टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्या शाखांतर्गत 'इतिहास' विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीसाठी
सादर करण्यात आलेला प्रबंध

# ''सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास''

## (इ. स. १९७२ ते इ. स. २००२)

संशोधक

**श्री. अनिल सितराम जगताप**
एम. ए.

मार्गदर्शक

**डॉ. दिपक एस. गायकवाड**
एम. ए., एम. फिल., पीएच. डी. (जे. एन. यु. नवी दिल्ली)
प्रोफेसर व इतिहास विभाग प्रमुख
पुणे विद्यापीठ, पुणे

ऑगस्ट २०१०

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत 'इतिहास' या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) या पदवीसाठी **श्री. अनिल सिताराम जगताप** यांनी **''सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास'' (१९७२ - २००२)** या विषयावरील शोध-प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

स्थळ : पुणे

दिनांक : ऑगस्ट २०१०

**मार्गदर्शक**

**डॉ. दिपक एस. गायकवाड**

एम.ए., एम. फिल. पीएच. डी.

(जे. एन. यु.) नवी दिल्ली

**प्रोफेसर व इतिहास विभागप्रमुख**

**पुणे विद्यापीठ, पुणे**

# प्रतिज्ञापत्र

मी **श्री. अनिल सिताराम जगताप** प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या **''सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास'' (१९७२-२००२)** हा माझा स्वत:चा शोध-प्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

स्थळ : सातारा

दिनांक : ऑगस्ट २०१०

**संशोधक विद्यार्थी**

**श्री. अनिल सिताराम जगताप**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे अंतर्गत पीएच. डी. पदवीसाठी मी निवडलेल्या शोध-प्रबंधाचा विषय ''सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीचा अभ्यास'' (१९७२ - २००२) असा असून यामध्ये सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीत काम करणाऱ्या विविध संघटना, राजकीय पक्ष व त्यातील नेते, कार्यकर्ते यांच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

वरील विषयावरील सदरचा प्रबंध सादर करीत असताना संशोधनाच्या प्रारंभापासून प्रबंध पूर्ण होईपर्यंत ज्या सर्वांनी मौलिक सहकार्य केले त्यांचा उल्लेख करणे मी माझे परमकर्तव्य समजतो.

मला संशोधक म्हणून स्वीकारून प्रबंधाच्या विषय निश्चितीपासून ते संशोधन पूर्ण होईपर्यंत अत्यंत मौलिक मार्गदर्शन करणारे माझे मार्गदर्शक डॉ. दिपक गायकवाड यांच्या ऋणात रहाणे मी पसंत करतो. त्यांनी दिलेल्या बहुमोल सहकार्यामुळे व वेळोवेळी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचनांमुळेच माझ्याकडून हे संशोधनाचे काम पुर्ण होऊ शकले. श्री. जयंत उथळे व प्रा. डॉ. एस. पी. शिंदे यांनीही मला वेळोवेळी सर्व प्रकारचे सहकार्य केले, त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

संशोधनासाठी कागदपत्रे, फोटो जमा करण्यासाठी वेळोवेळी मदत करणारे शाहीर मनोहर पवार, तसेच सातारा जिल्हा दलित चळवळीतील सर्व नेते, कार्यकर्ते यांनीही मला वेळ दिला, मुलाखती दिल्या. केवळ त्यांच्यामुळेच संशोधनाचे काम लवकर झाले. म्हणून त्यांचे आभार मानतो.

संशोधनाचे कार्य पूर्ण करत असताना मला सतत मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे माझे ज्येष्ठ बंधू प्राचार्य डॉ. अरुण गाडे यांचाही मी सदैव ऋणी आहे.

संशोधन करीत असताना ज्यांनी मला नेहमी प्रेरणा दिली ते माझे वडील दिवंगत सिताराम जगताप, ज्यांचे आशिर्वाद सतत पाठीशी आहेत ते ज्येष्ठ बंधू श्री. सुनिल जगताप - विस्तार अधिकारी ( पं. स. वाई), मेहुणे श्री. गुणवत सोनावणे, तसेच या वाटचालीमध्ये वेळोवेळी सक्रीय

सहकार्य देणारी व संसारातील जबाबदारी सांभाळणारी माझे पत्नी सौ. हेमलता, माझी दोन्ही मुले कु. समता व सिद्धांत अशा सर्वांच्या मानसिक पाठबळामुळेच मी हे संशोधनाचे काम पूर्ण करू शकलो.

ज्यांच्या कार्यामुळे सातारा जिल्ह्यात दलित चळवळी वेगाने वाढल्या, कार्यकर्त्यांना दिशा मिळाली ते या जिल्ह्यातील दलित चळवळीचे नेते मा. पार्थ पोळके व पद्मश्री लक्ष्मण माने यांनीही खूप सहकार्य कले, वेळ दिला, चर्चा केली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

तात्त्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. विजय कारेकर, इतिहास विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. श्रद्धा कुंभोजकर व सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील सर्व प्राध्यापक, पीएच. डी. विभागातील डॉ. सु. गो. पाटील यांचाही मी आभारी आहे.

तसेच प्रबंधाचे टंकलेखनाचे काम करणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, सातारचे श्री. मुकुंद ढवळे व त्यांचे सहकारी श्री. कुलकर्णी यांनी सुबकरित्या व योग्य वेळेत प्रबंध पूर्ण करून दिल्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

स्थळ : सातारा

दिनांक : ऑगस्ट २०१०

**श्री. अनिल सिताराम जगताप**

**संशोधक**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | अध्यायाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रतिज्ञापत्र | I |
| | प्रमाणपत्र | II |
| | ऋणनिर्देश | III |
| | अनुक्रमणिका | V |
| प्रकरण – १ | प्रस्तावना – भारतीय दलित चळवळीचा इतिहास | १ ते २८ |
| प्रकरण – २ | क्रांतिबा जोतीराव फुले व राजर्षी शाहू महाराज | २९ ते ४९ |
| प्रकरण – ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९१९ ते १९५६) | ५० ते ६८ |
| प्रकरण – ४ | भारतीय रिपब्लिकन पक्ष व त्याची वाटचाल (१९५६ ते १९७२) | ६९ ते ९३ |
| प्रकरण – ५ | दलितांच्या चळवळी (१९७२ ते २००२) | ९४ ते १७० |
| प्रकरण – ६ | सातारा जिल्हा : महाराष्ट्राच्या इतिहासातील या जिल्ह्याचे योगदान | १७१ ते १८८ |
| प्रकरण – ७ | सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ (१९७२-२००२) | १८९ ते २६९ |
| प्रकरण – ८ | उपसंहार | २७० ते २८२ |
| संदर्भ ग्रंथसूची | | २८३ ते २९४ |
| परिशिष्ट – | सहा दशकांची दलित चळवळ | २९५ ते ३०६ |

# प्रकरण - १

# प्रस्तावना : भारतीय दलित चळवळीचा इतिहास

## १. प्रस्तावना :-

आधुनिक भारताच्या इतिहासात सातारा जिल्हा हा महत्त्वाचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने देशपातळीवर यशवंतराव चव्हाण यांच्यासारखे नेतृत्व दिले आहे. छ. शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास याच जिल्ह्यामध्ये निर्माण झाला. प्राचीनकाळी अनेक बौद्ध भिख्खू याच साताऱ्यातील कराडच्या आगाशिवच्या डोंगरावर येऊन ध्यान साधना करीत असल्याचे पुरावे आहेत. स्वातंत्र्याच्या आंदोलनात भारतामध्ये पत्रीसरकार स्थापन झाले तोच हा जुना सातारा सांगली जिल्हा होय. १८५७ मध्ये साताऱ्याच्या १७ क्रांतिकारकांना फासावर लटकविले तो फाशीचा वड आजही त्याची साक्ष देत आहे.

ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांची ही भूमी आहे. भारतरत्न डॉ. आंबेडकरांचे बालपण व प्राथमिक शिक्षण याच साताऱ्यात झाले. परिवर्तनाच्या लढ्यामध्ये सदैव अग्रेसर राहिलेला हा सातारा जिल्हा आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राला दिशा दिली ती रयत शिक्षण संस्था याच सातारा जिल्ह्यात काले येथे स्थापन झाली. आज महाराष्ट्राला वैचारिक दिशा देणारे थोर विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे, अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोळकर, महाराष्ट्रातील भटक्या जातीचे नेते लक्ष्मण माने, विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे अध्यक्ष पार्थ पोळके हे सर्वजण साताऱ्यातील आहेत.

अशी वैचारिक भूमिका असलेल्या साताऱ्याचा अभ्यास करीत असताना जाणीवपूर्वक सातारा जिल्ह्यातील दलितचळवळीचा अभ्यास हा विषय निवडलेला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मानवमुक्तीची संकल्पना व मानवतावादी भूमिका घेवून आंबेडकरी चळवळी साताऱ्याात निर्माण झाल्या, त्या दलित शोषित चळवळीचा अभ्यास करून महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीला एक नवी दिशा मिळावी म्हणून या विषयाच्या अनुषंगाने माहिती गोळा करीत असताना प्रबंधासाठी हा विषय निवडला गेला.

## २. प्रबंधाचे नांव :-

१९७२ मध्ये भारतीय स्वातंत्र्याचे रजत वर्ष देशभर सुरू झाले होते. याच वेळी या स्वातंत्र्याच्या रजत वर्षाला गधे वर्ष अशी विडंबनात्मक उपाधी दलित भटके शोषित कार्यकर्ते लावत होते. १९७२ नंतर शिक्षण घेतलेली पिढी स्वातंत्र्याचा अर्थ शोधू लागली. स्वातंत्र्याने दलित समाजाचा भ्रमनिरास केला आहे. त्यातच दलित जाणीवांचा विकास होऊ लागला होता. ते स्वत:चा आत्मशोध घेऊ लागले. आर्थिक स्वावलंबनासाठी प्रयत्न करू लागले. त्यातही अपयश आल्यानंतर अस्मिता शोधाचे लढे निर्माण केले पाहिजेत आणि सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात परिवर्तन घडविले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. आपण माणूस आहोत. माणसाचे हक्क व अधिकार आपल्याला मिळाले पाहिजेत म्हणून भौतिक प्रश्नासाठी ही त्यांनी लढे सुरू केले. त्यांची सांस्कृतिक चळवळ आत्मउद्धारासाठी, स्वाभिमानासाठी होती.

आपल्या अवनतीला ब्रिटीशच जबाबदार आहेत असे सुरूवातीला वाटत होते. पण स्वातंत्र्यानंतरही उपेक्षा झाली. सुराज्य निर्माण झाले नाही. उलट स्वकीय सवर्णांच्या अत्याचाराने हा समाज पिचला गेला. स्वातंत्र्यानंतर सकारात्मक प्रयत्न होतील. अशी अपेक्षा होती. पण त्या ध्येय उद्दिष्टांचा भ्रम निरास झाला म्हणून आपल्या हक्कासाठी आपल्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी काही ध्येयवादी कार्यकर्त्यांनी फुले, आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून दिले व उपेक्षित घटकांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी लढे उभारले. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे आहे. म्हणूनच त्यांनी केलेल्या सामाजिक व राजकीय चळवळींचा हा अभ्यास आहे.

## ३. प्रबंधाचा उद्देश :-

१९७२ नंतरचा कालखंड हा लोकांचा सामाजिक कार्यावरचा विश्वस डळमळित होण्याचा कालखंड होता. जातिजातीतील सत्ता संघर्ष तीव्र होऊ लागला. सत्ता स्पर्धा तीव्र होऊ लागली. लोकशाहीमुळे राजकीय व आत्मिक सत्ता केंद्र निर्माण झाले. समुहांचे राजकीय प्रतिनिधीत्त्व वाढले. शिक्षणामुळे, स्वातंत्र्यामुळे व राजकीय सक्षमीकरणामुळे सामान्य लोकांच्या राजकीय

अपेक्षा वाढल्या. पण प्रस्थापित लोकशाहीच्या मर्यादा होत्या, त्या दलितांना सामावून घेऊ शकत नव्हत्या. सत्तेचे पुर्नवाटप होत होते. पण संपत्तीचे फेरवाटप झाले नाही. रोजगाराच्या संधी वाढवण्यात सत्ताधाऱ्यांना अपयश आले. त्यामुळे आर्थिक विकास झाला नाही. सहकार चळवळीने आप्तेष्टांचे हितसंबंध जोपासले. त्यामुळे निराश झालेला दलित तरूण आंबेडकरांच्या उपदेशानुसार रोजगार व शिक्षणासाठी शहरांमध्ये स्थलांतरित झाला. त्यामुळे दलितांच्या जाणिवांचा विकास झाला. आपल्या गावाकडची परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. हे शिक्षणामधून आत्मभान आले. इथल्या व्यवस्थेने केलेला भ्रमनिरास व त्यामुळे आलेले वैफल्य या असंतोषाला संघटनात्मक स्वरूप देण्याचा प्रयत्न १९८० च्या दशकात मोठ्या प्रमाणात सुरू झाला. याचवेळी राजकीय सत्ताधाऱ्यांनी आंबेडकरी चळवळीच्या नेत्यांना सत्तासहभागाच्या नावाखाली भ्रष्ट करून ठेवले व या नेत्यांनी दलित समाजाच्या मुलभूत प्रश्नांना हात घालण्याऐवजी मर्यादित सत्ता सहभागास कवटाळले.

१९७२ मध्ये मुंबईत दलित-सवर्ण दंगल झाली. यावेळी खेड्यातला दलित तरूण मुंबईमध्ये आला होता. परंतु व्यवस्था त्याला सामावून घेत नव्हती. याच दरम्यान भूमिपुत्रांच्या आर्थिक मागण्यासाठी मुंबईला शिवसेनेची चळवळ सुरू झाली होती. या चळवळीचे सर्वच तरूणांना आकर्षण होते, पण ही चळवळ फसवी होती. सत्ताधाऱ्यांनी या चळवळीचा वापर कामगार चळवळ मोडून काढण्यासाठी केला व शिवसेनेने १९६० नंतर जातीयवादी मुखवटा धारण करून दलित विरोधी भूमिका घेण्यास सुरूवात केली. आरक्षण व हिंदूत्ववाद्यांमुळे वरळी येथे दंगल झाली. शिवसेनेच्या गुंडगिरीला प्रतिकार करण्यासाठी दलित पँथरची स्थापना झाली. दलित पँथरचे प्रारंभीचे कार्यक्षेत्र मुंबई पुरतेच मर्यादित होते. त्यानंतर अन्यायाविरुद्ध संघटित होण्याची प्रेरणा ग्रामीण तरूणांना मिळाली. जातीय विषमता सोसणारा तरूण वर्ग जाब विचारू लागला. व्यवस्थेविरुद्ध दलित तरूणांचा असंतोष संघटित करून त्याला परिवर्तनाच्या व्यापक लढाईमध्ये उतरवण्यासाठी व्यापक परिवर्तनाचा विचार मांडण्यास सुरूवात झाली होती. पण सर्वच परिवर्तनवादी संघटनेमध्ये ऐरणीवरचा प्रश्न सामाजिक समता हाच होता आणि या लढ्यामध्ये सहभागी कार्यकर्ते हे प्रामुख्याने दलित भटके ओ. बी. सी. घटकातले होते.

या पार्श्वभूमीवर पश्चिम महाराष्ट्रात सातारा जिल्हा हे मुख्य कार्यक्षेत्र निवडून या कार्यक्षेत्रात परिवर्तनाच्या लढाईमध्ये जाणीवपूर्वक आक्रमकपणे दोन नेते उभे राहिले. या दोन्ही नेत्यांनी कधी स्वतंत्रपणे तर कधी एकत्रितपणे दलितांच्या भटक्यांच्या प्रश्नावरती अनेक लढे आंदोलने उभी केली व त्याचवेळी दलितांच्या विविध जातवार संघटनांनी त्यांना सहकार्य केले. म्हणूनच अशा वादळी व्यक्तिमत्त्व असलेल्या पार्थ पोळके व लक्ष्मण माने या नेत्यांच्या चळवळीचा शोध घेणे गरजेचे आहे.

## ४. प्रबंधाची उद्दिष्टे :-

१) दलितांच्या सामाजिक व राजकीय चळवळीच्या स्थित्यंतराचा आढावा घेणे.

२) या स्थित्यंतरामध्ये सहभागी असणाऱ्या समाज घटकाचाआणि लोकचळवळीची माहिती नव्या पिढीसमोर आणणे.

३) दलित चळवळीतील नेत्यांच्या कार्यपद्धतीचे मूल्यमापन करणे.

४) चळवळीमधून उपलब्ध झालेली सामाजिक व राजकीय शक्ती अभ्यासणे.

५) दलित सामाजिक आणि राजकीय चळवळीमधील सर्वसामान्य जनतेच्या सहभागाचा अभ्यास करणे.

## ५. गृहिते (पुरावे) : -

१) हे दोन्ही दलित नेते साहित्याच्या चळवळीतून आले असल्यामुळे त्यांनी लिहिलेले राजकीय सामाजिक लिखाण प्रकाशित झालेले आहे.

२) चळवळीच्या वेळी केलेली आंदोलने यांचे वृत्तपत्रीय व संशोधनात्मक लेखन झाले आहे.

३) विविध नियतकालिकांनी यांच्या सामाजिक लढाईची दखल घेतली आहे.

४) चळवळीत काम करणाऱ्या समकालीन कार्यकर्त्यांच्या मुलाखती उपयुक्त आहेत.

५) अनेक नेत्यांनी निर्माण केलेल्या संस्थांचे व संघटनांचे वार्षिक अहवालात माहिती मिळते.

६) सरकारी दप्तरात, पोलिस दप्तरात नोंदी आहेत, तसेच जेलमधील रेकॉर्ड आहे.

सातारा जिल्ह्यातील महाराष्ट्राच्या व देशाच्या दृष्टीने या नेत्यांच्या चळवळीने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याचे समाजकारणावर व राजकारणावर दूरगामी परिणाम झाले आहेत.

विविध समाज घटकांचा गुणात्मक विकास घडविण्यासाठी १९ व्या शतकापासून प्रयत्न चालू आहेत. त्यांच्या कार्याचा परिणाम म्हणूनच आज महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय वातावरण पुरोगामी जागरूक आणि विकासाधुनिक राहिले आहे.

## ६. प्रबंधाची व्याप्ती :-

या प्रबंधातील दलित चळवळीच्या नेत्यांनी आपली चळवळ मुख्यत: सातारा जिल्हा व पश्चिम महाराष्ट्रापुरतीच ठेवली होती. कारण त्यांचे लढे हे सातारा जिल्ह्याच्या आसपासच्या भागातच झालेले दिसून येतात. काही नेते साताऱ्यामध्येच नोकरी करत होते. त्यामुळे सुरूवातीला त्यांची आंदोलने साताऱ्याजवळच्या भागातच जास्त होती. त्यांनी नोकऱ्या सोडून देऊन पूर्ण वेळ चळवळीत झोकून दिले. पुढे त्यांची आंदोलने प्रत्येक ग्रामीण भागात झालेली दिसून येतात.

## ७. प्रबंधाच्या मर्यादा :-

सामाजिक परिवर्तन ही खूपच व्यापक प्रक्रिया आहे. त्यामध्ये अनेक घटकांचा आणि घटनांचा समावेश होतो. एवढ्या सर्व घटकांचा आणि घटनांचा आढावा घेणे हे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे सामाजिक परिवर्तनासाठी आवश्यक असणारी सूत्रे आणि घटक डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या पुराव्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्राला ३०० ते ४०० वर्षांची परंपरा आहे. एवढा मोठा व्यापक इतिहास अभ्यासण्याची या प्रबंधात आवश्यकता वाटत नाही. या प्रबंधातील ऐतिहासिक काळ हा सन १९७२ ते २००२ म्हणजे साधारणपणे दलित पँथरच्या उदयापासून ते जागतिकीकरणाच्या सुरूवातीपर्यंतचा आहे.

## प्रबंधातील प्रकरणे :-

१. **प्रस्तावना – भारतीय दलित चळवळीचा इतिहास** – या प्रकरणात प्रबंधातील प्रस्तावना सुरूवातीला दिलेली आहे. त्यामध्ये प्रबंधाचे नाव, प्रबंधाचा उद्देश, प्रबंधाची उद्दिष्टे, गृहीते, प्रबंधाची व्याप्ती, प्रबंधाच्या मर्यादा, प्रबंधातील प्रकरणे व प्रबंधाची सैद्धांतिक चर्चा प्रस्तावनेत दिलेली आहे.

तसेच मानवी इतिहासात जगाच्या पाठीवर भारताचे वेगळेपण आहे. कारण फक्त जातीव्यवस्था भारतामध्येच आहे. अशा दलित अतिशुद्र जातीच्या चळवळीची माहिती, चळवळ कशी सुरू झाली, ती मानवमुक्तीपर्यंत कशी गेली व जातीव्यवस्था कशी निर्माण झाली याची मांडणी केली आहे.

२. **महात्मा जोतीराव फुले व राजर्षी शाहू महाराज** - या प्रकरणामध्ये दलित चळवळीचा भारतात उगम झाल्यानंतर दलितांच्या प्रश्नांची कोंडी फोडण्याचे काम प्रथम म. फुले यांनी सुरू केले. दलितांच्या मागासलेपणास जबाबदार इथले धर्मग्रंथ आहेत. म्हणून त्यांनी धर्मग्रंथांची चिकित्सा केली व त्यानंतर शिक्षणाचा आग्रह धरला. त्यांनी प्रथम भारतात पुण्यामध्ये दलितांसाठी व स्त्रियांसाठी शाळा काढल्या. दलितांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराज यांनीही दलित बहुजन समाजासाठी मोफत शिक्षण सुरू केले. नोकरीमध्ये त्यांना ५०% आरक्षण ठेवले. दलितांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडविण्याचे काम शाहू महाराजांनी केले. याची चर्चा या प्रकरणात केली आहे.

३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर – १९१९ ते १९५६** - दलितांच्या मुक्तीची खरी प्रेरणा २० व्या शतकात निर्माण झाली, ती म्हणजे डॉ. आंबेडकर होय. डॉ. आंबेडकरांचे जीवनचरित्र व त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडी, त्यांनी निर्माण केलेली चळवळ, धर्मग्रंथाची चिकित्सा व शेवटी भारतीय राज्यघटना निर्माण करून शोषित दलित समाजाची मुक्ती केली व त्यांना बुद्धाच्या मानवतावादी भूमिकेकडे घेवून गेले. याची चर्चा या प्रकरणात केलेली आहे.

४. **भारतीय रिपब्लिकन पक्ष (१९५६ ते १९७२)** - डॉ. आंबेडकरांनी आपले निर्वाण होण्यापूर्वी दलितांच्या मुक्तीसाठी एका नव्या राजकीय पक्षाची मांडणी लिहून ठेवली होती. तो म्हणजे रिपब्लिकन पक्ष होय. आंबेडकरांच्या नंतर त्यांच्या अनुयायांनी तो पक्ष स्थापन केला व लगेच नेतृत्वावरून फुटला. त्यांचे गटातटात विभाजन झाले. व मूळ उद्दिष्टापासून तो कसा बाजूला गेला याची मांडणी या प्रकरणात केलेली आहे.

**५. दलितांच्या चळवळी - १९७२ ते २००२** - रिपब्लिकन पक्षाला आलेली ग्लानी व दलितांच्या प्रश्नापासून बाजूला जावून राजकीय सत्तेत सहभागी झालेला हा पक्ष महाराष्ट्रातीलनवीन शिकलेल्या दलित तरूणांना खटकू लागला. म्हणून त्यांनी दलितांवरील अन्याय अत्याचार रोखण्यासाठी एका जहाल गटाची उभारणी केली.

**५.१ दलित पँथर** :- दलित पँथरनी आपल्या लढावूपणाने संपूर्ण समाजाचे लक्ष वेधून घेतले व भक्कमपणे तो उभा राहिला. पण अंतिम उद्दिष्टाकडे पोहचू शकला नाही. याची मांडणी यात केली आहे.

**५.२ भारतीय रिपब्लिकन पक्ष** :- या देशाची राज्यव्यवस्था ताब्यात घेतल्याशिवाय दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत म्हणून डॉ. आंबेडकरांचे नातू प्रकाश आंबेडकर यांनी भारिप स्थापन केला. त्याची कामगिरी या प्रकरणात आहे.

**५.३ बहुजन महासंघ** :- केवळ दलित मतांवर राजकीय सत्ता मिळणार नाही तर बहुजन समाजाची मते आवश्यक आहेत. म्हणून प्रकाश आंबेडकांनी बहुजन समाजातील विविध वर्गास जागृत केले व त्यांचा बहुजन महासंघ स्थापन केला. या बहुजन महासंघाने अकोला पॅटर्न कसा राबविला याची माहिती या प्रकरणात आहे.

**५.४ बहुजन समाज पक्ष** :- डॉ. आंबेडकरांची ध्येय उद्दिष्टे महाराष्ट्रातील आंबेडकरी समाज विसरला आहे. म्हणून पंजाबमधील मा. काशीराम यांनी ८५% बहुजन समाजाला देशपातळीवर संघटित केले व जयभिमचा नारा देत निळा झेंडा हाती घेवून फुले-शाहू-आंबेडकरी विचारधारा देशपातळीवर पोहचवली व उत्तरप्रदेशची सत्ता ताब्यात घेतली व अनेक योजना दलितांसाठी राबविल्या याची माहिती या प्रकरणात आहे.

**६. सातारा जिल्हा - महाराष्ट्राच्या इतिहासातील या जिल्ह्याचे योगदान** - या प्रकरणात सातारा जिल्ह्याची भौगोलिक माहिती, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक माहिती व जिल्ह्याचा इतिहास तसेच या जिल्ह्यातील दलित चळवळीची पार्श्वभूमी काय होती याची चर्चा या प्रकरणात करण्यात आलेली आहे.

७. **सातारा जिल्ह्यातील दलितांच्या चळवळी - (१९७२-२००२) -** ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या सातारा जिल्ह्यात दलित चळवळी कशी निर्माण झाल्या, आंबेडकरी चळवळीतील लोक खेड्यापाड्यात कसे पोहचले व सातारा जिल्ह्यात सामाजिक प्रबोधन, परिवर्तनाची चळवळ कशी वाढली याची चर्चा या प्रकरणात केली आहे.

सातारा जिल्ह्यात अनेक वेगवेगळ्या स्तरावर सामाजिक परिवर्तनाचे लढे चालू होते. जातीयवादाला बळी पडलेला समूह, तर सवर्ण असलेला बहुजन समाज यांनी सातारा जिल्ह्यात सामाजिक परिवर्तनाला कशी दिशा दिली व ही चळवळ परिवर्तनाच्या दिशेने कशी गेली याची चर्चा आहे. दलित नेतृत्व कसे उभे राहिले व उद्दिष्टापसून बाजूलाकसे गेले याची मांडणी केली आहे.

८. **उपसंहार** :- यामधे एकूण सर्वच दलित चळवळीची मिमांसा केली आहे. मानवी जीवन सुखकर, आनंदी बनवायचे असेल तर सर्वच मानवी समुह स्वतंत्र व गुलामगिरीमुक्त असले पाहिजेत. याची मांडणी उपसंहारमध्ये केली आहे. केवळ दलित कार्यकर्त्यामुळे ही सामाजिक चळवळ स्वाभिमानाने उभी राहिली याची मांडणी केली आहे. तसेच प्रबंधातील प्रत्येक प्रकरणाचा गोषवारा घेतला आहे.

**सैद्धांतिक चर्चा :-**

भारतीय समाज व्यवस्थेला फार प्राचीन इतिहास आहे. आजच्या भारतीय समाजाला कुंठितपणा येण्याचे एक वेगळे कारण आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून ते आजपर्यंत सामाजिक परिवर्तनाची चळवळ निर्माण झाली. पण अपरिवर्तनीय विचारधारा त्याच वेगाने बदलाचा विचार नष्ट करण्याचा प्रयत्न करते आहे. इ. स. पूर्व अडीच हजार वर्षापूर्वी भारतीय समाज हा मातृसत्ताक, शेतीप्रधान, गणराज्य व्यवस्था, अहिंसावादी होता. अरबस्थानातून आर्यांच्या रानटी टोळ्या घोड्यावर बसून आल्या व त्यांनी आपली संस्कृती अनार्यांवर लादली. कर्मकांड, पशुहत्या, यज्ञ परंपरा यामधून त्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले व अनार्यांना गुलाम बनविले. आर्यांना लिपीची माहिती नव्हती. त्यांचे ज्ञान मौखिक पद्धतीचे होते. हा कालावधी बुद्ध पूर्वीचा आहे. वर्धमान

महावीरांनी या आर्य परंपरेला आपल्या पराकोटीच्या अहिंसा तत्त्वज्ञानाने आव्हान दिले. पण यज्ञ संस्कृती व पुरोहितशाहीमुळे वर्णव्यवस्था त्यांना मोडता आली नाही. भारतीय समाजात आर्यांच्या वर्णव्यवस्थेने आपले वर्चस्व निर्माण केले. या वर्णव्यवस्थेला धार्मिक व तात्त्वीक पद्धतीचे कडवे आव्हान भगवान गौतम बुद्धाने दिले. बुद्धाने आर्यांचा कर्म विपाकाचा सिद्धांत नाकारला. आत्म्याचे अमरत्व नाकारले व मानवतावादी भूमिकेतून धर्माला उभे केले. वर्णव्यवस्थेविरोधी मांडणी केली. आर्यांचे सनातन तत्त्वज्ञान मानवाच्या अकल्याणाला जबाबदार आहे. त्यामुळे भारतात एक फार मोठी बौद्ध धर्माच्या विचारांची चळवळ उभी राहिली. जागतिक इतिहासात भारताची वैज्ञानिक, व्यापारी व सांस्कृतिक क्षेत्रात फार मोठी आघाडी निर्माण झाली. हिंदूवाद, कर्मकांड हे थोतांड आहे हे त्यांनी पटवून दिले. बुद्धानंतर बुद्धपरंपरा नाकारणारी मनुस्मृती संहिता निर्माण झाली व या मनुस्मृतीने सांस्कृतिक दहशतवाद निर्माण केला.

इ. ६ व्या शतकात महंमद पैगंबराचा जन्म झाला व त्यानंतर अरब देशात फार मोठी परिवर्तनाची लाट निर्माण झाली. पुढे युरोपियनांचा कॉन्सटंटिनोपाल येथे पराभव झाला. त्यामुळे इस्लामांमध्ये आत्मप्रौढी निर्माण झाली. तर युरोपियनांनी आपल्या पराभवामधून अनेक नवीन गोष्टी स्विकारल्या. औद्योगिक क्रांतीचा फायदा घेऊन त्यांनी फार मोठे आर्थिक बदल घडवून आणले. जागतिक इतिहासात या घटना घडत असतानाच त्याचे बरेच पडसाद भारतात उमटत होते. परकियांच्या आक्रमणामुळे अनेक नवे विचार भारतीयांनी स्विकारले. यातूनच पुढे महाराष्ट्रात चक्रधर स्वामींची परंपरा सुरू झाली. संत ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या विचारांवर मानवतावादी संत परंपरा निर्माण झाली. वेगवेगळ्या जातीजमातीमध्ये संत जन्माला आले. वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय यांनी समतेचा व मानवमुक्तीचा विचार येथे रूजविला. पुढे मुघलांच्या राजवटीत इथल्या क्षत्रियांना महत्त्वाचा जागा मिळाल्या. त्यामुळे सरदारांच्या मनात बंडाची उर्मी निर्माण झाली. पुढे शिवाजी महाराजांनी सर्व जाती-धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन स्वराज्य निर्माण केले व वतनदारी पद्धत नष्ट केली. त्यामुळे समाज ढवळून निघाला.

ब्रिटिश भारतात आल्यानंतर त्यांनी समान न्यायाची संकल्पना मांडली व उच्चवर्णियांच्या वर्ण वर्चस्वाला धक्का बसला. म्हणून १८५७ मध्ये इंग्रज विरोधी बंड झाले. महात्मा फुले म्हणतात

हे भट पांड्यांचे बंड होते. या उठावात सर्वात आघाडीवर ब्राह्मण समाज होता. या शेटजी भटजींच्या बंडाचे वतनदार संस्थानिक हे नेतृत्व करीत होते. पुढे महात्मा फुलेंनी ही परिवर्तनाची चळवळ वाढविली. पण उच्च वर्णियांनी इंग्रजांशी हातमिळवणी केली. इंग्रज व उच्चवर्णियांची युती तोडण्याचा प्रयत्न महात्मा फुले यांनी केला. धर्मव्यवस्था व जातीव्यवस्था यांनी हा समाज बांधला गेला. पुढे फुल्यांचा वारसा डॉ. आंबेडकरांनी आपल्या हातात घेतला. त्यांनी समाजाची नवीन मांडणी केली. ज्याप्रमाणे फुल्यांनी शाळा काढल्या, ग्रंथ लिहिले, चळवळी उभ्या केल्या त्याचप्रमाणे आंबेडकरांनी ही दलित भटक्यांची अस्मिता जागरूक केली व संघटित लढे उभे केले. सत्यशोधक समाज निर्माण केला. धर्माला वेगळा पर्याय दिला. हिंदुत्त्व विचारसरणी बरोबर प्रतिवाद करणे, मांडणी करणे, रचना प्रबोधन करणे, संघटन उभे करणे व संघर्ष करणे हाच धागा फुले आंबेडकरी विचारांचा होता. सर्व मानवजात समान आहे, त्यांचे कल्याण व्हावे, व अन्यायातून त्यांची मुक्तता व्हावी, यासाठी प्राचीन काळापासून सुरू असलेली वैदिक विरुद्ध अवैदिक ही लढाई पुढे दलित नेत्यांनी स्विकारली. आपल्या चळवळीची बाजू फुले आंबेडकरी विचारधारेशी निगडीत केली. दलित व भटक्यांचे प्रश्न सोडविणे, त्यांच्या विचारांची वैचारिक पातळी वाढविणे व समताधिष्ठित समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपली चळवळ राबवावी अशी या दलित चळवळीची मांडणी होती.

**पार्थ पोळके :-**

पार्थ पोळके यांची जडणघडण व त्यांचे प्रकाशित झालेले जीवनचरित्र ''आभरान'' या आत्मकथनात त्यांनी रेखाटले आहे. एकूणच त्यांच्या जीवनातील प्रवास हा अतिशय प्रतिकूल परिस्थितीशी सामना करीत झालेला आहे. अशातच त्यांनी स्वत:ला चळवळीत झोकून दिले. जातिव्यवस्था मोडण्यातील महत्त्वाचा टप्पा त्यांनी स्वत: आंतरजातीय विवाह करून पार केला. त्यामुळे पोळके यांनी समाजवादी युवक दल, समता आंदोलन, दलित पँथर, भिमसेना या क्रांतिकारी संघटनेत कार्य करताना व पुढे नेता म्हणून समाज परिवर्तनाचे काम केले.

मुंबई, पुणे, मराठवाडा या भागातील दलित नेते मोर्चे आंदोलने करीत होते. त्यांच्यामध्ये व पोळके यांच्यामध्ये महत्त्वाचा फरक आहे. पोळके यांनी रस्त्यावरच्या चळवळी करीत असताना

लोकांच्यात प्रेरणा निर्माण केली. त्यांची शिबिरे घेऊन वर्णव्यवस्था समजावून सांगितली. लोकांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला. साहित्याच्या क्षेत्रातही समाजातील दारिद्र्य व व्यथा मांडल्या. तसेच वैचारिक लेखन केले.

संघर्षात्मक काम करीत असताना संस्थात्मक कामे त्यांनी सुरू केली. समता शिक्षण संस्थेच्या माध्यमातून मुकबधिर, मतीमंद मुलांसाठी निवासी शाळा सुरू केल्या. दलित शेतकरी संघटना, युवकांची लढावू भिमसेना, झोपडपट्टीतील लोकांच्यासाठी पुनर्वसन असे अनेक उपक्रम राबविले. परिवर्तनवादी चळवळीची सैद्धांतिक मांडणी केली. डॉ. आंबेडकरांच्या नावाने पुढारीपण चालवणाऱ्या दलित नेतृत्वाला आव्हान देऊन त्यांनी समाजाची कशी फसवणूक केली आहे. याचीही मांडणी त्यांनी केली.

**लक्ष्मण माने :-**

दलित समाजाच्या वेदनेपेक्षाही भयानक वेदना सहन करणाऱ्या समाजातील दुसरा वर्ग म्हणजे भटके जाती जमाती. त्यांना राहण्यासाठी कोठेही जागा नाही. फक्त शरीरानेच माणूस असलेला पण पूर्णपणे पशुतुल्य जीवन जगणारा हा घटक होता. अशाच भटक्यांच्या समुहात लक्ष्मण माने यांचे नेतृत्व उभे राहिले. 'उपरा' हे त्यांचे आत्मकथन फार प्रसिद्ध झाले.

माने यांची जडणघडण समाजवादी कार्यकर्त्यांमध्ये झाली. त्यामुळे त्यांना फुले-आंबेडकरी चळवळीचे भान होते. त्यांच्या पूर्वी भटक्यांच्या चळवळीत काम करणारे काही कार्यकर्ते होते पण ते फक्त आर्थिक सुधारले होते. पण बौद्धिक क्षमता त्यांच्यात नव्हती. माने यांचे व्यक्तिमत्त्व हे वैचारिक बौद्धिक होते. रस्त्यावरच्या चळवळी उभ्या करीत असतानाच ते भटक्यांना जागरूक करीत होते. कधी कधी संघर्षात्मक लढे उभे करत होते. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मोठा वर्ग त्यांना मिळाला. भटक्यांना फुले, शाहू, आंबेडकर विचार त्यांनी समजून सांगितला. त्यामुळे भटके निळे झेंडे हातात घेऊन मोर्चा काढू लागले. समाजाचे भौतिक प्रश्न सोडवित असतानाच शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे म्हणून त्यांनी संस्थात्मक काम उभे केले. आश्रमशाळा समाजशास्त्र महाविद्यालय यामधून भटक्यांची अनेक मुले शिक्षण घेऊ लागले. भटक्यांच्या जात पंचायतीला आव्हान देऊन त्यांच्यातील अंधश्रद्धा नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

माने यांनी स्वत: आंतरजातीय विवाह करून जातीव्यवस्थेला व धर्म व्यवस्थेला आव्हान दिले. माने यांनी प्रबोधन, चिकित्सा, आंदोलन, अशा टप्प्यावर संघर्ष केला. दलित नेतृत्व हे समाजपासून दूर जात होते. अशा वेळी माने यांनी आपल्या भटक्या विमुक्तांची नाळ तोडली नाही. त्यामुळे या चळवळींचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

पार्थ पोळके व लक्ष्मण माने यांची वैचारिक विचारधारा ही फुले, शाहू, आंबेडकरवादी आहे व पुढे ती गौतम बुद्धाशी नाते जोडते व या विचारधारेला अनुसरूनच त्यांनी कार्य केले आहे. डॉ. आंबेडकर, म. फुले यांच्या कार्यपद्धतीप्रमाणे त्यांनी आपले कार्यपद्धती अवलंबली आहे. दोघांनी चळवळीमध्ये त्रिसूत्री वापरली.

**प्रबोधन, संघर्ष व रचनात्मक कार्य :-**

ही त्रिसूत्री वापरून विस्थापित समाजाला स्थिर करून त्यांच्यामध्ये आत्मभान निर्माण करण्याचा या नेत्यांनी प्रयत्न केला. अनेक कार्यकर्ते त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन या सामाजिक परिवर्तनाच्या लढाईत सहभागी झाले. भटक्या समाजाच्या मुखामध्ये त्यांनी जयभिमचा नारा उच्चारला. त्यामुळे पिचलेला वर्ग जागृत होऊन अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी तयार झाला. आज महाराष्ट्रात चळवळीच्या माध्यमातून उभे केलेले फार मोठे काम या नेत्यांचे आहे.

कोणत्याही नेत्याचे मुख्य उद्दिष्ट समाजाजगृती असले पाहिजे. जर नेत्यांना यांचे भान राहिले नाही तर चळवळ समाजाची न राहता नेत्यांची राहते. नेते मोठे होतात, समाज मात्र आहे तिथे राहतो. पुढे हे नेते प्रस्थापित होतात व नवीन कार्यकर्ते चळवळ म्हणजे प्रस्थापित होण्याचा मार्ग आहे. असे अनुमान काढून चळवळीत येतात. म्हणून चळवळ ही डबक्या सारखी न राहता तिने लोकांच्या प्रतिभा उंचावल्या पाहिजेत. तसेच नेत्याला एखादे आंदोलन किती ताणावे याचे भान असायला पाहिजे. व्यवस्था बदलाचे उद्दिष्ट खूप दूरवर असले तरीही उद्दिष्टापासून बाजूला न जाता व्यवस्था बदलण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत.

पोळके यांच्या विचाराने दलित चळवळीत अनेक कार्यकर्त्यांचा उदय झाला व पुढे त्यांनी स्वतंत्रपणे दलित चळचळ वाढवलेली दिसून येते. त्या कार्यकर्त्यांच्या कार्याचा अभ्यास केला आहे.

**१. पार्थ पोळके यांचे प्रकाशित साहित्य :-**

१) आभरान (आत्मकथन)

२) आम्ही बी माणसं हायं

३) गावकुसाबाहेरच्या बाया

४) हिंदू विरुद्ध वैदिक

५) रामदासांचे लिखाण व संताचे साहित्य

६) बहुजनांचा सांस्कृतिक संघर्ष

**२) लक्ष्मण माने यांचे प्रकाशित साहित्य :-**

१) उपरा (आत्मकथन)

२) बंद दरवाजा

३) पालावरच जग

४) प्रकाशपुत्र (नाटक)

५) विमुक्तायन

६) उध्वस्त

७) भटक्याचे भारूड

८) काय करायचं शिकून ?

९) क्रांती पथ (काव्यसंग्रह)

१०) 'बंद दरवाजा' (साप्ताहिक)

## भारतीय जातिव्यवस्थेची निर्मिती :-

जगाच्या इतिहासात भारतीय समाजाचे एक वेगळेपण दडलेले आहे. अतिप्राचीन काळामध्ये भारतात वसलेली सुजलाम्, सुफलाम् शेती व मानवी हित जपणारी संस्कृती केवळ वर्णव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या वरवंट्याखाली गाडली गेली. अशा भारतीय समाजात पिचलेला, दबलेला व मानवी जीवनापासून खूप दूर असलेला दलित समाज, शोषित समाज शतकानुशतके हे पशुहिन जीवन जगत राहिला. हा अचानक घडलेला बदल नसून ही बदलाची प्रक्रिया हजारो

वर्षांपासून चाललेली होती. त्यामुळे आज २१ व्या शकतात जग एवढे जवळ आले आहे. नव्या संकल्पना आल्या पण भारतात जातीय अभिनिवेश मात्र वाढतच राहिला. कधी कधी तो एवढा उफाळून येतो की, आपण नेमके कोणत्या शतकात आहोत असे प्रश्न निर्माण होतात. म्हणून भारतीय दलित चळवळीचा इतिहास पाहत असताना जगामध्ये अनेक देशात वर्णपद्धती, दासपद्धती होती. पण भारतात असलेली जातिव्यवस्था ही कर्म सिद्धांतावर आधारित होती. त्यामुळे तिच्यात बदल करताना अनेक प्रश्न निर्माण करण्यात आले व तिचे समर्थन करण्यात आले. या जातिव्यवस्थेचा मुख्य आधार धार्मिक होता, त्याची चर्चा होणे आवश्यक आहे.

भारतामध्ये इ. स. पूर्व काळात निर्माण झालेला संघर्ष हा दोन संस्कृतीमधील संघर्ष होता. हा संघर्ष म्हणजे स्वकीय असलेले अनार्य व परदेशातून आलेले आर्य यांच्यामध्ये होता. दलित समाज अस्तित्वात आल्यावर दलित चळवळ सुरू झाली. म्हणजे बुद्ध कालखंडात व्यवसायावरून मूल्यमापन सुरू झाले व त्यातूनजातिव्यवस्थेला सुरूवात झाली. भारतामध्ये अतिप्राचीन काळी आर्यांच्या काही रानटी टोळ्या घोड्यावर बसून आल्या. त्यांना शेतीची माहिती नव्हती. लुटालूट करणे एवढेच त्यांना माहिती होते. त्यांनी आपल्या शस्त्रांच्या साहाय्याने इथल्या मूळ निवासियांना गुलाम करण्यासाठी काही सांस्कृतिक बदल केले. त्यांनी चार वेदांची निर्मिती केली. सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद, ऋग्वेद या चार वेदामध्ये ऋग्वेद हा महत्त्वाचा वेद होता. या ऋग्वेदामध्येच वर्णव्यवस्था मांडली गेली. पण जातिव्यवस्था मांडली गेली नाही. पण ऋग्वेदाच्या चौथ्या मंडळातील पुरुषसुक्तामधील अकराव्या व बाराव्या ऋचा (श्लोक) आहेत. यात वर्णव्यवस्थेचे जातिव्यवस्थेत रूपांतर होण्यासाठी पुढे हजारो वर्ष लागली.[१] इ. स. २ ऱ्या शतकात मनुस्मृती निर्माण झाली. तोपर्यंत जातिव्यवस्थेची निर्मिती झाली होती. पण ती रूजलेली नव्हती. ही जातिव्यवस्था प्राचीन काळापासून आतापर्यंत कशी सुदृढ होत गेली ते पाहणे महत्त्वाचे आहे.

प्राचीन काळी इ. स. पूर्व ३ ऱ्या व ४ थ्या शतकात मौर्य घराण्यातील चंद्रगुप्त मौर्य राजा होऊन गेला. चंद्रगुप्त मौर्याच्या दरबारात एक चाणाक्ष सरदार होता. तो म्हणजे आर्य चाणक्य होय. आर्य चाणक्य हा कूट राजनीति तज्ञ होता. तसेच तो राज्यवादी विचारांचा होता, राज्य हेच सर्वश्रेष्ठ आहे. राज्य चालविण्यासाठी जे जे आवश्यक आहे ते ते त्याने केले. धर्म ही प्रत्येकाची

वैयक्तिक बाब आहे. धर्मापेक्षा राज्य श्रेष्ठ आहे. त्याने वर्णव्यवस्था बाजूला ठेवली व धनानंद या राजाला बाजूला करून चंद्रगुप्त मौर्य यास गादीवर बसविले. आर्य चाणक्याने गणराज्य मिळवण्यासाठी एक विभाग स्थापन केला होता. गणराज्ये मिळवण्यासाठी त्याने पुरोहितांना आमिषे दाखविली, पैसा दिला, त्यावेळी पुरोहित वर्गाने गणराज्याच्या गुप्त बातम्या सांगितल्या. म्हणजे पुरोहित वर्ग हा आमिषाला लगेच बळी पडणारा वर्ग आहे. म्हणून चाणक्याने पुढे आपल्या राज्यातील पुरोहित वर्गास महत्त्वाची पदे देऊ नका. कारण ते फार लवकर आमिषाला बळी पडतात असे मत मांडले.[२] म्हणजेच आर्य चाणक्य हा गणव्यवस्थेच्या विरोधात होता. त्या काळामध्ये लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. शेतीचा विकास व्हावा यासाठी चाणक्याने शेती करण्यासाठी अनेक गावे वसविली. गावे वसवत असताना गावातील शेतकऱ्यांना कारागिरांची गरज होती. म्हणून चाणक्याने आपल्या राज्यात परराज्यातील अनेक कारागीर यांना खेडेगावामध्ये पाठविले व शेतीसाठी शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण केल्या. यामधून ग्रामव्यवस्था अस्तित्वात आली. चाणक्याच्या म्हणजेच चंद्रगुप्त मौर्याच्या काळात जंगले तोडून शेती केली गेली. त्यामुळे शेतीचा विकास झाला. त्यामुळे शेती कसणाऱ्यांची संख्या वाढली. शेतीवरती काम करण्यासाठी मजुरांची आवश्यकता होती. त्या काळात शेतीवरती काम करण्यासाठी शत्रूंच्या राज्यातील पराजित लोकांना पकडून आणले जात होते व त्यांना दास बनवून शेतीवरती काम करण्यासाठी ठेवले जात होते. अशा भूदासांची संख्या वाढत गेली. अनेक जमीनदार, धनिक लोक आपल्या शेतीवरती, घरामध्ये काम करण्यासाठी भूदासांना ठेवू लागले. हे भूदास विनामोबदला काम करत होते. त्यांना कोणत्याही स्वरूपाचे मानधन नव्हते. फक्त खाण्यासाठी व राहण्यासाठी अतिशय मोजक्या सुविधा पुरविल्या जात होत्या. त्यामुळे भूदासांची अतिशय वाईट परिस्थिती होती.[३] त्याचा परिणाम त्यांच्या कामावरती होत होता. मोबदला मिळत नाही, गुलाम म्हणून वागविले जाते. यामुळे ते कमी काम करत होते व शेतीतील उत्पन्न कमी निघत होते. म्हणजेच आता ग्रामीण व्यवस्था गावकामगार, आलुतेदार, बलुतेदार यांनी बनलेली होती. व्यवसाय जन्मावरून पाडले जावू लागले म्हणजेच त्या काळात जातिव्यवस्थेला सुरूवात झाली होती. पण ती व्यावसायिक स्वरूपात होती.

इ. स. पूर्व ५ व्या शतकात प्राचीन काळामध्ये गौतम बुद्धाचा कालखंड सुरू झाला. बुद्धाच्या काळात गुलाम-दासांची संख्या प्रचंड वाढली होती. त्यांचे भयानक हाल होत होते. त्यामुळे ते प्रामाणिकपणे काम करीत नव्हते. त्याचा परिणाम शेतीच्या उत्पन्नावर होत होता. शेतीचे उत्पन्न घटले होते. म्हणून बुद्धांनी जमीनदार व धर्मनिष्ठ लोकांना एक मार्ग सांगितला. तुम्ही तुमच्या ताब्यातील सर्व दासांची मुक्तता करा. त्यांना पगारी चाकर ठेवा, ते मुक्त झाले, त्यांना पगार मिळू लागला की, शेतीवरती प्रामाणिकपणे काम करतील व शेतीचे उत्पन्न वाढेल. शेतीचे उत्पन्न वाढले की, समाजाचे उत्पन्न वाढेल व समाजाचे उत्पन्न वाढले की, राज्याचे उत्पन्न वाढेल व राज्य भरभराटीस येईल.[४] त्यामुळे धनिक जमीनदार खूष झाले व त्यांनी आपल्या शेतावरील भूदासांची मुक्तता केली. दास मुक्त झाल्यामुळे प्रामाणिकपणे काम करू लागले. त्यामुळे राज्याचे उत्पन्न वाढले. त्याचाच परिणाम होऊन अनेक जमीनदार, धार्मिक, व्यापारी राजे, प्रजा, व्यावसायिक कारागीर यांनी बुद्धांचा धम्म स्विकारला. म्हणजेच बुद्धांनी दुःखाचा अंत करता येतो हे सांगितले. बुद्धाच्या काळात व्यवसायानुसार प्रतिष्ठा ठरत होती. म्हणजेच बुद्धांच्या काळात जातिव्यवस्था निर्माण झालेली होती. पण ती ताठर नव्हती. व्यवसाय जन्मावरून ठरत होते. याकाळात जातीच्या दृष्टिकोनातून प्रक्रिया सुरू होती. परंतु जातिव्यवस्था बंदिस्त झालेली नव्हती. जातिव्यवस्थेचा आराखडा तयार झालेला होता. व्यवसाय जन्मानिष्ठित होते. व्यवसायानुसार समाजात मान-सन्मान होता. म्हणजे जातिव्यवस्थेला आवश्यक ती सर्व रचना तयार झालेली होती.

इ. स. दुसऱ्या शतकामध्ये मनुस्मृती निर्माण झाली. मनुस्मृतीतील वर्ण नियमाप्रमाणे कार्यवाही सुरू झाली. म्हणजेच जन्मावरून जातिव्यवस्था निर्माण झाली. येथून खऱ्या अर्थाने दलित चळवळीचा उदय झाला. चंद्रगुप्त मौर्यनंतर त्याचा मुलगा सम्राट अशोक सत्तेवर आला. त्याने आपली सर्व राज्यव्यवस्था बौद्ध धर्माच्या प्रसार-प्रचारासाठी वापरली व संपूर्ण भारतभर व भारताबाहेर बुद्धांचा विचार पसरविला. सम्राट अशोकानंतर त्याचा मुलगा ब्रहद्रत सत्तेवर आला. तो सुद्धा आपल्या वडिलांप्रमाणे धर्मप्रसारक होता. त्याचा सेनापती पुष्यमित्र शुंग हा ब्राह्मण होता. 'पुष्यमित्र शुंग' हा उच्चवर्णीय होता. त्याने ब्रहद्रत राजाचा खून केला व मौर्यांची सत्ता आपल्या

ताब्यात घेतली. पुष्यमित्र शुंग राजा झाला व त्याने मनुस्मृतीतील नियमाप्रमाणे राज्यकारभार करण्याचे जाहीर केले व मनुस्मृतीतील वर्णाप्रमाणे समाजाची रचना पक्की झाली.

ऋग्वेदामध्ये वर्णव्यवस्था आहे. जातिव्यवस्था नाही. ऋग्वेदाच्या ४ थ्या मंडळातील अकराव्या व बाराव्या पुरुषसूक्तामधील ऋचा (श्लोक) मध्ये चार वर्णव्यवस्था मांडलेल्या आहेत. त्याप्रमाणे वर्णाचे रूपांतर जातीमध्ये करण्यात आले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णातील ब्राह्मणांचा वर्ण मात्र बदलण्यात आला नाही. बाकीच्या तीन वर्णाचे रूपांतर जातींमध्ये करण्यात आले व हजारो जाती निर्माण झाल्या. जात ही जन्माधिष्ठित झाली. जातीचे नियम, शिक्षा मनुस्मृतीमध्ये सांगितलेल्या होत्या. त्या नियमांचे पालन करणे बंधनकारक होते.[५] जातीचे नियम मोडणाऱ्यांना भयानक शिक्षा होत्या. त्यामुळे जातीची ताठरता वाढली. पुष्यमित्र शुंग या राजाने तो स्वत: ब्राह्मण असल्यामुळे आपली राजवट मनुस्मृतीच्या नियमाने चालवली. त्यामध्ये स्त्रीविषयक देखील भयानक रचना करण्यात आली. स्त्रियांचे हक्क नाकारले. सर्वात शेवटचा वर्ग शुद्र होता. शुद्रांचे सर्व हक्क नाकारले गेले. शिक्षण व शस्त्र बाळगण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे शुद्र वर्गाची पिछेहाट झाली. या जातिव्यवस्थेला धर्माचा आधार देण्यात आला. त्यामुळे सर्व वर्गाची मानसिकता अशी झाली की, प्रत्येकाने आपल्या जातीचे नियम पाळणे मोक्षाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. वैदिक नियम पाळणे मोक्षाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. वैदिक धर्मातील वेदाप्रमाणे समाजाने जीवन जगावे तरच तुम्हाला मोक्ष मिळेल असे सांगण्यात आले. त्यामुळे प्रत्येक जात आपल्या जातीचे नियम पाळू लागली. समाजामध्ये भयानक जातिव्यवस्था मूळ धरू लागली. शुद्र वर्गाला पशुहिन जीवन जगावयास भाग पाडले.

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये एकूण नऊ दर्शन आहेत. त्यातील सहा दर्शने निरीश्वरवादी आहेत. तर तीन दर्शने ईश्वरवादी आहेत. सहा निरीश्वरवादापैकी, तीन दर्शने कट्टर निरिश्वरवादी होती. त्यामध्ये चार्वाक, बुद्ध व जैन, संख्य हे वैश्विक ईश्वर मानणारे होते.[६]

भारतीय तत्त्वज्ञानामध्ये ईश्वराला मानणे महत्त्वाचे नाही, तर वेदाला मानणे महत्त्वाचे आहे. वेदप्रामाण्यवादी असणे महत्त्वाचे आहे. ईश्वरप्रमाणवादी, शब्दप्रमाणवादी यापेक्षा वैदिक

धर्मियांना वेद प्रामाण्यवादी असणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच वेदामध्ये जे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे ते महत्त्वाचे आहे. त्यालाच आधार आहे. ब्रह्मसत्य जगनमिथ्य म्हणजे प्रत्यक्ष जीवनाला अनुभवायला येते ते खोटे आहे, तर ब्रह्म हेच सत्य आहे. ते मृत्यूनंतर समजते. आताची आपली सर्व परिस्थिती हि निमित्तमात्र आहे.''[७] असे तत्त्वज्ञान वेदामध्ये सांगितल्यामुळे जातिव्यवस्थेला आधार मिळाला व प्रत्येक जात आले जीवन मोक्षप्राप्तीसाठी जगू लागली. त्यांची मानसिकता अशी बनली की, आपण कोणीच नाही, जे दिसते ते अदृश्य आहे. दृश्य ब्रह्म आहे. त्यासाठी पुजाअर्चा, संन्यास मार्ग महत्त्वाचा आहे. अशी मानसिकता समाजाची निर्माण होऊ लागली.

याच दरम्यान इ. स. ७८८ मध्ये भारतात शंकराचार्यांचा जन्म झाला. त्यांना फक्त ३२ वर्षाचे आयुष्य लाभले. अलौकिक बुद्धिमत्तेचा मानव म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी वेदांना व वैदिक धर्माला अनुसरून सोयीचे कार्य केले. त्यांनी एकूण ३ ग्रंथ लिहिले व त्याचवेळी संपूर्ण भारतभर भ्रमंती केली. अनेक तात्त्विक वादविवाद केले व अनेक तत्त्वज्ञानी, विचारवंतांना वैचारिकदृष्टीने पराभूत केले. त्यानंतर त्यांनी वैदिक संस्कृती जिवंत राहण्यासाठी भारताच्या चारही बाजूला चार मठ स्थापन केले. त्यालाच हिंदूधर्माची धर्मपिठे असे नाव दिले. त्यास महत्त्व प्राप्त करून दिले. तत्कालीन अनेक बुद्धिवंतांवर त्यांचा प्रभाव पडला. वैदिक ब्राह्मणास सशक्त तर्कशास्त्र मिळाले. ब्राह्मणाच्या सोयीचा तर्क काढला गेला, त्यामुळे ब्राह्मणांनी वेदाला फार मोठे केले.[८] अशाप्रकारे प्राचीन काळापासून वेगवेगळ्या टप्प्यामधून जातिव्यवस्था मूळ धरू लागली. नंतरच्या काळात जातिव्यवस्थेने आक्राळविक्राळ रूप धारण केले. ही जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी प्राचीन काळात अनेक विचारवंत सुधारकांनी प्रयत्न केले.

शंकराचार्यांच्या निर्मितीनंतर मोठ्या प्रमाणात बौद्धधम्माला विरोध करण्यात आला. अनेक बौद्ध भिक्षू यांच्या सामुहिक हत्या करण्यात आल्या. बौद्ध अनुयायांचे हाल करण्यात आले. कारण बौद्ध परंपरा ही मानवतावादाचे समर्थन करणारी होती. जातिव्यवस्था नाकारणारी होती. अशा परिस्थितीत बौद्ध अनुयायी आपला प्राण वाचविण्यासाठी ओरिसा राज्यातील शल्यपर्वत येथे एकत्रित आले व तेथूनच त्यांनी नाथपंथाची निर्मिती केली.

## गोरखनाथांच्या नाथपंथाचा उदय :-

इ. स. ८ व्या शतकात गोरखनाथांनी नाथपंथाची निर्मिती केली. या पंथाचा प्रचार व प्रसार संपूर्ण भारतभर झाला. वैदिक धर्मातील संन्यासमार्गाला खोडून काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला. समाजात पसरलेल्या जातियतेला विरोध केला. त्याकाळात त्यांनी अनेक आंतरजातीय विवाह लावले. संन्याशाला लग्न करण्याचा अधिकार दिला. परंतु त्याला अट घातली. त्याने दलित स्त्रीबरोबरच विवाह करावा.[९] अशाप्रकारे नाथपंथाने ८ व्या शतकापासून ते ११ व्या शतकापर्यंत आपल्या विचारांचा प्रसार केला.

## नाथपंथी तत्त्वज्ञान :-

ब्राह्मणी वैदिक तत्त्वज्ञानाला नाथपंथाने आव्हान दिले. आत्मा खोटा आहे. पाप-पुण्य खोटे आहे. तीर्थस्थाने खोटी आहेत. नाथांनी व्यावहारीक तत्त्वज्ञान मांडले. गोरखनाथांच्या ‘गोरखवाणी’ या ग्रंथामधून त्यांनी जातियतेला विरोध करणारे विचार मांडले. या विचारांचा प्रसार काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत संपूर्ण भारतभर झालेला दिसून येतो.[१०] अशाप्रकारे मध्ययुगाच्या सुरूवातीला जातिव्यवस्थेला प्रखरपणे विरोध करून तात्त्विक मांडणी करण्याचे फार मोठे कार्य नाथपंथियांनी केलेले दिसून येते.

नाथपंथाची ही वैचारिक परंपरा पुढे १२ व्या शतकामध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांपर्यंत जाते. संत ज्ञानेश्वर यांचे वडील, चुलते हे सर्वजण नाथपंथीय होते. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांचा झालेला छळ हा संन्यासाची मुले म्हणून झालेला नाही तर ते नाथपंथाच्या विचाराचे होते म्हणून वैदिक धर्मीय ब्राह्मणांनी छळ केला आहे. संत ज्ञानेश्वराचे गुरू त्यांचे वडीलबंधू संत निवृत्तीनाथ होते. ते नाथपंथाचे होते. याकाळात जातिव्यवस्थेला अमर्यादित स्वरूप आले होते. जातिव्यवस्था पक्की झाल्यानंतर संतांची निर्मिती झाली.[११] भारतामधील आणि महाराष्ट्रातील सर्व व्यवस्था ब्राह्मणांच्या ताब्यात होती. अशावेळी महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या जातींमध्ये संतांचा उदय झाला होता. त्याचवेळी जगामधील वेगवेगळे धर्मप्रसारक भारतात आले होते. उदा. ख्रिश्चन, इस्लाम, शीख, पारशी इत्यादी. त्यामध्ये ख्रिश्चन, इस्लाम धर्मीय लोक आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार

करण्यासाठी भारतभर भटकत होते. त्यात इस्लाम धर्मातील अनलहक तत्त्वज्ञान म्हणजे तूच ब्रह्म आहे. प्रत्येक माणसामध्ये ब्रह्माचा अंश आहे. यातूनच सुफी संप्रदाय निर्माण झाला व त्यांचा प्रभाव भारतीयांवर पडला. भारतामध्ये राज्यकर्ते मुसलमान होते परंतु ते धर्मप्रसाराबाबत राज्यप्रसाराइतके आग्रही नव्हते. अनेक दलितांनी उत्स्फूर्तपणे जातिव्यवस्थेतून मुक्तता मिळवण्यासाठी इस्लाम, ख्रिश्चन धर्माचा स्विकार केला.[१२] त्याचवेळी अनेक वेगवेगळ्या जातिंमध्ये संत जन्माला आहे. त्यामध्ये संत नामदेव, एकनाथ, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, गोरा कुंभार, सेनान्हावी, चोखामहार, सावतामाळी, संत कबीर, संत रोहिदास इत्यादी.

या संत परंपरेने मानवतावादी भूमिका स्विकारली व सर्व जातिधर्माच्या लोकांना जवळ केले व जातियतेची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला. याच दरम्यान मोगली कालखंड संपलेला होता. छ.शिवाजी महाराजांची राजवट महाराष्ट्रामध्ये आलेली होती. त्यांनीही सर्व जातिधर्माच्या लोकांना आपल्या सैन्यात प्रवेश दिला. अनेक महत्त्वाची सैन्यातील पदे त्यांना दिली. त्यामुळे ही जातीची तीव्रता थोडी कमी झाली. प्रत्येक व्यक्तीच्या कर्तृत्वाला काही प्रमाणात संधी मिळाली. पुढे इंग्रजी अंमल भारतावर सुरू झाला व इंग्रजांनी केवळ राज्यकारभारात सुधारणा केल्या नाहीत तर येथे प्रशासन व्यवस्था, कायदे सुविधा, सामाजिक सुधारणा करण्यास सुरूवात केली. त्यासाठी त्यांनी भारतात इंग्रजी, मराठी शाळा सुरू केल्या. इंग्रजांनी त्यांच्या सोयीसाठी शक सुरू केला होता. त्याचाचांगला परिणाम झाला. भारतातील ख्रिश्चन मिशनरींनी धर्मप्रसार करीत असताना सेवाभावी काम करण्यास सुरूवात केली.[१३] याच काळात जातिव्यवस्थेने भयानक रूप धारण केले होते.

१८ व्या शतकात पेशवाईचा कालखंड आला. पेशवे हे अतिशय कर्मठ वृत्तीचे होते. त्यांनी काटेकोरपणे जातिव्यवस्थेचे पालन केले. शूद्र जातीच्यालोकांना भयानक त्रास दिला. त्यामुळे दलितांच्या विषयी तिरस्काराची भावना वाढतच गेली. एकूणच महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थिती भयानक, खालावलेली होती. ज्योतिष मुहूर्त, शुभशकुन, व्रते, नाम, जप, दान यांचे समाजात स्तोम माजले. व्रतवैकल्याचे नामजप, अनुष्ठान केल्याने पापक्षाल होते. तसेच धर्मगुरू, पंडित, शास्त्रे यांनाही मानवतेचा विसर पडला. मंत्र, तंत्र, जादूटोणा, भूतपिशाच्च विद्या यांना महत्त्व प्राप्त

झाले. अंधश्रद्धा, कर्मकांड, व्रतवैकल्य यांचा उपयोग पुरोहितांनी आपल्या फायद्यासाठी करून घेतला. ब्राह्मणांना दानधर्म करणे, त्यांना सहस्त्र व लक्ष भोजने घालणे त्यामुळे पुण्य लाभते अशी समाजाची श्रद्धा बनली.[१४]

जातिव्यवस्थेचा जातिसंस्थेवर समाजावर फार मोठा प्रभाव होता. शुद्र-अतिशुद्र, अस्पृश्य, आदिवासी, भटके विमुक्त समाज अशा सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीयदृष्ट्या मागासलेल्या समाजाला दलित असे म्हटले जावू लागले. जातिव्यवस्थेला धर्मशास्त्र, स्मृती व पुराणांचा आधार देण्यात आला. जात जन्मावर व व्यवसायावर ठरविली जावू लागली. ज्या जातीत जन्माला आला होता, त्यानुसार समाजात मानसन्मान होता. प्रत्येक जातीला सामाजिक हक्क, अधिकार, कर्तव्ये लाभली होती. उच्च व वरिष्ठ जातीला अनेक प्रकारचे विशेष अधिकार लाभलेले होते. दलितांना मानवी हक्कापासून वंचित ठेवले होते. त्यांच्यावर कडक व जाचक बंधने लादली होती. या बंधनांचे उल्लंघन केल्यास सामाजिक बहिष्कार, जाती बहिष्कृत करण्यात येत होते. मानवाचे जीवनच उद्ध्वस्त करणारी बहिष्काराची ही शिक्षा तुरूंगवास किंवा फाशीपेक्षा हानिकारक होती. रोटी-बेटी व्यवहार, जातीच्या बाहेर जाऊन विवाह करता येत नव्हता. जातीबाह्य विवाह हा गंभीर सामाजिक गुन्हा मानला जात होता.

ब्राह्मण स्वत:ला सर्व जातीच्या लोकांपेक्षा श्रेष्ठ, उच्च समजत होते. इतर सर्व जमातीतील लोकांना तुच्छ, कनिष्ठ, शुद्र लेखत होते. ब्राह्मणांची सेवा करणे हा शुद्रांचा धर्म व कर्तव्य आहे, असे मानले जात होते. तसेच धर्माच्या नावावर कनिष्ठ, शुद्र व अतिशुद्र जातीच्या लोकांच्या शोषणाची एक कायमस्वरूपी व्यवस्था तयार झाली.[१५]

### भारतीय दलित चळवळीचा उगम :-

भारतीय समाजव्यवस्था ही जातिव्यवस्थेवर आधारलेली आहे. ही जातिव्यवस्था वैदिक धर्मग्रंथातील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून निर्माण झाली. ही जातिव्यवस्था वरिष्ठ व कनिष्ठ जातीच्या विषम अशा क्रमवारीमध्ये आधारलेली आहे. यातील कनिष्ठ जातींना अस्पृश्य दलित म्हणून लेखण्यात आले आणि त्यांच्यावर भारतीय समाजव्यवस्थेकडून मोठ्या

प्रमाणात हजारो वर्षे अन्याय, अत्याचार करण्यात आले. या अस्पृश्य जातींनी या अन्यायाविरूद्ध कमी-जास्त प्रमाणात संघर्ष केला. परंतु तोपर्यंत ही जातिव्यवस्था पक्क्या अर्थव्यवस्थेवर स्थिर झाली. राजकीय बदल घडत होते. पण अस्पृश्यता नष्ट झाली नाही. या जातिव्यवस्थेने आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक, व्यावसायिक बंधने लादल्याने दलित समाज हा हिंदू व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग असूनसुद्धा मानवतेच्या समान हक्कापासून वंचित राहिला. हिंदू समाजाची इमारत वैदिक धर्मावर उभी असल्याने जातीयतेच्या भिंती शेकडो वर्षे भक्कम राहिल्या.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये असलेल्या जातियतेच्या भिंती नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न डॉ. आंबेडकरापूर्वी अनेक भारतीय सुपुत्रांनी केले. यामध्ये चार्वाक, लोकायत यांचे योगदान महत्त्वाचे आहे. परंतु सर्वप्रथम अडीच हजार वर्षापूर्वी सिद्धार्थ गौतम बुद्धांनी या जातिव्यवस्थेला धक्का दिला. त्यांनी अस्पृश्य शुद्र ते अतिशुद्रांना आपल्या नव्या समतावादी बौद्ध धम्माची दीक्षा दिली. तसेच त्यांना भिक्षुसंघात समाविष्ट करून घेतले. अकराव्या शतकात इस्लामी आक्रमणे भारतावर झाली व त्यांनी प्रथम मशिदीमध्ये सर्वांना प्रवेश दिला. त्याचा परिणाम होऊन भारतात रामानुजाचार्य यांनी स्वत: स्थापन केलेले मठ व मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली ठेवली. त्यांचा एक शिष्य तर अस्पृश्य होता.

चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथ स्थापन करून सर्व अस्पृश्य समाजाला आपल्या पंथात प्रवेश दिला. जातियतेला तोडण्याचे काम केले. अशा जातिअंताचा लढा पुकारणाऱ्या चक्रधर स्वामींचा कर्मठांनी दिवसाढवळ्या खून केला. कर्नाटकामध्ये बसवेश्वरनामक एका विशाल नि व्यापक दृष्टीच्या धैर्यशाली प्रधानाने अस्पृश्यता नष्ट करण्याचे कार्य केले. याचकाळात जातिव्यवस्था टिकून राहावी म्हणून काही सनातन्यांनी प्रयत्न केले. यामध्ये देवगिरीचा राजा रामदेवराय याचा प्रधान 'हेमाद्री' हा सनातनी विचारांचा होता. त्याने 'चतुर्वर्गचिंतामणी' ग्रंथ लिहून वर्षभर प्रत्येक जातीने आपल्या जातीनुसार कोणते व्रत करावे हे लिहिले व तसे करण्याचा दंडक घातला. तसेच रामानंद, चक्रधर, कबीर, चैतन्य यांनी भक्तीक्षेत्रात एकात्मता प्रचारली. पुढे या संत परंपरेतून मोठ्या प्रमाणात प्रबोधनाची चळवळ मूळ धरू लागली. नाथ संप्रदाय, भागवत

संप्रदाय यामधून संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रोहिदास, चोखामेळा, सावतामाळी, गोराकुंभार, सेनान्हावी, जनाबाई, मुक्ताबाई, मिराबाई या साधुसंतांनी भक्तिपंथात समतेचा उपदेश केला. 'समाजात एकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[१६]

छ. शिवाजी महाराजांच्या काळातही खालच्या जातींना सैन्यामध्ये व राज्यकारभारात सहभागी करून घेतले. त्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक समतेचा प्रवाह वाहण्यास सुरूवात झाली. याच दरम्यान जगामध्ये विविध स्तरावर प्रबोधनाच्या घडामोडी घडत होत्या. त्यामध्ये युरोप खंड आघाडीवर होता. औद्योगिक क्रांतीमुळे जग जवळ येवू लागले होते. त्यामधून वसाहतवाद व साम्राज्यवाद पुढे आला. नवीन मागासलेल्या वसाहतींकडे युरोपियनांचे लक्ष गेले. धर्म, संस्कृती, पैसा या गोष्टींसाठी अनेक वसाहती भारतात येत होत्या. त्यामध्ये सर्वात आघाडीवर इंग्रज होते. इ. स. १६०० मध्ये ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना भारतात झाली व तेव्हापासून भारतावर हळूहळू इंग्रजी अंमल वाढू लागला. याचवेळी त्यांचे लक्ष समाजव्यवस्थेकडे वळले.

भारतात ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ झाल्यावर त्यांनी अत्यंत सावधपणे आपली धोरणे अवलंबण्यास सुरूवात केली. थोड्याफार प्रमाणात अस्पृश्य वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले गेले. पण त्यांनीही ब्राह्मणवर्ग सर्वश्रेष्ठ मानला. पेशवाईत तर ब्राह्मणांकडे सत्तासूत्रे असल्याने या वर्गाला असंतुष्ट न ठेवता ब्रिटिशांनी त्यांना पाश्चात्य धर्माचे शिक्षण देवून राज्यकारभारत गुंतवून ठेवले. भारतीय धर्मव्यवस्थेने शिक्षण घेणे हा फक्त ब्राह्मणांचाच हक्क असल्याचे सांगितल्याने ब्राह्मणेत्तरांसह सर्वानांच शिक्षणापासून वंचित ठेवले. पण ब्रिटिशांच्या काळात अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न उभा राहिला. त्यामुळे ब्रिटिशांनी आपली सत्तासूत्रे भक्कम करण्यासाठी थोड्याफार प्रमाणात भारतात व महाराष्ट्रात सुधारणांना प्रारंभ केला.

याचकाळात भारतात राजा राममोहन रॉय, पंडित सिताराम, बाळकृष्ण जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, न्या. रानडे, गोपाळ आगरकर इ. समाजसुधारकांनी अस्पृश्यतेत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. परंतु या सुधारकांनी जे विचार मांडले त्याला कृतीची योगय जोड नसल्याने त्यांचे विचार म्हणावे तेवढे प्रभावी झाले नाहीत. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीपूर्वी दलितांमध्ये

शिक्षणाचा अभाव होता. रोजगाराची हमी नव्हती, सामाजिक प्रतिष्ठा नव्हती, विकासाची अजिबात संधी नव्हती. सामाजिक न्यायापासून वंचित होता. कसलीही सुधारणा नव्हती. एकूणच सर्व दलित समाज पशुवत जीवन जगत होता. त्यांचे सर्व मानवी हक्क हिरावून घेतले होते. या सर्व स्तराला धडक व सुरूंग लावण्याचे काम म. फुले यांनी केले.

ब्रिटिश काळात महाराष्ट्रात महार समाजाने शौर्य दाखविले. ब्रिटिशांनी व हिंदू उच्चवर्णियांनी आपली राजकीय सत्तास्थाने टिकवण्यासाठी या वर्गाचा उपयोग करून घेतला. दलित चळवळीला पहिला नेता ब्रिटिश आर्मीने दिला. ते १८८६ मध्ये गोपाळ बुवा वळंगकर सैन्यातून निवृत्त झाल्यावर त्यांनी सामाजिक सुधारणा कार्यास प्रारंभ केला. गोपाळ बुवा वलंगकरांच्या आचारविचारांवर म. फुल्यांचा प्रभाव होता. गोपाळ बुवा सैन्यातून निवृत्त झाले आणि त्यांनी 'अनार्य दोष परिहार' या नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेच्या नावातच त्यांच्या सुधारणाविषयक दृष्टीची चुणूक आपल्याला जाणवते. आज आपल्याला दलित चळवळीचे जे भव्य स्वरूप दिसते, त्याची मुहूर्तमेढ गोपाळबुवांनी रोवली. व्यावहारिक व वैचारिक पातळीवर त्यांनी त्यांच्या कुवतीप्रमाणे संघर्ष केला होता.[१७]

गोपाळबुवा वलंगकरांचा वारसा नंतरच्या काळात महाराष्ट्रामध्ये अस्पृश्य समाजातील शिवराम जानबा कांबळे यांनी चालविला. 'सोमवंशीयमित्र' नावाचे एक मासिक पुण्याहून ते प्रसिद्ध करीत असत. भारतातील पहिली अस्पृश्यांची परिषद बोलवण्याचा मान या कर्तृत्ववान नेत्यास आहे. भारतीय अस्पृश्यांना त्यांच्या पूर्वजांच्या धर्मात राहू देवून त्यांना ज्ञानदान करावे आणि त्यांची ऐहिक उन्नती करावी असे निवेदन भारत सरकारास त्यांनी सादर केले. गोपाळबुवा वलंगकर व शिवराम जानबा कांबळे यांच्यानंतर अस्पृश्य निवारणाची चळवळ पुढे नेण्यास दलित समाजातील अनेक नेते निर्माण होऊ लागले. यामध्ये किसन फागुनी बनसोडे, गणेश आकाराम गवई, कालीचरण नंदगवळी यांचा समावेश होता.[१८]

दलितांमध्ये अशाप्रकारे सामाजिक आणि राजकीय जागृती निर्माण व्हावयास सुरूवात झाली होती. म. फुले यांच्यानंतर दलित चळवळीला खरा पाठिंबा देण्याचे कार्य कोल्हापूरचे राजे

छ. शाहू महाराज यांनी केले. शाहू महाराजांनी दलित चळवळ एक स्वतंत्र चळवळ म्हणून कशी पुढे येईल याचा विचार केला होता. शाहू महाराजानंतर कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'डिप्रेस्ड क्लास मिशन' स्थापन करून दलित उद्धाराचे कार्य हाती घेतले. नंतरच्या काळात महात्मा गांधींनी हा प्रश्न काही प्रमाणात धसास लावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याकाळातील सामाजिक व राजकीय जीवनामध्ये दलितांच्या प्रश्नांचे गंभीर स्वरूप महर्षि शिंदे यांच्यासारख्या सुधारकाचा अपवाद वगळता इतरांच्या लक्षात आलेले नव्हते. या काळात सर्वच जातीत संघर्ष सुरू होता. देशस्थ ब्राह्मण, कोकणस्थ ब्राह्मण, उच्च मराठा, कनिष्ठ मराठा, कनिष्ठ जातीमध्ये सुद्धा श्रेष्ठत्वासाठी तंटे व संघर्ष होत होता. अस्पृश्यता वाढतच होती. दलितांना शुद्र, अतिशुद्र, चांडाळ, दास म्हणत. अस्पृश्य म्हणून त्यांना गावकुसाबाहेर कायमची वस्ती करून ठेवले. त्यांना घाणेरडी कामे दिली. मांग, महार, ढोर, चांभार, होलार या मुख्य अस्पृश्य जातीचे जगणे अमानुष व मानवतेला कलंक फासणारे होते. पेशवाईच्या काळात तर अस्पृश्यांना पुण्यात भर दुपारी गळ्यात मडके व झाडाची फांदी बांधून फिरावे लागे. पाणवठे, मसणवटे वेगळे होते. मंदिरात प्रवेश नव्हता. अशाप्रकारे दलितांची स्थिती दयनीय, दुर्दैवी व अत्यंत हलाखीची  व वाईट होती. दलित जातीत काही वेठबिगार होते. सरकारी बांधकाम, रस्ते दुरूस्ती करणे, सरकारी गवत, कुरणे कापणे, इनामदार, जहागिरदार, देशमुख, पाटील, कुलकर्णी या वतदारांच्या घरी वेठबिगार असे. त्यांना कोणत्याही प्रकारचा मोबदला नव्हता. दास-दासी असत. घरगुती कामासाठी मुली व मुलांना दास, दासी म्हणून विकत घेतले जात असे. म्हातारे झाल्यावर त्यांची मुक्तता केली जाई.

स्त्रीचे जीवन भयानक होते. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान होती. मालमत्तेचा अधिकार फक्त पुरुषांनाच होता. धर्मशास्त्रात पुरुष हा वंशाचा दिवा होता. स्त्रीला आचारविचारांचे स्वातंत्र्य नव्हते. सतीप्रथा, बालविवाह, विधवा विवाहास बंदी, केशवपन, बहुपत्निकत्व अशा रूढी परंपरा अस्तित्वात होत्या. भारतात इंग्रजी राजवट येण्याअगोदर भारतीय समाज हा आधुनिक, वैज्ञानिक, बुद्धीप्रामण्यवादापासून शेकडो मैल लांब होता. मूलभूत स्वातंत्र्य, सामाजिक समता, बंधुभाव, पुरोगामी विचार स्विकारण्याची समाजाची तयारी नव्हती.[१९]

याच दरम्यान भारतात इंग्रजी अंमल सुरू झाला. इंग्रजांनी भारतात आपली प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यांना प्रशासनामध्ये काम करण्यासाठी भारतीयांची गरज भासू लागली. म्हणून त्यांनी भारतीयांना इंग्रजी शिक्षण देण्यास सुरूवात केली. याच दरम्यान इंग्रजांनी तुरूंग कायदा लागू केला. बंदिशाळा काढल्या. दळवळणाच्या सोयी उपलब्ध केल्या. कायदा सुव्यवस्था निर्माण करण्यात आली.[२०] यावेळी भारतात ख्रिश्चन धर्मप्रसार करण्यासाठी अनेक देशातील धर्मप्रसारक आले. त्यामध्य फ्रेंच, इंग्रज, अमेरिकन, पोर्तुगाल या मिशनऱ्यांनी सामाजिक सुधारणा करण्यास सुरूवात केली. त्याचा प्रभाव पडून अनेक दलितांनी ख्रिश्चन धर्माचास्विकार केला. म्हणून काही उच्चवर्णिय लोक जागृत झाले व त्यांनीही सामाजिक सुधारणा करण्यास सुरूवात केली.

महर्षि वि. रा. शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास मिशन तर्फे अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणणे, त्यांना नोकरीच्या संधी उपब्ध करून देणे, त्यांच्या अडीअडचणीचे निवारण करणे, त्यांना खऱ्या धर्माची शिकवण देणे, त्यांचे शीलसंवर्धन घडवून आणणे इत्यादी बाबतीत काम केले. सन १९१७ च्या कोलकत्ता येथील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात अस्पृश्य निवारण संदर्भात ठराव संमत व्हावा म्हणून पुढाकार घेतला. मुंबईत २३, २४ मार्च १८९८ मध्ये महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद भरविली होती. १९३३ मध्ये 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' पुस्तक लिहिले. कर्मवीर भाऊराव पाटील (१८८७-१९५६) रयत शिक्षण संस्था, भाई माधवराव बागल - (१८९६-१९९९) सत्यशोधक कार्यकर्ते जातीभेदास विरोध, आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करीत होते.

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये दलित चळवळीला पोषक भूमिका घेण्याचे कार्य वरील विविध समाजसुधारकांनी केले आहे. त्यामध्ये काही ब्राह्मण होते तर मोठ्या प्रमाणात ब्राह्मणेत्तर होते. त्यांच्यामध्ये काही सुधारक कृतिशील होते तर काही केवळ विचार मांडणारे होते. समाज प्रबोधन करणारे होते. त्यांच्यामध्ये प्रामुख्याने विठ्ठल रामजी शिंदे, म. गांधी यांनी याकाळात दलित उद्धाराचे कार्य जोमाने केलेले दिसून येते. पण म. गांधीं हे केवळ भूतदया भावनेने या दलितांच्या प्रश्नाकडे पाहत होते. त्यामुळे

त्यांच्या सुधारणांचा फार मोठा प्रभाव पडला नाही. परंतु खऱ्या अर्थाने कृतिशील व तात्विक परिवर्तन म. जोतीराव फुले यांच्याच काळात झालेले दिसून येते.

**सारांश :-**

जगामध्ये मानवाची उत्पत्ती झाली. लाखो वर्षापासून मानव आपली प्रगती करत आहे. मात्र मानवाने इतर मानवी समूहास आपल्या ताब्यात घेण्यासाठी त्याला गुलाम केले. दास बनवले. युरोप खंडातही मानवी छळवादाची प्रक्रिया घडत असताना भारतातही ही प्रक्रिया सुरू होती. प्राचीन काळी सुजलाम सुफलाम असलेला आपला भारत सर्वच क्षेत्रात अग्रेसर होता. या देशात मातृसत्ताक पद्धती होती. सिंधू संस्कृती त्याची साक्ष देते. मानवी मूल्य येथे जपली जात होती. संघर्ष नव्हता. सर्वजण प्रेमाने जीवन जगत होते. पुढे परकीय आक्रमक टोळ्या भारतात आल्या व त्यांनी आपली मानवी संस्कृती निर्माण करावयास सुरूवात केली. या सर्व प्राचीन प्रक्रियेतून भारतात जातिव्यवस्थेची निर्मिती झाली. याची मांडणी या प्रकरणात आहे.

चार वर्णाचे रूपांतर साडेसहा हजार जातीमध्ये झाले. एक जात दुसऱ्या जातीस शुद्र मानू लागली. अस्पृश्यता निमाृण झाली. या शुद्रांचे मानवी अधिकार हिरावून घेण्यात आले. दुर्दैवाने याला दैवी सिद्धांत व कर्म सिद्धांतचा आधार देण्यात आला. मागील जन्मातील पाप या जन्मात फेडावे अशी संकल्पना मांडली. याला फार मोठा विरोध झाला. पण यश आले नाही. आधुनिक काळात याच जातीव्यवस्थेने भयानक रूद्र रूप धारण केले व हळूहळू ही व्यवस्था मोडण्याची प्रक्रिया सुरू झाली. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामध्ये या दलित चळवळीचा कसा उगम झाला व परिवर्तनाच्या लढाईत सातारा जिल्हयाने मानवी हिताचा कसा विचार केला. याचा शोध घेतलेला आहे.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | आंबेडकर डॉ. बाबासाहेब | : | 'शुद्र पूर्वी कोण होते ?', पृ. ३७ |
| २. | इंद्र एम. ए. | : | 'कौटिल्याचे अर्थशास्त्र', पृ. १९ |
| ३. | पाटील शरद | : | 'दास शुद्रांची गुलामगिरी', पृ. ६२ |
| ४. | पाटील शरद | : | उक्त, पृ. ८५ |
| ५. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'वैदिक धर्मसूत्रे आणि बहुजनांची गुलामगिरी', पृ. ३६ |
| ६. | माधवाचार्य | : | 'सर्व दर्शन संग्रह', पृ. ४२ |
| ७. | जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री | : | 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', पृ. १२५ |
| ८. | कुरुंदकर नरहर | : | 'जागर', पृ. ६० |
| ९. | ढेरे रा. चिं. | : | 'नाथ संप्रदायाचा इतिहास', पृ. ६२ |
| १०. | ढेरे रा. चिं. | : | उक्त, पृ. ६५ |
| ११. | सरदार गं. बा. | : | 'संत चळवळीचा समाजावरील प्रभाव', पृ.२३ |
| १२. | कुरुंदकर नरहर | : | 'जागर', पृ. ४७ |
| १३. | मोहिते प्रा. डॉ. कल्पना | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. ३७ |
| १४. | पाटील विकास | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. २३ |
| १५. | कांबळे प्रा. सरोज | : | 'मनुस्मृती स्त्रिया आणि डॉ. आंबेडकर', पृ.२४ |
| १६. | सरदार गं. बा. | : | 'संत चळवळीचा समाजावरील प्रभाव', पृ.४६ |
| १७. | झेलिएट डॉ. एलिनॉर | : | 'डॉ. आंबेडकराचे नेतृत्व', पृ. ६ |
| १८. | झेलिएट डॉ. एलिनॉर | : | उक्त, पृ. ८ |
| १९. | कांबळे प्रा. सरोज | : | 'मनुस्मृती स्त्रिया आणि डॉ. आंबेडकर', पृ.२४ |
| २०. | सरदेसाई बी. एन. | : | 'आधुनिक महाराष्ट्र', पृ. ६५ |


-----×-----

# प्रकरण – २

# क्रांतिबा जोतीराव फुले व राजर्षी शाहू महाराज

## २.१ क्रांतिबा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले :-

भारतीय इतिहासामध्ये महात्मा फुले यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. म. फुले यांनी भारतीय व्यवस्थेत प्रत्येक क्षेत्राकडे डोळस पद्धतीने पाहिले आहे. भारतीय समाजव्यवस्थेची चिरफाड भारतात प्रथम म. फुले यांनी केली. तत्कालीन समाजव्यवस्था, जातिव्यवस्था, स्त्रीवर्ग यांची शोषणातून मुक्तता करण्यासाठी सर्वच स्तरांवर त्यांनी मांडणी केली आहे. साहित्य निर्मितीच्या क्षेत्रामध्ये त्यांनी भारतीय धर्मग्रंथांची चिकित्सा करून समाजासमोर एक नवा मानवतावादी कल्याणाचा मार्ग उभा केला आहे. ब्राह्मणी व्यवस्थेला सबल पद्धतीने विरोध करून नवनिर्मिती करत असताना त्यांनी द्वेष परसविला नाही ही त्यांची योग्यता आहे. समाजशास्त्र, धर्मशास्त्र, नीतिशाखा, तत्त्वज्ञान, साहित्य, इतिहास या सर्व विद्या शाखांमध्ये त्यांनी आपली मांडणी केली आहे. बहुजन समाजाला सर्वधर्म समभाव, मानवता, धर्मनिरपेक्ष वृत्ती या सद्‌गुणांचा ठेवा ठेवला आहे. शुद्रांच्या अवनतीचे मुख्य कारण म्हणजे त्यांचे अज्ञान आहे. म्हणून त्यांनी भारतामध्ये प्रथम शिक्षणाचा प्रसार केला. त्यामुळे त्यांना भारताचे 'मार्टिन ल्युथर किंग' असे म्हणतात.

भारतात इंग्रजी सत्ता स्थिर होऊ लागली. त्याबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन होऊ लागले. शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. परंतु तो ठराविक वर्गापुरताच मर्यादित होता. समाजातील तोच वर्ग अधिक प्रगतीकडे वाटचाल करू लागला. मात्र बहुजन समाज हा आर्थिक सामाजिक क्षेत्रात मागासलेला राहिला. समाजात जातिभेदाच्या विकृत कल्पनेने काहुर मांजले होते. शिक्षणापासूनचे फायदे सामान्यांपर्यंत पोहचले नव्हते. बहुजन समाज अंध:कारात चाचपडत होता. जातियवादाची पोलादी चौकट भक्कम झाली होती. स्त्रियांच्या व अस्पृश्यांच्या दुर्दैवी स्थितीत काहीच फरक पडलेला नव्हता. वेगवेगळ्या प्रकारचे गळफास समाजाभोवती आवळले होते. अशा काळात म. फुले यांनी स्त्रीशिक्षण आणि अस्पृश्यतेसाठी केलेली कामे महत्त्वाची आहेत. त्यांना स्त्रियांचा उद्‌धारकर्ता म्हटले जाते. ते सामाजिक समतेच्या क्रांतीचे आद्यजनक होते.

समाज परिवर्तनासाठी फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ते एक बंडखोर विचाराचे सुधारक होते. धार्मिक विषमतेविरुद्ध बंड करणारे, धार्मिक सहिष्णूतेच्या मूल्यांसाठी प्रयत्न करणारे ते थोर क्रांतिकारक होते.

म. फुले यांचा जन्म १८२७ मध्ये पुणे येथे झाला. लहानपणी त्यांची आई वारली. परंतु जोतिरावांचे वडील गोविंदराव यांनी दुसरे लग्न केले नाही. जोतिबांना शाळेत पाठविले. त्यांचा विवाह धनकवडीचे झगडेपाटील यांची कन्या सावित्रीबाई यांच्याशी झाला. जोतिबांच्यामध्ये चिंतनशीलता व बौद्धिक कौशल्य पाहून उर्दू शिक्षक गफार बेग मुनशी व धर्मोपदेश लिजिडसाहेब यांच्यामुळे ते पुन्हा शाळेत जाऊ लागले. त्यांना स्कॉटिश मिशनरी शाळेत पाठविण्यात आले. मिशनऱ्यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे त्यांना अनेक ग्रंथांचा अर्थ कळू लागला. त्यांनी पाश्चात्य विचारवंतांच्या ग्रंथांचा अभ्यास केला. एका ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत त्यांना शुद्र म्हणून हाकलून दिले. तो अपमान त्यांना सहन झाला नाही. आपल्या देशबांधवांच्या मनावर अज्ञानाची आणि बुरसटलेल्या विचारांची पकड बसली आहे. ती काढून टाकली पाहिजे. राजकीय व सामाजिक गुलामगिरीबद्दल त्यांना चीड होती. पुण्यातील लहुजी मांग यांच्याकडून दांडपट्टा, नेमबाजीचे शिक्षण घेतले होते. त्यांनी सतत सद्सद्विवेक बुद्धीने विचार केला व सामाजिक क्रांतीच्या ध्येयाने ते प्रेरित झाले. समाजातील जातियता, विषमता संपविल्याशिवाय समाज सुधारणार नाही. हे त्यांच्या लक्षात आले. धर्माविषयी सत्य शोधण्याची त्यांच्या मनात तळमळ, प्रेरणा निर्माण झाली. समाजात विषमता, जातिभेद, अज्ञान, स्त्रीदास्य या अनिष्ट गोष्टी धर्माज्ञा म्हणून निर्माण झाल्या आहेत. म्हणून असल्या निर्दयी धर्माची चिकित्सा झाली पाहिजे असे त्यांना वाटू लागले. उच्चवर्णियांच्या प्रतिगामी वृत्तीला संपविण्यासाठी त्यांनी सामाजिक परिस्थितीचे अवलोकन केले. हिंदू वैदिक धर्माप्रमाणेच त्यांनी इतर धर्मांचाही बारकाईने अभ्यास केला. अज्ञान म्हणजे अंधार व शिक्षण म्हणजे प्रखर सूर्यप्रकाश होय. त्यामुळे समाज सुधारण्यासाठी शिक्षण हाच प्रभावी मार्ग आहे. हे त्यांनी ओळखले. स्त्रिया व शुद्र यांना शिक्षणाचे दरवाजे खुले करण्याचा त्यांनी निश्चय केला.

१९४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. स्त्री शिकली पाहिजे म्हणून त्यांनी पत्नी सावित्रीबाई यांना शिकवले. १८५२ मध्ये अस्पृश्यांच्या मुलांसाठी शाळा सुरू केली. दलित

मुलांसाठी त्यांनी आपल्या राहत्या घरातील हौद खुला केला. याच काळात त्यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. विधवा पुर्नविवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. शेतकरी मजूरांचे प्रश्न सरकारपुढे मांडले. शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून सोडविले. धार्मिक व सामाजिक गुलामगिरीचे उच्चाटन करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

**महात्मा फुले यांचे दलित सुधाराचे कार्य :-**

अस्पृश्यता ही १९ व्या शतकात महाराष्ट्रात अधिकच तीव्र होती. स्वत:ला उच्चवर्णीय समजणारे लोक अस्पृश्य लोकांना अतिशय हीन व नीच लेखीत. त्यांना निर्दयतेने वागवित. अस्पृश्यांना गावाच्या बाहेर वस्ती करून राहावे लागे. त्यांची स्थिती अतिशय हलाखीची होती. समाजात त्यांना अजिबात स्थान नव्हते. सर्व बाजूंनी त्यांचा छळ होत असे. उच्चवर्णिय लोक अस्पृश्यांना शिवून घेत नसत. अस्पृश्यांची सावली अंगावर पडून विटाळ होईल, म्हणून रस्त्यातून फिरायलाही बंदी असे. त्यांनी रस्त्यातून दिवसा भर बारा वाजता जेव्हा उन्हाळ्यावेळी रस्त्यावर सावली पडत नसे, तेव्हा फिरावे. फिरताना गळ्यात मडके व कमरेला झाडाची फांदी किंवा खराटा बांधून जावे लागे. गळ्यातील मडके त्यांचा थुंकीचा विटाळ टाळी व झाडाची फांदी त्यांची पावले पुसून टाकी.[१]

सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, तलाव, विहिरी, घाट, शाळा इ. ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. हलकी सलकी कामे त्यांना करावी लागत. अज्ञानीपणा, दारिद्रय, मागासलेपणा, उपासमार या गोष्टी त्यांच्या जन्मालाच लागलेल्या होत्या. अस्पृश्यांचे एकंदर स्थिती गुलामाहूनही वाईट होती. उच्चवर्णिय लोकांची सेवा करणे एवढेच त्यांचे काम होते. अशा वाईट परिस्थितीतून अस्पृश्यांना बाहेर काढायचे असेल तर त्यांना शिक्षण हाच उपाय आहे. शिक्षणाशिवाय त्यांची सुधारणा होणार नाही. हे ओळखून म. फुलेंनी अस्पृश्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी शिक्षण, धर्मचिकित्सा, सामाजिक सुधारणा, वाङ्मय-निर्मिती केली.

**शिक्षण :-**

वर्णभेदाविरुद्ध जोतिबांनी आवाज उठविला. अस्पृश्यांचे अज्ञान दूर करून त्यांना शिक्षण मिळवून देण्याचे काम जोतिबांनी हाती घेतले. अस्पृश्य दलितांना आपल्या हक्काची जाणीव व्हावी यासाठी शिक्षण हाच मार्ग म.फुलेंनी स्विकारला. १८५१ मध्ये त्यांनी नाना पेठेत अस्पृश्य मुलींसाठी एक शाळा सुरू केली. १८५२ मध्ये नाना पेठेत महार-मांगाच्या वस्तीत स्वखर्चाने व मोफत दोन शाळा सुरू केल्या. पुढे मित्रांच्या साहाय्याने १८५३ मध्ये महार-मांग इ. लोकांस विद्या शिकविण्याकरिता 'मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली. जोतिबांच्या या शिक्षणविषयक कार्यास काही देशातील मंडळी व युरोपीय मंडळींनी सहकार्य कले.[२]

१८५८ पर्यंत अस्पृश्यांसाठी तीन शाळा पुण्यात सुरू करण्यात आल्या. शाळांची भरभराट झाली. 'दक्षिणा प्राईज' फंडातूनही दरमहा २५ रू. इतकी आर्थिक मदत मिळू लागली. त्यांच्या शिक्षणाबरोबर त्यांच्यावर होणारा अन्याय व गुलामगिरीचे उच्चाटन करणे, अस्पृश्यता निवारण करणे, त्यांना सार्वजनिक ठिकाणी प्रवेश मिळावा इत्यादीसाठी म.फुलेंनी लिखाणाच्या माध्यमातून आवाज उठविला. समाजात परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. भाषणाच्याद्वारे लोकांत जागृती केली. हजारो वर्ष अज्ञान अंध:कारात चाचपडणाऱ्या समाजाला शिक्षणाचा मार्ग दाखवून माणूस म्हणून जगण्यास समर्थ बनविण्याचे कार्य म. फुलेंनी केले. १८६८ मध्ये म. फुल्यांनी आपल्या घराजवळीत हौद अस्पृश्यांसाठी खुला केला. अस्पृश्य बांधवात जागृती घडवून आणण्यासाठी लुहजी मांग, राजवा महार या अस्पृश्य मित्रांची मदत त्यांनी घेतली. याशिवाय गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला. त्यातून ब्राह्मण शुद्रांची कशी फसवणूक करतात हे त्यांनी सांगितले आहे. समाजाला जागृत केले.[३]

म. फुले म्हणतात, कनिष्ठ वर्गातील लोकांना अशा प्रकारचे शिक्षण द्यावे की ते आपल्या सामाजिक समतेच्या आणि व्यक्ती स्वातंत्र्याच्या हक्कासाठी झगडण्यास तयार होतील. पुढे ते म्हणतात ब्राह्मणांनी स्वत:च्या स्वार्थासाठी जातिव्यवस्था निर्माण केली आहे. शुद्रांना गुलामगिरीत ठेवले आहे. तेव्हा त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी शिक्षणाध मार्ग दाखवून दिला.[४] अज्ञानात गाडलेल्या अस्पृश्य बांधवांना ज्ञानाचे दरवाजे उघडून देणारे म. फुले हे पहिले भारतीय समाजसुधारक होय.

## सत्यशोधक समाज :-

महाराष्ट्रातील बहुजन समाज अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरिती व उच्चवर्णियांच्या गुलामगिरीत दास्याखाली दबला गेला होता. समाजात ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व होते. वरिष्ठ वर्ग अडाणी लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन स्वत:चा स्वार्थ साधत होता. स्वत:च्या स्वार्थासाठी त्यांनी तयार केलेल्या ग्रंथातील ज्ञानाद्वारे शुद्र बांधवांना लुबाडणाऱ्या या स्वार्थी लोकांचे चुकीचे अधिकार दाखवून देण्यासाठी म. फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ साली पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. धर्माचे स्वरूप काय आहे ? बहुजन समाजात जागृती व स्वाभिमान निर्माण करणे हा या स्थापनेमागे उद्देश होता.

सामाजिक व धार्मिक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे उद्दिष्ट होते. सत्यशोधक समाजाच्या त्रैमासिक प्रतिवृत्तात ते म्हणतात, ब्राह्मण, भाट, जोशी, उपाध्ये इ. लोकांच्या दास्यत्वापासून शुद्र लोकांना मुक्त करण्याकरिता सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील कनिष्ठ वर्गाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी समाजात असणारी विषमता नष्ट केली पाहिजे.[५] हे महात्मा फुले जाणून होते. परंतु हे हक्क मिळण्यासाठी संघर्ष केला पाहिजे, हे जोतिबा फुले यांनी ओळखले होते. कारण ब्राह्मण सहजासहजी आपले हक्क व अधिकार सोडणार नाहीत. तेव्हा आपल्या हक्कासाठी शुद्रांनी संघटित होऊन ब्राह्मण समाजाशी संघर्ष करणे गरजेचे आहे. म्हणूनच बहुजन समाजाला संघटित करण्यासाठी फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सत्यशोधक समाजाचे ब्रीद वाक्य त्यांनी पुढीलप्रमाणे निवडले.

**''सत्यापरिता नाही धर्म, सत्य हाच परब्रह्म।''**

निर्मिकाचा धर्म सत्य आहे. पुढे ते म्हणतात, सत्याशिवाय दुसरा धर्म नाही. सत्य हाच खरा धर्म आहे म्हणून मानवाने सत्याने वागले पाहिजे. 'सर्वसाक्ष जगन्यंती। त्याला नकोच मध्यस्थी।' याद्वारे ते म्हणतात, ''ज्या निर्मिकाने जगत्पत्तीने या जगाची निर्मिती केली आहे, त्याची भक्ती करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. म्हणजेच ब्राह्मणी शास्त्रे जी आहेत त्या शास्त्राच्या मानसिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त होणे सत्यशोधकांचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाचे

कोणालाही सभासद होता येते. ते दर महिन्यात व्याख्यान चर्चा केली जात असे. ब्राह्मण वर्गाचे धार्मिक क्षेत्रात असणारे वर्चस्व झुगारून दिले पाहिजे. लग्न अल्प खर्चात करावी. जातिभेदाविरुद्ध, मूर्तिपेजूविरुद्ध ही प्रचार केला आहे. ज्योतिष पाहण्यापासून लोकांनी परावृत्त व्हावे. लग्न लावताना पुरोहिताशिवाय लावावी. मंगलाष्टका मराठीत म्हणण्यात याव्यात.

सत्यशोधक समाजाच्या कृतिविरुद्ध ब्राह्मण विरोध करू लागले. लोकांना भिती घालू लागले. पुरोहिताशिवय जर कोणते धार्मिक विधी केले तर त्यांच्या कुटुंबावर परमेश्वराचा कोप होईल. ब्राह्मणांच्या शापामुळे त्यांचे नि:संतान होईल अशी भिती लोकांना वाटू लागली.[६]

म. फुल्यांनी आपल्या सत्यशोधक समाजाची तत्त्वे देखील मानवतावादी घेतली. ईश्वर एकच आहे. ईश्वराची भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे. त्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज नाही. आपण सर्व एकाच ईश्वराची लेकरे आहोत. मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्या जन्मावर नसून गुणांवर व कर्मावर आहे. कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही तर तो मानवनिर्मित आहे. म्हणजेच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून म. फुलेंनी अस्पृश्य उद्धाराचे कार्य अतिशय प्रभावीपणे केले. सत्यशोधक चळवळ ही कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हती. कनिष्ठ वर्गाचा उद्धार करणे हेच त्याचे उद्दिष्ट होते.[७]

म. फुले यांनी या चळवळीच्या माध्यमातून कनिष्ठ वर्गात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य केले. कनिष्ठ वर्गाला आपले हक्क मिळविण्यासाठी संघटित केले. त्यांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण केली. अनेक ठिकाणी शुद्रांसाठी शाळा सुरू केल्या. ब्राह्मण पुरोहिताशिवाय हिंदू विवाह लावून दिले. जातिभेदाची भावना कमी करण्याचा प्रयत्न केला. या समाजाचा लढा सर्वप्रकारच्या गुलामगिरी विरुद्ध होता. समाजाच्या पुनर्रचनेची मागणी त्यांनी केली. धनंजय कीर म्हणतात, आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्रचनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. या समाजाने हजारो वर्ष अज्ञानात गाढलेल्या समाजाला जागे करण्याचे काम केले. वरिष्ठ वर्गाने कनिष्ठ वर्गावर लादलेली जी गुलामगिरी होती त्या गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला. या चळवळीद्वारे हिंदू समाजात स्थित्यंतर घडून येऊ लागले. अनेकांनी मुक्तहस्ते मदत या समाजाच्या कार्यासाठी केली.[८]

रा. रा. व्यंगू बालोजी काळेवार यांनी सत्यशोधक समाजास १,२०० रू.छापखाना विकत घेवून देणगी म्हणून दिला. १८७४ ला कॉन्ट्रॅक्टर रामभाऊ मनसारामनी आपल्या घरातील दिवाणखाना दिला. नंतर दरमहा १० रू. भाड्याने मोठी इमारत दिली. पुण्याजवळील हडपसर हे चळवळीचे मोठे केंद्र बनले. तेथे शिक्षणाच्या सोयी केल्या. पुढे सत्यशोधक चळवळीमुळेच विविध सामाजिक सुधारणेच्या कार्याला गती मिळाली.[९]

म. फुले यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या साठीही वेगवेगळ्या सुधारणा केल्या. भारतातील शेतकऱ्यांची अवस्था निकृष्ट होण्याची कारणे पुढीलप्रमाणे म. फुले देतात. भारतीय शेतकरी अज्ञानी, देवभोळा, कर्जबाजारीपणा, मागासलेपणा, दारिद्रय इ. मुळे तो ग्रासलेला आहे. १८८३ मध्ये त्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहिला. शेतकरी जन्मापासून त्याच्या मृत्यूपर्यंत स्वार्थी ब्राह्मण वर्गाकडून कसा लुबाडला जातो याचे हृदयद्रावक वर्णन म. फुले यांनी कले. म. फुले म्हणतात एकतर शेतकऱ्यांचे अज्ञान व शेतकऱ्यांना स्वार्थी ब्राह्मणांनी ज्ञानापासून, शिक्षणापासून वंचित ठेवले. त्यामुळे त्यांची प्रगती होऊ शकली नाही.

**विद्ये विना मती गेली, मति विना नीती गेली**
**नीति विना गती गेली, गति विना वित्त गेले**
**वित्ता विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**[१०]

शिक्षणाच्या अभावामुळे शूद्र शेतकरी समाजाचा कसा अनर्थ झाला हे म. फुले यांनी कवितेतून चित्रण केले आहे.

इ. स. १८७६-७७ मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला. याच दरम्यान १८८८ मध्ये पुण्यास इंग्लंडच्या राणीचे पुत्र ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या भेटीसाठी म. फुले शेतकऱ्यांच्या वेशात गेले. त्यावेळी त्यांनी डोक्यास मुंडासे, साधा अंगरखा, खांद्यावर घोंगडी, हातात काठी व पायात फाटक्या वहाणा घातल्या होत्या. त्यावेळी म. फुले म्हणाले, आपल्या समोर हे सुटाबुटाचा पोशाख करून जे श्रीमंत लोक आलेत हे खरेखुरे रयतेचे प्रतिनिधी नाहीत. मी जो पोशाख घातला आहे तो पोशाख या देशातील बहुसंख्य शेतकरी जनता वापरते. त्याच पेहरावात मी या जनतेचा

प्रतिनिधी म्हणून आपल्या भेटीला आलो आहे आणि तुमच्या आईला जाऊन सांगा, आमच्या भारतीय जनतेचे हित करायचे असेल तर आमच्या जनतेचे अज्ञान घालवा. प्राथमिक शिक्षण लोकांना मोफत करून देण्याची व्यवस्था करा.[११]

## म. फुले यांचे राजकीय विचार :-

जोपर्यंत भारतीयांची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक प्रगती होत नाही तोपर्यंत राजकीय स्वातंत्र्य काय कामाचे ? असा सवाल त्यांना केला. जोपर्यंत भारतातील सर्व लोक एक होत नाहीत. तोपर्यंत भारताला राष्ट्र म्हणणे योग्य नव्हे. ज्या समाजातील सर्व लोकांनासमान हक्क मिळत नाहीत, त्या राष्ट्राला तोपर्यंत राष्ट्र म्हणता येणार नाही.[१२] म. फुलेंच्या काळात भारत इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीत होता. जर इंग्रजांची राजकीय गुलामगिरी संपून भारत स्वतंत्र झाला तर भारतातील शुद्रातिशुद्रांना या स्वातंत्र्याचा लाभ होईल की नाही, त्यांची सामाजिक गुलामगिरी संपेल की नाही याची फुलेंना खात्री नव्हती. येथील लोकांची सामाजिक गुलामगिरी संपेपर्यंत इंग्रजांची सत्ता उलथवून स्वातंत्र्य मिळवण्यात काही अर्थ नाही. म्हणून येथील लोकांचे सामाजिक शोषण थांबविले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. समाजातील उच्चवर्णियांनी समाजाचे चालविलेले शोषण थांबविण्यासाठी समाजाला जागृत केले पाहिजे. लोकशिक्षणाच्या माध्यमातून जागृत करून संघटित केले पाहिजे म्हणून त्यांना मिशनरी काम आवडले. इंग्रज भारतात आल्यामुळे भारतात विविध सामाजिक सुधारणा घडून आल्या. इंग्रजांनी वृत्तपत्रे, वैद्यकी, इतिहास संशोधन अशा विविध क्षेत्रामध्ये संशोधनकेले. भारतीयांना आधुनिक नवी दालने खुली केली. १८८९ च्या मुंबई येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात म. फुले म्हणाले, की या राष्ट्रीय प्रवाहात जोपर्यंत शेतकऱ्याला सामावून घेत नाही तोपर्यंत तुमची चळवळ राष्ट्रीय होणार नाही.[१३]

## म. फुले यांचे शिक्षण विषयक विचार :-

म. फुले यांनी स्त्रीशिक्षण अस्पृश्यांच्या शिक्षणाचे कार्य केले. शिक्षण हा तिसरा डोळा आहे. शिक्षण म्हणजे माणसाच्या जीवनाचा कणाच आहे. शरीराला ज्याप्रमाणे पाठीच्या कण्याची आवश्यकता ताठ उभे राहण्यासाठी आहे, त्याप्रमाणे जीवनात सन्मानाने जगण्यासाठी शिक्षणाची

तितकीच आवश्यकता आहे. म. फुले यांनी 'तृतीय रत्न' या नाटकातून शिक्षणाचा मंत्र मांडला. १९ सप्टेंबर १८८२ मध्ये आयोगापुढे साक्ष देताना त्यांनी सुचविले की, सरकार गरीब शेतकऱ्यांकडून जो सारा वसूल करते त्या वसूलाचे उत्पन्न वरिष्ठ वर्गाच्या शिक्षणावरच खर्च होते व वरिष्ठ वर्ग आपल्या स्वत:पुरताच विचार करतो. तेव्हा सरकारने कनिष्ठ वर्गाच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे. इंग्रजी शिक्षण तज्ज्ञ लॉर्ड मॅकालेच्या शिक्षणविषयक 'पाझर पद्धतीला' (Filtration Theory) विरोध केला.[१४]

प्रथम शिक्षण खालच्या वर्गाला द्यावे व नंतर वरच्या वर्गाला द्यावे. अशाप्रकारे त्यांनी शिक्षणाबरोबर त्यांच्या सर्वांगिण उद्धारासाठी आपले आयुष्य खर्च केले. सत्यनिष्ठा, नीतिमत्ता, सौजन्य, शीलसंवर्धन, प्रगतीपर विचार व व्यवहार ज्ञान यावर भर दिला. ग्रामीण व शहरी भागात व्यावसायिक शिक्षण देण्यासाठी तांत्रिक शाळा सुरू कराव्यात, व्यावासायिक शिक्षण द्यावे, वसतिगृहे स्थापन करावीत. म. फुले हे भारतातील आद्यशिक्षक होते.

## म. फुले यांचे धर्मविषयक विचार :-

म. फुले यांचे धर्मविषयक विचारदेखील क्रांतिकारक स्वरूपाचे होते. वैदिक हिंदूधर्मातील आंधळ्या रूढी, परंपरा जपणाऱ्या, पापपुण्य, कर्मकांड, नरक यांना विरोध केला. अनिष्ट चालीरीती, प्रथा, परंपरा याविरुद्ध चळवळ उभी केली. ईश्वर, अल्ला, गॉड, ब्रह्म याऐवजी त्यांनी निर्मिक ही संकल्पना वापरली. हिंदूधर्मातील मूर्तिपूजा एक थोतांड आहे. ते कट्टर एकेश्वरवादी होते. जगातील सर्वात पवित्र मनुष्य कोण तर ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे. ते म्हणतात, सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. प्रत्येक मनुष्याला परमेश्वराची भक्ती करता येते. ज्या परमेश्वराने हे विश्व निर्माण केले आहे, पण त्याला कोणी पाहिलेले नाही. त्यालाच आपण फळे, फुले, नैवेद्य, नारळ, कोंबडी, बकरे देता कसे काय ? याच्यासाठीच त्यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' हे पुस्तक लिहिले.[१५]

म. फुले म्हणतात, ब्राह्मणांनी स्वत:च्या फायद्यासाठी धर्मग्रंथ तयार केले. धर्माच्या नावाखाली शोषण केले. त्या शोषणातून त्यांची सुटका करण्यासाठी काम केले. प्रत्येक धर्मातील

चांगली तत्त्वे घ्यावीत. प्रत्येक जातीमधील लोकांनी आपापसात न भांडता प्रेमाने रहावे. त्यांना जातीभेद, वर्णभेद नाहीसे करून माणूसकी, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या आधारावर समाजनिर्मिती करावयाची होती.[१६]

**धर्म राज्य भेद मानवा नसावे। सत्याने वागणे ईश्वरासाठी**

**ख्रिस्त महंमद मांग ब्राह्मणांशी । धरावे पोटाशी बंधूपरी।**

**निर्मिकाचा धर्म सत्य आहे । भांडणे अनेका कशासाठी ।।**[१७]

अशाप्रकारे म. फुल्यांनी डॉ. आंबेडकरांच्या दलित चळवळीचा उगम होण्याअगोदर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जाणीव जागृती निर्माण केल्याचे दिसून येते. एकूणच दलित चळवळीचा इतिहास पहात असताना म. फुले यांचे सामाजिक परिवर्तन विचारात घेतल्याशिवाय तो इतिहास पूर्ण होत नाही असे दिसते.

## म. फुले यांचे वाङ्मयीन कार्य :-

बहुजन समाजात प्रबोधन करणे, त्यांच्यात जागृती घडवून आणणे व अस्पृश्यता निवारण्याचा प्रचार करण्यासाठी फुले यांनी अनेक लहानमोठी पुस्तके लिहिली. समाजसुधारणा, धर्मसुधारणा, अस्पृश्यता निवारण, स्त्रियांचा उद्धार, शेतकरी उद्धार यासंबंधी त्यांना आपले विचार गद्यात्मक व पद्यात्मक ग्रंथातून मांडले. समाजात असणाऱ्या अनिष्ट प्रथा, अस्पृश्यता, जातियता, विषमता, अनिष्ट चालीरिती दूर करण्यासाठी व दीनदुबळ्यांवर होणारा अन्याय दूर करताना त्यांच्यावर होणाऱ्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी म. फुल्यांनी लेखणी हातात घेतली.

त्यांच्या ग्रंथाची भाषा ग्रामीण आहे. मराठमोळी, ओबडधोबड, कडवट व रांगडी आहे. त्यांच्या लिखणातून त्यांनी जनतेच्या दुःखाला वाचा फोडली. आपल्या लिखाणातून त्यांनी समाजाच्या दुःखाचे विदारक वर्णन केले आहे. त्यांच्या ग्रंथातील समाजाच्या दैन्यावस्थेचे वर्णन मन हेलावून टाकणारे आहे. त्यांच्या लिखाणाचा मुख्य रोख ब्राह्मणाच्या स्वार्थी वृत्तीवर होता.

१) ब्राह्मणांचे कसब - १८६९

२) शिवाजीचा पोवाडा - १८६९

३) गुलामगिरी - १८७३

४) शेतकऱ्यांचा असूड - जुलै १८८३

५) इशारा - १८८५

६) सत्सार अंक - १८८५

७) सार्वजनिक सत्यधर्म - १८८५

८) तृतीय रत्न (नाटक) - १८८५

९) अस्पृश्यांची कैफियत - १८८५[१८]

म. फुले हे १० वर्ष नगरपरिषदेचे सदस्य होते. आपल्या चरितार्थासाठी त्यांनी बांधकामे घेतली. मुंबईतील गिरणी कामगारांसाठी लोखंडे यांच्याबरोबर 'मिल हॅन्ड असोएिशन' ही संघटना १८७५ मध्ये स्थापन केली. पुणे येथील दारू दुकानाचे परवाने रद्द केले. न्या. रानडे यांना स्वामी दयानंद सरस्वती यांची हत्तीवरून मिरवणूक काढण्यासाठी मदत केली.

## ब) राजर्षि छत्रपती शाहू महाराज व त्यांचे कार्य :-

शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ मध्ये कागलच्या घाटगे घराण्यात झाला. १९८४ मध्ये आनंदीबाईसाहेब यांनी यशवंतराव यांना दत्तक घेतले व त्यांना शाहू छत्रपती बनवण्यात आले. शाहूचे शिक्षण राजकुमार कॉलेजमध्ये झाले. राज्यकारभाराची सगळी सूत्रे हाती घेतल्यानंतर २ एप्रिल १९८४ मध्ये प्रजेला उद्देशून ते म्हणाले, आमची सर्व प्रजा संमत तुप्त राहून सुखी असावी. तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे संस्थानची एक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी अशी आमची उत्कट सदिच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यात आमच्या पदरचे सर्व लहानथोर, जहागिरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार, व्यापारी आदि करून तमाम प्रजानन शुद्ध अंत:करणापासून मोठ्या राजनिष्ठेने आम्हास साहाय्य करतील, अशी आमची पूर्ण उमेद आहे. ही आमची कारकीर्द दीर्घ काळापर्यंत चालवून सफल करावी अशी मी त्या जगप्रियंत्या परमात्म्याची एकभावे प्रार्थना करतो.[१९] म्हणजे शाहू महाराजांच्या वरील भाषणावरून त्यांनी प्रजेच्या सुखासाठी, कल्याणासाठी व त्यांच्या सुखसमृद्धीसाठीच आपण राज्यकारभार

करणार आहे म्हणून आपण सर्वांनी सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. म्हणून शाहूंनी इंग्रजांशी सहकार्य करून आपणास प्राप्त झालेल्या राजकीय सत्तेचा आणि अधिकाराचा वापर करून बहुजन समाजाचा विकास करावा हे धोरण ठरवून बहुजन समाजाचा विकास करावा हे धोरण स्विकारले. शाहूंना स्वराज्य हवे होते. त्या अगोदर आपल्या प्रजेमध्ये जागृती निर्माण करून त्यांना शिक्षण देवून तयार करावयाचे होते. अन्यथा स्वराज्यात त्यांचा खरा लाभ फक्त उच्च वर्गीयांना मिळणार होता. त्यातच या काळातील समाज अज्ञान, दारिद्रय, अंधश्रद्धा व कर्मकांडात खितपत पडला होता. ब्राह्मण वर्गाच्या वर्चस्वाखाली सर्व समाज होता. यातून या समाजाला बाहेर काढून पात्र व सक्षम बनवून त्यांचे जीवनमान उंचावण्याचे होते. अशा प्रकारे बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शाहूंनी आपले आयुष्य खर्ची घातले.

**वेदोक्त प्रकरण :-**

१८९९ च्या ऑक्टोबर महिन्यात त्यांच्या जीवनात वेदोक्त प्रकरण घडले. शाहू महाराज आपल्या मित्र परिवारासह कार्तिक स्नानासाठी पंचगंगा नदीवर गेले होते. त्यांच्याबरोबर बंधू बापूसाहेब, मामासाहेब खानविलकर व संस्कृत भाषेचे अभ्यासक राजारामशास्त्री भागवत होते. महाराजांना अधिक पुण्य प्राप्त व्हावे म्हणून नारायणशास्त्री मंत्र पुटपुटत होते. त्यावेळी राजारामशास्त्री यांच्या लक्षात आले की भटजी पुराणोक्त पद्धतीचे मंत्र म्हणत आहेत. त्यांनी शाहूंना सांगितले, त्यावर शाहूंनी नारायण भटजी यांना विचारले त्यावर नारायण भटजी म्हणाला शुद्राला पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात. वैदिक मंत्र म्हणताना स्नानाची आवश्यकता असते. परंतु या शुद्रांना पुराणोक्त पद्धतीचा अनुग्रह करावयाचा असल्याने मला स्नानाची आवश्यकता नाही. एका आपल्या नोकराने असे म्हणावे याचा महाराजांना धक्का बसला व ते अंतर्मुख झाले व विचार केला आणि त्यांनी सामाजिक क्रांती घडविण्याचे ठरविले. या वेदोक्त प्रकरणात सामाजिक, धार्मिक आणि न्यायालयीन बाबींचा सखोल विचार करावा लागतो. ब्राह्मणी विचारसरणीनुसार आज समाजात दोनच वर्ग आहेत. ते म्हणजे ब्राह्मण व शुद्र होय. क्षत्रिय व वैश्य हे वर्ग अस्तित्वातच नाहीत. हे प्रसंग छ. शिवाजी महाराज, सातारचे प्रतापसिंह महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांच्या राज्याभिषकेवेळी ही त्यांना शुद्र म्हणून हिणवण्यात आले व राज्याभिषेक नाकारण्यात आला होता.

नारायण राजोपाध्ये यांनी न्यायालयात दाद मागितली तेव्हा प्रो. विजापूरकर, लोकमान्य टिळक व ब्राह्मणवर्गांने शाहूमहाराज विरोधी बाजू घेतली व त्यातूनच ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर चळवळ मोठ्या प्रमाणात पसरली. अशाप्रकारे ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून समाजाची सुटका करण्याचे महान कार्य राजर्षि शाहू महाराजांनी सुरू केले.

## शासकीय नोकऱ्यात ५०% आरक्षण :-

रा. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी एक क्रांतिकारी निर्णय घेतला. या निर्णयामुळे शेकडा ५०% जागा मागासलेल्या वर्गातून भराव्या व ३ महिन्याने त्याबाबत अहवाल सरकारला पाठवावा. ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारशी व इतर पुढारलेल्या जाती सोडून इतर मागासवर्गीयांना आरक्षण ठेवले होते. या निर्णयाविषयी धनंजय कीर म्हणतात, नवीन युगाच्या आमगनाची घोषणा करणारा अग्रदूत होय.[२०] परंतु ब्राह्मणी वृत्तपत्रकारांनी यावर प्रखर टीका केली.

वरील धोरणांमुळे दलित समाजात सुधारणा झाली. समाजात परिवर्तन घडले. याचवेळी महाराजांनी मागासवर्गातील लोकांना उच्च शिक्षणासाठी उत्तेजन दिले व त्यामुळे देशभर सरकारी नोकऱ्यात आरक्षणाची मागणी वाढू लागली. सरकारी नोकऱ्या मिळाल्या तर दलित समाजामध्ये शिक्षण घेण्यासाठी स्पर्धा लागेल व मोठ्या प्रमाणात लोक शिक्षणाकडे वळतील असे महाराजांना वाटले.

## शैक्षणिक कार्य :-

बहुजन समाजाला शिक्षण न मिळाल्यामुळे समाजाची पर्यायाने देशाची फार मोठी हानी झाली आहे. 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे' आमचा भूतकाळ एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. खालच्या जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद केले होते. म्हणून शिक्षण म्हणजेच सर्वांगिण प्रगतीचा पाया, सामाजिक परिवर्तन त्यासाठी शाहू महाराजांनी कार्यवाही केली.[२१]

### १) सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा :-

सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुलांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. १९१७ मध्ये

प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व ओळखले. २१ सप्टेंबर १९१७ रोजी त्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. मुले पालकांनी सक्तीने शाळेत पाठवावी, जर मुले शाळेत आली नाहीत तर पालकांना दंड बसवावा.[२२] शाहूंच्या संस्थानात शाळांची संख्या ४२० झाली तर त्या शाळेत २२०० विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळाला.

**२) वसतिगृहे :-**

माधवराव शिंदे यांनी शाहूंना 'भारतातील विद्यार्थी वसतिगृहाचे आद्य जनक' म्हटले आहे. कोल्हापूर हे 'मदर ऑफ बोर्डींग हौसेस' असे म्हटले आहे. वेगवेगळ्या जातींसाठी जातवार वसतिगृहे स्थापन केली. कोल्हापूरमध्ये एकूण २० वसतिगृहे स्थापन केली. सर्व जातीजमातीच्या मुलांना शिक्षण घेताना राहण्याजेवण्याची मोफत सोय केली. वसतिगृहात त्यांनी वैयक्तिक लक्ष दिले. महाराजांना असे वाटत होते की सर्व जातीजमातीच्या लोकांनी प्रेमाने, एकीच्या भावनेने वागवे व प्रत्येक जातीने स्वत:चा विकास करून घ्यावा. याचवेळी शाहू महाराजांनी पुणे, नाशिक, अहमदाबाद, नागपूर, पंढरपूर, कराची, मुंबई येथील वसतिगृहाला सढळ हाताने मदत केली.

**३) स्त्री-शिक्षणाला चालना :-**

स्त्रियांच्या मागासलेपणाचे कारण म्हणजे त्यांची निरक्षरता होती. राजाराम कॉलेजमधील शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत दिली. स्त्रियांच्या शिक्षणामुळे कुटुंबाचा पर्यायाने संस्थानचा विकास होईल, असे त्यांचे मत होते.

**४) राजाराम कॉलेज :-**

१८८१ मध्ये राजाराम कॉलेज काढले. दरबारातून ५० हजार रु. अनुदान दिले.

**५) व्यावसायिक शिक्षणाची सुरुवात :-**

पाटील स्कूल, तलाठी स्कूल काढले. जमाखर्च, कायदे, शांतता-सुव्यवस्था, महसूलाबाबत प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण केंद्रे काढली. टेक्निकल इन्स्टिट्यूट काढले. लष्करी शिक्षणासाठी इन्फ्रट्री स्कूलची स्थापना केली.

### ६) शिक्षक भरती :-

दि. १० मार्च १९१८ रोजी हुकूम काढला. शिक्षकांच्या नेमणूका करताना त्यांच्या वर्तणूकीचा दाखला, वय पंचवीस वर्षे असे नियम केले. या त्यांच्या धोरणामुळे दलित समाजामध्ये आनंदीउत्सव साजरा करण्यात आला.[२३]

## शाहू महाराजांचे दलितांविषयी उदार शैक्षणिक धोरण :-

वेदोक्त प्रकरणानंतर ब्राह्मणांनी जरी महाराजांना शूद्र लेखले असले तरी उच्चवर्णीय लोक शाहूंना क्षत्रिय मानत होते. परंतु ब्राह्मणांनी शूद्र अतिशूद्र यांना पशूचे जीवन जगण्यास भाग पाडले होते. म्हणून शाहू महाराजांनी दलितांना मानसिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी काही महत्त्वाचे क्रांतिकारी निर्णय घेतले. सर्व मागसवर्गीय जातीच्या मुलामुलींना शिक्षण देऊन त्यांचा उद्धार घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले. १८९४ मध्ये त्यांनी अस्पृश्यांसाठी ५ शाळा काढल्या होत्या. त्या शाळेमध्ये १६८ मुले शिक्षण घेत होती. १९१२ पर्यंत शाळांची संख्या २७ वर गेली. विद्यार्थी संख्या ६३६ इतकी झाली. सन १९१२ च्या कोल्हापूर संस्थानच्या प्रशासकीय अहवालात असे म्हटले आहे की, पददलित जातिजमातींना छत्रपती महाराजांनी ज्या विशेष सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या आणि अस्पृश्यामध्ये शिक्षणप्रसार करण्यासाठी स्थानिक लोकांच्या संघटनेने जे कमालीचे परिश्रम घेतले त्याचा संकलित परिणाम म्हणजे अंत्यजाच्या शिक्षण प्रसार कार्याची झालेली लक्षणीय प्रगती होय. अमानुष वागणुकीचे दुर्दैवी बळी बनलेल्या आपल्या अतिशुद्र धर्मबांधवांना अल्प प्रमाणात का होईना सहानुभूतीचा आणि सहकार्याचा हात देण्यासाठी उच्चवर्णीय लोक पुढे येत आहेत. हे उच्चवर्णियांच्या मनाला चिकटलेली अपसमजाची किल्मीषे करवीर दरबारच्या शहाणपणाच्या व उदार धोरणाच्या प्रभावाने विरघळून जात असल्याचे द्योतक आहे.

दलित शाळातील अभ्यासक्रम कमी स्वरूपाचा होता. इयत्ता ४ थी च्या विद्यार्थ्यांना काहीही येत नसे. म्हणून महाराजांनी दलित मुलांना खास पात्रता वर्ग सुरू केले. दलितांसाठी सर्व प्रकारचे शिक्षण मोफत देण्याची सोय केली. तसेच ७ एप्रिल १९१९ मध्ये आणखी एक आदेश काढला की दलित वर्गातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके पेन्सिल मोफत देण्याची योजना आखली.[२४]

शाहू महाराजांनी २७ जुलै १९१८ रोजी आदेश काढून गुन्हेगारी जातीची हजेरी माफ केली. मात्र गुन्ह्यात सापडलेल्या लोकांना हजेरी चालू ठेवली. गुन्हेगारी जातीतील फासेपारधी जातीतील काही लोकांना त्यांनी पहारेकरी नेमले. काहींना रस्त्यावरची कामे दिली. काहींना पोलीस म्हणून नेमले. त्यातील फासेपारध्यांचा नेता लाल्या याच्या मुलाला तर कर्नाटकात कार्यक्षम पोलीस म्हणून चोऱ्या पकडण्यासाठी पाठविण्यात आले. [२५]

माणगाव परिषदेत, महाराजांनी आपण हजेरी पद्धत बंद केली हे सांगताना ते म्हणतात, या गरीब जातीतील लोकांवर गावकामगार व सरकारी अधिकारी जुलूम करीत. त्यांच्याकडून मोफत कामे करून घेत. चोरी झाली की, बिनहजेरी लोकांना पकडत व त्यामुळे ते सर्वजण गुन्हेगारीकडे वळत. मी हजेरी बंद केल्यापासून गुन्ह्यांची संख्या कमी झाली असे ते म्हणाले. [२६]

### १) वेठबिगारी पद्धत बंद केली :-

या वेठबिगारी पद्धतीमुळे पाटील कुलकर्णी व सरकारी अधिकारी महारांकडून बरीच कामे मोफत करून घेत गाव वाड्यातील महार हा वतनदार होता. त्याला सेवाचाकरीसाठी इनामे व हक्क होते. पण महारकीच्या वतनापोटी त्याच्यावर वेठखळा पद्धत लादली होती. महाराजांनी या सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्यासठी २६ जुलै १९१८ मध्ये एक आदेश काढला. महार लोकांचे उत्पन्न बलुते कमी करून गावहक्कदार करून गावहक्कदार खुतात दाखल केले. [२७] म्हणजे यापुढे महारांना सक्तीने राबवून घेता येणार नाही तर त्याला मोबदला द्यावा लागेल. एकूण महाराजांनी दलितांच्यासाठी त्यांच्यात आत्मप्रेरणा निर्माण व्हावी म्हणून अनेक स्वद्धाराच्या गोष्टी केलेल्या दिसून येतात.

### २) दलित निवारण्यासाठी कायदे (अस्पृश्यता) :-

शाहू महाराजांनी शिक्षण प्रसारासाठी आपल्या राजकीय सत्तेचा वापर केला तसाच अस्पृश्यता निवारण्यासाठीही केला. ज्या-ज्या सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली जात होती. त्याबाबत त्यांनी महत्त्वाचे ३ हुकूम काढले. २०, २२ व २३ ऑगस्ट १९१९ रोजी सरकारी खात्यातून, शिक्षण खात्यातून, धर्मार्थ दवाखान्यातून, अस्पृश्यतेचे निर्मूलन केले. [२८] हे हुकूम अस्पृश्य

लोकांसाठी सहानुभूतीचे होते. तर ते कडक व दंडात्मक न मानणाऱ्या लोकांसाठी होते. नव्याने संस्थानात तसेच महसूल, न्याय व इतर खात्यातील अधिकाऱ्यांना हुकूम काढून बजावले की, कोल्हापूर इलाक्यातील रेव्हिन्यू ज्युडिशियल अशा सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांना वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्यांनी हा हुकूम पोहचण्यापूर्वी सहा आठवड्यांच्या आत नोटीस देवून राजीनामा द्यावा. त्याला पेन्शन मिळणार नाही. आमची अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावरांप्रमाणे न वागविता मनुष्याप्रमाणे वागवावे. अस्पृश्य व स्पृश्य शाळेमध्ये भेदभाव केला जातो हे लक्षात येताच त्यांनी कायदा करून हुकूम दिला. वैद्यकीय अधिकाऱ्यांना सांगितले रोग्याला सुद्धा अस्पृश्य आहे हे न पाहता त्याला माणसाप्रमाणे वागणूक द्यावी व ज्यांना हे जमणार नाही त्यांनी नोकरी सोडून निघून जावे.[२९] म्हणजे दलितांच्यासाठी एवढी काळजी घेणारा हा पहिलाच राजा होता.

३) गंगाराम कांबळे हा सरकारी पागेत मोतदार होता. एकदा उन्हाळ्यात त्याने मराठ्यांच्यासाठी असलेल्या पाण्याच्या हौदाला स्पर्श केला तेव्हा त्याला रक्तबंबाळ होइपर्यंत मारले. तेव्हा महाराजांनी गंगाराम कांबळेला कोल्हापुरात हॉटेल टाकून दिले. त्याचे नाव सत्यसुधारक हॉटेल होय. व महाराज रोज आपल्या घोडागाडीत त्या हॉटेलमध्ये चहा पिण्यास जात असत व त्यांच्याबरोबर सर्वच जातीचे लोक चहा पित. पुढे हाच गंगाराम कांबळे डॉ. आंबेडकरांचा कार्यकर्ता बनला.[३०]

त्यांनी डॉ. आंबेडकरांची मुंबई येथे घरी जावून भेट घेतली व त्यांना परदेशी उच्च शिक्षणासाठी स्कॉलरशिप मंजूर केली. म्हणून डॉ. आंबेडकर त्यांच्याविषयी म्हणतात, शाहू महाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नाही, नव्हता व पुढे लाभेल की नाही याबद्दल शंका आहे.

रा. शाहू महाराजांनी आपल्याला लाभलेल्या २८ वर्षाच्या राजकीय कारकिर्दीत कोल्हापूर व महाराष्ट्रात क्रांती घडवून आणली. बहुजन समाजाला अज्ञानातून उच्चवर्णियांच्या वर्चस्वापासून

मुक्त करण्यासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. वेदोक्त प्रकरणावरून ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढली. नोकरदारामध्ये अस्पृश्यांना ५०% आरक्षण दिले. सक्तीचे प्राथमिक शिक्षण दिले. सर्व जातीजमातीच्या मुलांसाठी वसतिगृहे स्थापन केली. ब्रिटिश कायद्यातून अस्पृश्यांची सुटका केली. वर्णवर्चस्ववाद्यांनी दलितांना पशुवत जीवन जगणे भाग पाडले होते. अशा ब्राह्मणवादी मंडळींचे त्यांनी सक्तीने मतपरिवर्तन घडवून आणले. तर काहींना नोकरीतून काढून टाकण्याची तरतूद केली.

दलित चळवळीच्या इतिहासात राजर्षि शाहू महाराज यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रात २० व्या शतकात दलित चळवळीने बाळसे धरले व डॉ. आंबेडकरांच्या क्रांतिकारी लढ्यात ती सहभागी झाली. या काळात शाहू महाराजांना प्रस्थापित वर्णवाद्यांनी भयानक त्रास दिला. प्रा.विजापूरकर, लोकमान्य टिळक यांनी खूप टीका केली. आपल्या वर्तमानपत्रात शाहूविरोधी लेख लिहिले. शाहू महाराजांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. तरीही शाहू महाराज डगमगले नाहीत. त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत दलित उद्धारासाठी आपले आयुष्य वेचले. त्यांनी निर्माण केलेला वैचारिक वारसा पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समाज उद्धारासाठी उपयोगी पडला.

**सारांश :-**

युरोपात वेगवेगळे शोधलागले व औद्योगिक क्रांती घडली. प्रचंड वेगाने युरोप प्रगती करू लागला. हे युरोपातील आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय सुधारणांचे वारे हळूहळू भारतात येऊ लागले व या सामाजिक सुधारणेवेळी महात्मा फुले यांचा उदय झाला. भारतात प्रथमता म. फुले यांनी धर्मग्रंथाची चिकित्सा केली. परमेश्वरालाच प्रश्न विचारले. हे सर्व थोतांड आहे. ब्राह्मणांनी आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी ही शोषणाची व्यवस्था तयार केली आहे. हे फुले यांच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी अज्ञानी समाजाला सज्ञान करण्यासाठी शिक्षणास प्रारंभ केला. शिक्षणामुळे बुद्धिचा विकास होतो व चिकित्सकपणा वाढतो. खरेखोटेपणा पाहता येतो. त्यासाठी म. फुले यांनी साहित्य निर्मिती केली. विद्रोही साहित्याने धर्मव्यवस्थेवर व समाजव्यवस्थेवर प्रचंड

हल्ला केला. सत्यशोधक समाजाची स्थापना केली. इंग्रजी राजवटीचा दलित बहुजन समाजाने फायदा करून घ्यावा यासाठी प्रयत्न केले. मानवमुक्तीच्या विचाराचा प्रचार व प्रसार केला. ज्या स्त्रियांना अतिशुद्र मानले त्यांच्यासाठी विविध सुधारणा केल्या.

याच काळात राजर्षि शाहू महाराजांचा उदय झाला. म. फुले यांचा वारसा चालविण्याचे काम शाहू महाराजांनी केले. आपल्या कोल्हापूर संस्थानात दलितांच्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. नोकऱ्यामध्ये ५०% आरक्षण दिले. विविध वसतीगृहे काढली. ब्राह्मणांचे वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला. डॉ. आंबेडकरांना मदत केली. एकूण बहुजन समाजासाठी सामाजिक हित साधणारा हा आदर्श राजा होता. त्यांनाही फार विरोध झाला पण त्या विरोधाला न जुमानता त्यांनी लोककल्याणाचे धोरण चालूच ठेवले. म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा वारसा त्यांनी चालू ठेवला.

सातारा जिल्ह्यामध्ये म. फुले यांच्या सत्यशोधक समाजाचा विचार पोहचलेला होता. या जिल्ह्यात सत्यशोधक जलसे तयार झाले होते. पुढे शाहू महाराजांच्या काळात तर या जिल्ह्यात अनेक सामाजिक घडामोडी घडल्या. छ. प्रतापसिंह महाराजांनी शाहू महाराजांच्या सुधारणा साताऱ्यात राबविल्या व सामाजिक परिवर्तनाला हातभार लावला.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | झेलिएट डॉ. एलिनॉर | : | 'डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व', पृ. ९ |
| २. | कीर धनंजय | : | 'म. जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक', पृ. ४८ |
| ३. | कीर धनंजय | : | 'म. फुले समग्र वाङ्मय' (सहावी आवृत्ती), पृ. १४२ |
| ४. | उक्त | : | पृ. १५६ |
| ५. | उक्त | : | पृ. १६६ |
| ६. | मोहिते प्रा. कल्पना | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. ७१ |
| ७. | कीर धनंजय | : | 'म. फुले समग्र वाङ्मय', पृ. २१० |
| ८. | उक्त | : | पृ. १२५ |
| ९. | नरके हरि | : | 'म. फुले साहित्य आणि चळवळ', पृ. ५४ |
| १०. | कीर धनंजय | : | 'म. फुले समग्र वाङ्मय', पृ. २१० |
| ११. | मोरे सदानंद | : | 'म. फुले यांचे राजकीय विचार', पृ. ६९ |
| १२. | उक्त | : | पृ. ७२ |
| १३. | उक्त | : | पृ. ७५ |
| १४. | मोहिते प्रा. कल्पना | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. ७३ |
| १५. | गुंदेकर डॉ. श्रीराम | : | 'म. फुले - साहित्य आणि साहित्य मुल्ये', पृ. ८४ |
| १६. | कीर धनंजय | : | 'म. फुले समग्र वाङ्मय', पृ. २१० |
| १७. | उक्त | : | पृ. २२० |
| १८. | उक्त | : | पृ. २२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | भोसले एस. एस. (संपा.) | : | 'क्रांतीयुक्ते - राजर्षी छत्रपती शाहू', पृ.१९ |
| २०. | धारवकर भास्कर | : | 'शाहू छत्रपतींचे निवडक आदेश', (खंड १) पृ. २१ |
| २१. | भिडे, पाटील, थोरात | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. ९२ |
| २२. | धारवकर भास्कर | : | 'शाहू छत्रपतींचे निवडक आदेश', (खंड १) पृ. २५ |
| २३. | उक्त | : | पृ. २७ |
| २४. | उक्त | : | पृ. २६ |
| २५. | उक्त | : | पृ. ३० |
| २६. | जाधव भ. बा. (संपा.) | : | 'राजर्षी शाहू महाराजांची भाषणे', पृ. २४ |
| २७. | धारवकर भास्कर | : | 'शाहू छत्रपतींचे निवडक आदेश', (खंड १) पृ. ४५ |
| २८. | उक्त | : | पृ. ४९ |
| २९. | उक्त | : | पृ. ५४ |
| ३०. | भोसले प्रा. जे. वाय. | : | 'महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणेचा इतिहास', पृ. ७४ |

-----×-----

## प्रकरण - ३

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९१९ ते १९५६)

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व चळवळ :-

भारतीय समाजव्यवस्थेत हजारो वर्षापासून वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थेच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या दलितांना गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करण्याचे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केले. दलितांच्या मुक्तीसाठी त्यांनी वेळोवेळी राजकीय व सामाजिक लढे उभे केले. ते २० व्या शतकातील एक महान समाजसुधारक होते. इ. स. १९३६ नंतर संपूर्ण दलित चळवळीचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांच्याकडे आले. त्यांनी दलित समाजाच्या उत्थानासाठी खालील कार्यक्रम राबविला.

'शिका,संघटित व्हा आणि संघर्ष करा' या त्रिसूत्रीची घोषणा करून त्यांनी प्रथम शिक्षणाकडे लक्ष दिले. निरक्षरता, मागासलेपणा घालवावयाचा असेल तर शिक्षण घेतले पाहिजे म्हणून त्यांनी दलितांच्यासाठी शिक्षण संस्था काढल्या. धर्माच्या विचारांची चिरफाड करणारे लेखन केले. समाजजागृतीसाठी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, चळवळी, प्रबोधनपर हजारो व्याख्याने दिली व एकूणच दलित समाजाला विचार करावयास प्रवृत्त केले. त्यांनी अनेक चळवळी उभ्या केल्या. त्यामधून दलितांची अस्मिता जागृत केली. महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश या आंदोलनात त्यांना यश आले नाही. पण लोकांचे संघटन वाढविण्यासाठी या लढ्याचा उपयोग झाला. दलित समाज संघटित झाल्यानंतर बाबासाहेबांनी न्याय हक्कासाठी संघर्ष करायला सुरूवात केली. त्यामध्ये गोलमेज परिषद, मुंबईतील कामगारांचा संप, दलितांनी पारंपरिक अस्वच्छ कामे सोडण्याचा केलेला निर्धार तसेच 'खेडी सोडा व शहराकडे चला' यामुळे दुहेरी संघर्षासाठी दलित लोक तयार झाले.

दलितांना कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी राज्यघटनेची निर्मिती केली व शेवटी समतेचा मानवी कल्याणाचा मार्ग सांगणारा बुद्धांचा मार्ग ग्रहण केला. त्यांनी नागपूर येथे आपल्या लाखो बांधवांसह बुद्ध धम्माची दीक्षा घेतली. पूर्वाश्रमीचे दलित नवबौद्ध झाले. जुन्या मानसिक गुलामगिरीतून मुक्त झाले.

भारतातील उच्च-नीच जातीय पद्धतीवर आधारलेली समाजरचना मुळातून नष्ट करून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वावर आधारलेला समाज बाबासाहेबांना निर्माण करावयाचा होता. म्हणून त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळातही राजकीय व सामाजिक चळवळी केल्या. लढे उभे केले. आपली स्वत:ची अशी राजनिती विकसित करून दलित मुक्तीचे आंदोलन छेडले. अस्पृश्यांनी आपले मानवी हक्क मिळविण्यासाठी स्पृश्य समाजाशी संघर्ष करावा असे आंबेडकरांनी अस्पृश्यांना सांगितले.[१] त्यांना संघर्षास सिद्ध करून सामाजिक प्रतिकार करण्यास भाग पाडले. मानव मुक्तीसाठी लढा देण्याचा मंत्र दिला.

बाबासाहेबांनी भारतातील धर्मग्रंथाचा संपूर्ण अभ्यास केला होता आणि या धर्मग्रंथातून शूद्रांना कसे हीन लेखले जात होते याचे संशोधन त्यानी केले. भारतातील जातिव्यवस्थेविषयी बाबासाहेबांनी केलेले विवेचन अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांच्यामते, जगातील इतर सर्व समाजाप्रमाणे भारतीय समाज हा कालौघात वर्गीय बनला. त्या काळात त्यास - १) ब्राह्मण किंवा पुरोहित, २) क्षत्रिय सैनिक, ३) वैश्य किंवा व्यापारी, ४) शूद्र किंवा शेतकरी, मजूर आणि कारागीर एवढे वर्ग होते. सुरुवातीला हे वर्ग परिवर्तनवादी होते. त्यांच्यातील व्यक्तिगत गुणावगुणांमुळे वर्गातील व्यक्ती बदलत होत्या. परंतु पुढे हिंदूंच्या इतिहासात पुरोहित वर्गाने इतर जनतेपासून स्वत:ला वेगळे तोडून घेतले आणि आपल्या वर्गात प्रवेश नाकारून स्वत:च्या वर्गीय जातीत रूपांतर करून घेण्यास हा वर्ग यशस्वी झाला. पुढे श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार बाकीच्याही जनतेची विभागणी झाली. क्षत्रिय वर्गाची तर राज्यकर्ते आणि सैनिक अशी पोटविभागणी झाली. ही पोटविभागणी नैसर्गिक होती हे खरे परंतु वर्गपद्धतीतील मुक्त प्रवेश पद्धती बंद करणे ही अनैसर्गिक बाब होती. त्यामुळेच वर्ग बंदिस्त झाले. जाती उदयास आल्या.[२] बाबासाहेबांच्या या मताप्रमाणे भारतात जातिव्यवस्थेच्या उदयास कारणीभूत ठरलेला पहिला वर्ग म्हणजे ब्राह्मण होय. पण ब्राह्मण व्यतिरिक्त ब्राह्मणेत्तरात जातिव्यवस्थेचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाल्याचे आपणास दिसते. याविषयी बाबासाहेब विस्ताराने लिहितात. त्यांच्या मताप्रमाणे समाज हा अनुकरणप्रिय असतो. भारतातील ब्राह्मणेत्तर समाजही अनुकरणप्रिय होता व त्याने ब्राह्मण वर्गाचे अनुकरण केल्याने जातिसंस्था समाजात तळागाळापर्यंत पोहचली. डॉ. आंबेडकर या प्रक्रियेला अनुकरण्याचा संसर्ग (इन्फेक्शन ऑफ इमिटेशन) असे म्हणतात.

अशाप्रकारे ब्राह्मण ब्राह्मणेत्तरांनीसुद्धा जातियतेच्या नावाखाली अस्पृश्य दलित समाजावर मोठ्या प्रमाणात पिळवणूक करून अस्पृश्य वर्गास गुलाम बनविले. या गुलामगिरीत अडकलेल्या समाजाला गुलामगिरीची जाणीव करून देऊन बंडास उभे करण्यासाठी बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात योग्य अशी सामाजिक लढाई विकसित केली.

## डॉ. आंबेडकरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित उद्धाराचे आंदोलन :-

ब्रिटीश काळात ब्रिटिश साम्राज्यवादी भारतात आपले सत्तास्थान भक्कम करण्यासाठी भारतातील जात व धर्माचा वापर करून घेत होते. जातीय आणि धार्मिक अहंकार फुलवून त्यास खतपाणी घालत होते. भारतातील महत्त्वाच्या वर्गांना सत्तेमध्ये मर्यादित वाटा देऊन ब्रिटिश आपल्या सत्तेत सहयोगी करण्यास भाग पाडत होते. अशा परिस्थितीत भारतीय राजकारणात जात व धर्म हा केंद्रबिंदू बनला.

तत्कालीन परिस्थितीत बाबासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. १९२३ साली आपले परदेशातील शिक्षण पूर्ण करून ते भारतात परतले. तेव्हा येथील अस्पृश्य दलित अत्यंत हीनवाणे जीवन जगत होता. या वर्गाच्या सर्वांगिण उन्नतीच्या ध्यासाने बाबासाहेबांनी आपली चळवळ सुरू केली.

१९२३ पूर्वी भारतात अस्पृश्य उद्धारासाठी सत्यशोधक चळवळ कार्यरत होती. पण याचळवळीचे नेतृत्व उच्चवर्णिय मराठा समाजाकडे होते. ते ही चळवळ स्वहितासाठी वापरत होते. बाबासाहेबांनी या चळवळीत सहभागी न होता स्वतंत्र चळवळ उभी करून दलित मुक्तीचा लढा दिला. सत्यशोधक चळवळीपासून अलिप्त राहून डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र चळवळ जरी उभी केली तरी त्यांची राजकीय परंपरा ही महात्मा फुल्यांच्या राजकीय परंपरेसारखीच होती. त्यांच्यामते सत्यशोधक चळवळ ही सद्धर्माची चळवळ आहे आणि ते स्वत:ही सत्यशोधक होते. त्यांच्यामते कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली चाललेली राष्ट्रीय चळवळ हा एक ब्राह्मणांचा सत्ता ताब्यात घेण्यासाठी व स्वत:चे जातीय वर्चस्व टिकविण्यासाठी निर्माण केलेला कावा आहे. सध्याच्या ब्राह्मणांना सोवळ्या-ओवळ्याचा धर्म राखावयाचा नाही तर राजकीय सत्तेच्या साहाय्याने

आपले वर्चस्व टिकवावयाचे आहे म्हणून शुद्रातिशुद्रांनी या राजकारणापासून सावध राहिले पाहिजे. जागृती व प्रगती संघर्षाशिवाय शक्य नाही कारण संघर्षाशिवाय ब्राह्मण आपले विशेषाधिकार सोडणार नाहीत. त्यासाठी संघर्ष आवश्यक आहे. तर कधी कधी त्यासाठी इंग्रज सरकारची लागलीच तर मदत घ्यावी.[४] अशा प्रकारे बाबासाहेब संघर्षाचा मंत्र देतात पण संघर्ष करीत असताना बाबासाहेब इंग्रजांची मदत घ्या असे म्हणतात. म्हणजेच ते स्वातंत्र्य चळवळीच्या विरोधी व इंग्रजांबद्दल सहानुभूती दाखवित होते असे नाही तर त्यांना इतर सर्व बाबींपेक्षा अस्पृश्य वर्गास हक्क व अधिकार मिळवून देणे हे निकडीचे वाटत होते. निश्चितपणे बाबासाहेब स्वातंत्र्य चळवळीत नव्हते व त्यांनी या चळवळीला पाठिंबाही दिला नाही. एखाद्या प्रदेशाने दुसऱ्या प्रदेशाचे स्वातंत्र्य हिरावून घेणे जसे वाईट आहे तसेच समाजातील एखाद्या वर्गाने दुसऱ्या वर्गाला बंधनात ठेवणे हे सुद्धा वाईट आहे. स्वातंत्र्याच्या भूमिकेविषयी बाबासाहेब आपली मते व्यक्त करताना म्हणतात, अस्पृश्य वर्गास स्वराज्याची अत्यंत आवश्यकता आहे. किंबहुना त्याबद्दल त्यास इतर वर्गापेक्षा जास्त तळमळ लागली आहे. परंतु त्यास हवे असलेले स्वराज्य म्हणजे पूर्वीच्या स्वराज्याची आवृत्ती नको. ज्या स्वराज्यात त्याच्या माणुसकीचा खून होणार नाही, न्याय, व्यक्तीच्या हक्काचे संरक्षण योग्य प्रकारे होईल असे स्वराज्य त्यास हवे आहे.[५] अशाप्रकारे डॉ. आंबेडकर स्वराज्याची कल्पना मांडतात. स्वराज्य मागताना ते स्पृश्यांना सांगतात, आम्हाला सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करा म्हणजे आम्ही तुमच्या खांद्याला खांदा लावून राजकीय स्वातंत्र्यासाठी आमचे प्राण पणास लावून लढू.[६]

अशाप्रकारे स्वातंत्र्याच्या चळवळीत डॉ. आंबेडकरांनी दलितांच्या हिताला जास्त महत्त्व दिले. १९२३ मध्ये बाबासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला असला तरी त्यापूर्वी त्यांनी दलित मुक्तीचा राजकीय, सामाजिक कार्यास प्रारंभ केला. आंदोलनाची दिशा स्पष्ट केली होती. त्याचा परामर्श घेणे महत्त्वाचे आहे.

बाबासाहेबांनी दलितांच्या हक्कासाठी लढा देण्यापूर्वी भारतात याच काळात राजकारणात धर्माचा वापर मोठ्या प्रमाणावर होत होता आणि धर्म वापरासाठी ब्रिटिश खतपाणी घालत होते. राष्ट्रीय सभेने केलेल्या स्वातंत्र्याच्या आंदोलनातून मुस्लिम धर्मियांना अत्यंत कावेबाजपणे दूर

करण्याचे काम इंग्रज करत होते. राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्याचे आंदोलन तीव्र केले की, हिंदू-मुस्लिम दंगे होऊ लागले. हे ब्रिटिशांनी जाणिवपूर्वक केलेले कटू कार्य आहे. यातूनच १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना होऊन धर्माधिष्ठित पक्ष स्थापन झाला. पुढे १९०९ च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने मुस्लिमांना राखीव जागा व स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले. यामुळे मुस्लिमांचे वेगवळे राजकीय अस्तित्व मान्य करण्यात आले. पुढे १९१६ मध्ये काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात लखनौ करार होऊन मुस्लिमांच्या स्वतंत्र राजकीय अस्तित्वाला मान्यता दिली. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणानुसार विभक्त मतदार संघ हे एकराष्ट्रीयत्वास घातक आहेत व लोकशाहीसही घातक आहेत, हे या अहवालात स्पष्ट केले असतानाही राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांनी हे तत्त्व मान्य केले. पुढे स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची निर्मिती होण्यास या सर्व बाबी कारणीभूत ठरल्या.

या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांच्या हक्कासाठी भारतीय राजकारणात व समाजकारणात उतरलेले दिसून येतात.

## साऊथब्युरो कमिशनला अहवाल :-

भारतातील निरनिराळ्या जातीच्या मताधिकाराविषयक चौकशीसाठी साऊथब्युरो समिती आली. २७ जानेवारी १९१९ ला साऊथब्युरो कमिशनला बाबासाहेबांनी अहवाल सादर करून सर्वप्रथम दलितांच्या राजकीय हक्कासाठी आवाज उठवला. भारतात काँग्रेस पक्षाने मुस्लिम वगळता इतरांना जातीवार प्रतिनिधीत्व तर नाकारलेच शिवाय स्वीकृत सदस्यत्वाचा मार्गही बंद केला. तेव्हा या कमिशनपुढे डॉ.आंबेडकरांनी मुंबई प्रांतीय विधिमंडळामध्ये आठ आणि मध्यवर्ती मंडळामध्ये एक अशा नऊ जागा अस्पृश्यांसाठी मागितल्या तसेच तीन सदस्य मतदार संघाची मागणी केली. अस्पृश्यवर्गाचे मताधिकार व मतदार संघही विस्तृत करावेत अशी सूचना त्यांनी केली. पुढे १९१९ च्या कायद्यान्वये मुंबई प्रांतीय विधीमंडळात श्री. डी. डी. घोलप, या केवळ एका अस्पृश्य व्यक्तीस प्रतिनिधीत्व मिळाले.[७]

डॉ. आंबेडकरांनी सुरुवातीच्या काळामध्ये अस्पृश्यासाठी राखीव जागांची मागणी केली पण त्याचबरोबर सर्व वयस्कर मतदारांना मतदानाचा अधिकार असावा अशी अट त्यांनी घातली.

नंतरही काही काळ बाबासाहेबांनी राखीव जागांचे समर्थन केले. पण नेहरू समितीच्या रिपोर्टमुळे व कॉंग्रेस पक्षाच्या दृष्टिकोनामुळे पुढे त्यांनी विभक्त मतदार संघाची मागणी केली. त्याकाळात सर्व धार्मिक अल्पसंख्याकांसाठी इंग्रज सरकारने विभक्त मतदार संघ देऊ केले होते. त्यामुळे बाबासाहेबांनी गोलमेज परिषदेत विभक्त मतदार संघाची मागणी केली.

## समाजजागृतीसाठी वृत्तपत्रे व परिषद :-

अस्पृश्य समाजाची दु:खे जगाच्या वेशीवर मांडण्यासाठी व अस्पृश्यांना आपल्या गुलामगिरीची जाणीव करून देण्यासाठी 'मुकनायक' वृत्तपत्र सुरू केले. बाबासाहेबांच्या कार्यास कोल्हापूरच्या छ.शाहू महाराजांनी पाठिंबा दिला. अस्पृश्यांना स्वत:चा नेता मिळाला म्हणून त्यांनी डॉ. आंबेडकरांना प्रोत्साहन दिले. नंतरच्या काळात २१ मार्च १९२० मध्ये काल्हापूर संस्थानातील माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद भरली होती. या परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांची मुक्त कंठाने प्रशंसा केली. पुढे मे १९२० मध्ये नागपूर येथे शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद झाली आणि दलितांच्या चळवळीला सुरुवात झाली.

नंतरच्या काळात बाबासाहेबांनी समता, जनता, प्रबुद्ध भारत यासारखी इतर मासिक / वृत्तपत्रे सुरू करून अस्पृश्य वर्गाच्या जागृतीचे काम केले.

१९२३ नंतर बाबासाहेबांनी दलित मुक्तीची स्वत:ची अशी एक वैचारिक बैठक ठरवून दलितांच्या विकासासाठी स्वतंत्र राजकीय व सामाजिक चळवळ उभी केली. कोणत्याही राजकीय सामाजिक चळवळीत विचार व तत्त्वज्ञानाला अत्यंत महत्त्व असते. कारण विचार व तत्त्वज्ञानाशिवाय जनसंघटन होत नसते. तसेच त्या चळवळीला लोकांचा पाठिंबाही मिळत नसतो. चळवळीला लोकांची अधिमान्यता असणे महत्त्वाचे असते. म्हणून बाबासाहेबांनी आपली दलित मुक्तीची राजनिती आखत असताना आपल्या चळवळीसाठी उदारमतवादी विचारसरणीचा स्वीकार केला व मनुष्याचे नैसर्गिक हक्क महत्त्वाचे मानले.

अस्पृश्य वर्गाच्या अडचणी सरकारपर्यंत मांडून त्यांना हक्क मिळवून देण्यासाठी एखादी वैचारिक भूमिका असणारी संघटना असावी लागते आणि त्यासाठीच बाबासाहेबांनी १९२४ मध्ये

''बहिष्कृत हितकारीणी सभा'' या नावाची संघटना स्थापन केली. बहिष्कृत हितकारिणी सभा - उद्देश्य - ध्येय - कार्य पुढीलप्रमाणे -

**संस्थेचे उद्देश व संस्थेने करावयाचे कार्य खाली नमूद केली आहेत.**

अ) बहिष्कृत वर्गातील चालू परिस्थितीची माहिती गोळा करून व ती लोकांच्या निदर्शनास आणून त्यावर लोकमत तयार करणे.

ब) त्याचप्रमाणे सरकारकडून त्यांच्या इच्छांचे संरक्षण व्हावे व त्यांना जरूर त्या सवलती मिळाव्यात म्हणून प्रयत्न करावे.

क) बहिष्कृत वर्गात जागृती निर्माण करणे व त्यासंदर्भात प्रचारक नेमणे.

ड) बहिष्कृत वर्गात त्यांच्या हक्कांची जाणीव उत्पन्न करून ते त्यांना प्राप्त करून देण्यास प्रयत्न करणे.

इ) शिक्षण प्रसार करणे, वाचनालये काढणे, विद्यार्थी वसतिगृह काढणे, लायक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे व देवालये, समाज जागृतीसाठी कीर्तने किंवा मॅजिक लॅटर्नद्वारे व्याख्याने वगैरेची व्यवस्था करणे, आर्थिक उन्नतीच्या जरूर त्या योजना व सूचना तयार करून योग्य अधिकाऱ्यास सादर करणे.

फ) इतर अन्य मार्गांनी त्यांची सर्वांगिण सुधारणा करण्याचा प्रयत्न करणे.[८]

## बहिष्कृत हितकारिणी सभा :-

या संघटनेने सुरुवातीला सामाजिक जागृतीवर भर दिला. या संघटनेच्या माध्यमातून नंतरच्या काळात बाबासाहेबांनी अनेक लढे उभे केले. अस्पृश्यांना त्यांचे मानवी न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी त्यांना संघर्ष करायला शिकवले. जे दु:ख सार्वजनिक आहे, त्याचे सर्वांनी मिळून निराकरण करावे असे बाबासाहेबांनी सुचविले. आपला उद्धार आपणच केला पाहिजे. या भूमिकेतून बाबासाहेबांनी अस्पृश्य वर्गास सामाजिक प्रतिकार करण्यास भाग पाडले. त्यासाठी त्यांनी १९२७ साली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. मनुस्मृती या प्राचीन वैदिक परंपरा जपणाऱ्या ग्रंथांचे दहन केले. १९२९ मध्ये पुणे येथील पार्वती मंदिर सत्याग्रह, १९३० मध्ये नाशिक काळाराम

मंदिर प्रवेश सत्याग्रह केला व अस्पृश्यांना आत्मउन्नतीचा मार्ग दाखविला. सनातनी हिंदूंनी बाबासाहेबांना विरोध केला. पण त्यांनी त्यास तेवढ्याच धीराने तोंड दिले.

भारतीय राजकारणात बाबासाहेब एका बाजूला सामाजिक समतेसाठी सत्याग्रह करीत होते तर दुसऱ्या बाजूला अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी आपली स्वतंत्र राजकीय चळवळ विकसित करीत होते. १९३० नंतरच्या बदलत्या राजकीय घडामोडीच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी स्वत:ची राजकीय राजनिती विकसित करणे भाग पाडले. कारण कोणतीही सामाजिक चळवळ ही नंतरच्या काळात राजकीय चळवळीत परावर्तित होत असते. १९३० नंतरच्या वेगवेगळ्या गोलमेज परिषदा भारतात मर्यादित सत्तेचे वाटप व वितरण कशा प्रकारे करावे याचा विचार करण्यासाठी भरविण्यात आल्या. बाबासाहेबांनी या गोलमेच परिषदामधून अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी करून त्यांना मानवी मुलभूत हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांना कौन्सिलमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व, सरकारी नोकरीत पुरेसे प्रमाण तसेच त्यांना कायदेशीर संरक्षण इ. ची मागणी त्यांनी केली. तसेच अस्पृश्य वर्गांचा राज्यकारभारामध्ये सहभाग असावा, त्यांचे स्वतंत्र स्थान असावे यासाठी दुसऱ्या गोलमेज परिषदेत बाबासाहेबांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. पण महात्मा गांधीजी अस्पृश्य समाज हा हिंदू धर्माचा एक घटक मानत असल्याने त्यांनी स्वतंत्र मतदार संघ देण्यास विरोध केला. पुढे महात्मा गांधींनी येरवडा कारागृहामध्ये बाबासाहेबांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीविरुद्ध उपोषण केले. शेवटी १९३२ मध्ये गांधीजी व डॉ. आंबेडकर यांच्यात 'पुणे करार' होऊन राखीव मतदार संघाचा पर्याय बाबासाहेबांनी मान्य केला.

बाबासाहेबांनी आपल्या राजकीय जीवनात संपर्ण हिंदूंशी संघर्ष करून दलितांना जास्तीत-जास्त सवलती मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पण सर्वत्र हिंदू सहजासहजी आपले अधिकार हक्क सोडत नव्हते. पुढे १३ ऑक्टोंबर १९३५ ला येवला, जि. नाशिक येथे भरलेल्या दलित परिषदेत बाबसाहेब आपल्या भाषणात म्हणाले, हिंदू धर्माशी असलेला संबंध तोडा, स्वाभिमान आणि शांतता प्राप्त करून घेण्यासाठी अशा दुसऱ्या धर्मात जा, परंतु लक्षात ठेवा जो धर्म तुम्ही निवडाल त्यात समान दर्जा, समान संधी आणि समान वागणुक मिळाली पाहिजे.

आपल्या स्वत:विषयी ते म्हणाले की, दुर्दैवाने मी अस्पृश्य जातीत जन्माला आलो हा काही माझा अपराध नाही. परंतु मरताना मी हिंदू म्हणून मरणार नाही.[९] बाबासाहेबांच्या या घोषणेमुळे हिंदू समाजाला हादरा बसला. हिंदू नेते धर्मांतराच्या या घोषणेचा विचार करू लागले.

## स्वतंत्र मजूर पक्ष (Independent Labour Party) :-

१९२४ नंतर बाबासाहेबांनी मंदिर प्रवेश सत्याग्रह, मनुस्मृती दहन, चवदार तळे सत्याग्रह यासारखे लढे देऊन हिंदू समाजाला हादरे दिले. अस्पृश्यता हा या देशावरील कलंक आहे. पण तरीही काँग्रेस व इतर सवर्ण हिंदू सहजासहजी अस्पृश्यांना माणुसकीची वागणूक देत नाहीत. हे लक्षात आल्यावरच १३ ऑक्टोबर १९३५ रोजी त्यांनी धर्मांतराची घोषणा केली. पण ही घोषणा मात्र त्यांनी अंमलात आणली नाही.

भारतीय राजकारणात दलितांच्या राजकीय चळवळीला खऱ्या अर्थाने १९३६ पासून सुरुवात झाली. १९३५ मध्ये ब्रिटिशांनी एका कायद्यान्वये भारतीयांना काही प्रमाणात विधिमंडळात प्रतिनिधित्व दिले. १९३५ च्या कायद्यान्वये १९३७ मध्ये भारतात निवडणुका घेण्यात येणार होत्या. भारतातील सर्व पक्ष निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करीत होते. सर्व जातीतील दलितांचा त्यांना राजकीय हक्क प्रदान करणारा एखादा राजकीय पक्ष स्थापन करावा असे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून १५ ऑगस्ट १९३६ मध्ये त्यांनी आपल्या सहकाऱ्यांशी योग्य विचार विनिमय करून ‘स्वतंत्र मजूर पक्ष’ या नावाचा पक्ष स्थापन केला.

१९३७ च्या निवडणुकीत काँग्रेसला विरोधी पक्ष असावा अन्यथा काँग्रेसची एक पक्षीय हुकूमशाही निर्माण होईल असे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून त्यांनी या पक्षाची स्थापना केली. स्वतंत्र मजूरपक्षाविषयी १५ ऑगस्ट १९३६ साली ‘टाईम्स ऑफ इंडिया’ या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली.

‘स्वतंत्र मजूर पक्ष’ या नावातच हा राजकीय पक्ष जाती आणि धर्माच्या मर्यादा ओलांडणारा आणि कष्टकऱ्यांच्या हिताची जपणूक करणारा असेल हे स्पष्ट करण्यात आले. भारतीय राजकारणाला जातीय पातळीवरून वर्गीय पातळीवर नेण्याचा हा बाबासाहेबांचा पहिलाच प्रयत्न होता.[१०]

हा पक्ष स्थापन करीत असताना बाबासाहेबांनी 'दलित' या शब्दाऐवजी 'मजूर' शब्द वापरला. या पक्षाचे जे नाव ठेवले त्याचे कारण विचारले असता त्यांनी स्पष्ट केले की, दलित वर्ग नावाऐवजी 'मजूर' हा शब्द योजण्याचा एकच हेतू आहे. तो म्हणजे मजूर या वर्गात 'दलित' वर्गाचा समावेश होतो.[११]

**मजूर पक्षाची उद्दिष्टे :- स्वतंत्र मजूर पक्षाने खालील ध्येयधोरणांचा पुरस्कार केला**

१. उत्पादन साधनांची मालकी राज्याकडे असावी, व्यवस्थापन राज्याकडे असावे.

२. शेतकऱ्यांच्या हितासाठी लँड मॉरगेज बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या, सहकारी सोसायट्या स्थापन कराव्यात.

३. शेतीचे छोटे-छोटे तुकडे होणार नाहीत यासाठी लक्ष देणे.

४. खोती आणि तालुकादारी शेती पद्धतीतील कुळांना संरक्षण देण्याचे वचन दिले.

५. वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात जड उद्योगांची पुनर्रचना करण्याचे ठरविले.

६. तांत्रिक शिक्षणाचा जोरात पुरस्कार करू असे जाहीर केले.

७. खेड्यातील जमीनीबाबत आधुनिक दृष्टिकोन निर्माण करण्याचा, प्राथमिक शिक्षणात सहकार्य करण्याचा, प्रौढ शिक्षणाचा प्रसार करण्याचा, शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना करण्याच कार्यक्रम असे अनेक कार्यक्रम मजूर पक्षाने जनतेसमोर ठेवले.[१२]

## स्वतंत्र मजूर पक्षाचे राजकारण :-

बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने अत्यंत व्यापक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवला होता. वर्गीय पातळीवर मजूर व दलितांना हक्क मिळवून देणारा श्रमजीवी वर्गाचा हा पक्ष होता. या पक्षात वर्गाखेरीज इतर शोषित वर्गाला सुद्धा सहभागी करून घेतले होते. १९३७ च्या निवडणुकीत बाबासाहेबांनी पक्षाच्या वतीने ज्या उमेदवारांना निवडणूक लढविण्यासाठी अधिकृत केले, त्यांच्या जातीचा विचार केल्यास असे स्पष्ट होते की, बहुतेक उमेदवार अस्पृश्यातील महार जातीतील, मांग जातीतील, काही सी. के. पी. जातीय आणि ब्राह्मण जातीचे होते.[१३] त्यामुळे हा पक्ष सर्व जाती धर्मांचा असल्याचे दिसते.

१९३७ च्या निवडणूकीत मजूर पक्षाला घवघवीत यश मिळाले आणि १७ पैकी १३ उमेदवार यशस्वी झाले. स्वत: बाबासाहेब मुंबई विधानसभेवर निवडून आले.

मजूर पक्षाच्या माध्यमातून बाबासाहेब वर्गीय आणि जातीय या दोन्ही पातळ्यावर लढा देत होते. मजूर पक्षाच्या वतीने बाबासाहेबांनी कायदेमंडळात - १) महार वतने पद्धत नष्ट करण्यासंबंधी एक बिल आणले. २) कोकणातील खोतशाही नष्ट करायची म्हणून दुसरे स्वतंत्र बिल आणले.

मजूरांच्या हिताविरोधी असणारा काळा कायदा (बॉम्बे इंडस्ट्रीयल ॲक्ट) म्हणून प्रसिद्ध असलेला कायदा सरकारने अंमलात आणला. त्यांलाही बाबासाहेबांनी इतर पक्षाच्या सहकार्याने प्रखर विरोध केला.[१४] त्यासाठी इतर कामगार संघटनांच्या मदतीने त्यांनी मुंबईत एक दिवसाच संप पुकारला.

## शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे राजकारण :-

१९३९ साली दुसरे महायुद्ध झाले आणि भारतीय राजकारणात १९३९ नंतर गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने स्वातंत्र्याचे आंदोलन सुरू केले. भारतीयांची स्वातंत्र्याची मागणी व त्यासाठीचे मोठे जन-आंदोलन सुरू केले. या पार्श्वभूमीवर भारतीयांचा असंतोष शांत होण्यासाठी व भारतातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यासाठी १९४२ साली सर स्टॅनफोर्ड क्रिप्स यांना ब्रिटिशांनी भारतात पाठविले. त्यांनी आपल्या भारतीय स्वातंत्र्याच्या संदर्भात काँग्रेस, मुस्लिम लिग व इतर पक्षाशी वाटाघाटी केल्या. पण बाबासाहेबांना अस्पृश्यां ऐवजी मजुरांचे प्रतिनिधी मानले गेले व अस्पृश्य या वर्गाकडे क्रीप्स योजनेने पुर्णपणे दुर्लक्ष केले.

क्रिप्स योजनेनुसार महायुद्ध संपल्यावर भारताला स्वातंत्र्य देण्यात येणार होते. तसेच स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी प्रांतिय कायदे मंडळाद्वारे निवडलेल्या प्रतिनिधीची एक घटना समिती बनविली जाणार होती. कोणत्याही विरोधी प्रांताला घटना समितीने तयार केलेली घटना मंजूर नसेल तर त्यांना स्वतंत्र घटना बनवून त्याप्रमाणे शासन करवून घेण्याचे स्वातंत्र्य राहील. घटना समिती आणि ब्रिटिश सरकार आपापसात करार करतील आणि त्यानंतर भारताला स्वातंत्र्य

दिले जाईल. तसेच धार्मिक व वांशिक अल्पसंख्यकांना संरक्षण देण्यात येईल. घटना समितीच्या प्रतिनिधींची संख्या सर्व प्रांतिय विधिमंडळाच्या एकणू सदस्य संख्येच्या १/१० इतकी असेल. त्यामध्ये संस्थानाच्या प्रतिनिधींनाही भाग घेण्याचा समान अधिकार देण्याचे योजलेले होते.[१५] परंतु काँग्रेसने ही योजना फेटाळल्यामुळे क्रिप्स यांना हात हालवित परत जावे लागले.

एकंदरीत या योजनेत अस्पृश्य वर्गाच्या प्रतिनिधित्वाचा घटना समितीमध्ये विचार केला गेला नव्हता. त्यामुळे बाबासाहेबांनी या योजनेला विरोध केला.

**शेड्युल्ड कास्ट फेडरेशन १९४२** - १९३७ च्या निवडणुकीत स्वतंत्र मजूर पक्षाने भरीव यश मिळवले होते. पण बदलत्या राजकीय परिस्थितीत बाबासाहेबांना मजूर पक्षाचा प्रयोग मागे घ्यावा लागला. कारण ब्रिटिश मजूर पक्षाला मान्यता देत नव्हते.

क्रिप्स योजनेच्या अपयशानंतर भारतीय राजकारणात दलितांची एक देशव्यापी संघटना असावी असा विचार करून बाबासाहेबांनी ३०, ३१ मार्च १९४२ ला दिल्ली येथे एक परिषद भरवली व त्यात संघटनेसंबंधी विचार केला. तद्नंतर १७, १८, १९, २० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे भारतीय अस्पृश्य समाजाचे अधिवेशन घेतले. या अधिवेशनात शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या नावाच्या राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली. देशातील सर्व अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी हे फेडरेशन काढण्यात आले होते. या अधिवेशनापूर्वी म्हणजे २ जुलै १९४२ रोजी बाबासाहेबांना लॉर्ड वेव्हेल यांच्या एक एझिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये घेण्याचे जाहीर झाले होते आणि ॲमिटिनी त्यांच्याकडे मजूर खाते सोपवावे असे सुचविले.[१६] त्याप्रमाणे बाबासाहेबांना मजूर खाते देण्यात आले. नागपूर अधिवेशनात शे. का. फे. ची स्थापना होऊन खालील ठराव मंजूर करण्यात आले.

१. क्रिप्स योजनेचा निषेध, बहिष्कार.

२. अस्पृश्यांचे स्वतंत राजकीय अस्तित्व मान्य करणे.

३. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी प्रत्येक प्रांताच्या बजेटमध्ये तरतूद करावी.

४. अस्पृश्यांना मध्यवर्ती व प्रांतिक मंत्रीमंडळात योग्य प्रतिनिधित्व मिळावे.

५. अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्यात राखीव जागा मिळाव्यात.

६. लोकसंख्येच्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्था व कायदे मंडळात राखीव जागा मिळाव्यात.

७. त्यासाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत.

८. अस्पृश्यांना त्यांच्या चरितार्थासाठी शेतीला लायक अशी पडिक जमीन मिळावी.

इ. महत्त्वाचे ठराव मान्य झाले.[१७]

## शे. का. फे. चे कार्य :-

शे. का. फे. च्या स्थापनेनंतर बाबासाहेब व्हाईसरॉयच्या कौन्सिलात मजूर मंत्री म्हणून सामील झाले. त्या काळात त्यांनी शे. का. फेडरेशनला बळकट करण्याचा प्रयत्न केला.

शे. का. फे. च्या स्थापनेपासून १९४५ पर्यंतच्या फेडरेशनच्या वेगवेगळ्या अधिवेशनातून बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या हक्कांची व राजकीय सहभागाची मागणी केली. शे. का. फे. च्या द्वारे बाबासाहेब दलितांच्या राजकीय हक्कासाठीच फक्त लढा देत होते असे नाही तर त्याचबरोबर काँग्रेसच्या पाठीशी हिंदू जनता खंबीरपणे उभी होती. मुस्लीमांना स्वतंत्र मतदार संघ होता. शे. का. फे. भोवती संयुक्त मतदार संघ असल्याने ग्रामीण भागात स्पृश्य समाजाने या पक्षावर बहिष्कार टाकला. तसेच या निवडणुकीत शे. का. फे. ला यश मिळणार नाही यासाठी काँग्रेसने प्रयत्न केला. त्यामुळे या निवडणुकीत शे. का. फे. चा दारूण पराभव झाला. पण बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना नाउमेद होऊ दिले नाही. २३/३/१९४७ रोजी दादासाहेब गायकवाड यांना लिहिलेल्या पत्रात बाबासाहेब म्हणतात, आपण आपल्यातील विस्कळीत झालेली शक्ती एकत्रित केली पाहिजे. खरे म्हणजे पराजित सैन्याचा सेनापती असेच करतो.[१८] पुढे १९४६ मध्ये घटना परिषद व हंगामी राष्ट्रीय सरकारच्या स्थापनेची घोषणा झाल्यामुळे बाबासाहेबांनी मंत्रीपद सोडले व पुन्हा ते दलित मुक्तीचा मार्ग शोधण्याच्या कार्याला लागले. ब्रिटिशांनी अस्पृश्यांकडे दुर्लक्ष करू नये व त्यांचे हक्क अधिकार द्यावेत म्हणून मधल्या काळात शे. का. फे. ने अनेक सत्याग्रह आयोजित केले.

## डॉ. बाबासाहेब आबेडकरांची स्वातंत्र्योत्तर काळातील दलित मुक्तीच रणनिती :-

१९४६ च्या हंगामी मंत्रिमंडळात बाबासाहेबांच्या जागी अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून बाबू जगजीवनराम यांना घेण्यात आले. तर मुस्लीम लीगने शे. का. फे. चे नेते श्री. जे. एम. मंडल (बंगाल) यांना घेतले. इंग्रजांनी बाबासाहेबांकडे फारसे लक्ष न देताच सत्तांतर केले. पुढे १९४६ च्या नोव्हेंबरमध्ये घटना समितीच्या सदस्यांची निवड करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बंगालमधून घटना समितीवर निवडून देण्यात आले. परंतु नंतर मुस्लीम लिगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. माऊंट बॅटन योजनेप्रमाणे भारताचे विभाजन करण्याचे निश्चित झाले. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. पाकिस्तान अस्तित्वात आल्यावर बंगालचा बराचसा भाग पाकिस्तानात गेला. त्यामुळे बाबासाहेबांचे घटना समितीवरील सदस्यत्व रद्द झाले. पण पुढे १९४७ मध्ये मुंबई विधिमंडळाने त्यांना घटना समितीवर निवडून दिले.

१९४७ मध्ये नव्या मंत्रिमंडळात गांधीजींच्या सल्ल्यानुसार पं. नेहरूंनी बाबासाहेबांना कायदामंत्री म्हणून घेतले. पुढे ते घटना मसुदा समितीचे अध्यक्ष झाले. अस्पृश्य समाजाच्या हक्काचे रक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून आणि देशसेवा करण्याच्या दृष्टीने काँग्रेसला सहकार्य करायचे असे ठरवून बाबासाहेबांनी राज्यघटना तयार केली व २६ जानेवारी १९५० ला अंमलातही आली.

कायदामंत्री असताना हिंदू समाजाची पुनर्रचना करण्यासाठी देशातील स्त्रियांना पुरुषांबरोबर अधिकार, हक्क मिळावेत यासाठी बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल तयार केले. पण संसदेत हे बिल सादर केल्यावर प्रतिगामी हिंदू सभासदांनी हे बिल जसेच्या तसे पास होऊ दिले नाही. त्यामुळे २५ सप्टेंबर १९५१ रोजी त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. हजारो वर्षानंतर हिंदू समाजाला एक सर्व मान्य असा कायदा हिंदू कोड बिल रूपाने बाबासाहेबांनी प्रदान कला हे त्यांचे मोठे योगदान म्हणावे लागेल.

१९५१ नंतर बाबासाहेबांनी त्यांच्या राजकीय डावपेचामध्ये फारसा बदल केला नाही. काँग्रेस पक्षाशी त्यांचे संबंधचांगले राहिले नाहीत. कम्युनिस्ट विचारसरणीपेक्षा त्यांनी बुद्धीझम् श्रेष्ठ मानला. मार्क्सपेक्षा बुद्ध तत्त्वज्ञान त्यांना जवळचे वाटले. त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाचे व त्यांचे

मतभेद झाले. समाजवादी पक्षाशी त्यांनी जवळीक साधली. पण १९५० च्या घटनेनुसार १९५२ मध्ये सार्वजनिक निवडणूका घेण्यात आल्या. या निवडणुकीत शे. का. फे. ने अत्यंत महत्त्वपूर्ण आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. या निवडणुकीत काँग्रेसला प्रचंड विजय मिळाला. डॉ. बाबासाहेबासह बरेचसे शे. का. फे. चे मातब्बर नेते या निवडणुकीत पराभूत झाले. शे. का. फे. चे पी. एन. राजभोज व हैद्राबाद प्रांतातील एम्. आर. कृष्णराव हे दोनच उमेदवार निवडून आले. पुढे १९५४ मधील भंडारा पोटनिवडणुकीत ही बाबासाहेबांचा पराभव झाला. पण नंतर ते राज्यसभेवर निवडून आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वातंत्र्यानंतरच्या काळात निवडणूकीच्या राजकारणात म्हणावे तेवढे यशस्वी झाले नाहीत. अस्पृश्य समाजाला शासनकर्ती जमात बनविण्याचा प्रयत्न करीत असलेल्या बाबासाहेबांना तत्कालीन काँग्रेस पक्षाने पुढे येऊ दिले नाही.

**धर्मांतर :-**

१९३५-३६ पासून १९५१ पर्यंतच्या बाबासाहेबांच्या सार्वजनिक जीवनात तत्कालीन काँग्रेस व स्पृश्य हिंदू धर्मियांकडून त्यांना कटू अनुभव येत होते. त्यामुळे १९५० पासून बौद्ध धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म असल्याची भूमिका ते मांडू लागले.

१९३५ ला धर्मांतराची घोषणा करून बाबासाहेब १९५६ ला बौद्ध धर्माचा स्विकार करतात म्हणजे प्रदीर्घ विचारांनी त्यांनी हा निर्णय घेतला होता. बौद्ध धर्मच बाबासाहेबांनी का घेतला ? त्याचे कारण काय ? बौद्ध धर्म व वैदिक धर्म यांची तुलना केली तर असे दिसते की, बौद्धधम्माचा पाया नैतिक आचरण असून वैदिक धर्माचा पाया कर्मकांडाचे आचरण आहे. वैदिक धर्माची उभारणी अमंगल अशा भेदभावावर केलेली असून बौद्ध धर्माची उभारणी समतेवर आहे.[१९]

१४ ऑक्टोबर १९५६ रोजी  धम्म दीक्षा घेण्यापूर्वी वृत्तपत्रांना बाबासाहेबांनी दिलेली मुलाखत महत्त्वाची आहे. ते म्हणतात, मी गांधीजींना असे आश्वासन दिले होते की, कमीत कमी हानिकारक मार्ग मी स्वीकारेन, तद्नुसार आता बौद्ध धर्म स्वीकारून मी हिंदू समाजाच्या दृष्टीने एक उपकारक कृत्य करीत आहे कारण बौद्ध धर्म हा भारतीय संस्कृतीचेच अंग आहे.[२०]

अशाप्रकारे हजारो वर्षापासून अस्पृश्यतेच्या दलदलीत फसलेल्या दलितांना नव्या मानवधर्माची दीक्षा देऊन बाबासाहेबांनी खऱ्या अर्थाने मानवमुक्तीचा प्रयत्न केल्याचे दिसते.

बाबासाहेबांनी शेवटच्या काळात दलितांनी अन्य समाजातील समविचारी लोकांशी सहकार्य करावे. त्या शिवाय आपणास यश मिळणार नाही, असा सल्ला दिला. शे. का. फे. फारसा प्रगती करीत नाही, म्हणून तो पक्ष बरखास्त करून सर्व दलित शोषितांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करावी असे सूचविले. परंतु ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांचे अचानक महानिर्वाण झाल्यामुळे नव्या रिपब्लिकन पक्षाची ते स्थापना करू शकले नाहीत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित मुक्तीच्या राजकारणाचा व समाजकारणाचा विचार करता असे दिसते की त्यांनी जाणूनबुजून दलितांची राजकीय चळवळ व सामाजिक चळवळ वेगळी ठेवली होती. त्याचे कारण म्हणजे राष्ट्रीय चळवळीत दलितांच्या हितााच विचार होत नव्हता. दलितांचा स्वाभिमान व आत्मतेज केवळ वेगळी चळवळ चालवून मिळणार होते. कारण संघर्षाशिवाय जागृती नाही असे त्यांचे मत होते. त्यासाठीच त्यांनी आपली चळवळ वेगळी ठेवली. दलितांच्या लोकमताचा दबाव आणून त्यांनी शक्य तेवढे फायदे दलितांना मिळवून दिले. बाबासाहेब मूळातच संसदीय शासन व्यवस्थेचे पुरस्कर्ते असल्याने शासनाकडून वाटाघाटी दबावाने त्यांना आपणास योग्य असे निर्णय घेण्यास भाग पाडले. बाबासाहेबांनी आपल्या राजकीय व सामाजिक चळवळीत दबावाची राजनिती विकसित केली. त्यामुळे दलितांमध्ये जागृती तर निर्माण झालीच पण त्याचबरोबर त्यांना राजकीय व कायदेशीर संरक्षण, नोकऱ्यात राखीव जागा ही मिळाल्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात दबावाच्या राजकारणाबरोबर सर्व पद दलितांसाठी एकच संघटना स्थापन करण्याचा प्रयत्न बाबासाहेबांनी केला. १९३६ साली त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. हा पक्ष सर्व शोषित कामगार व शेतकरी यांच्यासाठी खुला होता. १९३७ च्या निवडणुकीत या पक्षाने बऱ्यापैकी यश संपादन केले. पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर बदलत्या जागतिक आणि राष्ट्रीय परिस्थितीमुळे बाबासाहेबांना शे. का. फे. ही संघटना स्थापन करणे भाग पडले. शे. का. फे. च्या द्वारे सर्व भारतभर बाबासाहेबांनी दलित चळवळीचा प्रसार केला. १९४६ च्या

निवडणुकीत शे. का. फे. चा दारूण पराभव झाला. त्या काळात काँग्रेस व मुस्लीम लीग यांच्यामध्ये झालेले राजकीय बदल, काँग्रेसच्या कार्यकर्त्यानी केलेला त्याग, शे. का. फे. ची संघटनात्मक कमजोरी व दलित नेत्यांच्यामध्ये असलेला एकीचा अभाव या सर्व गोष्टीमुळे शे. का. फे. चा पराभव झाला आणि भारताच्या स्वातंत्र्याच्या वाटाघाटीत इंग्रजांनी बाबासाहेबांना कोणतेही स्थान दिले नाही.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये बाबासाहेबांनी दलित मुक्तीच्या राजनितीमध्ये काही बदल केले. संघर्ष, तडजोड आणि संघर्ष हा त्यांच्या राजनितीचे मुख्य उद्देश होता. स्वातंत्र्यानंतर संसदीय राजकारणात इतर प्रादेशिक पक्षांशी आघाडी करून राजकीय सत्ता मिळवण्याचा प्रयत्न करावा असे त्यांचे मत होते. उत्तरप्रदेशात त्यांसाठी त्यांनी डॉ. राम मनोहर लोहिया यांच्याशी चर्चा केली होती. राजकीय जागृती करून लोकशाहीच्या मार्गने मागास आणि पददलित वर्गाची संघटना करून सत्ता ताब्यात घ्यावी. आत्मतेज जागृत करावे आणि स्वत:ची अस्मिता व संस्कृती विकसित करावी असे बाबासाहेबांचे मत होते. उत्तर प्रदेशात अनुसूचित जाती आणि इतर मागास जाती यांची आघाडी सत्तेवर येवू शकते हे जवळजवळ ४० वर्षांपूर्वी बाबासाहेबांनी ओळखले होते. दलित मुक्ती, दलितांमध्ये राजकीय सामाजिक जागृती करून त्यांना स्वत:च्या अधिकार प्रक्रियेसाठी संघटित करून त्यांच्या संघटीत सामर्थ्याच्या जोरावर सत्तेमध्ये योग्य वाटा मिळवून आणि सामाजिक व आर्थिक साधनाचे राजकीय सत्तेच्या मदतीने फेरवाटप करून साध्य होईल असे त्यांचे मत होते.

## सारांश :-

भारतीय मानवमुक्तीच्या लढ्यामध्ये २० व्या शतकात डॉ. आंबेडकरांचे योगदान महत्त्वाचे आहे. गौतम बुद्ध, संत कबीर, महात्मा फुले यांना गुरू मानून डॉ. आंबेडकरांनी शोषणविरहित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. ते स्वत: दलित समाजात जन्माला आल्यामुळे जातीयतेचे भयानक वास्तव त्यांनी भोगले होते. म्हणूनच त्यांनी केलेली आंदोलने समताधिष्ठीत समाजरचनेसाठी असलेली दिसून येतात. त्यांच्या चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृती दहन, काळाराम मंदिर सत्याग्रह हे सर्व लढे मानवी मूल्ये नाकारणाऱ्या व्यवस्थे विरोधात तर

होतेच पण मानवी कल्याण साधणारे होते. या देशाची घटना लिहून त्यांनी राज्यघटनेतील कलमाद्वारे ही व्यवस्था मोडून टाकली व या देशातील सर्व माणसे समान आहेत हे कायद्याने सिद्ध केले.

डॉ. आंबेडकरांच्या विचाराचे लोण सातारा जिल्ह्यात फार लवकर पोहचले होते. त्यांच्या आदेशानुसार या जिल्ह्यातील दलितांनी गावकीची घाणेरडी कामे सोडली होती. एवढेच नव्हे तर या जिल्ह्यातील लोक आंबेडकरांच्या लढ्यात सहभागी होते. शेड्यूल कास्ट फेडरेशनचे आमदार खंडेराव सावंत, सातारा नगरपालिकेचे सदस्य व शिक्षण सभापती भिकू बनसोडे हे याच सातारा जिल्ह्याने दिले होते. डॉ.आंबेडकरांच्या जाहीर सभा सातारा, फलटण, वडूज, मसूर येथे झालेल्या होत्या. डॉ.आंबेडकरांचे बालपण, प्राथमिक शिक्षण साताऱ्यात झाले. आंबेडकर हे आडनाव त्यांना साताऱ्याने दिले. तसेच जातीय चटकेही याच साताऱ्याने दिले आहेत. म्हणून सातारा जिल्ह्याच्या दलित चळवळीत डॉ. आंबेडकरांचे फार मोठे योगदान आहे.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. चौसाळकर अशोक | : | 'डॉ. आंबेडकरांचा सामाजिक प्रतिकाराचा सिद्धांत', पृ. २५ |
| २. | कसबे रावसाहेब | : | 'आंबेडकर आणि मार्क्स', पृ. १२ |
| ३. | डॉ. चौसाळकर अशोक | : | 'डॉ. आंबेडकरांचा सामाजिक प्रतिकाराचा सिद्धांत', पृ. १२, १३ |
| ४. | डॉ. चौसाळकर अशोक | : | 'डॉ. आंबेडकरांचे राजकीय संगठन', पृ. |
| ५. | गणवीर रत्नाकर | : | 'बहिष्कृत भारतातील स्फूट लेख', पृ. १५८ |
| ६. | कीर धनंजय | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पृ. ६२ |
| ७. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. १ |
| ८. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', पृ. ९, १० |
| ९. | कीर धनंजय | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पृ. २६३ |
| १०. | कसबे रावसाहेब | : | 'आंबेडकर आणि मार्क्स', पृ. ६५ |
| ११. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे' पृ. १८१ |
| १२. | कसबे रावसाहेब | : | 'आंबेडकर आणि मार्क्स', ६५ |
| १३. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. ७ |
| १४. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे' पृ. ७ |
| १५. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. ११ |
| १६. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', पृ. २१३ |
| १७. | तत्रैव | : | पृ. २१३ |
| १८. | कीर धनंजय | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पृ. ३७६ |
| १९. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', पृ. २२५ |
| २०. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', पृ.१६० |


-----×-----

## प्रकरण - ४

# भारतीय रिपब्लिकन पक्ष व त्याची वाटचाल (१९५६ ते १९७२)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पीत केलेला रिपब्लिकन पक्ष महाराष्ट्रातील दलित शक्तीच्या राजकारणाचा विचार करता एक महत्त्वाचा टप्पा ठरतो. शे. का. फे. चे राजकारण अयशस्वी झाल्यानंतर दलित चळवळ जास्त व्यापक पायावर उभी राहण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे ठरविले होते. दलितांना केवळ दलितांच्या मतावर सत्ता मिळवता येणार नाही. तर भारतातील इतर पीडित आणि शोषित जातीतील लोकांशी आघाड्या करून त्यांना सत्ता मिळवता येईल असे त्यांचे मत झाले होते.

बहिष्कृत हितकारणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या संघटना व पक्ष स्थापन करून बाबासाहेबांनी १९१९ पासून ते सतत १९५६ पर्यंत दलितांच्या राजकीय व सामाजिक उन्नतीसाठी, जागृतीसाठी प्रयत्न केले. त्यांना दलितांना शासनकर्ता जमात बनवायचे होते. हिंदू धर्मव्यवस्थेतील विषमता नष्ट करण्यासाठी भारतीय राज्यघटना लिहून त्यांनी दलित वर्गाला इतरांच्या बरोबर आणले. बाबासाहेबांनी १९१९ ते १९५६ या कालाखंडातील राजकीय व सामाजिक चळवळी ह्या आत्मोद्धाराच्या व राजकीय जागृतीच्या चळवळी होत्या.

स्वातंत्र्योत्तर काळात दलितांना राजकीय सहभाग व हक्क मिळवून देण्यामध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन म्हणावा तेवढा प्रभावी ठरला नाही. भारतात १९५२ च्या सार्वजनिक निवडणूकीत शे. का. फे. ला पराभव पत्करावा लागला. स्वत: डॉ. आंबेडकर लोकसभेवर निवडून येऊ शकले नाहीत. पुढे १९५४ मध्ये झालेल्या भंडारा लोकसभा मतदार संघातील पोटनिवडणुकीमध्येही बाबासाहेब आंबेडकरांचा पराभव झाला. शे. का. फे. बरखास्त करून सर्व दलितांसाठी एक नवा राजकीय पक्ष स्थापन करावा असे शेवटच्या काळात बाबासाहेबांना वाटत होते. पण ६ डिसेंबर १९५६ रोजी त्यांचे आकस्मिक निधन झाले. त्यामुळे ते नव्या पक्षाची निर्मिती करू शकले नाहीत. पण नवा पक्ष स्थापन करण्याबाबतचे मत त्यांनी मांडले होते. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांची

चळवळ पुढे घेऊन जाणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांच्या अनुयायांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत असणारा रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दि. ३१ डिसेंबर १९५६ ला शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. या बैठकीत सामुहिक नेतृत्वाची निवड करण्यात आली. बैठकीत असे ठरले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जागी एका प्रेसिडीयम वा अध्यक्ष मंडळाची निवड केली जाईल आणि त्याद्वारे डॉ. आंबेडकरांच्या संपूर्ण राजकीय व सामाजिक चळवळीचे नेतृत्व केले जाईल. त्याप्रमाणे एक अध्यक्ष मंडळ निवडण्यात आले. त्यामध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात आला होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | बॅ. राजभाऊ खोब्रागडे | - | अध्यक्ष शे. का. फे. |
| २) | श्री. दादासाहेब गायकवाड | - | शे. का. फे. महाराष्ट्र |
| ३) | श्री. जी. रा. परमर | - | शे. का. फे. गुजरात |
| ४) | श्री. ए. रत्नम | - | एम. एल. ए. मद्रास |
| ५) | श्री. आर. डी. भंडारी | - | मुंबई प्रदेश शे. का. फे. |
| ६) | श्री. के. बी. तळवटकर | - | मुंबई |
| ७) | श्री. बी. सी. कांबळे | - | मुंबई |

नागपूर येथे दि. १/१०/१९५७ ला प्रेसिडीयमच्या बैठकीमध्ये आणखी चार सदस्य घेण्याचे ठरले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | श्री. एन. शिवराज | - | विदर्भ |
| ९) | श्री. एच. डी. आवळे | - | विदर्भ |
| १०) | श्री. बी. पी. मोर्य | - | उत्तरप्रदेश |
| ११) | श्री. चननराम | - | पंजाब |

प्रेसिडीयमच्या स्थापनेनंतर पहिली बैठक नागपूर येथे १/१०/५७ आणि दुसरी बैठक अकोला येथे २८, २९, ३० डिसेंबर १९५७ ला घेण्यात आली. प्रेसिडीयने प्रेसिडीयमची घटना तयार केली.[१]

प्रेसिडियम निर्माण केल्यावर ती फार काळ टिकली नाही. दादासाहेब रुपवतेंच्या मते, बाबासाहेबांच्या ठायी प्रेसिडियम मानायचे ह्या निर्णयात सर्व प्रमुखांनी व कार्यकर्त्यांनी स्वत:स बांधून घेतले. काही काळ या प्रेसिडीयमने चळवळीवर आपली हुकूमत चालवली. पण नेतृत्वाच्या संघर्षात प्रेसिडीयम लवकरच मोडकळीस आले व बरखास्त करताच अंतर्धान पावले. कोणी त्याच्यासाठी अश्रू ढाळले नाहीत का स्मृती गीते गायली नाहीत. त्याचे नाव पुन्हा कोणी काढले नाही. कनिष्ठ गावकामगार असोसिएशन म्युनिसिपल कामगार संघ, शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन आदी बाबासाहेबांनी स्थापलेल्या व चालविलेल्या लढ्याचे नियंत्रण प्रेसिडियमला करू दिले गेले नाही.[२] एकंदरीत डॉ. आंबेडकरांच्या नंतर सामुहिक नेतृत्वाच्या कल्पनेतून साकारलेल्या प्रेसिडियम नेतृत्वाखाली बाबासाहेबांची चळवळ आली नाही.

## रिपब्लिकन पक्षाची स्थापना :- (३ आक्टोबर १९५८)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतर शे. का. फे. च्या नावाने बाबासाहेबांचे अनुयायी त्यांची राजकीय चळवळ चालवीत होते. परंतु १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत शे. का. फे. चा पराभव झाल्याने या पक्षाबद्दलची निरर्थकता स्वत: आंबेडकरांना कळाली होती. याचवेळी बाबासाहेबांचे अनुयायीही फेडरेशनबद्दल नाराज झाले होते. दादासाहेब गायकवाड यांनी शे. का. फे. च्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली होती. तेव्हा त्यांना लिहिलेल्या पत्रात बाबासाहेब लिहितात, ''शे. का. फे. आपल्या शक्तीच्या जोरावर कोणत्याही मतदार संघात निवडणूक जिंकणार नाहीत. अशी परिस्थिती असल्याने शे. का. फेडरेशन मोडून टाकावे व शे. कास्ट फेडरेशनला पाठींबा देणाऱ्या शेड्यूल्ड कास्ट जनतेला त्यांच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही पक्षात जाण्याची मोकळी ठेवावी. पुढे बाबासाहेब लिहितात जर शे. का. फेडरेशन स्वतंत्र राजकीय पक्ष म्हणून जिवंत ठेवावयाचा असेल तर त्याकरीता पडायची आवश्यकता आहे. यापैकी प्रत्येक अट अतिमहत्त्वाची आहे. यापैकी काही अटींची पूर्तता झाली नाही. तर शे. का. फेडरेशन पक्ष रद्द करून टाकावा.[३]

यावरून असे दिसते की, शे. का. फे. च्या अपयशामुळे बाबासाहेबांनी त्या पक्षाच्या बरखास्तीचा विचार केला होता. पुढे नागपूर येथील बौद्ध धम्मदीक्षेच्या समारंभाच्या वेळी म्हणजे

१३ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेबांनी व्यापक पाया असलेल्या नव्या राजकीय पक्षाची घोषणा केली. या नव्या राजकीय पक्षाचे नाव 'आखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष' असेल आणि तो स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वावर आधारलेला असेल. शे. का. फेडरेशनशी त्यांचा काहीही संबंध असणार नाही. हा राजकीय पक्ष सर्वांना खुला असेल आणि तो १९५७ च्या सार्वजनिक निवडणुकीपूर्वीच अस्तित्वात येईल असे आंबेडकरांनी जाहीर केले.[४]

यावरून बौद्धधम्मदीक्षेच्या वेळी नव्या राजकीय पक्ष स्थापनेचा विचार बाबासाहेबांनी व्यक्त केला होता. शिवाय या राजकीय पक्षामध्ये इतर समविचारी मंडळींनी सहभागी व्हावे, असेही बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून ते प्रयत्नशील होते. दि. ४ डिसेंबर १९५६ रोजी बाबासाहेब आंबेडकरांनी आचार्य अत्रे आणि एस. एम. जोशी यांना पाठवावयाची पत्रे लिहून घेतली. हे दोघेही काँग्रेसच्या विरोधी पक्षातील प्रमुख महाराष्ट्रीयन नेते होते आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील आघाडीवरचे नेते होते. या दोघांनी आंबेडकर काढीत असलेल्या रिपब्लिकन पक्षात येवून मिळावे, अशी विनंती आंबेडकरांनी त्यांना त्या पत्रात केली होती.[५]

अशा रितीने मृत्यूपूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे पूर्णपणे निश्चित केले होते. फक्त मोठ्या समारंभाने रिपब्लिकन पक्षाची कायदेशीर स्थापना करावयाची बाकी राहिली होती.

### १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका :-

डॉ. बाबासाहेबांच्या आकस्मित मृत्यूनंतर १९५७ मध्ये लगेच देशात सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या. त्यामुळे आंबेडकरी अनुयायांनी पुढे आलेल्या निवडणूक लढविण्याच्या रणनितीच्या कामाला सुरूवात केली.

१९५७ च्या निवडणूकीपूर्वी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीची चळवळ जोरात चालू होती आणि डॉ. आंबेडकरांनी त्यात असतानाच महाराष्ट्रातील काँग्रेस सोडून इतर सर्वपक्षीय नेत्यांना खास दिल्लीला बोलावून त्यांना सांगितले होते की, काँग्रेस विरुद्ध तुम्ही आघाडी उघडत असल्यास आमचाही पक्ष (शे. का. फे. ) तुमच्यात सहभागी होईल.[६]

म्हणून शे. का. फेडरेशनने संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये क्रियाशील सहभाग घेतला होता व शे. का. फे. ने काँग्रेस विरोधी संयुक्त महाराष्ट्र चळवळीसोबत निवडणूक लढविली. ही चळवळ सर्व विरोधी पक्षांची मिळून बनलेली होती. या निवडणुकीत बहुसंख्य मतदारांनी काँग्रेसच्या विरोधात विरोधी पक्षाच्या उमेदवारांना मतदान केले. ''संयुक्त महाराष्ट्र समितीचा शे. का. फे. एक घटक पक्ष असल्यामुळे मतदारांनी जेथे कोठे शे. का. फे. चे उमेदवार असतील त्यांच्या बाजूने मतदान केले. परिणाम असा झाला की शे. का. फे. चे महाराष्ट्रामधून ६ (सहा) उमेदवार निवडून आले. तर कर्नाटकमधून १, मद्रास आणि गुजरातमधून १ असे एकूण ९ उमेदवार लोकसभेवर निवडून आले. त्यात दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, श्री. दिघे, श्री. जी. के. माने, हरिराव सोमुळे, दत्ता कच्ची, एन. शिवराज, के. यू. परमार आणि बी. डी. साळुंखे तसेच कर्नाटक राज्यविधिमंडळावर २, मुंबई विधीमंडळावर १३, पंजाब विधिमंडळावर ५ अशा एकूण २० जागा शे. का. फे. ला राज्य विधीमंडळावर मिळाल्या होत्या.[७]

बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांची चळवळ त्यांच्या अनुयायांच्या हातात आली, त्यांनी १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत जी रणनिती वापरली त्याचे फार मोठे यश मिळाले. राजकीय दृष्टी दलित पक्ष संघटनेला मिळाली होती. शे. का. फेडरेशन या राजकीय पक्षाच्या राजकीय इतिहासात मिळालेले हे यश दलित चळवळीला पुढे नेण्यास खऱ्या अर्थाने यशस्वी ठरले. स्वत: डॉ. आंबेडकर हयात असताना या शे. का. फे. ला एवढे अभूतपूर्व यश मिळाले नव्हते. ते संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीत एक घटक पक्ष राहून काँग्रेसविरोधी भूमिका घेतल्याने मिळाले होते.

नंतरच्या काळात ३ ऑक्टोबर १९५८ ला नागपूर येथे शे. का. फे. चे अधिवेशन भरले आणि या अधिवेशनासाठी देशातील सर्व प्रदेशातून नेते आलेले होते. त्या सर्वांनी मिळून रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि बाबासाहेबांचे एक अत्यंत निकटचे सहयोगी श्री. एन. शिवराज यांना रिपब्लिकन पक्षाचा पहिला अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले.

३ ऑक्टोबर १९५८ ला नागपूर अधिवेशनामध्ये रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर त्याच दिवशी लाखो लोक या पक्षामध्ये सामील झाले. शे. का. फे. च्या नावावर निवडून आलेल्या

सर्व लोकसभा व सर्व विधानसभा सदस्यांनी या नव्या रिपब्लिकन पक्षामध्ये प्रवेश केला. या पक्षाने आपली स्वतंत्र राजकीय ओळख निर्माण केली. जे इतर राजकीय पक्षांना कधीच शक्य नव्हे. भारतीय राजकारणामध्ये गांधीवाद, समाजवाद, साम्यवाद, हिंदुत्ववाद या राजकीय विचारप्रणाली बरोबरच आंबेडकरवाद विचारप्रणालीने आपले स्वतंत्र राजकीय स्थान निर्माण केले.[८]

## भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना :-

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना एका घटनासमितीमार्फत तयार करण्यात आली. त्यामध्ये बी. सी. कांबळे, बाबू हरदास आवळे आणि बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्यासारख्या विद्वान व्यक्तींचा त्यात समावेश होता. घटना समितीच्या बैठका अकोला, मुंबई व दिल्ली येथे झाल्या. दिल्ली या ठिकाणी झालेल्या बैठकीत एन. शिवराज, बाबू आवळे, बी. सी. कांबळे, ए. जी. पवार, दादासाहेब रूपवते हजर होते. याच बैठकीत घटना समितीने तयार केलेली घटना मंजूर करण्यात आली व या पक्ष घटनेची अंमलबजावणी १० मार्च १९५९ पासून सुरू झाली. ती घटना पुढीलप्रमाणे आहे -

### ध्येय व उद्देश :-

१. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात व्यक्त केल्याप्रमाणे न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हेच रिपब्लिकन पक्षाचे ध्येय असेल.

२. रिपब्लिकन पक्ष सर्वांना कायद्यापुढे समान समजेल आणि स्वातंत्र्य व समता प्रस्थापित करेल. लोकांचे हित हे साध्य तर राज्य हे प्राप्त करायचे साधन आहे असे समजेल, प्रत्येक भारतीयाला धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य असेल, सर्वांना समान संधी दिली जाईल. मात्र ज्यांना पूर्वी समान संधी नव्हती, त्यांना पक्ष खास सवलती देण्याचा प्रयत्न करेल. पक्ष लोकांच्या गरजा, गुलामी आणि भिती याविषयी करावयाच्या कार्यबद्दल राज्यालासतर्क करील. सर्व प्रकारचे शोषण नष्ट करण्याचा पक्ष प्रयत्न करील. तसेच हा पक्ष व्यक्तीगत व सामाजिक हित दृष्टिकोनातून संसदीय लोकशाहीचा पुरस्कार करील.

३. हा पक्ष अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, बौद्ध व मागासवर्गीय यामधील लोकांना संघटीत करील. शेतकरी, भूमिहीन, शेतमजूर आणि कारखान्यातील मजूर यांनाही संघटीत करील. सर्व अल्पसंख्याकांना न्याय मिळवून दिला जाईल. आज लोकांच्या सर्वांगिण विकासासाठी पक्ष सतत प्रयत्नशील राहील.

उपरोक्त उद्देशामध्ये रिपब्लिकन पार्टीने भारतातील सर्व कमकुवत घटकांना, अल्पभूधारकांना, भूमिहीन मजूरांना, श्रमिकांना, अल्पसंख्याकांना संघटीत करून त्यांना सामाजिक व आर्थिक न्याय प्राप्त करून देण्याची बांधिलकी स्विकारलेली दिसते.

## रिपब्लिकन पार्टीची संघटना याप्रमाणे असेल :-

सभासदत्व रिपब्लिकन पक्षाचे सभासद दोन प्रकारचे असतील - अ) प्राथमिक सभासद व ब) क्रियाशील सभासद. अर्थात ज्या व्यक्तीने वयाची १८ वर्षे पूर्ण केलेली असतील, त्यास पक्षाची घटना व नियम मंजूर असतील, जे वर्षासाठी २५ पैसे वर्गणी देऊ इच्छित असतील आणि ज्यांनी दुसऱ्या कोणत्याही पक्षाचे सभासदत्व स्विकारलेले नसेल अशा व्यक्तीस रिपब्लिकन पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व प्राप्त होऊ शकते. तसेच ज्या व्यक्तीने वयाची २१ वर्षे पूर्ण केलेली असतील, त्याने एक वर्ष प्राथमिक सदस्य म्हणून काम केलेले असेल आणि जो वार्षिक एक रूपया वर्गणी देऊ इच्छितो अशा व्यक्तीस क्रियाशील सदस्य म्हणून घेतले जाईल. प्रत्येक क्रियाशील सदस्याला वर्षामधून निदान १०० प्रामाणिक सदस्य बनवावे आणि त्यांच्याकडून पक्षासाठी २५ रूपये जमा करावे लागतील. प्रत्येक क्रियाशील सदस्याला पक्षांतर्गत निवडणूका लढविण्याचा अधिकार असेल.

**१) ग्रामस्तरावरील कमिटी :-** ग्रामस्तरावर ५ ते ९ सभासदांचे एक मंडळ असेल. त्याची निवडणूक त्याच गावातील क्रियाशील सभासद बहुमताने करतील. ग्राम कमिटी आपल्यातूनच कार्यकारी मंडळाची निवड करील. तसेच त्याच गावातील अन्य पाच व्यक्तीस कॉ. ऑप. सभासद म्हणून कार्यकारणीवर घेतले जाईल.

२) तालुका आणि ब्लॉक स्तरावरील कमिटी संबंधित तालुका किंवा ब्लॉकमधील सर्व ग्राम कमिटीचे सभासद तालुका स्तरावरील जनरल कौन्सिलचे सदस्य असतील. जनरल कौन्सिल सर्व

सभासदांमधून एका अध्यक्षांची आणि सेक्रेटरी सोडून अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. तसेच तालुका स्तरावरील कार्यकारी मंडळास त्या तालुक्यातील कोणत्याही पाच सदस्यांस को. ऑ. सभासद म्हणून निवड करता येईल.

३) **जिल्हा स्तरावरील कामगिरी :-** संबंधित जिल्ह्यातील सर्व तालुका स्तरावरील कार्यकारी मंडळाचे सभासद जिल्हा स्तरावरील जनरल कौन्सिलचेच सदस्य असतील. जनरल कौन्सिल आपल्या सदस्यामधून अध्यक्ष व सेक्रेटरी व्यतिरिक्त अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. तसेच जिल्ह्यातील कोणाही ५व्यक्तींची कॉ. ऑप. सभासद म्हणून निवड करील. त्याचप्रमाणे संबंधित जिल्ह्यातील पक्षाचे सर्व आमदार आणि खासदार जिल्हा कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध सदस्य असतील.

४) **प्रदेश स्तरावरील कमिटी :-** जिल्हा स्तरावरील सर्व कार्यकारी मंडळाचे सभासद प्रदेश स्तरावरील जनरल कौन्सिलचे सभासद असतील. जनरल कौन्सिल अध्यक्षांची व सेक्रेटरी व्यतिरिक्त अन्य कार्यकारी सभासदांची निवड करील. त्यास त्या प्रदेशातील कोणत्याही पात्र सभासदांना कॉ. ऑप. सभासद करून घेता येईल. तसेच त्या प्रदेशातील सर्व आमदार व खासदार प्रदेश स्तरावरील कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध सभासद असतील.

५) **राज्यस्तरावरील कमिटी :-** राज्यस्तरावरील कमिटीमध्ये त्या राज्यातील सर्व प्रदेशाचे अध्यक्ष, सेक्रेटरी, पक्षाचे आमदार आणि खासदार राज्यस्तरीय कमिटीचे सभासद असतील. राज्यस्तरावरील समन्वय समितीचा एक सेक्रेटरी असेल.

सेक्रेटरीची निवड संबंधित कार्यकारी मंडळाच्या अध्यक्षांकडून केली जाईल. सर्व पदाधिकारी तीन वर्षांसाठी आपल्या पदावर राहतील.

**मध्यवर्ती संघटना :-** रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती संघटनेमध्ये खालील पदाधिकारी असतील

१) अध्यक्ष

२) जनरल सेक्रेटरी

३) सेक्रेटरी (जास्तीत जास्त चार)

४) जनरल कौन्सिल

५) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ

१. मध्यवर्ती जनरल कौन्सिलमध्ये प्रदेश स्तरावरील सर्व जनरल कौन्सिलचे सभासद असतील.

२. मध्यवर्ती जनरल कौन्सिल पक्षाच्या अध्यक्षाची निवड करील.

३. अध्यक्ष आपल्या स्वत:च्या अधिकारात एक जनरल सेक्रेटरी व अन्य जास्तीत जास्त चार सेक्रेटरीची नियुक्ती करील.

४. पक्षाध्यक्ष व मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे संघटन करील.

मध्यवर्ती कार्यकारी मंडळाच्या निम्मे सदस्य प्रदेश स्तरावरील अध्यक्ष किंवा सेक्रेटरी असतील. प्रत्येक प्रदेशामधून निदान एक तरी प्रतिनिधी मध्यवर्ती कार्यकारी मंडळावर असणे जरूरीचे आहे. तसेच पक्षाचे मंत्री आणि खासदार पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचे पदसिद्ध सभासद असतील. त्याचप्रमाणे मध्यवर्ती कार्यकारी मंडळात जास्तीत जास्त सात सभासदांना कॉ. ऑप. म्हणून घेण्याचा अधिकार असेल.

सर्व पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ तीन वर्षाचा असेल. पक्षाचे सर्वसाधारण अधिवेशन दोन वर्षातून एकदा पक्षाने ठरविलेल्या वेळी व स्थळी भरेल. आणि १/५ सदस्यांच्या विनंतीनुसार खास अधिवेशन भरेल. पक्षाचे कामकाज चालविण्यासाठी कमीत कमी १/३ सदस्य अधिवेशनात उपस्थित रहाणे जरूरीचे आहे.

पक्षाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळ पक्षाचे प्रमुख असेल ते जेव्हा अधिवेशन नसेल तेव्हा पक्षाध्यक्ष कार्यकारी मंडळाची जागा घेईल. मध्यवर्ती कार्यकारी मंडळाला ध्येय धोरण ठरविण्याचा, पक्षाच्या शिस्तीसंबंधी नियम बनविण्याचा, शिस्तभंगाची कारवाई करण्याचा आणि सर्व पक्ष शाखांवर देखरेख व नियंत्रण करण्याचा अधिकार असेल.

पक्षाला प्राप्त झालेली सर्व रक्कम पक्षाच्या नावावर बँकेमध्ये ठेवली जाईल आणि त्यासंबंधी अध्यक्ष, सेक्रेटरी आणि कोषाध्यक्ष जबाबदार असतील. प्रत्येक शाखा आपल्यापेक्षा उच्च शाखेत आपल्या कार्याचा वार्षिक अहवाल सादर करील. जनरल सेक्रेटरी पक्षाचा अहवाल प्रकाशित करील.

**उमेदवाराची निवड :-** संसदेच्या व विधानसभेच्या निवडणूकांमध्ये पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून भाग घेणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यासाठी एक निवड मंडळ असेल. त्यामध्ये पक्षाध्यक्ष व अन्य सहा सभासद असतील. उमेदवारांची निवड करीत असताना स्थानिक शाखांनी केलेल्या शिफारशी निवड मंडळ विचारात घेईल.

**पक्षाचा झेंडा** :- रिपब्लिकन पक्षाचा ध्वज निळा असेल. तो चौकोनी असून त्याच्या लांबी रूंदीचे प्रमाण ३ : २ असे असेल. त्याच्या मध्यभागी पांढऱ्या रंगातील अशोकचक्र असेल.

**पक्ष शिस्तीचे नियम** :- पक्षाच्या कोणत्याही सभासदाने खालीलपैकी कोणताही गुन्हा केल्यास त्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

१. पक्षाच्या ध्येयधोरणाविरुद्ध वर्तन केल्यास

२. पक्षाच्या ध्येय-धोरणावर उघडपणे टीका केल्यास

३. पक्षांतर्गत गटबाजी केल्यास

४. एखाद्या सभासदांची बदनामी केल्यास

५. पक्षाच्या कामकाजामध्ये अडथळा आणल्यास

६. पक्षाच्या पैशाचा गैरव्यवहार किंवा अपहार केल्यास

७. दुसऱ्या पक्षामध्ये प्रवेश केल्यास

८. पक्षाच्या अपयशाबद्दल स्वत: कारणीभूत ठरल्यास

९. पक्षाच्या अधिकृत उमेदवारास विरोध केल्यास

कोणत्याही सभासदाविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही संबंधित प्रदेश स्तरावरील शाखा करू शकेल. अर्थात ज्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही केली गेली असेल आणि शिक्षा झाली असेल अशा सभासदास मध्यवर्ती कार्यकारी मंडळाकडे अर्ज दाखल करता येईल. मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

ज्या सभासदाने किंवा पदाधिकाऱ्याने शिस्तभंग केला असेल, त्यास पक्षामधून काही काळासाठी किंवा नेहमीकरता काढून टाकले जाईल.

पक्षाध्यक्षाला वेळप्रसंगी आपल्या अधिकारात एका हंगामी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची नियुक्ती करण्याचा अधिकार असेल. अशा हंगामी कार्यकारी मंडळामध्ये जास्तीतजास्त पंधरा सभासद असतील. रिपब्लिकन पक्षाच्या घटनेतील तरतूदींना अंमलात आणण्याचा हंगामी कार्यकारणीस अधिकार राहील.

पक्षाच्या संघटनात्मक रचनेविषयी साधारण कल्पना यावी यासाठी रिपब्लिकन पक्षाची घटना संक्षिप्तपणे देण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. अर्थात पक्षाची रचना किंवा बांधणी करणाऱ्यांनाही माहिती उपयुक्त असेल. तसेच पक्ष शिस्तभंग करणाऱ्यावर कोणती कार्यवाही करता येईल हे ही समजू शकेल.[९]

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला रिपब्लिकन पक्ष हा असा होता. शे. का. फे. पेक्षा या पक्षाचे धोरण भारतीय राज्यघटनेतील तत्त्वांशी सुसंगत होते. दलित पीडित व शोषित जनतेचे हितरक्षण संसदीय मार्गाने करण्याचा या पक्षाचा प्रयत्न होता.

''रिपब्लिकन पक्षाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळामध्ये खालील नेते निवडण्यात आले होते -

| | | | |
|---|---|---|---|
| होते - | अध्यक्ष | - | एन. शिवराज |
| | उपाध्यक्ष | - | बाबू हरिदास आवळे |
| | जनरल सेक्रेटरी | - | बॅ. राजाभाऊ खोब्रागडे[१०] |

## रिपब्लिकन पक्षाची दलित उद्धाराची राजनिती :-

**मूळ भूमिका :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्षाची एक भूमिका निश्चित केली होती. मूळात बाबासाहेब हे उदारमतवादी लोकशाही व्यवस्थेचे समर्थक होते. लोकशाही व्यवस्थेचे आणि संसदीय राज्यपद्धतीचे योग्य रक्षण करण्यासाठी देशामध्ये प्रभावी असा विरोधी पक्ष असला पाहिजे, जर विरोधी पक्ष नसेल तर त्या व्यवस्थेला हुकूमशाही स्वरूप प्राप्त होत असते. या भूमिकेतूनच समाजातील सर्व दलित, आदिवासी, मागासलेले वर्ग यांना बरोबर घेऊन जाणारा व कष्टकरी कामगार, शेतकरी वर्ग यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या रिपब्लिकन पक्षाचा आराखडा बाबासाहेबांनी आपल्या मृत्यूपुर्वी तयार ठेवला होता.

महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाच्या एक महिला नेत्या श्रीमती शांताबाई दानी यांच्याभाषेत रिपब्लिकन पक्षाची सविस्तर भूमिका सांगावयाची तर त्यांच्यामते, डॉ. बाबासाहेबांनी रिपब्लिकन पक्षाची घटना, रिपब्लिकन पक्षाबाबतचे विचार, कुठल्याही गोरगरीब पददलित, मागासलेले व पायदळी तुडविले जाणार नाही, त्यांना चांगले दिवस यावेत व लोकशाहीला पोषक अशा उदात्त हेतूने लिहिली आहे. त्यांना काँग्रेसला धक्का देणारा प्रचंड मोठा रिपब्लिकन पक्ष स्थापण्याचा हेतू होता.

१. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रह धरील. एका वर्गाकडून दुसऱ्या वर्गाची पिळवणूक व दडपशाही यांना पायबंद घालील.

२. प्रत्येक नागरिकास समान संधी अधिकार असल्याचे हा पक्ष मान्य करील.

३. व्यक्ती व समाज या दोघांच्या भल्यासाठी संसदीय राज्यपद्धती सर्वोत्तम आहे, अशी या पक्षाची श्रद्धा राहील. सर्व भारतीयांना समान न्याय व समता मिळेल असे या पक्षाचे धोरण राहील.

४. सर्वांना प्रत्येक व्यक्तीचे सुख हा केंद्रबिंदू समजण्यात येईल.

५. आपल्या उद्धारार्थ प्रयत्न करण्याची प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळेल.

ही अशी रिपब्लिकन पक्षाची तत्त्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडली.[११]

स्वातंत्र्योत्तर काळात मानवमुक्तीचा लढा देऊन समाजातील उदात्त तत्त्वे रिपब्लिकन पक्षाला दिली. बाबासाहेबांच्या पश्चात निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षाने या भूमिकेतूनच आपल्या दलित मुक्तीच्या कार्याला प्रारंभ केला व आपली एक विशिष्ट अशी राजकीय, सामाजिक व्यूहनिती आखून देशात व महाराष्ट्रात लोकशाहीच्या माध्यमातून कार्य केले. भारतासारख्या कृषिप्रधान देशामध्ये वरिष्ठ वर्गाचे रक्षणकर्ते शासन बदलण्यासाठी दलितांसह सर्वसामान्य लोकांच्या हिताचे रक्षण करण्याची सर्वस्वी हमी म्हणजे दलितांच्या हातात शासन सत्ता येणे हे होय. आणि याच दृष्टिकोनातून समाजातील मूठभर सवर्ण वर्गाकडून बहुसंख्य दलितांची जी आर्थिक, सामाजिक, राजकीय पिळवणूक होते, त्यातून दलित शोषितांनाबाहेर काढून दलितांनी शासनकर्ती जमात बनविण्याचे आंबेडकरी विचार दलित वर्गात पसरविण्याचे कार्य रिपब्लिकन पक्ष करू लागला.

## रिपब्लिकन पक्षाची राजकीय रणनिती :-

रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यानंतर पक्षाने अत्यंत मन:पूर्वक दलितांचे प्रश्न सोडवण्याचे कार्य केले. ''३ सप्टेंबर १९५७ ते ३ ऑक्टोंबर १९५९ हा भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासातील सुवर्ण युगाचा काळ मानला जातो.''[१२] कारण याच काळात रिपब्लिकन पक्षाचे राजकारण व जनमानसात भक्कम असा प्रभाव होता. शे. का. फेडरेशनच्या माध्यमातून निवडून आलेले व नंतर रिपब्लिकन पक्षाच्या गटबंधनात असलेल्या नेते मंडळींनी दलित मुक्तीचा जास्त व्यापक अर्थाने विचार केला. दलित मुक्तीचा लढा हा केवळ राजकीय वा सामाजिक नाही तर दलितांची सध्याची अवस्था सुधारण्यासाठी आर्थिक लढे हे सुद्धा महत्त्वाचे आहेत. ग्रामीण व्यवस्थेमध्ये गरीब दलितांची मोठ्या प्रमाणावर जमीनदार वर्गाकडून पिळवणूक होत आहे. ही अवस्था बदलण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने लढा देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे डॉ.आंबेडकरानंतर रिपब्लिकन पक्षाने दलितांच्या समस्या मांडून त्या सोडवून घेण्याचाही प्रयत्न केला.

''रिपब्लिकन पक्षाचे लोकसभेमध्ये दादासाहेब गायकवाड, बी. सी. कांबळे, श्री. दिघे, जी. के. माने, हरहिरराव सोमुळे, दत्ता कच्चे, एन.शिवराज आणि के. यू. परमार हे आठ सदस्य व राज्यसभेमध्ये बॅ. राजाभाऊ खोब्रागडे हे होते. त्यापैकी एन. शिवराज हे पक्षाचे अध्यक्ष होते तर बॅ.राजाभाऊ खोब्रागडे पक्षाचे जनरल सेक्रेटरी होते.''[१३] त्यामुळे संसदीय व्यवस्थेत रिपब्लिकन पक्ष दलितांचे प्रश्न सोडविण्यात प्रभावी ठरत होता.

रिपब्लिकन पक्षाचे लोकसभा व राज्यसभेमध्ये असलेल्या या सर्वांना बाबासाहेब आंबेडकरांचा सहवास व मार्गदर्शन लाभलेले होते. त्यामुळे बाबासाहेबांची दलित मुक्तीची संकल्पना त्यांना चांगली अवगत होती. म्हणून दलितांच्या प्रश्नासाठी त्यांनी परिश्रमपूर्वक कार्य कले. भारतीय संसदीय व्यवस्थेमध्ये राजकीय लढे आणि आंदोलने उभे करून व दलितांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी आर्थिक लढे उभे करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाने संसदेत व जनसामान्यात महत्त्वपूर्ण असे काम केले नाही म्हटले तरी भारतीय संसदेत रिपब्लिकन पक्षाचे बळ बऱ्यापैकी होते. संसदेत खालील महत्त्वपूर्ण बाबींवर रिपब्लिकन पक्षाने आवाज उठविला.

१. शेड्युल्ड कास्टना मिळणाऱ्या राजकीय सवलती व्यतिरिक्त अन्य सवलती नवबौद्धांना मिळाव्यात.

२. अस्पृश्य आदिवासी व इतर मागासलेले वर्ग यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी व्यापार उद्योगात सवलती द्याव्यात व प्रत्येक खात्यात योग्य प्रमाणात अस्पृश्यांना घ्यावे.

३. नवबौद्ध आर्थिकदृष्ट्या गरीब व मागासलेला असल्याने त्यांना सरकारने शैक्षणिक, आर्थिक व नोकरीच्या बाबतीतील नेमणूका अशा संबंधीच्या सर्व सवलती द्याव्यात.

४. देशाच्या सर्व भागात रेल्वेमार्ग सुरू करावेत व रेल्वे बोर्डावर दलितांचे प्रतिनिधी घ्यावेत अशी मागणी मार्च १९५८ च्या रेल्वे अंदाजपत्रकावर खा. जी. जी. माने यांनी बोलताना दिली.

५. खेड्यातील भूमिहीन अस्पृश्यांना पडीक जमीन द्याव्यात यासाठी खा. दादासाहेब गायकवाड व बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांनी संसदेत मागणी केली. देशातील पडीक जमिनीचे भूमिहीन अस्पृश्यांना जर वाटप झाले तर त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल अशी या मागे भूमिका होती.

६. दलितांची आर्थिक उन्नती होणे गरजेचे आहे, या भूमिकेतून रिपब्लिकन संसद सदस्यांनी दलितांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पंचवार्षिक योजनेत घरगुती धंदे काढणे - उदा. चामडी धंदे, विटा तयार करणे, विड्या बनविणे, साबण, मेणबत्त्या, काड्यापेट्या इत्यादी वस्तू तयार करण्यासाठी सरकारने सहाय्य करावे अशी आग्रही मागणी केली.

७. संसदेत देशातील दलितांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराबाबत वेळोवेळी आवाज उठविला.

अशाप्रकारे रिपब्लिकन पक्षाने संसदेत दलितांच्या मूलभूत विकासाच्या दृष्टिकोनातून आवाज उठविला. संसदीय व्यवस्थेमध्ये राजकीय मागण्याबरोबरच या राजकीय मागण्यांची निर्णय प्रक्रिया सत्ताधारी पक्षाकडून व्हावी यासाठी संसदीय व्यवस्थेबाहेर रिपब्लिकन पक्षाने राहून काही राजकीय व सामाजिक लढे, आंदोलने उभी केली. रिपब्लिकन नेत्यांनी संसदेबाहेरही जनआंदोलने

उभी केली. रिपब्लिकन पक्षाच्या राजकीय वाटचालीत व दलित मुक्तीच्या राजकारणात एक निर्णायक स्वरूप प्राप्त करण्यासाठी सामाजिक आघाड्या तयार करून आपली राजकीय व्यूहनिती विकसीत केली. रिपब्लिकन पक्षाने केलेल्या या कार्याचा आढावा खालीलप्रमपणे घेता येईल -

१. १९२८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता सैनिक दलाची स्थापना केली होती. समता दलाचे मुख्य कार्य म्हणजे सर्वच क्षेत्रामध्ये समता प्रस्थापित करणे व दलितांसाठी एक स्वयंसेवी संघटना प्रस्थापित करणे व दलितांसाठी एक स्वयंसेवी संघटना (Uolunter Corps) म्हणून कार्य करणे हे होते. रिपब्लिकन पक्षाने १९५७ मध्ये नागपूर येथे समता सैनिक दलाचे पुनरूज्जीवन केले. अशा राजकीय पक्षासाठी एखाद्या पोषक अशा संघटनेची जरूरी असते. म्हणूनच समता सैनिक दलाचे पुनरूज्जीवन करण्यात आले. या दलाचे नवनिर्मित अध्यक्ष म्हणून बाबू हरदास यांची नियुक्ती केली होती.

२. २ ऑक्टोबर १९५७ ला नागपूर येथे रिपब्लिकन पक्षाने अखिल भारतीय महिला परिषद भरविली. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध महिला कार्यकर्त्या श्रीमती शांताबाई दाणी या होत्या. रिपब्लिकन पक्षाने महिला आघाडीची स्थापना केली. महिलांना समाजात आत्मसन्माने जगता यावे यासाठी आंबेडकरी चळवळीत महिलांनाही मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले होते.

३. २ मार्च १९५८ मध्ये बी. सी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत दलित साहित्य संघाची स्थापना रिपब्लिकन पक्षाने केली.

४. रिपब्लिकन पक्षाने अखिल भारतीय रिपब्लिकन विद्यार्थी फेडरेशन नावाची विद्यार्थ्यांची संघटना स्थापन केली. या संघटनेचे जनरल सेक्रेटरी म्हणून बी. डी. कांबळे यांनी काही काळ काम पाहिले.

५. रिपब्लिकन पक्षाने कामगारांच्या संघटना बांधण्याच्या क्षेत्रामध्येही महत्त्वाचे कार्य केली. नागपूरात २ ऑक्टोबर १९५७ ला कनिष्ठ गाव कामगार व अखिल भारतीय कामगार परिषद भरली होती. या परिषदेचे उद्घाटन खा. कच्ची (कर्नाटक) यांनी केले होते. तर

अध्यक्षस्थानी दादासाहेब गायकवाड हे होते. कनिष्ठ गाव कामगारांना किमान वेतन कायदा लागू करण्याविषयीचा महत्त्वपूर्ण ठराव यावेळी मंजूर करण्यात आला .

६. रिपब्लिकन पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दीक्षा घेतलेल्या बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सुद्धा काम केले. या संदर्भात दि. ३/१०/१९५७ रोजी नागपूर येथे महाथेरो चंद्रमणी यांच्याहस्ते भारतीय बौद्ध महासभेच्या पहिल्या अधिवेशनाचे उद्‌घाटन झाले. यावेळी अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेबांचे सुपूत्र भैय्यासाहेब आंबेडकर हे होते. या अधिवेशनात चार ठराव पास करण्यात आले.

१) नवबौद्धांना शिक्षण क्षेत्रात आणि नोकऱ्यात राखीव जागा द्याव्यात.

२) भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात यावी.

३) ज्या पवित्र दीक्षाभूमीवर बौद्ध महासभेचे अधिवेशन भरलेले होते, ती दीक्षाभूमी बुद्ध विहारासाठी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्यात यावी.

४) नवबौद्धांवरील अन्याय-अत्याचाराची नि:पक्षपातीपणे चौकशीची व्यवस्था करण्यासंबंधी शासनाला विनंती करण्यात आली.

७. रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची चळवळ जर कोणती असेल तर ती दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली झालेली भूमिहीनांच्या सत्याग्रहाची चळवळ होय. ग्रामीण व्यवस्थेमध्ये जमीनदारांच्या आर्थिक पिळवणुकीपासून दलित गरीबांची सुटका करावयाची असेल तर त्यांना त्यांच्या मालकीची जमीन मिळवून दिली पाहिजे, असे डॉ. आंबेडकरांना नेहमी वाटत असे. रिपब्लिकन पक्षाने बाबासाहेबांच्या या विचारानुसार आपल्या कार्यक्रमापासून जमीनीचे राष्ट्रीयीकरण केले जाईल असे स्पष्ट केले होते. दलितांचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे आर्थिक दुर्बलता होय, आणि ती दूर करण्यासाठी भूमिहीनांना स्वत:च्या जमीनी मिळवून दिल्या पाहिजेत. या भूमिकेतून दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली डिसेंबर १९५८ पासून नाशिक, जळगाव, धुळे व अहमदनगर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी भूमिहीनांनी सत्याग्रह केले.

८. रिपब्लिकन पक्षाद्वारे दुसरे महत्त्वाचे कार्य केले ते म्हणजे दलितांमध्ये जनजागृतीचे होय. पक्षाने १९५७ ते १९५९ या काळात प्रबुद्ध भारत नावाचे महत्त्वाचे साप्ताहिक चालवले. या साप्ताहिकातून पक्षाने लोकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.[१४]

## रिपब्लिकन पक्षात फूट :-

''१९५७ ते १९५८ या कालखंडात पक्षाचे मजबूत असे संघटन होते. दलितांचे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व राजकीय परिवर्तन घडवून आणून दलितांचा सर्वांगिण विकास करण्याच्या दृष्टीने सर्व रिपब्लिकन पक्ष नेते मंडळी प्रयत्न करीत होती. भारतीय संसदेत व संसदेबाहेर आपले प्रभुत्व निर्माण करून दलितांमध्ये एक नवी जाणीव निर्माण करत होते. परंतु नंतरच्या काळात दलितांच्या सर्वांगिण विकासाबरोबर दलित मुक्तीसाठी होत असलेले प्रयत्न बाजूला पडून रिपब्लिकन पक्ष नेते आपआपसात संघर्ष करू लागले. प्रत्येक जण स्वत:ला प्रति आंबेडकर समजू लागला.''[१५] आणि आपणच अखिल भारतीय पातळीवरील दलितांचे नेते आहोत, असा खोटा आभास निर्माण करू लागले. नेत्याच्या या संघर्ष व परस्पर विरोधी भावनेतून दलित मुक्तीच्या चळवळी पुढे नेण्यात ते अयशस्वी झाले.

१९५८ मध्ये प्रथम रिपब्लिकन पक्षांतर्गत 'दुरूस्त' व 'नादुरूस्त' रिपब्लिकन पक्ष असे दोन गट निर्माण झाले. रिपब्लिकन 'दुरूस्त' गटाचे नेते बी. सी. कांबळे हे होते तर नादुरूस्त गटाचे नेते दादासाहेब गायकवाड हे होते. खा. बी. सी. कांबळे गटात बाबू हरिदास आवळे, दादासाहेब रूपवते, ए. जी. पवार, एन. एम. कांबळे हे होते. तर नादुरूस्त गटात दादासाहेब ग ायकवाड, एन. शिवराज व बॅ. खोब्रागडे यांच्या समवेत होता. दुरूस्त गट हा नादुरूस्त गटापेक्षा स्वत:ला शैक्षणिकदृष्ट्या अत्यंत हुशार व सुशिक्षित समजत होता व नादुरूस्त गट हा साधा व अशिक्षित होता असे दुरूस्त गटाचे म्हणणे होते.

रिपब्लिकन पक्षामध्ये काही प्रमाणात फूट पडत होती. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि १९६२ साली महाराष्ट्रात विधानसभेसाठी निवडणूका झाल्या. राष्ट्रीय पातळीवर रिपब्लिकन पक्षाला यावेळी फक्त तीन जागा मिळाल्या. महाराष्ट्रामध्ये काँग्रेस पक्षाने

२६५ पैकी २१५ जागा मिळवल्या आणि विरोधी पक्षाचा पराभव केला. रिपब्लिकन पक्षाला ही १९५७ पेक्षा कमी जागा मिळाल्या. परंतु सर्व मिळालेल्या मतांची टक्केवारी ११.६६% पाहता रिपब्लिकन पक्ष हा काँग्रेसच्या खालोखाल मते मिळवणारा पक्ष ठरला. १९६२ साली ही सर्व दलित मते रिपब्लिकन पक्षाला मिळाली होती.[१६] १९६४ मध्ये पुन्हा एकदा रिपब्लिकन पक्षात फूट पडली. मा. दादासाहेब गायकवाडांचे सहकारी आर. डी. भंडारे यांनी आपला वेगळा गट स्थापन केला. पुढे १५ ऑगस्ट १९६५ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

१९६४ ला रिपब्लिकन पक्षाचे पहिले अध्यक्ष एन. शिवराज यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दादासाहेब गायकवाड यांना पक्षाध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. ते १९७१ पर्यंत म्हणजे त्यांच्या निर्वाणापर्यंत अध्यक्षपदी होते. १९६७ च्या सार्वत्रिक निवड प्रक्रियेत त्यांनी काँग्रेस पक्षाशी सहकार्य केले. या काँग्रेस रिपब्लिकन पक्षामुळे रा. सु. गवई यांना महाराष्ट्र विधान परिषदचे उपाध्यक्ष पद मिळाले. तर बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना राज्यसभेचे उपसभापती पद मिळाले. तत्पूर्वी १९६६ मध्ये बी. सी. कांबळे गटातून दादासाहेब गायकवाडांच्या गटात आलेले दादासाहेब रूपवते यांना १९७० मध्ये दादासाहेब गायकवाडांनी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केले. पण त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती पदाची मागणी करूनही ते पद रा. सू. गवई यांना मिळाल्याने दादासाहेब रूपवते नाराज झाले व त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

१९७० मध्ये पुन्हा बॅ. खोब्रागडे गट निर्माण झाला. पुढे दादसाहेब गायकवाडांच्या निधनानंतर त्यांच्या गटाला गवई गट म्हणण्यात येऊ लागले. अशाप्रकारे १९५९ पासून सातत्याने महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे छोटे मोठे गट निर्माण होताना आपणास दिसतील. अर्थात दलित जनतेच्या भावनिक रेट्यामुळे व नेत्यांच्या काही प्रमाणातील सामंजस्याच्या भावनेतून या रिपब्लिकन गटांमध्ये वेळोवेळी ऐक्य घडवून आणण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु हे गट नेते एकत्र येऊ शकले नाहीत. रिपब्लिकन पक्षाच्या फूटीविषयी बोलताना दलित साहित्यिक व भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट) महाराष्ट्र प्रदेश माजी अध्यक्ष अर्जुन डांगळे म्हणतात, बी. सी. कांबळे यांनी दादासाहेब गायकवाडांकडे नेतृत्व दिले असते तर खूप बरे झाले असते. पण नेतृत्व करण्याची हौस कांबळे गटाला अधिक लागलेली होती.[१७] एकंदरीत दादासाहेब गायकवाड हे

आंबेडकरी चळवळीतील अनुभवी व क्रियाशील नेते होते हे नाकारून चालत नाही. कारण ते दलितांच्या मूलभूत प्रश्नांवर आवाज उठविणारे एकमेव नेते होते.

## रिपब्लिकन पक्ष फुटीमागची वैचारिक कारणे :-

रिपब्लिकन पक्ष १९५९ पासून १९७० पर्यंत सातत्याने दुभंगत आहे. त्यात वेगवेगळे गट व गटनेते निर्माण होत आहेत. रिपब्लिकन पक्ष फुटीमध्ये नेतृत्वाचा हव्यास हे जरी महत्त्वाचे कारण असले तरी याचकाळात मार्क्सवाद का आंबेडकरवाद असा वैचारिक प्रश्न उभा राहात होता. शिवाय भारतीय समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था ही फूटीस कारणीभूत ठरत होती. ग्रामीण व्यवस्थेमध्ये दलितांची पिळवणूक मोठ्या प्रमाणावर होत असताना रिपब्लिकन पक्षाचा एक गट दलितांना आर्थिक बलवान करण्यासाठी प्रयत्न करताना दिसतो. शिवाय भारतातील पक्ष पद्धतीचा परिणामही फूटीस कारणीभूत ठरतो. फक्त नेतृत्व कोणाकडे या प्रश्नामुळे पक्षात फूट पडली असे नाही तर रिपब्लिकन पक्ष फूटीस काही वैचारिक कारणे आहेत. ती पुढीलप्रमाणे देता येतील -

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर दलित समाजामध्ये एकमुखी असे नेतृत्व राहिले नाही. त्यांच्यासारखा सर्व कार्यकर्त्यांवर प्रभाव असणारा नेता न राहिल्याने आणि ठरल्याप्रमाणे सामूहिक नेतृत्वाची कल्पना फारशी यशस्वी न झाल्यामुळे पक्षामध्ये संघर्षाला सुरूवात झाली. रिपब्लिकन पक्षातील ज्येष्ठ नेते श्री. दादासाहेब गायकवाड आणि पक्षातील एक विचारवंत नेते श्री. बी. सी. कांबळे यांच्यामध्ये वैचारिक व वैयक्तिक संघर्ष निर्माण झाला.

२. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये घटक रूपाने असताना रिपब्लिकन पक्ष नेते श्री. दादासाहेब गायकवाड यांचा संबंध साम्यवादी पक्षाशी व साम्यवादी विचारसरणीच्या नेत्यांशी आला होता. दादासाहेब गायकवाडांचे साम्यवादी पक्षांच्याबरोबर मैत्रीचे संबंध होते. पण हे संबंध श्री. बी. सी. कांबळे यांना मान्य नव्हते. वास्तविक पाहता रिपब्लिकन पक्षाच्या या आघाडीमुळे फायदा झाला होता आणि दादासाहेब गायकवाड हे कोणत्याही अर्थाने कम्युनिष्टांचे हस्तक नव्हते. परंतु समितीच्या राजकारणाचा गैरवापर श्री. बी. सी. कांबळे यांनी केला असे म्हणायला हरकत नाही.

३. श्री. बी. सी. कांबळे हे दादासाहेब गायकवाडांना अशिक्षित समजत होते. दादासाहेब गायकवाडांच्या आंबेडकरी चळवळीतील अनुभवाचा विचार बी. सी. कांबळे यांनी केला नाही. ते स्वत:ला अत्यंत विद्वान-विचारवंत समजत असल्याने त्यांनी प्रथम आपला दुरूस्त गट स्थापन केला आणि अनेक पक्षांशी आघाड्या केल्या. १९७१ च्या सार्वजनिक निवडणुकीत कांबळे यांनी भारतीय जनसंघाची आघाडी केली होती. या फुटीच्या राजकारणामुळे दोन्ही गटांचा काहीच फायदा झाला नाही.

४. १९५९ च्या नागपूर पोटनिवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने अधिकृतपणे बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांना उमेदवारी दिली असताना दुरूस्त गटाचे नेते बाबू हरिदास आवळे यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरून निवडणूक लढविली. त्यामुळे कॉंग्रेसच्या उमेदवाराचा या निवडणुकीत विजय झाला. त्यामुळे या निवडणुकीनंतर रिपब्लिकन पक्षातील संघर्ष जास्त तीव्र बनला आणि खऱ्या अर्थाने फुटीची पार्श्वभूमी तयार झाली.

५. १९६० नंतर संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली आणि पक्षाने १९६२ च्या सार्वजनिक निवडणुका जिंकल्या. या काळात दोन्ही गटातून फूट वाढत गेली. १९६५-६६ साली सीमाभाग महाराष्ट्रात आणण्यासाठी जनसंघ वगळता संयुक्त महाराष्ट्रात आणण्यासाठी जनसंघ वगळता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सर्व घटकांनी संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. या समितीत सामील व्हावे का नाही याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांमध्ये मतभेद होता.

६. १९६८ मध्ये महाराष्ट्रापुरते कॉंग्रेस पक्षाशी सहकार्य करण्याचे दादासाहेब गायकवाड यांनी ठरविले. या कॉंग्रेस-रिपब्लिकन युतीमुळे महाराष्ट्रात कॉंग्रेसचा मोठा फायदा झाला. परंतु रिपब्लिकन पक्षाला मात्र फारशा जागा मिळाल्या नाहीत. पक्षाचे एक नेते रा. सू. गवई यांना महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती पद देण्यात आले. त्यामुळे पदासाठी नेत्यांमध्ये संघर्ष सुरू झाला. त्यातूनच दादासाहेब रूपवते, आर. डी. भंडारी हे पुढारी कॉंग्रेसमध्ये सामील झाले.

७. रिपब्लिकन पक्षाच्या पुढाऱ्यांनी सभेच्या आणि संसदीय पदाच्या राजकारणामध्ये जास्त रस घेतला. जनतेच्या पातळीवर ज्या मोठ्याचळवळी त्यांनी उभ्या करायला हव्या होत्या पण त्या त्यांनी उभ्या केल्या नाहीत. पक्षाने धडाडीने सामाजिक आणि राजकीय चळवळ न केल्यामुळे पक्षातील अंतर्गत मतभेद, हेवेदावे वाढत गेले आणि रिपब्लिकन पक्षामध्ये सातत्याने फूट पडत गेली. काँग्रेस पक्षाने रिपब्लिकन पक्षाचा लढावूपणा त्या पक्षाशी आघाडी करून संपुष्टात आणला. नेत्यांतील संघर्षामुळे, आत्मकेंद्रितपणामुळे आणि सत्तास्पर्धेमुळे रिपब्लिक पक्षाला पाठिंबा देणारी जनता उदास बनली आणि १९७१ नंतर बहुसंख्य रिपब्लिकन मतदारांना राष्ट्रीय काँग्रेसने आपल्या बाजूला झुकवायला सुरूवात केली.

**रिपब्लिकन पक्षाची दलित मुक्तीची संकल्पना** :- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्य निधनानंतर निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षात एक-दीड वर्षाचा मजबूत पक्ष संघटनाचा काळ सोडला तर अवघ्या काही दिवसातच या पक्षात फूट पडली व रिपब्लिकन पक्ष गटागटात विभागला गेला. अर्थात रिपब्लिकन पक्ष गटागटात विभागला जात होता तरी तमाम दलितांच्या व्यापक हिताचा विचार करता दुभंगलेल्या या पक्षात वारंवार ऐक्य करावयाचे प्रयत्न झाले. पण तेवढे ते यशस्वी झाले नव्हते. १९५७ ते १९७२ या कालखंडात रिपब्लिकन पक्षाने दलित मुक्तीच्या राजकारणात वेगवेगळ्या आघाड्यांवर कार्य करून दलितांच्या मुक्तीचा प्रश्न पुढे नेण्याचा प्रयत्न केला.

१९५७-५९ हा रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासातील सुवर्णयुगाचा काळ समजला होता. याच काळात पक्षाने संसदीय व्यवस्थेत राहून दलित मुक्तीचा जास्त व्यापक अर्थाने विचार केला. त्याचबरोबर संसदीय व्यवस्थेच्या बाहेर राहून दलित-बौद्धांच्या सवलती, दलितांवरील अन्याय, अत्याचार तसेच भूमिहीनांचा सत्याग्रह यासाठी जे सामाजिक, राजकीय, लढे उभे केले त्यामुळे दलित समाजामध्ये जागृतीबरोबरच सर्वांगिण विकासाची भावना विकसित झाली.

आंबेडकरी चळवळी ही फक्त सामाजिक व राजकीय प्रश्नापुरती सीमित न ठेवता सर्व दलित कष्टकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे यासाठी रिपब्लिकन पक्षाने आर्थिक लढेही

उभारले. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था ही मूठभर जमिनदारांच्या हातात आहे. या व्यवस्थेमध्ये दलित मोठ्या प्रमाणावर मजूर म्हणून राबत आहेत. ग्रामीण दलितांची आर्थिक प्रगती करावयाची असेल तर भूमिहीन दलितांना जमिनी मिळाल्या पाहिजेत. यासाठी १९५८ पासून ते १९६४ पर्यंत रिपब्लिकन पक्षाने दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली जो भूमिहीनांचा सत्याग्रह केला तो रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासात महत्त्वाचा सत्याग्रह आहे. दादासाहेब गायकवाडांनी नवबौद्धांच्या सामाजिक हिताचा विचार न करता आर्थिक न्यायासाठी जो लढा दिला तो दलित मुक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. रिपब्लिकन पक्षाच्या भूमिहीनांच्या सत्याग्रहाविषयी अर्जुन डांगळे म्हणतात, दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली झालेला भूमिहीनांचा सत्याग्रह हा भारताच्या रिपब्लिकन पक्षाच्या इतिहासातील सोनेरी पान आम्ही मानतो.[१८]

रिपब्लिकन पक्षाची दलित मुक्तीच्या उद्धाराची संकल्पना ही डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक राजकीय विचारावर आधारलेली होती. डॉ. आंबेडकरांनी दलित मुक्तीसाठी दलितांची स्वतंत्र संघटना निर्माण करून त्यांना आपल्या अधिकाराबद्दल जागृत करावे आणि आपल्या संघटनेच्या सामर्थ्याच्या जोरावर दलितांनी वाटा मिळवावा असे सांगितलेले होते. रिपब्लिकन पक्षाने राजकीय जागृतीसाठी संसदीय मार्गाचा स्वीकार केला आणि सर्व शोषितांना एकत्र आणण्याचे ठरविले. या देशातील शोषितांची आघाडी बनवून राजकीय सत्ता ताब्यात यावी ही राजनिती त्यामागे होती. या राजनितीमध्ये संसदीय मार्गाचा आत्यंतिक आग्रह सोडला तर फार दोष काढायला जागा नव्हती. परंतु रिपब्लिकन पक्षाने या राजनितीप्रमाणे राजकारण न केल्यामुळे त्यांना इतर जातीतील शोषितांचा पाठिंबा मिळाला नाही. तसेच १९७० नंतर दलित जनतेनेसुद्धा हळूहळू त्यांचा पाठिंबा काढून घ्यायला सुरूवात केली.

## सारांश :-

डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीचे नेतृत्व खंबीरपणे उभे राहिले नाही. कोणा एकाचे नेतृत्व सर्वमान्य झाले नाही. म्हणून अध्यक्षीय मंडळ स्थापन करावे लागले. येथूनच आंबेडकरी चळवळीला ग्रहण लागलेले दिसून येते. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन

पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला पण पक्षाने कोणत्या पक्षाशी तडजोड करावी यावरून पक्ष फुटला. एकीकडे दादासाहेब गायकवाड तर दुसरीकडे बी. सी. कांबळे असे महाराष्ट्रात चित्र होते. दादासाहेबांनी काँग्रेसबरोबर लोकसभेत आघाडी केली व १ जागा संपूर्ण भारतातून मागितल्याने तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने दलित चळवळ काँग्रेस व प्रस्थापितांच्या वळचणीला बांधलेली दिसून येते. तमात दलित शोषित समाजाचे भयानक प्रश्न असताना रिपब्लिकन नेते सत्तेच्या राजकारणाला कवटाळत बसले व प्रस्थापितांनी दलित चळवळ विकत घेतली व तिला वापरू लागले.

या अनुषंगाने सातारा जिल्ह्यात रिपब्लिकन पक्ष वरील गटातटात विखुरलेला दिसून येतो. महाराष्ट्र प्रदेशावरती मुंबईमध्ये जे चित्र असेल तेच ग्रामीण भागात होते. येथेही बी. सी. कांबळे गट, आर. डी. भंडारे गट, रा. सू. गवई गट, हे आर. पी. आय. गट काम करीत होते. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात त्यांना यश आले नाही. आर. टी. रणवरे, शंकर काकडे, बि. टी. जावळे, डी .डी. खरात, डी. पी. सावंत हे कार्यकर्ते काम करीत होते. पण दलितांच्या भौतिक प्रश्नांपेक्षा सामाजिक प्रश्न महत्त्वाचे होते. त्याकडे लक्ष नव्हते. याचा उद्रेक म्हणूनच रिपब्लिकन पक्षाला नाकारून युवकांची पँथरसारखी संघटना निर्माण झाली.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. २६ |
| २. | रूपवते दा. ना. | : | 'रिपब्लिकन ऐक्य - कथा नी व्यथा'', लिंबाळे शरणकुमार (संपा.) भारतीय रिपब्लिकन पक्ष प्रचार प्रकाशन, कोल्हापूर - लेख १९९२ |
| ३. | खरात शंकरराव | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', पृ. ३२१ व ३२२ |
| ४. | कसबे रावसाहेब | : | 'डॉ. आंबेडकर आणि मार्क्स', पृ. ७३ |
| ५. | कीर धनंजय | : | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पृ. ५३३ |
| ६. | बंधू माधव | : | लेख 'रिपब्लिकन पक्ष - दुरूस्त - नादुरूस्त', लिंबाळे शरणकुमार (संपा.) भारतीय रिपब्लिकन पक्ष प्रचार प्रकाशन, कोल्हापूर - लेख १९९२, पृ. ५५ |
| ७. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. ३९ |
| ८. | प्रा. डॉ. मेश्राम एस. जी. उर्म विमलकीर्ती, | | लेख - 'रिपब्लिकन पक्षाचे विधिमंडळातील कार्य', लिंबाळे शरणकुमार (संपा.) भारतीय रिपब्लिकन पक्ष प्रचार प्रकाशन, कोल्हापूर - लेख १९९२, पृ. ६० |
| ९. | तत्रैव | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्षाची घटना' पृ. ३७५ ते ३७९ |
| १०. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. ५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | श्रीमती शांताबाई दाणी | : | 'रिपब्लिकन पक्ष माझी भूमिका', लिंबाळे शरणकुमार (संपा.) भारतीय रिपब्लिकन पक्ष प्रचार प्रकाशन, कोल्हापूर - लेख १९९२, पृ. २९० व २९१ |
| १२. | Jogdand P. G. | : | 'Dalit Movement in Maharashtra', pp. 57 |
| १३. | प्रा. क्षीरसागर रामचंद्र | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष', पृ. ५७ |
| १४. | रिपब्लिपक्षाच्या कार्याचे विवेचन हे प्रा. क्षीरसागर यांच्या 'भारतीय रिपब्लिकन पक्ष व | | पी. जी. जोगदंडे यांच्या 'Dalit Movement in Maharashtra ग्रंथावरून संमिश्रपणे घेतले आहे. |
| १५. | Jogdand P. G. | : | 'Dalit Movement in Maharashtra', pp. 59 |
| १६. | Zelliot E. Fram | : | 'Untouchable to Dalits, Pp. 115 |
| १७. | डांगळे अर्जुन | : | 'भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाशआंबेडकर) यांची मुलाखत दि. ७/११/१९९४ |
| १८. | तत्रैव | | |

----×----

# प्रकरण – ५

# दलितांच्या चळवळी (१९७२ ते २००२)

## ५.१ भारतीय दलित पँथर (१९७२ ते २००२) :-

१९५७ ला स्थापन झालेल्या रिपब्लिकन पक्षाने १९७२ पर्यंतच्या आपल्या राजकीय वाटचालीत दलितांच्या राजकारणामध्ये व समाजकारणामध्ये दलितांच्या मुक्तीसाठी व परिवर्तनासाठी संसदीय राजकारण आणि संसदीय राजकारणातील आघाड्या यांना महत्त्वाचे स्थान दिले. परंतु बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला प्रबळ असा विरोधी पक्ष म्हणून रिपब्लिकन पक्ष कधीच उभा राहू शकला नाही. रिपब्लिकन पक्ष हा डॉ. आंबेडकरांच्या चळवळीशी इमान राखू शकला नाही. त्याला डॉ. आंबेडकरांच्या व्यापक पुरोगामी दृष्टिकोनाचे अधिष्ठान कधीच समजू शकले नाही. डॉ. आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणामुळे निर्माण झालेली पोकळी सामूहिक नेतृत्वाद्वारे भरून काढण्याचा दलित पुढाऱ्यांचा संकल्प प्रत्यक्षात येऊ शकला नाही. दादासाहेब गायकवाडांनी केलेल्या व्यापक आर्थिक न्यायाच्या लढ्यापेक्षा नवबौद्धांच्या मर्यादित हितसंबंधाना या पक्ष नेत्याच्या दृष्टीने प्राधान्य मिळाले.[१] त्यामुळे भारतातील सर्व दलितांची एकजूट करून संसदीय व्यवस्थेवर जबरदस्त प्रभाव पाडण्यात हा पक्ष अयशस्वी ठरला. दलितांची संघटित शक्ती उभी न करता हा पक्ष फक्त एकजातीय राहिला. युती आणि फाटाफूट यातच हा पक्ष गुरफटला गेला.

१९५७ ला स्थापन झालेला रिपब्लिकन पक्ष अगदी थोड्याच काळात फुटला व १९७२ पर्यंत यापक्षाचे ऐक्य दृढ होण्याऐवजी वेळोवेळी या पक्षाचे विविध गटात विभाजन होत गेले.

रिपब्लिकन पक्षाच्या आत्मघातक फुटीच्या राजकारणामुळे आणि वेगवेगळ्या गटांच्या संधी साधू धोरणामुळे दलितांची संघटीत शक्ती कमी झाली. रिपब्लिकन पक्षाच्या एकूण धोरणाविषयी व कार्यपद्धतीविषयी नामदेव ढसाळ म्हणतात, वेशी बाहेरच्या सर्व दलितांना आणि आर्थिक शोषणाने पिळलेल्यांना त्यांनी कधीच सांधले नाही. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दलितांसारख्या क्रांतिकारक समुहाचे राजकारण या पक्षाने सनदशीर मार्गाने चालविले. मते, मागण्या, राखीव जागा या चक्रात रिपब्लिकन पक्ष गुंतला. त्यामुळे खेडोपाडी अस्ताव्यस्त असलेला दलित

समाज राजकीयदृष्ट्या होता तिथेच राहिला. पक्षाचे नेतृत्व समाजातील मध्यमवर्गीय गटाच्या हातात गेले. गटबाजी, स्वार्थ आणि फाटाफुट सुरू झाली.[२] एकंदरीत दलितांच्या परिवर्तनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरानंतर जेवढा जास्त व्यापक प्रमाणात विचार व्हायला हवा होता तो रिपब्लिकन पक्षाच्या या वृत्तीमुळे झाला नाही. याच काळात दलितांमध्ये जागृती वाढत होती व नवी शिकणारी पिढी जन्माला आली होती. ग्रामीण महाराष्ट्रामध्ये दलितांवरील अत्याचार वाढत होते. जुन्या सरंजामशाही शेती व्यवस्थेच्या जागी नवी भांडवलशाही हरित क्रांतीवर आधारलेली शेतीव्यवस्था जन्म घेत होती. अशा व्यवस्थेत दलित मोठ्या प्रमाणावर शेतमजूर म्हणून काम करत होते. त्यामुळे आर्थिक आणि जातीय कारणांमुळे दलित शेतमजूर आणि सर्वच सधन शेतकरी यांच्यामध्ये संघर्ष वाढला होता. मुठभर गावकुसाबाहेरच्या दलितांची मोठ्या प्रमाणावर सवर्ण वर्गाकडून पिळवणूक व त्यांच्या अत्याचारात वाढ होत होती. शहरी भागाचा विचार करता शहरी भागातही दलितांच्या वरील अत्याचारात वाढ झाली होती. १९६७-७० च्या दरम्यान सवर्ण हिंदूंनी जवळजवळ ११०० अस्पृश्यांची (दलितांची) हत्या केली असे शंकरराव खरात म्हणतात. ग्रामीण भागातील दलितांवर यामध्ये प्रामुख्याने दलित स्त्रियांवर बलात्कार होणे, त्यांना अपमानित जीवन जगण्यास भाग पाडणे इ. प्रकार सातत्याने घडत होते. इ. स. १९७२ मध्ये भारताची एकूणच अर्थव्यवस्था अरिष्टामध्ये होती. शहरी आणि ग्रामीण दलितांवर एका बाजूने मोठ्या प्रमाणावर अन्याय वाढत होते तर या अर्थव्यवस्थेच्या बदलामुळे शहरी आणि ग्रामीण दलितांचे व गरीबांचे प्रश्न हे जास्तीत जास्त गंभीर व गुंतागुंतीचे बनले.[३] तत्कालीन रिपब्लिकन पक्षाच्या प्रस्थापित पुढाऱ्यांकडे या सर्व परिस्थितीचे काहीही उत्तर नव्हते. दलित अत्याचारात वाढ झालेली होती. पण या अत्याचारातून वाचा फोडणारी अशी संघटना या काळात दलितांकडे नव्हती. सुशिक्षित दलित तरूणांमध्ये आत्मसन्मानाची भावना प्रबळपणे निर्माण होत होती. दलितांना भेडसावणारे प्रश्न आणि जातीच्या प्रश्नावर प्रखरपणे लढणारी संघटन असणे ही काळाची गरज वाटत होती आणि या गरजेतून १९७२ मध्ये 'दलित पँथर' ही तरूणांची नवीन जहाल राजकीय व सामाजिक संघटना निर्माण होवू लागली.

## दलित पँथरचा उदय :-

दलित पँथरची चळवळ ही खऱ्या अर्थाने दलित साहित्यातून निर्माण झालेली आहे. १९५६ नंतर दलित साहित्याच्या चर्चेला तोंड फुटले होते. दलित साहित्य संघ तसेच १९६७ मध्ये घनश्याम तळवटकर यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभेच्या स्थापनेनंतर मराठी साहित्य क्षेत्रात विद्रोही व बंडखोर असे विचार पुढे आले. १९५८ च्या मुंबई येथील दलित साहित्य संघाच्या मेळाव्यात सुप्रसिद्ध कादंबरीकार शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी, 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दलितांच्या तळहातावर तरलेली आहे.' अशी क्रांतिकारी जाणीव करून दिली. तर प्रस्थापित मराठी साहित्याला प्रचंड हादरा देणारे लेखक बाबूराव बागुल हे याच सुमारास नावारूपास आले. त्यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या कथा संग्रहांनी मराठी साहित्य क्षेत्रात खळबळ माजवली होती. आजपर्यंतच्या मराठी साहित्याने कधीही दखल न घेतलेले दलित जीवनाचे अक्राळविक्राळ दर्शन दलित साहित्यातून होत होते. या सर्व साहित्याचा प्रभाव दलित समाजातील सुशिक्षित तरुणांवर पडत होता व त्यातून त्यांना दलित जीवनाची जास्त प्रखरपणे जाणीव झाली. १९७२ साली महाड येथील दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात बाबूराव बागुल यांनी दलित साहित्यास ठोस दिशा दिली. त्यांनी 'दलित' या जातिवाचक शब्दाल एक नवा आणि व्यापक अर्थ दिला. बाबूराव बागुल आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात 'माणूस' हा दलित साहित्याचा केंद्रबिंदू आहे. हा माणूस अन्यायाविरुद्ध, अत्याचाराविरुद्ध, पिळवणूक आणि छळवणूकीविरुद्ध न्याय मागणारा आहे. तो संपूर्ण समाज परिवर्तन मागणारा आहे. तो समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व आणि सम्यक क्रांतीचा पुरस्कर्ता आहे. त्याचा शत्रू हा धर्मग्रंथांमध्ये म्हणजेच वेद, पोथ्या, पुराणांमध्ये दडलेला आहे. तो अदृश्य आहे. त्याला आपण शोधून काढला पाहिजे. त्याच्यावर कठोर प्रहार केले पाहिजेत कारण त्यानेच जात निर्माण केली आहे. ही चातुवर्ण्यधिष्ठीत विषम समाजव्यवस्था आणि या पोथ्या विषम समाजव्यवस्थेतून जन्माला आल्या आहेत. पुराणांनी समाजामध्ये जातीयतेचे विष रूजवलेले आहे. त्या धर्मग्रंथांचा विचारपूर्वक समाचार घेतला गेला पाहिजे.[४]

याच संमेलनातील एका परिसंवादात डॉ. म. ना. वानखेडे यांनी अमेरिकेतील निग्रो साहित्याबद्दल माहिती सांगितली. अमेरिकेतील गोरा माणूस काळ्या निग्रो माणसाला पशुहून हीन वागणूक देतो. तशाच प्रकारची वागणूक भारतात दलित वर्गाला सर्वच हिंदू वर्गाकडून मिळते. अमेरिकेतील निग्रोंनी निर्माण केलेल्या निग्रो साहित्याचे भारतामधल्या दलितांनी निर्माण केलेल्या साहित्याशी कसे जवळचे नाते आहे व अमेरिकेतील गोऱ्यांच्या विरोधात निग्रो तरुणांनी 'ब्लॅक पँथर' ही लढावू संघटना कशी उभी केली आहे. आज साहित्य क्षेत्रात तरुण निग्रो लिहित आहेत व अन्यायाविरुद्ध लढतही आहेत. भारतातील दलित साहित्यिकांनी व तरुणांनी या मार्गाने जावे अशी सूचनाही वानखेडे यांनी केली. या साहित्य संमेलनाचा परिणाम महाराष्ट्रातून आलेल्या अनेक सुशिक्षित वर्गावर झाला. 'विद्रोह' सारख्या नियतकालिकातून किंवा कवी नामदेव ढसाळांच्या 'गोलपीठा'तून दलित जीवनाचे चित्रण समाजापुढे येऊ लागले. बाबूराव बागुल, दया पवार, शंकरराव खरात, राजा ढाले, ज. वि. पवार, अरूण कांबळे आणि इतर अनेक दलित लेखकांच्या लिखाणात आक्रमकता, कडवटपणा दिसून येतो. अशा या साहित्यिक आक्रमकतेतूनच जहाल स्वरूपाच्या पँथर चळवळीचा उदय झाला. दलित साहित्य आणि दलित पँथर याविषयी जयश्री गोखले स्पष्टपणे असे म्हणतात की, 'दलित पँथरच्या चळवळीचे गमक म्हणजे दलित साहित्य होय.' मराठी साहित्य वर्गाभोवती फिरणारे म्हणून या साहित्याला कडाडून विरोध करून दलित साहित्याची निर्मिती करणे सुरू झाले. दलित साहित्याने मोठी प्रगतीच केली. आतापर्यंत ज्या जीवनाकडे दुर्लक्ष केले जात होते, त्या जीवनाकडे दलित साहित्याने लक्ष वेधून समाजात एक प्रकारची नवीन जाणीव निर्माण केली. दलित साहित्याने निर्माण केलेली ही घडी केवळ मराठी साहित्यातच नव्हे तर अखिल भारतीय साहित्याला एक क्रांतिकारक घटना म्हणून नोंद करणे भाग पडेल. प्रत्यक्ष जीवनातील जडणघडण, सामाजिक उणीवा आणि मानवी हक्कांची जाणीव यांचा उदय इ. क्रांतिकारक विचारांची मालिका निर्माण झाली. दलित साहित्याची भाषा घरगुती, ग्रामीण आणि बोलीभाषा होती. त्यामुळे त्यात समाजाचे खऱ्या अर्थाने प्रतिबिंब उमटले. साहित्यात एक नवीन जीवनधारा निर्माण झाली.[५] एकंदरीत भावी काळात जहाल दलित संघटना 'दलित पँथर' निर्मितीची मुहूर्तमेढ दलित साहित्यानेच रोवली.

१९७२ च्या दरम्यान महाराष्ट्रात पुण्याजवळील बावडा या गावी सर्वच गावकऱ्यांनी दलित बांधवांवर बहिष्कार टाकला. मराठवाड्यातील ब्राह्मण गावामध्ये एका दलित स्त्रीची नग्न धिंड काढण्यात आली. तसेच नागपूरपासून पंचवीस किलोमीटर अंतरावरील एरण गाव येथील रामदास नाईकनवरे या बौद्ध तरुणाचा बळजबरीने देवीपुढे बळी दिला. असे अनेक अमानुष अत्याचार महाराष्ट्रातील ग्रामीण भागात घडत होते. प्रस्थापित रिपब्लिकन नेते मंडळी या सर्व घटनांवर योग्य प्रतिक्रिया व्यक्त करू शकत नव्हती. साहित्य क्षेत्रातील विद्रोह आणि ग्रामीण जनतेवरील अमानुष अन्याय, अत्याचार यांच्या विरोधात उठाव करण्यासाठी महाराष्ट्रात दलित समाज याच काळात जागा होत होता. या सर्व परिस्थितीस तोंड देणे गरजेचे होते.

९ जुलै १९७२ रोजी सिद्धार्थ विहार मुंबई येथे दलित तरुणांची बैठक घेवून दलित पँथरची स्थापना करण्यात आली. अमेरिकेतील ब्लॅक पँथर ही अशी निग्रो तरुणांची संघटना होती. त्याच धरतीवर 'दलित पँथर' चळवळ निर्माण करण्यात आली. ''या बैठकीमध्ये राजा ढाले यांना अध्यक्ष करण्यात आले. नामदेव ढसाळ यांना संसदमंत्री व ज. वि. पवार यांना जनरल सेक्रेटरी म्हणून नियुक्त करण्यात आले.[६]

## दलित कोण ?

नामदेव ढसाळ यांनी दलित पँथरच्या जाहिरनाम्यात दलितांची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, अनुसूचित जाती-जमाती, बौद्ध, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी या सर्वांची दलितात गणना होते.

'पँथर' हे कशाचे प्रतीक आहे. पँथर हा इंग्रजी शब्द आहे. 'चित्ता' हा त्याचा अर्थ. 'चित्ता' या शब्दाला आम्ही एक सामाजिकपणा दिला आहे. शब्दकोशाने एका हिंस्त्र वन्य प्राण्यासाठी हा शब्दप्रयोग योजला आहे. चित्त्याची शिकार करीत नाहीत. आम्ही अन्यायखोराची शिकार करू. दलित माणूस हा आमचाच आहे. दलितविरोधी माणूस ही आमची शिकार असेल. अन्यायखोराविरुद्ध उभे राहताना आम्ही चित्त्याच्या आक्रमकतेने उभे राहू. चित्त्यासारखे आम्ही चवताळलेले असू. अन्यायाविरुद्ध आमच्या नसा ताठ झालेल्या असतील. हिंसेला प्रतिबंध करण्यासाठी हिंसेचा वापर हे आमचे तत्त्व आहे.

हिंसेला  अहिंसेने उत्तर देता येईलही पण आमचा तो स्वभाव नाही. आमचं भक्ष्य आम्ही सदैव शोधत असतो. शोषक दु:ख दारिद्र्य या कारणाने त्रस्त झालेल्या माणसांचे असहाय्यपण हे आमचं भक्ष्य आहे. पँथरची आक्रमकता पँथरच भक्ष्य शोधन, पँथरची सावधगिरी, पँथरची तडफ झाली की झडप आम्हांला मोहविते. आम्हाला पँथर विषयी आकर्षण वाटते. आम्हाला पँथरविषयी आकर्षण वाटते. आम्ही स्विकारलेला 'पँथर' हा शब्द वन्य प्राण्याचे द्योतक नाही, तो आहे, आमच्या तडफदार आणि अन्यायाविरुद्ध झडप घेण्याच्या प्रवृत्तीचे प्रतीक.

अशा प्रकारे अमेरिकेतील निग्रोंच्या 'ब्लॅक पँथर' या जहाल संघटनेच्या धरतीवर भारतात 'दलित पँथर' ही दलित मुक्तीची एक लढावू क्रांतिकारक चळवळ म्हणून उभी राहिली. नामदेव ढसाळ, राजा ढाले, ज. वि. पवार, रामदास सोरटे, लतिफ खाटीक, अविनाश माहतेकर, प्रल्हाद चेंदवाणकर, अर्जुन डांगळे, भाई संगारे, अनिल कांबळे, अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रतिमकुमार शेगावकर, टी. एम. कांबळे आदि आघाडीच्या कार्यकर्त्यांनी ही चळवळ थोड्याच दिवसात वाढविली, आंबेडकरी विचार हा या चळवळीचा पाया होता. 'शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा' या आंबेडकरी विचारांवर पँथर उभी राहिली. सुरुवातीच्या काळात पँथरने महाराष्ट्रात औरंगाबाद, पूर्व नाशिक इ. ठिकाणी व नंतरच्या काळात महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर ही आपली संघटना शक्ती वाढवली.

## दलित पँथरची घटना आणि कार्यक्रम :-

दलित पँथरच्या स्थापनेनंतर नामदेव ढसाळ यांनी दलित पँथराची घटना, कार्यक्रम आणि नंतरच्या काळात जाहीरनामा प्रकाशित केला. पांढऱ्या पार्श्वभूमीवर काळ्या रंगात काढलेला चित्ता व त्याच्याभोवती पांढऱ्या रंगात 'दलित पँथर' ही वर्तुळाकार अक्षरे हे पँथरचे बोधचिन्ह ठरविण्यात आले. तसेच 'काळा चित्ता' हे या संघटनेचे निशाण निश्चित केले. पँथरचे घटना व जाहीरनामा ज्या कोणास मान्य असेल व जो नियमित संघटनेची वर्गणी देऊ शकेल अशा १८ वर्षाच्या किंवा त्याहून जास्त वयाच्या दलित श्रमिक वर्गातील व्यक्तीस त्या संघटनेचे सभासदत्व मिळू शकेल, असे ठरविण्यात आले.  संघटनेचे मूळ घटक छावणी हा असेल व कमीतकमी २५

सभासदांची छावणी ठरविण्यात आली. छावणीमध्ये एक छावणीप्रमुख, एक उपप्रमुख व एक खजिनदार एकमताने अगर बहुमताने निवडले जातील. या वार्षिक अधिवेशनात सर्वोच्च राजकीय मंडळाची नियुक्ती बहुमताने करण्यात येऊन या सर्वोच्च मंडळाद्वारे पँथरचे राजकीय व संघटनात्मक निर्णय होतील. पँथरचे गाव / शहर / तालुका नित्य स्तरावर बांधणी करण्यात येईल. प्रत्येक विभागात एकाहून अधिक छावण्या असतील. तसेच राज्यपातळीवरही पँथरचे संघटन करण्याचे ठरविले. या राज्य सर्वोच्च मंडळामध्ये प्रत्येक जिल्ह्याचा एक प्रतिनिधी व मंडळाचा एक अध्यक्ष निवडला जाईल व या सर्व प्रतिनिधीमधून पँथरला एक चिटणीस, दोन सरचिटणीस व एक खजिनदार निवडला जाईल व बाकीचे सर्वोच्च मंडळाचे सभासद राहतील. असे घटनेत नमूद करण्यात आले. गाव / तालुका / जिल्हा / राज्य व राष्ट्रीय स्तरावर पँथरचे संघटन करून त्याच्या बैठका, निधी, पदाधिकारी व पँथर सभासदाची कर्तव्ये निश्चित करण्यात आली.

### दलित पँथरचा कार्यक्रम :-

पँथरने आपल्या कार्यक्रमात सामाजिक जागृतीबरोबरच राजकीय जागृतीचाही विचार केलेला आहे. जात, धर्म, वर्ण-विरहीत, शोषणमुक्त, सुखी, समृद्ध, सुसंस्कृत व विज्ञानावादी समाजनिर्मितीसाठी दलित श्रमिक वर्गाची राजसत्ता स्थापन करणे तसेच विषम समाजव्यवस्था मांडणारे व विषमतेला बळी पडलेल्या सर्व घटकांना दोस्त करण्यात येईल असे ठरवले. जातीयवादी धर्मभेदवादीवर आधारलेला पक्ष व शेतकरी, जमीनदार, बागायतदार, भांडवलदार, साम्राज्यवादी हे पँथर शत्रू समजतो व या सर्वांविरुद्ध क्रांती करू इच्छितो. जगातील साम्राज्यशाहीविरुद्ध भांडणाऱ्या दलित श्रमिकांना पँथर पाठिंबा देऊ इच्छितो.[७]

दलित पँथरचा मुक्तीलढा हा सर्वंकश क्रांती इच्छितो. सर्व क्षेत्रात स्वत:चे प्रभुत्व निर्माण करून संघर्षातून क्रांती करण्यावर पँथरचा विश्वास आहे. पँथरच्या दृष्टीने अन्न, वस्त्र, निवारा, नोकरी, जमीन, शिक्षण, अस्पृश्यता, सामाजिक व शारीरिक अन्याय हे मुख्य प्रश्न आहेत. हे सोडविण्यासाठी पँथर दूरवरचा कार्यक्रम व ताबडतोबीचा कार्यक्रम आपल्या घटनेत नमूद करते. पुढच्या कार्यक्रमामध्ये भांडवलदार (देशी व विदेशी) जमीनदार यांचे उच्चाटन करून दलित

श्रमिकांची सत्ता स्थापन करण्याचा हेतू बाळगतो. तसेच ताबडतोबीच्या कार्यक्रमामध्ये पँथर दलित श्रमिकांना नोकऱ्या, बेकारभत्ता, शेतमजूरांना जमिनी, किमान वेतन, सार्वजनिक विहीरी, सर्वांना मोफत शिक्षण, मोफत औषधोपचार, जीवनावश्यक वस्तूचे योग्य दर या बाबींची मागणी करते. तर धर्म, जात, पंथ यावर बंदी तसेच सर्व जातीधर्माच्या एकत्रित वस्त्या वसविण्याचा कायदा करावा असा कार्यक्रम आखते व आर्थिक, राजकीय, सामाजिक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पँथर दलित श्रमिक जनतेला एकत्र करून लढे देऊ असे ठरविते. दलित पँथरची घटना आणि कार्यक्रमावरून आपणास असे दिसते की दलित पँथरची चळवळ ही मुलत: दलित व श्रमिक यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने जाणारी आहे.

## दलित पँथरची चळवळ :-

दलित पँथरची निर्मिती झाल्यावर त्यांनी आपला जाहीरनामा व कार्यक्रम जाहीर केला. पँथरच्या जाहीरनाम्यात मित्र आणि शत्रू असे दोन भाग पाडून, वर्णव्यवस्था मोडणारे क्रांतीकारक पक्ष, समाजवादी समाजरचना मानणारे डावे पक्ष यांना मित्र पक्ष मानण्यात आले. सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा मानणारे डोके आपले शत्रू मानण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने जमीनदार, बडे भांडवलदार, सावकार, साम्राज्यशाहीचे दलाल आणि नोकरशाही, भांडवलदार, धार्मिक जातीय राजकारण करणारे पक्ष आणि या सर्वांना पाठीशी घालणारे सरकार यांना शत्रू मानण्यात आले. दलित पँथरने दलित मुक्तीसाठी सम्यक क्रांतीचा जयघोष केला. पँथरला अंशत: बदल नको होता. संपूर्ण सर्वांगीण क्रांतिकारक बदल पँथरला अपेक्षित आहे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात पँथरला परिवर्तन हवे होते. दलित पँथरने दलित मुक्तीचा विचार जास्त व्यापक पातळीवर केला. दलित मुक्तीचे तीन महत्त्वाचे प्रश्न दलित पँथरने लोकांपुढे मांडले.

१. भारतातील सम्यक क्रांतीसाठी, जातीव्यवस्थेचा नाश जितका महत्त्वाचा तितकाच वर्णव्यवस्थेचा नाश महत्त्वाचा आहे.

२. राजकीय जागृतीसाठी संसदीय व्यवस्थेच्या बाहेर जाऊन राजकीय लढे उभारणे.

३. दलितांच्या आर्थिक, सामाजिक प्रश्नांवर जनआंदोलने उभी करणे आणि दलितांच्या राजकारणाला एक लढाऊ स्वरूप देणे.

आणि या प्रश्नावर सुरुवातीच्या काळापासून पँथरने दलितांवरील अत्याचाराला वाचा फोडली.

पँथरच्या नेत्यांनी दलित पँथरची चळवळ सतत आक्रमक ठेवली. देशामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये एक आक्रमक वातावरण निर्माण केले. आंबेडकरवाद मनुष्यतेचे श्रेष्ठत्व हे मूल्य मानतो, पँथरनेही हे तत्त्वज्ञान स्विकारले. 'माणसाने माणसांशी माणसांसारखे वागावे' हे धम्म सत्य त्यांनी स्विकारले होते.[८] दलित पँथरची चळवळ नेहमीच प्रस्थापित व्यवस्थेच्या विरुद्ध आक्रमक राहिली. शंकराचार्यांना जोडे दाखविणे, मनुस्मृतीचे दहन, हिंदू देवदेवतांवर व वैदिक व्यवस्थेवर कडाडून पँथरने टीका केली.

१९७२ साली भारतीय स्वातंत्र्याचा रौप्य महोत्सवाचा दिवस होता. पण पँथरने तो 'काळा स्वातंत्र्य दिवस' पाळला. पँथरचे नेते राजा ढाले यांनी 'साधना' या साप्ताहिकातून एक लेख लिहून एकच खळबळ उडविली. साधनेतील लेखात राजा ढाले लिहितात, लोकांची सहानुभूती मिळविण्यासाठी स्वत:ला दलित म्हणवून घेणे वेगळे आणि प्रत्यक्षात दलित उपेक्षित म्हणून जगणे नि लढ्याला सामोरे जाणे वेगळे. ब्राह्मणांच्या बाईचा कासोटा ब्राह्मणगावात सोडला जात नाही. सोडला जातो बौद्ध स्त्रीचा नि याला शिक्षा काय तर ५० रुपये दंड झाला. राष्ट्रगीताचा अपमान केला तर३०० रुपये दंड झाला. राष्ट्रध्वज म्हणजे निव्वळ कापड विशिष्ट रंगात रंगविलेले प्रतीक. त्या प्रतिकाचा अपमान झाला तर दंड नि सोन्या गावच्या सोन्यासारख्या प्रत्यक्षातील चालत्या बोलत्या स्त्रीचे पातळ फेडले तर ५० रुपये दंड. याच लेखात ते पुढे म्हणतात, लोकांचे दु:ख मोठ की प्रतिकाच्या अपमानाचे दु:ख मोठ ? कोड काय ? आमच्या अब्रूची किंमत एका पातळाच्या किंमतीएवढी. या गुन्ह्यात म्हणूनच राष्ट्रध्वजाच्या अपमानाला होणाऱ्या दंडापेक्षा जबर शिक्षा हवी न पेक्षा लोकांत राष्ट्रप्रेम राहणार आहे काय ?[९] या राष्ट्रध्वजाच्या टीकेवर सर्व हिंदूंनी कडाडून हल्ला केला. शिवसेना आणि जनसंघाने 'साधना' च्या कार्यालयावर मोर्चा काढून साधना साप्ताहिकाचे अंक जाळण्याची धमकीही दिली.

१५/०८/१९७२ रोजी नामदेव ढसाळ यांच्या नेतृत्वाखाली युवक क्रांतिदल आणि दलित पँथर यांच्या संयुक्त विद्यमाने सवर्ण हिंदूकडून दलितांवर होणारा अन्याय निपटून काढण्यासाठी मोर्चा काढला गेला. १४ ऑगस्ट १९७२ रोजी पँथरने मुंबई येथे मुख्यमंत्र्यांना दलित अन्याय-अत्याचार ताबडतोब थांबविण्यासाठी निवेदन दिले. याशिवाय पँथरने अनेक छोट्या मोठ्या प्रश्नावर चळवळी उभारण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये प्रामुख्याने औरंगाबाद येथील दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवाढीचा प्रश्न पँथरनी यशस्वीरित्या सोडविण्याचा प्रयत्न केला. या शिष्यवृत्ती वाढीसाठी पँथरनी जवळजवळ दीड महिना विद्यार्थ्यांचे आंदोलन १९७३-७४ मध्ये चालविले होते.[१०]

## निवडणूकीवर बहिष्कार :-

जानेवारी १९७४ मध्ये मुंबईतील लोकसभेची पोटनिवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीवर दलित पँथरने बहिष्कार टाकला. याचकाळात पँथरचा राजकीय दबदबा वाढला होता. त्यामुळे या बहिष्काराला पँथरच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे असे स्थान आहे. मध्य मुंबईतील या मतदार संघातील श्री. आर. डी. भंडारे यांची बिहारचे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्याने त्यांनी लोकसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे या पोटनिवडणुकीत काँग्रेस, रिपाई आणि शिवसेना यांची युती झाली आणि त्यांच्या विरुद्ध कम्युनिस्ट पक्ष, जनसंघ व अन्य एकत्र आहे. लोकसभेच्या या निवडणुकीमध्ये पँथरने घेतलेली भूमिका ही रिपब्लिकन पक्षाला धक्का देणारी होती. रिपब्लिकन पक्षाने काँग्रेस व शिवसेना ही युती केल्याबद्दल दलित पँथर रिपब्लिकन पक्षावर कठोर टीका करीत होते. या निवडणुकीत काँग्रेस रिपाई युतीचे 'रामराव आदिक' हे उमदेवार होते.तर जनसंघाचे डॉ.उदयकुमार पंडित हे उभे होते. परंतु दलित पँथरच्या भूमिकेमुळे (बहिष्कारामुळे) दलितांचे मतदान झाले नाही. परिणाम काँग्रेस रिपाई युतीचे उमेदवार पराभूत झाले. तर कॉ. एस. ए. डांगे यांची कन्या श्रीमती रोझा देशपांडे या निवडून आल्या.

नंतर मात्र दलित पँथरने असे स्पष्ट केले की, आमचा बहिष्कार म्हणजे भारतातील कम्युनिष्ट पक्षाला मान्यता असा नाही. हा बहिष्कार म्हणजे सर्व राजकीय पक्षाविरुद्ध व त्यांच्या उमेदवारांविरुद्ध आहे. कारण कोणत्याच राजकीय पक्षाने दलितांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराबद्दल विशेष

लक्ष पुरविले नाही. पण याचा परिणाम असा झाला की, मुंबईत दलित पँथर व सर्व हिंदू यांच्यात संघर्ष निर्माण झाला.[११]

**वरळी संघर्ष :-**

जानेवारी १९७४ च्या मध्य मुंबई पोटनिवडणुकीच्या वेळी सवर्ण हिंदू आणि दलित पँथर यांच्यातील संघर्षाचे रुपांतर मोठी दंगल घडवण्यात आले. ५ जानेवारी १९७४ रोजी वरळी आंबेडकर मैदानावर पँथरची जाहीर सभा होती. सभेला कडेकोट पोलीस बंदोबस्त होता. कारण वरळी बी. डी. डी. पार्कच्या परिसरामध्ये दलित पँथर विरोधी घोषणा देणारे, त्याचबरोबर हिंदू देवदेतवांची कुचेष्टा करणाऱ्या राजा ढाले यांचा निषेध करणारे फलक जनसंघ व तत्सम हिंदूत्ववादी पक्षांनी लावले होते. त्यामुळे ही सभा तणावग्रस्त होती. सभेमध्ये पँथरचे नेते राजा ढाले बोलायला उभे राहिल्यावर पोलीस गणवेशातील काही लोक सभा मंचकावर चढले व त्यांनी राजा ढाले यांचेवर लाठी हल्ला केला. सर्वत्र गोंधळ झाला. सभेचे लोक सैरावैरा पळू लागले. या धावणाऱ्या लोकांवर एका बाजूला दगडफेकही झाली. राजा ढालेंचा काहीही अपराध नसताना त्यांना पोलिसांनी जखमी अवस्थेत अटक केली. या पोलीसांच्या जबरदस्तीमुळे वस्तीतील दलित समाज अत्यंत प्रक्षुब्ध झाला आणि त्यामुळे प्रचंड मोठी दंगल घडवण्यात आली. पोलिसांचा अत्याचार आणि हिंदूत्ववादी शक्तीच्या निषेधार्थ १० जानेवारी १९७४ रोजी नायगांव येथून मोर्चा काढण्याचे ठरले. त्याप्रमाणे मोर्चा काढला पण मोर्चाच्या वेळीसुद्धा दंगल घडली. काहींचा बळी गेला. मोर्चातील पँथर नेते मंडळी नामदेव ढसाळ, भाई संगारे, लतिफ खाटीक, ज. वि. पवार इतर अनेक पँथर्सना अटक केली व दोन आठवडे पोलीस कोठडीत ठेवले. या वरळी दंगलीत दलितांवर सवर्ण व पोलीस यंत्रणा यांचेकडून अत्याचार झाले. वरळीच्या दंगलीविषयी प्रा. अरुण कांबळे यांचे मत असे होते की, ‘दलित पँथर’ या चळवळीचे लढाऊ आणि आक्रमक स्वरूप लोकांच्यापुढे आले ते वरळी दंगलीमुळे. वरळी दंगल ही शिवसेना आणि दलित पँथरमध्ये होती. यावेळी डाव्या शक्ती पँथरच्या पाठिशी होत्या. भागवत जाधव आणि रमेश देवसवकर यांच्या आत्मबलिदानातून ही संघटना उभी राहिली. या दंगलीमुळे दलित तरुणांना आपल्या प्रतिकार क्षमतेची जाणीव झाली.[१२]

अशाप्रकारे वरळी दंगलीनंतर दलित पँथर संघर्षाच्या भूमिकेमुळे शहरी व ग्रामीण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. पँथरची ही चळवळ वाढत असताना प्रस्थापितांचा एक भाग बनू इच्छिणाऱ्या रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांना पँथरच्या वाढीमुळे धडकी भरली आणि त्यांनी दलितांच्या भावनांना हात घालीत १९ जानेवारी १९७४ मध्ये एक बैठक घेऊन रिपब्लिकन पक्षाचे ऐक्य झाल्याचे जाहीर केले व या रिपब्लिकन पक्षातील सर्व गटांनी मिळून ऐक्याच्या नावाने मुंबईत चैत्यभूमीवर एक लाखाचा मोर्चा काढून बाबासाहेबांच्या प्रतिमेसमोर ऐक्याची शपथ घेतली.

त्यावेळी दलित पँथरने रिपब्लिकन पक्षाची युवा संघटना म्हणून काम करावे असे जनतेचेही दडपण येवू लागले. यातूनच पुढे दलित पँथरच्या फुटीस सुरुवात झाली.

## दलित पँथरचे विघटन / फूट :-

दलित पँथरचे नेतृत्व नामदेव ढसाळ आणि राजा ढाले ही वाङ्मयीन क्षेत्रातील जोडी करीत होती. दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये दलित पँथर संघर्षाची भूमिका घेत होता. या चळवळीला एक विचारसरणी असावी त्यामुळे ढाले-ढसाळ दोघेही पँथरला एक विशिष्ट विचार देण्याचा प्रयत्न करू लागले.

दलित पँथर ही संघटना बहुसंख्येने महार व बौद्ध तरुणांची आहे. इतर बहिष्कृत जाती-जमातीही या संघटनेत सामावून घेणे महत्त्वाचे आहे. संघटनेचे मनुष्यबळ वाढविल्याशिवाय संसदीय राजकारणात महत्त्व मिळत नाही. केवळ नवबौद्धांची चळवळ उभारल्याने समस्त बहिष्कृत समाजाचे की, केवळ नवबौद्धांचे आपण दलितांचे प्रतिनिधित्व करणार आहोत. तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या सर्व जातीतील दलित असणाऱ्या माणसाच्या मुक्तीविषयी आपली भूमिका काय ? चळवळ म्हणून पँथरला असणाऱ्या माणसांच्या मुक्तीविषयी आपली भूमिका काय ? चळवळ म्हणून पँथरला काही भूमिका घेणे जरुरीचे होते. यामुळेच दलित पँथरमध्येही मार्क्सवाद व आंबेडकरवाद असे दोन विचार प्रवाह निर्माण झाले.[१३]

१९७४ मध्ये नामदेव ढसाळांनी दलित पँथरचा जाहीरनामा लिहीला व प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा कम्युनिष्ट विचारानुवर्ती आहे म्हणून राजा ढाले यांनी जाहीरनाम्यास विरोध केला.

यातूनच ढाले व ढसाळ या दोघांत संघर्ष सुरू झाला. दलित पँथरमध्ये मार्क्सवाद की आंबेडकरवाद हा वैचारिक संघर्ष सुरू झाला.

डॉ. गोपाळ गुरू यांच्या मते पँथरमध्ये फूट पडण्याची प्रामुख्याने दोन कारणे संभवतात, त्यापैकी एक कारण वैचारिक स्वरूपाचे आहे. तर दुसरे कारण हे पँथरच्या नेतृत्वाशी निगडीत आहे. खरे पाहिले तर विचाराच्या पातळीवरील फूट ही पँथरमध्ये सुरुवातीपासूनच होती. परंतु ती फूट उघड उघड अभिव्यक्त झाली नव्हती एवढेच. या फुटीतील एक गट हा आंबेडकरवादाला कमी न लेखता मार्क्सवादाकडे झुकलेला या गटाची भूमिका अशी होती की, भारतीय समाजातील वास्तव समजून घेण्यासाठी जातीयवादीचे विश्लेषण अपुरे पडते. तेव्हा हे वास्तव समजावून घेण्यासाठी जातीबरोबर वर्गाचासुद्धा विचार व्हावयास पाहिजे. त्याप्रमाणे राज्य हे दलितांचे दमन करणारी यंत्रणा असल्यामुळे पँथर काँग्रेसशी युती करणार नाही, अशी ढसाळांची भूमिका होती. दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी वर्गीय पातळीवर संघर्ष उभारावा लागेल अशी या गटाची धारणा होती. म्हणजेच ढसाळांनी पायाला (बेस) तसेच हाताला (सुपर स्ट्रक्चर) परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे मानले होते. परंतु पँथरचे दुसरे प्रसिद्ध नेते राजा ढाले यांची भूमिका मात्र ढसाळांच्या भूमिकेपेक्षा बरीचशी वेगळी व एकांगी होती. ढालेंच्या मते भारतामध्ये दलित मुक्तीच्या दृष्टीने किंवा समाजपरिवर्तनासाठी आर्थिक प्रश्नापेक्षा सांस्कृतिक प्रश्न महत्त्वाचे आहेत. म्हणजे सामाजिक बदलासाठी धर्मांतरासारखे उपायच महत्त्वाचे आहेत.[१४] अशा प्रकारे दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये बुद्ध की मार्क्स, या वैचारिक प्रश्नाला या काळात एक विशिष्ट टोक प्राप्त झाले. वैचारिक संघर्षाबरोबरच आरोप-प्रत्यारोप, व्यक्तीवाद, नेतृत्वाचा हव्यास यामुळे फूट होत असते. पँथरच्या वैचारिक संघर्षाच्या फुटीविषयी व एकूणच फुटीच्याबाबत दलित पँथरचे संस्थापक सदस्य व माजी भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष (प्रकाश आंबेडकर) अर्जुन डांगळे म्हणतात राजा ढालेंचा एकूण अहंकार फुटीस कारणीभूत ठरला. नामदेव ढसाळ लोकांच्या प्रश्नांवर बोलत असे, भाकरी, पाणी, जमीन, बेकारी यावर नामदेव ढसाळ बोलत. मार्क्सवाद व आंबेडकर या वादाविषयी ते पुढे म्हणतात, १९५४ मध्ये पुरंदर स्टेडियम मुंबई येथे बाबासाहेब म्हणाले होते, आम्ही काही वेळा मार्क्स फुले स्वीकारू पण काँग्रेस नको. मार्क्सवाद आमचा शत्रू नाही. ते एक क्रांतिकारी

तत्त्वज्ञान आहे.  आंबेडकरवाद व मार्क्सवाद यात फक्त तपशिलाचा फरक आहे. मार्क्सवाद गरीबांसाठी आहे. हिंदूत्ववादी तत्त्वज्ञान आम्हास अजिबात नको. पण मार्क्सवादी तत्त्वज्ञान आंबेडकरवादाला पूरक वाटते. आंबेडकर आमचा बाप आहे. मार्क्स आमचा काका-चुलता होऊ शकतो.[१५]

पँथरच्या फूटीमध्ये  अंतर्गत वैचारिक नेतृत्वाच्या हव्यासाने जेवढी महत्त्वाची भूमिका बजावली तेवढीच पँथर फुटीमध्ये रिपब्लिकन पक्ष व इतर दलितेतर राजकीय नेते यांची भूमिका महत्त्वाची होती. पुढे नागपूरच्या पँथर अधिवेशनामध्ये नामदेव ढसाळांना राजा ढाले यांनी पँथरमधून काढून टाकले. दलित पँथर चळवळ नावारूपास आलेली असल्याने पँथरचा राजकीय दरारा मोठा होता. सर्वसामान्य पँथर कार्यकर्ते या फुटीमुळे गोंधळात पडले. शिवाय दलित पँथरच्या नावाचा कार्याचा राजकीय सौदेबाजीसाठी उपयोग होऊ लागला. म्हणून राजा ढाले यांनी आपल्या गटाचे नाव बदलण्याचे ठरविले व त्यांनी पँथर बरखास्त करून टाकली. पँथरच्या बरखास्तीनंतर त्यांनी मास मुव्हमेंट नावाची नव्याने संघटना निर्माण केली. पँथरच्या फुटीनंतर आजही नामदेव ढसाळ हे दलित पँथरच्या नावानेच कार्य करीत आहेत.

## दलित पँथरचे पुनरुज्जीवन :-

पुन्हा एकदा पँथरचे पुनरुज्जीवन करण्यात आले. १९७६ मध्ये औरंगाबाद येथे दलित तरुणांची बैठक घेऊन पँथर बरखास्त न करता त्या संघटनेची पुन्हा नव्याने उभारणी करण्यात आली. पँथर संघटीत करण्याचे काम प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, प्रितमकुमार शेगावकर, भाई संगारे यांसारख्या नेत्यांनी केले. महाराष्ट्राबाहेर दलित पँथर अनेक राज्यात पाय रोवून उभी आहे. महाराष्ट्राबाहेर निर्माण झालेली दलित पँथरही भारतीय पातळीवरची संघटना आहे. म्हणून दलित पँथरचे 'भारतीय दलित पँथर' असे नामकरण करण्यात आले. या संघटनेचे पहिले अध्यक्ष प्रा. अरुण कांबळे हे होते. दुसरे गंगाधर गाडे, तिसरे रामदास आठवले. यांनी भारतीय दलित पँथरला भक्कम पायावर संघटीत केल्याचे दिसते. १९७६ च्या औरंगाबादच्या पँथरच्या पुनरुज्जीवनाच्या बैठकीमध्ये प्रा. अरुण कांबळे यांना अध्यक्ष म्हणून निवडल्यावर या बैठकीत पुढील महत्त्वाचे निर्णय घेतले गेले.

१. मुलभूत आणि पायाभूत धंदा याचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे.

२. बौद्धांना केंद्र शासनाच्या सवलती मिळाल्या पाहिजेत.

३. जातीवाद पसरविणारे अभ्यासक्रमातील लेखन वगळले पाहिजे.

४. १० + २ + ३ हा दलितद्रोही अभ्यासक्रम बंद झाला पाहिजे.

५. दलितांवरील अन्याय, अत्याचार बंद झाले पाहिजेत. दलितांवर अन्याय-अत्याचार होऊ नये म्हणून फिरती न्यायालये आणि फिरती पोलीस यंत्रणा राबविली पाहिजे.

६. मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामांतर झाले पाहिजे.[१६]

अशा प्रकारे भारतीय दलित पँथर असे नामकरण करून पुन्हा एकदा नव्याने पँथरची निर्मिती करण्यात आली. पँथरला यामुळे एक नवे वळण व वैचारिक अधिष्ठान देण्याचे काम करण्यात आले. पुढे १९८० साली दिल्लीमध्ये पँथरचे एक अधिवेशन भरविण्यात आले. या अधिवेशनामध्ये अरुण कांबळे यांनी स्पष्टपणे सांगितले की, दलित पँथर चळवळ ही केवळ ढाले, ढसाळ यांनी निर्माण केलेली नसून या देशातील असंख्य दलितांना न्याय मिळण्यासाठी निर्माण झालेली आहे. पुढे ते म्हणाले की, पँथर ही कोणा व्यक्तीची मिरासदारी नसून सर्व दलित वर्गाचा आवाज आहे.[१७]

भारतीय दलित पँथरने सर्व समावेशक अशी भूमिका डोळ्यापुढे ठेवून आपल्या कार्याला सुरुवात केली. पँथर ही फक्त महार वा नवबौद्धांची संघटना न राहता सर्व शोषित, पीडित, पिळलेल्या जाती-जमातींना बरोबर घेवून जाणारी आणि त्यांच्या न्याय-हक्कासाठी लढा देणारी संघटना होती. दलित म्हणजे आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या जो शोषित आहे असा, अशी भूमिका पँथरने घेतली. भारतीय दलित पँथर मार्क्सवाद मानत नाही. त्यांना मार्क्सवाद अपुरा वाटतो. आंबेडकरवाद हाच चळवळीचा प्राण मानून भारतीय दलित पँथरने चळवळ पुढे नेण्याचे काम केले. पँथर मार्क्सवादाचा पुरस्कार करीत नाही. पण सम्यक क्रांतीचा संकल्प हा भारतीय दलित पँथरचा मंत्र आहे. भारतीय दलित पँथरने अमेरिकेतील निग्रोंच्या ब्लॅक पँथरचे प्रतिक घेतले आहे. त्यांनी वेगळ्या पद्धतीने आपली विचारधारा व्यापक अर्थाने मांडली.

## भारतीय या शब्दाची व्याख्या :-

भारतीय दलित पँथरने व्यापक भूमिका घेवून त्यांनी 'भारतीय' या शब्दाची पुढीलप्रमाणे व्याख्या केली. आमच्या भारतीयात भारताचे सर्व नागरिक येतात आणि त्यांची मूले येतात. भारताचा नागरिक मग तो कोणत्याही जातीधर्माचा असो तो आमचा आहे. त्याची मूल आमची आहेत. ती केवळ वरिष्ठ वर्णिय हिंदू नाहीत म्हणून त्यांना छळणारे मूठभर हिंदूत्ववादी आमचे शत्रू. आम्ही भारतावर प्रेम करतो. हिंदूस्थानवर नाही. हिंदूस्थान या शब्दामुळे पाकिस्तान, अफगाणिस्तान, दलितस्थानसारख्या वेगवेगळ्या प्रकृतीचा उदय होतो. हिंदूस्थान हे हिंदू धर्माची राष्ट्रीय धर्म मानू पाहतो. आमचा त्याला सक्त विरोध आहे. डॉ.आंबेडकरांनी दहन केलेली मनुस्मृती आमच्या असंतोषाचे आजही प्रतिक आहे. आम्ही मनुस्मृतीची अनेक वेळा होळी करू. आम्हाला शुद्र ठरविणाऱ्या तमाम धर्मग्रंथांवर आम्ही मुतू. या धर्मशास्त्रांनीच भारत आणि बहिष्कृत भारत अशी सीमारेषा आखून ठेवलेल्या आहेत. त्या आम्ही मिटवू इच्छितो. म्हणूनच विषम तत्त्वज्ञानाचे ग्रंथ आम्ही नष्ट करू इच्छितो. ते पुढे म्हणतात, आमच्या भारतीयत्वात एका सुंदर माणसाचं स्वप्न आहे. आमचे भारतीयत्व माणसाला महान मानणारे आहे. आमचे भारतीयत्व समता, स्वातंत्र्य, न्याय व बंधुतेवर आधारित आहे. या विचाराविरोधी असणाऱ्या तमाम घटकांविरुद्ध आमची लढाई आहे. इतक्या व्यापक अर्थाने आम्ही 'भारतीय' हा शब्द वापरतो. आमच्या भारतीय या शब्दाचा पाया ही या देशातील घटना आहे. भारतीय हा शब्द आम्ही सामाजिक, सांस्कृतिक तितक्याच राजकीय अर्थानेही व्यक्त करीत असतो. आमचे सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जगणे हे भारतीय या शब्दाने व्यक्त होते. म्हणून आम्ही दलित पँथर या संघटनेच्या नावात भारतीय हा शब्द वापरला आहे.[१८]

## दलित कोण ?

''भारतीय दलित पँथरने नामदेव ढसाळांनी जी दलितांची व्याख्या केली आहे तीच स्वीकारलेली आहे. त्याचबरोबर मंडल आयोगात येणाऱ्या सर्व जातीजमातींना दलित या व्याख्येत पँथरने घेतलेले आहे. भारतीय दलित पँथरचे दलित व्याख्या अनुसूचित जातीजमाती, बौद्ध, कष्टकरी, जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी,

जमातीत जो जो दडपला गेला आहे, पिळला गेला आहे, ज्याचे शोषण झाले आहे, तो माणूस आम्हाला आमचा वाटतो. आम्ही दलित या शब्दाची व्याख्या मंडल आयोगात येणाऱ्या सर्व जातींना लावतो. मंडल आयोगातील तमाम समाज हा आमच्या चळवळीचा पाया आहे. त्यांनी फुले-आंबेडकरांची चळवळ समजून घेतली पाहिजे. या देशातील ऐंशी टक्के जनता ही मंडल आयोग रेषेत येते. हीच जनता आमचे कार्यक्षेत्र आहे. या राजकीय दृष्टिकोनातून 'क्रांतीचे चक्र फिरणार आहे' असे आम्हास वाटते.[१९]

जातीव्यवस्थेविरुद्धचा लढा जास्तीत जास्त तीव्र करून संसदीय राजकारण व संसदीय राजकारणाबाहेर रहात भारतीय दलित पँथरने सर्व लढे दिले. १९८० च्या दिल्ली येथील भारतीय दलित पँथरच्या पहिल्याच अधिवेशनात पँथरने आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला व आपले स्वरूप स्पष्ट केले. या जाहीरनाम्यात असे म्हटले आहे की, सदर स्थितीतील सर्व पक्ष भांडवलदारांना पोषक असल्याने, भारतीय दलित पँथर हीच खरी डावी संघटना असून, ती बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय आणि संसदीय आणि लोकशाही या पंचतत्त्वावर आधारित समाजनिर्मितीसाठी कार्य करण्यास वचनबद्ध आहे. या संघटनेचे स्वरूप Social Political राहील.[२०] भारतीय दलित पँथरने समाजकारणाबरोबरच राजकारण हे महत्त्वाचे मानून दलित मुक्तीचे आंदोलन छेडले. महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागाबरोबरच देशातील अनेक राज्यात भारतीय दलित पँथरने आपले संघटन सामर्थ्य वाढवून भारतीय राजकारणावर प्रभाव पाडला. पँथरने विविध आघाड्यावर आपले संघटन उभारले. भारतीय विद्यार्थी संसद, भारतीय कर्मचारी संसद, भारतीय बौद्ध धम्म संसद, भारतीय महिला संसद अशा विविध आघाड्या पँथरने उभ्या करून दलितांच्या परिवर्तनाचे आंदोलन छेडले.

### भारतीय दलित पँथरची चळवळ :-

भारतीय दलित पँथरने सर्वप्रथम १९७७ ला मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे अशी मागणी केली. दि. १८ जुलै, १९७७ ला नामांतराच्या मागणीसाठी मराठवाडा विद्यापीठावर भारतीय दलित पँथर, युवक क्रांती दल, दलित युवक आघाडी, एस. एफ. आय., ऑल इंडिया स्टुडन्टस फेडरेशन, अ. भ. वि. प. आणि इतर काही संघटनांनी मोर्चा

काढला व विद्यापीठाच्या कार्यकारणीला नामांतराचा ठराव करायला लावले. नंतरच्या काळात भा. द. पँथरने नामांतराचा लढा वेळोवेळी तीव्र केला. १९७७ पासून सातत्याने मोर्चे, निदर्शने, घेराव या माध्यमातून पँथरने या प्रश्नाची तीव्रता वाढविली होती.

## मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर का ?

मार्च १९७७ ला महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाला ५० वर्षे पूर्ण होणार होती. त्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाड क्रांती सुवर्ण महोत्सवी समिती स्थापन झाली होती. १ मे १९७७ ला महाड येथे महोत्सव साजरा होणार होता. या ऐतिहासिक क्रांतिकारक घटनेच्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांचे स्मारक व्हावे याच सामाजिक कृतज्ञतापूर्व भावनेतून मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ असे नामांतर व्हावे अशी सूचना पुढे आली. या मागणीचा भा. द. पँथरने पुढाकर घेऊन पुरस्कार केला. तेव्हापासून अत्यंत तीव्रपणे भा.द. पँथर नामांतर प्रश्नावर संघर्ष केला.

मराठवाडा विद्यापीठाचेच नामांतर का या विषयी शांताराम पंदेरे लिहिताना म्हणतात, ‘‘डॉ. आंबेडकरांचा आणि मराठवाड्याचा जवळचा संबंध होता. हैद्राबाद संस्थानात त्यांनी अस्पृश्यांमध्ये जागृती निर्माण केली. त्यातूनच चळवळ उभी राहिली. निजामाविरोधी हैद्राबाद मुक्ती लढ्यातही बाबासाहेबांनी ठाम भूमिका घेतली व आपल्या सर्व अनुयायांना या लढ्यात सहभागी व्हायला सांगितले. १९५० साली बाबासाहेबांनी औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. अविकसित भागात शिक्षण हे विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. या भूमिकेतून दलित-दलितेत्तर विद्यार्थ्यांसाठी हे महाविद्यालय सुरू करण्यात आले. प्रारंभी मिलिंद महाविद्यालयामध्ये १५० पैकी २ विद्यार्थी दलित होते.

‘‘१९५८ ला मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. त्यावेळी दलित विद्यार्थ्यांचे प्रमाण १० ते १२ टक्के होते. १९७५ पर्यंत प्रस्थापित हे प्रमाण २२ ते २५ टक्क्यापर्यंत गेले. औरंगाबादला खानदेश, विदर्भ व मराठवाड्यातील विद्यार्थी शिकायला येऊ लागले. मिलिंद महाविद्यालय परिसर हे दलित विद्यार्थ्यांचे केंद्र बनले. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही दलित जमातीतील (महार,

मांग, चांभार, भंगी) आई वडील आपल्या मुलामुलींना औरंगाबादला मिलिंद महाविद्यालयामध्ये शिकायला पाठवत. आजही तीच परिस्थिती आहे .मिलिंद महाविद्यालय  हे दलित जमातीचे प्रेरणास्थान आहे. मिलिंद परिसर हे दलित पँथर साहित्य, नाट्य आणि सांस्कृतिक चळवळीचे महत्त्वाचे केंद्र बनले आहे.  त्यामुळे महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह सुवर्ण महोत्सवानिमित्त बाबासाहबांच्या अन्य कोणत्याही स्मारकापेक्षा 'शासकीय स्मारकच' योग्य असल्याची भूमिका या दलित तरुणांची होती. या भावनेमागे सामाजिक कृतज्ञतेचा भाग साठलेला होता व तिच भावना डॉ. आंबेडकरांचे नाव देण्यामागे होती. मराठवाडा विद्यापीठ नामांतर संकल्पना याच भावनेतून आली.[२१] एकंदरीत १९७७ ला जेव्हा नामांतर मागणी पुढे आली तेव्हापासून भारतीय दलित पँथर तिचासारखा पाठपुरावा करत आहे.

पुढे पुलोदचे सरकार स्थापन झाल्यावर मुख्यमंत्री शरद पवार यांनी या प्रश्नाची तीव्रता लक्षात घेवून २७ जुलै १९७८ ला महाराष्ट्र कायदे मंडळाच्या दोन्ही सभागृहात नामांतर ठराव मांडला व तो संमतही झाला. नामांतराचा ठराव संमत झाल्यावर मराठवाड्यातील काही ज्येष्ठ अस्मितावाद्यांनी, जातीयवाद्यांनी नामांतरविरोधी वातावरण तयार केले. त्यातून मोठी दंगल घडली, जाळपोळ झाली. मोठ्या प्रमाणावर दलित हत्याकांड झाले. दलित पँथरने अत्यंत समंजसपणे या दंगलीकडे पाहिले व आपले आंदोलन चालूच ठेवले.

६ डिसेंबर १९७९ ला नामांतराच्या मागणीसाठी दलित पँथरने सत्याग्रह केला. नामांतरवादी कृती समिती झाली. भा. द. पँथर यांनी सत्याग्रह केला. प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी नागपूर ते औरंगाबाद लाँग मार्च काढून नामांतराच्या बाजूने जनमत संघटीत करण्याचा प्रयत्न केला. तसेच मुंबई, पुणे, सातारा, नाशिक येथूनही लाँगमार्च निघाले. एकंदरीत नामांतराच्या प्रश्नावर पँथरने सर्वांना बरोबर घेवून लोकशाही सत्याग्रही मार्गाने माणसाच्या मत परिवर्तनार्थ संघर्ष केला.

नामांतरवादी चळवळीतील साताऱ्यातील नेते व दलित साहित्यिक पार्थ पोळके नामांतराच्या पँथरच्या भूमिकेविषयी म्हणतात, नामांतराच्या निमित्ताने झालेली दलित पँथरसारख्या सर्वात प्रभावी गटाची आणि समाजवादी कम्युनिष्ठांची एकजूट समतेच्या चळवळीवर दीर्घकाळ परिणाम करणारी ठरणार होती.[२२]

एकंदरीत भा. द. पँथरने आपल्या विविध आघाड्यावर नामांतर ठरावाची अंमलबजावणी व्हावी यासाठी अनेकांशी व दीर्घकाळ लढा दिला. प्रत्येक १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, ६ डिसेंबर, १४ एप्रिल या तारखांना तालुका, जिल्हा व मंत्रालयावर मार्चे काढले.

**मंडल आयोगासाठी लढा :-**

नामांतराच्या लढ्याप्रमाणे भारतीय दलित पँथरने सर्वसमावेशक भूमिका घेऊन मंडल आयोगाच्या प्रश्नावर लढा दिला. दलित कोण ? या व्याख्येमध्ये भा. द. पँथरने मंडल आयोगात येणाऱ्या सर्व जाती जमाती या आमच्या चळवळीचा पाया आहे. हे जाहीर केल्याप्रमाणे त्यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी या प्रश्नाकडे पाहिले. नामांतराच्या तणावग्रस्त वातावरणात मंडल आयोग जाहीर झाल्यावर नामांतर आणि मंडल आयोग हे दोन्ही लढे पँथरने निकराने लढविले.

नामांतर, मंडल आयोग याचबरोबर १९८७-८८ च्या सुमारास रिडल्सच्या प्रश्नावर सुद्धा दलित पँथरने संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन केले. रिडल्सच्या प्रश्नावर २४ जानेवारी १९८८ मध्ये रामदास आठवले यांचे नेतृत्वाखाली पुणे येथे दलित एकता परिषद घेण्यात आली. त्याचबरोबर सातारा (कराड) येथे दलित ऐक्य परिषद घेतली. मुंबई येथेही परिषद घेऊन आंबेडकरी जनतेला एकत्र करण्याचा प्रयत्न केला.

दलितांच्या सर्वांगिण प्रगतीबरोबरच त्यांच्या सर्व प्रश्नांवर लढा देण्याची भूमिका पँथरने घेतली. ढाले-ढसाळ प्रणित पँथरची जहाल विचारसरणी न ठेवता सर्व व्यापक असे लढे उभे केले. शांतता, सामंजस्य, देशाभिमान जागृत करून संसदीय मार्गाने लढे दिले.

१९८० नंतर भारतीय राजकारणात महत्त्वाचे बदल झाले. तसेच फुले-आंबेडकरांचा वारसा सांगणाऱ्या दलित चळवळीतही मोठे बदल झाले. फुले-आंबेडकरांच्या विचारांची परंपरा घेऊन कांशीराम यांचा बहुजन समाज पक्ष उत्तरेकडे प्रभावी झाला. १९८५-८८ पर्यंत (भारतीय दलित पँथर) लढावू भूमिका घेऊन रामदास आठवलेंच्या नेतृत्वाखाली दलित चळवळ खेड्यापाड्यात तग धरून राहिली. नंतर १९८९ मध्ये जनतेच्या भावनिकतेने दलित गटाचे ऐक्य झाले. रामदास आठवले यांनी भारतीय दलित पँथर बरखास्त केली व ते दलित ऐक्य प्रक्रियेत सहभागी झाले.

पुन्हा रिपब्लिकन युतीच्या राजकारणामुळे पुन्हा ऐक्य दुभंगले. आठवले यांनी काँग्रेसशी युती केली तर भारीपचे प्रकाश आंबेडकर यांनी जनता दल आघाडीशी युती केली. हिंदुत्ववादी पक्षांना विरोध करत रामदास आठवले काँग्रेसबरोबर राहिले व काँग्रेसने त्यांना संमिश्र स्थान दिले. भारतीय दलित पँथरचे नेते रामदास आठवले यांना काँग्रेसने समाजकल्याण मंत्री केले व दलित नेतृत्वाचा गोंधळ झाला.

**दलित पँथरचे राजकीय डावपेचाचे स्वरूप :-** दलित पँथरने १९७२ पासून दलित अन्याय-अत्याचाराला विरोध, भूमिहीनांचा सत्याग्रह, शेतकऱ्यांचे प्रश्न, झोपडपट्टीयांचे प्रश्न नामांतर, मंडल आयोग अंमलबजावणी, दलित विद्यार्थी शिष्यवृत्ती, रिडल्य इ. विविध पातळ्यांवर संघर्षाची भूमिका घेऊन लढे उभे केले. पण खऱ्या अर्थाने पहायला गेल्यास दलिताचा लढा हा सामाजिक व आर्थिक असा आहे. तसाच तो राजकीय लढा सुद्धा आहे. सामाजिक प्रश्नाबरोबरच दलित पँथरने महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणातही महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुरुवातीच्या काळातील चळवळ ही नंतरच्या काळात राजकारणात परावर्तित होत असताना दिसते. दलित पँथरसुद्धा याला अपवाद नाही.

दलित पँथरनेसामाजिक दृष्टी ठेवून राजकीय भूमिका घेतली ती फक्त दलितांच्या अधिकार व हक्कांच्या संरक्षणासाठीच दलित पँथरने आपले राजकीय डावपेच आखत असताना तत्कालीन काँग्रेस, जनता पक्ष व हिंदुत्ववादी पक्षांना विरोध केला आहे.

दलित पँथरच्या स्थापनेनंतर नामदेव ढसाळांनी जो पँथरचा जाहीरनामा मांडला त्यात जर सामाजिक क्रांती होऊन दलितांची मने पेटली तरच राजकीय क्रांती होईल असे सुचविले आहे. दलितांची, श्रमिकांची सत्ता प्रस्थापित व्हावी व देशातील जातीयवाद नष्ट व्हावा हीच भूमिका सुरूवातीच्या काळात पँथरने घेतली. १९७४ च्या मुंबईच्या लोकसभा पोटनिवडणुकीवेळी पँथरने जी बहिष्काराची भूमिका घेतली त्यामुळे जनसंघ व काँग्रेसचे उमेदवार पराभूत झाले. विरोधी कम्युनिष्ट पक्षाचा उमेदवार निवडून आला होता. पँथरच्या दृष्टीने काँग्रेस व इतर जनसंघासारखे सर्व पक्ष दलितांच्या हिताचा विचार करीत नाहीत. तर ते जातीयवादी आहेत. पँथर चळवळीच्या

इतिहासातील आणखी महत्त्वाच्या घडामोडींपैकी एक म्हणजे जॉर्ज फर्नांडीस यांच्या नेतृत्वाखाली १९७४ मध्ये रेल्वे कामगारांचा देशव्यापी संप झाला. यासंपाला नामदेव ढसाळ पँथरने पाठिंबा दिला होता. त्यामुळे पँथरची इतर पुरोगामी चळवळीच्या दृष्टीने विश्वासार्हता वाढली गेली.[२३] दलित पँथरने जनसंघ, शिवसेनासारख्या हिंदुत्ववादी संस्कृतीत धर्माभिमान पक्ष संघटनांना पाठिंबा व सहकार्य केले नाही. तर इतर समविचारी डाव्या पक्षांना पाठींबा देऊन आपला निधर्मीपणा स्पष्ट केला. दलित पँथरच्या राजकीय डावपेचाचा विचार करता टी. एम. कांबळे यांचे मत महत्त्वाचे वाटते. त्यांच्या मते, १९७८ साली विरोधी पक्षांना पाठिंबा दिला. १९८० साली जनता पक्षातील संघासारख्या जातीयवादी प्रवृत्तींना पराभूत करण्यासाठी इंदिरा गांधींना पाठिंबा दिला. आता मात्र भारतीय दलित पँथर स्वत:च्या बळावर निवडणूका लढविणे हे राजकीय निर्णय आम्ही परिस्थितीनुसार घेत गेलो. काँग्रेस हा निश्चितच भांडवलदारांचा पक्ष आहे. पण जनता पक्ष सत्तेत जावून जातीयवादी संघ फोफावेल त्यांचा पराभव करण्यासाठी काँग्रेसला पाठिंबा द्यावा लागला.[२४]

दलित पँथरची राजकीय भूमिका ही दलितांच्या हिताचीच आहे. संसदीय लोकशाहीवर दलित पँथरने विश्वास ठेवून देशातील धर्म, जातीयवाद नष्ट करण्यासाठी १९७७ नंतर राजकारणात प्रवेश केला. लोकसभा/विधानसभेमध्ये जरी पँथरला यश आले नाही तरी नगरपालिका व महानगरपालिकांच्या राजकारणात पँथर आपली शक्ती वाढवू शकला. १९८० नंतर भारतीय राजकारणात भा. ज. पा., शिवसेनासारख्या हिंदुत्ववादी पक्षांना पँथर थोपवू शकला आहे.

नामांतरासारख्या भावनिक प्रश्नावर लढा देत असताना दलितांची अस्मिता आणि आत्मसन्मान राजकीय डावपेचात दाबला जाणार नाही याची दक्षता घेतीलच. त्याचबरोबर राष्ट्रवादी भूमिका घेऊनच दलित पँथरने लोकशाहीच्या मार्गाने आपली राजकीय वाटचाल चालू ठेवली.

## दलित पँथरची दलित मुक्तीची संकल्पना :-

दलित पँथरची निर्मिती रिपब्लिकन पक्षाच्या नाकर्तेपणापासून झाली. दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी या चळवळीचा उदय झाला. पँथरने आपल्या सुरुवातीच्या काळात माणसांची सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्तता करण्यासाठी लढे उभे केले.

स्वातंत्र्यानंतर व बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर जेवढे दलित मुक्तीसाठी लढे झाले नाहीत, तेवढे प्रयत्न पँथरच्या निर्मितीनंतर झाले. पँथरने दबलेल्या माणसाला नेहमीच आपले मानले आणि भारतीय समाजव्यवस्थेत दबलेल्या माणसांच्या मुक्तीचे आंदोलन छेडले. वरच्या वर्गाविषयी जबरदस्त चीड आणि खालच्या वर्गाषियी आत्मीयतेची भावना ठेवून पँथरने आंदोलने केली.

अत्याचाराच्या विरोधात टोल्यास टोला ही पँथरची भूमिका होती. सरकार विरुद्ध संघर्षाचे धोरण होतेच पण सवर्ण आणि जातीव्यवस्थेविरुद्ध महायुद्ध पुकारण्याचा नारा होता. पँथरला अल्पश: बदल अपेक्षित नव्हता. पँथरच्या घटनेमध्ये असे स्पष्ट करण्यात आले होते की आमचा मुक्ती लढा सर्वंकष क्रांती इच्छितो. अंशत: बदल अशक्य आहे व तो आम्हाला नको. संपूर्ण क्रांतीकारकच बदल आम्हाला हवा आहे. सामाजिक अवमानातून बाहेर पडण्याबरोबरच आम्हाला आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक केंद्रस्थानी आमचे प्रभुत्व स्थापन करावे लागेल. आम्हाला राज्यसत्ता पाहिजे, आमचे लक्ष्य केवळ व्यक्ती नसून व्यवस्था आहे. त्याच परिवर्तनाने किंवा शिक्षणातील उदारमतवादाने आमच्यावरील अन्याय व आमचे शोषण थांबणार नाही. आम्ही वर निर्देशित केलेले क्रांतिकारक समूह सर्व दलित जागे करून संघटीत करू व हे क्रांतिकारक समूह वर निर्देशित केलेले आमचे शत्रू समूह यांच्या संघर्षातूनच क्रांतीची लाट येईल, असा आमच विश्वास आहे.[२५] पँथरने प्रथमपासून संघर्षाची भूमिका घेतली. ही भूमिका व्यापक स्वरूपाची होती.

पँथरने दलित मुक्तीचे आंदोलन छेडताना वर्ण व्यवस्थेबरोबर जातीव्यवस्थेचा नाश महत्त्वाचा मानला व जनआंदोलने उभी करून दलितांच्या राजकारणाला एक लढाऊ स्वरूप प्राप्त करून दिले. पँथरच्या मुक्ती लढ्यामध्ये वर्ण, वर्ग, आदी जातव्यवस्था मांडणारे सर्व पक्ष व डाव्या शक्तींना सुद्धा सामावून घेण्याची निती वापरण्यात आली. याच दरम्यान दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये मार्क्सवाद व आंबेडकरवाद यावर वाद गाजत होता. यातून पँथरची फूट झाली असली तरी जातीय आणि वर्गीय आधारावर राजकीय संघर्ष उभारून सर्व गरीबांना एकत्र आणून समाजवादी क्रांती करू इच्छिणारा एक गट होता. तर आंबेडकरवादातच सम्यक क्रांतीचे तत्त्वज्ञान समाविष्ट झाले आहे, असा दुसरा गट मानत होता. बुद्ध की मार्क्स या विचारभिन्नतेत काही काळ

पँथरची चळवळ मागे पडली. परंतु १९७६ मध्ये सर्वसमावेशक व व्यापक भूमिका घेऊन भारतीय दलित पँथर म्हणून पँथरचे पुररुज्जीवन करण्यात आले.

संसदीय राजकारणात सहभागी होऊन व संसदीय व्यवस्थेच्या बाहेर राहून लोकशाहीच्या सामंजस्याच्या मार्गाने भारतीय मंडल आयोग, राजकीय हक्कासाठी निवडणुकांचे राजकारण करून दलित पँथरने १९८० नंतर देशात व महाराष्ट्रात प्रभाव पाडला. शिवसेना, भाजपा सारख्या पक्षांना दलित पँथरने विरोध केला. काँग्रेस व इतर समविचारी पक्षाच्या सहाय्याने जातीयवादी शक्तींना मूठमाती देण्यात पँथर अग्रेसर राहिली. दलित मुक्तीच्या इतिहासात दलित समाजामध्ये लढावू वृत्ती जागे करण्याचे महत्त्वाचे काम दलित पँथरने केले.

## ५.२ दलितांच्या चळवळी - भारतीय रिपब्लिकन पक्ष (१९७२-२००२) :-

गेल्या पंचवीस तीस वर्षातील दलित समाजाचे राजकारण हे फक्त दलित ऐक्याच्या भावनेवर आणि डॉ. आंबेडकरांच्या नावाने चाललेले दिसते. बाबासाहेबांच्या निधनानंतर निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या आत्मघातक फुटीच्या राजकारणामुळे आणि नेत्यांच्या संधीसाधू वृत्तीमुळे वेळोवेळी दलितांची संघटीत शक्ती कमी होत गेली. त्यामुळे दलित समाज बेचैन झाला. प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरुद्ध आवाज उठविण्यासाठी व दलितांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी १९७२ मध्ये दलित पँथरने अत्यंत आक्रमकपणे दलितांच्या विरुद्धच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडली. परंतु काही दिवसातच दलित पँथर ही विघटीत होत गेली. पुढे १९७६ मध्ये प्रा.अरुण कांबळे यांच्या नेतृत्वाखाली दलित पँथरचे भारतीय दलित पँथर असे नामकरण करून पुर्नजीवन करण्यात आले.

१९७६ ते १९८६ या काळात दलित चळवळीत दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. पैकी एक दलित पँथरचे पुर्नजीवन आणि दुसरी प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 'सम्यक समाज आंदोलन' निर्मिती या होय. नव्या दलित पँथरने मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर हा एक कलमी कार्यक्रम महाराष्ट्रात राबवून एक वादळ उभे केले. परंतु कोणतीही सामाजिक व राजकीय चळवळ ही भावनात्मक प्रश्नावर सदासर्वकाळ उभी करता येत नसते. भावनात्मक प्रश्न

फक्त चळवळ जिवंत ठेवण्याचे काम करीत असतो. पण चळवळीला भक्कम असा टिकावूपणा भावनात्मक प्रश्न देवू शकत नाही. चळवळ सामाजिक वा राजकीय त्याचबरोबर आर्थिक पायावर उभी करावी लागते. पण भावनिक प्रश्नात गुंतल्यामुळे भारतीय दलित पँथर वर पर्यायाने दलित समाजावर काही मर्यादाही आल्या.

**सम्यक समाज आंदोलन :-**

डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर दलित समाजाची विस्कटलेली घडी व्यवस्थित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू (भैय्यासाहेब आंबेडकरांचे पुत्र) प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकरांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला १९८० नंतर सुरुवात केली. 'सम्यक समाज आंदोलन' या नावाची संघटना उभी करून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. सम्यक समाज आंदोलनाच्या निर्मितीपूर्वी त्यांनी दलित समाजातील सर्व नेत्यांना एकत्र करून चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. त्यादृष्टीने ११-१२ डिसेंबर १९८२ रोजी पुणे येथे महाराष्ट्रातील विविध संघटनांची व प्रमुख कार्यकर्त्यांची बैठकही झाली. या बैठकीत बाळासाहेब आंबेडकर यांनी नामांतरासहित इतरही प्रश्न घेवून त्यावर चळवळ उभारून नेतृत्व करावे असे ठरले.

प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली असे ठरले. सम्यक समाज आंदोलन हे नाव संघटनेचे घेतले. 'सम्यक ' याचा अर्थ योग्य मार्गाने जाणारे, विवेकाने विचार करणारे.[२६] भारतीय दलित पँथरपेक्षा सम्यक समाज आंदोलन दलितांच्या प्रश्नाकडे वास्तववादी भूमिकेतून पहात होते. दलितांच्या सामाजिक व आर्थिक मागण्या घेऊन जनआंदोलन छेडले. प्रकाश आंबेडकरांसारख्या बाबासाहेबांच्या वंशजाभोवती जनता संघटीत होऊ लागली. त्यामुळे या नव्या नेतृत्वाला 'मास ' प्राप्त झाला. सम्यक समाज आंदोलन या संघटनेच्या वतीने २ मार्च ते ८ मार्च १९८३ ला नाशिक ते मुंबई असा पायी इशारा मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यामध्ये प्रकाश आंबेडकरांच्या पाठीशी जयदेव गायकवाड, एल. डी. भोसले, मुरलीधर जाधव यांच्यासारखे निष्ठावंत, प्रामाणिक व कष्टाळू कार्यकर्ते उभे राहिले. प्रकाश आंबेडकरांचे नेतृत्वामुळे भारतीय बौद्ध सभा, समता सैनिक दल व संपूर्ण दलित समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. काळाराम मंदिर सत्याग्रह स्मृतिदिनाच्या

दिवशी २ मार्च १९८३ रोजी नाशिक येथून निघून ८ मार्च रोजी मुंबईत पोहोचला. या प्रचंड मोर्चाविषयी अर्जुन डांगळे म्हणतात, इशारा मोर्चाने भिमशक्ती संघटीत झाली आहे. लाचार, स्वार्थी, सौदेबाजीच्या राजकारणाला दणके बसले आहेत. शासन व प्रतिगामी संघटना जाळे टाकायला बघत आहेत. आता काही झाले तरी माघार नाही. हा सम्यक समाज आंदोलनाचा निर्धार आहे. कारण बाबासाहेबांनी जी चळवळ केली, जे तत्त्वज्ञान सांगितले, ज्या संघटना उभ्या केल्या त्या जिवंत ठेवण्याचा आणि पुढे नेण्याचा आंदोलनचा निर्धार आहे. भारतीय बौद्ध महासभा जोमाने कार्य करीत आहे. समता सैनिक दल जिल्ह्या-जिल्ह्यातून उफाळून येत असून आकार घेत आहे. परंतु बाबासाहेबांचे राजकीय तत्त्वज्ञान सांगणारा, त्यांनी स्थापन केलेला रिपब्लिकन पक्ष मात्र छिन्नविछिन्न आणि गलितगात्र अशा अवस्थेत आहे. स्वार्थी, अहंकारी आणि चळवळीचे भान नसलेल्या प्रवृत्तींनी हा पक्ष वाटून घेतला आणि स्वत:चे गट स्थापन केले. बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या रिपब्लिकन पक्षाची घडी व्यवस्थित करून ती एकसंघ करून त्याला अधिक गतिशील करून बाबासाहेबांचे तत्त्वज्ञान तळागाळापर्यंत पोहोचवून तिथल्या माणसांची अस्मिता जागृत करून एक विराट आणि निर्णाय आंदोलन उघडण्याचा आंदोलकांचा निर्धार आहे. सम्यक समाज आंदोलन हे भविष्यात होणाऱ्या रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीची नांदी आहे.[२७] अशा प्रकारे सम्यक समाज आंदोलनाने नंतरच्या काळात नवा रिपब्लिकन पक्ष स्थापन करून जुन्या रिपब्लिकन पक्षाच्या स्पर्धात विजयी होण्यासाठी आपले कार्य सुरू केले. प्रकाश आंबेडकरांचे गतिमान व चारित्र्यसंपन्न व नितीमान तसेच व्यापक भूमिका घेणारे नेतृत्व पुन्हा एकदा दलित समाजाला मिळाले. सम्यक समाज आंदोलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दलित समाजाला व दलित चळवळीला एक नवे तंत्र निर्माण करून देण्याचा प्रयत्न प्रकाश आंबेडकरांनी केला. सर्व दलितांना एकत्रित करून त्यांच्या संघटीत शक्तीला राजकीय सत्ता प्राप्त करून देण्याचाही त्यांनी प्रयत्न केला.

**भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापना : -**

प्रकाश आंबेडकरांनी सम्यक समाज आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. दलितांच्या चळवळीला एक वास्तववादी दिशा देण्याचे काम सम्यक

समाज आंदोलनाच्या माध्यमातून आपल्या सार्वजनिक जीवनास सुरूवात केली. दलितांच्या चळवळीला एक वास्तववादी दिशा देण्याचे काम सम्यक आंदोलनाने केले.[२८] प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९८३ मध्ये काढलेला नाशिक ते मुंबई अस पायी इशारा मोर्चा हा दलितांच्या जागृतीबरोबरच नामांतर, भूमिहीनांना जमीन देणे इ. मागण्यासाठी होता. म्हणजेच फक्त दलितांची चळवळ भावनात्मक प्रश्नावर उभी न ठेवला त्यांनी वास्तववादी दृष्‌टीने दलितांच्या मुक्तीचा विचार केलेला दिसतो. पुढे या सम्यक समाज आंदोलनाचे रूपांतर रिपब्लिकन पक्ष स्थापनेमध्ये झाले.

प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या पूर्वबांधणीची घोषणा २६ नोव्हेंबर १९८३ रोजी मुंबईत विविध गटांच्या व संघटनांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात करण्यात आली आणि पुनश्च आंबेडकरी जनतेमध्ये नवा जोम निर्माण झाला. प्रकाश आंबेडकरांच्या रूपाने एक चांगले नेतृत्व दलित समाजाला मिळाले. आंबेडकरी चळवळीच्या विकासातील एक तिसरा टप्पा म्हणून रिपब्लिकन पक्षाच्या घोषणाकडे पाहता येईल.[२९]

रिपब्लिकन पक्षाच्या घोषणेनंतर दि. ५ व ६ मे १९८४ रोजी पुणे येथे भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन घेतले गेले. या अधिवेशनामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेतील एक लढाऊ स्वाभिमानी बाण्याचा पर्यायी पक्ष उभा करावयाच्या पुर्नबांधणीचा सांगोपांग विचार करण्यात आला. त्याचबरोबर हा पक्ष फक्त एका जातीतच न ठेवता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षीत असणारा सर्व जातींमधील समविचारी लोक सामावून घेणारा रिपब्लिकन पक्ष उभा करण्याचे ठरविण्यात आले. भारतीय संसदीय राजकारणाचा विचार करता एक जातीय पक्ष टिकाव धरू शकत नाही. म्हणून सर्व शोषितांना बरोबर घेण्यासाठी रिपब्लिकन पक्षाची निर्मिती करण्यात आली. या पुर्नरचित रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपद मातोश्री मीराबाई आंबेडकर तथा जीजी यांच्याकडे दिले गेले. तर महाराष्ट्राच्या जनरल सेक्रेटरी म्हणून डॉ. नीलम गोऱ्हे या ब्राह्मण समाजातील कार्यकर्तीची निवड केली गेली. यावरून हा पक्ष सर्व जातीजमातीला बरोबर घेवून जाणार असल्याचे दिसते.

रिपब्लिकन पक्षाची पुर्नबांधणी करण्यासाठी या लेखात अर्जुन डांगळे लिहितात, भावनात्मक जातीय किंवा धार्मिक द्वेषावर आधारित अशा प्रश्नावर उग्र चळवळी करणे किंवा तो पक्षाचा पुर्नरचित कार्यक्रम करणे हे पुर्नरस्थित पक्षाला नामंजूर आहे. समग्र दलित शोषितांच्या जीवन मरणाच्या प्रश्नांना केंद्रबिंदू मानून चळवळी करणे आणि लोकशाही समाजवादाच्या दिशेने वाटचाल करणे हे या पक्षाला अभिप्रेत आहे. ''जमिनीचे राष्ट्रीयीकरण करावे यासाठी पुणे अधिवेशनात महाराष्ट्रव्यापी जेलभरो सत्याग्रह करण्याचा ठरावकरण्यात आला आहे.[३०] अशाप्रकारे एका मोठ्या जिद्दीने, प्रामाणिकपणे दलित शोषितांच्या मूलभूत प्रश्नावर लढा देण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्षाची पुर्नबांधणी करण्यासाठी प्रकाश आंबेडकर व त्यांचे सहकारी उभे राहिले.

## भारिपची विचारसरणी :-

१९८४ मध्ये पुणे येथील अधिवेशनामध्ये भारिपची भूमिका काय असावी याविषयी चर्चा करण्यात आली. आजपर्यंतची दलित मुक्तीची चळवळ ही फक्त भावनेवर आधारित होती. एक नवी दिशा व वास्तववादी दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न केला गेला. या पक्षाला महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या अत्यंत समृद्ध अशा विचारांचा वारसा आहे. हा पक्ष दुर्लक्षित आणि सामाजिक आर्थिक कारणाने वंचित असणाऱ्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. सामाजिक आणि आर्थिक विषमतेवर आधारित असलेली अन्यायी समाजरचना बदलण्याची बांधिलकी या पक्षाने स्वीकारलेली आहे. काँग्रेस पक्षाशी कुठल्याही प्रकारचा संबंध न ठेवता या पक्षाने आपली स्वतंत्र अशी विचारसरणी मांडलेली आहे. १९८४ च्या पुणे अधिवेशनामध्ये काही महत्त्वपूर्ण ठराव मांडले. या ठरावावरून पक्षाची विचारसरणी स्पष्ट होते.

## भारिपच्या अधिवेशनातील ठराव (१९८४) :-

**ठराव क्र. १** - रिपब्लिकन पक्षाचे पुर्नबांधणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा खराखुरा रिपब्लिकन पक्ष उभारण्याचा आम्ही निर्धार करीत आहोत. या देशातील राजकारणावर सरंजामशाही व श्रीमंताची घट्ट पकड आहे व मतांचे सौदे करून लोकशाहीचा

डोलारा उभारण्याचा प्रयत्न चालू आहे. दलित श्रमिकांना काहीही राजकीय अस्तित्व नाही. या बहुसंख्याक शोषितांची सत्ता प्रस्थापण्यासाठी आम्ही रिपब्लिकन पक्ष पुर्नबांधणी करीत आहोत. सध्याचे एकजातीय राजकारण ठोकरून आम्ही सर्वसमावेशक कृतीने सर्व तळागाळातील समाज आर्थिकदृष्ट्या दुर्बल समूहांना बरोबर घेऊ, केवळ भाषणाचा भपका न करता विचार व कृतीने आम्ही समस्त जनतेचे राजकारण करून लवकरच एक मुख्य राजकीय प्रवाह होऊ. तुकड्यांचे व लाचारीचे राजकारण न करता पोलादी वृत्तीने संपूर्ण समाज ताब्यात घेण्यासाठी लढू. या देशातील सर्व राष्ट्रीय प्रश्नांकडे देश हिताचे दृष्टीने पाहू व या देशाचे नेतृत्व करू असा आम्ही निर्धार करतो.

**ठराव क्र. २ – राष्ट्रीयीकरण** :- सध्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर मूठभर धनदांडगे जमीनदार भांडवलदारांची पकड आहे. एकीकडे मूठभर प्रचंड श्रीमंत होत आहेत तर बहुसंख्याक दारिद्रयाच्या खाईत लोटले जात आहेत. खेड्यात जमीनदार व भूमिहीन दलित शेतमजूरांतील संघर्ष दिवसेंदविस वाढताहेत. जमीनदारीतून जातीयता ही पोसली जात आहे. खाजगी क्षेत्रात प्रचंड स्वार्थ बोकाळला आहे. शेकडो कारखान्यातील कलहापोटी उत्पादनाला खीळ बसत आहे. कामगारांच्या जीवनाशी जुगार खेळला जात आहे. या दोन्ही क्षेत्रातील अमानुष संघर्ष पाहता या संदर्भात नवीन दृष्टीने पाहिले पाहिजे. व दलित भूमिहीन शेतमजूर, कामगार, कष्टकऱ्यांचे शोषण रोखण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादलेली राज्य-समाजवादाची संकल्पना हाच एकमेव तोडगा आहे, असे आम्हास वाटते. जमीन व कारखान्यातील खाजगी मालकी हक्क नष्ट करून त्यावर जनता तथा शासनाची मालकी निर्माण केली तरच ही उद्‌धवस्त होणारी अर्थव्यवस्था रोखली जाईल आणि म्हणूनच आम्ही असा निर्धार करतो की, जमीनीचे राष्ट्रीयकरण करण्यासाठी यापुढे रिपब्लिकन पक्ष चळवळ हातात घेईल व मे च्या २१ तारखेपासून अकोला जिल्ह्यातून चळवळीला सुरुवात करून ही मागणी देशव्यापी करू. कारखान्यातील कामगारांच्या संघटना करू व शोषणरहित उत्पादन व्यवस्था निर्माण करण्यासाठी यापुढे निर्धाराने लढू. उत्पादनातील ऐषआरामी, सुखासीन, अनावश्यक वस्तुंच्या उत्पादनाऐवजी समाजाच्या मुलभूल गरजा भागविणारे उत्पादन व अल्प किंमतीत व योग्य वितरण व्यवस्था यांचा आग्रह धरू.

अर्थव्यवस्थेतील बोकाळलेली लाचलुचपत नष्ट करण्यासाठी जनआंदोलन करू आणि देशातील न्याय तथा समतेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी कायदे करू.

**ठराव क्र. ३ – निवडणूक पद्धतीतील बदल :-** भारतामध्ये दरडोई मत आणि एक उमेदवार ही पद्धत स्वीकारण्यात आलेली आहे. भारतीय समाजरचनेतील दोन घटक जात आणि धर्मसत्ता यांनी निवडणूक पद्धतीसही वेठीस धरले आहे. परिणामी हिंसा, पैसा, भ्रष्टाचार यांनी सर्वसामान्य माणसाला राजकारणातील खऱ्या निर्णय प्रक्रियेतून वंचित ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न चालविलेला आहे. ही कोंडी फोडण्याच्या दृष्टीने मतदारांना पक्षांचे पर्याय समोर असावेत. प्रत्येक पक्षाला जितकी टक्के मते मिळतील तितका वाटा सर्व लोकशाही निर्णय संख्या (ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा) मध्ये असावा. या पक्षाच्या निवडणूकीच्या खर्चाची जबाबदारी शासनाकडे असावी.

**ठराव क्र. ४ – स्त्री-पुरुष विषमता :-** भारतीय समाजव्यवस्था सरंजामी भांडवलशाही संयुक्त स्वरुपाची आहे. परंपरागत चातुवर्ण्याच्या कल्पनांचा प्रगत समाज माणसावर व संपूर्ण व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात पगडा आहे. शुद्रातिशुद्रांसाठी असणारे समाजवादी समाज नियम आणि स्त्रियांवर लादल्या गेलेल्या रूढी, बंधने, अत्याचार ही जन्माधिष्ठित उच्च-नीच्चतेच्या नियमानुसार निर्मिलेल्या व्यवस्थेतील शोषणाचीच दोन अंगे आहे.

समाजातील प्रत्येक मनुष्यास मात्र संपूर्ण विकसाची संधी मिळाली पाहिजे असे आम्ही मानतो. त्या दृष्टीने स्त्री-पुरुष विषमतेच्या परिणामी स्त्रीला आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रात जे दुय्यम स्थान मिळाले आहे, ते बदलले गेले पाहिजे आणि समाजव्यवस्थेतील हे दुय्यम स्थान बदलण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न झाले पाहिजेत. प्रत्येक माणसाचे व्यक्तीगत जीवन, कुटूंब, गावे आणि समाजातील सर्व निर्णय प्रक्रियेशी आर्थिक, राजकीय, सामाजिक संस्था यात या संदर्भात विशेष जागृती आणि संघर्ष व लोक संघटनाची आवश्यकता आहे असे आम्ही आग्रहपूर्वक नमूद करतो.

दलित, शेतमजूर, कामगार, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील स्त्रियांवरील अन्याय-अत्याचाराची शासन संस्था विशेष दखल घेत नाहीत. त्याबाबत आम्ही निषेध करतो. केवळ उपभोगाची वस्तू म्हणून तिला माणूस म्हणून जगण्याची संधी न देणाऱ्या पुरुषप्रधान प्रवृत्तीचाही आम्ही निषेध करतो. विशिष्ट स्त्रियांवरील दडपशाही, तलाक, देवदासी प्रथा, सतीप्रथांच्या पुनरुज्जीवनाचे व उदात्तीकरणाचे प्रयत्न याबाबत तीव्र चिंता व्यक्त करून या विरोधी विशेष प्रबोधन करण्याचा निर्णय घेत आहोत.

**ठराव क्र. ५ – मोफत शिक्षण :-** भारतातील अर्थव्यवस्था हातात केंद्रित करणारे भांडवलदार, जमीनदार, उदारमतवादी विचारांचा बुरखा पांघरून समाजाचा विकास करण्याचा आवाज उठवत आहेत. या विकासाची फुले समाजातील बहुसंख्य पिळल्या गेलेल्यांच्या वाट्याला येत नाहीत तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम गटांकडे कायदे केंद्रिभूत झाले आहेत. परिणामी प्रत्येक विकासास आवश्यक योनजा उदा. आरोग्य शिक्षण अंतिमत: अत्यंत परिणामकारक झाले आहे, असे दिसते. चातुवर्ण्य व्यवस्थाच काही प्रमाणात वेगळे स्वरूप स्वीकारत आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातील प्रवेशासाठी देण्याची सक्तीची प्रवेश फी, मोफत वसतिगृहाच्या अल्प सोयी, पुस्तके व प्रवास खर्चाचा प्रश्न, ग्रामीण भागातील मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न यामुळे स्वकीयांना शिक्षणास संधी हे तत्त्व कागदावरच राहिलेले आहे. महागाई व अल्पवयीन मुलामुलींच्या पिळवणुकीबाबतची कायद्यातील ढिलाई यामुळे शिक्षणातील गळतीचे प्रमाण मोठे आहे. मोठ्या शहरात स्थलांरीत विविध भाषिक मुलांच्या गैरसोयीचा मोठा प्रश्न आहे.

शासनाने आर्थिक नियोजनात सर्वांसाठी वसतिगृह, प्रवास खर्चासह मोफत शिक्षणाची सोय अंतर्भूत करावी असा ठराव आम्ही मंजूर करीत आहोत. त्याचप्रमाणे शिक्षण संस्थातील भ्रष्टाचार, खाजगी वसतिगृहातील गैरव्यवहार या संदर्भात आळा घालण्यास कडक उपाय योजना करावी.

**ठराव क्रं. ६ – मंडल आयोग :-** मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यात जी देशपातळीवर दिरंगाई, मतभेद निर्माण केला जातो आहे. याचा रिपब्लिकन पक्ष धिक्कार करतो व

आग्रहपूर्वक प्रतिपादन करतो की, मंडल आयोग तातडीने स्विकारून त्या संदर्भात असलेल्या मागास समाजाच्या विकासाची वाटचाल सुरू करून न्याय तत्त्वावर आधारलेल्यासमाज निर्मितीची प्रक्रिया सुरू करावी.

**ठराव क्र. ७ – नामांतर व्हावे :-** नामांतराबाबत शासन व विधिमंडळात घेतलेली भूमिका विधीसंकेताविरुद्ध आहे. नामांतराचा प्रश्न अशा प्रकारे लोंबकळत ठेवणे म्हणजे दलितांच्या दु:खावर डागण्या दिल्याप्रमाणे आहे. तेव्हा नामांतर त्वरीत करून समतेच्या मूलतत्त्वाची बाजू राखावी.

**ठराव क्र. ८ – नवबौद्धांना केंद्रिय सेवेत राखीव जागा देणेबाबत :-** केंद्रिय सेवेत बौद्धांना राखीव जागा नाहीत. ही बाब केंद्र सरकार हिंदूत्ववादी धोरण अवलंबिते असे होईल. ही तफावत दूर करण्यासाठी केंद्रसरकारने ताबडतोब केंद्रिय सेवेत बौद्धांना राखीव जागा निर्माण कराव्यात.

**ठराव क्र. ९ – सागर येथे बाबासाहेबांचे स्मारक व्हावे :-** सागर येथे महार रेजिमेंटचे कार्यालय आहे. महार रेजिमेंटने भारतीय संरक्षणात मोठा वाटा उचलला. अशा सागर येथे डॉ.बाबासाहेबांचे सैनिकी शिक्षणासाठी इंडियन मिलेटरी ॲकॅडमी स्थापन करावी व त्या संस्थेत केवळ दलितांनाच प्रवेश द्यावा.[३१]

अशाप्रकारे भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर या पक्षाला एक तात्त्विक व सैद्धांतिक बैठक प्राप्त करून दिली. दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये वास्तववादी विचारसरणीवर हा पक्ष उभा करण्यात आला. पूर्वी येथील अधिवेशनात जे ठराव पास केले त्यावरून असे दिसते की, हा पक्ष दलित, शोषितांच्या, कष्टकरी कामगार, दलित स्त्रिया यांच्या मानवी मूलभूत हक्कांसाठी लढा देणारा आहे. नंतरच्या काळात भारिपने जो कार्यक्रम व आपली राजकीय व्यूहनीती आखली ती दलितांच्या सामाजिक समतेबरोबर राजकीय व आर्थिक विकास कसा साकारता येईल, या दृष्टीचीच होती.

**भारिपची रचना :-**

कोणत्याही राजकीय पक्षाला समाजातील सर्व क्षेत्रातून पाठिंबा मिळवून आपली राजकीय शक्ती वाढवावी लागते. त्यासाठी त्याला विविध आघाड्या निर्माण करून कार्य करावे लागते. त्यादृष्टीने भारिपने विविध आघाड्या निर्माण करून समाजातील विविध क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने - १) युवक रिपब्लिकन, २) रिपब्लिकन महिला आघाडी, ३) भारतीय कामगार संघटना इत्यादी होय.

युवकांच्या प्रश्नांवर लढा देण्यासाठी युवक रिपब्लिकनची स्थापना करण्यात आलेली असून महिलांच्या विविध प्रश्नांवर लक्ष देण्यासाठी रिपब्लिकन महिला आघाडीची स्थापना केलेली आहे. त्याचबरोबर कामगार संघटनेच्या माध्यमातून कामगारांच्या हिताचा विचार केला जातो. मुंबई महानगर पालिकेमध्ये कामगारांची संघटना असून वैद्यकीय क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी औरंगाबाद मेडिकल लेबर युनियन आहे. त्याचबरोबर शासकीय आणि निमशासकीय क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना संघटीत करण्याचे कार्यही रिपब्लिकन कामगार संघटना करीत आहे.

भारतीय रिपब्लिकन पक्षाची सुव्यवस्थित अशी बांधणी करण्यात आलेली आहे. या पक्षाची राष्ट्रीय पातळीवर कार्यकारणी असून राज्य, जिल्हा व ग्राम पातळीवर ही कार्यकारी मंडळे आहेत. कार्यकारणीमध्ये प्रामुख्याने अध्यक्ष, उपाध्यक्ष, जनरल सेक्रेटरी, खजिनदार, महिला संघटक, कामगार संघटना, युवक संघटक अशी पदे असून राष्ट्रीय पातळीपासून ग्रामपातळीपर्यंतच्या सर्वसामान्य माणसांना समाविष्ट करून घेतलेले आहे.

या पक्षामध्ये अत्यंत अनुभवी व बुद्धीमान असे क्रियाशील कार्यकर्ते आहेत. यामध्ये अर्जुन डांगळे, अविनाश महात्तेकर, ॲड्. जयदेव गायकवाड, प्रा. जे जी. खैरनार, प्रा. अविनाश डोहस, प्रा. एल. बी. जोगदंड, प्रा. एम. के. गायकवाड, डॉ. जाधव, सुखदेव जाधव, प्रा.माधवराव मोरे, ॲड्. बी. एच. गायकवाड, एल. डी. भोसले, लंकेश्वरजी, बी. आर. शिरसाठ, चंदन तेलंग, ॲड्. प्रतापराव ढाणे, मुरलीधर जाधव, सुखदेव जाधव इ. बुद्धिमान व अनुभवी अशा

कार्यकर्त्यांची फळी भारिपकडे आहे. त्यातील अर्जुन डांगळे व अविनाश माहातेकर आठवले गटात गेले तर जयदेव गायकवाड राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेल. ॲड्. निलम गोऱ्हे शिवसेनेत गेल्या. डॉ. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर पहिल्या टप्प्याच्या कार्यकर्त्यांचा अपवाद वगळता अशा बुद्धिमान अनुभवी लोकांमार्फत भारिपची चळवळ सुरू आहे. भारिप आपली चळवळ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'प्रबुद्ध भारत' हे साप्ताहिक मुंबईहून प्रसिद्ध करते. तर 'मुकनायक' हे पत्रक अकोला येथून प्रसिद्ध करते.

## भारिपची कामगिरी :-

१९८४ मध्ये प्रकाश आंबेडकर नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या भारतीय रिपब्लिकन पक्षाने आज अखेरपर्यंत दलित मुक्तीचा जास्त व्यापक अर्थाने विचार केला. सत्ताधारी काँग्रेस पक्षाशी तडजोडीचे राजकारण न करता डॉ. आंबेडकरांच्या विचाराशी बांधिलकी जपणाऱ्या समविचारी लोकांच्या पक्षाच्या सहकार्याने दलितांचे राजकारण केले. अर्जुन डांगळे यांनी आंबेडकरी चळवळीशी वैचारिक भूमिका कोणत्या प्रकारची असावी याबाबत आपले मत खालीलप्रमाणे मांडले.

१. दलित किंवा आंबेडकरी चळवळ ही फक्त जातीय न राहता व्यापक व स्वतंत्र असावी.

२. ती एक स्वतंत्र, बलाढ्य राजकीय ताकद म्हणून उभी राहून सत्ता संपादनाच्या दृष्टीने तिने वाटचाल करावी.

३. आंबेडकरी चळवळीने समविचारी पक्ष संघटना यांच्याशी सुसंवाद साधावा.

४. चळवळीचे अधिष्ठान हे आक्रस्ताळी किंवा भावनात्मक असता कामा नये. मुलभूत प्रश्नांची तिला जाण असावी.[३२]

या महत्त्वाच्या चार सूत्राद्वारे भारिपने दलित मुक्तीचा विचार केलेला दिसतो. भारतीय रिपब्लिकन पक्षाने सर्व दलित पीडित शोषितांना आपल्या पक्षामध्ये सामावून घेतलेले आहे. केवळ एका जातीची व जात वा धर्म अशी भावनिक चळवळ न ठेवता सर्व जातींना बरोबर घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे बाबासाहेबांना अपेक्षित असणारा खरा रिपब्लिकन पक्ष व्यापक पायावर उभा करण्याचे श्रेय भारिपला जाते. भारिपने जी कामगिरी केली ती महत्त्वाची

आहे. भारिपने निवडणूकीच्या राजकारणात तर आपला प्रभाव दाखवला पण डॉ. आंबेडकरांच्या राजकीय व्यूहनितीप्रमाणे संसदीय व्यवस्थेबाहेर पडून दलितांमध्ये जागृती व दबावाचे राजकारण केले. भारिपने १९८४ पासून आजपर्यंत जी कामगिरी केली, ती पुढीलप्रमाणे -

१. २२ जुलै १९८४ रोजी पुणे येथे झोपडपट्टीवाल्यांची परिषद घेण्यात आली. या परिषदेमध्ये ३५ हजार स्त्रिया व ६५ हजार पुरुष अशा एक लाख लोकांनी भाग घेतला.

२. १० ऑगस्ट १९८४ रोजी शासनाने राखीव जागा भराव्यात या मागणीसाठी जळगाव येथे निदर्शने केली.

३. १ ऑगस्ट १९८४ रोजी जबरदस्तीने बळकावलेल्या जमीनी ज्याचे त्याला परत मिळाव्यात व पिकांच्या सुरक्षिततेसंदर्भात यवतमाळ येथे जाहीर सभा घेतली.

४. ७ जानेवारी १९८५ रोजी विदर्भातील पक्ष कार्यकर्त्यांचे एक शिबीर वरूड येथे घेण्यात आले.

५. झोपडपट्टीवासीयांच्या समस्या सोडविण्यासाठी ५ मे १९८५ रोजी मुंबई येथे एक मोठा मोर्चा काढला.

६. सहकारी साखर कारखान्यांचे राष्ट्रीयकरण आणि ‘दलित शेतकऱ्याचे सामाजिक प्रश्न’ या विषयावर २३ जून १९८५ रोजी एक चर्चासत्र आयोजित केले.

७. साखर कारखाने शासनाने ताब्यात घ्यावेत या मागणीसाठी माणगाव ते पुणे असा २५ ते २७ नोव्हेंबर १९८५ लाँगमार्च काढला. देशातील अत्यंत महत्त्वाचा लढा प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झाला. या लाँगमार्चमध्ये ५० हजार लोक सहभागी झाले होते.

८. १६ जानेवारी १९८६ रोजी गोंदिया येथे बिडी कामगारांची परिषद घेतली.

९. सोलापूर येथे १३ ऑक्टोबर १९८६ रोजी अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जाती आणि मातंग समाज यांची परिषद घेतली.

१०. १४ नोव्हेंबर १९८६ रोजी नांदेड येथे व १७ नोव्हेंबर १९८७ मध्ये भुसावळ येथे दुष्काळी परिषद घेतली. अशाच प्रकारची परिषद धामणगाव येथे घेण्यात आली.

११. २७ नोव्हेंबर १९८७ रोजी औरंगाबाद येथे भूमिहीनांच्या हक्क सुरक्षिततेसाठी अधिवेशन घेण्यात आले.

१२. ५ फेब्रुवारी १९८८ रोजी रिडल्सच्या प्रश्नावर मुंबई येथे विधानभवनावर विराट मोर्चा काढला.[३३]

अशा प्रकारे नामांतर, मंडल आयोग या प्रश्नावर तर भारिपने लढे उभारलेच पण त्याबरोबर जमीन, पाणी, झोपडपट्टी, बेकारी, दुष्काळी भागाचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न यावरही लढे दिले. ही सर्व कामगिरी भारिप करीत असताना समाजातील सर्व दलित व इतर मागसवर्गीयांच्या हिताच्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केले.

## भारिपचे राष्ट्रीय अधिवेशन १९८८ :-

भारतीय रिपब्लिकन पक्षाने १९८४ पासून समस्त समाजातील सत्ता सामाजिक सर्व दलित पीडित इतर मागासवर्गीय यांच्या उन्नतीच्या दृष्टीने कार्य केले व आपली व्यापक भूमिका निश्चित केली. दि. २८ ते ३० ऑक्टोबर १९८८ रोजी औरंगाबाद येथे पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात राज्यातील २ जिल्हे मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, गुजरात, तामिळनाडू, आंध्रप्रदेश या ठिकाणाहून जवळजवळ एक ते दीड लाख प्रतिनिधी उपस्थित राहिले होते. या अधिवेशनाचे उद्‌घाटन भारिपचे ॲड्. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

आपल्या उद्‌घाटनपर भाषणात ॲड्. प्रकाश आंबेडकर यांनी असे प्रतिपादन केले की, भारताची अर्थव्यवस्था काही मुठभर लोकांच्या हातात असल्यामुळे देशातील गरीब हा गरीबच राहिलेला असून तो मिळणाऱ्या मुलभूत गरजांपासून वंचित राहिलेला आहे. ही अर्थव्यवस्था बदलण्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही.[३४]

यावरून असे दिसते की भारिपने देशातील अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने प्रयत्न करण्यासाठी पाऊल उचलले होते. औरंगाबाद येथील राष्ट्रीय अधिवेशनात खालील ठराव करण्यात आले.

१. जमीनीचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे.

२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करावी.

३. स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान बदलावे म्हणून रिपब्लिकन महिला आघाडी सतत संघर्ष करेल.

४. शासनाने राखीव जागा भराव्यात.

५. सार्वजनिक क्षेत्राची पिछेहाट शासनाने त्वरीत थांबवावी.

६. मंडल आयोगाची त्वरीत अंमलबजावणी करावी.

७. दलित-आदिवासींच्यासाठी आर्थिक विकासाच्या योजना राबवाव्यात.

८. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर विनाविलंब करावे.

९. निवडणूक पद्धतीत बदल झाला पाहिजे.

१०. सत्तेचे विकेंद्रीकरण करणे.[३५]

याच अधिवेशनात अर्जुन डांगळे यांना प्रदेशाध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. १९८७ मध्ये महाराष्ट्रातील सर्व गट एकत्र येऊन दलित ऐक्याचा प्रयत्न केला गेला व महाराष्ट्रातील सर्व दलित संघटना बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नावाच्या पक्षाची स्थापना करण्याचे ठरले. १९ डिसेंबर १९८९ मध्ये दलित ऐक्य झाले. या ऐक्य प्रक्रियेत प्रकाश आंबेडकर व त्यांचा पक्षही सहभागी झाला. परंतु १९८९ च्या सार्वत्रिक निवडप्रक्रियेत कॉंग्रेस की राष्ट्रीय आघाडी यापैकी कोणाशी युती करावयाची यावरून रिपब्लिकन पक्षात पुन्हा दोन गट पडले. रामदास आठवले यांनी कॉंग्रेसशी युती केली तर प्रकाश आंबेडकर यांनी राष्ट्रीय आघाडीला मदत करण्याचे ठरविले. याचा परिणाम असा झाला की, महाराष्ट्रात कॉंग्रेसची सत्ता आल्यावर रामदास आठवले यांना समाजकल्याण मंत्रीपद मिळाले तर राष्ट्रीय आघाडीला मदत केल्याने या आघाडीने प्रकाश आंबेडकरांना राज्यसभेवर निवडून आणले व केंद्रात बौद्धांना सवलतीही जाहीर केल्या.

१९८९ चे दलित ऐक्य हे केवळ भावनेवर झालेले ऐक्य होते. त्यामुळे ते फार काळ टिकले नाही. नंतरच्य काळात प्रकाश आंबेडकरांनी भारिपचे काम अत्यंत वेगाने करायला सुरूवात केली. रामदास आठवले यांनी मंत्रीपद स्विकारून नामांतर या एकाच प्रश्नावर चळवळ आधारित ठेवली तर प्रकाश आंबेडकरांनी नामांतरासह दलित व इतर सर्व मागासवर्गीय समाजाला बरोबर घेऊन त्यांच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय विकासाच्या दृष्टीने प्रयत्न केले.

## भारिप-राज्यव्यापी महिला परिषद :-

भारिपच्या वतीने भव्य राज्यव्यापी महिला परिषद ८-९ मार्च १९८१ रोजी नागपूर येथे घेण्यात आली. या परिषदेमध्ये महत्त्वपूर्ण असे ठराव करण्यात आले.

१. स्वत:च्या राजकीय स्वार्थासाठी धर्माचा वापर करणाऱ्या या संधीसाधू राजकीय हुकूमशाही प्रवृत्ती लोकशाही विरोधी असून दलित मुक्ती व स्त्रीमुक्ती विरोधी आहेत. याला आळा घालण्यासाठी धर्मांधता व जातीयता विरोधी ठराव करून केंद्र व राज्यशासनाकडे पुढील मागण्या केल्या.

अ) धर्माचा वापर राजकारणात करणाऱ्या पक्षावर कडक बंदी घालावी.

ब) धार्मिक स्थळ, व्यक्ती वा ग्रंथ यांच्या नावाने पुरविल्या जाणाऱ्या राजकीय कार्यक्रमावर ताबडतोब बंदी आणून ते कार्यान्वित करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना अटक करावी.

क) विषमता व अन्याय जोपासणाऱ्या धार्मिक प्रश्न, चालीरिती व रूढी परंपरा यांचे समर्थन करणाऱ्या त्यांचे उदात्तीकरण करणाऱ्य व्यक्तींना अटक करावी.

२. धर्माच्या नावाने हिंसाचार करणाऱ्या व दहशत पसरविणाऱ्या व्यक्तीस अटक करावी.

३. जीवनावश्यक वस्तूंचा जास्तीत जास्त मर्यादे पर्यंतच्या किंमती शासनाने ठरवून द्याव्यात.

४. समान कामास समान वेतन व राबणाऱ्या हातास काम दिले पाहिजे.

५. पाणी - जळण - चारा पुरविण्याच्या दृष्टीने योजना आखली पाहिजे.

६. अर्थ संकल्पातील कमीत कमी १२ टक्के रक्कम आरोग्यावर खर्च करावी.

७. पदवीपर्यंतचे स्त्री शिक्षण मोफत असावे.

८. सर्व नोकरी करणाऱ्या तसेच शेतमजूर कामगार स्त्रियांना पाळणाघरे व बाळंतपणाची रजा या सुविधांची अंमलबजावणी झाली पाहिजे. ही अंमलबजावणी न करणाऱ्या कारखानदार व मालकांवर कडक कार्यवाही करण्यात यावी.

९. मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे.

१०. महिलांचे देह प्रदर्शनाचे जाहिरातीद्वारे होणारे विडंबन थांबवावे.

११. मंडल आयोगाची अंमलबजावणी त्वरीत करावी.

१२. मध्यमवर्गीय महिलांना आर्थिक मदत बिनव्याजी कर्ज पुरवठा करावा.

१३. स्त्रियांना समाजात सहभागाची संधी व प्रतिष्ठेची वागणूक मिळाली पाहिजे.

१४. पोटगीची रक्कम पतीच्या पगारातून कपात करून परस्पर कोर्टात जमा करण्यात यावी. तशी पोटगी कायद्यात सुधारणा करावी व द्विभार्या प्रतिबंधक कायदा कडक करावा.

१५. विधवा स्त्रियांच्या मुलांच्या विकासाची जबाबदारी शासनाने घ्यावी.

१६. स्त्रियांनी छळाला कंटाळून आत्महत्या करू नये तर जिद्दीने संकटांशी व अन्यायाचा सामना करावा.[३६]

अशा महत्त्वपूर्ण ठरावांची राज्यव्यापी महिला परिषद भारिपने घेतली. भारिपकडे महिलांचे केडर असल्याने सदर परिषदेला महाराष्ट्रातून बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.

अशाप्रकारे गायरान जमीन प्रश्न, अतिक्रमण, जमिनीचा मालकी हक्क, आंदोलन, बेकारी, दुष्काळी भागातील प्रश्न, झोपडपट्टीवासियांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न यावर अनेक चळवळी पुढे भारिपने उभ्या केल्या व समाजातील सर्व थरातील जनतेमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण केली. भारिपने आपली संपूर्ण राजकीय व सामाजिक चळवळ ही भावनिक न ठेवता माणसांच्या मुलभूत हक्कांच्या संबंधी असणाऱ्या प्रश्नावर केंद्रित केली.

## भारिप आणि निवडणुका / राजकारण :-

भारतीय रिपब्लिकन पक्षाने आर्थिक व सामाजिक व राजकीय पातळीवर आपले राजकारण सुरू केले. समाजातील सर्व दलित, शोषित, पीडित, अल्पसंख्यांक, आदिवासी, भटके विमुक्त व इतर सर्व मागासवर्गीयांना बरोबर घेऊन राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला. १९८४ साली स्थापन झालेल्या भारिपने आपल्या पहिल्याच अधिवेशनात हा ठराव मंजूर केलेला आहे. एकजातीय राजकारण न करता समाजातील आर्थिकदृष्ट्या सर्व दुर्बल घटकांना बरोबर घेऊन समस्त जनतेचे राजकारण करण्याचे ठरवले. त्यानुसार त्यांनी आपले राजकीय डावपेचही आखले.

मे १९८४ मध्ये या पक्षाची पुर्नबांधणी झाल्यावर लगेच डिसेंबर१९८४ मध्ये देशात सार्वत्रिक निवडणूका घेण्यात आल्या. १९८४ ची निवडणूक ही देशातील काँग्रेस व्यतिरिक्त दलित पक्षांना अवघड जाणारी अशी होती. परंतु इतर पक्ष व प्रकाश आंबेडकरच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या रिपब्लिकन पक्षालाही निवडणूक अवघड होती. देशाच्या राजकारणाच्या दृष्टीने भारिप या निवडणुकीत नवखा होता. तरीही भारिपने या निवडणुकीत आपले उमेदवार उभे केले. डिसेंबर १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत भारिपचे नेते ॲड्. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. तो खालीलप्रमाणे -

१. मंडल आयोगाची व मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरची त्वरीत कार्यवाही.

२. बेकारांना काम व कामगारांना, मजुरांना योग्य वेतन हमी.

३. प्रत्येक नागरिकास स्वस्त घरे व सर्व नागरी सुविधा.

४. भूमिहीनांना जमीनी व जमिनीचे राष्ट्रीयकरण.

५. पाण्याचे योग्य वाटप, प्रदुषणास विरोध व किफायतशीर शेतीसाठी शेतीचे नियोजन.

६. महागाई, काळा पैसा व साठेबाजीवर कडक उपाय.

७. स्त्रियांवरील अन्यायाबाबत कडक उपाय व समान न्याय व समान हक्क.

८. अलिप्त राष्ट्रांशी मैत्री व आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाही विचारांना पाठिंबा.[३७]

वरीलप्रमाणे आपला जाहीरनामा प्रसिद्ध करून प्रकाश आंबेडकरांनी महाराष्ट्रात आपली प्रचार यंत्रणा राबविली. महाराष्ट्रात अनेक भागात आपले प्रतिनिधी उभे केले. परंतु या निवडणुकीत पक्षाला म्हणावे तेवढे यश मात्र मिळाले नाही. पक्षाने खालीलप्रमाणे उमेदवार उभे करून मताधिक्क्य मिळविले.

पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर हे अकोला येथून उभे राहिले होते. त्यांना या निवडणुकीत १ लाख ६५ हजार ५०० मते मिळाली व ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले. पुणे येथे जयदेव गायकवाड यांना २० हजार ७०० मते मिळाली. यवतमाळ येथे ज. रेवीदास तळतुगडे यांना २१ हजार ३०० मते मिळाली. रामटेक येथे बाळासाहेब ताटेकर यांना ४५ हजार ५४ मते मिळाली ते तिसऱ्या

क्रमांकावर राहिले. औरंगाबाद येथे ॲड्. बी. एच. गायकवाड यांना २१ हजार ५४६ मते मिळाली. नांदेड येथे यशवंत आडवळे यांना १९ हजार ८२१ मते, खानदेश जळगाव मतदार संघात राजाराम गाडे यांना १७ हजार तसेच चंद्रपूर येथे ॲड्. जयश्री हिंगोळे यांना ११ हजार ६२६ मते मिळाली व त्या तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या.[३८]

अशाप्रकारे भारिपच्या पहिल्याच निवडणुकीत या पक्षाला यश प्राप्त झाले नसले तरी पक्षाच्या उमेदवारांना जे मताधिक्य मिळाले ते खरोखरच यशस्वी होते असे म्हणायला हरकत नाही. पक्षाला १९८४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत यश मिळाले नसले तरी १९८९ मध्ये नगरपालिका व महानगरपालिकेच्या निवडणुकीत पक्षाला यश मिळाले.[३९]

## नांदेडची लोकसभा पोटनिवडणूक :-

१९८६ साली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी आपल्या लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे नांदेड लोकसभा मतदार संघात पोटनिवडणूक घ्यावी लागली. या पोटनिवडणुकीत काँग्रेसने श्री. चव्हाण यांचे चिरंजीव श्री.अशोक चव्हाण यांना उभे केले. भारिपचे नेते ॲड्. प्रकाश आंबेडकर हे ही विरोधी पक्षाचे उमेदवार म्हणून उभे राहिले. यावेळी त्यांना शेतकरी संघटनेने पाठिंबा दिला होता. ही निवडणूक अत्यंत चुरशीची झाली आणि नांदेड मतदार संघामध्ये पहिल्यांदाच श्री. शंकरराव चव्हाण यांच्यापुढे चव्हाण उभे राहिले. या निवडणुकीत अंतिमता काँग्रेसचा उमेदवार विजयी ठरला. परंतु विधानसभेच्या अनेक मतदार संधात श्री. आंबेडकर यांनी बहुमत मिळवले होते. पुढे १९८९ लोकसभा निवडणूकीत जर आंबेडकर त्याच मतदार संघात उभे राहिले असते तर कदाचित ते निवडून आले असते. कारण त्यांनी निर्माण केलेल्या मतदार जागृतीमुळे १९८९ साली जनता दलाचे उमेदवार डॉ. व्यंकटेशन कावरे निवडून आले होते. १९९० च्या निवडणकीत आज पक्षाला बऱ्यापैकी यश मिळाले. १९९० च्या विधानसभा निवडणूकीपूर्वी दलित ऐक्याची प्रक्रिया झाली होती. रामदास आठवले यांचा आर. पी. आय. ला महाराष्ट्रात काँग्रेस युतीमुळे १२ जागा मिळाल्या होत्या. परंतु त्यांच्या पक्षाचा एकही उमेदवार निवडणूकीत यशस्वी झाला नाही. मात्र भारिपचे श्री. मखाराम पवार यांना

अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापूर मतदार संघात दिलेली उमेदवारी ही यशस्वी ठरली. पक्षाने विधानसभेच्या दोन जागा जिंकल्या आणि चांगल्या प्रकारे मते मिळाली.

१९९० नंतर मात्र ॲड्. प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या राजकीय राजनितीमध्ये अंशता बदल केला. त्यांनी वर्ग आणि जात पातळीवर सर्व शोषितांचे संघटन करण्याचा विचार केला. दलितांबरोबर इतर सर्व शोषितांचे संघटन करण्याचा विचार केला. दलितांबरोबर इतर सर्व मागासवर्गीय जातीचा पाठिंबा मिळाल्याशिवाय सत्ता हस्तगत करता येणार नाही. या दृष्टीने त्यांनी महाराष्ट्रात बहुजन महासंघाची स्थापना केली.

## भारिपची दलित परिवर्तनाची संकल्पना :-

दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये महाराष्ट्रात व देशात भारतीय रिपब्लिकन पक्षाने अत्यंत महत्त्वपूर्ण असे प्रयत्न केलेले आहेत. फक्त एका जातीपुरते राजकारण न करता दलितांसह सर्व श्रमिक, गरीब, शोषित व इतर मागासवर्गीयांची आघाडी निर्माण करून अंतिमता सर्व दलितांना सत्तेच्या राजकारणात आपले मानवी हक्क मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१९८४ साली स्थापन झालेल्या या पक्षांनी दलितांच्या भौतिक गरजांचा विचार केला. जमीनीचे राष्ट्रीयीकरण, साखर कारखाने सरकारने ताब्यात घ्यावेत. यासाठी जे लढे उभे केले ते दलित मुक्तीच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. दलितांची चळवळ ही फक्त भावनिक न राहता वास्तविक दृष्टिकोनातून सर्व दलितांच्या मुलभूत गरजांची पूर्तता कशी करता येईल या दृष्टीने भारिपने प्रयत्न केले. बदलत्या राजकीय व सामाजिक परिस्थितीत दलितांसह सर्व बहुजनांना एकत्र करण्याचा भारिपचा जो प्रयत्न आहे, तो महत्त्वाचा आहे. सामान्य माणसांच्या हातात सत्ता देण्यासाठी त्यांची ही व्यूहनितीसुद्धा महत्त्वाची म्हणावी लागेल.

## ५.३ बहुजन महासंघ (१९७२-२००२) :-

सध्या देशाच्या आणि महाराष्ट्राच्या राजकीय व्यवस्थेचा अभ्यास करता असे दिसते की, राजकीय सत्ता ही मुठभर अशा प्रस्थापित उच्चवर्णीय लोकांच्या हाती एकवटलेली आहे. त्यामुळे संख्येने निम्यापेक्षा जास्त असणारा मध्यम जाती गट व इतर दलित आदिवासी व अल्पसंख्यांक

समाज हा सत्तेच्या राजकारणापासून पुर्णपणे वंचित आहे आणि पुढारलेल्या अशा मुठभर उच्चवर्णीय जातींनी या संख्येने जास्त असणाऱ्या बहुजन समाजास राजकीय सत्तेपासून बाजूलाच ठेवलेले आहे आणि हे मुठभर लोक बहुजन समाजावर पिढ्यानपिढ्या सत्ता प्रस्थापित करून त्यांचेवर अन्याय करीत आहेत. महाराष्ट्रात महात्मा जोतिबा फुले यांनी सत्यशोधक चळवळ सुरू केली, ती बहुजनांची होती. तिचे रूपांतर पुढे ब्राह्मणेत्तरांच्या चळवळीत झाले. या चळवळीचा दबाव शक्तीचा परिणाम म्हणून कै. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. त्यावेळी काँग्रेस बहुजनांच्या आकांक्षाचे प्रतिक वाटत असे.[४०] परंतु आजची परिस्थितीपहाता असे दिसते की, महाराष्ट्रातील उच्चवर्णीय मराठा समाजाने बहुजन समाजाचे कल्याण या नावाखाली मराठेत्तर बहुजन समाजाला राजकीय सत्तेपासून दूर ठेवले आहे व आपल्याच हाती संपूर्ण सत्ता केंद्रित केली आहे. त्यामुळे अलिकडच्या काळात भारिप नेते खा. प्रकाश आंबेडकर व मखाराम पवार यांनी भटके विमुक्त आदिवासी, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्गीय व दलितांसह सर्व बहुजन समाजातील जाती जमातींचे एकसंघ संघटन झाले. तर सामाजिक व राजकीय शक्ती उभी राहू शकते हा विचार पुढे आणला व यातूनच १९९४ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात 'बहुजन महासंघ' नावाच्या नव्या राजकीय प्रयोगाचा उदय झाला.

## बहुजन महासंघाची स्थापना :-

महाराष्ट्रातील बहुजन समाजाचा दुरावलेला आत्मविश्वास, मानसन्मान परत मिळवुन देण्यासाठी बहुजन समाजाची सामर्थ्यशाली एकसंघ शक्ती उभारून बहुजन समाजाची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी बहुजन महासंघाची स्थापना झाली. सुरूवातीला २३ ऑगस्ट १९९० या दिवशी अकोल्यात 'बहुजन समाज महासंघ' या जिल्ह्यास्तरावरील संघटनेची स्थापना झाली.[४१] या संघटनेची स्थापना भारिपचे अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर येथील आमदार मखाराम पवारांनी या संघटनेची प्रथमपासून वाटचाल केली. नंतरच्या काळात मखाराम पवारांनी या संघटनेला व्यापक राजकीय व सामाजिक विचारपीठ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रासतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या विमुक्त जाती व अल्पसंख्यांक जाती-जमातीतील काही पुरोगामी प्रमुख व्यक्तींना एक निवेदन पाठविले व त्यांच्या निमंत्रणावरून १५फेब्रुवारी १९९३ रोजी के. सी.

कॉलेज हॉटेल, चर्चगेट मुंबई येथे महाराष्ट्रातून सुमारे १ हजार प्रतिनिधी मेळाव्यास आले होते. त्या सर्वांनी मिळून 'बहुजन महासंघा'ची स्थापना केली. त्यावेळी भारिपचे नेते खा. प्रकाश आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले.[४२]

मुंबई येथे झालेल्या बैठकीत बहुजन महासंघाची राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणीची निवड करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | - | आमदार मखाराम पवार |
| २. | महासचिव | - | आमदार विजय मोरे |
| ३. | महासचिव | - | श्री. शांताराम पंदेर |
| ४. | महासचिव | - | श्री. नवनाथ आव्हाड |

**बहुजन महासंघाचे जिल्हाध्यक्ष :-**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | आकोला | - | डॉ. दशरथ भांडे |
| २. | बुलढाणा | - | श्री. बापूराव कंणे |
| ३. | अमरावती | - | श्री. नामदेवराव गावरकर |
| ४. | यवतमाळ | - | सुधाकर जाधव |
| ५. | नागपूर | - | श्री. ज्ञानेश्वर काकडे |
| ६. | चंद्रपूर | - | श्री. वामनराव शिंगम |
| ७. | नांदेड | - | प्रा. आत्माराम वानुळे |
| ८. | परभणी | - | श्री. हरिभाऊ शेळके |
| ९. | जालना | - | ॲड्. उत्तमराव राठोड |
| १०. | औरंगाबाद | - | प्राचार्य भाऊराव नावाडे |
| ११. | लातुर | - | श्री. भगवानराव नागरमोडे |
| १२. | बीड | - | श्री. हणमंतराव उपरे |
| १३. | अहमदाबाद | - | श्री. रवींद्र सानप |
| १४. | जळगाव | - | श्री. मेहताबसिंग नाईक [४३] |

अशाप्रकारे 'बहुजन महासंघाची' रितसर स्थापना झाली. भारिपचे नेते खा. प्रकाश आंबेडकर सुरुवातीपासून महासंघाचे प्रणेते राहिले. महासंघाची स्थापना झाल्यावर दिनांक २१/३/१९९३ रोजी गजानन महाराजांचे शेगाव जि. बुलढाणा येथे महासंघाचे राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचे ठरले. स्थापनेनंतर महासंघाच्या वतीने खालील महत्त्वाचे ठराव मांडले.

### बहुजन महासंघाचे ठराव :-

**ठराव क्र. १ :-** भारतीय संविधानावर खरी श्रद्धा व निष्ठा 'बहुजन महासंघ' ही संघटना कायद्याद्वारे स्थापित झाली आहे. अशा संविधानाबद्दल खरी श्रद्धा व निष्ठा बाळगेल. भारतीय सार्वभौमत्व व एकात्मता उन्मत्ता राखण्यासाठी प्रयत्नशील राहील. भारतीय संविधानात अंतर्भुत असलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्त्वाशी आमची संघटना बांधील राहील.

**ठराव क्र. २ :-** 'बहुजन महासंघ' या संघटनेचे घोषवाक्य 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असे असेल. संघटनेचा ध्वज चौरंगा असेल ज्यामध्ये निळा, केशरी, पांढरा आणि हिरवा या रंगाच्या समान लांबीच्या व समान रूंदीच्या चार पट्ट्या एकमेकांना जोडलेल्या असतील. प्रत्येक रंगाच्या पट्ट्या डाव्या बाजुने उभ्या असतील व निळा आडव्या पद्धतीने वर केसरीमध्ये पांढरी व खाकी हिरवी पट्टी जोडलेली असेल. अशा पद्धतीने चौरंगाध्वज तयार होईल. ध्वजाच्या पांढऱ्या रंगाच्या आडव्या जोडलेल्या पट्टीच्या मधोमध ऐक्य आणि शक्तीचे प्रतीक म्हणून उजव्या हाताची बंद मुठ परंतु हाताच्या बंद मुठीचा बंद अंगठा ध्वजाच्या उजव्या बाजूस राहील. अशा रितीने बंदमुठ निळ्या रंगाने चित्रित केलेली असेल.

**ठराव क्र. ३ :-** संपूर्ण मंडल आयोग राबवा, 'क्रिमीलेअर' सिद्धांत अमान्य. सर्वोच्च न्यायालयाने नोव्हेंबर १९९२ मध्ये दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार देशातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास जातींना मंडल आयोगाने सुचविल्याप्रमाणे २७% आरक्षण तातडीने देणे अत्यंत गरजेचे असतानाही केंद्र व राज्य शासनाने सदर आरक्षणाची तरतूद अजूनही लागू केलेली नाही व मंडल आयोगाच्या शिफारशींना निष्प्रभ करण्याचा कुटील प्रयत्न चालविलेला आहे. बहुजन समाजाला सवलतीपासून वंचित ठेवण्याचा शासनाच्या धोरणाचाच हा परिपाक आहे.

वास्तविक पाहता ५२ टक्के बहुजन समाजास (इतरमागास जाती) अनु. जातीप्रमाणे संख्येच्या प्रमाणात आयोगाने बहुजन समाजास पूर्ण न्याय न देता अर्धा न्याय दिला आहे आणि हा अर्धा न्यायही देण्यात शासन अशीच दिरंगाई करीत आहे. म्हणून आमची स्पष्ट मागणी आहे की, मंडल आयोगाच्या सर्व शिफारशींची शासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी व बहुजन समाजाला विनाविलंब न्याय द्यावा.

मंडल शिफारशींच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा आर्थिक निषकचा सिद्धांत पुर्णपणे अमान्य केलेला असतानाही भारत सरकारने नेमलेल्या आणि आर्थिक निकषांवर अवलंबून असलेला अहवाल शासनाने तात्काळ अमान्य करावा.

**ठराव क्र. ४** :- बहुजन समाजातील सर्व लोक आजवर हिंदू म्हणूनच वावरत आलेले आहेत. परंतु धर्माच्या नावावर आम्हाला चातुर्वण्याच्या पोलादी चौकटीत डांबण्यात येऊन अमानुष वागणूक देण्यात आली. आम्हाला पवित्र धर्मशास्त्राचे अध्यापन करण्याचा हक्क नाकारण्यात आला. परिणामी संपूर्ण बहुजन समाज हा भक्तीमार्गाकडे व वारकरी पथाकडे वळला. भक्तीमार्ग स्विकारल्यानंतर देखील बहुजन समाजाला मान व सन्मान दिला गेला नाही. उच्च-निच्चतेची भावना पद्धतशीरपणे जोपासण्यात आली. अशा या सामाजिक व धार्मिक परिस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व इतर धार्मिक संघटना नव्याने सर्व हिंदू धर्मियांचे संघटन करावयास निघाल्या आहेत. हिंदू समाजामध्ये वैदिक परंपरा आणि भक्ती मार्गाची परंपरा या दोन मुख्य वाटा आहेत. राष्ट्रीय संघटना या वैदिक परंपरा मागणाऱ्या आहेत. त्यांनीही अजून भक्ती मार्गाला मान्यता व प्रतिष्ठा दिलेली नाही. भक्तीमार्ग संप्रदायात देखील अनेक लेखक, पंडीत, विख्यात प्रवचनकार व किर्तनकार आज उपलब्ध आहेत. हिंदू धर्मामध्ये शंकराचार्यांचे पद हे सर्वोच्च प्रतिष्ठेचे व मानसन्मानाचे पद आहे असे मानले जाते. बहुजन समाज हा हिंदू असून हिंदू धर्मात बहुसंख्येने वावरतो आहे आणि म्हणून शंकराचार्यांच्या धर्मपीठावर बहुजन समाजालाही अधिकार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांच्या इतर संघटनांकडे आणि हिंदू धर्मातील शंकराचार्यांच्या पिठाधीशांकडे आमची अशी मागणी आहे. जर ते सर्व हिंदुना समाज समजत असतील व हिंदू एकतेची त्यांची भूमिका प्रामाणिक असेल तर शंकराचार्यांच्या चार धर्मपीठांनी किमान दोन

धर्मपीठावर बहुजन समाजातील भक्तीमार्ग परंपरेतील दोन व्यक्तींची शंकराचार्य म्हणून नेमणूक करावी व ती नेमणूक ते कधी करतात, त्याची तारीख जाहीर करावी. जर अशी नेमणूक करायची त्यांची तयारी नसेल तर हिंदू धर्माच्या नावाखाली बहुजन समाजाचा बुद्धिभेद करण्याचे त्यांनी त्वरीत बंद करावे.

**ठराव क्र.५** :- ग्रामीण कृषि औद्योगिकरणाचे धोरण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील जिल्हा परिषद मतदार संघ निहाय ग्रामीण औद्योगिक वसाहत स्थापन करून संबंधित जिल्हा परिषद मतदार संघामध्ये, शेतीमध्ये पिकणाऱ्या शेतमालावर प्रक्रिया करणारे विविध उद्योग काढण्यातयावेत व त्या औद्योगिक वसाहतीतील संबंधित जिल्हा परिषद सर्कलमधील बेकार तरुण-तरुणींना रोजगार मिळवून द्यावा. तसेच या उद्योगातील नफा त्या शेतीमाल पिकवणाऱ्या शेतकऱ्याकडे त्यांनी पिकवलेल्या मालाच्या प्रमाणात विभागुन द्यावा. यासाठी आवश्यक रक्कम राष्ट्रीयीकृत बँकांनी या उद्योगाला पुरवावी.

**ठराव क्र. ६** :- वनजमीनीचे भूमिहीनांना वाटप करा. आज अस्तित्वात असलेल्या पद्धतीप्रमाणे महाराष्ट्र शासन आपल्या वनविभागामार्फत वनजमिनीमध्ये करोडो रुपये खर्च करून जंगल निर्मिती व पर्यावरण संतुलन राखण्यासाठी विविध झाडांची रोपे लावल्याचे दाखवत आहेत. परंतु प्रत्यक्षात वर्ष दोन वर्षानंतर त्या ठिकाणी कुठलेही वन उभे राहिलेले दिसत नाही व जनतेचे करोडे रुपये पाण्यात जातात. हे रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ज्या ठिकाणी उजाड वनजमीनी किंवा अत्यल्प झाडांची संख्या असलेल्या वनजमिनींपैकी भूमिहीन शेतमजूर कुटुंबात प्रत्येकी पाच एकर जमिन ताब्यात द्यावी व त्यांच्या देखरेखीखाली वनजमिनीवर शासकीय खर्चाने वनीकरण करून द्यावे. सदर वनीकरणाची योग्य निगा राखण्याची जबाबदारी वनजमिनीतील उत्पन्नाचा ३/४ भाग संबंधित शेतमजूर कुटुंबाला द्यावा व केवळ २५% उत्पन्न सरकारने घ्यावे.

**ठराव क्र. ७ - सर्वांना समान व सक्तीचे शिक्षण** :- महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित शैक्षणिक धोरणाचा परिणाम म्हणून बहुजन समाजाला अत्यंत निकृष्ट दर्जाचे शिक्षण देण्यात येत आहे. बहुजन समाजाच्या मुलांची त्यामुळे वाताहात झाली आहे. राज्य घटने अंतर्गत देशातील

प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्याची स्पष्ट जबाबदारी शासनावर टाकलेली असतानाही शासन घटनेची या तरतुदीची पायमल्ली करीत आहे.

म्हणून बहुजन महासंधाचे असे स्पष्ट धोरण आहे की, महाराष्ट्रातील ग्रामपंचायत क्षेतात राहणाऱ्या प्रत्येक मुला-मुलींच्या मॅट्रीकपर्यतचे शिक्षण संपूर्णपणे मोफत द्यावे व सक्तीचे करावे. हे करण्यासाठी ग्रामीण भागातील प्रत्येक शाळा ही आश्रम शाळेच्या धरतीवर निवासी शाळा असावी व ती निवासी शाळा चालविण्याची संपूर्ण जबाबदारी शासनाने स्विकारावी.[४४]

**बहुजन कोण ? -**

सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेने ज्या जाती समुहांना वंचित ठेवले ते सारे बहुजन बौद्ध, शिख, जैन, मुसलमान, ख्रिश्चन वगळून बाकी सारे बहुजन मुख्यत: स्वत:ला हिंदू म्हणूवन घेतात. सर्व आदिवासी भटके विमुक्त यात येतात. बौद्ध, शिख, जैन, ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मातील बहुसंख्य जनता ही मुळची भारतीय शूद्र-अतिशूद्र जनता आहे. ब्राह्मण स्त्रियांसह सर्व स्त्रिया शूद्र आहेत. थोडक्यात महात्मा जोतीराव फुले यांच्या परिभाषेत सांगायचे तर स्त्री शूद्रातिशूद्र म्हणजे बहुजन समाज अनुसूचित जाती-जमाती, भटके विमुक्त, इतर मागास जात व अन्य धार्मिक समुह व स्त्रिया यात येतात.[४५]

**विचारसरणी :-**

बहुजन महासंघाने आपली विशिष्ट अशी विचारसरणी मांडलेली आहे ती महत्त्वाची आहे. त्यांच्या मते, भारतात वर्ण-जाती आणि स्त्रियांची गुलामगिरीची व्यवस्था आहे. तिला वैदिक ब्राह्मणी धर्मसंस्कृतीचा आधार आहे. या ब्राह्मणी वैदिक संस्कृतीमध्ये मनुष्याच्या कष्टाला अजिबात प्रतिष्ठा नाही तर फक्त बुद्धीलाच प्रतिष्ठा आहे. आर्य-वैदिक ब्राह्मण संस्कृतीने पुर्नजन्म कल्पना, असत्य, हिंसा, द्वेष, वंश-वर्ण, जाती, लिंग, श्रेष्ठत्व, स्त्रियांची गुलामगिरी, विषमता, शोषण यासारखी हुकूमशाही प्रवृत्तीची नीतीमूल्ये जपली आहेत आणि या वैदिक संस्कृतीनेच मनुस्मृती हा ग्रंथ अधिकृत मानला आहे. मुसलमान व ख्रिश्चन धर्म हे बाहेरून आले आहेत व निघुनही गेले. परंतु धर्मांतरीत मुस्लिम व ख्रिश्चन हे येथेच राहिले. ही जनता बौद्ध, शीख,

जैनांप्रमाणेच मुळातच भारतीय आहे. भारतात वारकरी, भक्ती संप्रदायाची चळवळ आणि चक्रधर स्वामींचा महानुभाव पंथ यांनी वैदिक परंपरेविरुद्ध उठाव केला होता. बहुजनांची संस्कृती ही येथील मातीशी नाते सांगणारी आहे. चार्वाक, बौद्ध, जैन, शीख, मुसलमान, ख्रिश्चन, वारकरी महानुभव विकसीत झाले. बहुजन समाजाची संस्कृती ही मर्यादित नाही. हीच खरी भारतीय संस्कृती आहे.

सत्य, अहिंसा, प्रज्ञा, शील, करुणा, समता, स्वातंत्र्य, परस्पर स्नेहभाव, सामाजिक न्याय, गतिमानता आणि लोकशाही ही नितीमुल्ये या बहुजन सांस्कृतिक प्रवाहातून विकसीत झाली आहेत. या बहुजन संस्कृतीला वैदिक ब्राह्मणी धर्माने कधीच मान्यता दिली नाही. उलट बहुजनांची संस्कृती दडपून टाकण्याचाच प्रयत्न केला.[४६] त्यामुळे बहुजन महासंघाने आपले नाते या देशातील वारकरी संप्रदाय आणि भक्ती संप्रदायाशी जोडले. वारकरी भक्ती परंपरा ही बहुजनांची खरीखुरी संस्कृती आहे, असे ते मानतात. भारतातील धर्मव्यवस्था व जातिव्यवस्थेच्या विरोधात चार्वाक, बुद्ध, महावीर यांनी उठाव केला. पुरोहितांविरुद्ध बंड केले आणि सामाजिक, आर्थिक, समता प्रस्थापित केली. संत कबीर, ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, जनाबाई, शेख महंमद, चोखामेळा, रोहिदास, एकनाथ आदि बहुजन संत परंपरा आहे. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवार हिंदू संस्कृतीपेक्षा आर्य-वैदिक परंपरा मानते आणि समस्त हिंदू धर्मियांच्या नावाने देशाची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सत्ता काबीज करण्याचे कूट कारस्थान करीत आहे. त्याविरुद्ध बहुजन महासंघ बहुजनांचे संघटन करून आवाज उठवू इच्छितो.

मंडल आयोगाने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या या २७२ जाती महाराष्ट्रात आहेत, असे ठरविले आहे. महाराष्ट्रातील व देशातील एकुण लोकसंख्येच्या मानाने विचार करता अनुसूचित जाती-जमाती, भटके, विमुक्त, मुसलमान, शीख, जैन, ख्रिश्चन धर्मातील मागास जाती मिळून २५ टक्के समाज हा बहुजनांमध्ये मोडतो. हा बहुसंख्य बहुजन समाज मूठभर उच्चवर्णियांच्या हाताचे बाहुले होऊन बसलाआहे. देशात ८५ टक्के बहुजन आहेत पण ते विविध जाती-जमातीत विभागले आहेत. त्यामुळे या बहुजन समाजाने आपला आत्मविश्वास गमावला आहे. या बहुजन समाजाचा हरवलेला आत्मविश्वास जागृत करून देशाच्या राजकीय सत्तेमध्ये

त्यांचा सहभाग वाढावा या दृष्टीने बहुजन महासंघाचे प्रयत्न आहेत. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकीयदृष्ट्या बहुजन समाज परिपूर्ण व्हावा व सत्तेची स्थाने मूठभर लोकांच्या हातात न राहता बहुजन समाजाच्या हातात रहावीत यासाठीच आ. मखाराम पवार, खा. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तिसरी शक्ती म्हणून बहुजन महासंघाची निर्मिती करण्यात आली.

## शेगावचे अधिवेशन :-

२१ मार्च १९९३ रोजी बहुजन महासंघाचे राज्यपातळीवरील पहिले विराट अधिवेशन शेगाव येथे पार पडले. महासंघाचे अध्यक्ष आ. मखाराम पवार यांच्या अध्यक्षतेखालील महासंघाचे प्रणेते खा. प्रकाश आंबेडकर यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. या अधिवेशनात निळूभाऊ फुले, राज मगरकर, प्रदेशाध्यक्ष अर्जुन डांगळे व इतर प्रमुख उपस्थित होते.

या अधिवेशनात बहुजन महासंघात अकोला येथील कॉंग्रेसचे नेते महादेवराव बुटेले, प्रकाश लाथाडे, शंकरराव पाटणकर, युनिक गैड, देवानंद मदाने, खासगाव येथील श्री. रामचंद्र जिकाळ पाटील यांनी बहुजन महासंघात प्रवेश केला.[४७] या अधिवेशनामध्ये बहुजन समाजाचा फायदा संघ परिवार व कॉंग्रेस यांना कसा देणार नाही, असा निर्धार करण्यात आला. नव्या जोमाने महाराष्ट्रातील बहुजनांची प्रभावी संघटन करण्याचा संकल्पही करण्यात आला. या अधिवेशनात भारिप आणि सर्व शक्ती बहुजन महासंघाच्या पाठीशी उभी राहील अशी घोषणा अध्यक्षांनी केली.

महाराष्ट्रामध्ये बहुजन समाजाचे संघटन होण्याअगोदरच भारताच्या दलित राजकारणातही १९८५ नंतर श्री. काशिराम व मायावती यांनी एक नवा राजकीय प्रवाह सुरू केला. उत्तर भारतामध्ये इतके दिवस दलित मतदान हे कॉंग्रेसच्या बाजूने होत होते. परंतु श्री. काशिराम यांनी बहुजन समाज पक्षाची स्थापना करून दलितांचा नवा राजकीय पक्ष स्थापन केला. ब्राह्मण, ठाकुर आणि बनिया यांना वगळुन इतर सर्व जे लोक आहेत ते बहुजन आहेत. समाजात त्यांची संख्या शेकडा ७५% असतानाही उत्तर भारतातील राजकीय सत्ता ब्राह्मण आणि ठाकूर या अल्पसंख्य जमातीकडे केंद्रित झाली होती. सर्व बहुजनांना एकत्र आणण्याचा प्रयत्न श्री. काशिराम यांनी गेली दहा वर्षे करीत आहेत. काशिराम हे स्वत:ला डॉ. आंबेडकरांचे शिष्य मानतात. त्यांच्या चळवळीने उत्तर

प्रदेशात मोठी जागृती निर्माण केली आणि दलितांची स्वतंत्र अस्मिता निर्माण झाली. अलिकडील काळात बसपाने जो पाठिंबा उत्तर भारतात मिळविला त्यावर समाज बदलास तयार आहे, असे चित्र निर्माण झाले. महाराष्ट्रात सर्व बहुजनांना एकत्र करून उत्तर भारतातील राजकीय सत्ता मिळविण्याचा बहुजन महासंघाचा प्रयत्न आहे.

**बहुजन महासंघ - भारिपचे राजकारण :-**

२३ ऑगस्ट १९९० रोजी भारिपचे आ. मखाराम पवार यांनी अकोला येथे बहुजन महासंघ या जिल्हास्तरीय संघटनेची स्थापना केली आणि या संघटनेचे सुरुवातीपासून भारिप बरोबर वाटचाल केली. १९९० नंतर खऱ्या अर्थाने बहुजन महासंघ व भारिपने समाजातील बौद्ध, दलित, मुस्लिमांसह सर्व बहुजन समाजाला बरोबर घेऊन आपले राजकीय डावपेच आखले आणि त्यात त्या शक्तीला काही प्रमाणात यश प्राप्त झाले.

**अकोला पॅटर्न :-**

फेब्रुवारी १९९१ च्या अकोला जिल्हा परिषद निवडणुकीच्या वेळी अकोला जिल्ह्यात भारिप-बहुजन समाज महासंघाने संयुक्तपणे एक नवा प्रयोग केला. जिल्ह्यातील काँग्रेसची सत्ताधारी घराणी आणि संघ परिवारातील महाजन यांना वगळून तमाम बहुजनांची शक्ती उभी केली. सत्तेच्या राजकारणात एक 'जात' ऐवजी 'बहुजन' या भावनेने मतदान करा ही भूमिका घेतली. खा.प्रकाश आंबेडकरांच्या नव्या अस्मितेने अकोला जिल्हा पेटून उठला. निवडणूकीत भारिप-बहुजन महासंघास प्रचंड यश मिळाले. बहुजन समाजातील धनगर, गोंधळी, टाकणकर, पारधी, बंजारा, हटकर, बौद्ध, मुसलमान अशा सर्व जातीधर्माचे प्रतिनिधी सत्तेमध्ये आले. यालाच 'अकोला पॅटर्न' असे म्हणतात.

१९९२ च्या अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीविषयी आ. मखाराम पवार म्हणतात, बहुजन समाज महासंघाच्या बहुजन समाजाची व इतर सर्व शोषित समाजाची सामाजिक व राजकीय एकी करण्याचा अकोला जिल्ह्यामध्ये जो जाणीवपूर्वक प्रयत्न झाला त्याचा उत्कृष्ट परिणाम या जिल्हा परिषद निवडणुकीत दिसून आला. भारतीय रिपब्लिकन पक्ष व बहुजन महासंघाचे ६०

पैकी जवळजवळ १५ उमेदवार जिल्हा परिषदेत सदस्य म्हणून प्रचंड बहुमताने निवडून आले. आमचे २० जिल्हा परिषदेचे उमेदवार केवळ १०० ते २०० मतांच्या फरकाने पराभूत झाले. बहुजनातीलच ही लोकांची मामुली चूक झाल्यामुळे आमचे २० उमेदवार पराभूत झाले. चूका करणाऱ्यांनी रडून आपली चूक नंतर माझेजवळ कबुलही केली. अन्यथा अकोला जिल्हा परिषद आज बहुजन महासंघ व भारिपच्या ताब्यात राहिली असती. बहुजन महासंघाचा एवढा जबरदस्त रेटा होता की भाजप व सेनेच्या अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये सर्व उमेदवार पराभूत झाले. त्यापैकी अनेकांच्या अनामत रक्कमाही जप्त झाल्या.

बहुजन महासंघाने दोन माजी आमदारांना चारीमुंड्या चीत केले. तर एक माजी आमदार आमच्या आदिवासी उमेदवाराच्या सपाट्यातून आपल्या राजकीय बनवेगिरीच्या जोरावर कसाबसा थोडक्यात वाचला. अकोला जिल्ह्याचा काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष आमच्या मुस्लिम उमेदवाराच्या दणक्यामुळे तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला व त्याला दारुण पराभव पत्करावा लागला. अकोला जिल्ह्यातील अनेक करोडपतींच्या विरुद्ध आम्ही शेतमजूर वर्गातील उमदेवार उभे केले होते. पैशाचा प्रचंड वापर करूनही त्या कोट्याधीश उमेदवारांना आमच्या मजूर उमेदवारांकडून दारुण पराभव पत्करावा लागला.

अकोला जिल्ह्यातील १३ पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये १२० उमेदवारांपैकी भारिप व बहुजन महासंघाचे ३० उमेदवार निवडून आले आणि जवळजवळ ४८ उमेदवार मतांच्या अत्यंत कमी फरकाने पराभूत झाले. अकोला जिल्ह्याच्या अकोला व बार्शी या दोन्ही अत्यंत प्रतिष्ठेच्या पंचायत समितीया भारिप व बहुजन महासंघाने धनदांडग्या सत्तेच्या मक्तेदारांकडून हिसकावून घेतल्या. बार्शी पंचायत समितीमध्ये श्री. बी. आर. शिरसा हे आमचे बौद्ध सदस्य सभापती म्हणून निवडून आले तर अकोला पंचायत समितीत आमचे मेंढी चारणारे धनगर सदस्य श्री. हरीदासजी भदे हे सभापती म्हणून कार्यरत आहेत.

मूर्तीजापूर पंचायत समितीत आमच्या सहकार्याने श्री. बबन दबिराव (गणपारधी) समाजाशी सदस्य सभापती म्हणून काम करू लागले. तर दर्यापूर पं. समितीत श्री. वासदेवराव

खेडकर हे आमचे भावी सदस्य सभापती म्हणून निवडून आले आहेत. करंजा व बाळापूर समित्या केवळ एक- एक सदस्य कमी पडल्यामुळे आमच्या हातातून गेल्या याचे आम्हाला अतिशय दु:ख होत आहे. विशेष नमूद करण्यासारखी बाब अशी की अकोला जिल्ह्यातील या पंचायत समित्या सोडून उर्वरित महाराष्ट्रात विरोधी पक्षाच्या ताब्यात एकही पंचायत समिती नाही. अकोला जिल्ह्यातील भाजप व शिवसेना येथे शेवटचे आचके देत आहेत.[४८]

## किनवटची निवडणूक :-

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये अशाप्रकारे व्यापक आणि पुरोगामी विचार घेऊन भारिप-बहुजन महासंघाने आपली वाटचाल सुरू केली. या काळात उत्तर भारतामध्ये मंडल आयोगाच्या प्रश्नावरून जागृती झाली होती. दक्षिण भारतातही शोषित वर्ग जागृत होत होता. परभणी जिल्ह्यातील किनवट मतदार संघातील जागा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आ. सुभाष जाधव यांच्या अपघाती मृत्यूमुळे रिकामी झाली होती. या मतदार संघात अनुसूचिज जाती-जमातीचे (भिमराव केराम) उमेदवार होते. इतर मागासवर्गीय समाजाची मोठी संख्या होती. या निवडणूकीत काँग्रेसचे ज्येष्ठ पुढारी श्री. उत्तमराव राठोड यांचा पराभव करून श्री. थोरात विजयी झाले. श्री. भिमराव केराम यांनी जवळजवळ आठ हजार मताधिक्याने जिंकून महाराष्ट्राच्या राजकारणात उदयास येत असलेल्या तिसऱ्या शक्तीची जाणीव करून दिली.[४९]

नोव्हेंबर १९९३ साली उत्तर प्रदेशात विधानसभा निवडणूका झाल्या. बाबरी मशिदीच्या प्रश्नावर भाजपने या निवडणूका लढवल्या. भाजपाचे आक्रमण रोखण्यासाठी समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष हे दोन्ही पक्ष एकत्र आले. समाजातील गरीबांची ताकद या दोन पक्षाच्या पाठीमागे उभी राहिली. त्यामुळे त्या निवडणूकीत भाजपचा, काँग्रेसचा राजकीय पाया बसापाकडे सरकल्याने काँग्रेसचा मोठा पराभव झाला. या दोन्ही विजयामुळे बहुजन महासंघातही मनोबल वाढवता आले असे त्यांचे मत आहे.

## भारिप बहुजन महासंघाची दलित मुक्तीची राजनिती :-

भारतीय रिपब्लिकन पक्षाची १९८४ ला स्थापना झाल्यानंतर पक्षाने प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली व्यापक भूमिका आखली. राजकीय, सामाजिक व्यूहनिती घेवून फक्त एक जातीय राजकारण न करता तमात दलित, श्रमिक व इतर मागासवर्गीय बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टीने राजकीय व्यूहनिती विकसित केली. दलितांची चळवळ ही भावनिक न ठेवता त्याच्या आर्थिक उन्नतीसाठी जमिनीचे राष्ट्रीयीकरण, मंडल आयोगाची रास्त अंमलबजावणी, लोकसंख्येच्या प्रमाणात सर्व बहुजन दलित समाजाला सत्ता व प्रशासकीय हक्क प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला.

१९८४ नंतर उत्तरेकडे बसपा प्रभावी होत असताना बसपाच्या धर्तीवरच महाराष्ट्रात भारिपचे आ. मखाराम पवार व नेते प्रकाश आंबेडकर यांनी सर्व बहुजन समाजाला बरोबर घेवून सत्ता मिळविण्यासाठी बहुजन महासंघाची स्थापना केली.

सध्याच्या राजकीय व्यवस्थेत राजकीय सत्ता मुठभर प्रस्थापित उच्चवर्णीयांच्या हाती एकवटलेली आहे. या राजकीय वर्गाचा आधार त्यांची जात व आर्थिक संपन्नता हा आहे. सध्याचे राजकारण हे वर्ग, जात यांच्या परस्पर संबंधाचा शक्तिमान अविष्कार आहे. यामुळे निम्म्यापेक्षा संख्येने जास्त असणारा बहुजन, मध्यम जाती, दलित, आदिवासी, भटके, विमुक्त अल्पसंख्यांक समाजाची मोठ्या प्रमाणावर उपेक्षा होत आहे. सत्ता हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन असल्याने भारिप-बहुजन महासंघात सर्वांगीण उन्नतीसाठी सत्ता हस्तगत करणे महत्त्वाचे वाटते. त्यादृष्टीने त्यांनी अकोला पॅटर्न हा प्रयोग केला. त्याच्या आधारे किनवटची पोटनिवडणूक जिंकली.

केवळ सत्ता संपादन करणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट नसले तरी भारिप-बहुजन महासंघाने राजकारणाला तमाम बहुजन समाजाच्या हिताच्या दृष्टीने समाजकारणाची जी जोड दिली आहे ती महत्त्वाची आहे. एका बाजूला प्रस्थापित सत्ताधाऱ्यांबरोबर संघर्षाचे राजकारण तर दुसऱ्या बाजूला पुरोगामी परिवर्तनाची समाजकारणे अशी भारिप-बहुजन व्यूहनिती आहे. १९९० मध्ये महासंघाच्या वतीने अकोला जिल्हाधिकारी कार्यालयावर मंडल आयोगाच्या समर्थनार्थ काढलेला मोर्चा हा पुरोगामी समाजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. भविष्यकाळात महाराष्ट्रात तिसरी शक्ती

म्हणून भारिप-बहुजन महासंघ निश्चितपणे उभा राहिल असे दिसते. मात्र दलित आणि बहुजनांचे राजकारण या सर्व बाबतीत यशस्वी होणे गरजेचे आहे. भारिप-बहुजन महासंघाचे राजकारण कितपत यशस्वी होईल, याविषयी भारिप राज्य अध्यक्ष अर्जुन डांगळे म्हणतात, भारिप-बहुजन महासंघाच्या सत्ता हस्तगत करण्याचा उद्देश आहे. परंतु सत्ता जरी मिळाली नाही तरी किमान राजकीय ताकद म्हणून उभे राहू इच्छितो. आम्ही सत्तेच्या दिशेने झेपावतोय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, सत्ता हे समाज परिवर्तनाचे हत्यार झाले पाहिजे. त्यासाठी आम्ही अनेक लढे उभे केले. समग्र व्यवस्था बदलण्यासाठी सत्ता मिळविणे गरजेचे वाटते. त्यासाठी भावी काळातील सत्तेच्या लढाईसाठी भारिप-बहुजन महासंघाचे राजकारण निश्चित यशस्वी होईल.[५०]

महाराष्ट्रात काँग्रेस व भाजपा-शिवसेना यांना शत्रू मानून भारिप-बहुजन महासंघाने समाजाला जागृत करण्याचे काम सुरू केले आहे. भविष्यकाळात होणाऱ्या निवडणुकीत इतर डाव्या पक्षांना बरोबर घेवून राजकीय सत्ता संपादन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यासाठी भारिप-बहुजन महासंघाने भारतीय कम्युनिस्ट पक्ष डॉ. दत्ता सामंत कामगार आघाडी यांना घेवून 'बहुजन श्रमिक समिती' ची स्थापना केली आहे. भविष्यात भारिप बहुजन महासंघाने जी नवी व्यूहनिती विकसित केली तिला डॉ. आंबेडकरांच्या विचारांचाच पाया असल्याचे दिसते. बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या काळात दलितांना इतर समविचारी पक्ष व लोकांच्या सहकार्याने सर्व शोषित पीडितांचे संघटन करून राजकीय सत्ता हस्तगत करावी असे सुचविले होते. या बाबासाहेबांच्या विचारानुसार प्रकाश आंबेडकर दलितांऐवजी सर्व बहुजन समाजावर भर देवून राजकारण करताना दिसतात.

बहुजन समाज पक्ष व भारिप बहुजन महासंघ बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली. परंतु या पक्षाचे मजबूत संघटन होवू शकले नाही. हा पक्ष गटागटात विभागला गेला. पण प्रकाश आंबेडकरांनी पुर्नबांधणी केली. रिपब्लिकन पक्ष हा समाजातील इतर मागासांना घेवून राजकारण करीत आहे. रिपब्लिकन पक्षापेक्षा भारिप-बहुजन महासंघ व्यापक भूमिका घेवून दलित मुक्तीचा विचार करीत आहे. दलित पँथरने १९७२ नंतर वर्गीय आणि जातीय अशा दोन्ही पातळ्यांवर लढा दिला. परंतु पँथरलाही फुटीचे गालबोट लागले.

भारतीय दलित पँथरच्या रूपाने १९७६ नंतर महाराष्ट्रात तरुणांचे संघटन झाले. पँथरने संसदबाह्य राजकारण करून आक्रमकपणे वर्गीय व जातीय व्यवस्था बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु भारिप-बहुजन महासंघ संसदीय व्यवस्थेत राहून व संसदीय व्यवस्थेला बहिष्कृत राजकीय लढे देत आहे.

१९८४ नंतर देशात मा. काशिराम यांचे नवे नेतृत्व उदयास आले. त्यांच्या राजकारणांचा थोडा फार प्रभाव देशाच्या राजकारणांवर पडताना दिसतो. काशिराम यांच्या नेतृत्वाखाली बहुजन समाज पक्ष अलिकडच्या काळात उत्तर प्रदेशात सत्ता मिळवू शकला. परंतु भारिप-बहुजन महासंघ व बहुजन समाज पक्ष यांच्या वैचारिक भूमिकांत फरक आढळतो. काशिराम यांच्या बसपाचा प्ररुत्न हा बनिया, ठाकूर या वर्गाच्या शोषणापासून बहुजनांना मुक्त करण्याचा आहे. तर भारिप-बहुजन महासंघाचे संघटन हे जात आणि वर्ग या दोन्ही पातळ्यांवर आहे.

भविष्य काळात प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारिप-बहुजन महासंघ राजकीय सत्ता हस्तगत करू पाहात आहेत. दलितांसह सर्व बहुजनांची ते 'तिसरी शक्ती' म्हणून उभी करण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु त्यांच्या या नव्या राजकीय व्यूहनितीला समाजातील ८५% बहुजनांनी पाठिंबा दिला तरच ती यशस्वी होईल.

## ५.४ बहुजन समाज पार्टी (१९७२-२००२) :-

बहुजन समाज पार्टीचे संस्थापक अध्यक्ष कांशीरामजी यांचे पूर्ण नाव काशीराम हरिसिंह रामरसिया होय. त्यांचा जन्म १५ मार्च १९३४ मध्ये पंजाब राज्यातील रोपर जिल्ह्यातील बुंगासाहेब या गावी झाला. त्यांच्या आईचे नाव किशन कौर होते. त्यांना दोन भाऊ व चार बहिणी होत्या. त्यांची शिक्षण खवासपूर येथे झाले. त्यांचे पूर्वज रामरसिया चमार या अनुसूचित जातीचे होते. धर्म परिवर्तन केल्याने ते रामरसिया शीख बनले. काशीरामजींनी सुद्धा परंपरेनुसार केस वाढविलेले होते पण त्यांना ते मान्य नव्हते. म्हणून त्यांनी स्वत:चे केस कापून टाकले. बी. एस्सी.ची परीक्षा पास झाल्यावर त्यांनी १९५७ मधे सर्व्हे ऑफ इंडिया परीक्षा पास झाले. पुढे प्रशिक्षणार्थिंनी बॉंड लिहून द्यावा लागत होता. परंतु स्वाभिमानी व स्वतंत्र विचारांचे व्यक्तिमत्त्व असलेल्या काशीरामजींनी ते नाकारले व नोकरी सोडली. पुढे त्यांनी किर्ती एक्सप्लोसिव रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट लॅबोरेटरी

पुणे येथे सा. शास्त्रज्ञ पदावर काम सुरू केले. पुढे आपण वैज्ञानिक म्हणून जीवन जगणार असे ठरवून काम करीत होते. त्यावेळी त्यांच्या जीवनात एक प्रसंग घडला. महाराष्ट्राच्या परंपरेनुसार डी. आर. जे. एस. मध्ये बुद्धजयंती व डॉ. आंबेडकर जयंतीची सुट्टी होती. परंतु मनुवादी अधिकाऱ्यांनी बुद्धजयंतीची सुट्टी दिवाळीच्या सुट्टीत व आंबेडकर जयंती ऐवजी टिळक जयंती केली. त्यामुळे कर्मचारी नाराज झाले. त्यांनी प्रशासनाला विरोध केला. त्यामध्ये प्रखर व खंबीर विरोध चूडा (भंगी) जातीच्या दिनभानांनी केला. कोर्टात केस टाकली. त्यांना निलंबित करण्यात आले. त्यांना काशीरामजींनी आर्थिक मदत केली. संरक्षण मंत्रालयाकडे तक्रार केली व दिनभानचे निलंबन रद्द झाले. या घटनेचा त्यांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. याच दरम्यान त्यांना 'एनिव्हिगेशन ऑफ कास्ट' हे पुस्तक वाचायला मिळाले. हे पुस्तक त्यांनी ११ वेळा वाचले व आयुष्यातील महत्त्वाचा निर्णय घेतला.

१९६४ मध्ये त्यांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व आपल्या आईला २२ पानी पत्र पाठविले व त्यामध्ये पाच प्रतिज्ञा केल्या.

१) आयुष्यात लग्न करणार नाही.

२) स्वत:च्या नावावर संपत्ती कमवणार नाही.

३) आयुष्यात कधीच घरी जाणार नाही.

४) या देशात राजकीय सत्ता स्थापन करणार.

५) सारा भारत बौद्धमय करणार.[५१]

या पद्धतीने त्यांनी पुण्यात एक खोली भाड्याने घेतली व आर. पी. आय. च्या नेत्यांना भेटले व आंबेडकरांच्या विचाराने काम करण्याचे आवाहन केले. पण कोणीच ऐकले नाही. त्यावेळी एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली की दलित समाज अधिक दुबळा आहे. त्यामुळे नेतेही दुबळे आहेत. ते लगेच प्रस्थापितांना विकले जातात . म्हणून समाजाला न विकणारा समाज बनविणार, त्यासाठी त्यांनी पुण्यातील सरकारी नोकरांना एकत्र करण्यास सुरुवात केली. व आंबेडकर मुव्हमेंट समाजावून सांगितली.[५२]

१४ ऑक्टोबर १९७१ ला एस. सी., एस. टी., ओबीसी मायनॉरिटी कम्युनिटीज एम्पलॉईज फेडरेशन पुणे ही संघटना स्थापन केली व १ जून १९७२ मध्ये दिल्लीवरुन 'अनटचेबल इंडिया' इंग्रजी मासिक सुरू केले. ६ डिसेंबर १९७३ ला दिल्ली येथूनच बामसेफ स्थापन करण्याची घोषणा केली व त्या नियोजनासाठी १७ ते २३ फेब्रुवारी १९७८ ला देवळाली, नाशिक येथे राष्ट्रीय स्तरावरील एक केडर कॅम्प घेतला. ६ डिसेंबर १९७९ ला दिल्ली येथे बामसेफची स्थापना केली. दिल्लीवरून 'ऑपरेण्ड इंडिया' इंग्रजी मासिक सुरू केले. १९७९ मध्ये आंबेडकरांचे पुर्नजागरण व पुर्नस्थापनेमध्ये 'होऊ शकेल' परिसंवाद ९ राज्यांत घेतले. नागपूर येथे बामसेफचे प्रथम अधिवेशन घेतले. ९ राज्यामध्ये डॉ.आंबेडकरी फिरते मेळावे घेतले. १९८० पासून नागपूरपासून 'बहुजन नायक' मराठी साप्ताहिक सुरू केले. दिल्लीत बामसेफचे २ रे अधिवेशन घेतले. १५ वा धम्म प्रवर्तन दिनी दिल्लीत २ रे अधिवेशन झाले व बुद्धिष्ट व्हिला येथे सेंटरची स्थापना केली.[५३]

६ डिसेंबर १९८१ मध्ये दिल्लीत बाबासाहेबांच्या २५ व्या महानिर्वाण दिनी डि. एस. फोर (दलित शोषित संघर्ष आघाडी) स्थापन केली. डि. एस. फोरने निवडणुका लढविल्या व यश मिळाले. २४ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर १९८२ पुणे करार धिक्कार परिषद प्रमुख ३० शहरात घेतली. 'चमचा युग' पुस्तक लिहिले केले. दिल्ली येथे 'मागसवर्गीयांची समस्या हीच खरी भारताची समस्या' यावर परिसंवाद घेतला. १५ मार्च ते २४ एप्रिल १९८३ दिल्लीपासून ३००० कि. मी. ४० दिवसांचा सायकल मोर्चा काढला. समता स्वाभिमानासाठी संघर्ष म्हणून १४ एप्रिल १९८४ मध्ये लाल किल्ल्यावर बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. १ ले अधिवेशन घेतले. बहुजन समाज गुलाम, लाचार परिषदा पुणे येथे घेतली. १०० दिवसांची सायकल रॅली, आरक्षणावर ५ परिसंवाद व ५०० चर्चसत्र, देशभर भाईचारा बनाओ दिन, बहुजन समाज पार्टीने सामाजिक परिवर्तनासाठी ५ उद्देश ठरविले. १) आत्मसन्मानासाठी संघर्ष, २) मुक्तीसाठी संघर्ष, ३) समतेसाठी संघर्ष, ४) जाती प्रथेचा नाश व विभाजित समाजातील बंधूभावांसाठी संघर्ष, ५) अस्पृश्यता, अन्याय, अत्याचार व आतंकवादाविरुद्ध संघर्ष. [५४]

त्यांच्या घोषणा खालीलप्रमाणे होत्या -

१. जयभिम का नारा है, भारत देश महारा है।

२. वोट हमारा राज तुम्हारा । नहीं चलेगा नहीं चलेगा।

३. जिसकी जितनी संख्या भारी । उसकी उतनी भागीदारी ।

४. जो बहुजनो की बात करेगो। वो दिल्ली पर राज करेगा।

५. अब बहुजन की बारी है । इक्कीसवी सदी हमारी है।[५५]

डॉ. आंबेडकरांनी १९५२ मध्ये जनता मासिकात हत्ती निशाणीबाबत लिहिले होते, ''गाई गुरांची नरडी घोटून पोसलेली वाघ सिंहाची क्रूर शक्ती आणि हत्तीची निष्पाप बलाढ्य शक्ती यामध्ये जितका फरक आहे तद्वतच भांडवलदारांच्या मक्तेदारीवर कष्टकरी बहुजन समाजाच्या रक्तावर पोसलेली इतर राजकीय पक्ष आणि माझा पक्ष यांच्यात फरक आहे. म्हणूनच माझ्यापटक्षाची अधिकृत निशाणी 'हत्ती' आहे.[५६]

म्हणून बसपाने 'हत्ती' ही निशाणी घेतली. मा. काशीराम म्हणतात, ''माझ्या कल्पनेतील भारत सम्राट अशोकाच्या भारतासारखा आहे.'' संपूर्ण भारतीय उपखंड बुद्धमय करणे हे बाबासाहेबांचे स्वप्न साकार करएण्यासाठी म्हणतात, ''आम्ही सत्तेवर आल्यानंतर आगामी दहा वर्षात भारत हा जगातील सर्वात समृद्ध देशांपैकी एक असेल. तो मानवीय सहृदयता व संवेदनायुक्त असेल. भारत कोणाचे शोषण करण्याची इच्छा धरणार नाही तसेच स्वत:चे शोषण सुद्धा होऊ देणार नाही. तो काहीसा सम्राट अशोकाच्या भारतासारखा असेल.''[५७]

बसापाचे मुख्य उद्दिष्ट देशामध्ये सामाजिक व आर्थिक समानता आणणे, भारतामध्ये मनुवादी व्यवस्थेमुळे अन्यायी व असमानतेची सामाजिक व्यवस्था होती. ती बदलून मानवतावादी व माणुसकीवर आधारित समाजावादी व्यवस्था बनवू इच्छितो. त्याचवेळी उच्च-नीच, छोटे-मोठे, गरीब-श्रीमंत हे भेदभाव नष्ट होऊन सामाजिक, आर्थिक समता प्रस्थापित होईल यासाठी डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला उपाय म्हणजे 'राजसत्ता' व राजसत्ताही सर्व समाजाची सोडवणूक करणारी गुरूकिल्ली आहे. बहुजन समाजाच्या मतदानावर राज्यकर्ते बनलेले आपले भले करीत

नाहीत, त्याकरता बहुजन समाजातील लोकांना तयार करून निवडणूक लढविण्यास सिद्ध केले. अशा प्रकारे बसपाने देशपातळीवर राजकारणात भाग घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीस त्यांनी उत्तर प्रदेशातील निवडणूका लढविल्या. १९८५ मध्ये त्यांना २% मतदान झाले. परंतु काँग्रेसचे १६५ उमेदवार पडले.[५८]

याच दरम्यान बसपाने फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार सुरू केला. दलितांच्यासाठी वेगवेगळ्या सुविधा निर्माण केल्या. दक्षिण भारतात पेरीयार रामस्वामी, तामिळनाडू व केरळमध्ये नारायण गुरू यांनी केलेले अंधश्रद्धा जाती निर्मूलनाचे कार्य लोकांना सागून एकएका समाजातील महापुरुषांची आठवण करून देणे सुरू केले. मा. काशीरामजींना अविरत मेहनत व निष्ठावान कार्यकर्त्यांची साथ मिळाली. बसपाने १५% विरुद्ध ८५% चा सिद्धांत मांडला व ६००० जातीत विभागलेल्या समाजाला निळ्या झेंड्याखाली एकत्र आणायला सुरुवात केली. मुस्लिम, शीख, जैन, ख्रिश्चन यांनाही प्रतिनिधित्व दिले.

१९८९ च्या निवडणुकीत बसपाचे थोडे मतदान वाढले. पण काँग्रेस ४९% वरून ३८% वर आली. १९९१ च्या निवडणुकीत बसपाचे दोन खासदार व १५ विधानसभा सदस्य विजयी झाले. २% वरून १% मतदानात वाढ झाली. बसपाच्या वाढत्या जनाधारामुळे उत्तरप्रदेशातील राजकारण ढवळून निघाले व काही धर्मनिरपेक्ष पक्ष बसपाबरोबर युती करण्याचा विचार करू लागले. १९९३ मध्ये सपा व बसपा युती करून विधानसभा लढविली. बसपाची आणखी २% मते वाढली व ६७ सदस्य निवडून आले. सत्तेत ४०% वाटा मिळाला. पुढे सपाने बसपाला संपविण्याचे प्रयत्न सुरू केले. मायावतींवर जीवघेणा हल्ला झाला. भाजपने बसपाला मदत केली व ३ जून १९९५ ला बसपाच्या नेत्या सुश्री बहन मायावती उत्तर प्रदेशात मुख्यमंत्री झाल्या. पुढे साडेचार महिन्यांनी भाजपने पाठिंबा काढून घेतला. परंतु बहन मायावती यांनी सोडेचार महिन्यात केलेली कामे महत्त्वपूर्ण होती. आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष, डॉ. आंबेडकर ग्रामविकास योजना जाहीर केली. महाराष्ट्राने सुद्धा ही योजना अंमलात आणली नाही. रस्ते, विद्युतीकरण, ग्रामविकास, इंदिरा आवास, ट्युब वेल, सूर्यचुली, महिला विकास, पाणी पुरवठा, प्राथमिक शाळा, सर्व शिक्षण अभियान, साक्षरता, प्रौढ शिक्षण, शेतकरी निवृत्ती योजना, शिष्यवृत्ती, विधवा निवृत्ती

वेतन, बालविकास, आंगणवाडी, शेतीचे वाटप, जागा जमिनीचे वाटप, घरे वाटप, मत्स्यपालन, कुटिरोद्योग, जमीनीच्या पट्ट्याबाबत, बालकांना लसीकरण, दवाखाने, मोफत बोरिंग योजना, अपंग निवृत्ती वेतन, अपंगांना सहाय्य, गटारे बांधणे, शौचालयाची व्यवस्था, महिला दुग्ध व्यवसाय, दुग्धजन्य व्यवसाय, प्राण्यांचे लसीकरण, कृत्रिम रेतन, रेशमी उद्योग विकास, दारुबंदी असे ३७ कार्यक्रम हाती घेतले होते. त्यातील प्रमुख ११ योजनांवर भर दिला. [५९]

साडेचार महिन्याच्या काळातील १५८२ गावे पक्क्या रस्त्याने जोडली. ११६६ गावात विज पोहचवली, अनुसूचित जातीच्या ५३७८३ घरात शौचलये बनविली. ८३५०६ वृद्ध व ११७८९ विधवांना निवृत्ती वेतन दिले. ३९१६ गटारांची व्यवस्था केली. ४६९३४ इंदिरा आवास घरे बांधली. १८१७२ कुटुंबांना आय. आर. डी. पी. मधून मदत केली. या योजनेतून ९२ लाख अनुसूचित जाती जनजातीच्या लोकांना फायदा झाला.[६०]

बसपा सरकारच्या कामगिरीचा प्रचार व प्रसार जवळच्या राज्यामध्ये झाल्याने त्याचा त्यांना फायदा झाला. १९९६ च्या झालेल्या निवडणुकीत उत्तरप्रदेशात १४ विधानसभा सदस्य, राजस्थानमध्ये २ आमदार, जम्मू-काश्मिरमध्ये ४ आमदार, मध्यप्रदेशमध्ये ११ आमदार, बिहारमध्ये ५ आमदार, पंजाबमध्ये ९ आमदार व विरोधी पक्षनेतेपद, हरियानामध्ये १ आमदार, गुजरातमध्ये गांधीनगरमध्ये कु. चावला या महापौर झाल्या. बसपाच्या या जनाधाराच्या जोरावरच १९९६ मध्ये बसपाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाली. त्यावेळी राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवणारा हा ८ वा पक्ष होता. आज संपूर्ण भारतातील प्रत्येक राज्यातील राजकारण व समाजकारणाची समीकरणेच बसपामुळे बदलून गेली. बसपाने केवळ उत्तर भारतातच आपली चळवळ वाढविली नाही तर दक्षिण भारततही त्यांनी कर्नाटकमध्ये २ आमदार तसेच अनेक ग्रामपंचायती, तालुका, जिल्हा परिषद मध्ये आपल्या पक्षाची माणसे निवडून आणली. तामिळनाडूमध्ये पेरिया रामास्वामींना मानणारा वर्ग जास्त आहे. परंतु तेथील राजकारण सच्चर जातीभोवतीच फिरत असल्याने तेथील समाज बहुजन समाज पक्षाबरोबर येऊ लागला. बसपाने परियार रामस्वामी यांना संपूर्ण भारतात पोहचविले. त्यांचे विचार समाजाला पटवून दिले. त्यामुळे बसपाला तामिळनाडून जनधार वाढत गेला.[६१]

बसपाने केरळमध्येही आपली जोरदार मुसंडी मारली. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे फुले यांना मानणारा मोठा वर्ग आहे, त्याप्रमाणे केरळात नारायण गुरू होते. बसपाने नारायण गुरू यांना मानणारा समाज बहुजन समाज पक्षाच्या निळ्या झेंड्याखाली आणला. आंध्रप्रदेशातही काही जिल्हा मंडळ, पंचायत सदस्य बसपाची आहेत. बसपाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मा. काशीराम यांना १५ सप्टेंबर २००३ (हैद्राबाद) मध्ये ब्रेनस्ट्रोकचा झटका आला व बहन मायावती यांनी बसपाची धुरा सांभाळली.

आता फुले-शाहू-आंबेडकर यांचे समाजकारण करणारी निळा झेंडा व जय भिमचा नारा देणारी बसपा ही भारतातील ३ ऱ्या क्रमांकाची राष्ट्रीय पार्टी बनलेली आहे. उत्तर प्रदेशात २००० साली जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत बसापाचे सर्वाधिक ५३७ जिल्हा परिषद सदस्य निवडून आले. ही सर्व सफलता बसपाने कोणाशीही हातमिळवणी न करता स्वबळावर मिळवलेले यश आहे. उत्तर प्रदेशात बसपाच्या नेतृत्वाखाली ३ वेळा सरकार बनले. १९९५, १९९७ आणि २००२ व तिन्हीवेळी बहन मायावती मुख्यमंत्री बनल्या. आज तर उत्तर प्रदेशात बसपाचे २१० आमदार आहेत व बसपा स्वबळावर सत्तेवर आहे. मा. काशीराम यांच्यानंतर बसपाला त्याच तोडीचे बहन मायावती यांचे नेतृत्व मिळाले.

बसपाने केवळ ६ वर्षात संपूर्ण उत्तर प्रदेश फुले-शाहू-आंबेडकरमय करून टाकला. बहुजन समाजातील सर्वच महापुरुषांना सन्मान मिळवून दिला. त्यांच्या कार्याची आठवण रहावी तसेच त्यांची शिकवण आपण अंगिकारल्यास आपण यशस्वी जीवन जगू शकतो या प्ररणेसाठी बसपाने त्यांची चिरंतन स्मारके बनविली. जगातील पर्यटक भारतात यावेत यासाठीच बौद्ध स्थळांचा विकास केला. बाबासाहेबांचे व्यवस्था परिवर्तनाचे स्वप्न साकार होऊ शकले नसले तरी शासनकर्ती जमात बनवण्याचा प्रयत्न बसपाने केला. उत्तर प्रदेशसारख्या मनुवाद्यांच्या राज्यात आंबेडकरवाद्यांनी मुसंडी मारून मनुवाद गाडण्याचा प्रयत्न केलाआहे. संपूर्ण भारतातील जातियतेचा नाश करून मानवतावादी समाज व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्‌द्शाने बसपाची वाटचाल सुरू आहे. बसपा काँग्रेसला एक नंबरचा शत्रू मानते. काँग्रेसने आजपर्यंत बहुजन समाजाची फसवणूक केली आहे.[६२]

मा. काशीराम यांचे ९ ऑक्टोबर २००६ ला दिल्ली येथे निर्वाण झाले. त्यापूर्वी बसपाचे सर्व सूत्रे मा. बहन मायावती यांच्या हातात दिली होती. मा. बहन मायावती यांनीही नेतृत्व केले व बसपाची घोडदौड चालु ठेवली.

**बसपाचे कार्य १९९५ :-**

१. उत्तर प्रदेशच्या अंदाजपत्रकात अनुसूचित जाती व जनजाती यांच्या विकासासाठी २१% खर्च करण्याचा निर्णय.

२. कल्याणकारी योजनांची जलद गतीने कार्यान्वीत करण्यासाइी चार विभाग - आंबेडकर ग्राम विकास योजना, इतर मागासवर्गीय विकास योजना, अपंग कल्याण योजना, अल्पसंख्यांक कल्याण योजना.

३. दुर्बलांच्या सुरक्षितता भावनेस वाढीसाठी प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये २०% अनु. जाती / जमाती, २५% इतर मागसवर्गीय व ८% अल्पसंख्यांक ठाणे प्रमुख नेमण्याचे आदेश.

४. ३१ डिसेंबर १९९५ पर्यंत ५ हजार आंबेडकर गावांमध्ये मोफल बोरींग, मलनि:सरण व गटारे, इंदिरा आवास घरे, पाणीपुरवठा रस्ते व विद्युतीकरण पुर्ण करण्याचा संकल्प.

५. भूमिहिनांना एक-एक एकर जमीन देण्याचा निर्णय.

६. लॉटरी पूर्णपणे बंद.

७. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कची कोनशिला लखनौ १५.८.१९९५.

८. आग्रा विद्यापीठाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वविद्यालय नामकरण २४.९.१९९५.

९. आग्रा स्टेडियमला एकलव्यचे नाव १९९५.

१०. इतर मागासवर्गीय व मुस्लिमांना जातीचे दाखले त्वरीत मिळावेत असे शासकीय आदेश व २७% आरक्षण पुर्ती आदेश.

११. लखनौमध्ये परिवर्तन चौकाचे निर्माण - १९९५.

१२. डॉ. आंबेडकर वसतिगृह, गोकुळपुरा, आगराच्या सुधारणेसाठी पाच लाख रुपयांचे सहाय्य २४.९.१९९५.

१३. डॉ. आंबेडकर नगर जिल्ह्याची निर्मिती २९.९.१९९५

१४. बौद्ध पर्यटन विकासाकरीता दक्षिण कोरिया, थायलंड व जपान देशांचा बहन मायावतींचा दौरा दि. ३.१०.९५ ते १०.१०.९५.

१५. शाहुजी महाराज विश्वविद्यालय कानपूर १९९५.

१६. महात्मा ज्योतीबा फुले मुक्त एकर कंडिशन ऑडीटोरियम लखनौ १९९५.

१७. श्रावस्ती विमानतळाचा कोनशिला - १९९५.

१८. उधमसिंह नगर जिल्ह्याची निर्मिती - २९.९.९५.

१९. १०.२७ लाख शेतकऱ्यांना 'शेतकरी निवृत्ती योजनेचा' लाभ.

२०. ३१४१ प्राथमिक शाळा व ७४१ उच्च प्राथमिक शाळांची स्थापना.

**बसपाचे कार्य १९९७ :-**

१. डॉ. आंबेडकर राजकीय डिग्री कॉलेज, उँचाहार रायबरेलीचे उद्घाटन ३.६.१९९७.

२. डॉ. आंबेडकर पुस्तकालय व संग्रहालय, रामपूरची निर्मितीची घोषणा व ४५ लाख रुपये मंजूर ६.४.९७.

३. डॉ. आंबेडकर इंटर कॉलेज, इझारी, मुरादाबादची स्थापना ६.४.९७.

४. डॉ. आंबेडकर पुलिस ॲकॅडमी मुरादाबादची स्थापना ६.४.९७.

५. रमाबाई आंबेडकर महिला महाविद्यालय, गजरौला मुरादाबादरचे नामकरण ६.४.९७.

६. कौशांबी जिल्ह्याची निर्मिती ४.४.९७.

७. महात्मा फुले नगर जिल्ह्याची निर्मिती ६.४.९७.

८. डॉ. भीमराव आंबेडकर पार्क कैलाशपूर, सहारपूरची स्थापना ११.४.९७.

९. गागल हेडी, सहाराणपूर येथे म. फुलेंच्या पुतळ्याची स्थापना ११.४.९७.

१०. डॉ. आंबेडकर विश्वविद्यालय, लखनऊमध्ये डॉ. आंबेडकर चेअरची स्थापना व प्रशासकीय भवनचे उद्घाटन १४.४.९७.

११. डॉ. आंबेडकर पर्यावरण परिषद, लखनौचे उद्घाटन १४.४.९७.

१२. डॉ. आंबेडकर गौरव पुरस्काराची स्थापना १४.४.९७.

१३. डॉ. आंबेडकर पुल लखनौचे नामकरण १३.४.९७.

१४. डॉ. भिमराव आंबेडकर ग्रामोद्योग, औद्योगिक मिशनचा शुभारंभ १४.४.९७

१५. डॉ. आंबेडकर पर्यावरण म्युझियम, लखनौसाठी पाच करोड रुपयांची घोषणा १४.४.९७

१६. डॉ. आंबेडकर मेळाव्याचे लखनौ येथे आयोजन १४.४.९७ ते १७.४.९७.

१७. डॉ. आंबेडकर प्रदर्शनी लखनौ येथे आयोजन १४.४.९७.

१८. डॉ. आंबेडकर पार्क लखनौमध्ये बाबासाहेबांच्या दोन पुतळ्यांचे अनावरण १४.४.९७

१९. ज्योतीबा फुले राजकीय स्वेच्छाकार आश्रमशाळा लखनौचे उद्घाटन १४.४.९७

२०. डॉ. भिमराव आंबेडकर क्रिया संकुल, लखनौचे उद्घाटन १५.४.९७.

२१. डॉ. आंबेडकर कोचिंग सेंटर, अलिगढची कोनशिला - १.५.९७.

२२. डॉ. आंबेडकर पीठ, आगरा विश्वविद्यालय स्थापन - १.५.९७.

२३. प्रत्येक जिल्ह्यात गौतम बुद्ध विद्यार्थी वसतिगृह स्थापण्याचा निर्णय - १.५.९७.

२४. गौतम बुद्ध विद्यार्थी वसतिगृह, मुकुंदपूर अलिगढ स्थापना १.५.९७.

२५. महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे छुटमलपूर चौराहा सहाराणपूर येथे अनावरण १.५.९७.

२६. अहिल्याबाई होळकर चौक अतिगढची निर्मिती - १.५.९७.

२७. सरसौल बस स्थानक अलिगढचे बुद्ध विहार स्थानक नामकरण - १.५.९७ नगरचा कोनशिला ४.५.९७.

२८. गौतम बुद्ध नगर जिल्ह्याची स्थापना ६.५.९७.

२९. महामायानगर जिल्ह्याची स्थापना ६.५.९७.

३०. ज्योतीबा फुले नगरमध्ये महात्मा ज्योतीबा फुलेंच्या पुतळयचे अनावरण ६.५.९७.

३१. डॉ. आंबेडकर इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी फॉर हँडीक्राफ्ट कानपूरचे उद्घाटन १०.५.९७.

३२. राजर्षि शाहू महाराज यांच्या पुतळ्याचे शाहुजी महाराज विश्वविद्यालय कानपूर मध्ये अनावरएण ११.५.९७.

३३. बिलसीरी बदायू येथील संत रविदास धर्म शाळेला १० लाख मंजूर १६.५.९७.

३४. राजर्षि शाहू महाराज जिल्ह्याची स्थापना १३.५.९७.

३५. डॉ. आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह महाराजगंज येथे स्थापना ११.५.९७.

३६. डॉ. आंबेडकर भवन आजमगढ येथे स्थापना ११.५.९७.

३७. सावित्रीबाई फुले महिला डिग्री कॉलेज चांदोली नामकरण २०.५.९७.

३८. संत रविदास पार्कची वाराणसी येथे बनविण्याची घोषणा - २०.५.९७.

३९. संत रविदास अनु. जाती / जमाती प्रशिक्षण संस्था वाराणसी येथे स्थापन करण्याची घोषणा २०.५.९७.

४०. संत रविदास मंदिर बिलसी बदायू मध्ये रविदासांच्या मोठ्या पुतळ्यास मंजूरी १६.५.९७.

४१. संत रविदास सेतू हे पुलाचे नाव ठेवण्याचे जाहीर २०.५.९७.

४२. संत रविदास स्मारक व पार्क येथे रविदासांचा पुतळा बसविण्याची घोषणा २०.५.९७.

४३. संत रविदास पॉलिटेक्निक चकीया चंदोली येथे स्थापन २०.५.९७

४४. एकलव्य स्टेडियम आगरासाठी ५० लाख रूपये घोषित.

४५. प्पिरहवा, कपिल वस्तूमध्ये विमानतळ, प्रेक्षकगृह, बौद्ध कलासंग्रह, बौद्ध संग्रहालाय व हेरिटेज पार्कचा कोनशिला २२.५.९७.

४६. पडरौना जिल्ह्याचे नाव बदलून कुशिनगर ठेवले २२.५.९७.

४७. श्रीवस्ती जिल्ह्याची निर्मिती २५.५.९७.

४८. महामाया महिला डिग्री कॉलेज स्थापनेचा निर्णय २२.५.९७.

४९. डॉ. आंबेडकर ज्युबली हॉल आगाराची कोनशिला २२.५.९७.

५०. डॉ. आंबेडकर कोचिंग सेंटर आगरा येथे स्थापन २५.५.९७.

५१. डॉ. आंबेडकर हायस्कूल शिकरापूरसठी पाच लाख मंजूरी २३.५.९७ व

५२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजकीय डिग्री कॉलेज उँचाहा रायबरेलीचे उद्‌घाटन ३.६.९७

५३. डॉ. आंबेडकर इंटर कौंलेज उँचाहार रायबरेलीसाठी नवीन इमारतीकरीता १० लाख रुपयांची घोषणा ३.६.९७.

५४. डॉ. आंबेडकर कृषी अभियांत्रिकी महाविद्यालय इटावा नामकरण १९.६.९७.

५५. डॉ. आंबेडकर इन्टर कॉलेज सवैइया धनी रायबरेलीकरीता दहा लाख रुपयांची घोषणा ३.६.९७.

५६. डॉ. आंबेडकर विहार कॉलनी इलाहाबाद यास मान्यता २२.६.९७.

५७. डॉ. आंबेडकर चिकित्सालय इटावाच्या इमारतीसाठी एक करोड रुपयांची घोषणा १९.६.९७.

५८. एकलव्य युवा केंद्र इटावाचे नामकरण १९.६.९७.

५९. गौतम बदुध उद्यान इटावा येथे कोनशिला १९.६.९७.

६०. महात्मा फुले स्टेडीयम इटावा असे नामकरण १९६.९७.

६१. संत रविदास पुरस्काराची स्थापना १९९७.

६२. बिजली पासी किल्ला लखनौचा जिर्णोद्धार १.७.९७.

६३. बिलसी पासी किल्ला लखनौ येथे बिजली पासी यांच्या पुतळ्याचे अनावरण १.५.९५.

६४. अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याचे अनावरण १.७.९७.

६५. कर्पूरी ठाकूर यांच्या पुतळ्याचे अनावरण १२.७.९७.

६६. सावित्रीबाई फुले महिला वसतीगृह मेरठ येथे कोनशिला १.७.९७.

६७. भागिदारी भवनमध्ये शाहू महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण २०.७.९७.

६८. शाहू मेळा व प्रदर्शनीचे आयोजन लखनौ - २६.७.९५.

६९. महात्मा फुले विश्वविद्यालय असे रुहेलखंड विश्वविद्यालय बरेलीचे नामकरण ७.७.९७.

७०. डॉ. भिमराव आंबेडकर जन्मशताब्दी महाविद्यालय धनसारी, अलिगढ उद्घाटन १२.७.९७.

७१. महामाया महाविद्यालय, इन्टर कॉलेज व ज्युनिअर हायस्कूल श्रावसनी येथे उद्घाटन १२.७.९७.

७२. डॉ. आंबेडकर गेस्ट हाऊस लखनौचे उद्घाटन २५.७.९७.

७३. डॉ आंबेडकर पार्क गौतम बुद्धनगर येथे निर्माण २७.७.९७.

७४. आंबेडकर हवाई पट्टी मेरठचे उद्घाटन १९.७.९७.

७५. हजरतगंज चौकात लखनौमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तांब्याच्या पुतळ्याची स्थापना १४.७.९७.

७६. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळा कम्पनी बाग कानपूरमध्ये अनावरण २६.७.९७.

७७. डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्याचे गोमती नगर लखनौमध्ये अनावरण १६.७.९७.

७८. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची नबाबगंज, कानपूर येथे स्थापना २६.७.९७.

७९. गौतम बुद्ध नगर विश्वविद्यालय, गौतम बुद्धनगरचा कोनशिला २७.७.०५.

८०. गौतम बुद्ध नगर जिल्हा व गौतम बुद्ध पार्क स्थापन करण्याचा निर्णय २७.७.९७.

८१. गौतम बुद्ध नगर टर्मिनल बरेलीचे उद्घाटन २३.७.९७.

८२. गौतम बुद्ध राजकिय डीग्री कॉलेज फैजाबाद स्थापनेची घोषणा ३.७.९७.

८३. कानपूरमध्ये गौतम बुद्धांच्या पुतळ्याची स्थापना २६.७.९७.

८४. दिल्ली गौतम बुद्ध नगर सीमेवर गौतम बुद्धांच्या पुतळ्याचे अनावरण २७.७.९७.

८५. डॉ. आंबेडकर पुस्तकालय भवन उद्घाटन ५.९.९७.

८६. डॉ. आंबेडकर पुतळ्याचे गोरखपूरमध्ये उद्घाटन १.९.९७.

८७. डॉ. आंबेडकर पुतळ्याचे कुशिनगर उद्घाटन १.९.९७.

८८. डॉ. आंबेडकर संस्थान बालीयामध्ये बाबासाहेबांच्या प्रतिमेचे अनावरण ७.९.९७.

८९. रमाबाई आंबेडकर सरकारी मुलींचे इंटर कॉलेज कोटा सहाराणपूर १३.९.९७.

९०. रमाबाई आंबेडकर सरकारी मुलींचे इन्टर कॉलेज घिबराम उ. फरुखाबाद येथे स्थापण्याची घोषणा २७.९.९७.

९१. गौतम बुद्ध पार्क मानपूरचे उद्घाटन ७.९.९७.

९२. महामाया स्पोर्टस स्टेडियम गाजीयाबादचे उद्घाटन २८.७.९७.

९३. कपिलवस्तू प्राधिकरण व बौद्ध परिषदेची स्थापना १.९.९७.

९४. गौतम बुद्ध संग्रहालय गोरखपूरमध्ये गौतम बुद्ध प्रतिमेचे अनावरण २१.७.९७.

९५. संत रविदास महाविद्यालय फैजाबादचा कोनशिला ५.९.९७.

९६. संत रविदास नगर जिल्हा निर्मिती ४.९.९७

९७. संत कबीर भवन सुचना निदेशालय लखनौचे उद्घाटन ५.९.९७.

९८. संत कबीर जिल्ह्याची निर्मिती १.९.९७.

९८. संत कबीर हॅण्डलुम भवन कानपूरचे उद्घाटन ७.९.९७.

९९. संत कबीर सांप्रदायिक सद्भावना पुरस्कार सुरू सप्टेंबर ९७.

१००. कबीर भवन मुरादाबादचे उद्घाटन ६.९.९७.

१०१. अहिल्याबाई होळकर सन्मान पुरस्कार जाहीर ८.८.९७.

१०२. संत कबीर यांची प्रतिमा (पुतळा) वाराणसीमध्ये लावण्याचा निर्णय ३.९.९७.[६३]

## महाराष्ट्रातील बसपाची वाटचाल :-

बसपाच्या स्थापनेपासून संपूर्ण भारतात बसपाचा झंझावात सुरू आहे. मान्य. कांशीरामजी यांच्या भाषेत सांगावयाचे झाल्यास महाराष्ट्र हा बसपाच्या वाटचालीतील शेवटचा टप्पा आहे. कारण मनुवाद्यांनी बाबासाहेब आंबेडकरांना महाराष्ट्रापुरते मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला. बसपाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रीय नेते, राष्ट्रनिर्माते, राष्ट्राभिमानी, संविधानाचे पिता म्हणून संपूर्ण भारतात सांगितले. बाबासाहेबांनी संपूर्ण भारतीयांसाठी केलेल्या कार्याची माहिती दिल्यानेच सर्व भारतात 'जयभिम' चा नारा घुमू लागला आहे. महाराष्ट्र ही सामाजिक परिवर्तनाची जन्मभूमि आहे. याच महाराष्ट्रात म. फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाज परिवर्तनाचे, प्रबोधनाचे कार्य केले. तेथे पुन्हा या महापुरुषांविषयी सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्रातील सत्ताधारी कॉंग्रेस पार्टीने येथील बहुजन समाजाला थोडा-थोडा सत्तेचा लालीपॉप दिल्याने ते फुले, शाहू, आंबेडकरी विचार स्विकारायला घाबरतात. परंतु यांची नावे घेतल्याशिवाय ते राज्य करू शकत नाहीत.[६४]

बसपाच्या स्थापनेपासून बसपा महाराष्ट्रात जास्त लक्ष देत नव्हती. परंतु महाराष्ट्रात मनुवाद्यांची वाढ होऊ लागल्याचे दिसताच बसपाने मनुवाद्यांची वाटचाल रोखण्यासाठी महाराष्ट्रात सुरुवात करताच बसपाला जनाधार मिळू लागला. त्याचे प्रत्यंतर म्हणजे नागपूर महानगरपालिकेत नऊ नगरसेवक निवडून दमदार सुरुवात केली आहे. सोलापूर महानगरपालिकेमध्ये चंचूप्रवेश केला.

नांदेड जिल्ह्यातील पुर्णा नगरपरिषदेमध्ये १८ पैकी ७ नगरसेवक बसपाचे निवडून आल्याने तीन समित्यांची सभापती पदे मिळाली. चंद्रपूर - १, बल्लारशा - २, वर्धा - २, वळसा - १ नगरसेवक तसेच अनेक पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, काही गावची सरपंचपदे बसपाने हस्तगत करून बसपाने सुरुवात केली. त्याचप्रमाणे बसपाच्या वाढत्या जनाधारामुळे महाराष्ट्रातील सत्ताधारी कॉंग्रेस तसेच शिवसेना-भाजपाला धक्का देण्याचे काम बसपाने लोकसभा निवडणूकीत केले. त्यामुळे कॉंग्रेस-राष्ट्रवादी, शिवसेना-भाजपा यांनी बसपाला रोखण्यासाठी हमखास निवडून येणाऱ्या उमेदवाराला मतदान करण्याचे आतून आदेश दिले. त्यामुळे बसपाचा विधानसभेत प्रभाव दिसू शकता नाही. परंतु महाराष्ट्रातील शासनसुद्धा बसपाच्या झंझावाताने हलू लागले आहे, नव्हे प्रत्येक जण खाजगीत बोलताना सुद्धा बसपाचीची चर्चा करीत असतो.[६५]

बसपाने राजकीय धक्का तंत्राने राज्यकर्त्यांना हलविले आहेच परंतु बाबासाहेबांच्या नावाचे भांडवल करून जोगवा मागत फिरणारांना त्यांची जागा दाखविली असल्याने कोणी मनुवाद्यांचे चरणी लोटांगण घालू लागले, तर कोणी आपल्या बापाचा ज्यांनी अनेक वेळा अपमान केला त्यांचे चरणी लीन झाले. स्वाभिमानी भिम अनुयायी बसपाच्या कार्यावर खूष होऊन बसपाकडे आकर्षित होऊ लागला आहे. त्यामध्ये तरुण व सुशिक्षित वर्ग जास्त आहे. बसपाने महाराष्ट्रात घाटकोपर येथील रमाबाई नगरातील शहिद भिमसैनिकांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत केली. नागपूरमधील शहीदांच्या नातेवाईकांना मदत केली. उपेक्षित समाजाचे रुप आपल्या लेखणीने चव्हाट्यावर मांडले तेच उपेक्षित राहिले. त्या साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या सूनबाई सावित्रीबाई मधुकर साठे यांना आण्णाभाऊंचे चिरंतन स्मारक म्हणून आण्णाभाऊ साठे विहार नावाचे घर बांधून दिले. बसपाचे कार्यकर्ते बहुजन समाजाच्या महापुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार जसे करतात तसेच समाजाच्या अडीअडचणींची सोडवणूक करून सहकार्य व मदत करतात. बसपा ही एक दिवस राजकारण व बाकी सर्व दिवस समाजकारण करीत असते. बसपा प्रशिक्षित, निष्ठावंत व समाज ऋण फेडण्याची इच्छा असणाऱ्या कार्यकर्त्यामुळेच लोकप्रिय आहे.[६६]

## सारांश :-

५.१ **दलित पँथर -** प्रस्थापित झालेल्या आर. पी. आय. नेतृत्वाला आव्हान देत दलित शोषित समाजाच्या अन्याय अत्याचाराला क्रांतिकारी पद्धतीने विरोध करण्यासाठी पँथर ही संघटना १९७२ मध्ये निर्माण झाली. पँथरने सर्वसामान्य दलितांच्या मनामध्ये आत्मविश्वास व अन्यायाला प्रतिकार करण्याची क्षमता निर्माण केली. शिवसेना, काँग्रेससारख्या जातीयवादी संघटनांना रोखण्याचे काम केले. पण त्यांच्यातच अंतर्गत कलह सुरु झाला व पँथर फुटली. प्रस्थापितांनी पँथरच्या कार्यकर्त्यांची आर्थिक दुर्बलता ओळखली व त्याचा फायदा घेतला. त्यातच दलित नेते, कार्यकर्ते मूळ उद्दिष्टपासून बाजूला गेले.

५.२ **भारतीय रिपब्लिकन पक्ष :-** डॉ. आंबेडकरांचे नातू प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर हेही याच दरम्यान समाजकारणात उतरले. बाबसाहेबांचा पक्ष तळमळीने उभा करावा म्हणून त्यांनी भारिपला बळकटी दिली. केवळ संघर्ष करून प्रश्न सुटणार नाहीत तर आपण राजकारणात प्रवेश करून परिवर्तन करू असे त्यांना वाटले व महाराष्ट्रात त्यांना चांगले यश मिळाले. केवळ दलितांच्या मतावर आपण सत्तेपर्यंत पोहचू शकत नाही. म्हणून त्यांनी (ओबीसी) इतर मागसवर्गीयांसाठी बहुजन महासंघ हा मखाराम पवार यांच्याअध्यक्षतेखाली स्थापन केला. व त्यांनी मिळालेले यश गटातटाच्या राजकारणाने त्यांच्याविरोधात प्रस्थापितांना दलित नेतृत्व वापरलेले दिसते.

५.३ **बहुजन महासंघ** :- उत्तर प्रदेशात मा. काशीराम यांच्या बहुजन समाज पक्षाने संघटन उभे केले. त्यामध्ये दलित ओबीसी यांची त्यांनी एकजूट केली. तोच प्रयोग महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकरांनी मखाराम पवार यांच्या अध्यक्षतेखाली बहुजन महासंघ स्थापन करून केला. त्यांनी राबविलेला अकोला पॅटर्न प्रसिद्ध आहे. त्याला राजकीय यश मिळाले. प्रस्थापितांच्या वळचणीला असलेले रिपब्लिकन नेते यांना त्यांनी दाखवून दिले की आपण स्वातंत्र्यानंतर राजकारणात यश मिळवू शकतो. या भारिप-बहुजन महासंघ आघाडीलाही प्रस्थापितांनी फोडले पण प्रकाश आंबेडकर महाराष्ट्राच्या राजकारणात आज तग धरून उभे आहेत.

**५.४ बहुजन समाज पक्ष :-** डॉ. आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळीला विशाल असे नेतृत्व मिळाले नव्हते. ते मा. काशीराम यांच्या रुपाने मिळाले वआंबेडकरी चळवळ संपूर्ण भारतभर पोहचली. महाराष्ट्रातील दलित नेतृत्व व कार्यकर्ते जातीयवादी पक्षाला विकले गेले आहेत. ते आंबेडकरी समाज निर्माण करू शकत नाहीत. फक्त बहुजन समाज पार्टी निर्माण करण्यास सक्षम आहे. केवळ दलितच नव्हे तर या देशातील ओबीसी बरोबर घेऊन तर सत्तेपर्यंत जावू शकली हे. काशीराम यांनी दाखवून दिले. भारतातील सर्वात मोठे राज्य उत्तरप्रदेशात ते स्वबळावर सत्तेर आले व संपूर्ण परिवर्तन घडविले. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत सुधारणा मा. मायावती यांनी करून महाराष्ट्राला एक नवा आदर्श दिला.

वरील या सर्व संघटना पक्ष सातारा जिल्ह्यामध्ये काम करू लागल्या. दलित पँथर, भारिप, बहुजन महासंघ, बहुजन समाज पाटी या सर्वच पक्षांचे गट सातारा जिल्ह्यात आहेत. पण खऱ्या अर्थाने साताऱ्यात सामाजिक परिवर्तनाचे रणशिंग फुंकण्याचे काम वरील पक्षाचा आधार न घेता स्वतंत्र नेतृत्व केले ते म्हणजे पार्थ पोळके व लक्ष्मण माने यांनी. त्यांच्यापासून कार्यकतृे तयार झाले व मतभेद झाल्यानंतर त्यांनी वरील पक्षांचे काम सुरू केले. त्यामुळे सातारा जिल्ह्यात इतर जिल्ह्याच्या वेगाने वरील पक्षाचे काम झालेले दिसून येत नाही. त्यातील पार्थ पोळके हे तेव्हा रिपब्लिकलन पक्षात गेले. पुन्हा बहुजन समाज पक्षात गेले. त्यावेळी संपूर्ण सातारा जिल्ह्यात हे काम वेगाने झालेले दिसून येते. तरीही वरील पक्षाचे पदाधिकारी आपल्या पद्धतीने काम करीत आहेत. पण या जिल्ह्यात म्हणावे तसे त्यांना यश आले नाही.

## संदर्भ सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भोळे भा. ल. | : | 'महाराष्ट्रातील दलित चळवळ एक समाजशास्त्रीय चिकित्सा' (दिवाळी अंक) जुलै ते डिसेंबर १९९१, पृ. १३० |
| २. | ढसाळ नामदेव | : | 'दलित पँथर-सिद्धांत आणि व्यवहार', पृ.८४ |
| ३. | Jogdand P. G. | : | 'Dalit Movement in Maharashtra', Pp. 73 |
| ४. | चेंदवणकर प्रल्हाद | : | 'पँथरचा जन्म', 'दलित पँथर', लिंबाळे शरणकुमार (संपा), पृ. २७ |
| ५. | जोगदंड पी. जी. | : | उपरोक्त, पृ. २७ |
| ६. | जोगदंड पी. जी. | : | उपरोक्त, पृ. ७५ |
| ७. | लिंबाळे शरणकुमार | : | 'भारतीय दलित पँथर', पृ. ३६, ३७ |
| ८. | फडके भालचंद्र | : | 'दलित पँथर आणि आंबेडकरवाद' लिंबाळे शरणकुमार (संपा.) पृ. २३६, २३७ |
| ९. | चेंदवणकर प्रल्हाद | : | 'पँथरचा जन्म', 'दलित पँथर', लिंबाळे शरणकुमार (संपा), पृ. ३७ |
| १०. | गुरू गोपाळ | : | 'दलित पँथर व सम्यक क्रांती : एक अभ्यास' |

( A paper read in a seminar on 'Dalit Movement in Maharashtra', Organised by Dept. of Political Science, Shivaji University, Kolhapur, 8th, 9th and 10th March 1989)

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | जोगदंड पी. जी. | : | उपरोक्त, पृ. ८२, ८३ |
| १२. | प्रा. कांबळे अरुण | : | 'वाटचाल' दलित पँथर, लिंबाळे शरणकुमार (संपा.) पृ. ५१ |

१३. लिंबाळे शरणकुमार : ‘सम्यक क्रांती आमचा संकल्प’, दलित पँथर - लिंबाळे (संपा.), पृ. ४

१४. गुरू गोपाल : ‘दलित पँथर व सम्यक क्रांती : एक अभ्यास, पृ. ३९

१५. डांगळे अर्जुन, प्रदेशाध्यक्ष भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर) यांची मुलाखत. दि. ७/११/१९९४

१६. कांबळे अरुण : ‘वाटचाल’, दलित पँथर, लिंबाळे शरणकुमार (संपा.) पृ. ९२

१७. Jogdand P. G. : ‘Dalit Movement in Maharashtra’, Pp. 79

१८. लिंबाळे शरणकुमार : ‘भारतीय दलित पँथर’, पृ. ३५ व ३६

१९. लिंबाळे शरणकुमार : उपरोक्त, पृ. ३५ व ३६

२०. कांबळे टी. एम. : मनोगत, दलित पँथर, लिंबाळे शरणकुमार (संपा.) पृ. २१०

२१. पंदेर शांताराम : मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन ( A paper read in a seminar on ‘Dalit Movement in Maharashtra’, Organised by Dept. of Political Science, Shivaji University, Kolhapur, 8th, 9th and 10th March 1989)

२२. पोळके पार्थ : ‘सिद्धांत व व्यवहार’, दलित पँथर, लिंबाळे शरणकुमार (संपा.), पृ. १६४

२३. गुरू गोपाळ : ‘दलित पँथर व सम्यक आंदोलन : एक अभ्यास’, उक्त

२४. कांबळे टी. एम. : मनोगत, दलित पँथर लिंबाळे शरणकुमार, (संपा.) पृ. क्र. २१०

२५. लिंबाळे शरणकुमार (संपा.) : दलित पँथरची घटना - कार्यक्रम, पृ. २५३

२६. डांगळे अर्जुन : 'सम्यक समाज आंदोलन निर्मिती आणि वाटचाल', प्रबुद्ध भारत दि. १४/४/१९८३

२७. डांगळे अर्जुन : उपरोक्त.

२८. डांगळे अर्जुन : 'दलित विद्रोह', पृ. ८४

२९. डोळस अविनाश : Bharatiya Republican Party, Its Its Rise and Development, 'महराष्ट्रातील दलित चळवळी' या विषयातील राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील सेमिनारमध्ये वाचलेला पेपर, ९ , १०, ११ फेब्रुवारी १९८९.

३०. डांगळे अर्जुन : 'रिपब्लिकन पक्षाची पुर्नबांधणी कशासाठी', दै. लोकसत्ता, १७ मे १९८४.

३१. भारतीय रिपब्लिकन पक्ष पुणे अधिवेशन ५ आणि ६ मे १९८४ येथील ठरावाची प्रत, उपलब्ध पक्ष कार्यालय मुंबई येथून झाली.

३२. डांगळे अर्जुन : 'दलित विद्रोह', 'मनोगत', पृ. १

३३. डोळस अविनाश : Bharatiya Republican Party, Its Its Rise and Development,

३४. दै. अजिंठा (औरंगाबाद) दि. २९/१०/८८ अधिवेशन वृत्त, पृ. १

३५. भारिप राष्ट्रीय अधिवेशन १९८८ ठराव प्रत उपलब्ध, द्वारा निलम गोऱ्हे, माजी सरचिटणीस महाराष्ट्र मुंबई प्रदेश पक्ष कार्यालयातून.

३६. महिला परिषद, नागपूर, ठराव प्रत - पक्ष रेकॉर्डवरून.

३७. १९८४ निवडणूक जाहीरनामा - पक्ष रेकॉर्डवरून.

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | निवडणूकीची माहिती पक्ष रेकॉर्डवरून | | |
| ३९. | उपरोक्त. | | |
| ४०. | भिंगे सुभाष | : | 'बहुजन महासंघ - बहुजनांच्या आकांक्षेचे व्यासपीठ', पृ. २७ |
| ४१. | दाते सुनील | : | 'बहुजन महासंघ - भूमिका, कार्यक्रम व अपेक्षा', पृ. १०५ |
| ४२. | बहुजन महासंघ : सामाजिक सांस्कृतिक राजकीय पत्रिका, प्रका. शांताराम पंदेर, | | पृ. १, २ |
| ४३. | पवार मखाराम | : | बहुजन महासंघ - कशासाठी कोणासाठी बहुजन प्रकाशन, पृ. २० |
| ४४. | पवार मखाराम | : | उक्त, पृ. ३ व ४ |
| ४५. | पवार मखाराम | : | उक्त, पृ. ३ व ४ |
| ४६. | महेश भारतीय | : | 'जातीय राजकारणात बहुजन महासंघाचा शह', पृ. १३ |
| ४७. | पवार मखराम | : | उक्त पृ, १३, १४, १५ |
| ४८. | दाते सुनिल | : | 'बहुजन महासंघ - भूमिका, कार्यक्रम व अपेक्षा, पृ.१०३ |
| ४९. | डांगळे अर्जुन | : | मुलाखत, दि. ७/११/१९९४ |
| ५०. | उक्त | | |
| ५१. | सावंत नंदा दिलीप | : | 'बसपा एक झंझावात', पृ. ३ |
| ५२. | उक्त | : | पृ. ३ |
| ५३. | उक्त | : | पृ. ५ |
| ५४. | दळवी प्रा. अरुण (संपा.) | : | सा. बोधिसत्व वंदना, पृ. २९ |
| ५५. | सावंत नंदा दिलीप | : | 'बसपा एक झंझावात', पृ. ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५६. | उक्त | : | पृ. ७ |
| ५७. | धिवर अविचल (संपा.) | : | 'डॉ. आंबेडकरांनी संकल्पीत केलेला पक्ष - रिपब्लिकन की बसपा' खुली चर्चा, पृ. १२ |
| ५८. | माने प्रा. डॉ. सुरेश | : | 'केंद्रिय सचिव बसपा' मुलाखत, दिनांक २०/१०/२००१ |
| ५९. | बी. एस. पी. पहचान पत्र | : | बी. एस. पी. केंद्रीय युनिट, नवी दिल्ली, पृ. ३४ |
| ६०. | उक्त | : | पृ. २४ |
| ६१. | सावंत नंदा दिलीप | : | 'बसपा एक झंझावात', पृ. ८ |
| ६२. | पाटील मा. सिद्धार्थ | : | माजी प्रदेशाध्यक्ष बसपा, महाराष्ट्र मुलाखत दि. १५/१०/२००१ |
| ६३. | सावंत नंदा दिलीप | : | 'बसपा एक झंझावात', पृ. १० ते १२ |
| ६४. | साप्ताहिक बहुजन नायक | : | पृ. ३ |
| ६५. | थोरात सी. पी. | : | 'कांशीराम मनुवादापुढे आव्हान', पृ. २५ |


-----×-----

## प्रकरण – ६

# सातारा जिल्हा : महाराष्ट्राच्या इतिहासातील या जिल्ह्याचे योगदान

चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, महामनी व तद्नंतर आदिलशाही राजवटी प्राचीन काळापासून महाराष्ट्रावर येऊन गेल्या. चालुक्य काळातील इ. स. ७५४ मधील सामानमडच्या ताम्रपटात सातारा जिल्ह्यातील अनेक गावांचा उल्लेख आढळतो. भारतातील (जबलपूर) व कुडा (अलिबाग येथील स्तूपांवर (कऱ्हाड)चा उल्लेख केलेला आहे.[१]

या जिल्ह्याला सातारा हे नाव कसे पडले याबाबत अनेक मते आहेत. साताऱ्याच्या दक्षिणेला सातदारा नावाचे गाव आहे. सातदरा शब्दावरून सातारा अशी व्युत्पत्ती झाली असावी. अजिंक्यताऱ्याचे जुने नाव सप्तर्षीचा किल्ला असे होते. या सप्तर्षी पासून सातारा नाव पडल्याचे सांगितले आहे. भोज राजाची राजधानी पन्हाळगड येथे होती. पन्हाळगडाच्या ईशान्येस असलेले पूर्वीचे गाव सातर व त्यावरून सातारा शब्द बनला असे मानले.[२] औरंगजेबाचा मुलगा अजिमशहा याने सातारच्या किल्ल्याला वेढा दिला तेव्हा किल्ल्याला सतरा दरवाजे व बुरूज होते. यावरूनही सातारा हे नाव पडले असे मानले जाते.[३]

### ऐतिहासिक वारसा :-

साताऱ्याच्या परिसरात इ. स. पूर्व २०० मध्ये बौद्धांचा अंमल होता. आगाशिवाच्या डोंगरातील बौद्ध लेणी आज ही त्याची साक्ष देतात. तिसऱ्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत चालुक्य, राष्ट्रकुट, सिंघण, शिलाहार, यादव वंशराजे सातारा येथे राज्य करीत होते. १४ व्या शतकात देवगिरीचे यादव त्यानंतर बहमनी राजाच्या अंमलाखाली हा भाग आला. १५९८ ते १६८९ या काळात हा प्रदेश आदिलशहाकडे होता. १६६३ साली शिवाजी महाराजांनी परळी व सातारचा किल्ला जिंकला.[४] छ. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने हल्ला करून हा किल्ला ताब्यात घेतला. १७०६ मध्ये परशुराम प्रतिनिधीने हा किल्ला जिंकला व १७०८ साली या किल्ल्यावर शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला.

मराठ्यांच्या इतिहासाशी साताऱ्याचे नाते अतूट आहे. शिवाशाहीत हा प्रदेश स्वराज्यात अंतर्भूत होता. हा इतिहास सर्वांनाच ज्ञात आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धातच छत्रपती राजरामाने आपली गादी येथे स्थापन केली. इ. स. १७०० मध्ये राजाराम मृत्यू पावल्यानंतर आपला मुलगा २ रा शिवाजी यास राज्याभिषेक करवून ताराबाईने येथूनच राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. छत्रपती शाहू महाराज मोंगलांच्या कैदेतून सुटल्यानंतर झालेल्या यादवित शाहूचा पक्ष वरचढ ठरला व सातारची गादी शाहू महाराजांच्या ताब्यात आली. १७०८ मध्ये येथे शाहूचा राज्याभिषेक संपन्न झाला. ताराबाईने कोल्हापूर येथे स्वतंत्र गादी स्थापन केली. तेव्हापासून छत्रपत्रींची थोरली गादी येथे प्रस्थापित झाली.

कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री व सावित्री या पंचगंगा प्रमाणेच रयत शिक्षण संस्थेच्या ज्ञानगंगेचा उगमही सातारा जिल्ह्यातच झाला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १९१९ मध्ये काले, ता. कराड येथे रयत शिक्षण संस्थेचे रोपटे लावले. १९२४ मध्ये या संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय, सातारा येथे नेण्यात आले. कर्मवीरांनी लावलेल्या या रोपट्याचे आज संस्थेचे बोधचिन्ह असलेल्या वटवृक्षात रुपांतर झाले आहे.

जिल्ह्याचे मुख्य ठिकाण सातारा हे आहे व स्थान देशावर सह्याद्रीला लागून पश्चिम महाराष्ट्रात आहे. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २८०८९९४ (२००१) एवढी असून अनुसूचित जाती २४६११० आहे. तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या २१८९६ एवढी आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफह १०४७५ चौ. मी. आहे.

**दृष्टीक्षेपात सातारा जिल्हा :-**

''**भौगोलिक स्थान** - उत्तर अक्षांक्ष - १५.५ ते १८.११

पूर्व रेखांश - ७३.३३ ते ७४.५४

क्षेत्रफळ - १०,४८४ चौ. कि. मी.

**भुरुपे :-** १) पर्वत-पश्चिम भागात सह्याद्री

२) डोंगररांगा - शंभू महादेव, बामणोली

३) डोंगर - सीतामाई औंध, आगाशिव, जानाई-मळाई

४) पठारे - पांचगणी, महाबळेश्वर, मांढरदेव, मेरुलिंग

५) घाट - पसरणी, कुंभार्ली, हातलोट, पार, खंबाटकी

**लोकसंख्या** :- २७ लक्ष ९६ हजार ९०६ ( २००१ च्या जनगणनेनुसार)

**शेजारील जिल्हे** :-उत्तरेस - पुणे वायव्येस - रायगड

पूर्वेस - सोलापूर पश्चिमेस - रत्नागिरी दक्षिणेस - सांगली

**तालुके - ११** :-१) सातारा २) कराड ३) वाई ४) महाबळेश्वर

५) फलटण ६) माण (दहिवडी) ७) खटाव

८) कोरेगांव ९) पाटण १०) जावली ११) खंडाळा

**नगरपालिका - एकूण ८ :-**

१) सातारा २) पांचगणी ३) कराड ४) रहिमतपूर

५) वाई ६) फलटण ७) महाबळेश्वर ८) म्हसवड

ग्रामपंचायत - १४६० पोलीस स्टेशन - २५ पोलीस आऊट पोस्ट - २८

**पशुसंवर्धन (१ जानेवारी २००१ अखेर)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण पशुधन | - | ३४,२३,९३७ | देशी गाई | - | १,४०,८९० |
| संकरित गाई | - | १,२८,४६० | बैल | - | १,९६,०६० |
| म्हैशी | - | २,३१,६७५ | शेळ्या | - | ४,३१,१६२ |
| कोंबड्या | - | १८,८९,१२९ | | | |

**कृषी विकास**

प्रमुख पिके - बाजरी, ज्वारी, गहू, भात, घेवडा, हरभरा, ऊस, भुईमूग, बटाटा, सोयाबीन

वार्षिक पिक - ऊस

लागवडी खालील निव्वळ क्षेत्र :- बागायत - १,८१,७०० हेक्टर

जिरायत - ६,१२,००० हेक्टर

खरीप हंगामातील क्षेत्र :- ३,९३,८०० हेक्टर

रब्बी हंगामातील क्षेत्र :- २,१८,७०० हेक्टर

दुसोटा (दुबार) क्षेत्र :- १,९०,२०० हेक्टर

जंगल व्याप्त क्षेत्र :- १,४२,००० हेक्टर

जिल्ह्यातील एकूण विहिरी:- ४३,०००

**कृषी उत्पन्न बाजारपेठ :-**

१) कोरेगांव :- घेवडा, भुईमूग

२) लोणंद :- कांदा, कापूस, लोकर

३) सातारा ४) कराड ५) फलटण ६) वडूज ७) पाटण

**पाटबंधारे :-**

मोठे प्रकल्प - १ मध्यम - ९

मोठ्या व मध्यम प्रकल्पाखालील लाभक्षेत्र :- १ लाख ३४ हजार हेक्टर

सिंचन विहीरीखालील भिजणारे क्षेत्र :- ७९ हजार हेक्टर

**कृष्णा खोरे :-**

सातारा जिल्ह्यातील कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत १० मोठे, १३ मध्यम तर ८० लघु असे एकूण १०३ प्रकल्प होवू घातले आहेत. यामुळे सातारा जिल्ह्यातील २ लाख ४३ हजार, ३९२ हेक्टर इतक्या क्षेत्राला लाभ मिळणार आहे.

**जलस्त्रोत व जलसिंचन प्रकल्प :-**

**नद्या** - कृष्णा - कृष्णेच्या उपनद्या - कोयना, उरमोडी, वेण्णा, कुडाळी या आहेत.

माणगंगा, वसना, नीरा (उपनदी - बाणगंगा), येरळा

**तलाव** - कास, कुरवली, नेर, मायणी, पिंगळी, राणंद, म्हसवड

**धरणे** - कोयना नदीवरपाटण तालुक्यात कोयनानगर येथे धरण जलाशयाचे नाव शिवसागर, कृष्णा नदीवर वाई शेजारी धोमधरण, नीरा नदीवर वीर धरण, वेण्णा नदीवर कण्हेर धरण.

**सहकार :-**

एकूण सहकारी संस्था = ५,४७७ सभासद संख्या = ५,०६,३३८

प्राथमिक संस्थांची सभासद संख्या = ९०६

सहकारी संस्थांची सभासदसंख्या = १८,९९,१६१

सहकारी दुग्ध संस्था = १,५५२

**साखर कारखाने :-**

१) बाळासाहेब देसाई, दौलतनगर (पाटण), २) कृष्णा सहकारी साखर कारखाना रेठरे बु. (कराड), ३) सह्याद्री साखर कारखाना, यशवंतनगर (कराड), ४) किसन वीर सहकारी साखर कारखाना भुईंज (वाई), ५) श्रीराम सहकारी कारखाना, फलटण, ६) अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, शेंद्रे (सातारा), ७) जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, कोरेगांव, ८) प्रतापगड सहकारी साखर कारखाना (जावली), ९) रयत सहकारी साखर कारखाना, उंडाळे, १०. शुगर फॅक्टरी, साखरवाडी.

**विद्युत विकास :-**

| | | |
|---|---|---|
| वीज पुरवठा केलेले पंप संच | - | ८४,७०१ |
| घरगुती वीज ग्राहक संख्या | - | ३,९१,३८९ |
| वीज पुरवठा केलेली गावे | - | १,५२२ |
| वीज पुरवठा केलेल्या हरिजन वस्ती | - | १,९१३ |
| वीज पुरवठा केलेल्या वाड्या वस्ती | - | २,५८२ |
| वीज पुरवठा केलेली औद्योगिक कनेक्शन | - | १०,७०३ |
| वीज पुरवठा केलेली उच्च दाब शेती पंप | - | १५८ |
| उच्च दाब औद्योगिक कनेक्शन | - | २४६ |
| पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी वीज कनेक्शन | - | २,६८४ |
| एकूण विद्युत जनित्रे | - | ६,०८६ |

**उद्योग विकास :-**

| | | |
|---|---|---|
| नोंदणीकृत स्थायी लघुउद्योग | - | २.८४२ |
| नोंदणीकृत अस्थायी लघुउद्योग | - | २,५४८ |
| सहकारी स्थायी औद्योगिक वसाहती | - | ५ ( सातारा, वाई, कराड, शिरवळ, पाटण) |
| सहकारी स्थायी औद्योगिक वसाहती | - | ३ (कराड, ओगलेवाडी, सातारारोड) |
| स्थायी लघुउद्योग कामगार संस्था | - | १८,१०१ मोठे |
| मध्यम स्वरुपाचे कारखान | - | ६२ |
| मोठे व मध्यम कारखान्यांची एकूण संख्या | - | ६८६१.८१ लाख |

**प्रमुख उत्पादने :-**

| | | |
|---|---|---|
| सातारा | - | स्कूटर्स, सूटकेस, आयुर्वेदिक औषधे, प्लॅस्टिकच्या वस्तू |
| शिरवळ | - | कागद, डाळ |
| दहिवडी | - | घोंगडी |
| म्हसवड | - | हातमाग |
| महाबळेश्वर | - | मधुमक्षिका पालन |
| पांचगणी | - | फळांचे मुरांबे |

**सार्वजनिक आरोग्य :-**

| | |
|---|---|
| सामान्य रुग्णालय | - १ (सातारा) (क्रांतीसिंह नाना पाटील रुग्णालय) |
| कुटीर रुग्णालय | - ३ (कराड, पाटण व कलेढोण) |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | - ७१ |
| प्राथमिक आरोग्य उपकेंद्र | - ३०९ |
| प्राथमिक आरोग्य पथके | - ६ |
| प्राथमिक जिल्हा परिषद दवाखाने | - २ |
| ग्रामीण रुग्णालये | - १० |
| आयुर्वेदिक दवाखाने | - १७ |

**उप-प्रादेशिक परिवहन विभाग : -**

| | | |
|---|---|---|
| दुचाकी वाहनांची एकूण संख्या | - | १,०८,३३५ |
| मोटार सायकल | - | ६८,००० |
| स्कूटर्सची संख्या | - | २१,००० |
| मोटार कार | - | ५,४१३ |
| जीप्सची संख्या | - | ७१०० |
| टेम्पो | - | २८४ |
| एस. टी. बसेसची संख्या | - | ७७१ |
| ॲम्बुलन्स | - | ४३ |
| परवानाधारक प्रवासी बसेस | - | ४६ |
| ट्रॅक्टर्सची संख्या | - | १०,०६७ |
| परवानाधारक प्रवासी बसेस | - | १५ |
| एकूण नोंदणीकृत वाहनांची संख्या | - | १,५९,६१९ |

**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| औद्योगिक प्रशिक्षण संस्था | - | ११ |
| खाजगी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे | - | ०४ |
| प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांची संख्या | - | ९७ |

**शिक्षण विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| प्राथमिक शाळांची संख्या | - | २,४४५ |
| उच्च माध्यमिक विद्यालये | - | १२० |
| जिल्ह्यातील माध्यमिक शाळांची संख्या | - | ५८२ |
| नगरपालिका शाळांची एकूण संख्या | - | १५० |
| खाजगी शाळा | - | ७७ |
| जिल्ह्यातील अपंग शाळा | - | १० |

| | | |
|---|---|---|
| प्राथमिक आश्रमशाळा | - | ३७ |
| शासकीय मुलींची वसतीगृहे | - | ०४ |
| साक्षरता प्रमाण | - | ८८.५०% |
| स्त्रिया | - | ६८.७१% |

**वनविकास विभाग :-**

| | | |
|---|---|---|
| जंगलव्याप्त क्षेत्र | - | १ लाख ४२ हजार हेक्टर |
| कायम गुरे चराऊ आणि इतर जमीन | - | ७६ हजार हेक्टर |
| झाडे, झुडपाखालील जमीन | - | ७ हजार हेक्टर |
| राखीव वनक्षेत्र | - | ११७९.९८ चौ. कि. मी. |
| संरक्षित वनक्षेत्र | - | ४७.९० चौ. कि. मी. |

**नैसर्गिक संपत्ती :-**

**वनोत्पादने** - शिकेकाई, आपटा, लाख, डिंक, मध

**अभयारण्ये -**

१) कोयना - प्राणी - वाघ, अस्वल, रानमांजर, हरीण, वानर, साप

२) मायणी - पक्षी - ससाणा, रोहित, करकोचे (सरस)

३) स्वतंत्र सह्याद्री व्याघ्र प्रकल्प - कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय परिसराला केंद्र सरकारने नुकतीच स्वतंत्र व्याघ्र प्रकल्प म्हणून मान्यता दिली. महाराष्ट्रातील हा चौथा प्रकल्प आहे.[५]

ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व असलेल्या साताऱ्यातील व्यक्तींनी महाराष्ट्राच्या इतिहासात छाप पाडलेली आहे. अगदी प्राचीन काळातील अनेक पुरावे पूर्वीच्या सातारा जिल्ह्यात सापडतात. प्राचीन काळातील बौद्ध धर्माच्या प्रसाराचे अनेक पुरावे सापडतात. कराडची आगाशिवाची लेणी, देगांव, खंडाळ्या जवळील पांडव लेणी आजही आढळून येतात. कोकणातून येणारा रस्ता सातारा जिल्ह्यातून जातो. तो म्हणजे कराडवरून म्हसवपडपर्यंत व पुढे पंढरपूर पर्यंत जातो. देशाच्या

दळणवळणाच्या दृष्टीने म्हसवड हे घोड्यांच्या व्यापारासाठी प्राचीन काळापासून प्रसिद्ध होते. तेथील माने संस्थानिक प्राचीन घराणे आहे. तेथे आजही तलावांचे मंदीरांचे अवशेष दिसून येतात. महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या पंढरपूर आषाढी एकादशी यात्रेचे पालखी सोहळ्याचा मार्ग सातारा जिल्ह्यातून जातो. त्यामुळे सांस्कृतिक दृष्ट्या ही फार मोठी घटना आहे.

महाराष्ट्राला छ. शिवाजी महाराजांचाही फार मोठा वारसा आहे. शिवाजी महाराजांनी शत्रूच्या विरुद्ध अनेक लढाया जुन्या सातारा जिल्ह्यातच केल्या आहेत. त्यांचे अनेक किल्ले साताऱ्यात आहेत. पारतंत्र्याच्या काळातही सातारा जिल्हा सर्वात पुढे होता. याच साताऱ्याने देशात आपला वेगळा ठसा उमटविला आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पत्री सरकार याच जुन्या साताऱ्यात निर्माण झाले. स्वातंत्र्यानंतर संपूर्ण भारतात काँग्रेसची सत्ता असताना सातारा जिल्ह्यामध्ये लाल निशाण पक्षाचे खासदार क्रांतिसिंह नाना पाटील, आमदार व्ही. एन. पाटील, आमदार हरिभाऊ निंबाळकर, राखीव मतदार संघातून आमदार बंदिसोडे यांनासातारा जिल्ह्याने निवडून दिले. म्हणजेच सातारा जिल्हा हा परिवर्तनाचा जिल्हा आहे. सातारा जिल्ह्याला जसा राजकीय धार्मिक वारसा आहे. तसाच शैक्षणिक व सामाजिकही वारसा आहे.

याच साताऱ्यात छ. शिवाजी महाराजांची गादी स्थापन झाली. त्यांचा मोठा मुलगा संभाजी व त्यांच्याच वंशातील प्रतापसिंह महाराज पहिले गादीवरआले. प्रतापसिंह महाराज पहिले यांच्या काळात त्यांनी अतिशय समाजप्रिय धोरण ठेवले. याच काळात साताऱ्यातील काही ब्राह्मणांनी पुरीच्या शंकराचार्याला साताऱ्या जवळील माहुली येथे बोलावले होते. पण प्रतापसिंह महाराज भेटावयास गेले नाहीत. म्हणून शंकराचार्यांनी महाराजांना भेटावयास येण्याचा निरोप पाठविला. या उलट महाराजांनी पत्र पाठविले की आपण आमच्या राज्यात येताना आमची परवानगी घेतली नाही. त्यामुळे आपण दोन दिवसात चालते व्हावे. पुन्हा नातू भेटण्यास आले व काही दिवसांची मुदत वाढवून दिली. त्यामुळे ब्राह्मण चिडले. त्यांच्याच काळात ग्रामण्य प्रकरण घडले. त्यांना गावपातळीवर पूजा अर्चा करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळे सातारा जवळीत कोंडवे येथील ग्रामजोशी महाराजांकडे गेले व अर्ज केला की, आम्हाला अधिकार मिळावा. त्यामुळे महाराजांनी सी. के. पी. (देशस्थ) यांना अधिकार दिला. त्यामुळे कोकणस्थ ब्राह्मण नाराज झाले व त्यांनी

इंग्रज गव्हर्नर एलफिस्टन यांच्याकडे प्रतापसिंह महाराजांच्या संदर्भात तक्रार केली. त्यावेळी ५०० कोकणस्थ ब्राह्मण भेटले व संस्थानिकांना धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही असे सांगितले. मात्र गव्हर्नरने या प्रकरणात भाग घेतला नाही.[७]

प्रतापसिंह महाराजांचा बदला घेण्यासाठी चिपळूणच्या ब्राह्मणांनी (फडणीस) याने महाराजांच्या हस्ताक्षरातील एक पत्र फ्रेचांना लिहिले. ते पत्र इंग्रज विरोधी होते त्यावर फडणीस यांनी बोगस सही केली व ते पत्र इंग्रजांच्या हातात पडेल अशी व्यवस्था केली. त्यामुळे इंग्रज चिडले. त्यांनी प्रतापसिंह महाराजांना कैद केले व तेलनीच्या किल्ल्यात वासोटा येथे तुरुंगात ठेवले. म्हणून इंग्रजांनी १८१८ मध्ये बालाजी पंत नातू यास शनिवार वाड्यावर युनियन जॅक फडकविण्यास संधी दिली.[८]

स्वातंत्र्याच्या आंदोलनात क्रांतिसिंह नाना पाटील, वसंतदादा पाटील, किसन वीर, नागनाथ आण्णा नायकवडी, जी. डी. बापू लाड, यशवंतराव चव्हाण यांनी प्रतिसरकार स्थापून सातारा जिल्हा देशपातळीवर पोहचविला. स्वातंत्र्यानंतर सातारा जिल्ह्यामध्ये खंडकरी चळवळ कॉ.बाजीराव जगताप यांनी सुरू केली. स्वातंत्र्यानंतर कै. यशवंतराव चव्हाणांनी लोक चळवळ वाढविली. सामान्य माणसातून नवे नेतृत्व उभे केले. जिल्हा परिषद ही संकल्पना देशपातळीवर राबविली. महाराष्ट्रात त्यांनी शिक्षणाचे सामाजिकरण केले. नादारी (ई. बी. सी.) सवलत सुरू केली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात बहुजन समाजातील मुले शिकू लागली. हाच आंबेडकरी चळवळीचा वारसा होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सातारा जिल्ह्यातच रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली व काले या गावी शाळा व वसतीगृह काढले. सर्व जाती-धर्माच्या मुलांना एका वसतीगृहात ठेवण्याचा फार मोठा ऐतिहासिक निर्णय आण्णांनी घेतला. पुढे त्यांच्याच वसतीगृहातील ज्ञानदेव घोलप हा दलित मुलगा महाराष्ट्राचा सचिव झाला व बाबासाहेब आंबेडकरांच्या वर्तमानपत्राचा पुढे संपादकही झाला. शिक्षणाबरोबर त्यांनी 'कमवा व शिका'मधून श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. डॉ. बापूजी साळुंखे यांनीही हाच वारसा पुढे चालविला.

१९७२ ते २००२ या काळात डॉ. आंबेडकरांची दलित चळवळ वेगवेगळ्या गटात विभागली गेली. नेतृत्वावरून अनेक गट निर्माण झाले. त्यामुळे व्यवस्था परिवर्तनात या चळवळीचा

प्रभाव कमी झाला. त्यातच जातीयवादी प्रवाह जोर धरू लागला. याच दरम्यान शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले व नवा शिकलेला तरुण वर्ग पुढे आला. हा तरुण नवे आत्मभान असलेला होता. यावेळी घटनात्मक तरतूदीनुसार राखीव जागा फक्त कागदावर होत्या, लाभधारक पिढी नव्हती. स्वातंत्र्यापासून मोठ्या अपेक्षा होत्या, त्याचा भ्रमनिरास झाला. १९५६ नंतर जागतिक मंदी आलेली होती. त्याचा परिणाम सामाजिक अर्थव्यवस्थेवर पडलेला होता. १९७१-७२ मध्ये महाप्रचंड दुष्काळ पडलेला होता. ४ वर्ष पाऊस नाही. हालअपेष्टा मधून एक उर्जा बाहेर पडली. रडत रडत मरण्यापेक्षा लढत लढत मरावे ही जाणीव निर्माण झाली. १९६९ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. १९७१ मध्ये चीन बरोबर भारत युद्ध सुरू झाले. राष्ट्रीय प्रश्न निर्माण झाले. स्वातंत्र्याच्या २५ वर्षानंतर दलितांना काय मिळाले असे प्रश्न घेऊन दलित युवक उभे राहिले. रिपब्लिकन पक्षाचे नेते सत्तेत सहभागी झाले. संसदीय राजकारणात गुरफटले गेले. मुंबईमधील स. का. पाटील यांची समाजवादी चळवळ संपविण्यासाठी काँग्रेसच्या मंडळानी शिवसेनेला उभे केले व अशा परिस्थितीत दलित पँथर निर्माण झाली.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील सातारा जिल्हा : समाजप्रबोधनात सातारा जिल्ह्याचे योगदान -

पारतंत्र्याच्या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी प्रति सरकार स्थापन केले होते. त्यामुळे विचारांची पार्श्वभूमी तयार झाली. १९२४-४८ या कालावधीत छ. प्रतापसिंह महाराजांनी सातारमध्ये शिक्षणाचा प्रसार केला. १८५७ च्या बंडाचा (उठाव) परिणाम मुख्यत: सातारमध्येही घडून आला. साताऱ्यातील १७ क्रांतिकारकांना फाशी देण्यात आले. म्हणून साताऱ्यातील ‘फाशीचा वड’ आजही प्रसिद्ध आहे.[९] याच दरम्यान मा. फुले यांनी सुरू केलेली सत्यशोधक चळवळ साताऱ्यामध्ये पोहोचली. या सत्यशोधक चळवळीतून काही सत्यशोधक कार्यकर्ते निर्माण झाले. त्यामध्ये केशवराव विचारे, रा. ना. चव्हाण, ज्योतिजीराव फाळके इत्यादी. या दरम्यान ग्रँड डफ यांचे साताऱ्यात आगमन झाले. त्यांनी बहुजन समाजासाठी शिक्षणाचा प्रसार केला. मिशनरी हायस्कूलची स्थापना केली व सेंट पॉल हायस्कूलमध्ये मागासवर्गीय मुलांना प्रवेश दिला. त्यांच्यासाठी होस्टेलची मोफत सोय केली. सत्यशोधक समाजाचे लोक खेडोपाडी पोहचू लागले.

कराड तालुक्यातील कुसूर येथे सत्यशोधक चळवळ सुरू करण्यात आली. याच दरम्यान कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना काले ता. कराड येथे केली. कर्मवीर हे कोल्हापूरमध्ये रा. शाहू महाराजांच्याकडे सत्यशोधक कार्यकर्ते म्हणून काम करीत होते. सातारा जिल्ह्यातील फलटण संस्थानचे मालोजीराजे निंबाळकर यांनीही शिक्षण प्रसार करण्यासाठी शाळा, वसतिगृहे सुरू केली. खटाव तालुक्यात औंध येथे पंतप्रतिनिधींनी मोफत शिक्षणाची सोय केली.

सत्यशोधक चळवळीचा परिणाम होऊन सातारमध्ये सामुहिक विवाह सोहळे सुरू झाले. काही क्रांतिकारकांनी आंतरजातीय विवाह केले. याचवेळी ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद सुरू झाला. अशाप्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्ह्यामध्ये प्रबोधनाची चळवळ सुरू झाली होती. याचा परिणाम दलित चळवळीवर झाला. त्यामुळे जिल्ह्यात कोठेही जातीय दंगली निर्माण झाल्या नाहीत. परंतु जात असल्यामुळे जातिव्यवस्था आहे तेथेच होती. त्यात कोणताही बदल झाला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्य साताऱ्यात होते. याच पक्षाचे १९३७ साली खंडेराव सावंत आमदारझाले. त्यावेळी त्यांच्या विरोधात काँग्रेसचे नलवडे होते. ॲड्. दिनकर भाऊसाो कांबळे, रा. बावधन, वाई हे जिल्हाध्यक्ष होते. शे. का. फे. ने सातारा नगरपालिकेच्या निवडणुका लढवल्या. त्यात सातारा करंजे येथील भिकू हरी बनसोडे नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यावेळी त्यांना नगरपालिकेचे शिक्षण सभापती करण्यात आले.

१५ ऑगस्ट १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले व २६ जानेवारी १९४९ पासून भारतात लोकशाही पद्धतीने राज्यकारभार होण्यास सुरुवात झाली. याच दरम्यान महाराष्ट्रामध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर चळवळ राजकीय जोर धरू लागली होती व त्यातूनच शेतकरी कामगार पक्ष म्हणजे शेकाप जोर धरू लागला होता. यावेळी सातारमधून आम. व्ही. एन. पाटील, सहकार तज्ज्ञ कराड मधून यशवंतराव मोहिते, सत्यशोधक चळवळीमधून शाहिर फरांदे, शाहिर साबळे, ज्योतीजीराव फाळके, फलटणमधील खंडकरी चळवळीतील कॉ. हरिभाऊ निंबाळकर यांना सातारा जिल्ह्यामध्ये सामाजिक परिवर्तनाच्या क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात कार्य केले आहे. १९७७ मध्ये भारतात आणिबाणी आली, त्यावेळी सातारा जिल्ह्याने भरीव कार्य केले आहे. १९६० पूर्वी संयुक्त महाराष्ट्र समितीने जे आंदोलन पुकारले त्यामध्ये सातारा जिल्हा आघाडीवर होता.

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर व्ही. एन. पाटील, केशवराव पवार, कॉ. दत्ता देशमुख, कामगार व खंडकरी चळवळीमध्ये तुषार पवार, मधुकर भिसे, दादासो नलवडे, सत्यशोधक चळवळीमध्ये जोतीजीराव फाळके, केशवराव विचारे, प्रबोधनकार ठाकरे, कर्मवीर भाऊराव पाटील ही मंडळी अग्रेसर होती. साताऱ्यातील मंडळींनी मराठा मित्र मंडळ हे संभाजीबाबा थोरात यांनी स्थापन केले व १९५७ मध्ये प्रतापसिंह महाराज पहिले यांचा पुताळ उभारावा म्हणून बन्याबापू गोडबोले, अनंतराव कुलकर्णी, आमलेकर, भाऊसाहेब सोमण, बापूराव गवळी या कॉंग्रेस विचाराच्या मंडळींनी पुढाकार घेतला. हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरोधात होते. या दरम्यान मराठा मंडळी राजकारणात पुढे येत होती. त्यामध्ये आनंदराव चव्हाण, बाळासाहेब देसाई या ब्राह्मणेत्तर मंडळींनी साताऱ्यात वैचारिक पार्श्वभूमी तयार केली. या दरम्यान इंदोली ता. कराडमध्ये कॉ. दिनकरराव निकम, कुसूर येथील दानशूर बंडोगोपाळ मुकादम, औंधचे पंतप्रतिनिधी प्रजापरिषदेबरोबर न राहता पंतप्रतिनिधी लोकांबरोबर राहिले.

इ. स. १९५६ पासून समाजवाद्यांनी स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या. काँग्रेसविराधी सातारा जिल्ह्याला प्रतिनिधीत्व मिळाले. खटावमधून केशवराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील खासदार, बुवासाहेब जगताप - वाई, व्ही. एन. पाटील - सातारा, हरिभाऊ निंबाळकर - फलटण, आनंदराव चव्हाण- कराड, केशवराव पवार, बळवंतराव देसाई (काले), धडकबाबा (पाटण) इत्यादी आघाडीवर होते.

या दरम्यान भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये संसदबाह्य कार्य करणाऱ्या संघटना व कार्यकर्ते यांची संख्या वाढली. कारण १९६६ मध्ये काँग्रेसविरोधी विधायक दलाचा प्रयोग करण्यात आला. राम मनोहर लोहीया यांनी काँगेसविरोधी निवडणुका लढवाव्यात असा निर्णय घेतला व त्यानुसार निवडणूका लढवण्यात आल्या. त्यातच १९६६ मध्ये आर्थिक मंदी, दुष्काळ पडल्यामुळे काँग्रेसविरोधी लाट निर्माण झाली व काँग्रेसला अपयश आले. काँग्रेसचे ११ राज्यात सरकार पडले आणि बिगर काँग्रेस सरकार अस्तित्वात आले. मोरारजी भाई देसाई पंतप्रधान झाले.

परंतु पुन्हा समाजवाद्यांना अपयश आले. जयप्रकाश नारायण हे विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीकडे गेले. राम मनोहर लोहीया यांनाही अपयश आल्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेसविरोधी

समाजप्रबोधन करणाऱ्या चळवळी निर्माण झाल्या. पण त्यापरिवर्तनवादी होत्या. त्या सर्वांनी असा निर्णय घेतला की पुढील काळात संसदबाह्य कार्य करावे. यामधून १९६६ मध्ये पुणे येथे जयप्रकाश नारायण यांच्या विचाराने प्रेरित होऊन युवक क्रांतीदलाची व समाजवादी युवक दलाची स्थापन करण्यात आली. त्यामध्ये डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. अनिल अवचट, डॉ. अनिल अडसूळ, निलमताई गोरे, आनंद करंदीकर, डॉ. बाबा आढाव इ. प्रमुख कार्यकर्ते होते. याचवेळी मुंबई येथे १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली. त्यामध्ये नामदेव ढसाळ व राजा ढाले हे प्रमुख होते. १९७२ मध्ये सातारा येथे समाजवादी युवक दल स्थापन झाले व त्याचेही काम सुरू झाले.

१९७२ मध्ये सातारा येथे समाजवादी युवक दलाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये डॉ. नरेंद्र दाभोळकर, डॉ. नितीन लवंगारे, बाळासाहेब थोरात, नंदकुमार दोशी, मोकाशी, जयंत उथळे, धनंजय कासकर, विलास ढाणे इत्यादी प्रमुख होते. या समाजवादी युवक दलाचे कार्य म्हणजे महागाई विरोधी आंदोलन, भाजीमंडईमध्ये गोडेतेल मिळविणे, वंदे मातरमची सक्ती असावी, स्वदेशी चळवळ सुरू केली. मुस्लिम विधवा महिलांची पहिली परिषद सातारा येथे झाली व त्यामध्ये समान नागरी कायदा व्हावा ही मागणी करण्यात आली. डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली एक गाव एक पाणवठा, शेतमजूर, दलित हक्क परिषद तसेच प्रबोधनाची शिबिरे घेण्यात आली.

रहिमतपूरमध्ये आण्णा देशपांडे यांनी हिंद वाचनालय सुरू केले. विकास देशपांडे, हिंदूराव पवार, डॉ. अजित मगदूम या पद्धतीने जिल्हाभर वेगवेगळ्या क्षेत्रात काम सुरू होते. ॲड्. जी. बी. माने - फलटण, सुहासिनी माने - जमीन वाटप चळवळ, छात्रयुवा संघर्ष वाहिनी (माण) दहिवडी, म्हसवड विजय गुरव, रवी महामुनी, रवी डोंगरे, महादेव सरतापे, दिलीप तुपे, शहाजी लोखंडे, दिलीप लोखंडे, भाग्यवान शिंदे, शशी देठे हे काम करीत होते.

सर्व्हीस ऑफ इंडिया, पुणे - शेतमजूर व साखर शाळा, जनजागृतीचे काम दादा शिंदे (फलटण), साधना (सलमा) शिंदे करीत होत्या. भारतीय बौद्ध महासभा - आर. पी. आय गवई गट, आर. टी. रणवरे (जिंती), शाहिर भोसले (सातारा), पा. म. गायकवाड (तरडगांव), लोणंद - काकडे, डी. टी. खरात, प्रल्हाद भोसले - सातारा इत्यादी कार्यकर्ते काम करीत होते.

इ. स. १९७१-७२ भारत-पाकिस्तान युद्ध झाले. त्यात भारताला यश मिळाले व इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पुन्हा सत्तेवर आले. १९७५ मध्ये काँग्रेसने आणिबाणी जाहीर केली. सातारमध्ये आणिबाणी विरोधी प्रचार व बैठकांचे नियोजन करण्यात आले. १९७९ मध्ये एक गाव एक पाणवठा, त्रिपुटी, ता. कोरेगांव येथे तळे संघर्ष करण्यात आला. डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, गेल ॲमवेट, ॲड्. जी. बी. माने हे उपस्थित होते.

सातारा येथील समाजवादी युवक दलात दलितांच्या प्रश्नासाठी दलित हक्क समितीने सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये धोंडीराम यशवंत गडांकुश, ग. सा. कांबळे गुरुजी, मारुतीराव दणाणे, भोसले मास्तर - आरळे, फणसे गुरुजी - मांडवे, हे प्रमुख होते.

समाजवादी युवक दलात पार्थ पोळके व लक्ष्मण माने यांचा प्रभाव निर्माण झाला. १९७९ मध्ये त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा सुरू केला. सातारा ते औरंगाबाद लाँग मार्च (सातारा, लोणंद, तरडगांव, साखरवाडी, फलटण, बारामती, दौंड - नगर) असा काढण्यात आला. यादरम्यान दलित सेवक संघ सातारा शहरात काम करीत होता.

या लाँग मार्च समता दिंडीमुळे जनजागृती झाली व दलित कार्यकर्ते तयार झाले. यावेळी प्रथमच दलित कार्यकर्त्यांनी या लढ्याचे नेतृत्व केले. त्यामध्ये पार्थ पोळके, लक्ष्मण माने हे पुढे होते. त्यामुळे दलितेत्तर मंडळी नाराज झाली व समाजवादी युवक दलात फूट पडली.

साताऱ्यात दलित सेवा संघाचे अनेक कार्यकर्ते तयार झाले. यावेळी डॉ. नरेंद्र दाभोळकर, कॉ. शरद पाटील, नरहर कुरुंदकर यांनी वैचारिक शिबीरे घेण्याचा निर्णय घेतला. त्यातूनच विषमता निर्मूलन शिबीर घेण्याचा निर्णय झाला. पूर्ण वेळ कार्यकर्ते तयार करण्यात आले.

झोपडपट्टी पुनर्वसन, शेतमजूर संघटना, शिक्षण प्रसार, मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह चळवळी यामधूनच एकता शिक्षण संस्था स्थापन झाली व सातारच्या मध्यभागी मुक्तांगण नवविचार प्रेरणा केंद्र स्वत:च्या इमारतीत सुरू करण्यात आले.

पार्थ पोळके हे समता आंदालनाचे नेतृत्व करू लागले. लक्ष्मण माने यांनी भारतीय भटके विमुक्त जाती जमाती संघटना काढून काम करू लागले. किशोर तपासे व इतर मंडळी भारतीय

दलित पँथरमध्ये सहभागी झाली. अशाप्रकारे १९७२ च्या दरम्यान सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीची पार्श्वभूमी होती.

**सारांश :-**

भारताच्या इतिहासात सातारा जिल्ह्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. सह्याद्रीच्या रांगांनी सातारा जिल्हा वेढलेला आहे. एका बाजूला डोंगर दऱ्या, जंगले तर एका बाजूला सखल प्रदेश, बारमाही वाहणाऱ्या कृष्णा - कोयना सारख्या नद्या तर काही जिल्ह्याचा प्रदेश दुष्काळग्रस्त आढळून येतो. आज महाराष्ट्राला वीज निर्मितीसाठी कोयना धरण हे फार महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून सातारा जिल्हा हा परिवर्तनवादी दिसून येतो. बौद्ध संस्कृती सातारच्याच भागात पसरलेली होती. बौद्ध गुंफा याची साक्ष देतात.

छ. शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष येथील किल्ले देत आहेत. अनेक महामनवांचा संबंध या जिल्ह्यात आला. पारतंत्र्याच्या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांचे पत्री सरकार याच जिल्ह्यात सुरू झाले. म. फुलेंच्या सत्यशोधक समाजाची चळवळ येथे जोमाने सुरू झाली. कर्मवीर भाऊराव पाटील यांची शैक्षणिक चळवळ याच जिल्ह्यात सुरू झाली व ती महाराष्ट्रभर पोहचली.

स्वातंत्र्यानंतर याच जिल्ह्यातील नेतृत्व यशवंतराव चव्हाण यांच्या रूपाने देशाला मिळाले. परिवर्तनाच्या चळवळी याच जिल्ह्यात सुरू झाल्या. डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, लक्ष्मण माने, पार्थ पोळके हे कृतिशील विचारवंत याच साताऱ्यातील आहेत. दलित चळवळीची दिशादर्शक भूमिका याच साताऱ्याने दिली आहे. तर आंबेडकरी चळवळीची समीक्षा देखील याच साताऱ्यातून सुरू झालेली दिसून येते. रिपब्लिकन पक्षाचे नेतृत्व नाकारून बहुजन समाज पार्टीस याच जिल्ह्यातील दलित चळवळीने नेते, कार्यकर्ते बहुसंख्येने गेले होते. या पार्श्वभूमीवर या जिल्ह्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

## संदर्भ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पाठक डॉ. अरुणचंद्र श. (संपा.) | : | महाराष्ट्र राज्य गॅझिटीअर, सातारा जिल्हा. |
| २. | Gazetteer of the Bombay Presidenty : | | Satara District Volume XIX |
| ३. | उक्त | | |
| ४. | देशपांडे महेश | : | साताऱ्याच्या परिसरात, पृ. १६ |
| ५. | कुंभार दत्तात्रय | : | 'आपला जिल्हा सातारा', पृ. १ ते ७ |
| ६. | नलावडे प्रा. इंद्रजित | : | 'आपला सातारा जिल्हा', पृ. २६ |
| ७. | ठाकरे केशव सिताराम | : | 'प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी', पृ.८० |
| ८. | उक्त | : | पृ. ८० |
| ९. | माटे गो. रा. | : | 'असा घडला जिल्हा सातारा', पृ. १२१ |


-----×-----

## प्रकरण - ७

# सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ - १९७२-२००२

सातारा जिल्हा परिवर्तनवादी जिल्हा म्हणून महाराष्ट्रात परिचित आहे. या जिल्ह्यात सर्व धर्माचे लोक बंधुभावाने आजपर्यंत आपले जीवन व्यतीत करीत आहेत. या जिल्ह्याला महामानवाच पदस्पर्श झाला आहे. छ. शिवाजी महाराज, म. फुले, सावित्रीबाई फुले यांची ही मातृभूमी आहे. डॉ.आंबेडकरांचे बालपण साताऱ्यात गेले आहे. डॉ.आंबेडकरांना आंबेडकर हे आडनाव साताऱ्यातून मिळाले आहे. तर जातीयतेचे चटके ही त्यांना याच साताऱ्यातून मिळाले आहेत. त्यांच्या आईचे निधन साताऱ्यातच झाले. क्रांतिसिंह नाना पाटील, क्रांतिवीर नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांती अग्रणी जी. डी. बापू लाड, वसंतदादा पाटील, आबासाहेब वीर, यशवंतराव चव्हाण ही स्वातंत्र्याच्या आंदोलनातील सर्व मंडळी पूर्वीच्या सांगली-सातारा एकत्रित जिल्ह्यातीलच आहेत. या सातारा जिल्ह्याला पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे सातारा जिल्ह्यात कधीच जातीय, धार्मिक दंगली घडल्या नाहीत. या सर्व पार्श्वभूमीवर सातारा जिल्ह्यात डॉ.आंबेडकरांची दलित चळवळ डॉ. आंबेडकरांच्या कालखंडापासून अस्तित्वात असलेली दिसून येते.

डॉ. आंबेडकरांचे वडील रामजी सुभेदार हे अजिंक्यतारा संरक्षण प्रमुख म्हणून साताऱ्यात राहात होते. त्यावेळी इंग्रजी राजवट होती. त्यावेळी भिमराव आंबेडकर प्रतापसिंह हायस्कूलमध्ये शिकत होते. तेव्हा भिमरावांचा काही शालेय खर्च कोरगांव-ल्हासूर्णे गावचे नवलू कोंडीबा उबाळे यांनी केलेला आहे. डॉ. आंबेडकरांना 'मूक नायक' साप्ताहिक काढावयाचे होते त्यावेळी त्यांनी उबाळे यांना मुंबईवरून पत्र पाठविले व साप्ताहिकास मदतीची मागणी केली. त्यावेळी उबाळे यांनी पैसे पाठवले व डॉ. आंबेडकरांनी फलटणचे निंबाळकर यांच्याकडे साप्ताहिकास मदत मागावी असेही उबाळे यांना लिहिले.[१] म्हणजेच सातारच्या फलटणमधील निंबाळकर घराण्याने नेहमीच दलितांच्या विषयी सहानुभूती ठेवलेली दिसून येते. फलटणमध्ये त्यांनी दलित मुलांच्या शिक्षणासाठी वसतीगृह काढले. ते १५० मुलांचे वसतीगृह मोफत होते. म्हणून हजारो दलित समाजाची मुले पूर्वीच्या काळात शिक्षण घेऊ शकली. औंधचे पंतप्रतिनिधी यांनीही मुलांना शिक्षण मिळावे म्हणून

मोफत वसतीगृह काढले होते. त्याच वसतीगृहातील विद्यार्थी शंकरराव खरात पुढे डॉ.आंबेडकरांच्या चळवळीत काम करू लागले. संपूर्ण आशिया खंडात शिक्षणाचे महत्त्व देणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणाचे युग सातारा जिल्ह्यातूनच सुरू झाले. अशा या पार्श्वभूमीवर आंबेडकरांच्या दलित चळवळीची साताऱ्यामध्ये काय अवस्था होती, त्या चळवळीने महाराष्ट्राला काय दिशा दिली, याची माहिती पाहणे आवश्यक आहे.

डॉ. आंबेडकरांच्या शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे कार्य साताऱ्यात होते. १९३७ मध्ये ॲड्. दिनकर भाऊसाो कांबळे, रा. बावधन हे शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे जिल्हा अध्यक्ष होते. १९३७ मध्ये शे. का. फे. ने स्वायत्त संस्थेमधून विधानसभेतील जागा लढविल्या होत्या. महाराष्ट्रातून एकूण १६ लोक उभे केले होते. त्यातील १४ जण निवडून आले. त्यामध्ये साताऱ्यातून मूर्तीकार खंडेराव सावंत हे निवडून आले होते.[२] पुढे शे. का. फे. ने सातारा नगरपालिकेच्या निवडूणका लढविल्या. त्यामध्ये सातारा-करंजे येथील भिकू हरी बनसोडे हे नगरसेवक म्हणून निवडून आले. ते निरक्षर होते. पुढे ते नगरपालिकेत शिक्षण सभापती झाले.

डॉ. आंबेडकरांनी अनेकवेळा सातारा जिल्ह्याला भेट दिली आहे. काही वेळी ते कोर्टात केस संदर्भात आले. तर काही वेळा सभेसाठी आले होते. त्यावेळी राजवाड्यावर सभा होती. पण डॉ. आंबेडकर सभेला येण्यापूर्वीच काही सवर्ण लोकांनी सभेवर दगडफेक केली. त्यामुळे डॉ.आंबेडकर आले नाहीत परंतु इतर सहकाऱ्यांनी सभा घेतली. नागठाणे, मसूर, रहिमतपूर, कराड, दहिवडी, फलटण येथे आंबेडकरांच्या सभा झाल्या होत्या. मे - १९२६ मध्ये जिल्हा महार परिषदेतील भाषण, अस्पृश्यांच्या हातात सत्ता व संपत्ती जसजशी अधिक येत राहिल तसतशी त्यांची प्रगती होत राहील. जे. पी. होणे किंवा आमदार होणे ही प्रगती घडवून आणण्याची साधने आहेत व ती आम्ही हाती घेतलीच पाहिजेत. ती तुम्ही घेवू नका असे 'सोमण' सारखे जे लोक म्हणतात ते आमच्या लोकांचा बुद्धीभ्रंश करून त्यांना गुलाम परिस्थितीत ठेवण्याचा डाव खेळत आहेत.[३] यामधून डॉ. आंबेडकरांनी आपल्या दलित बांधवाना शिक्षणांचा मंत्र दिला व शिक्षणामधूनच आपली प्रगती आहे व शिक्षणातून आपली वैचारिक प्रगती होणार आहे. पुढे ते म्हणतात, ब्राह्मणेत्तर समाज व अस्पृश्य समाज हे आतापर्यंत ब्राह्मणांच्या या मानसिक माजोरीपणाला

व बौद्धिक व्यभिचाराला भिऊन त्यांचे गुलाम आणि गुपचूप वागत आलेले आहेत. परंतु या दोन्ही समाजाला आपली चूक कळून आलेली आहे. आणि हे दोन्ही समाज एकत्र येऊन जर आत्मप्रगतीची चळवळ चालवतील तर ते या पांढरपेशा समाजाच्या गुलामगिरीतून लवकरच मुक्त होतील.[४] डॉ. आंबेडकरांनी सातारा जिल्ह्यातील दलित व बहुजन समाजातील सर्वच लोकांना ब्राह्मणी कावेबाजीतून मुक्त होऊन एकत्रित येण्याचे आवाहन केले व जर दलित समाज व ब्राह्मणेत्तर समाज एकसंघ झाला तर ही व्यवस्था झुगारून देवून मानवतावादी समाज निर्माण होईल हे त्यांनी ओळखले. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील दलितेतर समाजात आत्मीयतेची भावना निर्माण झाल्याचे दिसते व त्यातून आंबेडकरी चळवळ सातारा जिल्ह्यात वाढलेली दिसून येते.

डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर अस्तित्वात आलेला रिपब्लिकन पक्ष दीर्घकाळ एकसंघ राहिला नाही. त्याचे गटात रूपांतर झाले व ते लोण सातारा जिल्ह्यातही पोहचले. बी. सी. कांबळे गट व आर. डी. भांडारे गट येथे कार्यरत होते. पुढे रा. सु. गवई गटही येथे अस्तित्वात आला. अशाप्रकारे १९७२ पूर्वी सातारा जिल्ह्यात वेगवेगळ्या प्रकारे छोट्या मोठ्या चळवळी होत होत्या पण खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या दलित चळवळीला दिशा देण्याचे काम सातारा येथील दलित चळवळीने पुढील काळात केलेले दिसून येते. सातारा जिल्ह्यामध्ये दलित चळवळीचे लोण पोहचवण्याचे काम खऱ्या अर्थाने दलित पँथरनेच केले. पँथरमुळे सर्वसामान्य दलित चळवळीकडे आकर्षित झाला. आपल्यावरती होणारा अन्याय अत्याचार आपण सहन करायचा नाही. त्याचा प्रतिकार केला पाहिजे हे आत्मबल पँथरच्या चळवळीने दिलेले दिसून येते. तरीही सातारा जिल्ह्यात पुरोगामी समाजावादी मंडळी काम करीत होती. राष्ट्रसेवा दलाचे काम काही प्रमाणात सुरू होते. त्यातून समाजवादी युवक दल डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले व साताऱ्यात सामाजिक प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. तरी सातारा शहरामध्ये व आसपासच्या भागात काही दलित मंडळी काम करीत होती. त्यामध्ये प्रामुख्याने ॲड्. आर. पी. कांबळे, ग. सा. कांबळे गुरुजी, नामदेव भिकू बनसोडे, महादू गेनू आढाव, कॅ. साहेबराव बनसोडे, आर. टी. रणवरे, शंकरराव काकडे, डी. पी. सावंत, धम्म प्रवचनकार सिताराम जगताप या वरील मंडळींनी सातारा जिल्ह्यामध्ये दलित चळवळीची पार्श्वभूमी तयार केली. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला मानवमुक्तीचा विचार याचा प्रचार करत त्यांनी त्यांच्या पद्धतीने काम केले.

## ५. ॲड्. आर. पी. कांबळी - सातारा - मिलिंदनगर २०/५/२००९ सायं.७ वा.

आर. पी. कांबळे हे मुळचे पूणदी ता. तासगावचे पण नोकरी निमित्त साताऱ्यात आले. १९५९ पासून सातारा येथील रविवार पेठेत ते रहात होते. त्यावेळी त्यांनी ज्ञानविकास मंडळ स्थापन केले. त्यामध्ये डॉ. रामटेके, एम. ए. कांबळे, हरिभाऊ माने, पांडुरंग यादव ही प्रमुख मंडळी होती. त्या काळात त्यांनी साताऱ्यातील मागासवर्गीय मुलांचा शैक्षणिक सर्व्हे केला व जी हुशार मुले असतील, आर्थिक दृष्ट्या कमकुवत असतील त्यांना मदत करण्याचे ठरविले. त्यामध्ये १०० सभासद होते. भोसले, बळवंत सावंत गुरुजी यांनी सहकार्य कले. हे सर्वजण दर महिन्याला एकत्र येत असत. आण्णा भोसले (दिवाणजी) यांच्या घरी एकत्र यायचे व रोज त्या मुलांना मोफत शिकवायचे व आर्थिक मदत करायचे. सातारा शहरामध्ये १८ ठिकाणी दलित वस्त्या आहेत. त्यामध्ये गोडोलीतील तुळशीराम मस्के, गुरुवार पेठ - पांडुरंग पवार , बुधवार - कांबळे, वाघमारे, मेठ - काका गाडे, जगन्नाथ अडसूळ, माची पेठ -रसाळ गुरुजी, गंगावणे, मंगळवार पेठ - पोळ, करंजे - कॅ. बनसोडे, काशीनाथ जावळे, शनिवार पेठ - बुवा कांबळे, रविवार पेठ - पेंटर कांबळे हे सर्वजण कार्यकर्ते होते व १०० सभासद स्वेच्छेने देणग्या देत असत. व त्यावरती कामकाज चालले होते. १९६२ मध्ये सातारा शहरातील सर्व मंडळांना एकत्र आणायचे व सार्वजनिक डॉ. आंबेडकर जयंती साजरी करायचे असे ठरले. यापूर्वी साताऱ्यात कधीच एकत्र जयंती होत नव्हती. आपआपल्या पेठेत जयंती करत असत. या जयंती सोहळ्याचे अध्यक्षपद प्राचार्य आण्णासाहेब होवाळे यांना देण्यात आले. त्यानंतर १९६९-७२ दरम्यान बौद्ध सेवा संघ स्थापन करण्यात आला. त्यावेळी दर आठवड्याला एका पेठेत सर्वांनी एकत्र येणे व बुद्ध पूजा घेणे हा कार्यक्रम ठरविण्यात आला. १९७४ मध्ये ते सर्वजण भारतीय बौद्ध महासभेत सहभागी झाले.

याचदरम्यान डॉ. आंबेडकरांच्या मातोश्री भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मारकाचे आंदोलन सुरू झाले. त्यामध्ये ते सक्रीय सहभागी झाले. रविवार पेठेत मिलिंद वाचनालय सुरू केले. बाजीराव म्हस्के, एन. टी. रोकडे, कृष्णानगरचे कांबळे, साळुंखे यांनी मदत केली. मातोश्री भिमाबाईंच्या स्माकारच्या बाबत सूर्यपुत्र यशवंतराव आंबेडकर यांनी कामाला गती देण्याचा प्रयत्न केला. पुढे पार्थ पोळके यांच्या नेतृत्वाखाली स्मारकाचे आंदोलन झाले व त्यात यश मिळाले. डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभा करावा म्हणून नगरपालिकेकडे मागणी केली. उपोषण झाले, त्यामध्ये ते सहभागी होते.

१९३५ मध्ये शे. का. फे. चे खंडेराव सावंत स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून आले. त्यांच्या विरोधी लोणंदचे लॅगलॉर्ड खरात उभे होते. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी आपल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटीसाठी जागा विकत घेतली व तेथे चाळ बांधली. १२ खोल्या होत्या. दलित मुलांना तेथे वसतीगृह सुरू केले. ते खंडेराव सावंत यांच्या नावाने होते. पुढे सावंत यांनी ही जागा पालकर बिल्डरला विकून टाकली.

ॲड्. आर .पी. कांबळे म्हणाले की दलित चळवळीची राजकीय व सामाजिक दृष्टी लोप पावलेली आहे. कार्यकर्त्यांमध्ये फाटाफूट आहे. नवीन पिढी साथ देत नाही. जुनी पिढी संपलेली आहे. बौद्ध महासभेचे कार्यक्रम होत आहेत पण बौद्ध चळवळ गती घेत नाही. राजकीय चळवळी थांडावलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये जर प्रकाश आंबेडकर व रामदास आठवले एकत्र आले तर राजकीय परिवर्तन होईल. पण रामदास आठवले यांनी वैचारिक दृष्ट्या बदलले पाहिजे.

### ६. भारतीय बौद्ध महासभा - ग. सा. कांबळे गुरुजी, अतित, दि. १०/४/२००९ सकाळी १० वा.

कांबळे गुरुजी ५ वी, ६ वी मध्ये असताना डॉ. आंबेडकरांचे चरित्र ले. चांगदेव खैरमोडे वाचण्यात आले. मुंबईवरून गणपत कंठे आले होते. त्यांच्याकडून ते पुस्तक मिळाले. त्याकाळात समाजात बैठका होत व माणसे बोलावण्याचे काम त्यांच्याकडे होते. समाजातील सर्वांनी एकत्र आले पाहिजे, आपल्यातील वाद मिटवले पाहिजेत अशी चर्चा होत होती. त्यावेळी १९४५ मध्ये जलसेकार संभाजी माने, दगडू गडकरी, दुर्योधन गडकरी हे अपशिंगे येथील प्रमुख मंडळी, ३६ गाव भागातील वाद विवाद मिटवत असत. त्यामुळे १९३५-३६ मध्ये नागठाणे भागातील लोकांनी बाबासाहेबांच्या उपदेशानुसार मेलेले मांस खावू नये, गावातील घाणेरडी कामे करू नयेत असा निर्णय घेतला व या गोष्टीचा ते प्रचार करू लागले. या दरम्यान डॉ. आंबेडकरांच्या विविध भागात सभा होत होत्या. साताऱ्यातील राजवाड्यावरील सभेसाठी कांबळे गुरुजी स्वत: चालत गेले होते. यासभेला पा. ना. राजभोज, दादासाहेब गायकवाड आले होते. दुपारी २.३० वा. सभेला सुरूवात झाली. पण त्या सभेवर दगडफेक झाली. पण नंतर सभा सुरळित चालू राहिली. डॉ. आंबेडकर

सभेला आले नाहीत. ते पुढे निघून गेले. इतर मंडळींनी सभा घेतली. रात्री १२ वा. सभा संपली व सातारवरून पहाटे २ वा. अतितला ही मंडळी पोहचली. तेव्हापासून त्यांनी मांसाहारावर बंदी घातली. पुढे कांबळे गुरुजी १९४८ मध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून काम करू लागले. त्यांनी १९५६ मध्ये ३६ गाव गट स्थापन केला व १९५७ मध्ये नागठाणे येथे धम्म दीक्षा विधी कार्यक्रम घेण्याचे ठरवले. त्यावेळी मुंबईमध्ये आसपासच्या गावातील जी मंडळी होती, त्यांना बोलावण्यात आले. शेंद्रेचे मुंबईतील एल. एस. वाघमारे कार्यकर्ते होते. ते नियोजनात होते. बाजार मैदानावर सभा भरली होती. ५ ते ६ हजार लोक आले होते. या सभेचे नेतृत्व भैय्यासाहेब आंबेडकर, बि. सि. कांबळे, आर. डी. भंडारे यांनी केले. त्यावेळी शंकर कांबळे - नागठाणे, ज्ञानू पवार - पाडळी, अंतु फणसे - मांडवे, गो. अ. गायकवाड - सोनापूर, शंकर भैरू, दगडू भैरू गडकरी - अपशिंगे, शंकर जावळे - वेचले, बळवंत रणदिवे - डोळेगाव, बाळू बल्लाळ - भाटमरळी, ज. तू. बल्लाळ - कुसावडे, यादव - कुमठे, गणपत कांबळे- कोपर्डे, महावेद कांबळे - गुरुवार पेठ, सातारा, न्यायनित - नांदगाव, रामचंद्र कांबळे - वेणेगाव अशी विविध भागातील प्रमुख मंडळी आली होती. पुढे सातारा तालुक्यात १२ गाव गट व ३६ गाव गट असे विभाग पाडून सामाजिक व धार्मिक काम सुरू केले.

पुढे त्यांनी भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने धार्मिक व सामाजिक कार्य करण्यास सुरूवात केली. १९५८ पासून सातारा तालुक्यातील वरील प्रादेशिक गट पाडून दर महिन्याला एके दिवशी सर्वांनी एकत्र यायचे व बुद्ध वंदना घ्यायची, धम्मावरती चर्चा करायची. प्रबोधन करावयाचे व त्यातूनच पुढे गाव व विभागवार डॉ. आंबेडकर जयंती सुरू झाली. जयंतीच्या निमित्ताने मिरवणुका, भजन, गायन, सभा असे स्वरूप होते. त्यावेळी सवर्ण मंडळी विरोध करीत नसत. १९५८ मध्ये तर वेणेगाव येथील विनायकराव घोरपडे यांनी त्यांच्या गावात सभा घेण्यास सांगितले. त्यावेळी डॉ. आंबेडकरांच्या वरती ग. सा. कांबळे गुरुजी यांनी १.३० तास भाषण केले. त्या भाषणामध्ये सामाजिक, धार्मिक, राजकीय विषयावर आपले विचार मांडले.

काही मंडळींनी गावकीची कामे सोडल्यामुळे सर्वांनी असहकार पुकारला. दलित समाजावर बहिष्कार टाकला. दलितांना मजूरीला बोलावयाचे नाही, दुकाने बंद केली. त्यावेळी दलितांनी

कायद्याने विरोध केला. पण सवर्ण मंडळींनी दलितांच्या शेतीला औत, बैलजोडी देण्याचे बंद केले. त्यावेळी दलित समाजातील ज्यांची बैलजोडी होती ते सगळीकडे घेवून जावून दलितांच्या शेतीची कामे करू लागले. म्हणजे दलित सर्व समाज एकरूप झाला होता. गावातील घाणेरडी कामे करावयाची नाहीत. तसेच दलित समाजातील देवाला सोडलेले जे पोतराज होते, त्यांच्या डोक्याचे केस कापण्याची काम नागझरी येथून सुरु झाले व हे सर्व लोण जिल्ह्यात पोहोचले. पाटण, वाई, जावली मध्ये अशाच प्रकारचे काम सुरू झाले.

**रिपब्लिकन पक्षाचे काम :-**

यावेळी डॉ. आंबेडकरांच्या नंतर रिपब्लिकन पक्षाचे विभाजन झाले, गट पडले. आर. पी. आय. चे काम करणारे काही कार्यकर्ते होते. त्यामध्ये वाघमारे, ढेकणे, कांबळे, गडकरी,न्यायनित ही प्रमुख मंडळी होती. १९६२ मध्ये कांबळे हे विधानसभेला सातारा येथून उभे राहिले. ग. सा. कांबळे गुरूजी शिक्षक असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष राजकारणात भाग घेता आला नाही. त्यांनी धार्मिक कार्याला वाहून घेतले. दलित प्राथमिक शिक्षकांची बांधणी केली. त्यावेळी सर्व दलित मंडळी काँग्रेसचे काम करीत होती. त्यामध्ये गणपती कांबळे - कोपर्डेकर हे प्रमुख होते. पण समाजातील कामाला त्यांचा विरोध नव्हता. ते मदतच करीत होते. रा. सु. गवई गटाचे काम प्रल्हाद भोसले- सातारा हे पहात होते. पुढे १९८१ मध्ये साताऱ्यातील समाजवादी युवक दलाचा संबंध आला. सर्व जातीच्या लोकांची ही संघटना होती. १६ ऑगस्ट १९८१ मध्ये शाहू कलामंदिरात जिल्ह्यातील सर्व दलितांची बैठक बोलवली. त्यावेळी जिल्ह्यातील विविध प्रश्ना संदर्भात चर्चा झाली व आंदोलन करण्याचे ठरवले. त्यामधूनच एक गाव एक पाणवठा, त्रिपुटी सत्याग्रहाचे नियोजन करण्यात आले.

ग. सा. कांबळे गुरुजी, गडांकुश गुरुजी यांनी भारतीय बौद्ध महासभेचे कामकाज सुरू केले होते. धम्म प्रचाराचे काम शिकलेल्या वर्गाने केले पाहिजे. कारण इतरांना स्वत: आचरण करता येत नाही व त्यामुळे दुसऱ्याल प्रेरित करता येत नाही. १९८४ मध्ये भारतीय बौद्ध महासभा सातारा जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली. १९८४-८७ पा. म. शिंदे - अध्यक्ष, पांचगणी, सुशांत जाधव -कोपर्डे - सचिव, ग. सा. कांबळी, अतित, संस्कार समिती कार्याध्यक्ष होते.

१९८१-९१ भगवानराव आवाडे- सातारा रोड - अध्यक्ष - दिनकर झिंब्रे -सातारा सचिव होते. यावेळी जिल्ह्यात धम्म मेळावे आयोजित केले. पण मोठ्या प्रमाणात काम झाले नाही. या दरम्यान महाराष्ट्रात धार्मिकही गट पडले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | भा. ल. भोळे | - | भारतीय धम्म परिषद. |
| २. | आर. डी. भंडारे | - | भारतीय बौद्ध महासंघ |
| ३. | वि. सि. कांबळे | - | बुद्ध शासन सभा |
| ४. | प्रकाश आंबेडकर | - | भारतीय बौद्ध महासभा |
| ५. | रामदास आठवले | - | बुद्धिष्ट सोसायटी |
| ६. | महात्थीवर संघ रक्षित | - | त्रैलोक्य बौद्ध साहाय्यक सभा |

साताऱ्यात मात्र भारतीय बौद्ध महासभा कार्यरत होती. त्यांची कार्यकारणी - १९९१ - एकनाथ अंतू फणसे - मांडवे - अध्यक्ष, ग. सा. कांबळे - अतित - सचिव, १९९५ - अध्यक्ष - वि. वि. सत्वशिर - पाटण व सचिव - तुकाराम कांबळे, निनाम. संस्कार - ग. सा. कांबळे. २००० - भिमराव गायकवाड - शेणोली - अध्यक्ष, रमेश थोरवडे - सचिव - कराड. २००६ - विष्णू रा. थोरवडे - अध्यक्ष व भि. मा. गायकवाड - सचिव.

अशा प्रकारे सातारा जिल्ह्यात भारतीय बौद्ध महासभा काम करीत आहे. या बौद्ध महासभेने जिल्ह्याच्या विविध भागात संस्कार शिबीरे, महिला शिबीरे, बालक शिबीरे यांचे आयोजन केले. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. परंतु भारतीय बौद्ध महासभेने पूर्वाश्रमीचे महार व आताचे बौद्ध यांनाचा धम्म सांगितल्यामुळे या धर्मात इतार जातीचे लोक आले नाही. त्यांना बौद्ध महासभा आकर्षित करू शकली नाही.

ग. सा. कांबळे गुरुजी हे आयुष्यभर धार्मिक व सामाजिक काम करीत आहेत. वयाच्या ८० व्या वर्षीही त्यांची काम करण्याची जिद्द, धडपड दिसून येते. परंतु त्यांच्या मते धम्म कारणामध्ये राजकारण आले आहे. त्यामुळे ही चळवळ राजकारणविरहित असली पाहिजे. इतर दलित जातींना व बहुजन समाजाला बौद्ध धम्माकडे वळवण्यात आम्हाला अपयश आल्याचे त्यांनी सांगितले.

ते भारतीय बौद्ध महासभा, संबोधी प्रतिष्ठान- सातारा, अतित भाग श्रमिक पतसंस्था- अतित, डॉ. आंबेडकर पाणी पुरवठा समिती- अतित, मिलिंद सेवा. मंडळ - अतित, १९९५-२००० ग्रामपंचायत सदस्य -अतित, मिलिंद पतसंस्था - नागठाणे, अशा विविध संस्थांवरती काम करीत आहेत. त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यामध्ये कॅ. साहेबराव बनसोडे, आदर्श कार्यकर्ता पुरस्कार, नामदेवबुवाजगताप विसापूरकर धम्म दीक्षा पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केले आहे. परंतु सरकार दरबारी त्यांची नोंद घेतली गेली नाही.

आपल्या मनोगतात ते म्हणतात, जातीयतेच्यापलीकडे जावून, व्यवस्था परिवर्तनाचा डॉ.आंबेडकरांचा विचार आम्ही जिवंत ठेवला आहे. तो तसाच वेगाने पुढे जावा व सारा भारत बौद्धमय व्हावा असे मला वाटते.

### ७. एन. बी. बनसोडे - करंजे - १५/३/२००९ - दुपारी ११ वा. :-

सातारा जिल्ह्याच्या दलित चळवळीत करंजेकर बनसोडे यांचे मोठे योगदान आहे. आज तिसऱ्या पिढीमध्ये बनसोडे कुटुंब दलित चळवळीत धम्मकार्य करीत आहे. सातारा नगरपालिकेत शे. का. फे. पक्षाच्या तिकीटावर भिकू हरि बनसोडे हे निवडून आले. त्यांच्या विरोधात रावखंडे उभे होते. ते निरक्षर होते. पुढे त्यांना शिक्षण सभापती करण्यात आले. त्यांनी आंबेडकर चळवळीला वाहून घेतले. त्याकाळी दलितांचा स्पर्श विटाळ मानला जात होता. त्यावेळी करंजे येथील श्रीपतराव बयाजी इंदलकर (पाटील) यांनी त्यांचे अभिनंदन केले. शाळेतील मास्तर नामदेव बनसोडे यांना वर्गाबाहेर बसवायचे पण वडील शिक्षण सभापती झाले व शाळेला अचानक भेट दिली. तेव्हापासून शाळेत बसवायला सुरूवात झाली. १९५७ मध्ये रिपब्लिकन पक्ष स्थापन झाला व निवडणूका लागल्या त्यावेळी ही सातारा जिल्हा रिपब्लिकन पक्षाबरोबर होता. १९६७ च्या निवडणुकीत घोडके - वाई, निवृत्ती गायकवाड - जावली हे बि. सी. कांबळे गटातून उभे होते. पण त्यांना त्यात यश आले नाही.

१९५२ मध्ये डॉ. आंबेडकर व त्यांच्या पत्नी सविता आंबेडकर सातारला आल्या होत्या. आंबेडकरांना देशी शेंगा व दही आवडायचे म्हणून नामदेव बनसोडे लहानपणी दही व शेंगा घेवून

थांबले होते. इन्स्पेक्टर बंगल्यात ते उतरले त्यावेळी त्यांच्याबरोबर पा. ना. राजभोज होते. त्यावेळी साताऱ्यातील प्रसिद्ध पेढेवाले तुळजाराम मोदी हे २ करंड्या पेढे घेवून आले. आंबेडकरांनी पैसे काढले पण मोदींनी पैसे घेतले नाहीत. म्हणजे सवर्ण समाजही आंबेडकरांच्यावर प्रेम करीत होता. कर्मवीर भाऊराव पाटील त्यांना भेटायला आले. त्यावेळी आंबेडकरांनी केंद्रातून ५ लाख रु. ग्रँट संस्थेला मिळवून दिली. कर्मवीरांनी शिवाजी कॉलेजच्या स्नेहसंमेलनाला येण्याचे निमंत्रण दिले. पण निपाणीला सभा असल्याने डॉ. आंबेडकर निघून गेले. १९५२ मध्ये डॉ. आंबेडकरांनी निपाणीस कन्नड भाषेतून भाषण केले.

सातारा राजवाड्यावरील सभेस नामदेव बनसोडे वडीलांच्या खांद्यावर बसून गेले होते. त्यावेळी तारगावचे फणसे मास्तर हे प्रचारक होते. १९६९ मध्ये आर. पी. आय. चे विभाजन झाले. त्यावेळी साताऱ्यातून भाऊसाहेब गमरे उभे होते. जावलीमधून मोरे उभे होते. साताऱ्याला रा. सु. गवई गट प्रबल होता. प्रल्हाद भोसले, आर. टी. रणवरे हे प्रमुख शिलेदार होते. याच दरम्यान मा. काशीराम यांच्या बामसेफ व डि. एस. फोर.चे काम चिंधवलीचे ॲड्. काकडे करत होते. यादरम्यान म. फुले यांचा नातू साताऱ्यात आला. त्यावेळी त्याचे स्वागत करण्यात आले.

## सिद्धार्थ सेवा संघ – १९८७ –

१९८७ मध्ये सातारा करंजे येथे सिद्धार्थ सेवा संघाची स्थापना करण्यात आली. संघ हा खेळ, लेझीमपथक अशा प्रकारचे काम करत होता. १९८९ मध्ये कॅ. साहेबराव बनसोडे निवृत्त झाले व साताऱ्यात आले. त्यांनी सिद्धार्थ सेवा संघ वाढविला. पोपट बनसोडे, कॅ. बनसोडे हे प्रमुख ट्रस्टी होते. पुढे आर. आर. पाटील यांनी बुद्धमूर्ती दिली. सतरंज्या, साहित्य, भांडी दिली व बुद्ध विहारात कार्यक्रम चालू झाले.

**संघाचे प्रमुख उपक्रम :-**

१. दरवर्षी १ जानेवारीला भिमा कोरेगांव येथे मानवंदना देणे.

२. २६ जानेवारी व १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन साजरा करणे.

३. महामानव व राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या, स्मृतिदिन साजरे करणे.

४. प्रतिष्ठित स्थानिक माणसांचे स्मृतिदिन साजरे करणे.

५. ५ सप्टेंबर - शिक्षक दिन साजरा करणे. त्यानिमित्त शाळेतील मुलांन वह्या, पुस्तके यांचे वाटप करणे. निवृत्त प्राथमिक शिक्षकांचा सत्कार करणे. ( या कार्यक्रमाला गोडबोले ट्रस्ट मदत करीत असत.)

६. धार्मिक कार्यक्रम, धम्मविषयक प्रबोधन, जयंत्या - मयंत्या साजऱ्या करणे.

पुढे महिला वर्गासाठी मातोश्री रमाबाई प्रतिष्ठान, करंजे स्थापन केले. प्रमुख कार्यकर्ते - आनंद बनसोडे, काशीनाथ जावळे, लक्ष्मीबाई बनसोडे, सुमन बनसोडे, सावित्री बनसोडे, नारायण बनसोडे, माधव भोसले हे होते.

सिद्धार्थ सेवा संघाचा म्हणावा तसा प्रभाव दलित चळवळीवर पडलेला दिसून येत नाही. कारण हे कार्येकर्ते कधीच कोणत्या दलित चळवळीच्या आंदोलनात सहभागी नव्हते. त्यामुळे ठरलेले नेहमीचेच कार्यक्रम करीत होते. त्यामुळे दलित चळवळींनी संघाची विशेष नोंद घेतली नाही. त्यांचे वस्तीपुरते मर्यादित धार्मिक काम चालू होते. पण त्यातील कॅ. बनसोडे व शाहिर माधव भोसले यांचे प्रामाणिकपणे काम चाललेले दिसून येते. महिला मंडळ गीतामधून सामाजिक व धार्मिक परिवर्तन करीत होते.

## ८. अशोक उबाळे - ल्हासुर्णे २५/५/०९ - सायं. ८ वा. :-

अशोक आण्णा यांचे आजोबांची कोरेगांवमध्ये एकमेव लाकडाची वखार होती. त्यांचे नाव नवलू कोंडीबा उबाळे होते. ते स्वातंत्र्यपूर्व काळात सातारा जिल्हा लोकल बोर्डाचे मेंबर होते. ते टेलिफोन एक्सचेंजमध्ये इन्स्पेक्टर होते.त्याकाळी त्यांच्याकडे टांगा होत्या. दलित समाजातील प्रतिष्ठीत व आर्थिक दृष्ट्या श्रीमंत असलेली व्यक्ती होती. भरपूर शेतवाडी त्यांच्याकडे होती. कोरेगांव तालुक्यातील शिरढोण हे त्यांचे गाव होते. अशोक अण्णांचे वडील ग्रॅज्यूएट होते. त्यावेळी मोडी, इंग्लिश कोणीही वाचू शकत नव्हते. कलेक्टर / प्रांत घरी येत असत. ज्यावेळी रामजी सुभेदार सातारला आले तेव्हापासून त्यांचे व उबाळे यांचे घरगुती संबंध होते. आण्णाच्या वडीलांनी रामजी सकपाळांना आर्थिक मदत केली होती. त्यांच्याप्रमाणे लोणंदचे शिवाजीराव धर्माजी खरात

होते. ते अनेक वर्ष लोणंदचे सरपंच होते. निम्मे लोणंद त्यांच्या मालकीचे होते. हेच खरात शे. का. फे. चे खंडेराव सावंत यांच्या विरोधी काँग्रेसमधून उभे होते, पण ते पडले. ते लोकल बोर्डाचे सदस्य झाले. पुढे डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या आजोबांकडे दोन हजार रुपयांची मागणी केलेले त्यांचे पत्र आहे. मेव्हणे आबाजी भोसले, काशीनाथ रामचंद्र सावंत हे मुंबई हायकोर्टात वकिली करत होते. त्यांनी १९७२ च्या वरळी दंगलीतील केसेस मोफत चालविल्या होत्या. असा आर्थिक, सामाजिक, राजकीय वारसा अशोक आण्णा उबाळे यांना मिळालेला होता. सुरुवातीपासून उबाळे मुंबईमध्ये रहात होते. त्यामुळे डॉ.आंबेडकरांच्या नंतरची रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांची भांडणे, गट तट त्यांनी पाहिले होते.

१९६४ मध्ये सिद्धार्थ कॉलेजमधून ११ वी झाले व त्यांच्या आई-वडिलांचा मृत्यू झाला. त्यांचे मेव्हणे मुंबईमध्ये ऑफीस सुपरिटेंड होते. १९६९ मध्ये फायरमन विभागात नोकरी मिळाली व सब ऑफीसर म्हणून व्हॉलंटरी घेतली. १९६४ पासून रामदास आठवले यांची ओळख होती. १९७२ च्या दंगलीनंतर आय विटनेस म्हणून साक्ष दिली. मुंबईत रिपब्लिकन लॉयर संघटना होती. त्यांचे काम शिरंबेचे गायकवाड, बाजीराव कांबळे, हे पहात होते. आण्णांची दोन्ही मुले सचिनतेंडूलकर व विनोद कांबळी यांच्या वर्गात होती. ती किंग्जडम हायस्कूलमध्ये शिकत होती. त्यावेळी दलित समाज तराळकी, गावकी, जोहारकी, मायबाप, जोहाराला भाकरी वाढ, अशा प्रकारे जगत होता. परंतु आण्णांना याचा स्पर्श नव्हता.

ज्यावेळी दलित पँथर स्थापना झाली त्यावेळी राजा ढाले, नामदेव ढसाळ, प्रा. अरुण कांबळे हे प्रमुख होते तर रामदास आठवले प्रास्ताविक करीत होते. रिपब्लिकन पक्षाच्या बैठका होत. ऐक्य करण्यासाठी चर्चा होत. दादासाहेब रूपवते, आर. डी. भंडारी काँग्रेसमध्ये गेले. गवई काँग्रेसबरोबर राहिले. तर बी. सी. कांबळे कट्टर आर. पी. आय. मध्ये राहिले. त्यावेळी दलित लोक कट्टर रिपब्लिकन वाले होते. आर. डी. भंडारे यांचे निधन झाले. त्यावेळी दादासाहेब रूपवते व शरद पवार आले होते. पण प्रेतयात्रेला आर. पी. आय. वाल्यांनी हात लावला नाही. त्यांच्या दोन प्रेतयात्रा निघाल्या. इतकी ताठरता रिपब्लिकन जनतेत होती. १९७२ च्या वरळी बौद्ध-सवर्ण दंगलीवेळी पोलीसी ड्रेस घातलेल्या गुंडांनी दंगल केली. त्यावेळी आरोपींना शिक्षा

झाल्या. असा हा सर्व चळवळीचा साज घेऊन ते गावी शिरढोण कोरेगांवला आले. गर्व नसलेला, निष्ठावान, जुनी संबंध आतपर्यंत जपणारा आठवले नेता होता. म्हणून रामदास आठवले यांच्या गटात काम करण्याचा निर्णय घेतला व जिल्हास्तरीय आर.पी. आयचे जिल्हा अध्यक्ष किशोर तपासे यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू केले. ते दोनवेळा शिरढोण ग्रामपंचायतीचे सदस्य, पतसंस्था, सोसायटीचे सदस्य होते. पंचायत समिती कोरेगांव राखीव झाल्यावर साताररोडमधून पत्नीला उभे केले पण यश आले नाही. तालुक्यातील अन्याय अत्याचाराविरोधी अनेक लढे उभे केले. कोणताही भ्रष्टाचार केला नाही. स्वयंभू राहिले. तडजोड केली नाही व पक्ष सोडला नाही. त्यावेळी त्यांच्याबरोबर नंदकुमार कांबळे, चंद्रकांत खंडाईत, सुरेश येवले, दिलीप श्रवाणे, श्रीमंत भंडारे, विकास रणखांबे, के. एस. कांबळे, रतन गायकवाड इ. कार्यकर्ते बरोबर होते. कोरेगाव तालुक्यात एकूण १४३ गावे आहेत. त्यामध्ये १०३ गावात त्यांचा संपर्क आहे. उरलेल्या गावात दलित वस्त्या नाहीत. अशा प्रकारे सर्वजणांनी एकत्रितरित्या कोरेगांव तालुक्यातील दलित भटके यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी काम केले आहे. मात्र महाराष्ट्रात आर. पी. आय. ऐक्याचे वातावरण आहे. परंतु त्यांनी आपल्या तालुक्यापुरते नवे नियोजन केले आहे, असे ते म्हणाले.

**कोरेगांव तालुका नवे नियोजन** - कोरेगांव तालुक्यात असलेल्या कार्यकर्त्यांनी आपापले गट तट पक्ष संघटना सर्व बाजूला ठेवून आपण कोणत्या तरी पक्षाचे पदाधिकारी आहोत म्हणून वावरायचे नाही. आतापर्यंत अशा प्रकारच्या मिटींग झाल्या आहेत. सर्व पक्ष संघटना गट सोडून सर्वांनी बरोबर यावे व एकसंघ तालुका ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आजही ग्रामीण भागातील लोकांचे बरेच प्रश्न आहेत. शहरातील लोकांना त्याची माहिती नाही.

१) दलित वस्तीला १५% अनुदान मिळत नाही.

२) गावातील ग्रामपंचायत आरक्षण फिरवले जाते.

३) महिला बचत गटाला रोजगार मिळत नाही.

४) पं. स. व जि. प. तंटामुक्तीखालील प्रलंबित कामे आहेत.

५) बचत गटाचे रोजगारा बाबत ऐकमत करणे.

६) नवीन एम. आय. डी. सी. मधील कार्यालयात दलितांसाठी आरक्षण किती ठेवले आहे. त्यात विशेष घटक योजनेमुळे ६० हजार रुपयापासून ५ लाख रुपयापर्यंत लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करणे.

या तालुक्याच्या माजी आमदार विशिष्ट समाजाला दुखावत असतात. त्यामुळे खोट्या जातीयवादी तक्रारी होतात त्या कमी करणे. गावात सामाजिक बांधिलकी जोपसणे व आंबेडकरी चळवळ जिवंत ठेवणे अशाप्रकारे काम सुरू आहे.

## ९. भगवान अवघडे - दलित सेवा संघ, कोल्हापूर १०/६/०९ - सां. ६ वा.

सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीत दीर्घकाळ काम केलेले व एक वैचारिक अधिष्ठान असलेले कार्यकर्ते म्हणजे भगवान अवघडे होय. १९७३-७४ मध्ये ते पी. डी.ला होते. त्यावेळी मल्हार पेठेत रहात होते. सातारा शहराचा मध्यवर्ती भाग म्हणजे मल्हार पेठ होय. या वस्तीमध्ये मोठ्या प्रमाणात ढोर, बौद्ध, मातंग, चर्मकार समाज रहात होता. येथे समाजात सतत आपआपसात भांडणे, मारामाऱ्या होत असत. अंधश्रद्धा, रूढी, परंपरा पाळणारे व शिक्षणाचे अत्यंत कमी प्रमाण असलेले, आर्थिक दृष्ट्या पिचलेले दलित लोक रहात होते. या दरम्यान शहरामध्ये डॉ. नरेंद्र दाभोळकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रसेवा दल प्रणीत समाजवादी युवक दल स्थापन केले होते. ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात सवर्ण मराठा समाजाची संख्या जास्त होती. त्यामुळे त्यांचेतील काम मध्यमवर्गापुरतेच मर्यादित होते. परंतु नंतर पार्थ पोळके व लक्ष्मण माने त्यात सहभागी झाल्यानंतर ते दलित प्रश्नांचा विचार करू लागले व कार्यक्रम घेवू लागले.

मल्हार पेठ मधील कॉलेजमध्ये शिकणारी मुले त्यामध्ये किशोर तपासे, अंकुश भिंगारदिवे, भगवान अवघडे, दिलीप ससाणे, दिलिप भोसले, रमेश बडेकर ही गुरुवार पेठेतील सर्वजण एकत्र आले व तेथील एका मठात चर्चा केली. सुरुवातीला त्यांनी तो मठ साफ केला व पेठेतील वाद मिटावेत म्हणून १९७४-७५ मध्ये दलित सेवा संघाची स्थापना केली. सुरुवातीला हा संघ खेळ खेळणे, उदा. कबड्डी, लेझिम हेच करत होता. त्यानंतर सातारा शहरात डॉ. आंबेडकर जयंती

वेगवेगळी साजरी केली जात होती. त्यामध्ये दलितांच्यात एकोपा नव्हता म्हणून सर्वांनी शहरातील सर्व दलित वस्त्यांना भेटी दिल्या. लोकांशी चर्चा केली व सर्वांनी मिळून एकत्र डॉ. आंबेडकर जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यांनी त्यांचे लक्ष पेठेतील मुलांच्या शिक्षणाकडे दिले. त्यामध्ये मुलांचे शाळा कॉलेज सोडून देण्याचे व नापास होण्याचे प्रमाण जास्त होते. म्हणून त्यांनी एक शैक्षणिक उपक्रम राबविला. त्यामध्ये १ ली ते ११ पर्यंतच्या सर्व पेठेतील मुलांना मोफत क्लासेस घेवून शिकवण्याचे ठरले. त्यासाठी जागा ठिकाण नव्हते. तेव्हा संघाच्या कार्यकर्त्यांच्या घरात क्लास सुरू केला. पुढे भगवान अवघडेच्या पत्र्याच्या शेडमध्ये क्लासेस घेवू लागले. हे क्लास घेण्यासाठी सोनवणे गुरुजी, माणिक तपासे यांनी खूप मदत केली. या दरम्यान साताऱ्यातील समाजवादी युवक दल बरखास्त करून समता आंदोलनाची स्थापना झाली. यावेळी पार्थ पोळके यांनी दलित प्रश्नांच्या संदर्भात जिल्हाभर जागृती सुरू केली होती. त्यांच्याशी संघाचा संबंध आला व दलित सेवा संघ बरखास्त करून सर्व कार्यकर्ते समता आंदोलनात सहभागी झाले. दलित सेवा संघाने सातारा शहराच्या सर्व दलित वस्तीमध्ये संपर्क ठेवलेला होता. करंजे मध्ये नामदेव बनसोडे, गोडोलीमध्ये वामनराव मस्के, मेटवस्ती काका गाडे व प्रा. अरुण गाडे, बुधवार - कांबळे, रविवार पेठ - आर. पी. कांबळे असे कार्यकर्ते दलित संघात होते. ते सर्वजण समता आंदोलनात सहभागी झाले.

१९७७ च्या दरम्यान डॉ. बाबा आढाव यांनी पुणे येथे हमाल पंचायत स्थापन केली होती व त्यांनी पुणे येथे एक कार्यकर्ता शिबीर घेतले होते. त्यामध्ये साताऱ्यातील प्रमुख कार्यकर्ते गेले होते. त्या शिबीराला बाबा आढाव यांनी 'एक गाव एक पाणवठा' ही संकल्पना मांडली. गावागावातील जातीची कवाडे मोडायची असतील तर सर्व जण एकत्र आले पाहिजेत व गावातील जाती मोडायच्या असतील तर गावातील पाणवठे सर्वांना खुले असावेत, अशी संकल्पना होती. सातारा जिल्ह्यामध्ये सर्व कार्यकर्ते कामाला लागले व 'एक गाव एक पाणवठा' या समता आंदोलनामधून प्रचार व प्रसार केला. त्यामधूनच कोरेगांव तालुक्यातील त्रिपुटी येथे पाणी परिषद घेण्याचा निर्णय झाला. या गावात फार मोठे तळे आहे पण दलितांना त्या तळ्यातील पाण्याला स्पर्श करता येत नव्हता. म्हणून त्रिपुटी येथे परिषद घेण्याचे ठरले. यासाठी सर्व जिल्हाभर प्रचार

करण्यात आला व १९७७ मध्ये ही पाणी परिषद झाली. या परिषदेला डॉ.बाबा आढाव, भाई वैद्य, बाबूराव बागूल, गेल ऑमव्हेट हे मार्गदर्शन करण्यासाठी बोलवले होते. त्यावेळी समता आंदोलनाचे कार्यवाह पार्थ पोळके हे होते. त्यानंतर समता आंदोलनाची अनेक शिबीरे झाली. त्यामध्ये १९७८ ला येवले येथे अधिवेशन झाले. सातारा येथे शिबीर झाले. या शिबीराला झालेला खर्च नागपूरच्या एन. जी. ओ. यांनी दिलेला होता. सातारा पंचायत समितीच्या कार्यालयात हे शिबीर झाले होते. दलितांच्या विविध विषयावर चर्चा झाल्या. पुढे मातोश्री भिमाबाई आंबेडकर समता प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले. त्याचे अध्यक्ष पार्थ पोळके होते. संस्थात्मक कार्य करावे म्हणून समता शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना करण्यात आली. मल्हार पेठेतील सरकारी दारुबंदीचे कार्यालय जुने होते. त्याचे कुलूप तोडले व ताबा घेतला. तेथे मूकबधीर शाळा सुरू केली. पुढे १९८० नंतर समता आंदोलनात फूट पडली. पार्थ पोळके, विजय मांडके, रमेश बडेकर, दिलिप भोसले, किशोर तपासे हे समता आंदोलनात राहिले व डॉ. नरेंद्र दाभोळकर, किशोर बेडकिहाळ, लक्ष्मण माने, दिनकर झिंब्रे, प्रमोद कोपर्डे हे त्यामधून बाहेर पडले.

साताऱ्यात मूकबधीर शाळा काढली व त्यासाठी पार्थ पोळके यांनी प्रशिक्षण घ्यावे व नोकरी सोडावी असे ठरले. त्यानंतर पोळके सर प्रशिक्षणासाठी पुण्यात गेले व नंतर सातारा शहरात मूकबधीर शाळा सुरू करण्यात आली. १९८५ मध्ये पुन्हा समता आंदोलनात मध्ये फूट पडली व किशोर तपासे यांच्या नेतृत्वाखाली साताऱ्यात भारतीय दलित पँथरची स्थापना करण्यात आली.

भगवान अवघडे यांनी १९८६ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था स्थापन केली. राधिका रोडवरील सरकारी जागा मिळवली हे काम दीर्घकाळ चालले होते. १९८७-८८ मध्ये भारतीय दलित पँथरची जिल्हा अध्यक्षपदी किशोर तपासे यांची निवड करण्यात आली. १९८८ मध्ये 'लोकमत'मध्ये कुमार केतकर यांच्या 'रिडल्स इन हिंदइझम' या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथावर टिकात्मक लेख आला. मुंबईत मोर्चा काढण्याचे ठरले. त्यावेळी साताऱ्याहून २५० मुले घेऊन सर्वजण मुंबईला मोर्चाला गेले. १९९१ मध्ये रामदास आठवले समाजकल्याण मंत्री झाले. याच दरम्यान १९९१-९२ डॉ.आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष होते. त्यामुळे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा.अरुण कांबळे यांचे व्याख्यान ठेवण्यात आले.

अविचल घिवर, पुणे यांनी 'थांबा रामराज्य येतय' या नाटकाचे १००० प्रयोग करण्याचे ठरविले. पँथरमध्ये सर्व जातीमधील लोकांना प्रवेश दिला पाहिजे. हा प्रयोग महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यात यशस्वी झाला. किशोर तपास - ढोर, अमर गायकवाड, संजय गायकवाड (मातंग), मुन्ना शेख (मुस्लिम), कुंदर मारुडा (भंगी) हे सर्व पदाधिकारी होते. भगवान अवघडे यांनी डॉ.आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त भारत भ्रमण दौरा आयोजित केला होता. तो १९९७ मध्य केला. १९८९ मध्ये सर्व परिवर्तनवादी संघटना एकत्र आणून राष्ट्रीयता जागर अभियान अंतर्गत १५ ऑगस्ट रोजी प्रभात फेरी काढली. याचवेळी भगवान अवघडे, जयंत उथळे, प्रा. अजित साळुंखे यांनी 'धुमकेतू' ही बाल विज्ञान पत्रिका काढली व लहान मुलांच्यात विज्ञानवादी दृष्टिकोन तयार करण्याचा प्रयत्न केला. १९८९ मध्ये पँथरच्या अधिवेशनासाठी 'अनुमती' अंक काढला . 'याचना नहीं अभी रण होगा संग्राम बडा भिषण होगा।' सातारा येथे या अंकाचे प्रकाशन झाले. १९९२ मध्ये बाबरी मशिद पाडली त्याची सत्य वस्तुस्थिती त्यामध्ये मांडली होती. पँथरच्या सोलापूर अधिवेशनाासठी 'निर्वाण' मासिक काढले, त्यात वैचारिक मांडणी केली.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ निर्मिती बाबत दोन वर्ष बैठका घेतल्या. २००० मध्ये बार्शी येथे दलित साहित्य संमेलन घेतले. त्याचे प्रमुख संयोजक भगवान अवघडे हे होते. महाराष्ट्राला वैचारिक दिशा देण्याचे काम अवघडे यांनी केले आहे. विद्रोही सांस्कृतिक चळवहीमध्ये ते क्रियाशील नेते म्हणून काम करीत होते. आज सातारा शहरात त्यांनी 'धुमकेतू' या वैज्ञानिक मासिकाचे रुपाने लावलेले रोपटे मोठे झाले आहे. आज मानव मुक्ती संघटन म्हणून हेच चिमुकले बालचमु आज सातारच्या परिवर्तनाचे मोठे काम चालवत आहेत. हे सर्व योगदान भगवान अवघडे व जयंत उथळे यांचे आहे.

### राष्ट्रसेवक क्रांती दल

### १०) जयंत उथळे - सातारा २५/७/०९ - सायं. ७ वा.

जयंत उथळे हे १९७२ पासून शिवाजी उदय मंडळात होते. विविध खेळ खेळणे चालू होते. या दरम्यान डॉ. नरेंद्र दाभोळकर डॉक्टर होऊन साताऱ्यात आले. ते कबड्डी खेळाडू होते. १९६८ मध्ये त्यांनी कबड्डीवरती पुस्तक लिहिलेले आहे. डॉ.दाभोळकरांनी १९७१ मध्ये

समाजवादी युवक दल स्थापन केले. त्यांच्यावर समाजवाद्यांचा प्रभाव होता. एस. एम. जोशी, डॉ. बाबा आढाव, डॉ. कुमार सप्तर्षी, जयप्रकाश नारायण यांचा प्रभाव होता. त्यांचे बंधू देवदत्त दाभोळकर माजी कुलगुरू पुणे विद्यापीठ यांचे 'समाजवाद्यांचे वादळ' पुस्तक त्यांच्या वाचण्यात आलं. या दरम्यान डॉ. कुमार सप्तर्षी यांनी 'युवक क्रांती दल' स्थापन केले. पुणे येथे शंकराचार्यांना अडविले. त्यावेळी नामदेव ढसाळ आले होते. आणिबाणी विरोधात सर्वजण काम करत होते. १९७७ दरम्यान ते एस. टी. नोकरीला लागले.

'एक गाव एक पाणवठा' हे डॉ. बाबा आढाव यांचे आंदोलन सुरू झाले. डॉ. दाभोळकरांच्या मुळे वैचारिक जडणघडण झाली. वाचन, चर्चा, युवक दल बैठका चालू होत्या. १९७५ मध्ये लक्ष्मण माने आले. त्यावेळी त्यांना धान्याच्या पिशव्या दिल्या. धनंजय कासकर, विलास ढाणे होते. १९७५-८० ते सातारा बाहेर होते. १९८० ला साताऱ्यात आले व १९८४ पर्यंत बुद्धिबळ चॅम्पियनशिप मिळवली. राज्य, जिल्हा, नॅशनल चॅम्पियन शिप मिळवली. बुद्धिबळ असोएिशन स्थापन केले. त्यावेळी अशोक लढ्ढा, अजित साळुंखे, बाळू बाबर सहवासात आले. संध्याकाळी ७-९ बुद्धिबळ व ९ ते पुढे चर्चा सुरू झाल्या. या दरम्यान प्रा. अजित गाढवे भेटले. रात्री २ वाजेपर्यंत त्यांच्या चर्चा चालू असत. माणसे वाढली. धनंजय इनामदार, रामप्रताप जोशी सहकारी झाले.

या दरम्यान १९८४ मध्ये कराड येथे राष्ट्र सेवक क्रांतीदल स्थापन झाले होते. त्यामध्ये भूतडा, मिनाज सय्यद, संदीप जावळे, सुनिल वाघमारे, अजित साळुंखे हे प्रमुख मंडळी होती. १९७७ मध्ये राक्रांदचे अधिवेशन होते. यावेळी ३० वर्षाच्या वरचे फक्त उथळेच होते. मुक्तांगणमध्ये बैठका सुरू झाल्या. प्रशांत साळुंखे, संजीव निकम, अजित साळुंखे, संजीव बोंडे, वर्षा देशपांडे ही प्रमुख मंडळी होती.

राक्रांदने सातारा शहरातील झोपडपट्ट्यांचा सर्व्हे करण्याचे ठरविले व झोपडपट्टीमध्ये अभ्यास वर्ग चालू करण्यासाठी जागा शोधण्याचे काम सुरू झाले. जागा शोधली. लक्ष्मी टेकडी येथे अभ्यास वर्ग चालू केला. रोज संध्याकाळी तेथे एकत्र येण्याचे ठरले. नंतर बैठक मुक्तांगण ऐवजी इंजिनिअर कॉलेजच्या पटांगणावर सुरू झाल्या. त्यामध्ये दत्तक पालक योजना राबविण्यात आली. त्यावेळी झोपडपट्टीतील २०० मुले दत्तक घेण्यात आली. त्या प्रत्येक मुलास युनिफॉर्म,

दफ्तर दिले. एका मुलाला १०० रु. खर्च करावयाचा ठरले. व समाजातील २०० माणसे शोधली. त्यांना योजना समजावून सांगितली. त्यासाठी वस्तीमधील लोकांच्या बैठका घेतल्या. लक्ष्मी आई मंदिरात लोक एकत्र येत असत.

जातीच्या प्रश्नावर चर्चा सुरू झाली. राखीव जागांची मोठी मांडणी त्यांनी केली. राष्ट्रीय एकात्मता, जमातवाद, जाती व्यवस्थेला विरोध यांना पोषक वातावरण नव्हते. मध्यम वर्ग, मध्यम जाती यांना त्यागाच्या कल्पनेचे आकर्षण जास्त असते. राष्ट्रीयता या भावना उदात्त भावना व व्यवहारामध्ये काल्पनिक, शिक्षण संपवून कार्यकर्ते घरी गेले व काम कमी झाले. १९८८ मध्ये ते प्रत्यक्ष झोपडपट्टीत गेले. जाती अंताचा पुरस्कार करायला लागले. आपले वर्तुळ जातीचे आहे. मराठा, ब्राह्मण असे जाणवायला लागले. तेथून विकास होण्यास सुरूवात झाली पाहिजे. वर्तुळ फोडले पाहिजे असे त्यांना वाटले व त्यातून भगवान अवघडे यांच्याशी मैत्री सुरू झाली. मित्र बनवायचा म्हणून बनवला. १९९७ पर्यंत दरवर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये अधिवेशन व्हायचे. १९८८-९६ पर्यंत क्लासेस फक्त झोपडपट्टीमध्ये होते. लक्ष्मी टेकडी येथे प्राथमिक शाळा व्हावी म्हणून आंदोलन केले. परंतु शाळा चालू झाली नाही. त्यामुळे बरीच मुले शाळेत जात नव्हती कारण अंतर फार लांब आहे. १९९७ मध्ये सायगाव येथे अधिवेशन झाले. मराठी शाळेपुढे हे शेवटचे अधिवशेन होते. संघटना बरखास्त करावी अशी चर्चा झाली. अविनाश जगताप यांनी नियोजन केले होते व संघटना बरखास्त करण्यात आली.

श्री. उथळे यांच्या मते, सामाजिक संघटन विशिष्ट परिस्थितीत निर्माण होते. त्यांच्या काही मागण्या असतात. तत्कालिन प्रश्न असतात. नंतर ते प्रश्न कालबाह्य होतात. मात्र संघटना टिकून राहते. संघटनेत भरती प्रक्रिया मंदावली की फक्त संघटना टिकवून ठेवण्यापुरते संघटन राहते. संघटन प्रभावी नसल्यामुळे नवीन प्रश्नांची जाण, भान रहात नाही. सवयीने भेटतात, मंडळी बोलतात, भांडतात, 'टोळकं' एवढी संघटना राहते. संघटना संदर्भहिन होते. त्यासाठी नवीन दृष्टी,नवीन नेतृत्व आले पाहिजे.

पुढे अवघडे व उथळे यांनी नवीन संघटना उभी करण्याचा प्रयत्न केला. मुक्तीवादी युवा संघटना, राष्ट्रीय क्रांतिदल, श्रमिक मुक्तीदल, सत्यशोधक विद्यार्थी संघटना या सर्वांचे ध्येय एकच

होते. 'जाती अंत समान ध्येय'. सर्वांनी काही समान मुद्यावर एकत्र यावे. त्यामध्ये किशोर ढमाळे, प्रा. रणजित परदेशी, प्रा. प्रतिमा परदेशी, डॉ. भारत पाटणकर, कॉ. धनंजय गुरूव, वहारू सोनवणे यांची चर्चा झाली. नगरचे रामप्रसाद जोशी यांनी एक मासिक सुरू करावे यासाठी 'वाळवा' येथे १९९८ मध्ये बैठक झाली. कोल्हापूरमध्ये आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त एक मेळावा घेतला. यावेळी १९९९ मध्ये मराठी साहित्य संमेलन दादर येथे झाले. शिवसेना नेते बाळ ठाकरे यांनी पु. ल. देशपांडे यांच्याबद्दल अपशब्द उच्चारले. पु.ल.नी ठाकरेंचा निषेध केला. साहित्यिकांना बैल म्हणाले, या शिवसेनेला प्रतिटोला दिला पाहिजे म्हणून बैठक घेतली व मुंबईमध्ये स्वतंतपणे साहित्य संमेलन घ्यायचे ठरले. चर्चेला वेग आला. ६, ७, ८ फेब्रुवारी १९९९ ला दादर व त्याच वेळी ७ फेब्रुवारी १९९९ विद्रोही साहित्य संमेलन घ्यावयाचे ठरले. संयोजन समिती बनवण्यात आली. त्यामध्ये उथळे, मिनाज सय्यद सातारचे होते. धारावीचे संमेलन यशस्वी झाले. पुढे चर्चा सुरूच ठेवण्यात आली. यासंमेलनाचे अध्यक्ष बाबूराव बागूल होते व उद्‌घाटक डॉ. आ. ह. साळुंखे होते. रामदास आठवले संमेलनाला आले होते.

पुढे विद्रोहीची अस्थायी समिती निवडण्यात आली. त्यामध्ये सातारमधून जयंत उथळे व विजय मांडके होते. २ रे संमेलन कोल्हापूरला झाले. ३ रे औरंगाबादला, ४ थे सातारा, ५ वे पंढरपूर, ६ वे सावंतवाडी, ७ वे सोलापूर, ८ वे सांगली येथे झाले. महाराष्ट्रामध्ये विद्रोही नावारूपास आली. याच दरम्यान १९९९ मध्ये कोल्हापूर संमेलनाचे अध्यक्ष वहारू सोनावणे यांचा सत्कार साताऱ्यात घेतला. लक्ष्मण माने व पार्थ पोळके आले होते. त्यानंतर २००२ मध्ये सातारा येथे साहित्य संमेलन घेण्यात पोळके यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर विद्रोहीमध्ये २००२-०८ पर्यंत पोळकेंचा कार्यकर्ता म्हणून सर्वांनी काम केले.

औरंगाबाद येथे विद्रोहीत भांडण झाले व सत्यशोधक विद्यार्थी संघटना बाहेर पडली. कारण प्रा. रणजित परदेशी, उमेश बागडे यांचे पत्र आले की आम्हाला विद्रोहीत सहभागी करून घ्यावे. किशोर ढमाळे यांचे म्हणणे होते त्यांना सहभागी करून घेवू नका. त्यातून किशोर ढमाळे, किशोर जाधव, प्रतिमा परदेशी, कांबळे विद्रोहीतून बाहेर पडले.

पुढे उथळे व अवघडे यांनी २००० पासून मानव मुक्ती युवा संघटना सुरू केली. कारण पूर्वी 'धुमकेतू' मधून बालकांचे रूपांतर कार्यकर्त्यात झाले व हे कार्यकर्ते मिळाले. हितसंबंध ज्यांचे व्यवस्थेत आहेत ते बदलले नाहीत. बदलण्याची जाणीव निर्माण करण्याची चळवळ असली पाहिजे. ती प्रबोधनाची चळवळ आहे. प्रश्नाचे स्वरूप फार वेगळे राहिले नाही. उत्पादनाची साधने घेणे, उत्पादनातील वाटा मागणे हे सक्षम झाल्याशिवाय शक्य नाही. सक्षम, सजग होणे, जागृत होणे हे शिकणं महत्त्वाचे होते. दलित चळवळ ही राजकारण केंद्रित झाली. समाजामध्ये समता निर्माण केली पाहिजे. जे येत नाहीत त्याबद्दल चर्चा नको. जे सामाजिक क्षेत्रात येतात यांच्याबद्दल बोलले पाहिजे. लढे भौतिक प्रश्नावरती उभे राहतात पण प्रबोधन हे सांस्कृतिक अंगाने होईल. भौतिक प्रश्नावरचे लढे जाती अंताच्या प्रश्नाशी जोडून घ्यावे लागतील.

बळीराजा धरण , लोक चळवळीतून श्रमिक मुक्ती दलाने उभे केले. पाणी दरडोई वाटप केले जाईल असा निर्णय घेतला. उत्पादन साधनांच्या मालकीचे समान वाटप झाले पाहिजे. नुसत्या अस्मितेच्या प्रश्नावरती लढे उभे करून उपयोग नाही. उदा. स्मारकांचा लढा. दलितांच्या वास्तविक जीवनामध्ये कायफरक पडला ते भौतिक प्रश्नांशी जोडले पाहिजे. शिक्षण, नोकरी हे अडथळे आहेत. जातीअंताच्या दिशेने जाणारे काम पाहिजे. लक्ष्मण माने यांचे काम जातीअंताच्या दिशेने जाणारे आहे. ते भुतदयावादी काम नाही.

## ११. महादू गेनू आढाव - गुणवरे - १५/४/०९ - सां. ५ वा.

महादू गेणू आढाव रा. गुणवरे ता. फलटण, जि. सातारा त्यांचे शिक्षण इयत्ता ४ थी होते. वय २५-२६ वर्ष असताना गुणवरे येथील डांगाणे हॉटेलमधील दलितांच्यासाठी वेगळ्या ठेवलेल्या कपबशा फोडल्या व जातीयतेविरोधी कामाला सुरुवात केली. पोलिसात तक्रार केली. फलटणमधून हॉटेल मालकाला तंबी मिळाली. आंबेडकरांचे भाषण ऐकण्यासाठी गुणवरे-फलटण पायी चालत गेले. त्यावेळी आंबेडकर म्हणाले होते, 'फलटणची गटारे सुधारतील पण फलटण बारामतीचा महार समाज सुधारणा नाही.'' यातून सामान्य माणसांवरचे अन्याय दूर करायला पाहिजे अशी प्रेरणा मिळाली.

गुणवरे गावातील ३०० दलित (महार) समाजातील लोक दरवर्षी वैशाख शुद्ध नवमीला भैरवनाथाला धडका घेत असत. त्याची कथा अशी आहे. संस्थानिकांच्या काळात फलटण तालुक्यातील जावली येथे नाथाची यात्र भरत असे. या जावलीच्या यात्रेत विडणी, जावली, वारुगड व पालवन येथील महार समाज धडका घेत असे. ही यात्रा पाहण्यासाठी दरवर्षी गुणवरेचे गौंड पाटील घोड्यावर बसून जात असत. त्याच्याबरोबर दोन महार जात असत. ते घोड्याची निगा राखण्याचे काम करत असे. पाटलाबरोबर गणपत आबा महार व चिमा आबा महार हे जात होते. पाटील म्हणाले आपले गावची यात्रा अशी भरवूया व धडकाचा मान महारांना देवूया. टकरा सुरू झाल्या. महादू आढावांनी ५ महिन्याचे असताना टक्कर घेतली. ते १९६९ पर्यंत टकरा घेत होतो. ह्या टकरा बंद केल्या.

गुणवरे गावातील इंदूमती पोपट जाधव या कैकाडी जातीच्या मुलीवर गावातील गुंडांनी बलात्कार केला. त्यांना न्याय मिळवून दिला. जर टकरा घेतल्या नाहीत तर आईवडील म्हणायचे आम्ही फास घेवू. सुरुवातीची ३०० पैकी २४० टक्करा बंद केल्या. बाकीच्याबाबत प्रांताकडे तक्रार, उपोषण केले. गावातील लोक म्हणायचे जुन्या प्रथा आहेत लगेच बंद होणार नाहीत. ते म्हणाले घर पेटले तर हळू हळू विझवू म्हणता का ? गावात यात्रा भरावी, टकरासारखा निंद्य प्रकार नसावा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती - डॉ. दाभोळकर यांनी १९८७-९० दरम्यान दुपारी रास्ता रोको केला. १९९० ला १००% टक्करा बंद झाल्या. २००४ मध्ये श्रीमंत लोकांनी पैसे दिले व टकरा घेण्यास सांगितले. आण्णा तात्या आढाव यांनी जोरात टक्कर घेतली, त्यांचा मृत्यू झाला होता. गावातील सवर्ण १२ गाड्या ओढत. आढाव म्हणाले आम्ही १३ गाड्या ओढू, तुम्ही टकरा घ्या. १९७५ मध्ये भारतीय दलित पँथरची स्थापना गुणवरे येथे केली. गंगाधर आंबेडकर आले होते. रोहिदास गायकवाड होते. दलित सर्व पुढाऱ्यांनी एकत्र यावे म्हणजे अन्याय अत्याचार होणार नाहीत. या त्यांच्या कामाची कोणीच दखल घेतले नाही. ते आजही उपेक्षीत आहेत.

## १२. किशोर तपासे - सातारा - ५/७/०९ - सकाळी. ९ वा.
## (भारतीय दलित पँथर)

मल्हार पेठ सातारा येथे १९७४-७५ च्या दरम्यान दलित सेवा संघाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये अंकुश भिंगारदेवे, भगवान अवघडे, दिलीप ससाणे, रमेश बडेकर, बाबू रावखंडे,

बाळासाहेब पोळ, दिलीप भोसले ही प्रमुख मंडळी होती. या दलित सेवा संघाच्या शाखा सातारा शहरातील विविध दलितवस्त्यामध्ये होत्या. त्यामध्ये मेठावरती काका गाडे, प्रा. अरुण गाडे, करंजे येथे नामदेव बनसोडे, गोडोली - वामनराव मस्के हे कार्यकर्ते होते.

समाजातील विविध सामाजिक प्रश्नावर मोर्चा काढण्यात आले. डॉ. आंबेडकरांच्या आईची समाधी जरंडेश्वर नाक्यावर सदरबझार येथे जमिनीखाली होती. तेथे प्रथम श्रमदान करून समाधी शोधली व शेड टाकले. ते शेड कोणीतरी काढून नेले. पुन्हा शेड उभे केले व पाळत ठेवली. रात्री १.३० - २ वाजण्याच्या सुमारास कूपरची माणसे आली व शेड घेवून गेली. त्यावेळी १५०-२०० कार्यकर्त्यांनी कूपरच्या बंगल्यावर हल्ला केला. गेट तोडले. पुन्हा समाधीवर पत्र्याचे शेड ठोकण्यात आले. ते इयत्ता ११ वी पासून चळवळीमध्ये काम करीत आहेत.

साताऱ्यामध्ये १९७४ च्या दरम्यान समाजवादी युवक दल कार्यरत होते. त्यांनी विविध कामे चालू केली होती. त्यांच्यात मतभेद झाले व 'समता आंदोलन' स्थापन करण्यात आले. त्यावेळी दलित सेवा संघ बरखास्त करण्यात आला. पार्थ पोळके यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू करण्यात आले. डॉ. बाबा आढाव यांच्या 'एक गाव एक पाणवठा', त्रिपुटी पाणी परिषद, नामांतर लाँग मार्च अशी कामे चालली. या दरम्यान समता शिक्षण प्रसारक मंडळ स्थापन करण्यात आले. त्यामार्फत मूकबधीर विद्यालय सुरू करण्यात आले. त्याचे बाळासाहेब पोळ पहिले अध्यक्ष होते. गावोगावी भेटी देणे, अन्याय अत्याचार घडला तर आंदोलन, मोर्चा काढणे अशी कामे सुरू होती. याच दरम्यान नामांतरासाठी औरंगाबाद लाँग मार्च निघाला. त्यामध्ये सहभागी झाले.

भारतीय दलित पँथरची स्थापना १९८४ मध्ये करण्यात आली. त्यामध्ये अमर गायकवाड, संजय गायकवाड, दिलीप भोसले, अरुण गाडे, सुनिल त्रिंबके, बाळासाहेब पोळ, सतिश गायकवाड, विजय आवळे, किशो तपासे ही प्रमुख मंडळी होती. मूकबधीर विद्यालयात बैठक घेऊन जिल्हाध्यक्ष म्हणून किशोर तपासे यांची निवड करण्यात आली. त्यांच्याबरोबर अनिल चव्हाण, शशिकांत चांदणे, अमर गायकवाड, संजय गायकवाड, विजय आवळे, सतिश गायकवाड, सुनिल त्रिंबके, वाई - अशोक गायवाड, फलटण - चंद्रकांत अहिवळे, मधुकर काकडे, सूर्यकांत अहिवळे, कराड- अशोक भोसले, बाळासाहेब शिंदे, भिमराव सावतकर, जयराम चव्हाण, रामभाऊ चांदणे,

पाटण - राम कांबळे, मगरे, कांबळे, कोरेगांव - नंदकुमार कांबळे, छबूताई माने, पांचगणी - रवि मोरे, सुदाम कांबळे, जावली - डॉ. संपतराव कांबळे इ. मंडळी प्रमुख होती. १९७७ मध्ये कराड येथे दलित ऐक्य मेळावा घेण्यात आला. त्याचे नेतृत्व अशोक भोसले, भिमराव सावतकर व रामभाऊ चांदणे यांनी केले.

पहिली सातारा जिल्हा कार्यकारिणी - अध्यक्ष - किशोर तपासेण, उपाध्यक्ष - चंद्रकांत अहिवळे, सरचिटणीस - भिमराव सावतकर, संघटक - अशोक भोसले, कोषाध्यक्ष - अमर गायकवाड अशी होती.

पाटणचे अध्यक्ष राम कांबळे यांचा खून झाला. १९९० मध्ये त्याच्या खूनाला वाचा फोडण्यासाठी फार मोठे आंदोलन झाले. मुंबईतील अनेक नेते उपोषणाला आले होते. डिसेंबर १९८८ मध्ये नामांतरासाठी प्रचंड मोठा मोर्चा काढण्यात आला. सर्व दलित नेते एकत्र आले. सातारवरून २०० कार्यकर्ते सदर मोर्चाला गेले होते.

१९९१ मध्ये प्रचंड दलित ऐक्य झाले. पँथर संघटना बरखास्त करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापन झाली. विधान सभा निवडणूकीत ऐक्य फुटले. आठवले यांनी काँग्रेसला पाठिंबा दिला व ते समाज कल्याण मंत्री बनले. १९९३ मध्ये मराठवाडा विद्यापीठाला डॉ.आंबेडकरांचे नाव देण्यात आले. त्यामुळे नामांतराचा प्रश्न मिटला व पुढे कार्यक्रम मिळाले नाहीत. तरीही खालील प्रश्न हाताळले - १) गायरान जमिनी प्रश्न, २) महार वतनी हक्क जमिनी, ३) राम कांबळे खून प्रकरण, ४) झोपडपट्टी प्रश्न इ.

आर. पी. आय. म्हणून प्रत्यक्ष निवडणुकीत सहभाग घेतला. त्यामध्ये १९९१-९६ मध्ये सातारा शहरात ४ नगरसेवक , जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती १ (बाळासाहेब शिरसाट), नगरसेवक - कराड - १, पांचगणी - १, फलटण - २, रहिमतपूर - १ व ४ पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आणले. कोरेगांव - १ पं. स. सदस्य होते.

किशोर तपासे यांनी दोन दशके दलित चळवळीचे नेतृत्व केले. त्याविषयी ते म्हणाले, कार्यकर्त्यांना योग्य संधी दिल्यामुळे व कामात पारदर्शकता ठेवल्यामुळे नेतृत्व उभे राहिले. जातीची

अडचण झाली नाही. प्रश्न संपले, नवीन कार्यकर्ते नाहीत. नेतृत्वाने कार्यक्रम दिले पाहिजेत. कार्यक्रम नाहीत त्यामुळे नवीन कार्यकर्ते तयार होत नाहीत. पुढे त्यांनी एक प्रसंग सांगितला.

डॉ. आंबेडकर १९३०-३५ च्या दरम्यान सातारला आले होते. त्यावेळी ते एक खून खटला चालवत होते. त्यावेळी दलित समाजातील रामचंद्र भोसले, संभाजी दुबळे, बापूराव बडेकर, परशुराम तपासे, रावखंडे यांनी भेट घेतली. नाव्ही केस कापत नाही अशी तक्रार सांगितल्यावर बाबासाहेबांनी संभाजी दुबळे (मातंग) यास केस कापण्यास सांगितले. त्यांनी आयुष्यभर केस कापण्याचा धंदा केला. त्यांचा १९९४ मध्ये मृत्यू झाला. पण त्यांना न्याय देता आला नाही.

अजून जातिअंताची लढाई सुरू आहे. ती संपली पाहिजे. पण जातीची अंतर्गत लढाई ही संपली पाहिजे. झोपडपट्टी विंग, मजूर संघटना, चतुर्थ श्रेणी संघटना, हातगाडीवाले, भाजी मंडई संघटना यासाठी काम करणारे कार्यकर्ते नेते झाले आहेत. पण कार्यकर्ते नाहीत. ज्यांनी आरक्षणाचा फायदा घेतला त्यांनी बदलले पाहिजे. ही व्यथा त्यांनी बोलून दाखविली

**१३. प्राचार्य डॉ. अरुण गाडे ( भिमसेना) - पाचगणी - २/४/१० सायं. ६ वा.**

माध्यमिक शालेय जीवनात पार्थ पोळके हे शिक्षक होते. श्री भवानी विद्या मंदीर सातारा येथे शिक्षण घेतले. तो परिसर दलित समाजाचा होता. ११ वी मध्ये पोळके सरांच्या प्रत्यक्ष सहवासाला सुरुवात झाली. १९८१-८२ मध्ये समता आंदोलनात सहभाग घेतला. त्यावेळी सातारा शहरामध्ये दलित सेवा संघ दलितांच्या प्रश्नावरती काम करीत होता. सातारा शहरामध्ये काका गाडे, किशोर तपासे हे काम करीत होते. डॉ. आंबेडकरांची जयंती साजरी करणे व सर्व दलितांनी एकोप्याने रहावे हे त्यांचे कार्यक्रम होते.

पोळके सर हे महाराष्ट्रातील दलित अत्याचाराबाबत जाणीव जागृती करीत होते. शहरातील लोकांमध्ये चर्चा करीत होते. छोटी मोठी आंदोलने सुरू होती. त्यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली सहभागी झाले. प्रशासन, शासन आणि पोलिस यंत्रणा यावर त्यांचा प्रचंड असा दबाव होता. पोळके सर यांचे व्यवस्थेला छेद देण्याचे काम पाहून अनेक तरुण भारावून गेले. दलित सेवा संघाची स्थापना व त्यातून एक व्यापक चळवळ उभी रहावी म्हणून पोळके सरांबरोबर ते उभे राहिले. दलित सेवा संघाचे अस्तित्व समता आंदोलनामुळे कमी झाले व दलित सेवा संघ समता

आंदोलनात मर्ज करण्यात आला. त्याचे पोळके सर हे प्रमुख कार्यवाह होते. समता आंदोलन ३ वर्षे चालले. दलित चळवळीची आक्रमकता महाराष्ट्रातील समाजवाद्यांना रुचली नाही. समाजवादी शिस्तीमध्ये पोळके व त्यांचे कार्यकर्ते राहू शकले नाहीत. अन्यायाविरुद्ध तीव्र प्रतिक्रिया देण्याची या मंडळींची भूमिका राहिली. बघू, पाहू, अभ्यास करू व नंतर एखाद्या भूमिकेविषयी निर्णय घेऊ हे मंडळींना मान्य नव्हते. अन्यायाला सडतोड उत्तर देण्याच्या पद्धतीमुळे महाराष्ट्रात मोठी ताकद निर्माण झाली. सर्व दलित तरुण समाजवादी चळवळीपासून बाजूला गेले.

समता आंदोलन, एक गाव एक पाणवठा, नामांतर लढा, दलित तरुणांना सक्षम बनविणे ही भूमिका घेतली. १९८४ नंतर भारतीय दलित पँथरने महाराष्ट्रभर व्यापक प्रभाव रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली वाढविला. समाजवाद्यांची काँग्रेसशी असलेली छुपी युती पोळके यांना हवीहवीश वाटत होती. पद्मश्री लक्ष्मण माने व शरद पवार सख्य व पोळकेंना पवारांविषयी वाटत असलले आकर्षण हे साताऱ्यातील दलित तरुणांच्या लक्षात आले.

१९८६ मध्ये सातारा येथे दलित पँथरची स्थापना झाली. किशोर तपासे, संजय गायवाड, अशोक गायकवाड, प्रा. अरुण गाडे, अमर गायकवाड, महेंद्र खरात, राजू मोरे, अशोक बैले, चंद्रकांत अहिवळे या तत्कालिन त्यावेळी दलित नेत्यांच्या काही गोष्टी त्यांना आवडल्या नाहीत. त्यामुळे ते पोळके सरांबरोबर राहिले. १९८७ मध्ये कराड येथे दलित ऐक्य परिषद अशोक भोसले व भिमराव सावतकर यांनी घेतली. पुढे दलित ऐक्यात पोळके सरांना कमी स्थान मिळाले व १९८९ मध्ये भिमसेना स्थापन करण्यात आली.

भिमसेनेने पँथर प्रमाणे आक्रमक चळवळ केली. दलित अन्याय, अत्याचार, नामांतर, दलितांच्या प्रश्नांवर आवाज उठविणे, झोपडपट्टी, वंचितांचा प्रश्न हे लढे आक्रमकपणे लढविले. अरविंद गाडे, सदाशिव गोळे, राजू आवटे, राजू मेळावणे, रामा गेजगे, बाळु गायकवाड, अमोल बनसोडे, राजू मोरे, थोरवडे - कराड, सयाजी भोसले, राजू भोसले, विनोद बनसोड - मोळ, सुनिल उबाळे - ल्हासुर्णे, राजरत्न सावंत, शाहीर कांबळे, आदिनाथ सावंत, बाळासाहेब मोरे, बाळासाहेब रणदिवे इ. प्रमुख कार्यकर्ते होते.

१९८९ मध्ये रिपब्लिकन पक्षाच्या अधिपत्याखाली सर्व संघटना बरखास्त करून दलित ऐक्य झाले. या ऐक्यात सर्वच दलित संघटना सहभागी झाल्या.

भिमसेनेने सातारा जिल्ह्यात खालीलप्रमाणे कार्य केले - १) झोपडपट्टीवासीयांचा प्रश्न सोडविला. २) बौद्धेतर मंडळींना दलित चळवळीत आणले (ढोर, होलार, मांग, मराठा). ३) लक्ष्मी टेकडी व भिमाबाई आंबेडकर झोपडपट्टीची जागा मिळविली. ४) महाराष्ट्रातील अन्याय अत्याचाराला प्रतिक्रिया दिल्या. ५) मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी यासाठी लढे दिले. ६) नामांतराच्या बाजूने लढायला उभे राहणे इ. कार्य केले.

१९९४ मध्ये मराठवाडा विद्यापीठासाठी सातारा ते औरंगाबाद लाँग मार्च काढला. त्यामध्ये १५० कार्येकर्ते सहभागी होते. त्यातील ७५ कार्यकर्त्यांना अटक झाली. वडूज व तेथून १५ दिवस जेलमध्ये सातारा येथे ठेवण्यात आले. त्यांनी जेलमध्ये नामांतर सोहळा साजरा केला.

नामांतरानंतर पोळके सरांच्यामध्ये वैचारिक खटके उडू लागले. जिल्हाभर बांधणी करणे, चळवळी उभ्या करणे याबाबत पोळके सर यांनी फार काही सहकार्य केले नाही.

त्यांनी संस्था स्थापन केल्या. हे रचनात्मक कार्य आहे. समता शिक्षण संस्था, भिमाबाई आंबेडकर प्रतिष्ठान या सारख्या संस्थांत कोणत्याही कार्यकर्त्याला सभासद केले नाही. आपल्या मर्जीतील नातेसंबंधी, हितसंबंधी मंडळींना घेतले. त्यामुळे जास्तच मतभेद वाढले.

समता संस्था व वसतीगृह जागा मिळविण्यासाठी संघर्ष करणे, हे कार्य भिमसेनेतील कार्यकर्त्यांनी केले. मातोश्री भिमाई जागेबाबत तीव्र आंदोलन केले. पोळके सर यांनी संस्था उभ्या करण्यासाठी मदत घेतली. पण भिमसेना जिल्हाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांना जाणीवपूर्वक सभासद केले नाही.

पोळके सर यांचा चळवळी विषयीचा हेकेखोरपणा होता. काँग्रेस व शरद पवार यांना अपेक्षित असलेले लढे उभे करण्याची त्यांनी तीव्र अपेक्षा केली. अपमानास्पद वागणूक द्यायला त्यांनी सुरुवात केली. त्यामुळे अनेक दलित कार्यकर्ते त्यांच्यापासून बाजूला गेले.

१९९५-९६ मध्ये दलित ऐक्य झाले व प्रा. गाडे यांनी भिमसेनेचा राजीनामा दिला व रिपाई जिल्हा सरचिटणीस झाले. १९९६ मध्ये सेना भाजप महाराष्ट्रात सत्तेवर आली व त्यांनी दलित विरोधी निर्णय घ्यायला सुरुवात केली. त्याविरोधात आंदोलने सुरू केली.

युती शासनाने नामांतराच्या काळातील ११०० खटले काढून घेण्यात आले. दलित मुलांना निळा गणवेश देणे, त्यावेळी पोळके सर यांनी आर. पी. आय. मध्ये प्रवेश केला, पण त्यांना घेतले नाही. यावेळी आर. पी. आय. ने निवडणुक लढविल्या. प्रा. गाडे यांनी पक्षाचा प्रचार केला. आर. पी. आय.ला यश मिळाले नाही. ते यश न येण्याची कारणे - स्थानिक नेत्यांचे युती विरोधी वर्तन, कार्यकर्त्यांचे मोठे आर्थिक व्यवहार, आंबेडकरी मूळ विचार धारेपासून भरकटत गेलेला कार्यकर्ता, पक्षीय निष्ठा राहिली नाही. विचारधारा राहिली नाही. या संदर्भात पक्षीय शिस्त म्हणून बंधन नाही. कारवाई नाही. वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतले नाहीत. त्यामुळे आर. पी. आय. (आठवले गट) मुख्य प्रश्नापासून बाजूला गेला.

रिपब्लिकन पक्षाला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी प्रा. गाडे यांनी 'रिपब्लिकन पक्षाला गरज आहे एका सरसेनापतीची' अग्रलेख लिहिला. तर बहुजनांचा सांस्कृतिक संघर्ष, हिंदू विरुद्ध वैदिक वैचारिक लिखाण ग्रंथरुपाने पोळके सर यांनी केले.

प्रशासकीय नोकरीमध्ये प्राचार्य झाल्यामुळे काही मर्यादा आल्या. निखळ आंबेडकरवादी विचार मांडणे, प्रबोधन करणे, मदत करणे, सर्व परिवर्तनवादी चळवळीला पाठिंबा देणे हे सुरू आहे. सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ प्रभावी आहे. प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करणारे कार्यकर्ते आहेत. पण जाती अंताची लढाई फार अवघड आहे.

शेवटी प्राचार्य गाडे सर म्हणाले, प्रत्येक नेत्याची संधीसाधू भूमिका त्यामुळे सामुदायिक नेतृत्व उभे राहू शकत नाही. गटबाजीचे राजकारण सुरू होते. दलित चळवळीचे पूर्णपणे राजकीयकरण झाले आहे. निखळ आंबेडकरवाद मनामध्ये रुजविणे ही चळवळ उभी करावी लागेल. हे सुशिक्षित लोकांचे काम आहे. दलित ऐक्याच्या दृष्टीने कार्य झाले तर सहभागी होणार व काम करणार. वैचारिक परिवर्तन जोपर्यंत तरुणांचे होत नाही तोपर्यंत वैचारिक विभाजन होणार. हा दीर्घकाळ चालणारा बदल आहे.

## १४. अशोक गायकवाड (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया - आठवले गट) - वाई - १६/०/०९ - सायं. ७ वा.

त्यांचे आजोबा मुंबईमध्ये गिरणी कामगार होते. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत ते डॉ.आंबेडकरांचे संरक्षक होते. चुलते सावळाराम गुरुजी हे बाबासाहेबांबरोबरहोते. त्यांचेही वडील वामन दिनकर गायकवाड हे अशिक्षित होते. पण १९७५-७६ मध्ये वाई बौद्ध सेवा संघाचे ते कार्यकर्ते होते. कवी वामन दादा कर्डक, विठ्ठल उमप यांचा गायन संच होता. कवी श्रावण यशवंते यांच्याशी त्यांचे चांगले संबंध होते. १९६४-६५ दरम्यान घरी त्यांच्यावर पत्र लिहिण्याची जबाबदारी होती. पत्रावर निमंत्रक म्हणून त्यांचे नाव होते. वाई तालुक्यात बुद्ध विहार चळवळ सुरू झाली. त्यामध्ये पि. जी. दाभोळे, के. आर. मोरे, कवठे - मोरे, शेंदुरजणे - जाधव, एस. टी. बनसोडे, शाम कांबळे, सुरेश गायकवाड, बबन गायकवाड, राम कांबळे, अरविंद कोठावळे यांचा परिणाम त्यांच्यावर झाला. लढावू भूमिका म्हणून काही तरुण मुले त्यांनी एकत्रित केली. त्यामध्ये सुनिल मोरे, शामराव कांबळे - धोम, शरद जाधव - बोपेगाव, गावागावांमध्ये बैठका घेतल्या व मुले एकत्रित केली. १९७६-७७ मध्ये घरातून विरोध झाला व ही चळवळ फिस्कटली.

१९८६ मध्ये सातारा जिल्ह्यात पँथरची स्थापना करण्यात आली व रामदास आठवले यांनी दलित ऐक्य परिषद कराड येथे घेतली. सातारा जिल्ह्यातील नेत्यांना आठवले यांचे नेतृत्व आवडले. भारतीय दलित पँथरचे सुरुवात वाईत फुलेनगर येथून सुरू झाली. त्यावेळी वाई अध्यक्ष महेंद्र खरात व नंतर ते अध्यक्ष झाले. किशोर तपासे, गायकवाड बंधू, अरुण गाडे, साहेबराव तपासे, सुनिल त्रिंबके, प्रकाश वायदंडे, गौतम वाघमारे इ. कार्यकर्ते होते.

१९८६-८७ मध्ये पार्थ पोळके यांना पँथरची भूमिका नको होती. पण वाईमध्ये झंझावाती सुरुवात केली. ४९ उप सरपंच पँथरचे होते. रामदास आठवले यांचा नियोजित मेळावा काँग्रेसला आवडला नाही. १९८९ मध्ये त्यांच्यावर शिवसैनिकांनी अचानक हल्ला केला. काहीच जवळ नव्हते. प्रचंड हल्ला होता. डॉक्टरने ते मरणार असे जाहीर केले. पण ते जिवंत राहिले. त्यांच्यावरील हल्ल्यामुळे पँथरला आक्राळविक्राळ स्वरूप आले. दादा येळगे, सुरेश मोरे, दिलीप कांबळे, सुदाम कांबळे, पाचगणी अशी बरीच पँथरची मंडळी तयार झाली.

त्यांचे वडील पूर्ण आंबेडकरवादी असल्याने ते म्हणाले, एक पोरगा गेला तर दुसरा पोरगा देईन. पण आठवले साहेबांचा मेळावा घेणारच. अशोक बैले मेळाव्यास उपस्थित होते. त्यांनी अतिशय प्रभावी भाषण केले. एक अशोक गेला तर १०० अशोक निर्माण होतील. त्यामुळे वाईत पँथर विरुद्ध शिवसेना असे स्वरुप निर्माण झाले. १९८९-९० शिवसैनिकांवर तलवार वार केला. त्यामुळे त्यांना वाँटेड करण्यात आले. अशाच धावपळीत त्यांचा एक भाऊ मृत्यू पावला. लहान मुलांना पत्नी सांभाळत होती व अशोक (बापू) बाहेर होते. १९९०-९१ मध्ये आठवले साहेब सातारला आले. सानप सो़ एस. पी. होते. नितीन वाडेकर यांनी हायकोर्टातून जामीनकी साठी मदत केली. मा. आठवले समाज कल्याण मंत्री झाले. अशोक बापू १ महिना जेलमध्ये होते. नंतर १६-१७ जणांना सोडण्यात आले. संतोष गायकवाड, शाम भोसले, दिनकर कांबळे स्वत: जेलमध्ये गेले व अशोक बापूंना जामीन करून दिला. तेव्हापासून त्यांनी कामाला वेगाने सुरुवात केली.

१९९२-९३ मंडल आयोग अंमजबजावणीसाठी प्रचंड मोर्चा काढला. मंडल आयोगाला तर्कतीर्थानी विरोध केला म्हणून तर्कतीर्थांचा पुतळा जाळायचा ठरले. ७ - ८ हजार लोक गोळा झाले होते. तातोबा गायकवाड- वेळे यांनी फार मोठी मदत केली. मानसिंग यादव - गुळुंब, निवास घाडगे - वाई, प्रकाश पाटील - फुलेनगर, नाना कांबळे इ. कार्यकर्ते होते. सर्व प्रशासन हादरले. सौ. विजयाताई शेलार व त्यांच्या पत्नीने तर्कतीर्थांच्या पुतळ्याला अग्नी दिला. त्यानंतर तर्कतीर्थांनी आपले विधान मागे घेतले व पुण्यास गेले. आजारी पडले व त्यात त्यांचा मृत्यू झाला.

शेवटी अशोक गायकवाड (बापू) असे म्हणाले, की दलित ऐक्य झाले. दलित पँथर विसर्जित करण्यात आली. दु:ख व आनंद झाला. चहा पिताना डोळे भरून आले. वाघ, चित्ते यांना बांधून टाकले. चळवळ संपली. बाबासाहेबांचा ऐक्याखाली रिपब्लिकन पक्ष स्थापन करण्यात आला. १९९२-९३ रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अशा पक्षाखाली काम सुरू केले.

ग्रामपंचायमध्ये राजकीय यश आले नाही. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून कामास सुरुवात झाली. सातारा जिल्ह्यात नवे नेतृत्व सुरु केले. आज गेली ६ वर्षे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. जिल्ह्यात कोठेही धावून जात आहेत. स्वतंत्रपणे वाई विधानसभा निवडणूक लढवली. यश आले नाही पण ताकद निर्माण केली आहे.

## १५. गौतम वाघमारे (भारतीय रिपब्लिकन पक्ष - प्रकाश आंबेडकर गट)

## सातारा - २५/१०/०९ - सायं. ६.३० वा.

१९७८ पासून दलित चळवळीतील कामाला सुरुवात केली. पुणे-बोपोडी येथे दलित पँथरच्या सुरुवातील बापूसाहेब कांबळे गटात काम केले. पुढे नामदेव ढसाळ यांच्या पँथरामध्ये बोपोडी शाखा प्रमुख झाले. १९८२ मध्ये अंतुले मुख्यमंत्री होते. नोकरभरतीबाबत त्यांना घेराव घातला. भारत-इंग्लंड क्रिकेट मॅच पुणे येथील नेहरू स्टेडियमवर होती. इंग्लंड संघातील काही खेळाडू वर्णभेद मानत होते. म्हणून त्यांच्या विरोधात मॅच रोखून धरली. त्यामध्ये ३०-३५ कार्यकर्ते होते. डॉ.भिमराव काळे, गौतम वाघमारे, नितीराज पिल्ले, प्रेमकुमार कांबळे, तुळीशराम सरोगी, मोहन मस्के, बाळू वाघमारे, नागेश घटकांबळी इ. कार्यकर्ते होते.

नामदेव ढसाळ यांच्या उपस्थितीत एस. पी. कॉलेज मैदानावर कै. इंदिरा गांधी विरोधी निदर्शने केली. गरीबी हटावची अंमलबजावणी झाली पाहिजे. ही मागणी केली.

१९८०-८१ ताजमहाल हॉटेल नामदेव ढसाळ यांच्या नेतृत्वाखाली अजित केतकर मॅनेजरयांनी जी गावे दत्तक घेतली होती. त्याची अंमलबजावणी केली नाही म्हणून २५-३० कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. बाळू वाघमारे यांना अटक झाली. भाई संगारे प्रश्न विचारायचे व नामदेव ढसाळ उत्तरे द्यायचे असा मोर्चा मुंबईमध्ये काढला.

१९८० मध्ये पुणे येथील कंपनी प्रेसिजन ट्रान्समॅटिक डिवायसेस प्रा. लि. हिचे सातारा येथे स्थलांतर झाले व वाघमारे सातारा येथे आले. यावेळी पार्थ पोळके समता आंदोलन व किशोर तपासे दलित पँथर चळवळीत होते.

१९८२ मध्ये प्रकाश आंबेडकरांचा राजकारणात प्रवेश झाला. त्यांनी नाशिक ते मुंबई आर. पी. आय. एकत्रीकरणासाठी पदयात्रा काढली. येथे वाद झाले. नामदेव ढसाळ सहभागी झाले नाहीत. १९८३ मध्ये पुणे शहर शाम रेड्डी, जयदेव गायकवाड, एल. डी. भोसले, वसंत साळवे यांनी पुणे शहरामध्ये बैठका झाल्या. २८ शाखा फोडल्या, प्रकाश आंबेडकरांच्या बरोबर जाण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी नेते मंडळी आली.

भूमिहीनांचा प्रश्न व साखर कारखाने यांचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे यासाठी माणगाव ते पुणे प्रकाश आंबेडकरांनी पदयात्रा काढली. त्यावेळी पुणे येथे रिपब्लिकन पक्षाची त्यांनी घोषणा केली. एकत्रित रिपाईचे अध्यक्ष ॲड्. प्रतापराव धनवडे व सरचिटणीस जयदेव गायकवाड, निलम गोऱ्हे यांना केले. त्यामुळे १९८२ पासून प्रकाश आंबेडकरांच्याबरोबर कामकाजाला त्यांनी सुरुवात केली.

प्रतापसिंहनगर येथील कृष्णा गव्हाळे, धनाजी वाघमारे, खेड - सुरेश कांबळे, हृदयनाथ कांबळे, शिवथर - शांताबाई कांबळे, काका गाडे, राजेद्र कांबळे, मधुकर अठवले, जिल्हा अध्यक्ष - राजेंद्र कांबळे, डॉ. श्रवण बनसोडे (खुबी) यांच्याबरोबर मेळावे, झोपडपट्टी प्रश्नी मोर्चा. १९८९-९० मध्ये दलित ऐक्यात सहभागी आर. पी. आय. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम केले.

१) नामांतर प्रश्न मेळावे, मोर्चा काढणे. २) झोपडपट्टी प्रश्नावरती - सुखसुविधा तयार कराव्यात मागणी. ३) दलित, अन्याय, अत्याचर, धरणे, मोर्चा. ४) महारवतनी जमीनी (देशमुख, भुजबळ निषेध, त्यांचे पुतळे जाळणे, त्यामुळे केसेस दाखल, खटले भरले गेले. ५) मागसवर्गीय आरक्षण, बढती-बदली, लालकृष्ण अडवाणी रथयात्रा नाक्यावर आडवले , ६) रमाबाई आंबडेकर नगर गोळीबार - सातारा बंदचे आवाहन, ७) संविधान रॅली - स्वागत कार्यक्रम, ८) घटनेचा सुवर्ण महोत्सव - रक्तदान शिबीर, त्यामध्ये १६ बुद्धिस्ट मुलांनी रक्तदान केले. अशा कार्यक्रमात सहभागी होतो.

दलित समाजाच्या प्रश्ना संदर्भात एक स्वतंत्र दलित नेता म्हणून स्वतंत्र विचार मांडले. माने-पोळके समाजवादी राहिले. त्यांनी सत्ताधाऱ्याचे नेतृत्व मानले. आंबेडकरांच्या चळवळीमध्ये एकूण दलितांचे प्रश्न सोडविले. पण त्यांनी स्वतंत्र आंबेडकरी चळवळ उभी करायला पाहिजे होती. वाघमारे यांच्या मते जातीचे मतदान आहे व जातीय संघटना झाल्यामुळे प्रस्थापित राजकीय लोक आहेत. वेगवेगळ्या पद्धतीने आंबेडकरी, चळवळीवर सर्व राजकीय पक्षाने आघात केला आहे. त्यामुळे भवितव्य नाही, अंधारातच आहे. लोकांनी एकत्र आले पाहिजे. रिपाई, आरपीआय एकत्र आले पाहिजेत. बुद्धिहीन दुबळे नेतृत्व नाकारले पाहिजे. समाजातील चांगल्या विचारांची मंडळी आहे त्यांनी एकत्र बसावे व चर्चा करावी. सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीच्या माध्यमातून २१ व्या शतकातील सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी सर्व दलित चळवळी, पक्ष एक होणे आवश्यक आहे.

## १६. वर्षा देशपांडे (दलित महिला आघाडी व युक्रांद) सातारा - ३०/१०/०९ सकाळी ११ वा.

त्यांचे वडील आर. एस. एस. चे पूर्ण वेळ कार्यकर्ते होते. मात्र आई काँग्रेसच्या राष्ट्र सेवादलात वाढलेली शिक्षिका होती. घरात नेहमी आईवडीलांच्यात तात्त्विक वाद होत. इंदिरा गांधींना अटक झाली त्यावेळी वडीलांनी पेढे वाटले व आई रडत होती. आणिबाणीत वडील १९ महिने अटक होते . जयप्रकाश नारायण मंडळी वडीलांच्या बरोबर होते. कर्नाटक व महाराष्ट्र सीमेवर कुरूंदवाडगाव या दरम्यान गांधी हत्या जाळपोळ झाली. बेळगांव, अनगाव, कुरुंदवाड संस्थानात होते.

१९८० स्त्रीमुक्ती यात्रा झाली व १९७५-८५ मुंबई- बेळगांव महिला दशक वर्ष साजरे करण्यात आले. ‘मुलगी झाली हो’ कानडी व मराठी ३५० प्रयोग केले. पैसे उभे राहिले. यात मार्क्सवादी कम्युनिस्ट होते. या दरम्यान परिवर्तन ग्रंथालय सुरू केले. विद्या बाळ ‘स्त्रीमासिक’ यात जाहिरात आली. पूर्ण वेळ कार्यकर्ता पत्नी हवी आहे. १९८६-८७-८८ मध्ये छात्रभारती संघटन केले. १० जून १९८८ मध्ये मुक्तांगणमध्ये लग्न झाले. त्यावेळी बेडकिहाळ, झिंब्रे, दाभोळकर, सतिश घाडगे इत्यादी हजर होते. छात्रभारती, दलित पँथर, एकता संस्था, अंधश्रद्धा निर्मूलन समिती व डॉ. आंबेडकर अकादमी यामधून त्या काम करीत होत्या.

राष्ट्रीयता जागर अभियान १९९१-९२, सहभाग , १९९० दलित महिला मंडळाची स्थापना केली. नवऱ्याने सोडलेल्या बायकांचा सर्व्हे केला. सातारा शहरात १९८९ मध्ये २०० महिलांचा मोर्चा काढला. जागतिक महिला दिन साजरा केला. प्रयोग पुणे निमित्त स्त्रीविषयक संवाद, भित्तीपत्रिका मुलींच्यासाठी सुरू केल्या. अंतरंग गृहिणी हस्तलिखित सुरू केली. निशा शिवरकर मार्फत नवऱ्याने सोडलेल्या महिलांसाठी स्वतंत्र रेशनकार्ड मिळावे, मागणी मान्य करून घेतली. महिला कल्याण केंद्र मार्फत जिल्हाभर सर्व्हे करण्यात आला व जिल्ह्यात ३५०० महिलांची नोंद करण्यात आली. परित्यक्ता हक्क परिषद जानेवारी १९९० मध्ये घेण्यात आली. नागपूरला महाराष्ट्रातील महिलांचे अधिवेशन भरले व त्यात ६ लाख महिलांची नोंदणी झाली. दारु बंदीबाबत

३० हजार महिला मंडळे उभी केली. दारुबंदीची चळवळ सुरू केली. महिला बचत गट स्थापन केले. १९९३ मध्ये महिला बचत गटाचे खाते बँकेत उघडून देत नव्हते ते उघडले.

१९९३ रामोशी समाजातील उमाजी नाईक महिला मंडळ डिस्कळ त्यामध्ये ४५० महिला होत्या. दारु दुकान बंद केले. त्या गावातील १८ मुले दारु पिऊन मेली होती. गावात १२७ दारु धंदे होते. सदरबझार, ओंड अशी १७ दुकाने बंद केली. पुसेगांवात रामोशी, दारु धंदेवाले यांची बैठक घेतली. ज्या शेतकऱ्याचे बांधावर दारू काढली जाईल त्याला अटक करा. अशी मागणी केली. यामध्ये राजकीय व्यक्तीची कमतरता होती. बायडाबाई मदने, द्रौपदा कुरणे, सिताबाई गोळे, सोनाबाई दळवी, अनुसया सपकाळ, मालन साळुंखे, विठ्ठल जगताप, सुजाता कारंडे, रेखा ससाणे, कुसूम साखरे इत्यादी महिला कार्यकर्त्या होत्या.

दलित महिला मंडळ स्थापन केले व झुणका भाकर केंद्र सुरू केले. ३ लाख रुपये अनुदान मिळाले. १४ एप्रिलला निळू फुले यांच्या मागणीने दलित महिला मंडळाने एस. टीत. जागा मिळविली. मोफत कायदा केंद्र सुरू केले. महाराष्ट्र विधिसेवा प्राधिकरण, कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण, सेवा संस्था म्हणून मान्यता. गर्भलिंग निदान केंद्र वतीने ५० डॉक्टर विरुद्ध केसेस घातल्या. महाराष्ट्र देश पातळीवर कौतुक नाही. उच्चवर्णीयांच्या मानसिकतेत आपल्याला मुलगी नको ही भावना जास्त आहे. सगळ्यात जास्त मुली मराठा व जैन समाजात मारल्या जात आहेत.

बनावट गरोदर महिला म्हणून दलित महिला उभ्या केल्या. २००९ मध्ये सातारा जिल्ह्यात मुलींची संख्या वाढते आहे. यामध्ये साथीदार दलित महिला आहेत. वेश्या जास्त दलित महिला आहेत. आरक्षणाच्या समर्थनार्थ आठवलें बरोबर सभा केल्या. आरक्षणाचा कायदा आहे म्हणून खैरलांजीमध्ये बायकांच्यावर अत्याचार झाले. पण याची नोंद झाली नाही. वस्तीवस्तीमध्ये नेतृत्वाचा अभाव आहे. दलित पुढाऱ्यांनी विश्वास अर्हता घालविली आहे. तसेच दीक्षा भूमीवर दलित बायका मुली यांची संख्या जास्त आहे. पण दलित चळवळीत महिलांचा सहभाग फारच नगण्य आहे. याची जाणीव दलित कार्यकर्त्यांना व नेत्यांनाही नाही.

## १७. मा. वामनराव मस्के (रयत महासंघ) - सातारा - ५/११/०९

मस्के यांचे बालपण पोलिस लाईनमध्ये गेले. १९७२ मधील वरळी दंगल प्रत्यक्ष त्यांनी पाहिली. हिंदू व बौद्ध यांच्यामध्ये जातीय दंगल झाली. गोळीबार झाला. त्यांचे मित्र पोळ सख्खे भाऊ ठार झाले. त्यावेळी त्यांनी निर्णय घेतला की समाजासाठी काम करावयाचे. याच दरम्यान १९७२ मध्ये दलित पँथर स्थापन झाले. त्यावेळी बी. सी. कांबळे, यांची राजकीय ताकद होती. चव्हाण मास्तर, दादासाहेब इंदिसे, गवई, एन. एम. कांबळे यांचे तत्कालिन कार्यकर्ते रत्नाकर गायकवाड होते. ते अभय शिक्षण केंद्रात काम करत होते. या दरम्यान त्यांचे वडील सेवानिवृत्त झाले.

१९७९ मध्ये सातारा येथे प्रयाण केले. त्यावेळी दलित सेवा संघ होता. त्यामध्ये काम करू लागले. पुढे एस. टी. मध्ये १९८६ मध्ये कामाला लागले. त्यानंतर भारतीय बौद्ध महासभा, बामसेफ, डी. एस. फोर या चळवळीशी बांधिलकी होती. सभासदांच्या बैठका, पत्रके काढणे, दलित समाजातील शिकलेला पुढारलेला वर्ग आंबेडकरी चळवळीत यावा म्हणून प्रयत्न केले. दलित चळवळीतील ब्रदर्स संघटना होत्या. त्यांचे विचार ऐकले. आपले विचार प्रदर्शित केले. समाजात एकवाक्यता निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न केला. गोडोलीमध्ये बुद्धविहार बांधण्यात पुढाकार घेतला, वाचनालय सुरू केले.

एकनाथराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली रयत महासंघ स्थापन केला. १९८९ मध्ये सातारा जिल्हा रयत महासंघाची स्थापना केली. बहुजन समाज चळवळीमध्ये यावा हा हेतू होता. आर्थिक दृष्ट्या दुर्बल समाजाचे, शैक्षणक मागासलेल्या लोकांना मदत, सहकार्य करण्याचा प्रयत्न केला. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात शाखा होती. अध्यक्ष - नानासाहेब भोसले, अशोक जंबुरे, सरचिटणीस - वामन मस्के, शहर - गोपाळ औताडे, उपाध्यक्ष - दत्ता पवार, शिवाजी वायफळकर, प्रकाश सरगडे, ॲड्. एस. के माने, विजयराव कणसे, सौ. शकुंतला कासट, नगरसेविका निंबाळकर बाई, नगरसेवक - हणमंतराव पवार, रफीक शेख इ. मंडळी प्रमुख होती.

मुंबई वरळीच्याजातीय दंगलीवरून त्यांनी असा एक बोध घेतला की बहुजन समाजाला एकत्र आणून जातीयवादाचा खातमा करावा म्हणून सर्वांना एकत्र करावे. ही त्या मागची मानसिकता

होती. १९८९-२००० पर्यंत रयत महासंघात काम केले. त्यावेळी रयत महासंघाचे संस्थापक अध्यक्ष - एकनाथ गायकवाड होते. ते सामाजिक न्याय व आरोग्यमंत्री होते. रयत महासंघाचा राजकीय लाभ सातारमध्ये झाला. नगरपालिकेत २ नगरसेवक निवडून आणले. एक जिल्हा परिषद सदस्य विजयराव कणसे. पुढे एकनाथ गायकवाडांनी रयत महासंघ मुंबई प्रदेशापुरता मर्यादित केला. कारण त्यांचे विधानसभेचे तिकीट कापण्यात आले. संघटनेला राजकीय वरद हस्त कमी झाला. बहुजन समाजातील जातीयवादी दृष्टिकोन विचारात घेता तो बदलल्यामुळे त्या कामाची पावती मिळाली.

पुढे २००० मध्ये परिवर्तन मित्र समूह वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१) फुले-शाहू-आंबेडकर यांच्या ग्रंथाचे वाचन व निरूपण कार्यक्रम, दलित वस्ती, वैदू वस्ती, कोल्हाटी वस्ती, जोशी बागडी वस्ती, बौद्ध वस्ती, मांतग वस्ती येथे राबविला. त्यामध्ये नारायण जावळीकर, शामराव बनसोडे, मस्के, मनोहर पवार, प्रा. अनिल जगातप, अे. बी. माने हे प्रमुख मंडळी होती.

२) फुले-आंबेडकर विचारांचा प्रचार व प्रसार करणे.

३) डॉ. आंबेडकर शाळा प्रवेशाचा कार्यक्रम केला.

४) सम्राट वर्तमानपत्र साताऱ्यात आणले.

५) सातारा कोल्हापूर येथे 'दै. सम्राट' चा प्रसार व वितरण केले. २००४ मध्ये कासट मार्केटमध्ये कार्यालय सुरू केले.

अंधश्रद्धा समिती, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, दलित साहित्य चळवळ केली. राजकीय क्षेत्र काँग्रेस , बहुजन समान पक्ष असे होते. समाजात बदल घडत आहे. पण जातीयवाद संपलेला नाही. नेतृत्वात दोष आहे. नेतृत्वाचा अभाव आहे. समाजात आत्मपरीक्षण करून समाजाप्रती काम करण्याची प्रवृत्ती बळावली पाहिजे. सामाजिक बांधिलकीसाठी दानत आहे पण ती पारदर्शक असली पाहिजे. जिकडे तिकडे निर्मळ असले पाहिजे असे स्पष्टपणे मस्के म्हणाले.

## १८. बापूराव जगताप (दलित सेना) - फलटण २५/११/०९ - सायं. ५ वा.

१९८० मध्ये हरिष काकडे कार्यकर्त्यातील मित्र होते. व्यक्तिगत स्वरुपात दलित अत्याचार विरोधी कामास सुरुवात केली. १९८४ मध्ये फलटणमध्ये पतंगाच्या दोरीवरुन शुक्रवार पेठ व मंगळवार पेठ अशी दंगल झाली. पोलिसांना मारहाण झाली. फलटण पूर्ण बंद होते. १९८४-९५ सामाजिक कामास व्यक्तिगत स्वरुपात सुरुवात केली. १९९२ मध्ये जे. टी. जगताप, बेबीताई कांबळे यांच्या संपर्कात आले. व रामजी बालक मंदिर सुरू केले. भटक्या विमुक्त मुलांसाठी प्राथमिक आश्रमशाळा सुरू केली.

१९९५ सातारा जिल्हा दलित सेना अध्यक्ष म्हणून निवड झाली. मा. रामविलास पासवान यांना फलटणमध्ये आणले व सभा घेतली. ५ हजार कार्यकर्ते आले होते. मदन अहिवळे, अशोक भोसले, नाना अहिवळे, सचिन मोरे, लखन गायकवाड, आप्पा गायकवाड हे कार्यकर्ते होते. राजकीय अडचण म्हणून ते भाजपकडे गेले. पुढे पासवानसाहेब रेल्वेमध्ये असताना अनेक कमिट्या दिल्या.

१९९८-९९ आंध्रप्रदेश रेल्वे कमिटीवरती निवड झाली. रामविलास पासवान हे फुले शाहू आंबेडकर विचारांचे देशपातळीवरचे नेतृत्व करीत आहेत. १९९६ मध्ये मुंबई जेलभरो आंदोलन केले. मागासवर्गीयांचे विविध प्रश्न घेवून आंदोलनासाठी ५० कार्यकर्ते मुंबईस गेले. महारवतनी, हक्काची जमिनी मिळव्यात म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. दलित सेना अध्यक्ष म्हणून दलितांना मोफत ५ झाडे वाटप केले.

२००२ - सातारा जिल्हा टेलिफोन कमिटीवरती निवड झाली. फलटण तालुक्यातील प्रत्येक दलित कुटुंबाला फोन सुविधा मोफत देण्यात यावी. तसेच त्यांना एस. टी. डी. बूथ देण्यात यासाठी आंदोलन केले. सातारा जिल्हा आश्रमशाळा संघटना अध्यक्ष, सातारा जिल्हा दारुबंदी कमिटी अध्यक्ष, दारुचे दुष्परिणाम यावर अभियान राबविले. फलटण शहर शांतता कमिटी सदस्य, राजर्षी शाहू महाराज ज्ञान विकास प्रसारक मंडळ फलटण अध्यक्ष. दरवर्षी १० वी, १२ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व शालेय साहित्य वाटप, प्रोत्साहनात्मक सर्टीफिकेट दिली जातात. शाहू जयंती रक्तदान शिबीर, केंद्रीय ग्रामीण रुग्णालय उभारणी मिरगाव, एच.आय.व्ही.,

बालसंगोपन केंद्र, अनाथाश्रम, केंद्रीय ग्रामीण रुग्णालय उभे करण्यासाठी सोमनाथ कोकळे यांनी २ एकर जागा दिली. डॉ. आंबेडकर जयंती अध्यक्ष, सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला.

शेवटी बापूराव जगताप म्हणाले, आंबेडकरी चळवळीतील लोक संघटित नाहीत. विविध पक्ष व संघटना आहेत. १९९७-९८ दलित सेना नगरपालिका ३ जागा लढविल्या. उत्काताई चव्हाण, जे. टी. जगताप, मोहन गो. आहिवळे, फलटण-लोणंद रेल्वे मार्ग सुरु करावा मागणी केली.

आंबेडकरी चळवळीत पूर्वीच्या बौद्धवितिरिक्त इतर चळवळीत कोणी नाहीत. प्रत्यक्ष विचाराने वागत नाहीत. बौद्ध धर्माचे विचार आचारात घेवून वागले पाहिजे. आर. पी. आय. चे नेते विखुरलेले आहेत. त्यामुळे चळवळीला खीळ बसतेय. वरचे नेते एकत्र आले तर खालचे नेते एकत्र येतील. बौद्ध धर्माच्या तत्वाने व आंबेडकरी विचाराने वागावे. देशाला बौद्ध धर्माशिवाय पर्याय नाही. नावाने धर्मांतरीत पण कृतीमध्ये धम्म नाही. सवलतीसाठी धर्मांतरे आहेत. त्यामुळे धम्म चळवळ वाढणार नाही.

## १९. अमर गायकवाड - (क्रांती कल्चरल ॲकॅडमी) सातारा - १०/१२/०९ - सायं. ६ वा.

अमर गायकवाडांचे आजोबा राजाराम दगडू गायकवाड रा. बोरखळ, इंग्रजी पोलीस होते. आईवडीलांचा मृत्यु झाला. आबा पाटलांकडे चाकरी करीत होते. ताराबाई बडेकर मुंबईमध्ये होत्या. डॉ. आंबेडकरांच्या बंदोबस्तासाठी आजोबा असत. स्वातंत्र्यपूर्व काळात नोकरी केली, मुंबईत भाईगिरी केली. सातारा येथे आगमन झाले. हातगाडा - हमाली जुना मोटार स्टँण्डवरती सुरू केली. नवीन स्टेशनला १ ला हमाल आजोबा होते. २ लाख रुपयाची बँग सापडली पण प्रामाणिकपणे परत दिली. त्यांना ५ मुले व २ मुली होत्या. सर्व सरकारी नोकऱ्यामध्ये मुले लावली.

दलित चळवळीत कॉ. बाजीराव चव्हाण माजी नगरसेवक यांच्यामुळे ते आले. १९८४ मध्ये भारतीय दलित पँथरमध्ये कोषाध्यक्ष होते. नंतर आर. पी. आय. मध्ये गेले. पण तेथे रमले नाहीत. म्हणून बहुजन समाज पक्षात गेले.

२० मार्च १९९७-९८ मध्ये महाड येथे काशीराम साहेबांची भेट झाली. भाषण ऐकले. एक महार होता. त्याने एक कोंबडी पाळली होती. ती कोंबडी १ महिन्यातून १५ दिवस अंडे घालत होती. त्या महाराला वाटले मी कोंबडीला रोज दाणे देतो, मात्र ती रोज अंडे देत नाही. मग मी रोज कशाला तिला अन्न देवू. मात्र कोंबळी सकाळी उडत उडत घराबाहेर आली. पण महाराने अडविले नाही. ती दिवस भर घराबाहेर ओरडत होती पण तिला अन्न दिले नाही. संध्याकाळी महाराच्या मनात बुद्धाची करुणा आली. तो दाणा घेऊन बाहेर आला पण कोंबडी आली नाही. ३ प्रश्न

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कोंबडीचे वजन किती | - | २ कि. |
| २) | कों. डोक्याचे वजन किती | - | २०० ग्रॅम. |
| ३) | कों. मेंदूचे वजन किती | - | ५० ग्रॅम |

जर कोंबडीला कळत असेल तर तुम्हाला केव्हा कळणार ?

त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आजोबा, कॉ. बाजीराव चव्हाण, मा. काशीराम यांच्या प्रभाव पडला व वडीलांनी सहकार्य केले. लहानपणापासून आवड होती. वडील संत कबीरांचे दोहे, भजन-गायन, एकतारी गाणी म्हणत. त्यांच्यावर बुद्धांचा प्रभाव होता. पँथरने समाजाला जागृत करण्याचे काम केले. कार्यकर्त्यांना लढाईसाठी स्टेज दिले. जिल्हाभर पँथर पोहचवली. नामांतराचा प्रश्न सुटला. आर. पी. आय. मध्ये दलाली सुरू झाली. हैदोस, भांडणे, कुरघोड्या, गटबाजी युतीचे राजकारण सुरू झाले. काँग्रेसमध्ये नेते गेले.

१९९१ मध्ये नगरसेवक झाले. सत्तेमध्ये प्रामाणिक काम करणाऱ्यांची गळचेपी होते. डावलले जाते. हुजरेगिरी, चमचेगिरी करणाऱ्यांस संधी दिली जाते.

नगरसेवक असताना खालील कामे केली. सातारा नगरपरिषदेसमोर आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा १६ मे १९९६ मध्ये उभा केला. आरोग्य सभापती असताना कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाला तर मयताचा खर्च नगरपालिका करणार- ६०० रु. दिले. अनुसया कोल्हाट्याची बाई मृत्यू झाला. पैसे नव्हते. कोल्हाटी वस्तीत .४०० संडास बांधले. डॉ. आंबेडकर स्मारक समिती मुंबई सहकार्य केले व २ एकर जागेची मागणी केली.

१९९२ मध्ये ५ लाखाचे शाहू फुले आंबेडकर नावाचे ग्रंथालय बांधले. मा. काशीराम यांच्या हस्ते उद्घाटन केले. भिमाई स्मारकाकडे कांशीराम साहेबांना नेले. बाबासाहेबानंतरचा मोठा माणूस. म्हणून डॉ. आंबेडकर राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी चर्चा केली.

**सांस्कृतिक कार्य –** क्रांति थिएटर सातारा नाट्यसंस्था स्थापन केली. क्रांती कल्चरल ॲकॅडमी स्थापन केली. १८ ऑक्टोबर १९८९ – २० वर्ष काम केले. बहुजनांची सांस्कृतिक परंपरा जतन करण्याचा प्रयत्न केला. 'कोण म्हणतं टका दिला', मरणरंग, खजिन्याची विहिर, सातच्या आत घरात, दुकान कोणी मांडू नये, खेळ, थांबा रामराज्य येतय इ. १२ नाटके केली. जलसे, शाहिरी, प्रबोधन, प्रयोग, लावणी महोत्सव आयोजन केले. बहुजन समाजातील जुन्या वयोवृद्ध कलाकारांना व्यवस्थेने जाणीवपूर्वक उपेक्षित ठेवले, अशा बहुजन समाजातील कलाकारांचा नटसम्राट भिमशाहिर भाऊ फक्कड या दिग्गज कलारांच्या नावे – लोकशाहिर भाऊ फक्कड गौरव पुरस्कार गेली १५ वर्षे देत आहे. धर्मांतर, चलो बौद्ध की ओर गेली ४ वर्ष चळवळ सुरू आहे. मातंग समाजाचे प्रबोधन सुरू आहे. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातून अमर गायकवाड, पुंडलीक पाटोळे, रघुनाथ बाबर, डॉ.शरद गायकवाड, जनार्धन घाडगे गुरुजी, नंदाताई भिसे इ. प्रामाणिकपणे कार्य करीत आहेत.

शेवटी गायकवाड म्हणाले, दलित चळवळीला अपयश आले आहे. कार्यकर्ते चिंतन करीत नाहीत. आपल्या मुर्ख वागण्यामुळे भावी पिढीचे नुकसान होत आहे. त्यासाठी एकत्र यावे. राजकीय परिवर्तनासाठी सक्षम नेतृत्व तयार झाले पाहिजे. बौद्धेत्तर नेतृत्व असावे. सत्तेसाठी ज्या युक्त्या लागतात त्या कराव्यात. नॅशनल आंबेडकर साहित्य मिशन, महाराष्ट्र प्रदेश लोकजनशक्ती पार्टी उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहे.

## २०. विजय येवळे (दलित पँथर, फलटण) २५/१२/०९ – सकाळी ११ वा.

त्यांचे आजोबा शंकर रामचंद्र काकडे हे दोन्ही पायाने अपंग होते. त्यांचे टोप्याचे दुकान बारामती चौकात होते. व तेथे तालुक्यातील कार्यकर्ते गोळा होत, चर्चा करत. त्यावेळी ते १३ वर्षांचा होते. आपल्या तालुक्यात आर. पी. आयच्या शाखा असाव्यात अशी चर्चा झाली.

१९५६ ला आजोबांनी नागपूरला जाऊन दीक्षा घेतली. व त्यानंतर डॉ. आंबेडकरांचे महानिर्वाण झाले. त्यानंतर दादासाहेब गायकवाड यांनी अकलुजला अधिवेशन घेतले. त्यावेळी भा. ल. भोळे, गायकवाड, कांबळे आदि होते. आजोबा त्या अधिवेशनाला गेले होते. आजोबांचा परिणाम त्यांच्यावरती झाला व चळवळीचे बाळकडू मिळाले. त्यानंतर काँग्रेस - आर. पी. आय. युती १ जागा मिळाली पण. दादासोा गायकवाड पडले. त्यानंतर आजोबा १९५७ साली गवई गटाचे काम करायचे. त्यांच्या मार्गदर्शनखाली आंबेडकरी चळवळीची सुरुवात झाली.

१९७४ मध्ये १४ एप्रिलला आंबेडकर जयंती होती. त्यावेळी म. गांधी पुतळ्याला हार घालताना हात निसटला व गांधींच्या पुतळ्याचा हात मोडला. यावरून फलटणमध्ये फार मोठी दंगल झाली. दुकाने पेटविली. त्यावेळी आजोबांनी सर्वांना चावडीमध्ये धीर दिला. आंबेडकर जयंतीला निळा झेंडा लावयाचा नाही अशा दोन मिरवणूका निघत असत. दंगलीनंतर यशवंतराव चव्हाण फलटणला आले व त्यांनी दिलगीरी व्यक्त केली. भरपाई देण्याचे आश्वासनदिले. आजोबा रोज संध्याकाळी बुद्ध वंदना, बुद्ध पूजा घेतल्याशिवाय जेवण करीत नव्हते. त्यांचे १९७५ मध्ये निर्वाण झाले व जावळे सर ता. अध्यक्ष झाले. त्यानंतर आर. टी. रणवरे, बबनराव आढाव हे कार्यकर्ते होते.

१९८५ मध्ये भारतीय दलित पँथरची स्थापना झाली. जून्या चावडीत व्यायामशाळा काढली. त्याला जुन्या मंडळींनी विरोध केला म्हणून पँथर काढण्यात आली व कामाला सुरुवात केली.

१) मंगळवार पेठेतील दलित सुधारावेत, चोऱ्या. गांज्या, दारुधंदे, बंद करणे ,२० दारु दुकाने बंद केली.

२) बुवा, पोतराज अंधश्रद्धा कमी करणे.

३) समाजात आदर्श निर्माण झाला व खेड्यातील लोकांना आधार मिळाला.

४) संपूर्ण तालुका कार्यक्षेत्र झाले.

५) १९९१ पासून सामुदायिक विवाह सोहळा सुरू केला.

त्यांनी कराड दलित ऐक्य परिषदेत सहभाग घेतला. नामांतर लढा सुरू केला.  पँथरने नामांतर लढा तीव्र करण्यासाठी लाँगमार्च काढण्यात आला. त्यावेळी फलटणला लाँगमार्चचे स्वागत करण्यात आले. नगराध्यक्ष बापूराव भोसले सहभागी झाले. औरंगाबादजवळ अटक झाली. राजन रणदिवे अटक झाली.  तहसिल कार्यालयापुढे ३० दिवस चक्री उपोषण करण्यात आले. मोर्चा, आंदोलन, रिडल्स प्रकरण इ. मध्ये सक्रीय सहभाग घेतला.

१९८६ मध्ये फलटण शहरात चारही बाजूने शाखा काढण्यात आल्या. म. फुले नगर, एस. टी. स्टॅण्डसमोर निळ्या पताका लावल्या. पोलीस वाद झाला. पोलीसाला मारहाण करण्यात आली. शुक्रवार पेठेत नागपंचमी पतंग उडवताना बाचाबाची, २ मुलांना मारले. पाचबत्ती चौकामध्ये कॉलनीवर हल्ला करण्यात आला. जाळपोळ, लुटालूट केली. १० कार्यकर्ते अटक करण्यात आले. दंगली भागाला भेट दिली. ढसाळ, ढाले, कांबळे, संगारे, आठवले, चव्हाण, हरिभाऊ निंबाळकरांनी आर्थिक मदत केली. पण शासनाकडून मदत मिळाली नाही. आठवले साहेबांनी मुंबईमधून पैसा गोळा करून पाठविला. केस २० वर्षे चालू होती. सर्वजण निर्दोष सुटले. निम्मे लोक केसच्या आत मेले. त्यांना दारुचे व्यसन होते.

१९९० पासून सामुदायिक विवाह संकल्पना चंद्रकांत अहिवळे यांनी मांडली. त्याला सुभाष शिंदे यांनी प्रोत्साहन दिले. समाजाची गरिबीची परिस्थिती म्हणून सर्व खर्च करतो. नाममात्र पैसे घेतले जातात. अत्यंत गरीब लोकांचे विवाह लावले आहेत व आजपर्यंत सर्वजण व्यवस्थित आहेत.  काहींनी त्यांच्या मुलांचे सामुदायिक विवाह लावले आहेत. आत्तापर्यंत २०० विवाह लावले आहेत. मातंग, मुस्लिम, अंध विवाह झाले. शासनाने काहीही मदत केली नाही. देणग्या गोळ्या करून मदत घेतली. आतापर्यंत सर्वांना आभाराची पत्रे पाठविली आहेत. जमाखर्च दाखवत आहोत.

फलटणला पँथर झाल्यामुळे लागलेला कलंक धुवून निघाला. आंबेडकर जयंती उत्सव सुरक्षितपणे चालू झाला. १९९५ पर्यंत आठवले  शिवाय इतर गट नव्हते. ऐक्याच्या विभाजनानंतर फलटणमध्ये इतर गट निर्माण झाले.

आर. पी. आय. राजकीय पक्ष म्हणून कामकाज केले. ग्रामपंचायती लढविल्या नाहीत. नगरपालिका लढविल्या. दर पाच वर्षापासून आर. पी. आय. चे दोन नगरसेवक निवडून आणले. फक्त २००५ मध्ये आपले उमेदवार पाडण्यात आले. इतर कोणत्याच निवडणूका लढविल्या नाहीत. काँग्रेस - आर. पी. आय. युतीमधून अनेक विकास कामे केली. ३० लाख रु. स्मारक जेथे डॉ. आंबेडकर येवून गेले होते तेथे बांधकाम सुरुवात केले. पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी पेठेत पाण्याची स्वतंत्र टाकी बांधली.

शेवटी येवले म्हणाले, गेली ३० वर्षे चळवळीत काम करतोय. खायला अन्न नाही. सायकल नाही. अशा काळापासून आजपर्यंत मी विचारांशी प्रामाणिक आहे. आंबेडकरांचा आदर्श आम्ही पाळलेला आहे. ग्रामीण भागातील चित्र असे आहे की अन्याय अत्याचार झाला तर गावपातळीवर मिटवला जातो. आता तरुणांच्या हातात सत्ता दिलेली आहे. कार्यकर्त्याला फळाची अपेक्षा आहे. चंगळवादाचा परिणाम आहे. नेतृत्वावर पूर्ण विश्वास आहे. विध्वंसक आंदोलने आंबेडकरी चळवळीशी मिळती जुळती नाहीत. आर. पी. आय. सरचिटणीस, सम्राट क्रीडा मंळडात सहभाग आहे. संजय निकाळजे, मुन्ना शेख, संतोष काकडे, चंद्रकांत कांबळे, राजू मारुडा, भाऊ ताटे, बी. टी. जावळे, प्रमोद गायकवाड, आनंद गायकवाड, अशोक भिसे इ. कार्यकर्ते आहेत.

## २१. दत्ता अहिवळे (सामाजिक कार्यकर्ते) फलटण - ३०/१२/०९ - सायं. ४ वा

फलटणमध्ये ४ नोव्हेंबर १९८५ साली पँथरची स्थापना झाली. त्यांच्या घरामध्ये सामाजिक वातावरण होते. समाजाचे अंतर्गत प्रश्न मिटवणे. लग्ने जुळविणे. लोकांच्यात सहभाग घेतला. त्यांचे वडील जनावरांचा व्यवसाय (दलाली) करत. त्यांना आमदार म्हणत असत. त्यावेळी रायरद फलटणला यायचे. त्यांना सहकार्य करत असत. ते ६ वीत असताना पुतळा विटंबना झाली. त्यावेळी मोर्चाला सर्वांनी यावे अशी चर्चा होती. १९८५ मध्ये आठवले साहेबांचे भाषण प्रभावी वाटले. भारतीय दलित पँथरमध्ये सहभागी झाले. अध्यक्ष - चंद्रकांत अहिवळे, सचिव - दत्ता अहिवळे, सुर्यकांत अहिवळे, विजय येवले, कुंदन मारुडा, नंदकुमार घोलप, मुन्ना शेख, मधुकर काकडे, संजय निकाळजे ही प्रमुख मंडळी होती.

१९८५ साली फलटणमध्ये वेटलिफ्टींग शो झाला. त्यात चंद्रकांत अहिवळे यांचा नंबर आला. त्यावेळी तरुणांची बैठक झाली. समाजाच्या चावडीत व्यायामशाळा सुरू करूया. भारतीय बौद्ध महासभेत  लक्ष्मण अहिवळे, सिताराम अहिवळे चालवत होते. त्यावेळी त्यांनी बांधकाम पाडले म्हणून समाजातील अंतर्गत वाद  सोडविण्यासाठी तरुणांची संघटना असू द्या म्हणून पँथर काढण्यात आले. फलटण शहरामध्ये सोमवार, मंगळवार पेठ, कामगार कॉलनी, लक्ष्मीनगर, येथे छावण्या सुरू करण्यात आल्या. तालुक्यातही पँथर पोहचली.

फलटणमधील थिएटर वरील भांडणास सामाजिक स्वरुप आले. विविध केसेस व्हायला लागल्या. डिसेंबर १९८५ मध्ये त्यामधूनच शिवसेना स्थापन झाली. छगन भुजबळ आले होते. विकास राऊत अध्यक्ष होते. शिवसेना - पँथर वादविवाद होऊ लागले. पँथरने त्यावेळी सामाजिक महत्त्वाच्या प्रश्नाला हात घातला. समाजातील व्यसनाधीनता संपविणे, दारुबंदी, दारुचे धंदे बंद करणे, अंधश्रद्धा नष्ट करणे, मोठी आई जागरण, गोंधळ, पोतराज अशा प्रथा बंद करून टाकल्या.

पुढे राजकीय संबंध येऊ लागले. श्रीराम स. साखर कारखाना समोरील दुकाने उठवायला सुरुवात झाली. त्यावेळी हणमंतराव पवार यांनी पक्के गाळे बांधून देवू सांगितले व त्यांच्याशी राजकीय संबंध आला.  १) सहकार तत्त्वावर संत कबीर रवा आटा मैदा उत्पादक सहकारी संस्था, २) संघमित्रा मोटार मालक संघ अशा सहकारी संस्था स्थापन केल्या.

१५ फेब्रुवारी १९८६ मध्ये जातीय दंगल झाली. कामगार कॉलनीवर हल्ला केला. मदने साखर कारखाना कामगार होता. त्याच्या बायकोची छेड काढली म्हणून दलित पोरांनी म. गांधी चौकात त्यांना मारहाण केली व कारखान्याजवळ पुलावर मारामारी झाली. त्यात शिवसेना अध्यक्ष विकास राऊत यास मारहाण झाली. त्यामुळे कामगार कॉलनीवर हल्ला केला. प्रथम दर्शी पोलीस उभे होते. शांततेत रात्री ९ ते १० वा. दरवाजा तोडला, टी. व्ही. फोडला, लोकांना मारहाण केली. त्यात ५० खोल्या फोडल्या.  ५०-६० मुले होती पण जमाव मोठा होता. तरुण मुले पळून गेली. दत्ता अहिवळेंनी प्रतिकार केला. मारहाण झाली. पेटवून टाकू म्हणाले पण ११-३० वाजता पोलीस आले. पोलीसांनी त्यांना दवाखान्यात नेले नाही तर बॅरकमध्ये ठेवले व जामिन मिळताच सोडले.

१९८६ मध्ये चंद्रकांत अहिवळे नोकरीमध्ये गेले. १९८७-८८ मध्ये ते अध्यक्ष झाले. पण त्यांना शैक्षणिक कार्य करावयाचे होते. महिला साक्षरता, १० वी विद्यार्थी मोफत अभ्यासवर्ग घेणे, फलटण हायस्कूलमधील घोरपडे सर, करडे सर, ॲड्. विठ्ठलराव काकडे यांनी सहकार्य केले. याचवेळी समाजात दोन गट पडले. पँथर गट व पँथर विरोधी गट. दै. शिवसंदेशमध्ये लेख आला - पँथरला मरगळ आली काय ? म्हणून प्रत्येक कार्यक्रम घेण्याचे ठरविले. स्पिकर सेट घेतला. पहाटे बुद्धगीते सुरू केली. विधायक चळवळ व्हावी म्हणून महिला गट उभे केले. पैसा उभा राहिला. डॉ. आंबेडकर ग्रंथालय सुरू केले. संजीव राजे यांनी पुस्तके दिली. मधुकर काकडे अध्यक्ष झाले. १९९२-९६ या काळात ते नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यांची विधायक कामे पँथरवाल्यांना आवडली नाहीत. पँथरविरोधी मूळ घटक जवळ केला. स्थानिक गटबाजी टाळली. १९८८ मध्ये डॉ. आंबेडकर विचार प्रसारक मंडळ स्थापन केले.

पँथर प्रणित समाजाचा विरोध देणेघेणे ठेवले नाही. १९९० नगरपालिका सफाई कामगार - महिला शिक्षण, १९९१ मध्ये डॉ. आंबेडकर वसतीगृह सुरू केले. ७ विद्यार्थी दत्तक घेतले. निवडणूकीत ३२५ रु. खर्च केला. ९२ मध्ये प्रबुद्ध बालवाडी सुरू केली. प्राथमिक शाळा सुरू केली. ९४ ला ५ वी पर्यंत मान्यता आली. सेवा अंतर्गत प्रशिक्षण डी. एड्. सांगलीत घेतले. आठवलेंची भेट घेतली. नगरपालिका ८० हजार रु. अनुदान मिळाले. नगरपालिकेकडून ५० हा. पुस्तके घेतली. परंतु पुस्तकांना वाचक नाही. २००० मध्ये साप्ताहिक 'कालमान' सुरू केले. बाबासाहेबांचे विचार पोहचवण्यासाठी काम सुरू केले. त्यात परखडता होती. २००४ मध्ये प्रबोधनात्मक काम सुरू केले. २००३ मध्ये प्रबुद्ध कालमान बचत फंड सुरू केला. हेतू असा होता की लोकांनी बचत करावी. त्यांना बचतीची सवय लागावी. जेव्हा त्यांना गरज असेल त्यावेळी पैसे घेवून जावे. याच दरम्यान डॉ. बाबासाहेब सहकारी बँक स्थापण्याचे नियोजन केले. १५० कर्मचारी त्यात होते. पण अंतर्गत वादविवादामुळे बँक सुरू करता आली नाही.

१९८०-८१ मध्ये रोज ५ रु. १० रु. किंवा आठवड्याला गोळे केले. आत्तापर्यंत २००५ पर्यंत ९ लाख रु. जमा केले आहेत. धर्मचक्र प्रवर्तन दिन, डॉ. आंबेडकर बचत फंड. रामदास आठवले यांच्या हस्ते उद्घाटन केले. प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नियमित २० वा. हिस्सा द्यावा पैकी

१०० रु. दर महिन्याला द्यावेत. सलग ४ वर्षे गोळा केले. (२ लाख रु. ३० हा) २००५ मध्ये डॉ. आंबेडकर भाषणे व साहित्य वाचन अभियान, बुद्ध जयंती ५ वर्षे चालू आहे.

सुवर्ण महोत्सवी वर्षात ३६५ दिवस व्याख्याने घेतली. फलटण शहरात २३ एप्रिल आंबेडकर फलटणला आले होते. प्राथमिक शाळा १ ते ७ वी पर्यंत आहे. ४ थी पर्यंत अनुदान आहे. दलित पँथर, फलटण न. प. सदस्य, डॉ. आंबेडकर विचार प्रसारक मंडळ स्थापन, साप्ताहिक कालमान संपादक, डॉ. आंबेडकर साहित्य भाषणांचे वाचन अभियान, डॉ. आंबेडकर बचत फंड असे काम चालू आहे.

शेवटी ते म्हणाले, फलटणची चळवळ योग्य दिशेने चालू आहे. मुळ चळवळ चालू आहे. आदर्श विचारप्रणालीचे अनुकरण करावे. धम्माची चळवळ, वैचारिक बदलासाठी की समाज बदलासाठी, राजकारणामध्ये धर्म आणता कामा नये. भावनिक चळवळ म्हणून पँथर उभी राहिली. पण ती दीर्घकाळ टिकली नाही.

## २२. चंद्रकांत खंडाईत (डॉ. आंबेडकर स्मारक समिती) कोरेगांव १७/०९/०८ सायं. ५ वा.

प्राथमिक शाळा अतित, ग. स. कांबळे गुरुजी, भिवा हरी कांबळे, रखमा शिवा कांबळे, यांच्या सहवासामुळे आंबेडकरी विचारांची आवड निर्माण झाली. भजन ऐकणे, लेझिम पथकात सहभाग घेतला.

मातोश्री भिमाबाई आंबेडकर जागा उपोषण - १९७९-८० - सहभागी होते. १९८१ - माणगाव, मुंबई लाँगमार्च मध्ये अतित-सातारा पायी दौऱ्यात सहभागी होतो. ११ वीत सातारा कॉलेजमध्ये नामांतर चळवळ समजली. १९८५-८६ मध्ये दलित पँथर चळवळीत सहभागी झाले. नंदकुमार कांबळे, बाळकृष्ण माने, बाळुभाई बागवान, दिलीप सवणे, जे. डी. वांघबारे, सुनिल संकपाळ इत्यादी. १९८७ मध्ये सरचिटणीस कोरेगांव तालुका म्हणून निवड झाली व कामाला सुरुवात केली.

आसनगावमध्ये ८ वीतील मुलांवर अत्याचार झाला. १९८९-९० मध्ये तहसिल कार्यालय मोर्चा, रामदास आठवले भेट झाली. घाटकोपर - शिवाजी वायदंडे यांच्यावर सामूहिक हल्ला, अॅट्रॉसिटी दाखल केली. सोळशी - बौद्ध वस्तीवर मुलांच्या खेळण्यावरून संपूर्ण गावाकडून सामुदायिक हल्ला झाला. सातारारोड येथे बडेकर खून प्रकरणी आंदोलन, महागाई प्रश्नी मोर्चा - नामांतर मोर्चा, महापुरुष मूर्ती विटंबना मोर्चा काढला.

कोरेगांवात ९० गावामध्ये शाखा काढल्या, जयंती कार्यक्रमातून महापुरुषाच्या विचारांचे प्रबोधन केले. लक्ष्मण वाघमारे, सुरेश जावळे, गौतम खंडाईत, संजय गायकवाड, प्रल्हाद घोडके, जयसिंग माने, प्रतिक बनसोडे, बाजीराव दोरके, अविनाश गायकवाड, भिमराव जाधव, बाळासाहेब इंगळे, बाजीराव उबाळे, छबूताई माने, रहिसा आतार हे सहकारी कार्यकर्ते होते.

इनाम जमिनी सोडविण्यास मदत कार्य केले. नामांतरवादी कार्यकर्त्यांवरती अन्याय अत्याचार होत. त्यास वाचा फोडली. जातीचे दाखले, ग्रामीण भाग १५% अनुदान मिळणे, शासकीय योजनांच्या अटी व शर्ती कमी करणे, अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी म्हणून प्रयत्न करणे. अनुसूचित जातीसाठीच्या महामंडळाकडून कर्ज देणे, निधी उपलब्ध करणे. मागासवर्गीयांच्या जमिनीवरील अतिक्रमणे काढणे, जमिन बळकावणारांना बाजूला करणे हे कार्य पँथरच्या माध्यमातून केले.

लोकांनी जास्त प्रमाणात सहयोग दाखविलेला नाही. सर्व सामान्य जनतेवर गावगाड्याचा प्रभाव आहे. समाज दबावाखाली आहे. कार्यकर्त्यांमध्ये नैराश्य निर्माण होईल असे वातावरण आहे. ज्यांच्यासाठी काम करतो ते तडजोडी करतात. आंदोलने दडपण्यासाठी शासकिय कमिट्या, मंडळे यावर नेते लक्ष देत नाहीत. पूर्ण वेळ काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बाबतीत नेत्यांची उदास भूमिका आहे.

आंबेडकरी चळवळीला यश आलेले आहे. व्यक्तिगत प्रश्न सुटले. पण चळवळ, पक्ष, सार्वजनिक प्रश्न व राजकीय प्रश्न सुटलेले नाहीत. आहे तेथेच आहेत. मात्र आतापर्यंत कमीतकमी चळवळीला कार्यकर्ते राहिल्यामुळे हे प्रश्न उग्र रूप धारण करू शकले नाहीत. हे सामुदायिक

अपयश आहे. समाजातील काही प्रवृत्ती जबाबदार आहेत. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक प्रश्न सुटले पाहिजे होते ते. प्रश्न सुटायला पाहिजेत.

या सर्व प्रक्रिया फुले - शाहू - आंबेडकरी विचारांच्या प्रक्रियेने सकारात्मक दृष्टिकोन ठेवून प्रत्येकाने सहयोग दिला पाहिजे. पूर्णपणे ताकदीने एकत्रित उतरल्यास यश येईल. सहकार चळवळ, शिक्षण क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, ब्रेन टँक, वैचारिक ताकद पुरविण्यासाठी कार्य केले पाहिजे. नेतृत्वाने बौद्धिक ताकद दिली पाहिजे. परिपूर्ण बाबासाहेब समजावून सांगणे गरजेचे आहे.

पँथर बरखास्त झाले. रिपब्लिकन पक्ष ऐक्य नेतृत्वाच्या चढाओढीत नेत्यांना भान न राहिल्यामुळे पक्षापेक्षा व्यक्तिगत महत्त्व वाढले यामुळे चळवळीची वाताहात झाली. विलासराव देशमुख व छगन भुजबळ यांच्या सरकारने इनाम हक्काच्या वतनी जमीनी खरेदी विक्री व्यवहार मान्यतेचा कायदा केला. त्या विरोधी मंत्र्याचे पुतळे जाळले. पुतळे जाळले त्यावेळी नेते म्हणाले तुम्हाला कोणी संमती दिली. दखल घेतली नाही. कार्यकर्त्यांमध्ये नैराश्याचे वातावरण आहे. जेलभरो आंदोलनात अटक - सुटका - महागाई विरोधी रास्ता रोको केले.

खंडाईत यांच्यामते, रिपब्लिकन पक्षाला विशिष्ट दिशा देण्यामध्ये नेतृत्व असफल झाले आहे. पक्षाच्या वैचारिक बांधणीमध्ये नेतृत्व कमी पडते. दोन वर्ष बी एस. पी. चे काम केले. लोकांमध्ये पक्षाची भूमिका पोहचवली. राजकीय तडजोड म्हणून जातीयवादी धर्मांध पक्षाबरोबर युती होते. त्याचा परिणाम कार्यकर्त्यांवर पडला. त्यामुळे बसपातून बाहेर पडले तरी त्यांचे सामाजिक काम चालुच आहे.

## २३. बाळासाहेब रणपिसे ( मास मुव्हमेंट) गोंदवले २३/८/०८ दुपारी १२ वा.

त्यांना लहानपणी वाचनाचे वेड होते. फुले-शाहू-आंबेडकर यांच्या पुस्तकांचे वाचन ११ वी पासून करीत होते. १९८५-८६ मध्ये कारखेल येथील गेजगे खून प्रकरण वाचण्यात आले. खडकीच्या मुलीवर बलात्कार झाला. हे प्रकरण म्हसवडचे शशी देठे यांनी हातात घेतले होते. त्यांच्याबरोबर नंदकुमार लोखंडे हे होते. शशी देठे यांनी म्हसवडमध्ये १९८६ मध्ये राजा ढाले यांची मास मुव्हमेंट चालवली होती. त्यामध्ये बाळासाहेब खरात, युवराज घाडगे, भास्कर खरात,

आदिनाथ सावंत हे कार्यकर्ते काम करीत होते. अन्याय, अत्याचाराचे प्रमाण जास्त होते. त्या संदर्भात न्याय देण्यासाठी मोर्चा आंदोलन केली जात होती. त्यामध्ये ते सहभागी झाले.

संभुखेडे येथील गाव देवतेची यात्रा होती व वर्गणी मागत असताना बौद्ध मंडळींनी दिली नाही. त्यावेळी त्यांना मारहाण करण्यात आली. त्यावेळी त्यांचे म्हसवड पोलीस स्टेशनने तक्रार घेतली नाही. १९८९ मध्ये रात्री ११ वा. सवर्णांना अटक करायला लावले.

कुळकजाई मागासवर्गीय वस्तीला पाणी पुरवठा होत नव्हता. त्यासाठी उपोषण केले. २४ तासात पाणी देण्याची व्यवस्था झाली. रिडल्स इन हिंदूइझम प्रश्नावर मोर्चा काढला. गोंदवले येथील १५-२० कार्यकर्त्यांनी सायकलवर फिरून कार्यकर्त्यांना एकत्र आणले. 'सोबत' अंकात महात्मा फुले म्हणवणारी ही केवळ दुर्गंधी - बाळ गंगाळ यांनी १९९० मध्ये लेख लिहिला त्यावेळी त्यांचा अंक जाळला. महाडच्याचवदार तळ्यावरून जाणीव जागृती ज्योत आणली व संपूर्ण तालुक्यात फिरवली व समारोप दहिवडी येथे केला. १९९४ मध्ये पतसंस्थेची निर्मिती केली. फुले-आंबेडकर सहकारी पतसंस्था दहिवडी, ९९ लाखाचा टर्नओव्हर होता पण कार्यकर्त्यांनी संस्था मोडीत काढली.

१९८७-८८ मध्ये डॉ. आंबेडकर औद्योगिक सहकारी संस्था स्थापन केली. त्यातील महत्त्वाचे उपक्रम खालील प्रमाणे होते. दलित मुलांना प्रशिक्षण देणे, उद्योग सुरू करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणे. परंतु प्रस्थापित काँग्रेसवाल्यांनी दलितांनाच हाताशी धरून संस्था बंद पाडली.

७ वी पासून गवंड्याच्या हाताखाली काम करून शिक्षण घेतले. रविवारी हॉटेलमध्ये काम केले. उद्देश हॉटेलात खायला चांगले मिळेल. १२ वी पासून स्टॅम्प व्हेंडरच्या हाताखाली काम केले. निराधार झोपडपट्टीतील मुलीशी लग्न केले.

सन १९९१-९२ डॉ. आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष व म. फुले स्मृती शताब्दी संपूर्ण तालुक्यात साजरी केली. १९९२-९३ मध्ये माण तालुका नामांतरवादी कृती समिती स्थापन केली. त्याचे अध्यक्ष होते. नामांतरासाठी दहिवडी, पिंगळी, गोंदावले, वावरहिरे येथे मेळावे घेतले. काही भागात रास्ता रोको आंदोलन केले. ३७।३।१ चा भंग करून मोर्चात सहभागी

झाले. नामांतरासाठी १९९४ मध्ये १३ जानेवारी ते २३ जानेवारी पर्यंत सातारच्या जेलमध्ये होते. १९९७ ला भाजपा सत्तेवर आली व त्यांनी घटना बदलवण्याचा घाट घातला. त्यावेळी विविध ठिकाणी रास्ता रोको केले. गोंदवले बंद, उकीर्ड, गोंदवले खुर्द येथे मेळावे घेतले. त्यामध्ये दीपक कांबळे, संजय धाहिजे, विकी कांबळे सहभागी होते.

महाराष्ट्र सरकारने जिहे-कटापूर योजना आणली. या योजनेतून महिमानगड परिसरातील २२ गावे या योजनेतून वगळण्यात आली. त्या गावामध्ये जनआंदोलन केले. रास्ता रोके केला व यश मिळवले. ते धम्म संस्काराचे काम १९९५ पासून करीत आहे. भारतीय बौद्ध महासभा मार्फत आत्तापर्यंत १००-१५० लग्ने लावली आहेत. १९९७ मध्ये जि. प. निवडणूकीत गोंदवले गट पंचायत समितीसाठी राखीव करण्यात आला. त्यामध्ये माण तालुका विकास आघाडीतून ते यशवंतराव माने महाराज व ॲड्. भास्कर गुंडगे यांच्या मार्फत निवडून आले व सभापती झाले. निवडणूक खर्च लोकवर्गणीतून केला.

सत्तेच्या माध्यमातून प्रचंड कामे केली. ट्रायसेम योजने अंतर्गत १५० मुलांना प्रशिक्षण व रोजगार मिळवून दिला. इंदिरा आवास घरकुल योजने अंतर्गत अनेक दलितांना घरे मिळवून दिली. विशेष घटक योजने अंतर्गत समाज कल्याण महिला स्वयंरोजगार व लघुउद्योग, समाज मंदिर, जोड रस्ते, मागसवर्गीय वस्तीत पाणी पिण्याच्या योजना दिल्या. २००१-०५ या दरम्यान माणमध्ये प्रचंड दुष्काळ पडला. शेतकरी-शेतमजूर संघटना कार्यकरत होती. अशोक भोसले, शिवाजी फडतरे, गुलाबराव कट्टे, अरुण कचरे, जयराम कचरे, धनाजी नवले, इत्यादी प्रमुख मंडळी होती. रोजगार हमीची कामे सुरू केली. गुरांसाठी छावण्या व्हाव्यात म्हणून तालुकाभर जन आंदोलन केले. व सर्वा मागण्या मान्य करून घेतल्या. कासा संस्थेमार्फत गहू मागणी केली. दोन पाझर तलाव बांधले. गोंदवले बु. वाघमोडेवाडी, शिंगणापूर, जाधववाडी, कुक्कुडवाड इत्यादी.

'आर्थिक विषमता हा सामाजिक समतेतील मोठा अडसर आहे.' आंतरजातीय विवाह घडवून दिले. एकूण ५ विवाह लावले. त्यांना योजना मिळवून दिल्या. संजय गांधी योजनेतून ५०० रु. बनुबाई पांडुरंग बनसोडे, अनुसया दगडू भोसले यांना दिले. त्या आजपर्यंत उद्योग करीत आहेत.

तालुक्यातील शेतकऱ्यांना जीवनधारा विहिरी मिळवून दिल्या. त्यातील १४ कुटूंबे चांगली शेती करतात. ७ फेब्रुवारी २००७ मध्ये दलित विकास परिषद ललित बाबर यांनी स्थापली. बजेटमध्ये वाढ करावी म्हणून २२ जिल्ह्यात निदर्शने केली. राज्याचे २५० कोटीचे बजेट होते ते ८५० कोटी करण्यास भाग पाडले. धम्म परिषदा घेतल्या. २००६ व २००७ दहिवडीत २५०० ते ३५०० लोक एकत्र केले. मातंग समाजातील संजय अवघडे, मांडवे यांनी दीक्षा घेतली. तालुक्यात ५ दिवस धम्मरथ फिरवला. त्यामध्ये भंत्तो दिपंकरजी होते. पुळकोटी येथील महिला व मुलांना नळपाणी भरण्यावरून मारहाण केली. त्यामुळे अॅट्रोसिटी दाखल केली. कुळकजाई मधुकर घाडगे खून खटला मोर्चा काढला. शालिनीताई पाटील विरोधी रास्ता रोको केले. त्यात ५०० लोक होते. मुलायमसिंह यादव यांचा दहिवडीत पुतळा जाळला. गोंदवले येथे पुतळ्याला जोडेमार आंदोलन केले.

त्यांच्यामते आंबेडकरांच्या नंतर समाजाला दिशा देणारे नेतृत्व मिळाले नाही. भावनेच्या प्रश्नावर लढे उभे राहिले. पण मागासवर्गीयांचे कारखाने, शेती, नोकरभरती प्रश्न हाताळले नाहीत. नेत्यांनी सत्ता भोगली व स्वार्थ साधला. कार्यकर्ते देशोधडीला लावले. खाजगीकरणाने आरक्षण गेले आहे. आता तरुणाईने कौशल्य हस्तगत केली पाहिजेत. स्कॉलरशिप वाढवली पाहिजे. शासनाच्या योजना फसव्या आहेत. दलित चळवळीचे एकीकरण झाले पाहिजे. जातीबाह्य आहेत त्यांना एकत्र आणले पाहिजे. नेतृत्व कुचकामी आहे. नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. जुन्या नेतृत्वाला थारा नाही. विविध कमिट्या, मास मुव्हमेंट, पँथर, दलित सेना, भिमसेना, रिपब्लिकन पक्ष, दलित विकास परिषद, भिमशक्ती सामाजिक संघटना, सामाजिक न्याय प्रतिष्ठान इ. मध्ये त्यांनी काम केले आहे.

## २४. नारायण जावळीकर (भटके जाती जमाती संघटना) सातारा १५/०७/०८ सायं. ६ वा.

यलप्पा वैदू यांना गुरूजी म्हणत. ते रयत शिक्षण संस्थेत कार्य करीत होते. नंतर ते शिक्षक झाले. त्यामुळे त्यांना गुरूजी म्हणत असत. या गुरूजींच्या प्रेरणेने १९८० मध्ये ते या विचाराकडे वळले. यलप्पा वैदू गुरूजी हे कोल्हाटी व वैदू समाजाला जोडण्याचे काम करीत होते. त्यांनी वैदू-कोल्हाटी वस्तीमध्ये १९७५ पूर्वी महात्मा फुले बालवाडी चालविली होती. ते मुलांना लेझिम,

कबड्डी असे वेगवेगळे खेळ शिकवत. त्यावेळी कोल्हाटी समाज हौसिंग सोसायटी स्थापन करण्यात आली. त्यांचे आजोबा चंदू मार्तड जावळीकर हे चेअरमन होते. नंतर वडील चेअरमन झाले. त्यांच्या काळात ही वडिलोपार्जित प्रथा मोडीत काढली. वर्गपद्धती भटक्यांमध्ये आजही आहे.

आ. लक्ष्मण माने यांचा परिचय १९८१-८२ मध्ये 'उपरा'च्या माध्यमातून झाला. त्यांना वाचनाचा नाद होता. त्यामुहे चळवळीची माहिती झाली. १९८५ मध्ये ते भटक्या विमुक्त जातीजमाती संघटना सातारा जिल्हा सरचिटणीस झाले. पश्चिम महाराष्ट्रातील सर्व भटक्यांचा मेळावा छ. शिवाजी कॉलेज परिसरात आयोजित केला होता. त्यावेळी प्रतापराव भोसले ग्रामीण विकास मंत्री होते. त्यांना बोलवले होते. त्यांच्याबरोबर बाळकृष्ण रेणके, व्यंकप्पा भोसले, आ.माने हे प्रमुख होते. सोलापूरमधील सेटलमेंटमध्ये असलेल्या १४ विमुक्त जातींचा समावेश एस. सी. मध्ये करावा ही प्रमुख मागणी भिमराव गुरूजी यांनी केली. दौलतराव भोसले माजी आमदार यांनी हे संघटन उभे केले. त्यावेळी बाळकृष्ण रेणके त्यांच्याबरोबर होते. १९७२ ला २५ हजार भटक्यांचा विराट मोर्चा निघाला व भटक्या विमुक्तांसाठी मागण्या केल्या. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. १९७२-७८ बाळकृष्ण रेणके यांचे नेतृत्व होते. पुढे ग. बा. सरदार, डॉ. बाबा आढावा यांनी १९८२ मध्ये भटक्यांच्या नेत्यांचे एकत्रीकरणाची बैठक घेतली व लक्ष्मण माने यांना कार्याध्यक्षपद देण्यात आले.

त्यानंतर ल. माने यांनी भटक्यांची शोध यात्रा काढली. १९८६-८७ मध्ये रेणके संघटनेतून बाहेर पडले. त्यानंतर महाराष्ट्रात लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली भटक्यांचे संघटन जोमाने सुरू झाले. त्यानंतर लक्ष्मण गायकवाड यांनी भारतीय भटके विमुक्त संघर्ष समिती स्थापन केली. प्रा. मोतीराम राठोड यांनी भारतीय विमुक्त युथ फ्रंट स्थापन केला. पण ही संघटना मराठवाड्या पुरती मर्यादित होती. त्यामध्ये रमेश श्रीखंडे, आसाराम गुरूजी हे होते. पुढे आण्णा डांगे व गोपीनाथ मुंढे सत्तेत आल्यामुळे त्यांनी १८ ऑक्टोबर १९९७ मध्ये राखीव जागेत बदल करून घेतले. नंतर रामदास आठवले, शेडगे मंत्री झाले. ८% जागा वाढवून द्याव्यात अशी मागणी केली. शरद पवार भेट झाली व त्यांनी बदल केले.

सातारा जिल्हा - मंडल आयोग लढ्यात सहभागी, पारधी समाज अन्याय अत्याचार परिषदा, मोर्चा, धरणे आंदोलनात सहभागी झाले. रेणके अहवालाची होळी करण्यात आली. धर्म परिषदा घेण्यात आल्या. पंढरपूर येथे वाजपेयी यांची सभा उधळली. त्यावेळी त्यांना अटक झाली. त्यांच्या जीवनामध्ये अंधकार होता. चळवळीमुळे माहिती मिळाली. चळवळ दिशा देणारी आहे.

भटक्यांचा प्रश्न दलित नेतृत्वाने व्यवस्थित समजून घेतला नाही. शिक्षणाचे प्रमाण ०.६% एवढे आहे. सातारमध्ये पोळके सर यांनी प्रश्न समजून घेतले पण इतर कोणी ह्याकडे पाहिले नाही. भटकेही दलितांच्याकडे गेले नाहीत व दलित समाज यांच्याकडे गेला नाही. दलित नेतृत्वाला समज आवश्यक होती. सामाजिक भान समाधानकारक आहे. प्रश्नावरती हाय लाईट झाले तर पुढे दखल घेतली जाईल व न्याय मिळेल.

भ. वि. जाती संघटना, अखिल महाराष्ट्र डोंबारी कोल्हाटी समाज, परिवर्तन मित्र समूह, कै. अ. भोसले ग्रंथालय वाचनालय, कोल्हाटी समाज हौ. सोसायटी, तलाठी संघटना, जिल्हा तलाठी संघ - उपाध्यक्ष, फुले-आंबेडकर साहित्य पंचायत, संत गाडगे महाराज सेवा समिती, कायदेशीर सल्लागार समिती सदस्य अशा विविध कमिटीवर काम करीत आहेत.

त्यांचे उपक्रम - परिवर्तनाच्या सर्व लढ्यामध्ये मदत करणे, निवृत्तीनंतर त्यात सक्रीय सहभाग घेणे, रोजगार, मोफत शिक्षण हे मूलभूत अधिकार आहेत, या लढ्यामध्ये सक्रीय आहे. दरवर्षी २७ मे या दिवशी धर्मांतर करण्यासाठी सहकार्य करणे. शेवटी त्यांनी व्यथा मांडल्या.

भटका समाज समजून घेतला पाहिजे. जुन्या सर्व चालीरितीमधून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विचारांचे धर्मांतर झाले नाही. शिक्षण प्रसार होणे आवश्यक आहे. समाजामध्ये मिसळले पाहिजे. स्विकारण्याला वेळ लागेल पण बदल होईल. व्यक्तिगत स्वतंत्र्य आहे. त्यामुळे काही गोष्टीत लगेच बदल होऊ शकत नाही.

## २५. प्रशांत चव्हाण (बहुजन समाज पार्टी) सातारा १०/६/०८ - सायं. ५ वा.

मा. कांशीराम यांनी भारतातील सर्व आर. पी. आय. नेत्यांना एकत्र संघटीत करण्याचे काम केले. पण नेते एकत्र आले नाहीत. ते निराश झाले व १४ एप्रिल १९८४ मध्ये दिल्ली येथे

त्यांनी बहुजन समाज पक्षाची स्थापना केली. हजारो किलोमीटर सायकलवर प्रवास केला. जाती तोडो-समाज जोडो अभियान राबविले व १९९४ साली उत्तरप्रदेशमध्ये बीएसपीचा मुख्यमंत्री झाला. श्री. चव्हाण हे १९९० मध्ये पुणे येथील सिंबॉयसेस कॉलेजमध्ये शिकत होते व येरवडा येथील शासकीय वसतीगृहामध्ये ते रहात होते. तेथे चळवळीतील काही कार्यकर्ते भेटले. डॉ.आंबेडकर जयंती दिवशी ते भाषणे करत होते. पुढे पुणे येथे विद्यार्थी चळवळीत काम करायला सुरुवात केली. तेथे डॉ. बाळासोा माने, हिराचंद चंदनशिवे, तुळशीराम बोरकर हे काम करीत होते. मा. काशीराम यांच्या बसापाविषयी दिलीप कुसाळे माजी जिल्हा अध्यक्ष बसापा यांनी माहिती दिली. प्रथम त्यांनी सायकल रॅलीत सहभाग घेतला. प्रचाराचा भाग म्हणून मुंबईत सभा ऐकण्यासाठी गेले व तेव्हापासून बी. एस. पी. शी जोडले गेले.

पुढे ते २००५ मध्ये सातारा येथे रहायला आले व सातारा जिल्ह्यात काम सुरू केले. प्रथम त्यांनी प्रदेश सचिव म्हणून काम केले. ११५ लोकांची कमिटी होती. जिल्हा संघटन बांधण्यास सुरुवात केली. जिल्ह्यातील सर्व विधानसभा बांधल्या. पुन्हा २००६ मध्ये प्रदेश सचिव झाले. २५ लोक प्रमुख होते. नंतर शरद गायकवाड जिल्हाध्यक्ष झाले. नगरपालिकेच्या निवडणुका लागल्या. शरद गायकवाड यांच्यामते राजेंद्र चोरगेंच्या आघाडीशी आपण युती करावी उमेदवार उभे केले. जुन्या मंडळींना पुन्हा एकत्र आणले व २००६ मध्ये सातारा जिल्हा अध्यक्ष झाले. पुन्हा संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न केले. २००७ मध्ये विजयरथ काढला व पहिला रथ संपूर्ण तालुक्यात फिरविला. विधान सभा लढविली. महागाई विरोधी जनहित चेतना आंदोलन केले. पक्षाने दिलेले काम राबविण्यास साथ दिली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत तयार केली व निवडणूका लढवल्या. लोकसभेला स्वत: उमेदवार म्हणून उभे राहिले. विरोधकांनी उमेदवार मिळू नये म्हणून काम केले.

फुले-शाहू-आंबेडकर विचारांचे कार्यकर्ते झाले पाहिजेत.

देनेवाले समाज मे लाल पैदा होता है

और लेनेवाले समाज में दलाल पैदा होता है।

राजकीय सत्ता ही मूळ समस्यांची गुरुकिल्ली आहे. बसपा ही स्वाभिमानी लोकांची मुव्हमेंट आहे. या जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदार संघात बसपाची विचारधारा पोहचली आहे. न विकणारा समाज बनविल्याशिवाय सत्ता प्राप्त होणार नाही. म्हणून जिल्ह्यात बसपाची बांधणी जोमाने सुरू आहे. पण काही दलित नेते दलाली करतात त्याचा तोटा बसपाला होत आहे.

उत्तर प्रदेशातले उमेदवार ८०% कामे गरीबांना देतात. राजकीय कार्यकर्त्यांची फौज उभे करावयाची तर चळवळी उभ्या राहिल्या पाहिजेत.दलित समाज हुशार आहे पण व्यवसाय करीत नाही. व्यवसाय करण्याची मानसिकता तयार व्हायला पाहिजे. अधिक सबलता महत्त्वाची आहे.

## २६. भगवान गडांकुश (त्रैलोक्य बौद्ध सहाय्यक महासंघ) अपशिंगे २०/५/०८ स. ९ वा.

अपशिंगेमध्ये सामाजिक धार्मिक काम पहिल्यापासून सुरू होते. १९८६-८७ मध्ये अशोक गडांकुश यांच्या माध्यमातून आठवड्यातून एकत्र येणे, वंदना घेणे, लहान मुले शिबीर, गाणी, भाषणे सुरू झाली. नितिमूल्यांचे शिकवण धम्म देत असतो. व्यक्तिगत विकासाचे साधन धम्मामधून विकसित होते. पंचशील, अष्ट शील, दश शील माणसांची जडणघडण यामधून होत असते.

१९८६ मध्ये ते १० वी पास झाले. मुंबईची मंडळी त्यावेळी दिपवाळी व उन्हाळी सुट्टीत धम्म शिबीर आयोजित करीत असत. (बोरगांव) दणाणे, इंगळे, ढेकळे इत्यादी प्रमुख पुढाकार घेत. तेथील अरूण दळवी व वासनिक मदत करीत असत. त्यांनी आत्तापर्यंत २५ - ३० धम्म शिबीरे केली आहेत. त्यामध्ये ५ दिवस, ८ दिवस, १० दिवस. पुढे १९९० नंतर त्यांनी स्वत: हे मिशन काम हातात घेतले व पुढाकार घेतला. मिलिंद कांबळे, चंद्रकांत खरात, प्रकाश गडांकुश, आधिक गडकरी, जीवन दणाणे, मिलिंद टेकाळे, आशाताई खरात, गोविंद खरात इत्यादी प्रमुख कार्यकर्ते होते.

१९९१ पासून धम्माची चळवळ अतिशय गतिमान झाली. धर्म प्रसार, प्रचार व्हायला अडथळे येऊ लागले. म्हणून शिबीराची ठिकाणे बदलली. कारण शिबीराला सर्व सुविधा, आर्थिक नियोजन, लोक वर्गणी, अन्नधान्य, पैसा, प्रत्यक्ष भोजनदान, प्रवास, प्रतिकूल परिस्थिती, धर्माची

आस्था नव्हती. आर्थिक अडचणी तरीही धम्म शिबीरे घेतली. मातंग समाजातील शशिकांत बोभाटे, घाडगे - कोल्हापूरचे बाळासाहेब सुहार्य यांनी धम्म शिबीरात धर्मांतर केले.

धर्मांतर केलेल्यांना धर्म माहित नव्हता. सखोलपणा नव्हता. बाबासाहेबांना आदर्श मानून त्यांनी धम्मात प्रवेश केला. धर्म आवड, धर्म श्रद्धा, व्यसनीपणा यामधून त्यांच्यात परिवर्तन झाले. त्यांचे कार्यक्षेत्र सातारा जिल्हा - पाटण, जावली, रहिमतपूर, कोरेगांव, खटाव, वडूज होते. तेथे शिबीरे घेतली. १ दिवस, ५ दिवस, ९ दिवस. जिल्ह्यात प्रसार, प्रचार दौरे आखले. व्याख्याने आयोजित केली. मित्र संघटनांना बोलावले. चांगल्या लोकांचे सत्कार केले. काही विरोधकही होते. जागतिक संघटना, संस्थापक इंग्लंडचे काही मतभेद निर्माण केले जात होते. २७ देशात प्रचार आहे. शिबीर केंद्रे, महाविहारे, विद्यार्थी वसतीगृहे, अंगणवाडी, दवाखाने अशी विविध उपक्रमाच्या माध्यमातून धम्म प्रसार सुरू आहे. अंतिम ध्येय बुद्धत्व प्राप्त करणे व त्यामार्गाने लोकांना घेवून जाणे, बुद्ध प्राप्ती मिळविणे ही आहे.

बौद्ध धम्म हा महासागर आहे. त्या दिशेने मार्गक्रमण करणे, पूर्वाश्रमीचे मार्ग खंडित करणे. मातंग, चर्मकार, ढोर, भंगी, ब्राह्मण, मराठा यांनी काही प्रमाणात धर्मांतरे केली. ही जागतिक चळवळ आहे. ख्रिश्चन, हिंदू, शीख यात आहेत. पाश्चिमात्य देशातील अनेक लोक आहेत. आर्थिक मदत मिळते. जागतिक संघटना आहे. जागतिक फंड मिळतो. बहुजन हिताय, बहुजन सुखाय. मधून आर्थिक मदत मिळते. त्यामधून सामाजिक, धार्मिक चळवळ सुरू आहेत.

**आंबेडकरी चळवळ** - संघटना नितिमूल्याचे पालन करीत आहे पण त्याचा समाजावर विधायक प्रभाव दिसून येत नाही. बौद्ध धर्म हा वास्तववादी जीवन जगायला शिकवतो. बौद्ध धर्म हा मैत्रीचा विकास करतो. द्वेष भावना कमी करतो. पण तरीही चळवळीला गती मिळाली नाही.

**त्यांचे भविष्यातील उपक्रम** - सातारा येथे धम्म प्रसार प्रचाराचे मोठे केंद्र व्हावे. शेवटच्या माणसापर्यंत बुद्धाचे विचार जावेत. बोधसत्वाचा आदर्श लोकांमध्ये निर्माण व्हावा. सामाजिक, शैक्षणिक कामास गती मिळावी. बौद्ध समाज सुविद्य, सुसंस्कृत व दु:खापासून मुक्त व्हावा. गरीबीची उदात्तीकरण धम्म करीत नाही. माणसाने प्रयत्नवादी रहावे, हे शिकवतो. अंधकार,

अंधश्रद्धा व आळस सुख दूर करायला शिकवतो. कारण भारत ही बुद्ध भूमी आहे. धर्मांतर केले की नितीमूल्यांची जपणूक करावी. त्यात सुरक्षिततेची भावना, नितीमूल्ये , अज्ञान, भेद नाहीत.

२१ व्या शतकात कर्मकांडावर आधारित बौद्ध धर्म नाही.तो मोक्षदाता नसून मार्गदाता आहे. बोधिसत्वासाठी असलेली कामे डॉ. आंबेडकरांनी केली. भिमस्मृती अभियान - कापूर लवकर पेटतो व लवकर विझतो. गोवरी कापसापेक्षा उशिरा पेटते व उशिरा विझते. अशा प्रकारे धम्माचे काम झाले पाहिजे. ते दीर्घकाळ टिकले पाहिजे.

लोकांच्या मनाचे परिवर्तन सहज करावे. प्रलोभन दाखवू नका. मनाचे परिवर्तन करण्यासाठी शिबीरे, मेळावे, सदाचारी माणसानी पूर्णपणे प्रबोधनाचे काम करावे. डॉ. आंबेडकरांची भाषणे आहेत ५ लाख अनुयायी नकोत, ५ लोक तलवारीच्या धारेसारखे असावेत. त्रैलोक्य बौद्ध साहाय्यक गण, डॉ. आंबेडकर प्रतिष्ठान अपशिंगे, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, जो. शा. बा., वधुवर सूचक मंडळ यामध्ये काम करीत आहेत.

धम्मचारी सुरंगम, पुणे, धम्माचारी उपायराजा, धम्माचारी खेतक्षेत्र - मुंबई, अमोधादित्य, धम्ममित्र - आनंद गंगावणे, मिलिंद कांबळे, विशाल खरात, शशिकांत देवकांत, विर सोा, विश्वास सावंत, दिपक साळवी, अधिक गडकरी, सिमा कांबळे, सातारा, ललिता गडांकुश, शिलचारीणी, पुणे, ध.आर्यचंद्रा, ध. विमलश्वरी, डॉ. दिपाली विर, शकुंतला जाधव हे सर्वजण या जिल्ह्यामध्ये धर्मप्रचाराचे काम करीत आहेत.

## २७. सिद्धार्थ खरात ( मुक्ती युवा संघटन) सातारा ५/४/०८ सायं. ६ वा.

खरात हे ८ वी, ९ वी मध्ये असताना साताऱ्यातून धुमकेतू हे विज्ञानवादी मासिक सुरू झाले. ते मासिक त्यांच्या वाचण्यात आले व मुलांच्या मनात विज्ञानवादी दृष्टिकोन निर्माण झाला. याच दरम्यान साताऱ्यात ते १२ वी ला असताना दलित क्रांती दल सन २००० मध्ये काम करीत होते. भारतीय दलित पँथरमधून बाहेर पडलेल्या कार्यकर्त्यांनी हे चालवले होते. त्याच्या प्राथमिक बैठका होत. त्यामध्ये भगवान अवघडे, जयंत उथळे होते. त्यावेळी ते काही प्रश्न विचारात होते.

१. आर. पी. आय. ची अशी अवस्था का झाली ?

२. दलित पँथरकडून काय शिकावे ?

याच दरम्यान भारत ज्ञान विज्ञान जथा प्रा. अजित साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली साताऱ्यात आला. त्यावेळी राजकारण महत्त्वाचे की समाजकारण महत्त्वाचे, यापेक्षा राजकारण महत्त्वाचे आहे. समाज एकसंघ पाहिजे आहे. पँथरचा लढा फक्त नामांतरासाठी होता काय ? तो आंदोलनाचा मुद्‌दा होता की क्रांतीचा लढा होता. किशोर तपासे, अशोक गायकवाड, प्रा.अरुण गाडे, पार्थ पोळके, लक्ष्मण माने हे जिल्ह्यातील नेते मंडळी एकत्र का येत नाहीत. प्रत्येकाच्या वेगवेगळ्या चुली का आहेत, यांना आपण दाखवून देवू की आम्ही युवकांची एकजूट करू शकतो. ही चर्चा कामे पोळके-गाडे यांच्यापर्यंत गेली होती. दलितांच्यावर राजकारण करणाऱ्यांना हा धक्का होता. सातारा शहरातील सर्व दलित वस्त्यामध्ये त्यांनी चर्चा केली व सर्वांच्या अनुमतीने दलित क्रांती दल स्थापन केले.

दलित क्रांतीदल हे खालील उद्देश घेवून चालते.

१. युवकांना संघटित करणे.

२. पुरोगामी विचार मांडणाऱ्या पक्ष संघटनावर टिका न करणे.

३. पेठेत बैठका घेवून प्रबोधन करणे.

४. कार्यकर्ता तयार होण्यासाठी शिबीरे घेणे.

**दक्रांदची भूमिका** - आपण पूर्वीचे लोक कोण होतो. चातुवर्ण्यव्यवस्था का निर्माण झाली. काम काय आहे ? जातीची अधिष्ठान काय आहे ? वर्ग काय आहेत ? हिंदू धर्माचा पाया काय आहे ? याची माहिती कार्यकर्त्यांना त्यांनी दिली. संघटना पातळीवर स्त्रीला कशी डावी मानलेली आहे. त्यांच्यात मोठी व्यापकता नव्हती. वाचायला मिळालेली पुस्तके, अनुवादित अशी होती. दलित साहित्यिकांचे वाचन झाले. रावसाहेब कसबे, दया पवार, बाबूराव बागुल, लक्ष्मण माने, गायकवाड यांनी लिहिलेले साहित्य वाचले पण मूळ साहित्य मिळाले नाही. त्यामध्ये मूळ मर्म दडलेले साहित्य होते. मानवाचा खरा इतिहास काय ? जाती कशा जन्माला आल्या. या सर्वांचा अभ्यास केला व त्यानंतर प्रत्यक्ष आंदोलनात ते उतरले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ निवास आमणे बंगला याचे आंदोलन झाले. त्यावेळी पोलीस व कार्यकर्ते दगडफेक झाली. त्यांना अटक करण्यात आले. पण केवळ राहूल तपासेमुळे ते बाहेर पडले. त्यानंतर विद्रोही चळवळीत २००२-०३ मध्ये काम करू लागले. भगवान अवघडे, जयंत उथळे यांच्या माध्यमातून विद्रोही चळवळीत सहभागी झाले. सांस्कृतिक क्रांती म्हणवण्याऱ्या संघटनात जावे म्हणून काम करू लागले.

त्यानंतर लोकायत संस्था स्थापन झाली. त्यामध्येही उथळे, अवघडे, खटावकर ही मंडळी होती. ते स्त्रीमुक्ती मानत होते. वर्णव्यवस्थेतून व शोषणातून तिला मुक्त करणे, स्त्रीत्वातून मुक्त करणे म्हणून महिलांच्यामध्ये काम करायला सुरुवात केली. त्यामधून बचतगट चळवळ सुरू झाली व महिलांच्यासाठी 'लोकायत पतसंस्था' उभी करण्यात आली. महिला सबलीकरणाचे कार्यक्रम चालविले होते. अॅट्रोसिटीबाबत मोर्चात महिलांना पुढे केले जाते. याला पर्याय म्हणून काम सुरू झाले. वर्षा देशपांडे यांची दलित महिला आघाडी ही घरगुती हिंसाचारातून मुक्ती मिळाली पाहिजे यासाठी काम करते. याला पर्याय म्हणून त्यांनी युवक-युवतींनी 'मानव मुक्ती अभियान' चालू केले. त्यामध्ये सचिन मोरे, सिद्धार्थ खरात, मिलिंद पवार, संदिप कांबळे ही प्रमुख मंडळी होती. बाकी चळवळ ही समाजकारणातून राजकारणाकडे चालली होती.

त्यांना दलित क्रांती दल मांडणी ही फुले-शाहू-आंबेडकरवादी होती. शोषण विरहित समाज, मानव मुक्ती अभियानला डी. वाय. एफ. आय. मध्ये शहर अध्यक्ष म्हणून काम करू लागले. याच दरम्यान मानवमुक्ती अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, दलित क्रांती दल, याच दरम्यान क्रांतिसिंह नाना पाटील जन्मशताब्दी महोत्सव या कार्यक्रमातत सहभागी झाले. या सर्व धावपळीमुळे ते सर्वव्यापी झाले.

पुढे विद्रोही चळवळीत सहभागी झाले. बडवे उत्पात हटाव आंदोलन हा विद्रोहीने निर्णय घेतला. याच दरम्यान बौद्ध युवा संघर्ष समितीचे कार्यकर्ते डॉ. हर्ष जगझाप साताऱ्यात आले व त्यांनी भूमिका मांडल्या. पण तो बुद्धिभेद करणारा गट होता. त्यामुळे त्यात ते सहभागी झाले नाहीत. बडवे हटाव हा विषमता निर्मूलन आंदोलनातील एक भाग होता.

पुढे त्यांनी कॅस्ट्रीयन मुव्हमेंट सुरू केली. डॉ. भारत पाटणकर यांनी दास्य मुक्तीची चळवळ अधिकच गतिमान करण्याचा प्रयत्न केला. जाती अंताच्या लढा देताना संत साहित्य महत्त्वाचे आहे.

पुढे विद्रोहीमध्ये वाद निर्माण झाला. पोळके - धनाजी वेगळे, उथळे - पाटणकर वेगळे . अशा प्रकारे वेगळ्या पद्धतीने चळवळी सुरू झाल्या. तेव्हा त्यांनी विचार केला. आपण वेगळे झालो तर काय होईल ? स्वंत जन आंदोलन उभे करू शकतो का ? वेगळे होण्यामुळे सर्वांबरोबर चर्चा केली. जानेवारी महिन्यात चिंतन बैठक ठेवली. मार्गदर्शक, हितचिंतक यांना बोलवण्यात आले. विद्रोहीमध्ये क्रांतिकारक विचार म्हणून आपण आलो. पुढे उथळे यांच्या येथे एक बैठक झाली. संघटनेत एकाधिकारशाही चालत असेल तर मानवमुक्ती अभियान हे नाव घेतलेले योग्य आहे का ? लोकशाहीची मूल्ये पायदळी तुडवली जाणार नाहीत. त्यासाठी समान शिक्षण, समान न्याय, समान लोकशाहीचे दुवे निर्माण करण्यासाठी जनआंदोलन करणार. भविष्यात राजकीय नवीन पर्याय उभा करूया. शांततेच्या मार्ग स्विकारू, हिंसात्मक मार्ग पत्करणे धोक्याचे आहे. डॉ. आ. ह. साळुंखे म्हणतात, विचारांची उंची वाढवा. जाती नष्ट झालेल्या दिसतील. वैचारिक गरीबी कधीही सोडता आली नाही. तर जाती अंताची चळवळ ही जनआंदोलनाकडे कशी नाहीत म्हणून वैचारिक श्रीमंत होण्यासाठी प्रयत्न केले.

## २८. प्रा. मच्छिंद्र सकटे (दलित महासंघ) कराड १०/०३/० ८ दुपारी ११ वा.

सकटे यांचे वडील नोकरीला रेल्वेमध्ये माटुंगा वर्कशॉपला होते. त्यामुळे त्यांचे बालपण मुंबईला गेले. नायगाव-सायन कोळीवाडा येथे महार-मांग यांच्या मोठ्या वस्त्या होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईस झाले. त्यांचे वडील भजने म्हणायचे. डॉ. आंबेडकरांची भाषणे असत त्यावेळी वडीलांनी गॅसबत्ती डोक्यावर घेवून भाषणे ऐकली आहेत. वडीलांना शिक्षणाविषयी तळमळ होती. आपल्या मुलानेसुद्धा बाबासाहेबांसारखे डॉक्टर व्हावे असे त्यांना वाटायचे. या कालावधीत ते वसतीगृहात रहात होते. भैरवनाथ वसतीगृह शेतकरी कामगार पक्षाच्या ताब्यात होते. १९७७ मध्ये जनता दलाचे सरकार होते. मोरारजीभाई देसाई हे पंतप्रधान होते. १९७८ मध्ये महाराष्ट्रात पुलोद सरकार होते. शरद पवार मुख्यमंत्री होते. त्यामुळे महाराष्ट्रावर डाव्या चळवळीचा पूर्ण प्रभाव होता.

प्रा. सकटे यंत्रमाग - मोर्चा, उपोषण होत, त्यात सहभागी होत होते. सुभाष पाटील, अरूण पाटील, माच्छिंद्र कदम हे होते. ते गायन स्पर्धा, भाषण स्पर्धा यात प्रथम क्रमांक मिळवत होतो. पहिले आमदार तात्यासाहेब भिंगारदेवे होते. ते माण, विटा व कुर्डूवाडी येथून (करमाळा) आमदार झाले. कर्मवीर आण्णांचा लाडका विद्यार्थी तात्या भिंगारदेवे हा होता. म. गांधी सातारमध्ये आले त्यावेळी संस्कृत विषयात पहिले आलेले भिंगारदेवे त्यांच्या गळ्यात म. गांधींनी त्यांच्या गळ्यातला हार घातला.

त्यांनी ११ वी मध्ये असताना पुरोगामी विद्यार्थी संघटना स्थापन केली. कॉलेजमध्ये शहरी व ग्रामीण असा वाद होता. त्यांना अध्यक्ष केले नाही, उपाध्यक्ष केले. जातीचा फटका बसला. कॉलेजमध्ये प्रा. आढाव व सौ. आढाव यांनी खूप प्रेम केले. पुढे विद्यापीठात एम. ए. ला गेले. तेथे डॉ. एम. डी. नलवडे, प्रा. रमेश ढावरे, प्रा. गोपाळ गुरू, प्रा. आंबादास जाधव, उत्तम कांबळे, ओमप्रकाश कलमे, रासम मॅडम, चौसाळकर यांचा सहभाग लाभला.

कोल्हापूर विद्यापीठात प्रचंड वाचन केले. १९८७-८८ कॉलेजमध्ये संप होता. त्यावेळी विद्यापीठावर मोर्चा काढला. शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी संघटना स्थापन केली. विद्यापीठ प्रबोधन मंच स्थापन केला. दर महिन्याला ते व्याख्यान घेत होते. प्रा. एन. डी. पाटील, प्रा. डि. यु. पवार, प्रा. कावळेकर, विलास बन्ने, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची व्याख्याने झाली.

१९८८ मध्ये दलितांची घरे पट्टणकोडोलीमध्ये जाळण्यात आली. त्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. दत्ता जाधव, भामा मोरे, बाळासोा वडगावकर इ. होते. त्यावेळी पोलीस वाहनांवर दगडफेक केली. त्यांनी भाषण केले व भाषण गाजले. जमीनीच्या वादात बाबूराव हेगडे या मातंगाचा सुळकूड येथे खून झाला. त्यावेळी एकाही संघटनेने आवाज उठवला नाही. मोर्चा, आंदोलन करूनही कोणीच दखल घेतली नाही. आपले प्रश्न आपण सोडविले पाहिजेत. यातून नवीन संघटनेचा जन्म झाला.

**दलित महासंघाची स्थापना ५ जुलै १९९२-** मध्ये दलित महासंघाची स्थापना केली. प्रा. रघुनाथ केंगार - होलार, प्रा. शशिकांत तासगांवकर - महार, प्रा.गोरख सांगळे - वंजारी,

प्रा. शामराव वटमोरे - रामोशी, प्रा. हिंदूराव पवार - मराठा, प्रा. विजय वाढते हे होते. प्रथम अध्यक्ष म्हणून प्रा. मच्छिंद्र सकटे यांची निवड करण्यात आली. व असे ठरले की प्रत्येकाने आपल्या जातीत जावून काम करावे व संघटन वाढवावे. पहिला मेळावा गडहिंग्लज येथे १९९२ मध्ये रामोशी समाजाचा घेण्यात आला. पुतळ्याची विटंबना झाली होती. उपोषण आंदोलन करण्यात आले. त्यामध्ये वंजारा समाज आंदोलन, बाबरी मशिद निषेध केला. नामांतरासाठी मोर्चा काढला. राखीव जागांची पूनर्रचना करावी म्हणून मंडल परिषद घेण्यात आली. लातूर, बीड याभागात जनयात्रा काढण्यात आल्या. त्यानंतर संघटनेत नेतृत्वावरून प्रचंड मतभेद निर्माण झाले. प्रा. केंगारचा स्वभाव तुसडा होता. संघटनेत गटबाजी, हेवेदावे सुरू झाले. बीड येथील केज येथे बाजार मैदानावर दलित महासंघाची प्रचंड सभा झाली. सभापती अध्यक्ष होते व दलित महासंघात पहिली फूट १९९३ मध्ये झाली. रघुनाथ केंगार बाहेर पडले. १९९५ ला शशिकांत तासगांवकर बाहेर पडले. याच दरम्यान १९९३ मध्ये बंजारा समाज मोर्चा सातारा जिल्हा कार्यालयासमोर काढला. पुढे राखीव जागांची फेररचना व्हावी, मंडल आयोग लागू करावा म्हणून दलितांचा मोठा मोर्चा काढला. दलित महासंघाची पहिली शाखा बरड ता. फलटण येथे लोंढे यांनी काढली. १९९५ मध्ये कराड येथे दलित साहित्य संमेलन घेतले. वामन होवाळ अध्यक्ष होते. परंपरा मोडणारे साहित्य संमेलन झाले. मा. रामदास आठवले, प्रा. अरूण कांबळे, आर. डी. गायकवाड, व्ही. के. घाटे इ. हजर होते. वाद-दलित साहित्याच्या नामांतराचा. दलित शोषित भटके परिषद, नामांतरवाले, क्रांतीवादी इ. विषय होते. १९९४ मध्ये कोल्हापूरला नामांतर परिषद घेण्यात आली. त्या परिषदेला गंगाधर गाडे, प्रकाश आंबेडकर यांना बोलावण्यात आले होते.

१९९६ मध्ये प्रा. सूकुमार कांबळे यांनी दलित महासंघात प्रवेश केला. त्यांना राज्यसंघटक हे पद दिले. त्यांनी १९८० मध्ये बौद्ध धम्म स्वीकारला.

वाळवा येथे काठीमोर्चा ठेवला होता. कार्यकर्त्यांना बचत भवन येथे ठेवले होते. आंदोलन टोकाला गेले होते. जहाल भाषण, सडेतोड युक्तीवाद, अभ्यासू मांडणी, उग्र आंदोलन यामुळे जागृती झाली. १९९८ साजूरची दंगल झाली होती. त्यावेळी मीरा बोरवणकर एस. पी होत्या. 'दलित-दलित दंगल आहे' अशा त्या म्हणाल्या. त्यावेळी ते म्हणाले, 'आमच्या नजरेने बायका

गरोदर राहतात', त्यामुळे वातावरण तापले व काठी मोर्चा झाला. १० दिवस उपोषण केले व १० व्या दिवशी सरकारचा १० वा घातला. सर्वांनी मुंडण केले. महागाई विरोधी मुख्यमंत्री जोशी असताना कराडला आले. त्यावेळी कांद्यांचे तोरण बांधले. १९९८ मध्ये गोलमेज परिषद घेतली. महाबळेश्वर येथे प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. आ. ह. साळुंखे यांना बोलावून दलित परिषद घेतली. नंतर पुणे, नागपूरला परिषद झाली. मधुकर वायदंडे, सूकुमार कांबळे, वारणानगरला मंडल आयोग परिषदेमध्ये आले. मधुकर वायदंडे, राम कांबळे, सूकुमार कांबळे. सांगलीच्या भारत बचाव परिषदेला उपस्थित होते.

१९९९ दलित महासंघ फूट पडली. मधुकर वायदंडे बाहेर पडले. ते वाळवा ता. अध्यक्ष होते. सांगली बचाव परिषदेत १९९९ मध्ये महासंघात नागनाथ आण्णांनी फूट पाडली. २००० मध्ये सूकुमार कांबळे व राम कांबळे बाजूला गेले. सनातन भोसलेच्या पारधी प्रश्नांवरती वायदंडे यांनी चळवळीचा बाजार केला. त्याने पारधी मूक आंदोलन केले. सूकुमारकांबळेने, डेमोक्रॅटिक रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया स्थापन केली. राम कांबळे यांनी राष्ट्रीय बहूजन क्रांतीदल स्थापन केले. आज दलित महासंघ १८ जिल्ह्यात काम करतोय. वस्तीशाळा सुरू केल्या. मुस्लिम समाज महासंघात आहे. राजू दिवाण, जावेद नायकवडी - अध्यक्ष होते. २००० मध्ये बांधणी केली. कराड येथील साहित्य संमेलनात आंदोलन केले. 'हिंदुत्वापेक्षा माणुसकी श्रेष्ठ आहे' हा ठराव करावा म्हणून संगमात जलसमाधी आंदोलन केले.

शेवटी प्रा. सकटे म्हणाले, दलित महासंघाने १९९९ मध्ये अधिकृत राजकारणात प्रवेश केला. मा. शरद पवार यांच्याशी चर्चा करून त्यांना पाठिंबा दिला. महाराष्ट्रात सगळीकडे दलित नेतृत्वामध्ये बौद्ध नेतृत्व आहे. दलित महासंघात नेहमीच मातंग समाजाचे नेतृत्व आहे व आमचा झेंडा निळा आहे. जूने प्रश्न अजून तसेच आहे. नवे प्रश्न निर्माण झाले आहेत.

१) सोलापूर-पंढरपूर जवळील चळे गावातील दलितांचे केस कापले जात नाहीत.

२) सांगली-आटपाडी-कामथी येथे केस कापत नाहीत.

३) जत - अनेक गावे आहेत वरून पाणी वाढले जाते. कपबशा वेगळ्या ठेवल्या आहेत.

त्यामुळे मला जातिविहीन, धर्मविहिन व वर्गविहिन समाज रचना अपेक्षित आहे. त्यामुळे कोणत्याच धर्मात प्रवेश करणार नाही. आमचा महासंघ या दिशेने चाललेला आहे असे ते म्हणाले.

**सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीत काम करणाऱ्या काही संघटना व कार्यकर्ते :-**

१. भारीप बहुजन महासंघात काका गाडे, मु. का. खराटे, राजेंद्र कांबळे, कृष्णा गव्हाळे ही प्रमुख मंडळी येथे अनेक वर्षे काम करीत आहेत.

२. मास मुव्हमेंटचे प्रमुख शशि देठे, बाळासाहेब खरात तसेच दिलीप तुपे, महादेव सरतापे, विकी कांबळे, वसंतराव भोसले हे प्रमुख कार्यकर्ते माण तालुक्यात काम करीत आहेत.

३. सातारा तालुक्यात सुनिल त्रिंबके, अनंता वाघमारे, आण्णा वायदांडे, शंकरराव सोरटे, चंद्रशेखर मोरे, बाळासाहेब सावंत, बाळू खरात, अरविंद गाडे, अमोल बनसोडे हे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

४. फलटण तालुक्यात प्रमुख्याने चंद्रकांत अहिवळे, बी. टी. जावळे, हरिष काकडे, जनार्दन लोंढे, प्रा. रमेश आढाव, मुन्ना शेख, संजय अहिवळे, कुंदर मारूडा, आदिनाथ सावंत, राजरत्न सावंत, मधुकर काकडे, दशरथ फुले, सुहासिनी माने, बेबीताई कांबळे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

५. सातारा शहरामध्ये गेली वीस वर्षे थोरांच्या व्याख्यानमाला संबोधी प्रतिष्ठान घेत आहे. त्यामुळे जिल्ह्यात वैचारिक प्रबोधन घडते आहे. आण्णासाहेब होवाळे, रमेश इंजे, हौशेराव धुमाळ, दिनकर झिंब्रे, शाहीर माधव भोसले व मनोहर पवार हे कार्यकर्ते काम करीत आहेत.

६. दि ऑल इंडिया बॅकवर्ड कम्युनिटीज ॲण्ड मायनॉरिटीज (बामसेफ) ही कर्मचारी संघटना सातारा जिल्ह्यात प्रभावीपणे फुले-शाहू-आंबेडकर यांचे विचार पसरविण्याचे काम करीत आहे. त्यामध्ये अमोल आवळे, प्रा. मुनेश्वर व श्री. बिराजे हे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

७. मा. महादेव जानकर यांनी काही वर्षापूर्वी स्थापन केलेल्या यशवंत सेना (राष्ट्रीय समाज पक्ष) आज सातारा जिल्ह्यात जोमाने काम करीत आहे. त्यामध्ये बजरंग खटके, काशीनाथ शेवते, बजरंग गावडे, भाऊसाहेब वाघ, पुंडलिक काळे, खंडेराव सरक, डॉ. शेंडे हे प्रमुख कार्यकर्ते आहेत.

८. सरकारी व निम सरकारी कर्मचारी यांचे साताऱ्यात प्रभावी संघटन आहे. कास्ट्राईब कर्मचारी महासंघ या संघटनेने शहरामध्ये आणि जिल्ह्यामध्ये दलित कर्मचाऱ्यांच्या पिळवणुकीच्या विरोधात अनेक आंदोलने केलेली आहेत. याचे प्रमुख सुशीलकुमार कांबळे व रोकडे सर, प्रा. बनसोडे व मस्के सर हे प्रमुख मंडळी काम करीत आहेत.

९. मा. चंद्रकांत हंडोरे माजी समाजकल्याण मंत्री यांनी स्थापन केलेल्या भिमशक्ती या संघटनेचे सातारा जिल्ह्यात जोमाने काम सुरू आहे. बाळासाहेब शिरसाट, येवले, वामनराव मस्के, नंदकुमार कांबळे, दिलिप वाघमारे हे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

१०. डॉ. मधुकर माने यांनी बहुजन क्रांती दल हे नवीन संघटन उभारून जिल्ह्यात काम सुरू केले आहे. सत्यवान कमाने हे काम करीत आहेत.

११. मा. जोगेंद्र कवाडे प्रणित पिपल्स रिपब्लिकन पार्टी या पक्षाचे काम या जिल्ह्यात युवराज कांबळे हे करीत आहेत.

१२. संत रोहिदास सामाजिक सेवा संस्था ही प्रामुख्याने चर्मकार समाजाचे परिवर्तन करून 'चलो बुद्ध की ओर' हा संदेश घेऊन काम करीत आहे. त्यांनी विविध व्याख्याने, पुरस्कार यामधुन परिवर्तन घडवून आणले आहे. गणेश कारंडे, किशोर रावखंडे, नितीन चव्हाण, वामन गंगावणे, भारत गडकरी हे प्रमुख काम करीत आहेत.

१३. जावली तालुक्यामध्ये दलित चळवळीत काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये विलास परिहार, डॉ. संपतराव कांबळे, ॲड्. प्रभाकर कांबळे, अजित जगताप, अविनाश जगताप हे आहेत.

१४. पांचगणी-महाबळेश्वर तालुक्यात दिलीप कांबळे, सुरेश कांबळे, हेन्री जोसेफ ही प्रमुख मंडळी काम करीत आहेत.

१५. वाई तालुक्यात महेंद्र खरात, भारत सोनावणे, प्रा. भानुदास आगेडकर, राजू मोरे ही प्रमुख मंडळी काम करीत आहेत.

१६. खटाव तालुक्यात मु. का. खराटे, गो. मा. वाघमारे, अशोक बैले, किरण जगताप, अरूण जावळे हे प्रमुख कार्यकर्ते आहेत.

१७. कोरेगांव तालुक्यात नंदकुमार कांबळे, सुनील उबाळे, एस. के. कांबळे, श्रीमंत भंडारे हे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

१८. पाटण तालुक्यात श्री. देवकांत, प्रा. रवींद्र सोनावणे, श्री. साबळे हे काम करीत आहेत.

१९. कराड तालुक्यात अशोक भोसले, भिमराव सावतकर, श्री. लादे, आप्पासाहेब गायकवाड, उत्तम कांबळे, अशोक मदने हे प्रमुख कार्यकर्ते काम करीत आहेत.

२०. खंडाळा तालुक्यात श्रावणकुमार आवडे, श्री. कांबळे, श्री. खरात हे काम करीत आहेत.

२१. भटक्या विमुक्त जाती संघटना सातारा जिल्ह्यात प्रमुख कार्यकर्त्यांमध्ये मच्छिंद्र जाधव, नारायण जावलीकर, यल्लाप्पा वैदू, श्री. गुडीले इत्यादी कार्यकर्ते काम करीत आहेत.

२२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी सातारा यांचे दरवर्षी 'विचारवेध साहित्य संमेलन' होत असते. त्यामध्ये वैचारिक चर्चा केली जाते. दिनकर झिंब्रे, किशोर बेडकिहाळ, प्रा.एन. डी. पाटील हे प्रमुख आहेत.

तसेच सातारा जिल्ह्यात काही परिवर्तनवादी संघटना काम करीत आहेत. त्याही दलित चळवळीला पोषक भूमिका घेत होत्या. यामध्ये छात्रभारतीचे प्रा. सतिश घाडगे, श्री. निकम, संजीव बोंडे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उदय चव्हाण, कुमार मंडपे, लोकरंगमंचचे तुषार भद्रे व मधुकर फल्ले, महात्मा फुले समता परिषदेचे दशरथ फुले, मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे कॉ. प्रभाकर महाबळेश्वर, ॲड्. सयाजीराव पाटील, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, ओबीसी संघटनेचे नेताजी गुरव, ॲड्. पन्हाळे, सौ. शिला गीते इत्यादी. यांच्याही भूमिका दलित चळवळीला पोषक अशाच होत्या.

## २९. पद्मश्री माजी आमदार लक्ष्मणराव माने - भटक्या विमुक्त जाती संघटना, महाराष्ट्र राज्य - सातारा १५/२/०८ सकाळी ९ वा. : -

लक्ष्मण माने यांच्या जीवनातील लहानपणीचा एक प्रसंग आहे. त्यांच्या वडिलांची आत्या वारली होती व त्यांना पत्र आले होते. ते पत्र दोन महिन्यांनी मिळाले व ते वाचण्यासाठी आठवडा गेला. त्यामधून त्यांच्या वडिलांना असे वाटले की आपल्या मुलाला लिहिता वाचता आले पाहिजे. यामधून त्यांचा प्राथमिक शाळेचा प्रवास सुरू झाला. निरगुडीतील अकोबा सस्ते गुरूजी यांनी त्यांचे नाव शाळेत टाकले व ज्या गावात त्यांचा मुक्काम असेल त्या गावात लक्ष्मण माने शाळेत बसू लागले. सातवीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर वडिलांना वाटले शाळा बंद करावी व त्यांचे लग्न करावे. पण माने यांनी याला विरोध केला व पुढे ते महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरला गेले. तेथेच त्यांचे जीवन बदलून गेले. सामाजिक जाणीवा निर्माण होऊ लागल्या. देवधर्म, कर्मकांड, भूत-पिशाच्च यावरचा विश्वास उडाला. कोल्हापूरमध्ये शाहू कॉलेजमध्ये त्यांना प्राचार्य आर. डी. गायकवाड, प्रा. ज. रा. दाभोळे व प्रा. पाटगावकर सर यांच्या मार्गदर्शनामुळे फार मोठे परिवर्तन झाले. प्रा. पाटगावकर सर हे राष्ट्रसेवा दलाचे कार्यकर्ते होते. त्यांच्यावर साने गुरूजींचा फार मोठा प्रभाव होता. त्यामुळे माने राष्ट्रसेवा दलात सहभागी झाले. अनेक शिबीरामधून त्यांच्या मनामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तयार झाला. साने गुरूजी व महात्मा गांधी यांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर झाला. नंतर ते उर्मिला काकी सबनीस यांच्यामुळे राष्ट्रसेवा दलाचे पूर्ण वेळ कार्यकर्ते झाले. भाऊसाहेब खांडेकर यांच्या पुस्तकाचे टिप्पणी दुरूस्ती करण्याचे त्यांना काम मिळाले. पुढे ते आंतरभारतीत काम करू लागले व त्यांनी आंतरजातीय विवाह करण्याचा निर्णय घेतला. रजिस्टर पद्धतीने विवाह केला. पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते शिरूभाऊ लिमये हे दरवर्षी आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्याला एक वर्षभर आपल्या घरात ठेवत. म्हणून मानेंनी पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. कारण मुलगी कोल्हापुरातील मराठा समाजाची होती. त्यामुळे तेथे राहणे धोक्याचे होते. परंतु पुण्याला लिमये यांच्याकडे अगोदरच एक जोडपे होते. त्यामुळे त्यांनी सातारला जाण्याचा निर्णय घेतला व अपघाताने ते सातारला आले.

१९७३ मध्ये साताऱ्यात आल्यानंतर त्यांनी राष्ट्रसेवा दलाचे काम सुरू केले. परंतु कोणाच्याच ओळखी नव्हत्या. ते काम शोधत होते. जवळचे पैसे संपले. आता शांतपणे आत्महत्या करायची म्हणून औषधाची बाटली घरी आणून ठेवली. पण याचवेळी साताऱ्यात जे. के. आर्टसमध्ये त्यांचे जुने फलटणचे मित्र त्यांना दिसले व तेथे ते कामाला लागले. त्यावेळी अचानक एके दिवशी डॉ. नरेंद्र दाभोळकर तेथे आले होते व त्यांची ओळख श्री. काळोखे व जंगम या मित्रांनी करून दिली. त्यावेळी दाभोळकर हे समाजवादी युवक दलाचे काम करीत होते. तेथूनच त्यांच्या सामाजिक जीवनाला सुरूवात झाली.

**लक्ष्मण माने यांचे सामाजिक कार्य :-**

१. १९७२ मध्ये फार मोठा दुष्काळ पडला होता. त्यामध्ये सातारा येथील वसतीगृहातील मेस बंद ठेवण्यात आली. याचदरम्यान मुलांच्या परीक्षा जवळ आल्या होत्या. वसतीगृह बंद ठेवल्यामुळे मुलांच्या जेवणाची अडचण झाली. त्यावेळी सातारा शहरातील अनेक मान्यवरांकडे माने गेले, त्यांना प्रश्न समजावून सांगितले व एका-एका कुटुंबाकडून आठ ते दहा मुले जेवणासाठी पाठवण्याचे ठरले. अशाप्रकारे वस्तीगृहातील मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची त्यांनी दक्षता घेतली. या मुलांमध्ये दलित, भटके, गरीब मुलांची संख्या जास्त होती.

२. सातारा शहरामध्ये वसतीगृहाची आवश्यकता होती. म्हणून एकता शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना करण्यात आली. त्याचे अध्यक्ष प्रा. अशोक रावखंडे व जनरल सेक्रेटरी लक्ष्मण माने तसेच ॲड्. जी. बी. माने, बाळासाहेब थोरात हे सदस्य होते. सातारा शहरातील सरकारी जागेची मागणी केली व ती जागा मिळविली. त्यावेळी शालिनीताई पाटील या महसूलमंत्री होत्या. फलटणचे रवींद्र बेडकिहाळ यांनी जागा मिळवून देण्यास मदत केली. या जागेवर वसतीगृहाची इमारत बांधली. त्यावेळी अनेक व्यक्तींकडून आर्थिक मदत गोळा केली. पु. ल. देशपांडे यांनी ७०,०००/- रुपये मदत केली. तोपर्यंत जेथे जेथे जागा मिळेल तेथे वसतीगृह चालविले जात होते. यावेळी फलटणमधील दलित युवक संघटनेने मदत केली. तेव्हापासून धान्याच्या रुपाने वसतीगृहाला फलटणकरांनी मदत केली. १२ वर्षे माने यांनी वसतीगृह चालवले. १९७५ मध्ये दलित कार्यकर्ते पार्थ पोळके यांची ओळख झाली.

३.  डॉ. बाबा आढाव यांनी पुणे येथे एक बैठक बोलवली व त्या बैठकीत दलित सवर्ण यांच्यातील संबंधावर चर्चा झाली. त्यामध्ये जातीयतेची भीषणता कमी करावयाची असेल तर जातीयता मोडली पाहिजे. जातीयता मोडण्यासाठी आंदोलन पुकारले पाहिजे. यासाठी महाराष्ट्रभर 'एक गाव एक पाणवठा' ही घोषणा करण्यात आली. म्हणजेच जेथे जेथे जातिभेद केला जातो त्यावर अतिक्रमण करावयाचे असे ठरले व त्यामधून कोरेगांव तालुक्यातील त्रिपुटी येथील तळ्याचा सत्याग्रह करण्याचे ठरले. त्रिपुटीला फार मोठे तळे आहे. पण त्यास दलितांना स्पर्श करण्यास परवानगी नव्हती. म्हणून माने व त्यांच्या सहकार्यांनी १५ दिवस संपूर्ण जिल्ह्यात प्रबोधन प्रचार केला व या आंदोलनाला उत्फूर्तपणे पाच हजार कार्यकर्ते उपस्थित होते. या आंदोलनाला डॉ.बाबा आढाव, भाई वैद्य, गेल ऑमव्हेट या आल्या होत्या.

या दरम्यान माने यांना सहकारात सरकारी नोकरी लागली. त्यामुळे त्यांनी १९७३-१९८६ पर्यंत नोकरी केली. दलित पँथरची स्थापना मुंबईमध्ये झाली होती. त्यामुळे ते दलित पँथरकडे आकर्षित झाले पण त्यांची जडणघडण समाजवादी चळवळीत झाली होती. त्यामुळे लगेच गांधीवाद ते सोडू शकत नव्हते. तरीही पँथरच्या आंदोलनात सहभागी होत होते.

४)  महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला २६ वर्षे पूर्ण झाली होती. म्हणून समाजवादी युवक दलाने असा निर्णय घेतला की या निमित्तात्तने आपण आज दलित समाजाची काय अवस्था आहे, त्यांचे राहणीमान, शिक्षण, जगण्याची पद्धती यांचा सर्व्हे करावा. म्हणून १९७५ मध्ये सातारा ते महाड असा पायी प्रवास करण्याचे ठरले. त्यामध्ये पार्थ पोळके, लक्ष्मण माने, दिनकर झिंब्रे, विजय मांडके, डॉ. नरेंद्र दाभोळकर, किशोर बेडकिहाळ, प्रमोद कोपर्डे, विलास ढाणे हे प्रमुख कार्यकर्ते व वसतीगृहातील काही विद्यार्थी असे २० ते २५ जण रोज पायी प्रवास कररत रस्त्याला लागणाऱ्या वस्त्या, वाड्या, गावात फिरणे, दलितांचा परिस्थितीचा आढावा घेणे व ओळख करून घेणे अशा प्रकारे सातारा-महाड पदयात्रा काढली व आजही दलित समाजाची स्थिती काय आहे ? याचा अभ्यास करून त्यावर आंदोलन करण्याचे ठरविले.

लक्ष्मण माने यांच्या जीवनाच्या महत्त्वाच्या टप्प्यावर 'उपरा' हे आत्मकथन प्रकाशित झाले. व ते महाराष्ट्रभर गाजले. या पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. १९८५ मध्ये

अमेरिकेच्या फाय फौंडेशनची २ लाख डॉलर्सची रक्कम त्यांना भटक्यांच्या संशोधनासाठी मिळाली व तेथून त्यांच्या जीवनात परिवर्तन झाले. पैशाची तरतूद झाली. त्यामुळे पूर्ण वेळ काम करण्याचा निर्णय घेतला. याचवेळी पार्थ पोळके, डॉ. दाभोळकर यांच्याबरोबर मतभेद झाले होते. या सर्व गोष्टींमुळे त्यांनी खूप चिंतन केले व भटक्या जातीजमातीच्या उत्थानासाठी आयुष्यभर काम करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला व भटक्यांच्या शोध मोहिमेस प्रारंभ केला.

## लक्ष्मण माने यांचे भटक्या विमुक्त जाती जमातीसाठीचे कार्य :-

महाराष्ट्रात दलित अस्पृश्य समाजाचे जसे विदारक चित आहे, त्याच्याही पलिकडे भटका समाज जीवन जगत आहे. हक्काची जागा नाही, घर नाही, मालमत्ता नाही. प्रत्येक गावाच्या हागणदारीला वस्ती करायची. भीक मागायची, कामधंदा करायचा आणि पुन्हा पुढच्या गावात जायचे. असे भयानक चित्र भटक्या समाजाचे होते.

पण भटक्यांमध्ये शिक्षणाचे प्रमाण ०.०५% एवढे असल्यामुळे त्यांच्या मनात वैचारिक भावना नव्हती. त्यावेळी महाराष्ट्रात भटक्यांच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या फार काही संघटना व कार्यकर्ते नव्हते. महाराष्ट्र पातळीवर प्रा. बाळकृष्ण रेणके, दौलत भोसले, गं. बा. सरदार, चंद्रकांत घोरपडे हे काम करीत होते. त्यावेळी सर्वांनी एकत्र यावे म्हणून १९८३ मध्ये पिंपरी-चिंचवडला भटक्यांचे अधिवेशन घेण्यात आले व भटक्यांच्या चळवळीत काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांनी एकत्रित काम करावे असा सल्ला गं. बा. सरदार, चंद्रकांत घोरपडे यांनी दिला व सर्वजण एकत्र आले. १९८३ मध्ये भटक्या विमुक्त जातीजमाती संघटना महाराष्ट्र या संघटनेची स्थापना करण्यात आली. याकामामध्ये पार्थ पोळके यांनी मोठे सहकार्य केले. त्यांनतर भटक्यांच्या प्रश्नावरती मोर्चा, आंदोलने करायला सुरूवात झाली. पण भटके जाती नेमक्या किती, कोणत्या, त्यांचे प्रश्न काय, राहणीमान काय, त्यांची जात पंचायत कशी ? याची माहिती माने यांनाच नसल्यामुळे महाराष्ट्र भर फिरण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

## लक्ष्मण माने यांची भटक्यांची शोधयात्रा :-

अमेकिरेच्या फाय फौंडेशनच्या रक्कमेचा उपयोग भटक्यांचा शोध घेण्यासाठी केला. त्यावेळी माने यांना डॉ. राजेंद्र कुंभार व प्राचार्य डॉ. टी. एस. पाटील यांनी सहकार्य केले. 'विमुक्तायन' हे भटक्यांच्या संशोधनाचे पुस्तक लिहिले. त्याकामी त्यांची मदत झाली. एकूण महाराष्ट्रात भटक्या जाती किती ? पोट जाती किती ? त्यांचे व्यवहार कसे चालतात ? त्यांच्या रूढी परंपरा काय आहेत ?  त्यांच्या भाषा कोणत्या आहेत ? त्यांच्या विवाह पद्धती काय आहेत ? या सर्वांची माहिती मिळाली व संपूर्ण महाराष्ट्रभर फिर असताना भटक्यांच्या संघटनेची बांधणी केली. या काळातच त्यांनी अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. भटक्यांचे प्रश्न घेवून फिरत असताना अनेक कार्यकर्ते भेटले. त्यांना या लढयात सहभागी करून घेतले व भटक्यांचे संघटना बांधून भटक्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलने करायला सुरूवात केली. त्यानंतर शरद पवारांनी मदत केली. भटक्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी एका शिक्षण संस्थेची आवश्यकता आहे. म्हणून एक शिक्षण संस्था काढली.

## भारतीय भटके विमुक्त जातीजमाती संशोधन संस्था सातारा :-

लक्ष्मण माने यांनी १९८८ मध्ये भारतीय भटके विमुक्त जातीजमाती संशोधन संस्थेची स्थापना केली व त्या संस्थेच्या विविध शाळा, आश्रमशाळा काढण्यात आल्या. साताऱ्यात - २, सोलापूर - १, कोल्हापूर - १,पुणे येथे - १ अशा एकूण ५ आश्रमशाळा काढल्या व या आश्रमशाळेमध्ये भटक्यांची हजारो मुले दरवर्षी शिक्षण घेऊन बाहेर पडू लागली. ही शिकणारी पिढी पुढे कार्यकर्ते म्हणून त्यांच्या आंदोलनात आलेली दिसून येतात. भटक्यांचया प्रश्नावरती संशोधन व्हावे म्हणून यशवंतराव चव्हाण सामाजिक शास्त्र महाविद्यालय त्यांनी काढले. त्यामध्येही आज दरवर्षी १०० मुले समाजशास्त्राची पदवी घेवून बाहेर पडत आहेत व या कामी त्यांना मदत करीत आहेत.

## लक्ष्मण माने यांचे मनोगत :-

मी बाबासाहेब आंबेडकरांचा पाईक आहे. ते ज्या वाटेवरून गेले त्याच वाटेवरून मी जाणार आहे. त्यामुळेच मी धर्मांतराचा निर्णय घेतला व धर्मांतराची चळवळ सुरू केली. भटक्यांच्या कार्यकर्त्यांपुढे ही संकल्पना मांडली व काम करू लागलो. जाती अंताची लढाई आजपर्यंत लढतो आहे. महाराष्ट्रामध्ये सातारा जिल्हा वेगळा आहे. आज दलितांवर हल्ले होत नाहीत. अस्पृश्यता पाळली जात नाही. हे आमच्या पिढीने केलेल्या कामाचे यश आहे. ते धार्मिक, सामाजिक आहे.

पण राजकीय म्हणून आम्ही शुन्य आहोत. राजकीय दलित नेतृत्व जोडे उचलण्याचे काम करणारे प्रस्थापितांना हवे आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सोयीचे दलित नेतृत्व स्वीकारले. सत्ता संपली की ते दलित नेतृत्व रहात नाही. आम्हला स्वत:ची कोंडी फोडता येत नाही व आम्ही एकत्र येऊ शकत नाही. पुढची पिढी दुरुस्त करेल. आमच्या चुकांपासून प्रेरणा घेईल असे वाटते. हिंदू धर्मातील अहंकार हा रोग आहे.जरी आम्ही धर्मांतरीत झालो तरी अहंकार हा रोग जात नाही. आजही ब्राह्मणांना ब्राह्मण राहायचे आहे. अपघात झाल्यामुळे मला ४ वर्षे लेखन करता आले नाही. हजारो भटक्यांना बरोबर घेऊन धर्मांतर केले व बाबासाहेबांच्या बौद्ध धम्मात प्रवेश केला.

सातारा जिल्ह्यातील प्रश्न सुटले पाहिजेत. डॉ. आंबेडकरांच्या स्मारकाचा प्रश्न, भिमाबाई आंबेडकर स्मारकचा प्रश्न, कराड, शिरवळ येथील बौद्ध लेण्यांचा प्रश्न हे सोडविताना सर्वांनी संघटीत होऊन प्रयत्न केले पाहिजेत. आता वर्गीय पद्धतीचे संघटना हवे आहे. शेतमजूर, हमाल, मजूर यांची संघटना बांधणे गरजेचे आहे. भांडवली अर्थव्यवस्थेला व भांडवली लोकशाहीला विरोध केला पाहिजे. तो करायचा असेल तर वर्ण व जाती दोन्हींचे संघटन करणे आवश्यक आहे. ओबीसी (इतर मागासवर्गीय) यांच्या प्रेरणा फुले-आंबेडकर नाहीत. विस्थापित होणाऱ्या सवर्ण जाती आपल्याबरोबर येतील. पण सैन्यातच जर फंदफितूरी असेल तर लढाई यशस्वी होणार नाही. सैन्य निष्ठावान असले पाहिजे. डॉ. आंबेडकरांना डोक्यावर घेण्यापेक्षा डोक्यात घेतले पाहिजे. मी लढाईला तयार आहे तसे सर्वांनी विचाराने, एकनिष्ठपणे असले पाहिजे. त्याशिवाय ही क्रांतीची प्रक्रिया पुढे जाणार नाही.

## ३०. पार्थ पोळके यांच्या कार्याचा आढावा, सातारा २१/१/०८ दुपारी १२ वा.:-

पिढ्यानपिढ्या इथल्या व्यवस्थेने बळी घेतलेल्या लाचार, दुबळ्या व अस्पृश्य समजल्या जाणाऱ्य पूर्वश्रमीच्या महार समाजात पोळके यांचा जन्म झाला. महार व मातंग समाजाला असलेली जुनाट रूढ कल्पना म्हणजे मरिआईला सोडलेला पोतराज. अशा पोतराजाच्यापोटी त्यांचा जन्म झाला. अंगाभोवती चिंध्या गुंडाळून चाबकाचे फटके अंगावर मारणाऱ्या व आपल्या उघड्या देहाचे प्रदर्शन करीत भीक मागणाऱ्या कुटुंबात कोणताही वारसा नसताना पोळके हे या व्यवस्थेच्या विरोधात उभे राहिले. हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण घेत असतानाच त्यांना आंबेडकरी विचाराची माहिती झाली होती.

महाराष्ट्राच्या दलित चळवळीच्या इतिहासात एक लढावू अभ्यासू व्यक्तिमत्त्व व कृतिशील नेता म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. आपल्या कामातील आपल्या लेखनाने त्यांनी उभ्या महाराष्ट्राला हालवून सोडले आहे. केवळ ते साताऱ्यात राहात असल्यामुळे राज्यपातळीवरचे दलित नेते होऊ शकले नाहीत. ते सातारा जिल्ह्यापुरते मर्यादित राहिले. प्रा. अरुण कांबळे, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे, प्रकाश आंबेडकर यांच्या पाठोपाठ आज दलित चळवळीत त्यांचा उल्लेख केला जातो. पण प्रस्थापितांना आव्हान देत असताना जर दलित चळवळी हितसंबंधावर व वैचारिक भूमिकेपसून अलग होऊन काम करीत असतील तर ते पोळके सर यांना ते आवडलेले नाही व ते रिपब्लिकन गटापासून बाजूला झाले व त्यांनी स्वतंत्रपणे या जिल्ह्यात त्यांच्या नेतृत्वाखाली चळवळ उभी केलेली दिसून येते.

कारण डॉ. आंबेडकर जयंती आपल्या वस्त्यामध्ये साजरी करणे या व्यतिरिक्त कोणताच कार्यक्रम रिपब्लिकनवाद्यांकडे नव्हता. पोळके सर या जिल्ह्यात आल्यावर एक जहाल, बंडखोर स्वरूपाची समाजाला व कार्यकर्त्यांना दिशा मिळालेली दिसून येते. आज या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पोळके सर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली तयार झालेले कार्यकर्ते व नेते दिसून येतात. प्रस्थापित व्यवस्थेत त्याच ताकदीने, त्याच तीव्रतेने आजही पोळके सर विरोध करीत असलेले दिसून येतात. त्यामुळे त्यांनी केलेले दलित चळवळीतील योगदान महत्त्वाचे व महाराष्ट्रात दिशा देणारे आहे.

१९६० नंतर पुणे येथे युवक क्रांती दल स्थापन झाले. ग. प्र. प्रधान, एस. एम जोशी, ना. ग. गोरे हे समाजवादी नेते लोहियावादी होते. स्वातंत्र्यानंतर शिकलेल्या पिढीचा उदय झाला. धुळे जिल्ह्यात शहादा आंदोलन झाले. या आंदोलनाने वहारू सोनावणे, डॉ. कुमार सप्तर्षी, डॉ. भारत पाटणकर यांच्यासारखे कार्यकर्ते मिळाले व क्रांतीकारी समाजवादी चळवळीला सुरुवात झाली. त्यातून पुणे येथे डॉ. कुमार सप्तर्षी यांनी युवक क्रांतीदल (युक्रांद) ची स्थापना केली. त्यामधून अनेक तरुण कार्यकर्ते पुढे येवू लागले. डॉ. नरेंद्र दाभोळकर हे याच वातावरणात तयार झाले होते. त्यांनी मेडिकल शिक्षण पूर्ण केल्यावर ते साताऱ्याला आले व त्यांनी १९७०-७१ मध्ये साताऱ्यात समाजवादी युवक दल स्थापन केले व सातारमध्ये कामाला सुरुवात झाले. त्यामध्ये ५० ते ६० सवर्ण दलित कार्यकर्ते होते. याच दरम्यान १९७२ मध्ये मुंबई येथे दलित पँथरची स्थापना नामदेव ढसाळ, राजा ढाले या प्रमुखांनी केली. पण पँथरचे लोक मोठ्या शहरामध्ये होते. ती साताऱ्यात लवकर आली नाही. १९८५-८६ मध्ये साताऱ्यात दलित पँथर स्थापन झाले. त्यापूर्वी १९७४-७५ मध्ये साताऱ्यात दलित सेवा संघाची निर्मिती झाली होती. त्यामध्ये किशोर तपासे, भगवान अवघडे, अंकुश भिंगारदेवे, दिलीप ससाणे ही प्रमुख मंडळी होती. शिवाजी उदय मंडळ हे साऱ्यातील युवकांना खेळाचे मार्गदर्शन करण्याचे काम करीत होते. त्यांनीही काही प्रमाणात सामाजिक काम करण्यास सुरुवात केली होती. या सर्व पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यातून नोकरीच्या निमित्ताने पार्थ पोळके साताऱ्यात आले. त्यांचा आंतरजातीय विवाह झालेला आहे. कोल्हापूर येथे विद्यापीठात असतानाच त्यांनी समाज कार्य करण्यास सुरुवात केली होती. ते तब्येतीने पैलवान असल्यामुळे त्यांच्या शरीरयष्टीचा प्रभाव सर्वांवर पडत होता. त्यातून त्यांचे समाजवादी युवक दलात डॉ. दाभोळकरांच्या बरोबर काम करण्यास सुरुवात केली. त्यावेळी दलामध्ये डॉ.दाभोळकर, लक्ष्मण माने, किशोर बेडकिहाळ, प्रमोद कोपर्डे, दिनकर झिंब्रे, विजय मांडके, धनंजय कासकर, विकास ढाले, थोरात, जयंत उथळे ही प्रमुख मंडळी होती.

## समाजवादी युवक दलात पोळके सर यांचे कार्य :-

समाजवादी युवक दलाने साताऱ्यात काम करायला सुरुवात केली. त्यामध्ये झोपडपट्टीमध्ये वर्ग घेणे, ऊस तोडणी कामगार मुलांच्यासाठी शाळा काढणे, कॅनॉल खुदाई कामगार यांच्या

प्रश्नांसंदर्भात गाठीभेटी घेणे, अशी सुरुवातीला कार्यक्रमाचे स्वरूप होते. त्यामध्ये महत्त्वाचे उपक्रम खालीलप्रमाणे -

१. १९८७ मध्ये महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून सातारा ते महाड अशी एक सर्वेक्षणात्मक पदयात्रा काढण्याचे ठरले. या निमित्ताने सातारा, जावली, महाबळेश्वर, माण या परिसरातील समाजाचे सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न, विषमता किती आहे. याचे सर्वेक्षण करण्याचे ठरले व प्रमुख कार्यकर्ते व वसतीगृहातील काही मुले अशी २५-३० कार्यकर्ते चालत निघालो. एकूण १० दिवसांचा कार्यक्रम तयार केला व चालायला सुरुवात केले. त्यानंतर वरील काही प्रश्नांचा अभ्यास केला व लिखाण केले. त्यांची कार्यवाही आज होत आहे.

२. १९८९ मध्ये डॉ. बाबा आढाव यांनी पुण्यामध्ये एक कार्यक्रम दिलेला होता. ग्रामीण भागातील जातीयता कमी करावयाची असेल तर ‘एक गाव एक पाणवठा’ असला पाहिजे. तरच जातीयतेच्या भिंती दूर होतील. म्हणून समाजवादी दलाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी दोन महिने सर्व सातारा जिल्हाभर दौरे काढले. गावोगावी भेटी दिल्या. पाहणी केली. त्यांना असा निर्णय घेतला की सगळीकडे छुपा जातीयवाद चालू आहे. त्यासाठी प्रतिकार म्हणून कोरेगांव तालुक्यातील त्रिपुटी तळ्याचा सत्याग्रह करण्याचे ठरले. त्यावेळी ग्रामीण भागातील दलित कार्यकर्ते गडांकुश गुरूजी, मारूती रणवरे, डी. डी. दणाणे, ग. सा. कांबळे गुरूजी यांनी खूप मोठी मदत केली. त्या सत्याग्रहाला ४ ते ५ हजार दलित मंडळी आली होती. त्यावेळी डॉ. बाबा आढाव, भाई वैद्य, गेल ऑमव्हेट यांनी मार्गदर्शन केले. या संघटनात्मक नियोजनात पोळके सरांची अत्यंत महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्याबरोबर अनेक लहान मोठे कार्यकर्ते सहभागी झाले. सत्याग्रह झाला. भाषणे झाली व सत्याग्रहाला यश मिळाले.

## पोळके सर यांच्या नेतृत्वाखालील नामांतर चळवळ :-

औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी साताऱ्यात पोळके सर यांच्या नेतृत्वाखाली नामांतरवादी कृती समिती स्थापन करण्यात

आली. या निमित्ताने राखीव जागा जनजागृती करण्याचे आयोजन केले. संपूर्ण सातारा जिल्ह्यात प्रबोधन, प्रचार, प्रसार करण्यात आला. सातारा ते औरंगाबाद पर्यंत पायी चालत जाणे व तेथे आंदोलन करणे असे ठरले होते. २८ नोव्हेंबर १९७९ मध्ये साताऱ्यातील मातोश्री भिमाबाई आंबेडकर स्मारकावरून समता ज्योत घेवून गांधी मैदानापर्यंत पदयात्राकाढण्यात आली व सातारा, वाठार, लोणंद, साखरवाडी, जिंती, फलटण, बारामती, औरंगाबाद असा तो मार्ग होता. डॉ. बाबा आढाव व अरुण लिमये हे पुण्यावरून येणार होते. यावेळी प्रवासाला गेले असताना पार्थ पोळके यांच्या पत्नीचे बाळंतपण झाले होते व वडीलांचा मृत्यू झाला. कार्यक्रम उरकला की लगेच सर समता दिंडीत सहभागी झाले. पारनेर येथे सर्वांना अटक करण्यात आली व येरवड्याच्या जेलमध्ये ठेवण्यात आले.

अशा प्रकारे आंदोलने होत असताना डॉ. दाभोळकर, माने व इतर  तर पार्थ पोळके, विजय मांडके यांच्यात टोकाचे मतभेद झाले व पार्थ पोळके यांनी समता आंदोलन सुरू केले. पेढ्याचा भैरोबा येथे बैठक झाली व समाजवादी  युवक दलामध्ये फूट पडली. पार्थ पोळके व विजय मांडके यांनी समता आंदोलनामार्फत व कामास सुरुवात केली.

## पार्थ पोळके यांच्या नेतृत्वाखाली समता आंदोलनाचे कार्य :-

समता आंदोलनाने काम करण्यासाठी त्रिसूत्री बनविली होती. प्रबोधन, संघर्ष, रचनात्मक कार्य याप्रमाणे कामास सुरुवात केली. समाजवादी युवक दल, सत्यशोधक युवा संघटना, समता युवक संघटना, समाजवादीआंदोलन या सर्वांचे एकत्रीकरण करण्यात आले व दलित भटक्या समाजाच्या प्रश्नासाठी लढे उभे करावेत असे ठरले. महाराष्ट्राचे कार्यवाह म्हणून एक लढाऊ नेता म्हणून पार्थ पोळके यांची निवड करण्यात आली.  समता आंदोलनाचा संगमनेर येथे एक मेळावा झाला. त्यानंतर माने - डॉ.दाभोळकर व पोळके-मांडके असे विभाजन झाले व पोळके, मांडके यांनी समता आंदोलनाच्या माध्यमातून लढे उभारायला सुरुवात केली.

१. अपशिंगे ता. सातारा येथील मातंग महिलेवर गावातील सवर्ण गुंडाकडून बलात्कार झाला, त्यावेळी त्यांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले.

२. सरताळे ता. जावली येथील भिसे बंधूंची घरे पेटवण्यात आली. गावाने बहिष्कार टाकला. त्यावेळी सारे गावकरी तुरुंगात टाकले व भिसे यांना न्याय मिळवून दिला.

३. बोरगांव, ता. सातारा येथील भिसे खून प्रकरण झाले. ज्यावेळी भिसेचा गावातील सवर्णांनी खून केला. तेव्हा त्याची दोन मुले तेथे हजर होती. त्यांनी ती घटना पाहिली होती. पण त्या दोघीही मुक्या होत्या. त्यांना बोलता येत नव्हते. म्हणून पोळके सरांनी साताऱ्यात या घटनेतूनच प्रेरणा घेवून मूकबधीर शाळा सुरू केली.

४. दुष्काळात सोलापूर केज जिल्ह्यातील अनेक कुटूंबे जीवन जगण्यासाठी इकडे आली होती. ती कॅनॉल खुदाईचे काम करीत होती. त्यांना वेठबिगार सारखी राबवली जात होती. त्यांचे संघटन केले. त्यांची वेठबिगारीतून सुटका केली व त्यांच्यासाठी लक्ष्मीबाई झोपडपट्टीत त्यांना जागा मिळवून दिली. कामगारांच्यासाठी १५ दिवसांचे शिबीरे घेतली. त्यांना प्रशिक्षण दिले.

५. वडार, होलार समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या मुलांचे आर्थिक पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी कूपर कंपनीमधील लाल बावटा यांचा संप मोडून काढला व अनेक दलित मुलांना नोकऱ्या मिळवून दिल्या.

६. रयत शिक्षण संस्थेतील महाविद्यालयीन वसतीगृहातील मुलांची राहण्याची गैरसोय होती. इमारत दुरुस्त नव्हती. तसेच भाडे वाढवले होते. त्यावेळी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनादिवशी १५० मुले-मुली यांना घेवून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. ३ दिवस आंदोलन सुरू होते. त्यावेळी मा. शरद पवार व बबनराव बडदरे यांनी मागण्या मान्य केल्या व उपोषण सोडवले.

७. डॉ. आंबेडकरांच्या आईचे निर्वाण साताऱ्यात झाले. भिमाबाई आंबेडकर यांची साताऱ्याची जागा मिळावी व तेथे त्यांचे स्मारक उभे करावे म्हणून फार मोठे जन आंदोलन केले. संपूर्ण सातारच्या जिल्ह्यातील लोक १५ दिवस आंदोलन करीत होते. त्यामध्ये सातारा व कोरेगांव तालुक्यातील लोक जास्त होते. त्यांचे चक्री उपोषण चाललेले होते व काही जागा ताब्यात घेतली व छोटे विहारबांधले. महामाता भिमाबाई आंबेडकर समता प्रतिष्ठान स्थापन करण्यात आले.

८. सातारा शहरामध्ये डॉ. आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतहा उभा करावा म्हणून नगरपरिषदेकडे मागणी

केली. जुन्या नगरपालिकेसमोर आठ दिवस उपोषण केले व प्रमुख ३ मागण्या मान्य करून घेतल्या.

अ) यशवंत उद्यानातील जागा पुतळ्याला द्यावी.

ब) सातारा शहरातील खालच्या रस्त्याला डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील पथ नाव द्यावे.

क) सातारा शहरातील दलित वस्त्यांचा पुन्हा आराखडा तयार करावा.

ही सर्व आंदोलने होत असतानाच दलित पँथरचा जोर वाढत होता व दलित कार्यकर्ते व पोळके सर यांच्यात मतभेद सुरू होते. तरीही पोळके सर यांनी आपला संपूर्ण जिल्ह्यावर जम निर्माण केला होता. त्यांचे व मुंबईचे नेतृत्व यांच्यात वैचारिक व नेतृत्वाचा फरक होता. त्यामुळे १९८६ मध्ये समता आंदोलनातून काही दलित कार्यकर्ते बाहेर पडले व त्यांनी भारतीय दलित पँथरची स्थापना केली. त्यामध्ये किशोर तपासे, अमर गायकवाड, अशोक भोसले, अशोक गायकवाड, महेंद्र खरात, संजय गायकवाड, चंद्रकांत अहिवळे ही प्रमुख मंडळी होती.

पोळके सर हे शिक्षण संस्थेच्या उभारणीत गुंतल्यामुळे त्यांच्या कामाचा वेग कमी झाला. तरीही त्यांनी संघटन चालू ठेवले व १९९० मध्ये समता आंदोलन बरखास्त करून भिमसेनेची निर्मिती केली. यावेळी प्रा. अरुण गाडे हे जिल्हा अध्यक्ष होते. भिमसेनेने जिल्ह्यात पँथरपेक्षाही आपला दरारा निर्माण केला होतो. कारण भिमसेनेत मराठी, माळी, होलार, मातंग, चर्मकार, रामोशी, महार अशी विविध जातीतील कार्यकर्ते सहभागी झाले होते. पुढे दलित ऐक्य झाले व सर्व संघटना बरखास्त करून रिपब्किन पार्टीचे ऐक्य झाले. पोळके सरांनी भिमसेना विलीन केली. पण नेतृत्वावरून वाद झाले. पुन्हा रिपब्लिकन पक्षाचे गटात रुपांतर झाले व पोळके सरांनी पुन्हा भिमसेनेची निर्मिती केली व कामास सुरुवात केली. पण भिमसेनेचे जिल्हाध्यक्ष यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला. त्यानंतर भिमसेना हळूहळू कमी होत गेली. पोळके सरही स्वत: रिपब्लिकन पक्षात गेले व पुन्हा भिमसेना बरखास्त झाली. पण रिपब्लिकन पक्षाच्या वैचारिक मंथनात त्यांना पटले नाही व स्वतंत्रपणे ते काम करू लागले. पुढे त्यांनी बहुजन समाज पार्टीत प्रवेश केला. पुन्हा त्यातून बाहेर पडले. आज ते विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. अनेक वैचारिक ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत.

पोळकें सरांसारखा दलित चळवळीला एक लढाऊ  बुद्धिमान व वैचारिक जाण असलेला नेता मिळाला होता. पण त्यांना कार्यकर्ते टिकवता आले नाहीत. त्यांनी जास्त लक्ष आपली संस्था, मूकबधीर मतिमंद शाळा यामध्ये वेळ घालवला व त्यांचे राजकीय संबंध हे मा.शरद पवारांच्या बरोबर असल्याने त्यांनी ठोस भूमिका घेतली नाही. त्यामुळे आज केवळ वैचारिक अस्तित्व म्हणून ते आहेत. दलित चळवळीत आज त्यांना मान्यता नसलेली दिसून येते.

आंबेडकरी चळवळीत पोळके-माने हे दोन्ही विचारवंत कृतिशील नेते साताऱ्यात उभे राहिले. त्यांनी दलित भटक्यांची चळवळ वाढविली. पण या दोघांचीही जडणघडण निखळ आंबेडकरवादी नव्हती तर ती समाजवादी होती. त्यामुळे ते दोघेही सतत दलित चळवळीच्या प्रवाहाबरोबर जास्त काळ राहिले नाहीत व स्वतंत्र अस्तित्वही निर्माण केले नाही.  लक्ष्मण माने यांचा आधार शरद पवार सोडला तर ते कोलमडल्याशिवाय राहणार नाहीत. पोळके सर तर सध्या विद्रोही व स्वत:च्या व्यक्तिगत बाबींमध्ये इतके अडकले आहेत, त्यामुळे सातारा जिल्ह्यात दलित चळवळ ते आज उभी करू शकत नाहीत. दलित कार्यकर्त्यांचा त्यांच्यावरचा विश्वास डळमळीत झाला आहे. तरीही त्या दोघांचे दलित चळवळीतील योगदान नाकारता येत नाही.

अशा प्रकारे सातारा जिल्ह्यामध्ये विविध राजकीय पक्ष, संघटना काम करीत होत्या. महाराष्ट्रातील आर.पी.आय.च्या गटातून आठवले गट या जिल्ह्यात प्रभावी होता. तर प्रकाश आंबेडकर गट जिल्ह्यात बांधणी करीत होता. परंतु बरेच कार्यकर्ते, नेते बसपामध्ये गेल्यामुळे आठवले गट खिळखिळा झाला. त्यानंतर दलित कार्यकर्त्यांनी पक्षस्तरावरती काम न करता विद्रोही सांस्कृतिक चळवळ, डॉ. आंबेडकर स्मारक समिती, संत रोहिदास सामाजिक संस्था, कास्ट्राईब कर्मचारी संघटना, भिमशक्ती अशा विविध संघटनेत हे कार्यकर्ते विखुरले. त्यामुळे येथे कोणताही राजकीय पक्ष ताकद उभी करू शकला नाही. पार्थ पोळके व लक्ष्मण माने यांचे राष्ट्रवादीशी असलेले सख्य त्यामुळे दलित कार्यकर्ते त्यांच्या जवळ टिकले नाहीत व या जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना आर्थिक आधार नसल्याने व काही कार्यकर्ते नोकरीत अडकल्याने दलित चळवळ समाजाच्या प्रश्नापासून बाजूला गेले. पण वैचारिकदृष्ट्या येथील कार्यकर्ते आजही सक्षम असलेले दिसून येतात.

**सारांश :-** रिपब्लिकन पक्षाचे विविध गट दलितांच्या न्याय हक्कासाठी निर्माण केलेल्या स्थानिक चळवळी, बहुजन समाज पक्ष, विविध परिवर्तनवादी संघटना अशा विविध चळवळीने सातारा जिल्ह्यातील दलित चळवळ वाढवलेली दिसून येते. काही कृतिशील नेते होते तर काही प्रबोधनातून समाजाला जागृत करणारे विचारवंतही या जिल्ह्यातील दलित चळवळीत होते. डॉ. आंबेडकरांच्या चळवळीत काम केलेल्या पण त्यांच्या भाषणाने प्रभावित झालेल्या जुन्या पिढीतील काही कार्यकर्त्यांच्या मुलाखतीमधून दलितांच्या प्रश्नांची व ते प्रश्न सोडविण्यासाठीची मदत होते आहे.

१९७२ नंतर या जिल्ह्यात दोन कृतीशील कार्यकर्ते उभे राहिले. व त्यांनी या जिल्ह्यात दलित व भटक्या जातीजमाती यांच्यामध्ये कार्यकर्ते उभे करण्याचे काम केले. लक्ष्मण माने व पार्थ पोळके या दोघांनी महाराष्ट्र स्तरावरती असलेले दलित नेतृत्व या जिल्ह्यात स्थिर होऊ शकले नाही. हे दोन्हीही नेते कार्यकर्ते, लेखक, विचारवंत व संघटन कौशल्य असलेले होते. या जिल्ह्यात त्यांनीच खऱ्या अर्थाने दलित चळवळ वाढवलेली दिसते. या जिल्ह्यातच महाराष्ट्राला वैचारिक दिशा देणारे डॉ. आ. ह. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभलेले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राची अंधश्रद्धेतून मुक्तता करणारे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर हे देखील या जिल्ह्यातील आहेत. याच जिल्ह्याने कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक विचार प्रथम स्वीकारला व महात्मा फुले यांचा वारसा जपलेला आहे.

या जिल्ह्यातील रिपब्लिकन पक्षाची चळवळ आज वेगाने वाढलेली आहे. मात्र स्थानिक चळवळी, संघटना मोडकळीस आलेल्या आहेत. आंबेडकरी विचारांच्या उद्दिष्टांच्या दिशेने आज दलित चळवळ जात नसल्यामुळे दलितांच्या सामाजिक , आर्थिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक प्रगतीमध्ये पाहिजे तेवढा वेग येत नसलेला दिसून येतो.या जिल्ह्यात अनेक क्षेत्रातील दलित कार्यकर्ते काम करीत आहेत. फुले - शाहू - आंबेडकरी विचार त्यांनी जिवंत ठेवला आहे. त्यामुळे दलितांवर होणारे अन्याय अत्याचार यांचे प्रमाण कमी आहे. तसेच जातीयवादी भूमिका घेणारे संघटना पक्ष यांच्यावरतीही दलित चळवळीतील काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा प्रभाव आहे. पण बदलत्या आर्थिक, राजकीय प्रश्नाबाबत जागरूकता नाही. धम्माचे चिंतन आढळून येत नाही. केवळ प्रतिक्रीयावादी चळवळी झालेल्या आहेत.

## संदर्भ सूची


१. अशोक उबाळे - यांच्याकडील डॉ. आंबेडकरांनी पाठविलेले पत्र.

२. बहिष्कृत भारत अंक १९४०.

३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समग्र भाषण - खंड १, संपा. प्रदिप गायकवाड, पृ. २९

४. उक्त.

५. आर. पी. कांबळे यांची मुलाखत.

६. ग. सा. कांबळे यांची मुलाखत.

७. नामदेव भिकू बनसोड यांची मुलाखत.

८. अशोक (आण्णा) उबाळे यांची मुलाखत.

९. भगवानराव अवघडे - दलित सेवा संघ यांची मुलाखत.

१०. जयंत उथळे - राष्ट्रसेवक क्रांती दल.

११. महादू गेनू आढाव यांची मुलाखत.

१२. किशोर तपासे - भारतीय दलित पँथर यांची मुलाखत.

१३. प्राचार्य डॉ. अरुण गाडे - भिमसेना यांची मुलाखत.

१४. अशोक गायकवाड - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांची मुलाखत.

१५. गौतम वाघमारे - भारतीय रिपब्लिकन पक्ष (प्रकाश आंबेडकर गट) यांची मुलाखत.

१६. वर्षा देशपांडे - युक्रांद - दलित महिला विकास आघाडी यांची मुलाखत.

१७. वामनराव मस्के - रयत महासंघ यांची मुलाखत.

१८. बापूराव जगताप - दलित सेना यांची मुलाखत.

१९. अमर गायकवाड - क्रांती कल्चरल ॲकॅडमी यांची मुलाखत.

२०. विजय येवले - दलित पँथर, फलटण यांची मुलाखत.

२१. दत्ता अहिवळे - सामाजिक कार्यकर्ते यांची मुलाखत.

२२. चंद्रकांत खंडाईत - डॉ. आंबेडकर स्मारक समिती यांची मुलाखत.

२३. बाळासाहेब रणपिसे - मास मुव्हमेंट यांची मुलाखत.

२४. नारायण जावलीकर - भटक्या जाती जमाती संघटना यांची मुलाखत.

२५. प्रशांत चव्हाण - बहुजन समाज पक्ष यांची मुलाखत.

२६. भगवान गडांकुश - त्रैलोक्य बौद्ध सहाय्यक महासंघ यांची मुलाखत.

२७. सिद्धार्थ खरात - मुक्तीवादी युवा संघटन यांची मुलाखत.

२८. प्रा. मच्छिंद्र सकटे - दलित महासंघ यांची मुलाखत.

२९. लक्ष्मण माने यांची मुलाखत.

३०. पार्थ पोळके यांची मुलाखत.

३१. बंद दरवाजा (साप्ताहिक) अंक २००१.

३२. दै. ऐक्य - १९७८.

३३. दै. पुढारी - १९९०.

३४. दै. ग्रामोद्धार - १९७५.

३५. दै. लोकमत - २००२.

३६. दै. पुण्यनगरी - २००६.

३७. बहिष्कृत (पाक्षिक), संपा. विजय मांडके

३८. क्रांती (साप्ताहिक), संपा. विजय मांडके

-----×----

# प्रकरण – ८

# उपसंहार

जगामध्ये मानवी जीवन सुरू झाले तेव्हापासून विविध प्रकारे मानव आपले प्राबल्य इतर मानव जातीवर प्रस्थापित करताना दिसतो आहे. सुरुवातीच्या काळात लैंगिक शोषणांसाठी दुर्बल मानवांच्या स्त्रियांना पळवून नेणे व त्यांचा उपभोग घेणे अशी मानवी प्रवृत्ती असलेली दिसून येते. मानवाचा विकास होवू लागला. त्यांचे रूपांतर विकसित मानवामध्ये होवू लागले. तरीही मानवी कळपावर सत्ता गाजविण्याची त्याची प्रवृत्ती असलेली पहायला मिळते. पुढे हजारो वर्षानंतर विविध देश अस्तित्वात आले. विविध खंडामध्ये देश विभागले गेले. मागासलेल्या देशात मानवी जाती जंगलामध्येच जीवन व्यतीत करू लागल्या. तर पुढारलेल्या देशात बदलाची प्रक्रिया घडू लागली. हळूहळू मानवाने विचारांची प्रगती करायला सुरुवात केली. आणि तो विज्ञानवादी अंगाने विचार करू लागला. त्यामधून विविध शोध लागलेले दिसून येतात. या वैज्ञानिक प्रगतीचा परिणाम औद्योगिक क्रांतीत झाला आणि आज हाच मानव अस्तित्वात असलेल्या विश्वावर अधिराज्य करू लागला आहे. पण एकीकडे प्रचंड वेगाने ही प्रगती होत असतानाच जगातील काही देश मात्र आधुनिकतेपासून आजही दूरवर असलेले दिसून येतात. त्यातील आशिया खंडातील लोकसंख्येच्या बाबतीत मात्र आघाडीवर असलेला आपला भारत देश दिसून येतो. या देशात शास्त्रज्ञ जन्माला आले नाहीत किंवा घडले नाही तर दैववादाच्या मागासलेपणाच्या कल्पना घेवून आज या देशात हजारो ढोंगी महाराज जन्माला आलेले दिसून येतात.  डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ‘या देशाला अनुकरणाचा संसर्ग झालेला आहे.’

या देशात विचारवंत, शास्त्रज्ञ, जन्मालाच येवू दिले जात नाही कारण इथली व्यवस्था धर्म, रूढी, परंपरा यांनी बंदिस्त केली आहे. त्याचे अपत्य म्हणूनच या देशात वर्णव्यवस्थेतून साडेसहा हजार जाती निर्माण झाल्या. एका जातीला दुसऱ्या जातिविरोधी द्वेष, मत्सर करायला शिकवण्यात आले. त्यामुळे या देशाला प्राचीन काळापासून परकीयांनी लुटले.  याबाबतीत या देशातील समूहांना काहीच वाईट वाटले नाही. उलट एक जात दुसऱ्या जातीला संपविण्यासाठी परकीय शत्रूला मदतच करीत होती. त्यामुळे परकीयांनी हा देश पूर्णपणे उपभोगला. या देशात

वर्चस्ववादी समाजरचना तयार केली.  आणि त्यातील एकच उच्च जात ब्राह्मण (वर्ण) सर्वच जातीवर हजारो वर्ष अन्याय अत्याचार करीत राहीला. या मागासलेल्या जातींनी विरोध करू नये म्हणून त्यांचे शिक्षणाचे व लढ्याचे हक्क नाकारले. आणि त्यांना लाचार गुलाम करून टाकले. धर्मग्रंथामध्ये नितीनियम तयार केले व ते चतुरपणे हुशारीचा आव आणत शोषण करू लागले. वर्चस्व कायम रहावे म्हणून पापपुण्याच्या संकल्पना अज्ञानी लोकांच्या डोक्यात उतरवल्या व 'ठेविले अनंते तैसेची रहावे मुखी असू द्यावे समाधान' या प्रमाणे अन्याय अत्याचाराला स्वत:चे सुख मानायला शिकवण्यात आले. अन्याय अत्याचाराचे उदात्तीकरण करण्यात आले. हा देश विशाल निसर्गसौंदर्य असलेला पण या जातीधर्माच्या आघाताने निवडुंगासारखा भग्न झाला. म्हणूनच या समाज व्यवस्थेला नाकारणासाठी या धर्मव्यवस्थेची चिकित्सा करण्यासाठी अनेक महान माणसे या देशात जन्माला आली. पण इथल्या व्यवस्थेने त्यांना कधी गिळंकृत केले हे त्यांनाही समजले नाही. मात्र २० व्या शतकात या व्यवस्थेला बदलवून टाकणारा आधुनिक महामानव जन्माला आला व त्याने इथल्या व्यवस्थेला आव्हान दिले. मानवतावादी भूमिकेतून आपण सारे एक आहोत असा संदेश दिला. जेव्हा तो संदेश नाकारला तेव्हा मात्र त्यांनी मानवमुक्तीसाठी संग्राम पुकारला व त्यात यश मिळविले. या देशातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्मव्यवस्था नाकारून एक नवा पर्याय दिला. तो म्हणजे भारतीय राज्यघटना होय.

भारतीय राज्यघटनेने समान मानवी मुल्ये प्रस्थापित केली. पण सामाजिकरित्या आर्थिक दृष्ट्या, धार्मिकदृष्ट्या समान तत्त्व अंमलात आणले गेले नाही. डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या काळात व्यवस्था परिवर्तनासाठी समग्र क्रांती हा मंत्र दिला होता. पण अचानक त्यांचे महानिर्वाण झाल्यामुळे ही क्रांती अधूरी राहिली. त्यांच्या वारसदारांनी ही उरलेली क्रांती करावी असा मानस होता. पण डॉ. आंबेडकरांच्या नंतर दलित चळवळीचे उदात्त ध्येय असलेले नेतृत्व लाभले नाही. त्यामुळे परिवर्तनाचे चक्र फिरण्याचे थांबले. इथली धर्म  व्यवस्था जातीजमातीच्या विरोधात रणशिंग फुंकणाऱ्यांना गारद करते हा फार जुना इतिहास आहे. दलित चळवळीत नेत्यांना अंतिम उद्दिष्टाचे भान राहिले नाही. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर लगेच सामूहिक नेतृत्वाची चळवळ सुरू झाली. रिपब्लिकन पार्टी स्थापन केली पण ती एका वर्षातच फुटली. आघाडी कोणाबरोबर करावी यावरून

मतभेद झाले. दलित समूह अजून आहे तिथेच होता. पण मतलबी राजकारण करणारे व स्वार्थी मंडळींच्या हातात आंबेडकरी चळवळ आली आणि त्यांनी स्वत:चा स्वार्थ साधला. काँग्रेसबरोबर आघाडी करून प्रथमता दादासाहेब गायकवाड यांनी फार मोठी अक्षम्य चूक केली. तेव्हापासूनच दलित चळवळ प्रस्थापितांच्या आश्रयाला गेलेली दिसून येते. ५२५ लोकसभेच्या जागा होत्या. त्यातील संपूर्ण भारतातून आर. पी. आय. ला फक्त १ जागा मिळली व तिही पाडण्यात आली. राजकीय परिस्थिती अशी होती तर सामाजिक प्रश्नाकडे लक्ष द्यायला आर. पी. आय. च्या नेत्यांना वेळच नव्हता. स्वातंत्र्यानंतर दलितांना वाटले आपले प्रश्न आता सुटणार आहेत. पण काहीच बदल झाला नाही. दलित नेतृत्व मात प्रस्थापितांच्या वळचणीला जावून विकले गेले. समुदाय आहे तिथेच होता. भूमिहीनांचा एक सत्याग्रह सोडला तर सर्वांगिण परिवर्तनासाठी आर. पी. आय. च्या नेत्यांनी काहीच केले नाही. काँग्रेसबरोबर जाणारे व काँग्रेसला विरोध करणारे तर काही जण काँग्रेसमध्ये विलिन झालेले. इतके विदारक चित्र डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर निर्माण झाले. इथल्या राज्यव्यवस्थेला सुरुंग लावावा व ती राज्य व्यवस्था ताब्यात घ्यावी अशी विशाल दृष्टी दलित नेतृत्वाला नव्हती. या सर्व पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील दलित समाज मोठ्या संख्येने शहरात आला होता. व तो किड्या मुंग्याप्रमाणे जीवन जगत होता. बकाल झोपडपट्ट्या निर्माण झाल्या होत्या. तरीही तो समूह निळ्या झेंड्याला विसरला नव्हता. जयभिमचा नारा दिला की तो घरदार विसरून रस्त्यावर येत होता. एवढा क्रांतीवादी समूह जगाच्या पाठीवर कोणत्याच देशात नाही. पण भानावर नसलेले नेते, उदासीन कार्यकर्ते त्यामुळे ग्रामीण भाग तर जुलूम जबरदस्तीने भयभीत होता. त्यांचेही कोणीच वाली नव्हते. सत्तेच्या राजकारणात दलित नेतृत्व विकले गेले होते. अशा वेळी शिकलेली तरुण पिढी विचार करायला लागली. लिहायला लागली व व्यवस्थेला प्रश्न विचारू लागले. आमचा वाटा कुठं हाय हो ? विद्रोही कथा, कविता, आत्मकथन झपाट्याने बाहेर येवू लागले. दलितांचे, स्त्रियांचे विदारक चित्र समाजासमोर येवू लागले. त्यातूनच मुंबईमध्ये दलित पँथरची निर्मिती झाली.

कोणतीही चळवळ निर्माण करताना नेतृत्व ही विशाल असले पाहिजे. विद्रोहाची भाषा, हाणामारीची भाषा करत असताना नवनिर्मिती करता आली पाहिजे. पँथरने समाजाचा स्वाभिमान

जागृत केला. यापुढे अन्याय आम्ही सहन करणार नाही असा आक्राळविक्राळ आरोळ्या होवू लागल्या. आंबेडकरी चळवळीचे नेतृत्व आता एका नव्या पिढीकडे आले. त्यांनी आवाज दिला की महाराष्ट्र ढवळून निघत होता. आता अन्याय सहन करायचे दिवस संपले आहेत. अन्याय अत्याचाराचा बदला घेतल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही. अशा वल्गना केल्या व हळूहळू दलित सवर्ण यांच्यात तेढ वाढून त्यांचे परिवर्तन दंगलीत झालेले दिसून येते. प्रस्थापितांनी हेही हेरुन ठेवले व नेतृत्वात आपआपसात वैचारिक मतभेद व्हायला लागले. याला जेवढे जातीयवादी जबाबदार आहेत तेवढेच समाजवादीही जबाबदार आहेत. त्यातूनच पँथर फुटली. मास मुव्हमेंट, भारतीय दलित पँथर, भारीप, बहुजन महासंघ, बसपा हे महत्त्वाचे राजकीय पक्ष म्हणून उदयाला आले. प्रकाश आंबेडकरांना बाबासाहेबांचे नातू म्हणूनही दलित समाजाने स्विकारलेले दिसून येत नाही. म्हणून त्यांनी इतर मागासलेल्या वर्गांना बरोबर घेतले व राजकारण सत्ता हातात घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना आंबेडकरवाद्यांनीच विरोध केला. म्हणजे दलितांच्यात आता अंतर्गत संघर्षाला सुरुवात झाली. नामांतरासारखा प्रश्न सोडविण्यासाठी हजारो दलितांचे संसार धुळीला मिळाले. भावनिक प्रश्न निर्माण करून किती काळ दलितांना रस्त्यावर आणायचे याचे दलित नेतृत्वास भानच राहिले नाही.

दलित चळवळ म्हणजे प्रतिक्रिया देणारी चळवळ असेच गणित झाले. राज्यपातळीवरील ही परिस्थिती जिल्हा व गावपातळीवर येऊन पोहचली होती. पँथरने प्रचंड बंडखोरपणा दलितांना दिला. पण कोणते प्रश्न किती ताणावे व कधी सोडावे याचे भान राहिले नाही. त्यामुळे नामांतरासारखा लढा लढविण्यासाठी दोन दशक संघर्ष करावा लागला. ही चळवळ जाती अंताची होती. पण नेत्यांना त्या दिशेने ही चळवळ नेता आली नाही. नामांतराचा प्रश्न सुटला की दलितांचे सर्व प्रश्न सुटतील असे वातावरण भासवण्यात आले व दलित चळवळ मुख्य प्रश्नापासून बाजूला गेली व एकमेव नामांतराच्या प्रश्नांभोवतीच फिरत राहिली. राज्यसत्ता हे सर्व प्रश्न सोडविण्याचे केंद्र आहे. म्हणून आपल्या पक्षाबरोबर इतर मागासवर्गीयांना आणण्यासाठी बहुजन महासंघाचा यशस्वी प्रयोग केला. तोच महाराष्ट्राच्या राजकारणात अकोला पॅटर्न म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांनी अकोला लोकसभा, तेथील इतर विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यामध्ये यश

मिळविले. हाच राजकीय प्रयोग रामदास आठवले, रा. सु. गवई, जोगेंद्र कवाडे, नामदेव ढसाळ यांनी इतर जिल्ह्यात राबवला असता तर दलित मते विकली गेली नसती. या सर्वांनीच दीर्घकाळ काँग्रेस, राष्ट्रवादीबरोबर आघाड्या करून स्वत: व्यक्तिगत सत्तेत राहिले. पण त्यांना दलितांचे प्रश्न सोडविता आले नाहीत. याउलट त्यांनी भारिप, बहुजन महासंघ व बहुजन समाज पक्ष यांनाच प्रस्थापितांच्या बाजूने जावून सत्तेपासून दूर ठेवले. याचाही परिणाम दलित कार्यकर्त्यांवर झाला. दलित चळवळीला सतत राजकारणात अपयश आल्यामुळे व दलित नेतृत्वाने याची दखल न घेतल्यामुळे अनेक कार्यकर्ते, नेते प्रस्थापित पक्षामध्ये जावून स्थिर झाले व त्यांनी आपला सर्व बाजूंनी व्यक्तिगत उत्कर्ष केला. मात्र बहुसंख्यांक दलित समाज आहे तेथेच राहिला व व्यवस्थेचा बळी होत गेला. या सर्व घडामोडी होत असतानाच देश पातळीवर दलित समाजातील एक नवे नेतृत्व उदयास आले. ते म्हणजे बहुजन समाज पक्षाचे अध्यक्ष कांशीराम होय.

महाराष्ट्रामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीला सर्वच बाजूंनी अपयश आल्यामुळे व ही चळवळ राजकारणापुरती मर्यादित राहिल्यामुळे या चळवळीत बौद्धेतरांना समाविष्ट न केल्यामुळे कांशीराम यांनी उत्तरप्रदेशात दलित, ओबीसी, अल्पसंख्यांक यांना संघटीत करून आपली राजकीय ताकद वाढविली. काँग्रेस व भाजप हे दोन्ही पक्ष जातीयवादी आहेत असे समीकरण मांडून जयभिमचा नारा देत उत्तरप्रदेशची सत्ता आपल्या ताब्यात घेतली. उत्तरप्रदेशाप्रमाणेच इतर राज्यातही दलितांची संघटीत शक्ती वाढवली व यश मिळविले. पण महाराष्ट्रात ते यशस्वी झाले नाहीत. कारण महाराष्ट्रातील रिपब्लिकन पक्षाचे व दलित चळवळीचे सर्वच गट काँग्रेस-राष्ट्रवादी बरोबर अडकले होते. तरी महाराष्ट्रातील शिकलेला मध्यमवर्गीय दलित समाज बहुजन समाज पक्षाकडे आकृष्ट झाला. पण भावनिक प्रश्नांत अडकलेल्या बहुसंख्यांक दलित समाज बीएसपीच्या विकास मुद्द्याकडे आला नाही. त्यामुळे त्यांना महाराष्ट्रात यश आले नाही.

महाराष्ट्रातील दलित, साहित्यिक, विचारवंत यांनीही रिपब्लिकन चळवळीची मीमांसा केली नाही. ते सुद्धा काँग्रेस, राष्ट्रवादीच्या प्रेमात अडकून राहिले. त्यामुळे त्यांनीही स्वाभिमानी आंबेडकरवाद निर्माण केला नाही. ते सुद्धा प्रस्थापित सत्तेतील भागीदारी मिळविण्यासाठी स्पर्धा करीत होते. अशाप्रकारे राज्यपातळीवर दलित चळवळीचे विस्थापन झालेले दिसून येते.

सातारा जिल्ह्यात वरील सर्वच दलित चळवळीचे लोण आलेले होते. मात्र रामदास आठवलेंच्या गटाचा फार मोठा प्रभाव सातारा जिल्ह्यावरती होता तरीही साताऱ्यातील दोन दलित नेत्यांनी आंबेडकरी चळवळ सर्व जाती-जमातींच्या घरापर्यंत पोहचविण्याचे फार मोठे काम केले. या दोन्हीही नेत्यांच्या चळवळी स्वतंत्रपणे कार्यरत होत्या. सुरूवातीला लक्ष्मण माने व पार्थ पोळके यांनी राष्ट्र सेवा दल, समाजवादी युवक दल, समता आंदोलन या समाजवाद्यांच्या चळवळीत काम केले व त्यांची जडणघडण समाजवाद्यांमध्येच झाली. त्यामुळे दोघेही निखळ आंबेडकरवादी होवू शकले नाहीत. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत काँग्रेस, राष्ट्रवादी धार्जिणे काम केले. मात्र सातारा जिल्ह्यात खऱ्या अर्थाने दलित चळवळ या दोघांनीच रूजवलेली दिसून येते.

पार्थ पोळके सर यांनी भिमसेनेच्या माध्यमातून सातारा जिल्ह्यात दलित चळवळ पुढे आणली. राज्य पातळीवरील दलित नेतृत्वाने भावनिक लढे उभारले आहे. त्याला पर्याय म्हणून दलितांच्या रोजच्या व्यावहारिक प्रश्नांवर पोळके सर यांनी लढे उभे कले. दलित शेतकरी संघटना विस्थापित झालेले दलित धरणग्रस्त, गुंडगिरी करणारे दलित कार्यकर्ते यांना पार्थ पोळके यांनी नवा रस्ता दाखवला. त्यांचे संघटन केले. त्यांच्या प्रश्नावरती आवाज उठवला. त्याचबरोबर जातीयवादाच्या प्रश्नांवर पँथरपेक्षाही आक्रमकपणे भिमसेनेचा कार्यकर्ता उतरवला. त्यामुळे या जिल्ह्यात दलित नेते म्हणून पार्थ पोळके यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली. ते डॉ. आंबेडकरांच्या जातीअंताच्या विचाराशी एकनिष्ठ होते. म्हणून त्यांनी दलित चळवळ नवबौद्धांपुरतीच मर्यादित न ठेवता सर्व जाती-जमातीपर्यंत ही चळवळ पोहोचविली. समाजातील मूक-बधीर, मतिमंद मुलांनाशिक्षण देण्यासाठी संस्थात्मक कामही केले. पुढे ते इतर राजकीय पक्षात गेले तरी तेथे रमले नाहीत व विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रभर प्रबोधन केले व प्रस्थापित संस्कृतीला आव्हान दिले.

जर सातारा जिल्ह्यापुरती दलित चळवळ संघटीत ठेवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले असते तर ही चळवळ फुटली नसती व या जिल्ह्यात एक मोठी राजकीय ताकद निर्माण झाली असती. परंतु त्यांच्या व्यक्तीगत मर्यादा, त्यांचा समाजवादी चळवळीतील प्रवास व कार्यकर्त्याला समजून न घेण्याची भूमिका यामुळे त्यांचे नेतृत्व मर्यादित राहिले.

लक्ष्मण माने हे भटक्या जाती-जमातीमधून आलेले नेतृत्व आहे. त्यांचाही प्रवास समाजवादी चळवळीबरोबर झालेला होता. त्यामुळे ते जेवढे आंबेडकरवादी होते तेवढेच गांधीवादी होते. त्यामुळे दलित चळवळीतील चाणाक्ष कार्यकर्त्यांचा त्यांच्यावर विश्वास बसला नाही. त्यामुळे माने यांनी भटक्या जाती-जमातीच्यासाठी काम केले. त्यांनी आपल्या शिक्षण संस्थेतून हजारो मुलांना शिक्षण दिले. त्यामुळे चळवळीत काम करण्यासाठी त्यांना कार्यकर्ते मिळाले. भटक्या जातीच्या लोकांना जुन्या रूढी परंपरेपासून बाजूला करून बुद्ध धम्माच्या दिशेने वळविण्याचे काम माने यांनी केलेले आहे. दलितांच्या पेक्षाही एक वर्ग दलितांच्या पेक्षाही वाईट जीवन जगतो आहे. त्यांच्यामध्ये परिवर्तन घडविण्याचे काम माने यांनी केले आहे. परंतु त्यांच्या नेतृत्वालाही मर्यादा होत्या. त्यांनी आयुष्यभर शरद पवारांच्या बरोबर सलगी केली व काही भटक्यांचे प्रश्न सोडविले. परंतु दलित चळवळीतील आंबेडकरवाद्यांना हे खटकत होते. त्यामुळे त्यांच्याबरोबर ते राहिले नाहीत. माने यांचे संस्थात्मक काम फार मोठे आहे. त्यांनी आपल्या अनुयायांसह धर्मांतर करण्याचा घेतलेला निर्णय हा इतिहासात नोंद करून घेण्याचा आहे. त्यामुळे आंबेडकरी चळवळीला बळ मिळाले. परंतु माने यांनी आपली राजकीय भूमिका आंबेडकर वादाच्या दिशेने वळवला नाही. आज ही दलित शक्ती वाढली तर या जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलू शकतात. परंतु माने यांनी आपला राजकीय प्रवास आंबेडकरवादाच्या दिशेने वळवला नाही. तसेच त्यांनी प्रस्थापितांबरोबर असलेले आपले हितसंबंध सोडून देणेही गरजेचे आहे. त्यामुळेच दलितांची संघटित शक्ती त्यांच्यामागे उभी राहू शकली नाही.

याचबरोबर सातारा जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाचे विविध गट कार्यरत असले तरी मुख्य गट रामदास आठवले यांचा आढळून येतो. तसेच प्रकाश आंबेडकरांचा गटही दोन-तीन तालुक्यांमध्ये आहे. तसेच प्रा. कवाडे सरांचा गटही जिल्ह्यात उभा रहात आहे. त्याचबरोबर बहुजन समाज पक्ष प्रा. सकटे यांचा दलित महासंघ, पोळके सर यांची विद्रोही सांस्कृतिक चळवळ, बामसेफ, बहुजन समाज पक्ष व कास्ट्राईब कर्मचारी संघ अस्तित्वात आहेत. यामध्ये दलित चळवळीला दिशा देण्याचे काम बहुजन समाज पक्ष करीत असला तरी म्हणावा एवढा त्याचा प्रभाव दिसून येत नाही. मात्र आर. पी. आय. चा आठवले गट जिल्ह्यात आजही ताकदीनिशी उभा असलेला दिसून येतो.

मात्र या पक्षाचे नेते अशोक गायकवाड व किशोर तपासे यांनी दिशा बदलणे आवश्यक आहे. कारण राजकीय ताकद म्हणून हा पक्ष जिल्ह्यात उभा राहू शकतो. पण राष्ट्रवादीबरोबरचे त्यांचे संबंध तोडून टाकणे आवश्यक आहे. केवळ भावनिक प्रश्नांवरती मोर्चासाठी माणसे गोळा करणे, त्यासाठी झोपडपट्टीतील लोकांना आमिषे दाखवून सहभागी करून घेणे आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने योग्य नाही.

सातारा जिल्ह्यातील दलित चळवळीत काम करणाऱ्या दलित नेत्यांची जडणघडण ही आंबेडकर वादातूनच झालेली आहे. त्यामुळे हे दलित नेते आंबेडकरी विचारांशी प्रामाणिक आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील सामाजिक वातावरण बदललेले दिसते. या जिल्ह्यात जातीय दंगली, जातीय पिळवणूक, जातीयवादी भूमिका केवळ दलित नेत्यांच्यामुळेच दिसून येत नाहीत. म्हणून हा जिल्हा परिवर्तनाच्या चळवळीत पुढे आहे. परंतु म्हणून आंबेडकरी चळवळ मुख्य उद्दिष्टांपर्यंत पोहचली आहे असे म्हणता येत नाही. कारण या जिल्ह्यातील दलित समाजाचे जीवनमान उंचावलेले नाही. भूमिहिनांचे प्रमाण जास्त आहे. आर्थिकदृष्ट्या हा दलित वर्ग सबल झालेला नाही. या जिल्ह्यातील गायरान जमिनीचा प्रश्न आजही सुटला नाही. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्मारकाचा प्रश्न, महामाता भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मारकाचा प्रश्न असे अनेक प्रश्न या जिल्ह्यामध्ये न सुटलेले दिसून येतात. आज वरवरचा दिसणारा पांढरपेशा दलित समाज हा मूठभर आहे. परंतु गावकुसाबाहेर आजही त्याच दयनीय अवस्थेत, दारिद्र्यात खितपत पडलेला मोठा दलित समुह दिसून येतो. मग या जिल्ह्यात काम करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांनी यांच्या मुलभूत प्रश्नांच्यासाठी काय केले हा प्रश्न उभा राहतो. जुन्या रूढी परंपरांचे आजही या जिल्ह्यात दलित समाज अनुकरण करतो. शिकलेला वर्ग नव्या पद्धतीने मध्यमवर्गीय झाल्यामुळे तो आपल्या बांधवांच्याकडे लक्ष देत नाही. त्यामुळे या जिल्ह्यात दलित समाजातच सुधारलेले व न सुधारलेले असे दोन गट पडलेले दिसून येतात. या जिल्ह्यातील दलित नेतृत्वाने आंबेडकरी विचारधारेची पायमल्ली केली नसती तर प्रस्थापिक वर्गाच्या विरोधात दलित समाज संघटीतपणे उभा राहिला असता. आज असे चित्र आहे की दलित नेते सुपाऱ्या घेवून कामे करताना दिसून येत आहेत. दलित नेत्यांच्या सत्ता-संपत्तीमध्ये वाढ होत आहे. दलित नेते व्यसनामध्ये अडकलेले आहेत.

दलित प्रश्नावर तडजोडी करून स्वत:चा उदरनिर्वाह करणारे नेते आज दिसत आहे. त्यामुळे या दलित समाजाने कोणाला आंबेडकरवादी नेता मानायचे हा संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे या जिल्ह्यात रिपब्लिकन पक्षाच्या प्रवाहात विचारांची दिशा असणारे कार्यकर्ते येत नाहीत व इतर पक्षातही सहभागी होत नाहीत. त्यामुळे दलित कार्यकर्त्यांची ही कोंडी फोडण्यासाठी या जिल्ह्याला सर्व समावेशक नवे नेतृत्व उभे रहाणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील ही परिस्थिती जशी आहे तशीच या राज्यातही आहे. जाती अंताच्या मुख्य उद्दिष्टापसून आज आंबेडकरी चळवळ बाजूला गेलेली दिसून येते. त्यांच्यामध्ये कर्मठ जातीयता व दलित पुरुषी अहंकार फार दडलेला आहे. त्यामुळे स्त्रीमुक्तीच्या दिशेनेही ही चळवळ जात नाही. अपवादात्मक खालच्या जातीतही बेटी व्यवहार या जिल्ह्यात सुरू झालेले दिसून येतात. या जिल्ह्यात लक्ष्मण माने यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात भटक्या जातींनी बौद्ध धर्मात प्रवेश केलेला आहे. परंतु धर्मांतरीत नवबौद्धांच्यात कोणत्याही प्रकारचा एकजिनसीपणा आढळून येत नाही. या जिल्ह्यातील दलित चळवळीने महाराष्ट्राच्या दलित चळवळीला एक नवी दिशा देणे आवश्यक आहे व तशी परिस्थिती आहे. या जिल्ह्यात डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. नरेंद्र दाभोळकर, पार्थ पोळके, लक्ष्मण माने, जयंत उथळे, भगवान अवघडे यासारखे विविध जातीतील विचारवंत असताना त्यांच्यामध्ये महाराष्ट्राचे वैचारिक प्रबोधन करण्याची क्षमता आहे. परंतु प्रत्येकाने स्वत:मधील अहंभाव दूर केला तर दलित चळवळ आंबेडकरी विचाराने गेल्याशिवाय राहणार नाही व तो निर्णय महाराष्ट्राला व या देशाला दिशादर्शक ठरेल.

२१ व्या शतकात दलित चळवळीपुढे प्रचंड मोठी आव्हाने उभी आहेत. त्यामध्ये खाजगीकरणामुळे सरकारी व निमसरकारी नोकऱ्यांचे प्रमाण घटते आहे. दलितांच्या प्रश्नांचे स्वरूप बदलले आहे. नव्या पद्धतीने जातीव्यवस्थाउभी रहात आहे. त्यामुळे जातिअंताची लढाई करणे अवघड बनले आहे. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला भारत बौद्धमय करण्याची संकल्पना अजून तोकडी पडलेली आहे व या देशात आर्थिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक समता स्थापन करण्यासाठी व्यवस्था परिवर्तनाची लढाई ही अंतिम टप्प्यातील शेवटचे उद्दिष्ट आहे. पण आज दलित चळवळी या वरील उद्दिष्टांच्या दिशेने जाताना दिसत नाहीत.

या जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांमध्ये दलित महासंघ, संबोधी प्रतिष्ठान, रिपब्लिकन सेना, मुक्ती युवा संघटना, आर. पी. आय. चे विविध गट, विविध मंडळे, सेवाभावी संस्था काम करीत आहेत. परंतु आज एकही संघटन डॉ. आंबेडकरांच्या अंतिम उद्दिष्टांच्या दिशेने जात असलेले दिसत नाही. आधुनिक काळात नेमके कोणते प्रश्न आहेत याचे आकलन आजही सामाजिक काम करणाऱ्या संघटनांना येत नसल्याचे जाणवते. केवळ प्रसिद्धी व वर्षभरातील कार्यक्रम करणे एवढ्या पुरत्या जर चळवळी होत असल्या तर ते समाजाला दिशादर्शक नाही. एखादी घटना घडल्यानंतर त्याला प्रतिक्रिया देणे हे काम परिपक्वतेचे लक्षण नाही. मूळ प्रश्नावरती आंदोलन होत नाहीत. भावनिक प्रश्नातच या चळवळी अडकलेल्या दिसतात. त्यामुळे ज्या वेगाने सामाजिक परिवर्तन व्हायला पाहिजे ते होत नसल्याचे जाणवते आहे. आजही या जिल्ह्यातील काही गावात पाणवठे वेगळे आहेत. मंदिरात प्रवेश दिला जात नाही. सामूदायिक घरे जाळली जातात. बळी दिला जातो. पण या प्रश्नाकडे दलित चळवळी प्रभावीपणे आंदोलन करताना दिसत नाहीत. अंतर्गत हेवेदावे, गैरसमज, पूर्वग्रह कलूषितपणा याने त्या आटोकाट भरलेल्या आहेत. प्रस्थापित राजकीय पुढाऱ्यांना खूश करण्यासाठी स्वत:ला पदे मिळविण्यासाठी ढोंगी पद्धतीने काही चळवळी काम करताना दिसतात.

डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'जा आणि आपल्या घराच्या भिंतीवर लिहून ठेवा, की तुम्हाला राज्यकर्ती जमात बनायचे आहे.' म्हणजेच केवळ सत्तेत जाणे नव्हे तर शासन व प्रशासनात जाणे होय. पण आज सातारा जिल्ह्यात रिपब्लिकन पार्टीचे मा. आठवले, प्रा. कवाडे व प्रकाश आंबेडकर असे ३ गट प्रभावी आहेत. त्यामधील सर्वात प्रभावी गट मा. आठवले यांचा आहे. त्याचबरोबर आज मोठ्या वेगाने बहुजन समाज पार्टी जिल्ह्यात स्वतंत्रपणे वाढते आहे. लोक जनशक्तीची अस्तित्व नावापुरते आहे. तर राष्ट्रीय समाज पक्ष प्रामुख्याने माण आणि फलटण या तालुक्यात अतिशय प्रभावीपणे काम करतोय. इतर डावे पक्ष आंबेडकरी चळवळीत इतके मिसळलेले दिसून येत नाहीत.

या जिल्ह्यात वरील राजकीय पक्षांची हीच अवस्था दिसते. कोणत्याही निवडणुका आल्या की पक्ष जागृत होतो आणि आघाडीची समीकरणे मांडली जातात. त्यामुळे दलाली करणारे,

मांडवली करणारे असे पक्षाचे समीकरण बाहेर पडते. अपवादाने बसपाने या जिल्ह्यात वेगळी ओळख तयार केली आहे. राजेशाहीलाही त्यांनी जुमानले नाही. मात्र आर. पी. आय. चे सर्व गट राजेशाहीचा उदोउदो करीत प्रत्यक्ष निवडणुकीत त्यांच्या बाजूने उतरत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यात दलितांच्या राजकीय पक्षाला कसलेही यश आलेले दिसून येत नाही. काही प्रमाणात रा. स. प. ने आपला प्रभाव काही तालुक्यात पाडलेला दिसतो. या जिल्ह्यातील फलटण, माण, वाई, कोरेगांव, कराड, सातारा या तालुक्यात दलितांचे प्रमाण बहुसंख्यांक आहे. ते ज्या बाजूला जातील तेथे राजकीय यश असते. पण दलितांच्या राजकीय पक्षाने आजपर्यंत या प्रकारची मांडणीच केलेली दिसून येत नाही. प्रत्यक्ष निवडणुकीत ते प्रस्थापित पक्षाबरोबर जातात. त्यामुळे राजकीय यश आलेले नाही.

या जिल्ह्यात काही दलित कर्मचारी संघटना आहेत. दलित कर्मचाऱ्यांच्या नेमणूका, बढती, बदली बाबत त्या प्रभावीपणे मांडणी करीत आहेत. त्यामध्ये कास्ट्राईब संघटना, रिपब्लिकन एम्लोईज संघटना ही काम करताना दिसत आहेत. तर बामसेफ ही कर्मचारी संघटना असली तरी ती समाजाच्या प्रश्नासंदर्भात प्रबोधनाचे काम करते आहे. त्यांचेही काम चांगल्या प्रकारे चालले आहे.

साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्रभावी संघटना आहेत. विद्रोही सांस्कृतिक चळवळ अतिशय प्रभावीपणे वैचारिक भूमिका मांडण्याचे काम करते आहे. या चळवळीचे महाराष्ट्राचे अध्यक्ष पार्थ पोळके हे सातारचे आहेत. त्यामुळे त्यांनी संत रामदास स्वामी पासून ते पंढरपूरातील बडवे उत्पात हटाव मोहिमेपर्यंत फार मोठी आंदोलने केली आहेत. दरवर्षी छ. शिवाजी महाराजांची जयंती साताऱ्यातील २०० - ३०० मुस्लिम कार्यकर्ते हाती भगवी पताका घेवून करीत आहेत. म्हणजे ही चळवळ सांस्कृतिकरित्या महाराष्ट्राला दिशा देण्याचे काम करीत असलेली दिसते. त्यांनीच विद्रोही साहित्याची निर्मिती केलेली आहे. तसेच फुले-आंबेडकर साहित्य पंचायत दरवर्षी एक दिवसीय साहित्य संमेलन व पुरस्कार देते. त्याचबरोबर दलित साहित्यावर चर्चा घडवून आणते. क्रांती थिएटर यांनीही उपेक्षित दलित कलाकारांना मानसन्मान मिळवून देण्यासाठी विविध उपक्रम घेतलेले दिसतात. त्यामधून काही दलित कलाकारांना न्याय मिळतो.

या जिल्ह्यात धार्मिक काम करणाऱ्या प्रमुख तीन संस्था आहेत. भारतीय बौद्ध महासभा व बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया व त्रैलोक्य बौद्ध संघ. त्यांनीही बौद्ध धम्म प्रचार प्रसाराचे काम वेगाने केले आहे. पण नवबौद्धांच्या व्यतिरिक्त या धम्म चळवळीत इतर दलित जाती येण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. तरी बौद्ध महासभा विविध शिबीरे भरविते व लोकांना नैतिक आचारण करायला शिकवते. त्रैलोक्य बौद्ध संघानेही जिल्ह्यात दरवर्षी ५ ते १० दिवसांचे धम्म शिबीरे घेतली आहेत. त्यांनीही समाजात निर्माण होणारा अहंभाव, हेवेदावे कमी व्हावेत म्हणून प्रयत्न केलेले आहेत. पण इतर जातींना या धर्माकडे ओढण्यासाठी कोणीच भरीव प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत.

या जिल्ह्यात शिक्षणाचे प्रमाण वाढलेले आहे. रयत शिक्षण संस्था व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थांबरोबर औधची संस्था व फलटणच्या संस्थेने दलितांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठा हातभार लावला आहे. लक्ष्मण माने यांच्या आश्रमशाळेत आज मोठ्या प्रमाणात भटक्या समाजाची मुले, मुली शिक्षण घेत आहेत. कोणतीही क्रांती मेंदूतून होत असते. त्या मेंदूला विचार करायला लावण्यासाठी शिक्षण आवश्यक असते. ते शिक्षण या जिल्ह्यात वाढलेले आहे.

दलित स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराबाबत काम करणाऱ्या महिला संघटना फार कमी आहेत. दलित महिला विकास आघाडीच्या वर्षा देशपांडे, शैला जाधव, कावेरीबाई बनसोडे तर ग्रामीण भागात काम करणाऱ्या सौ. शालन वाघमारे, संगीता गायकवाड, सौ. बनुबाई येवले या प्रमुख आहेत. त्यामध्ये वर्षा देशपांडे यांची महिला आघाडी मुख्यत: दारुबंदी, परित्यक्त्या विधवा महिलांना न्याय देण्यासाठी लढे उभारत आहेत. तसेच बचत गटाच्या माध्यमातून त्यांना विकासाच्यासंधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. पण शिकलेल्या दलित तरुणी या चळवळीत अजिबातच येत नाहीत. दलित कार्यकर्ते, नेते यांनीही आपल्या मुलींना आंबेडकरी चळवळीपासून दूर ठेवलेले दिसून येते. एकूण दलित पुरुष अजून मानवमुक्तीच्या दिशेने गेलेले या जिल्ह्यात दिसून येत नाहीत.

अशा प्रकारे या जिल्ह्यातील दलित चळवळ एका टप्प्यावर येवून थांबलेली दिसून येते. सर्वच दलित कार्यकर्ते संभ्रमात आहेत. वरील नेते एकत्र येत नाहीत. त्यामुळे खालीही दलित

चळवळ गटातटात विखुरलेली दिसून येते. या जिल्ह्याचे नेते पार्थ पोळके, लक्ष्मण माने हे सुद्धा एकत्रित येत नाहीत. आर. पी. आय. चे गट एकत्र येत नाहीत.कार्यकर्ते शांत झालेले आहेत. बसपा पळते आहे पण हाताला काहीच लागत नाही. आज दलित चळवळ नावापुरती उरली आहे. पूर्वीची दहशत, पूर्वीचा होश काहीच राहिलेला नाही फक्त पोस्टेड काम सुरू आहे. नव्या पिढीला दिशा द्यायची असेल, डॉ. आंबेडकरांचे स्वप्न साकार करावयाचे असेल तर एकच पर्याय आहे. जिल्हा स्तरावरती आपापले हितसंबंध बाजूला ठेवून एका उदात्त ध्येयासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. केवळ सामाजिकच नव्हे तर सर्वच बाबतीत एकसंघ सातारा जिल्हा झाला तर तो प्रस्थापित पक्षाला पर्याय देवू शकतो. व्यक्तिगत हाव, व्यक्तिगत संबंध, स्वत:मधील दोष, या सर्वांचा नाश करून नव्या उमेदीने हे नेते जर एकत्र आले तर या जिल्ह्यात दलित चळवळ एक स्वतंत्र पर्याय उभा करून महाराष्ट्राच्या दलित चळवळीला दिशा देवू शकते. गरज आहे फक्त या जिल्ह्यातील पार्थ पोळके, लक्ष्मण माने, किशोर तपासे, अशोक गायकवाड, प्राचार्य डॉ. अरुण गाडे, प्रशांत चव्हाण, युवराज कांबळे, मु. का. खरडे, बजरंग खटके, चंद्रकांत खंडाईत, विजय येवले, वर्षा देशपांडे, जयंत उथळे, ग. स. कांबळे गुरुजी, भगवान गडांकुश, गौतम वाघमारे, बाळासाहेब शिरसाट, सुशील कांबळे, प्रा. मच्छिंद्र सकटे, सत्यवान कमाने, अमर गायकवाड हे एकत्र आले तर हा जिल्हा २१ व्या शतकातील दलितांच्या समोर निर्माण होणारे प्रश्न सोडवेलच पण या जिल्ह्यात सर्वच स्तरावरती परिवर्तन घडेल व हे परिवर्तन महाराष्ट्राच्या दलित चळवळीला दिशादर्शक झाल्याशिवाय राहणार नाही.

या संशोधनाच्या निमित्ताने दलित चळवळीत काम करणाऱ्या सर्वच घटकांची माहिती पाहता हे संशोधन दलित चळवळीला मार्गदर्शक ठरेल. त्याचबरोबर या संशोधनातून निश्चितच समाजाला दिशा मिळू शकेल. तसेच पुढील संशोधकांना या दलित चळवळीवरती संशोधन करताना ही माहिती उपयोगी पडू शकेल. दलित नेतृत्वाने सिंहावलोकन करावे. दलित कार्यकर्त्यांनी दलित पुरुषत्व बाजूला ठेवून ही चळवळ मानवमुक्तीच्या दिशेने घेवून जावी. तरच पुढे २१ व्या शतकात ह्या दलित चळवळीला येणाऱ्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आत्मबल येईल व सर्व स्तरातील जनसमुदाय या चळवळीत सहभागी होईल व व्यवस्था परिवर्तन घडेल.

----×-----

# संदर्भ ग्रंथसूची

**प्राथमिक साधने :-**


१. आंबेडकर डॉ. बाबासाहेब : 'शुद्र पूर्वी कोण होते ?', अनु. चां. भं. खैरमोडे, क्षितिज प्रकाशन, नागपूर, १९९५

२. आंबेडकर डॉ. बाबासाहेब : 'हिंदूत्वातील कूट प्रश्न', अनु. डॉ. मु. भ. जोशी, राजेश प्रकाशन, पुणे, १९९५

३. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे', खंड १८ वा, भाग १, २, ३, महाराष्ट्र शासन संपादक मंडळ, २००२

४. 'डॉ. बाबासहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत व मूकनायक', महाराष्ट्र शासन संपादक मंडळ

५. कीर डॉ. धनंजय : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र', सुगावा प्रकाशन, पुणे, २००१

६. संपा. कीर धनंजय, मालशे स.ग. फडके य. दि. : 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' (सहावी आवृत्ती), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६

७. खैरमोडे चां. भ. : 'भारतीय घटनेचे शिल्पकार - डॉ. भि. य. आंबेडकर चरित्र खंड १ ते १२', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९६

८. धारवकर भास्कर : 'शाहू छत्रपतींचे निवडक आदेश खंड - १', महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८

९. जेम्स ग्रँड डफ : 'हिस्ट्री ऑफ दि मराठाज - खंड २'लोप्राईज पब्लिकेशन, दिल्ली, १९६३

१०. गायकवाड प्रदिप (संपा.) : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकराची समग्र भाषणे खंड १, २', क्षितिज पब्लिकेशन, नागपूर, २००१

११. जाधव म. बा. (संपा.) : ‘राजर्षी शाहू महाराजांची भाषणे’ लोक वाङ्मय गृह, मुंबई, २००१

१२. पाठक अरुणचंद्र श. (संपा.) : महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, सातारा जिल्हा, दर्शनिक विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई १९९९

१३. देव शां. भा. : महाराष्ट्र व गोवे शिलालेख ताम्रपट संदर्भ सूची, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२

१४. पानतावणे डॉ. गंगाधर (संपा.) : ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवडक लेख’, प्रतिमा प्रकाशन, पुणे

१५. पठारे ॲड्. हरिभाऊ (अनु.) : ‘मिलिंद प्रश्न’, रघुवंश प्रकाशन, पुणे, २००१

१६. मराठी रियासत, खंड ८, १९९२

१७. संपा. नरके हरि : ‘महात्मा फुले साहित्य आणि चळवळ’ आंबेडकर, फुले, शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई, २००६

**२. दुय्यम साधने :-**

१. आंबेडकर डॉ. बाबासाहेब : ‘ब्राह्मणी परंपरा आणि छ. शिवाजी महाराज’, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, २००६

२७. अवघडे भगवान : ‘वैदिक शोषिकांची संस्कृती - यज्ञ’, लोकायन प्रकाशन, सातारा, २००५

३. ऑमव्हेट डॉ. गेल : ‘जोतीबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार’, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, २००१

४. आंबेडकर डॉ. बाबासाहेब (अनु.) दळवी बबन : ‘ब्राह्मणी साहित्य’, सुगाव प्रकाशन, पुणे, २००१

५. ऑमव्हेट गेल : ‘कल्चरल रिव्हॉल्ट इन ए क्लोनिअल सोसायटी’, सायंटिफिक सोशालिस्ट एज्युकेशन ट्रस्ट, मुंबई, १९७६

६. भोसले एस. एस. (संपा.) : ‘क्रांती युक्ते राजर्षी छत्रपती शाहू’, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१

७. भिडे - पाटील - थोरात : ‘महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास’, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००५ (प्रथमावृत्ती)

८. भोसले प्रा. जे. वाय. : ‘महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास’, संपा. दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८

९. भोळे प्रा. डॉ. भा. ल. : ‘विसावे शतक आणि भारतातील समता विचार’, ६ वे विचारवेध संमेलन, डॉ.आंबेडकर अकादमी, सातारा, १९९८

१०. भोसले प्रा. नारायण : ‘डॉ. आंबेडकर आणि अब्राह्मणी इतिहास मीमांसा’, दिग्नाथ प्रकाशन, पुणे, २००५

११. बर्वे डॉ. स्वाती (संपा.) : ‘स्त्री विकासाच्या पाऊलखुणा’ (१८५०-१९५० मधील स्त्रियांच्या निवडक लेखांचा संग्रह), प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३

१२. भोळे डॉ.भा. ल. : 'आधुनिक भारतातील राजकीय विचारवंत', पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशिंग, नागपूर, २००३

१३. भोसले डॉ. पांडुरंग : 'नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा', पांडुरंग प्रकाशन, पंढरपूर, २००३

१४. कीर धनंजय : 'महात्मा जोतीराव फुले : आमच्या समाजक्रांतीचे जनक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९६८

१५. खरात शंकरराव : 'भटक्या विमुक्त जमाती व त्यांचे प्रश्न', सुगावा प्रकाशन, पुणे, १९७५

१६. कदम नागनाथ : 'महाराष्ट्रातील भटका समाज - संस्कृती व साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५

१७. कडू जैमिनी : 'ब्राह्मणवाद', भारत ठाकरे, शास्त्रीनगर आटणी, १९९६

१८. कांबळे उत्तम : 'जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न', सुगावा प्रकाशन, पुणे, २००२

१९. कांबळे गौतमीपुत्र, पाटील शरद : 'नवबौद्ध धम्म आणि जातीसंघर्ष', क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, पुणे, २००७

२०. खंडागळे प्रा. चंद्रकांत : 'भारतीय समाज - रचना आणि परिवर्तन' मायादेवी खंडागळे प्रकाशन, सांगली, २००१

२१. कांबळे सरोज, परदेशी प्रतिमा : 'मनुस्मृती, स्त्रिया आणि डॉ. आंबेडकर', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, धुळे, २००३

२२. कांबळे सरोज : 'स्त्री मुक्ती - आजचे संदर्भ', क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी प्रकाशन, धुळे, १९९९

२३. कसबे प्रा. रावसाहेब : 'झोत', सुगाव प्रकाशन, पुणे, १९९५

२४. कांबळे प्रा. अरुण : 'धर्माची भिमगर्जना', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००२

२५. खडसे डॉ. भा. वि. : 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या', हिमालय पब्लिशिंग हाऊस, मुंबई २००४

२६. बोहरे डॉ. सुमन : 'अभिजात सामाजिक विचारवंत', विद्या प्रकाशन, नागपूर, २००२

२७. खैरनार प्राचार्य जे. जी. : 'सत्याग्रही दादासाहेब', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, नाशिक, २००४

२८. ढेरे अरुणा : 'विवेक आणि विद्रोह', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००१

२९. चौसाळकर डॉ. अशोक : 'न्याय आणि धर्म', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००१

३०. डॉ. जगझाप हर्ष : 'आंबेडकरी धम्मक्रांतीपुढील आव्हाने भाग १' क्रांतीपर्व प्रकाशन, तक्षशिला, पुणे २००१

३१. जगझाप डॉ. हर्ष व कांबळे कुलवीर : 'शिवधर्म - मराठ्यांची लढाई जातीअंताची की जातिश्रेष्ठताची', बौद्ध युवा संघर्ष समिती, पुणे, २००५

३२. जगझाप डॉ. हर्ष, बनसोडे रवींद्र : 'रिपब्लिकन ऐक्य की नवा पर्याय', बौद्ध युवा संघर्ष समिती, पुणे, २००५

३३. देशपांडे प्रदिप : 'मनुस्मृती अजून जाळतेच आहे', एकता सांप्रदायिक संघर्ष समिती, मुंबई - २००३

३४. जाधव किशोर : 'विद्रोही सांस्कृतिक चळवळ' (मसुदा), विद्रोही सांस्कृतिक चळवळ, पुणे, २०००

३५. झेलियट डॉ. एलिनॉर (अनु.) वसंत मून : 'डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५

३६. गुंदेकर डॉ. श्रीराम : 'म. जोतीबा फुले - साहित्य आणि साहित्यिक मूल्य', प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९६

३७. गोखले पुरुषोत्तम पांडुरंग : 'जागृत सातारा', १९३५

३८. जोशी सु. ह. : 'महाराष्ट्र दर्शन - ४', समाज दर्शन, पुणे, १९८६

३९. ठाकरे केशव सिताराम : 'प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी', १९४८

४०. तेलतुंबडे डॉ. आनंद : 'जागतिकीकरण आणि कष्टकरी दलित बहुजन', दि ग्राम प्रकाशन, पुणे, २००५

४१. थोरात सुखदेव : 'खाजगी क्षेत्रात आरक्षण धोरण का व कसे?', सुगावा प्रकाशन, पुणे, २००५

४२. पवार जयसिंगराव (संपा.) : 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१

४३. पाटणकर भारत : 'जातिव्यवस्थेचा अंत', श्रमिक मुक्तीदल प्रकाशन, कासेगांव, २००५

४४. डॉ. पाटणकर भारत : 'हिंदू कि सिंधू', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९३

४५. पळशीकर सुहास : 'जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण', सुगावा प्रकाशन, पुणे

४६. पाटणकर डॉ. भारत : 'श्रमिक मुक्ती दलाचा - समांतर सत्तेचा कार्यक्रम', संपा. भारत पाटणकर, कासेगांव, २००४

४७. देशपांडे प्रदिप : 'मनुस्मृती अजून जाळतेच आहे', एकता सांप्रदायिक संघर्ष समिती, मुंबई, २००३

४८. पाटील शरद : 'रामायण महाभारतातील वर्ग संघर्ष', मावळाई प्रकाशन, शिरुर, पुणे, १९९३

४९. पानसरे कॉ. गोविंद : 'शिवाजी कोण होता ?', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, २००५

५०. नरके हरी : 'सनातनी ब्राह्मण आणि पुरोगामी ब्राह्मण हे एकाच शरीराच्या दोन भुजा आहेत', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, दिल्ली, २००८

५१. पाटील शरद : 'भारतीय मागासलेपणाचा पाया - वर्ग की जात ?', क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, पुणे, २००७

५२. पुनियानी राम अनु. कोरडे डॉ.विवेक : 'हिंदू तत्त्वाचे राजकारण', एकता सामाजिक प्रकाशन, मुंबई, २००४

५३. पाटील पंढरीनाथ सी. : 'म. जोतीराव फुले - चरित्र', मनोविकास प्रकाशन, मुंबई, १९९६

५४. प्रधान ग. प्र. : 'भाकरी आणि स्वातंत्र्य', विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९९१

| | | | |
|---|---|---|---|
| ५५. | फडके भालचंद्र | : | 'साहित्य वेदना आणि विद्रोह', सुरेश एजन्सी, पुणे, १९९३ |
| ५६. | पवार गो. म. | : | 'म. वि. रा. शिंदे यांचे जीवन व कार्य', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, २००४ |
| ५७. | फडके य. दि. | : | 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १', |
| ५८. | मोरे सदानंद | : | 'महात्मा फुले यांचे राजकीय विचार' महात्मा फुले स्मारक व्याख्यानमाला, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर १९९३ |
| ५९. | डॉ. सौ. मोहिते कल्पना | : | 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', संपा. दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००८ |
| ६०. | मेश्राम वामन | : | 'मूलनिवासी बहुजन सिद्धांत, संकल्पना, स्वरूप एवं व्यवहार', मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, नवी दिल्ली, २००२ |
| ६१. | पोळके पार्थ | : | 'रामदासाचे लिखाण आणि वारकरी संतांचे साहित्य', विद्रोहीसांस्कृतिक चळवळ, सातारा, १९९९ |
| ६२. | माटे गो. रा. | : | 'असा घडला सातारा जिल्हा', १९८८ |
| ६३. | राजवाडे वि. का. | : | 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास', लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई, १९९५ |
| ६४. | लिंबाळे डॉ. शरणकुमार | : | 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', कांता प्रकाशन, बार्शी, २००३ |
| ६५. | सुर्यवंशी कृ. गो. | : | 'राजर्षी शाहू राजा व माणूस', ठोकळ प्रकाशन, पुणे, १९८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६६. | शिरगुप्पे राजा | : | 'लिंगायत धर्म - ब्राह्मणी धर्म पिढीशी एक मतविद्रोह', सम्यक विद्रोही प्रकाशन, निपाणी, २००९ |
| ६७. | सप्तर्षी डॉ. कुमार | : | 'युवक क्रांती दल', क्रांतीनिकेतन, सदाशिव पेठ, पुणे, २००१ |
| ६८. | सरदेसाई डॉ. बी. एन. | : | 'आधुनिक महाराष्ट्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००७ |
| ६९. | शिंदे गौतम (अनु.) | : | 'बुद्ध की कार्ल मार्क्स - डॉ. बाबासाहे आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, २००१ |
| ७०. | वैद्य प्रभाकर | : | 'डॉ. आंबेडकर आणि त्यांचा धम्म', शलाका प्रकाशन, मुंबई, १९९७ |
| ७१. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'चार्वाक', सामाजिक बागणीकार स्मृतीमाला , पुणे, प्रका. राकेश साळुंखे, लोकायन प्रकाशन, सातारा, १९९५ |
| ७२. | साळुंखे पी. बी. (संपा.) | : | 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', शिक्षण व सेवा योजना विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९८८ |
| ७३. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'हिंदू धर्म आणि स्त्री', प्रका. राकेश साळुंखे, लोकायन प्रकाशन, सातारा, २००१ |
| ७४. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'विद्रोही तुकाराम', प्रका. राकेश साळुंखे, लोकायन प्रकाशन, सातारा, १९९७ |
| ७५. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती', पुणे, १९९३ |
| ७६. | साळुंखे डॉ. आ. ह. | : | 'आता आमच्या धडावर आमचेच डोके असेल', १९९९ |

७७. साळुंखे डॉ. आ. ह. : 'वैदिक धर्मयुगे आणि बाहुजनांची गुलामगिरी', १९९८

७८. साळुंखे डॉ. आ. ह. : 'ऐतरेय ब्राह्मण - एक चिकित्सा', २००१

७९. साळुंखे डॉ. आ. ह. : 'गुलामांचा आणि गुलाम करणाऱ्यांचा धर्म एक नसतो', २००२

८०. साळुंखे डॉ. आ. ह. : 'बळीवंश', २००५

८१. साळुंखे डॉ. आ. ह. : 'गौतम बुद्ध', २००९

८२. सुरवेद प्र. ग. : 'ऑक्टोबर धम्म क्रांती', सुगावा प्रकाशन, पुणे, २००१

८३. सरदार गं. बा. : 'गांधी आणि आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, २००२

८४. नाईक तु. का. : 'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, २००६

८५. प्राचार्य गरुड आण्णासाहेब प्राचार्य सावंत : 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद १९९५


**३. इंग्रजी – दुय्यम साधने :-**


1. Kohrai Rasni (Ed.) - Caste in India Politics, New Delhi, Orient Longman (1970), 1985 Reprint

2. Gavaskar Mahesh - Bahujans as Vanduara : BSP and BMS in Mahrasthra Plitics, Economic and Political weekly, 16 - 23, 1994

3. Guru Gopal - Emergence of Bahujan Mahasabha in Maharashtra, Economic and Political Weekly, 73 - 20, Vol. 29, No.45 - 42 - 1993

4. Guru Gopal - Caste, class and Politics in the Tameries of Kolhapur in K. L. Sharma (Ed.) Caste and class in India, Rawat Publications, Delhi - 1994

5. Jogdand P. G. - Dalit Movement in Maharashtra, Kanak Publications, New Delhi - 1991

6. Deshpande G. P. - From Caste to Class in Maharashtra, Economic and Political Weekly, Vol. 6, No. 8, February 20 - 1971

5. Punalekar S. P. - Growth , Inequties and Tensions : A Case Study of Sangli district, Maharashtra in Caste and Class in India, K. L. Sharma (Ed.), Rawat Publications, Delhi - 1994

6. Patil Sharad - Caste and Class in Maharashtra, In caste and Class in India, K. L. Sharma (Ed.) 1994 Rawar Publications, Delhi

7. Pandit Nalini - Caste and Class in Maharashtra, Economic and Political Weekly, Vol. 14, No. 7, 8 February 1979

8. Murudkar Lata - Dalit Panther Movement in Maharashtra, Bombay, Popular Prakashan, 1991

9. Vora Rajendra and Palshikar Suhas - 'Class, Caste and Ideology in Maharashtra in 1994', Rawat Publications, Delhi, 1994

10. Shrinivas M. N. - The Dominant Caste and Other Essays, Oxford University Press, New Delhi 1987

11 Shrinivas M. N. - Caste in Modern India and Other Essays, Asia Publicshing House, London, 1952

**४. हिंदी – दुय्यम साधने :-**

१. शुक्ला अमरनाथ : 'भारतीय संस्कृति कथा कोश', शुभकामना प्रकाशन, दिल्ली, २००१

२. शास्त्री परमानंद : 'भारत और भारतीय संस्कृति', भावना प्रकाशन, दिल्ली, १९९०

३. मेश्राम वामन : 'क्या है भारत की वर्तमान ज्वलंत समस्या?', मूल निवासी पब्लिकेशन ट्रस्ट, नवी दिल्ली, २००५

**५. मासिके, त्रैमासिके वसाप्ताहिके - दुय्यम साधने :-**

१. मूल निवासी संघटक (मराठी पाक्षिक) १५ ऑक्टोबर २००४, १८ वे महाराष्ट्र राज्य अधिवेशन, पुणे.

२. परिवर्तनाचा वाटसरू - वर्ष ५ वे, अंक २४ - २००८, अभयकांता, नारायण पेठ, पुणे

३. कसबे रावसाहेब - दलितांच्या राजकीय चळवळीचे भवितव्य, समाज प्रबोधन पत्रिका, वर्ष १२, अंक ६३, १९७५

४. कसबे रावसाहेब - दलित चळवळ, सुगावा मासिक, दिवाळी अंक, १९८९

५. चौसाळकर अशोक - मराठवाड्यातील दंगली : शोध व बोध, समाज प्रबोधन पत्रिका, वर्ष - १६, अंक -८५, १९७९

६. जाधव भास्करराव - दलित ऐक्याचा प्रश्न, समाज प्रबोधन पत्रिका, वर्ष - ३६, अंक - १४२, १९९८

७. जोगदंड प्रल्हाद - दलित पँथरवरील दोन अभ्यास, समाज प्रबोधन पत्रिका, १९९१

८. दाते सुनिल - दलित ऐक्य - स्वरूप आणि मर्यादा', समाज प्रबोधन पत्रिका, अंक ११२, १९९०

९. भोळे भा. ल. - दलित नेतृत्व : काल, आज व उद्या, समाज प्रबोन पत्रिका, वर्ष १७, अंक ९३, १९८०

१०. शिंदे डॉ. मारुती - जात हिच सर्व समस्यांचे मूळ, अन्वीक्षण संपाद. सी. पी. थोरात, पुणे

११. संपा. प्रकाश आंबेडकर - प्रबुद्ध भारत (पाक्षिक) दिक्षा विशेशांक, समता प्रकाशन, नागपूर, वर्ष १ ले, १९५६

-----×-----

## परिशिष्ट

# सहा दशकांची दलित चळवळ

१. शेड्युल्ड कास्ट्स फेडरेशनची स्थापना - १९४२ - संस्थापक डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

२. डॉ. आंबेडकरांचे जनतेला खुले पत्र - १९५४ - 'रिपब्लिकन पार्टीची' संकल्पना या पत्राद्वारे मांडली.

३. डॉ. आंबेडकरांचे महापरिनिर्वाण - ५ डिसेंबर १९५६.

४. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना - ६ डिसेंबर १९५६ - एन. शिवराज पहिले राष्ट्रीय अध्यक्ष.

५. पक्षात पहिली फूट - दुरुस्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना - ३ ऑक्टोबर १९५८ - ॲड्. बी. सी. कांबळे.

६. त्यानंतर काही वर्षातच बॅ. राजाभाऊ खोब्रागडे पक्षातून बाहेर. (खोरीप) खोब्रागडे रिपब्लिकन पार्टीची स्थापना केली.

७. दादासाहेब गायकवाड यांची रि. प. ई. अध्यक्षपदी निवड - १९६४.

८. बी. सी. कांबळे यांच्या दुरुस्ती रि. प. ई. मधून दादासाहेब रुपवते बाहेर. कॉंग्रेसमध्ये प्रवेश तर आर. डी. भंडारे कॉंग्रेसमध्ये.

९. दादासाहेब गायकवाडांचा मृत्यू - १९६८.

१०. रि. प. ई. अध्यक्षपद रा. सु. गवई यांचेकडे (१९६८ - ६९)

११. दलित पँथरची स्थापना - १९७३ - नामदेव ढसाळ, राजा ढाले, अविनाश महातेकर, ज. वि. पवार, भाई संगारे यांचा राजकीय पटावर उदय.

१२. दलित पँथरमध्ये फूट - १९७४ - राजा ढाले - मास मुव्हमेंट, नामदेव ढसाळ - दलित पँथर.

१३. खोब्रागडे रि. प. ई., बी. सी. कांबळे यांची दुरुस्त रि. प. ई. यांचे मूळ रि. प. ई. बरोबर पुन्हा ऐक्य - १९७४.

१४. हे ऐक्य वर्षभरच टिकले, पक्ष पुन्हा फुटला. १९७५ गवई काँग्रेसडे , बी. सी. कांबळे समाजवाद्यांबरोबर.

१५. दलित पँथरचे विसर्जन - मास मुव्हमेंट तसेच भारतीय दलित पँथरची स्थापना झाली. - १९७७.

१६. रामदास आठवले यांचा राजकीय पटावर उदय - १९८४.

१७. सम्यक समाज आंदोलनाद्वावरे प्रकाश आंबेडकरांचा राजकीय पटावर उदय - १९८४.

१८. भारतीय रिपब्लिकन पार्टीची पुर्नबांधणी.

१९. रिडल्स ऑफ हिंदू इझमला शिवसेनेचा विरोध - १९८८.

२०. दलित संघटनांचे अभूतपूर्व ऐक्य - १९८८.

२१. बौद्ध स्तूपाची मुंबईत मोडतोड, चेंबूर येथे वातावरण तंग - शिवसेनेची दंगल - १९८९.

२२. शिवसेनेच्या दसरा मेळाव्यातून परत येत असताना आनंद दिघे व अन्य शिवसैनिकांची दंगल - पोलिसांचा गोळीबार - ४ कार्यकर्त्यांचा मृत्यू.

२३. चेंबूर येथील आंबेडकर उद्यानात ९ दलित कार्यकर्त्यांचे आमरण उपोषण आंदोलन - 'ऐक्यासाठी आवाहन' .

२४. दलित संघटनांचे दुसरे ऐक्य - १९८९.

२५. १ वर्षातच पुन्हा फूट - १९९० - प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, अविनाश महातेकर, जोगेंद्र कवाडे, अर्जुन डांगळे, तिसऱ्या आघाडीबरोबर तर रा. सु. गवई, आठवले, ढसाळ, भाई संगारे, सुमंत गायकवाड हे काँग्रेसबरोबर.

२६. बहुजन महासंघाची स्थापना - १९९२ - भारिप - बहुजन महासंघ एकत्र.

२७. राज्य विधानसभेच्या निवडणुका येताच ऐक्याचा दबाव वाढण्यास सुरूवात - १९९५.

२८. विविध गट, संघटनांच्या ऐक्याच्या प्रक्रियेला सुरुवात. ६ डिसेंबर १९९५ - एका अध्यक्षीय मंडळाची स्थापना - रा. सु. गवई, बी. सी. कांबळे, घनश्याम तळवटकर, शिवराम,

प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, जोंगेद्र कवाडे, टी. एम. कांबळे, राजा ढाले, नामदेव ढसाळ यांचा या मंडळात समावेश.

२९. १९९६ सालची लोकसभेची निवडणूक पक्षाने स्वबळावर लढविली, निवडणूकीत पक्षाला एकही जागा नाही.

३०. रिपब्लिकन पक्षाची काँग्रेसबरोबर युती - १९९८ - जोगेंद्र कवाडे, रा. सु. गवई, रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर खासदार म्हणून विजयी.

३१. पक्षात पुन्हा फूट - ऑक्टोबर १९९८ - प्रकाश आंबेडकर नांदेड येथे वेगळे अधिवेशन.

३२. रामदास आठवले यांनी पुणे येथे वेगळे अधिवेशन भरवले - १९९८ डिसेंबर.

**शेड्युल्ड कास्ट फेडरेशन (१९४२)**

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया - १९५७**

१९५८

खोब्रागडे

बी. सी. कांबळे

रिपब्लिकन ऐक्य १९७४

गवई कॉंग्रेसबरोबर

बी. सी. कांबळे समाजवाद्यांबरोबर

सम्यक समाज आंदोलनात

प्रकाश आंबेडकरांचा राजकीय उदय (१९८४)

सर्व दलित संघटनांचे अभूतपूर्व ऐक्य (१९८९)

पुन्हा फूट (१९९०)

प्रकाश आंबेडकर, राजा ढाले, अविनाश महातेकर,
जोगेंद्र कवाडे, अर्जुन डांगळे तिसऱ्या आघाडीबरोबर

गवई, आठवले, ढसाळ, संगारे,
सुमन गायकवाड कॉंग्रेसबरोबर

पुन्हा फूट (१९९०)

भारिप - बहुजन महासंघ
(आंबेडकर, ढाले, डांगळे)

रिपई (कवाडे)

रि. प. ई.
(कांबळे टी. एम.)

रि. प. ई.
(गवई)

रि. प. ई.
(आठवले)

रि. प. ई.
(ढसाळ)

दलित पॅंथर (१९७३)

पॅंथर विसर्जित

भारतीय दलित पॅंथरची स्थापना

रामदास आठवले यांचा राजकीय उदय
(१९७७)

**दलित संघटनांचे अभूतपूर्व ऐक्य - १९९५**

**पुन्हा फूट - १९९८**

- रि. प. ई. संगारे
- रि. प. ई. कवाडे
- भारिप बहुजन महासंघ
- रि. प. ई. आठवले
- रि. प. ई. गवई
- रि. प. ई. खोब्रागडे
  - हरिश्चंद्र रामटेके
  - उपेंद्र शेंडे
  - कचरूलाल जैन
  - उमाकांत रामटेके
- रि. प. ई. कांबळे

**१९७२ ते २००२ - सातारा जिल्हा**

- समाजवादी युवक दल
  - समता आंदोलन
    - भिमसेना
- दलित सेवा संघ
  - भारतीय दलित पँथर

**दलित ऐक्य**

- रि.प.ई. – गवई
- भ.वि.ज. – लक्ष्मण माने
- रि.प.ई. – आठवले
- पी.आर.पी. – कवाडे
- मास मुव्हमेंट – ढाले
- भिमसेना – पार्थ पोळके
- दलित महासंघ – सकटे, कांबळे, वायदंडे
- बसपा – कांशीराम
- दलित सेना – पासवान

- रा.क्रांद.
- यु.क्रांद.
- द.म.वि.
- बामसेफ
- त्रैसा बौ. संघ
- भा. बौ. म.
- भि. प्रतिष्ठान
- आ.स्मा स.
- सं. प्रतिष्ठान
- प. समूह

- सी. से. सं.
- क्रां. ति.
- का. संघटना
- मुनिस
- य. सेना

## डॉ. आंबेडकरांचे श्री. उबाळे यांना आलेले हस्तलिखित पत्र



[illegible] कामास सुरवात करताना [illegible]

मी आपल्या वर कारण नसता बोजा टाकल्या सारखे वाटले, पण माझी खात्री आहे की तो बोजा आपल्या शक्ती च्या बाहेर नाही.

आपल्याला हे धनीक व पैसेवाले लोक सर्व लौकीक कामात [illegible] [illegible] [illegible] रक्षण [illegible] करणाऱ्या [illegible] मदत करीत नाहीत. [illegible] त्यांच्या वर सर्वांचा भरोसा आहे. आपण [illegible] लोकांना [illegible] आहोत. तेव्हा आपल्याला आपले [illegible] काय आहे या संबंधी [illegible] करण्याची जरुरी नाही. आपले [illegible] जीवावर [illegible] करीत आहो असो.

मला खात्री वाटल्या वरुनच [illegible] हे पत्र लिहीण्याचे धाडस करीत आहे. तरी माझ्या विनंतीस मान [illegible] द्याल अशी आशा ठेवून मी आपली रजा घेतो.

आपला नम्र सेवक

[illegible] आंबेडकर



भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचे
सातारा येथील निवासस्थान
१९०४



नायगाव, ता. खंडाळा येथील
क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले
यांचे स्मारक



मातोश्री भिमाबाई आंबेडकर
स्मारकाची जागा ताब्यात
मिळविण्यासाठी आंदोलन
करणारे कार्यकर्ते



रिपब्लिकन पक्षाचा ऐतिहासिक
ऐक्य मेळावा



भटक्या समाजाचे जीवन
माळरानावर




मंडल आयोग अंमलबजावणीसाठी
भिमसेनेचे चक्री उपोषण - १९९०




डॉ. आंबेडकरांचे मूळ निवासस्थान
राष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी
आमरण उपोषणास बसलेले
कार्यकर्ते



लक्ष्मण माने, पार्थ पोळके
आयोजित धम्म चक्र प्रवर्तन परिषद



बसपाचे संस्थापक अध्यक्ष
मा. कांशीराम यांच्या हस्ते
फुले शाहू आंबेडकर ग्रंथलयाचे
उद्‌घाटन



दलितांच्या विविध प्रश्नावर काढलेला
सातारा जिल्हाअधिकारी कार्यालयावर
काढलेला मोर्चा



१९८५ मध्ये फलटण येथील
दलित वस्तीवर शिवसेनेने हल्ला
केला व सर्व वसाहत जाळून टाकली
होती ती वसाहत



दलितांच्या विविध प्रश्नावरील
मोर्च्यांस संबोधित करताना
पार्थ पोळके, लक्ष्मण माने,
विजय मांडके व इतर

## सातारा जिल्हा
## प्राकृतिक




## सातारा जिल्हा
## प्रमुख रस्ते व लोहमार्ग



# समतेचे अग्रदूत

